THE BOOK WAS DRENCHED

TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY

OU_192495

UNIVERSAL
LIBRARY

केळकरांचे लेख

खंड १ ला

सन १९०४ ते १९२४ पर्यंतचे

शिक्षण-विषयक लेख व व्याख्यानें

लेखक

नरसिंह चिंतामण केळकर

मोलण्जंट्स्

श्रीभारत बुक-डेपो,

चंद्रमहाल, गिरगांव—मुंबई नं ४ व पुणें शहर.

प्रथमावृत्ति—१९२५

किंमत दोन रुपये

प्रकाशक
शिवराम वामन आपटी,
श्रीभारत प्रकाशन कार्यालय
५३८ शनवार, पुणे.

[सर्व हक्क ग्रंथकर्त्याने स्वाधीन ठेविले आहेत]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७८ शनवार, पुणे.

प्रकाशकाचे चार शब्द.

महाराष्ट्रांत महाराष्ट्राच्या संस्कृतीचें संवर्धन व्हावें व तें होण्यास आपल्या शक्त्यनुसार आपला स्वतःचाहि हातभार लागावा या हेतूनें श्रीभारत-प्रकाशनकार्यालय स्थापन झालेलें आहे. श्री० **तात्यासाहेब केळकर** यांनीं सदय अंतःकरणानें हें शिक्षण विषयक पुस्तक आम्हांस देऊन आमच्या कार्यास फार चांगली सुरवात करून दिली याबद्दल आम्ही त्यांचे कृतज्ञ आहों.

या पुस्तकांत सन १९०४ पासून तों तहत आजतागायतपर्यंतचे बहुतेक शिक्षणविषयक लेख आले आहेत. या कालाचे दोन भाग पडतात. एक १९०४ पासून ते १९२०पर्यंत व दुसरा १९२० ते १९२४पर्यंत. पहिल्या विभागांत शिक्षणविषयाचा विचार संपादक व सल्लागार या नात्यानें केळकर यांचेकडून झाला व दुसऱ्या विभागांत असहकारितेच्या चळवळीमुळें एक राष्ट्रीय कॉलेज स्थापन करण्याची जबाबदारी त्यांजवर येऊन पडली. यामुळें या पुस्तकाचें महत्त्व वेगळें सांगण्याचें कारण नाहीं.

या पुस्तकांत **स्त्रियांची युनिव्हर्सिटी** हा लेख आलेला आहे. हा लेख केळकर यांचा नसतां नजरचुकीनें या ग्रंथांत छापला गेला, त्याबद्दल आम्ही दिलगीर आहों. प्रो० कर्वे यांच्या युनिव्हर्सिटीसंबंधानें ज्या सूचना या लेखांत केलेल्या आहेत त्यांतील बहुतेक सध्यां तेथें अमलांत आल्या आहेत. गैरसमज असण्याचा संभव असूं नये म्हणून हा खुलासा केला आहे.

या पुस्तकांत जे लेख आले आहेत ते सरसकट तारीखवार न देतां वर्गीकरण करून विषयवार दिले आहेत. ते विभाग म्हणजे (१) युनिव्हर्सिटी (२) सक्तीचें शिक्षण (३) राष्ट्रीय शिक्षण (४) असहकारिता (५) सर्व साधारण (६) व्याख्यानें. तारीखवारीनें लेख वाचतांना त्या त्या विषयाची सांखळी अखंड रहात नाहीं म्हणून ही योजना केली आहे.

व्याख्यानांचा स्वतंत्र वेगळा विभाग पाडण्याची कल्पना मागाहून आल्याकारणानें (१) लोकमान्य टिळकांच्या चरित्रासंबंधीं विद्यार्थ्यांस चार उपदेशपर शब्द (२) सार्वजनिक सभेंतील व्याख्यान.

(३) खेड्यांतील शिक्षण व अस्पृश्य वर्ग, हीं व्याख्यान पुढील स्वतंत्र विभागांत घेतां आलीं नाहींत.

या पुस्तकाकरितां **लोकमान्य** पत्रांत प्रसिद्ध झालेल्या 'सासवनें' येथील भाषणाचा व सांगलीच्या 'राष्ट्रीय शिक्षणावरील' व्याख्यानाचा उपयोग झाला. सदर पत्रकर्त्यांचे आम्ही त्याबद्दल ऋणी आहों. तसेंच या पुस्तकास अनपेक्षित रीतीनें मदत आली. या शिक्षणविषयक लेखांचें छपाईचें काम चालूं आहे असें कळतांच टिळक महाविद्यालयांतील एका माजी विद्यार्थ्यानें असहकारितेंतील स्वानुभव व केळकर यांनीं वेळोवेळीं प्रकट केलेले उद्गार लिहून काढून त्यांचें टांचण आम्हांकडे पाठवून दिलें याबद्दल या पदवीधराचे आम्ही फार आभारी आहों.

आम्ही वेळोवेळीं पुण्यांत नसतां येथील विजय प्रेसचे मालक श्री० **गोखले** यांनीं काम जबाबदारीनें व सुबक करून दिलें हें कृतज्ञतेनें नमूद करणें भाग आहे.

या पुस्तकाबाबत आम्हांस आमचे मित्र श्री० **काशिनाथ नरसिंह केळकर** यांची मदत विशेष झाली. व्याख्यानांच्या विभागांतील बहुतेक सर्व व्याख्यानें त्यांनींच आमचे विनंतीवरून आम्हांस लिहून दिलीं. हीं व्याख्यानें म्हणजे (१) लो० टिळकांच्या चरित्रासंबंधीं चार उपदेशपर शब्द (२) अस्पृश्यवर्ग व खेडेगांवांतील शिक्षण (३) सार्वजनिक सभेंतील व्याख्यान (४) पुण्यांतील विद्यार्थ्यांची सभा (५) शिक्षणावरील बहिष्कार–शिवमंदिरातील सभा (६) प्रो० घारपुरे व 'राष्ट्रीय शिक्षण' (७) डेक्कन कॉलेजातील विद्यार्थ्यांस उपदेश, वगैरे. हीं व्याख्यानें लिहून सुमारें पन्नास साठ पृष्ठांचा मजकूर या पुस्तकासाठीं त्यांनीं परिश्रमपूर्वक तयार करून दिला याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होतील. असहकारितेच्या धामधुमींत ज्यांनीं हीं व्याख्यानें ऐकलीं असतील त्यांना हीं व्याख्यानें किती हुबेहूब वठलीं आहेत हें सांगण्याचें कारण नाहीं.

सरतेशेवटीं, आपला अमूल्य वेळ खर्च करून वरील व्याख्यानें नजरेखालीं घालून तपासून दिलीं याबद्दल ग्रंथकार श्री० **न. चिं. केळकर** यांचे कृतज्ञतापूर्वक पुनः आभार मानून, हे चार शब्द पुरे करितों.

प्रकाशक

अनुक्रमणिका

विषय	पृष्ठ
हिंदु विश्वविद्यालय	१
हिंदु युनिव्हर्सिटी	८
बनारस हिंदु कॉलेजांतील फूट	१६
काशी येथील नवीन विद्यापीठ	२२
समर्थ विद्यालयावर गदा	२९
राष्ट्रीय शिक्षणाचें पुढें काय?	३८
स्त्रियांची युनिव्हर्सिटी	४३
पुण फीमेल ट्रेनिंग कॉलेज	४९
नाथीबाई कन्याशाळेचें संमेलन	५६
खोडसाळ टीकेस उत्तर	५९
प्रो० कर्वे व राष्ट्रीय स्त्री शिक्षण	६३
जुन्या विद्यापीठांची आरती	६५
देशी भाषेंतून शिक्षण	७२
मातृभाषा हाच स्वराज्याचा पाया	७६
देशी भाषांतूनच परीक्षा घ्या	९०
युनिव्हर्सिट्या व देशी भाषा	९६
सक्तीचें शिक्षण व त्याचा खर्च	१०३
सोन्यासारखी संधी दवडली	१२३
मुलाच्या शिक्षणांतील षड्रिपु	१३१
देशी राजकुमारांचें शिक्षण	१४१
प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते	१४७
शील सुधारणारें शिक्षण	१५४
हीनजाति व शिक्षण	१६१
राष्ट्र व शिक्षण	१६८
सरकार व शिक्षण	१७४
शास्त्रीय शिक्षणाचा उत्कर्ष	१८१
शेतकी शिक्षण व सुधारणा	१८८
पुण्याचें शेतकी कॉलेज	१९५

शिक्षण व राजकारण	२०१
अमेरिकेंतील हिंदी विद्यार्थी-संघ	२०९
मोडी कीं बाळबोध	२१६
विद्यार्थी व सभा	२३०
हातकामाचें शिक्षण	२३८
गरीब शाळामास्तरांची कैफियत	२५०
हे जबाबदार दिवाण	२५७
खेड्यांतील शिक्षण व अस्पृश्यवर्ग	२६०
दिवाणसाहेबांचा कारभार	२६४
निवडणुकीचा निकाल	२६८
टिळक व इंग्रजी शिक्षणपद्धति	२७०
लो० टिळकांच्या चरित्रासंबंधी	२७५
सार्वजनिक सभेंतील व्याख्यान	२८५
लो० टिळकांचें पुण्यांतील स्मारक	२८६
पुणें येथील राष्ट्रीय शिक्षणाची योजना	२८९
राष्ट्रीय शिक्षण व पालकांचें कर्तव्य	२९९
पुणें टिळक-महाविद्यालय	३०६
विद्यार्थी व असहकारिता	३०९
बहिष्कारयोगी विद्यार्थ्यांची सोय	३२२
टिळक विद्यापीठाची योजना	३३२
पदवीदान—समारंभ	३३९
व्याख्यानें	
पुण्यांतील विद्यार्थ्यांची सभा	३४७
शिक्षणावरील बहिष्कार	३४९
प्रो० घारपुरे व 'राष्ट्रीय शिक्षण'	३५७
विद्यार्थ्यांना उपदेश	३७१
वैश्य विद्याश्रम—सासवनें	३७४
राष्ट्रीय शिक्षण	३७६
प्रासंगिक उद्गार	३८०

केळकरांचे लेख

हिंदु 'विश्वविद्यालय'*

सन १९०५ सालीं बनारस येथें राष्ट्रीय सभा भरली त्या प्रसंगीं ना० मदनमोहन मालवीय यांच्या खटपटीमुळें हिंदु 'विश्वविद्यालया'ची योजना तेथें जमलेल्या सर्व मंडळीपुढें मांडण्यांत आली होती हें प्रसिद्धच आहे. हिंदु युनिव्हर्सिटीसंबंधानें त्या वेळीं समाजांत किती उत्साह उत्पन्न झाला होता हें, केसरीच्या २ जानेवारी १९०६ रोजच्या अंकांत बनारसहून आलेली जी तार छापण्यांत आली होती तिचाच उतारा खालीं दिला आहे, त्याजवरून वाचकांस चांगलें कळून येईल.

"रविवारीं सकाळीं 'टाऊन हॉल'मध्यें निरनिराळ्या प्रांतांतील प्रमुख प्रतिनिधींची सभा भरली होती. त्या वेळीं अकोल्याचे रा०ब० विष्णु मोरेश्वर महाजनी यांना अध्यक्षस्थान देण्यांत आलें होतें. अलाहाबादचे प्रसिद्ध पुढारी पंडित मदनमोहन मालवीय यांनीं हिंदु युनिव्हर्सिटीची आपली कल्पना सभेपुढें मांडली. त्यावर निरनिराळ्या प्रांतांतील पुढाऱ्यांनीं बराच वादविवाद केला. ना० सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनीं बनारसयुनिव्हर्सिटीला आपलें पूर्ण अनुमोदन दिलें व कलकत्त्यास निघणाऱ्या राष्ट्रीय युनिव्हर्सिटीचें व या युनिव्हर्सिटीचें एकीकरण व्हावें, असें त्यांनीं सांगितलें. यासंबंधानें बोलतांना रा० टिळक यांनीं सांगितलें कीं, युनिव्हर्सिटीकरितां काम करणारे लोक प्रथमतः पुढें आले पाहिजेत, म्हणजे कामास लागणारे पैसे आपोआप मिळतात. स्वदेशी युनिव्हर्सिटीच्या कामाकरितां

* केसरी, तारीख १३ जून १९११ इसवी.

इलाख्याच्या वतीनें एक लायक मनुष्य देण्याची जबाबदारी रा० टिळक यांनीं आपल्या अंगावर घेतली. रा० टिळक यांच्या भाषणानें लोकांतील उत्साह दुणावला. प्रो० विजापूरकर व प्रो० भानु यांनीं या युनिव्हर्सिटीचें काम करण्यास आपण तयार आहों असें सांगितलें. पंडित मदनमोहन हे आपला वकिलीचा धंदा सोडून देऊन, या कामास स्वतःस वाहून घेण्यास तयार आहेत, असें जाहीर करण्यांत आलें. ना० सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनीं आपलें बाकी राहिलेलें आयुष्य या कामीं खर्च करण्याचें कबूल केलें. रा० टिळक यांनींहि स्वतः तीन वर्षें या कामास देण्याचें वचन दिलें. मद्रासचे मि० सुब्रह्मण्य आय्यर यांनींहि सदरप्रमाणेंच वचन दिलें. सातारचे वकील रा० करंदीकर यांनीं प्रो० विजापूरकर यांच्या तीन वर्षांच्या खर्चाची हमी घेतली. रा० माधवराव बोडस यांनींहि अशाच तऱ्हेची मदत करण्याचें वचन दिलें. मुनशी माधवलाल यांनीं या युनिव्हर्सिटीस तीन लाख रुपये देण्याचें अभिवचन दिलें. इतर लोकांनींहि याचप्रमाणें वचनें दिलीं असून आतांपर्यंत नऊ लाख रुपये जमले आहेत. कलकत्त्यास जुळलेला व हा फंड एक करण्याचें ठरलें. या युनिव्हर्सिटीची काय व्यवस्था करावयाची हें ठरविण्याकरितां निरनिराळ्या प्रांतांतील प्रमुख लोकांची कमिटी नेमण्यांत आली आहे. सायंकाळीं राष्ट्रीय सभेच्या मंडपांत या गोष्टीचा विचार करण्यासाठीं पुन्हा सभा भरली. त्यावेळीं मुनशी माधवलाल यांनीं अध्यक्ष-स्थान स्वीकारलें होतें. ना०सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचें भाषण होऊन बनारसच्या युनिव्हर्सिटीची स्थापना झाली असें त्यांनीं जाहिर केलें. ही युनिव्हर्सिटी विशेषतः हिंदु असली तरी मुसलमान, ख्रिस्ती आदिकरून इतर धर्मा-च्याही विद्यार्थ्यांना युनिव्हर्सिटींत बंदी ठेविलेली नाहीं. परंतु सर्व व्यवस्था व धोरण हिंदु लोकांच्याच हातीं राहील."

दुर्दैवानें हिंदु विश्वविद्यालयाच्या या योजनेला पुढें आजतागायत परिणत असें स्वरूप आलें नाहीं. आरंभशूरत्वाचा दोष असलाच तर तो केवळ आम्हां 'दाक्षिणात्यां'मध्येंच नाहीं, हें वरील उताऱ्यांत जीं अनेक नांवें आलीं आहेत त्यांजवरून दिसून येईलच. पण या दोषाचे अंशभागी अनेक असले तरी विश्वविद्यालयाची योजना अमलांत आणण्याचें काम मागें पडलें, ही गोष्ट मात्र दुःखानें नमूद करणें जरूर आहे. आतां या बाबतींतले

श्रम शिथिल होण्यास इतरहि कारणें नव्हतीं असें नाहीं. बनारस येथें ना० गोखले यांनीं वसाहतीच्या स्वराज्याहून आमचें राजकीय ध्येय कमी नाहीं हें स्पष्ट म्हणून दाखविलें व पुढील सालीं कलकत्त्यास दादाभाई नौरोजी यांनीं स्वराज्याच्या कल्पनेस रंगरूप आणलें, तेव्हांपासून पुढें तीन वर्षेंपर्यंत स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीयशिक्षण या चार अंगांनीं राष्ट्रीयसभांतर्गत राष्ट्रीय चळवळीस जोर आला. पैकीं राष्ट्रीय शिक्षणाची योजना बंगाल, वऱ्हाड व मुंबई या प्रांतांत सुरूहि झाली. तथापि हिंदी युनिव्हर्सिटीची कल्पना मागें पडण्यास १९०८ सालापासून झालेले अत्याचार आणि अत्याचारांच्या पावलांवर पाऊल टाकीत येणारी दडपशाही हीच विशेषतः कारणीभूत झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अस्वस्थतेबद्दल खरी जबाबदारी कोणाचीहि असो, परंतु राष्ट्रांत अस्वस्थता उत्पन्न झाली होती खरी; व या अस्वस्थतेमुळें राष्ट्रीय शिक्षणाचे जे थोडेसे प्रयत्न झाले. तेहि बहुतेक सरकाराकडून हाणून पाडण्यांत आले. बंगालमधील राष्ट्रीय शिक्षणाचें मंडळ अद्यापि जिवंत आहे हें खरें; तथापि, त्याच्या कामाच्या मूळच्या स्वरूपांत बराच फरक पडला आहे. वऱ्हाड प्रांतांतील राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा निव्वळ तंबी मिळाल्याबरोबर बंद पडल्या; व मुंबई इलाख्यांतील तळेगांवची शाळा अराजक समितीचा कायदा लावून सरकारकडून सक्तीनें बंद करण्यांत आली.

परंतु संस्था मेल्या तरी कल्पना मरत नाहींत, असें जें म्हणतात तेंच राष्ट्रीय शिक्षणासंबंधानेंहि घडून आलें आहे. असें म्हणण्यास हरकत नाहीं. राष्ट्रीय शिक्षणाचे व्यक्तिशः कांहीं पुरस्कर्ते व सरकार या दोघांच्याहि चुकीमुळें त्या शिक्षणाला नसतें राजकीय महत्त्व देण्यांत आलें होतें तें बाजूस ठेवून, निर्विकार मनानें विचार करणारास असें दिसून येईल कीं, केवळ 'शिक्षण'विषयक सुधारणेचा असा बराच भाग राष्ट्रीय शिक्षणाच्या मुळाशीं आहे; व राष्ट्रीय शिक्षणाच्या कांहीं शाळा जरी सरकारनें बुडविल्या तरी निवळ शिक्षणविषयक अशी जी सुधारणा ती या ना त्या रीतीनें घडून आल्यावांचून राहाणारच नाहीं. याचें एकच उदाहरण पुरें होईल. विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावयाचें तें देशी भाषांतून दिलें जावें, हें राष्ट्रीय शिक्षणापैकीं एक मुख्य तत्त्व आहे हें प्रसिद्धच आहे. तळेगांवास या तत्त्वाचा

अंमल जारी होता; व न्यू इंग्लिश स्कूलसारख्या शाळांतून म्हणजे सरकारी ग्रांट घेणाऱ्या शाळांतूनहि या तत्त्वाची परीक्षा पाहाण्याकरितां प्रयोग चालू होते. परंतु गेल्या महिन्यांत हायस्कुलांचा जो नवीन शिक्षणक्रम सरकारनें प्रसिद्ध केला आहे त्यामध्यें एक इंग्रजीखेरीज करून बाकी बहुतेक विषयांचें शिक्षण देशी भाषेंतूनच देण्याची शिफारस करण्यांत आली असून, हायस्कूलच्या अखेरच्या परिक्षांपर्यंत प्रश्नोत्तरें देशी भाषेंतून व्हावीं, अशीहि योजना झाल्याचें अनुमान निघतें. तात्पर्य, राष्ट्रीय शिक्षणाच्या या एका अंगाच्या सिद्धीला आतां खुद्द सरकारनेंच मदत केली आहे. इतर अंगांसहि सरकारास अशीच मदत करणें पुढें मागें भाग पडेल, यांत आम्हांस तर शंका वाटत नाहीं. पण हें होईपर्यंत नमुनेदार शाळा किंवा संस्था काढून त्यांच्या हातून राष्ट्रीय शिक्षणाचे विषय केवळ शिक्षणविषयक सुधारणेच्या दृष्टीनें साध्य करीत बसणें जरूर आहे. देशांतील सर्वच शिक्षण आम्ही आमच्या हातीं घेऊं, हा 'राष्ट्रीय शिक्षण' या शब्दाचा अर्थ नाहीं. तसें करण्यास सांपत्तिक व राजकीय अडचणी दुर्धर आहेत. पण राष्ट्रहिताच्या दृष्टीनें पाहतां शिक्षण कसें असावें लागतें हें सरकार परकें असल्यामुळें अगर इतर कारणांमुळें त्याच्या डोक्यांत भरत नसलें तर, तें नमुनेदार संस्थांतून केलेल्या प्रयोगांच्या द्वारें आम्ही त्यांस दाखवूं व कालांतरानें तरी लोकमताच्या जोरावर त्या सुधारणा त्यांजकडून अमलांत आणवूं, हाच राष्ट्रीय शिक्षणाच्या सर्व समंजस पुरस्कर्त्यांचा हेतु आहे व तो सिद्धीस गेलाच पाहिजे.

देशी भाषेंतून शिक्षण देण्याप्रमाणें धर्म व नीति यांचें शिक्षण देणें हेंहि राष्ट्रीय शिक्षणाचें एक अंग आहे. पैकीं धर्मशिक्षण सरकारास प्रत्यक्ष देतां येत नसलें तरी ज्यांचें त्यांनीं तें देण्याची योजना केल्यास सरकारास त्या कामीं मदत करणें जरूर आहे. नैतिक शिक्षणाचा प्रश्न सरकारानें स्वतंत्र रीतीनें हातीं घेतला आहे. व खऱ्या लोकमताच्या निदर्शकांचें सहकारित्व व पाठबळ मिळविण्याचा प्रयत्न सरकार करील तर ज्या प्रकारचें नैतिक शिक्षण मुलांस देणें योग्य आहे तें देण्याची योजना होणें अवघड नाहीं. पण अशा रीतीनें किरकोळ बाबींची व्यवस्था लागत जात असली तरी विश्वविद्यालयाची जरूरी नाहींशी होत नाहीं; किंबहुना ती वाढतच जाते; व आज पांच वर्षांनंतर हिंदु विश्वविद्यालयासंबंधाची कल्पना पुनः लोकांपुढें आली

आहे, यावरून राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेची प्रगतीच दिसून येईल. आतां दरम्यान राजकीय हक्कांसंबंधानें आमच्या मुसलमानबंधूंची चळवळ होऊन त्या चळवळीबरोबर मुसलमानी विश्वविद्यालयाचीहि तळी उचलली गेली आहे; व या चळवळीस प्रत्युत्तर म्हणून हिंदुसभेच्या स्थापनेबरोबरच हिंदु विश्वविद्यालयाची योजनाहि तितक्याच बाह्य शक्तीच्या जोरानें पुढें झाली आहे हें खरें. तथापि राष्ट्रीय शिक्षण व हिंदु राष्ट्राची प्रगति या दोन गोष्टी परस्परपोषक व उपोद्बलक अशाच असल्यामुळें, एकीचा दुसरीस दुजोरा मिळणें स्वाभाविकच आहे. पांच वर्षांपूर्वीच जें व्हावयाचें होतें तेंच आज झालें तर त्यांत कांहीं विशेष नाहीं; व केवळ हिंदु विश्वविद्यालयाच्या योजनेविषयीं पसंतीदर्शक असा लेख आज केसरीस मुद्दाम लिहिण्याचें कारणहि नव्हतें. पण पंडित मदनमोहन यांनीं मिसेस बेझंट यांजबरोबर विद्यालयाच्या खटपटींत मिळून वागावें कीं नाहीं, हा एक गौण प्रश्न पुढें आला असून त्यावर बरेच तर्कवितर्क चालू आहेत. सबब त्यासंबंधानें मात्र दोन शब्द लिहिणें जरूर आहे, असें आम्हांस वाटतें.

सन १९०५ सालीं पंडित मदनमोहन यांची योजना पुढें आली त्यावेळीं मिसेस बेझंट यांच्याशीं सहकारित्व करून विश्वविद्यालय स्थापावयाची कल्पना कोणाच्या मनांत नव्हती ही गोष्ट खरी. तथापि, हिंदु विश्वविद्यालय स्थापण्याची बेझंटबाईची कल्पना अगदींच नवी नाहीं; पंडितजींच्या कल्पनेहून ती जुनी आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण थिऑसफिस्ट काय किंवा सनातनवादी काय, कोणालाहि चुटक्यांचा मांडव घालून विश्वविद्यालयें उभारतां येत नाहींत. संस्था हें मुख्यतः पैशाचें काम असतें. काम करण्यास मनुष्य स्वतःस वाहून घेऊन निघाला म्हणजे पैशास वाण पडत नाहीं हें सर्वसामान्य तत्त्व बरोबर आहे; पण अशी स्वतःस वाहून घेणारीं मनुष्यें च कमी म्हणून कां म्हणाना, मोठमोठ्या रकमा हुकमी जमण्यास फार पंचाईत पडते. हवा तेवढा पैसा जमत नाहीं एवढें खरें, मग कारण कांहींहि असो. यःकश्चित् एखादें हायस्कूल स्वतंत्र रीतीनें चालवावयाचें म्हटलें तर हवा तितका पैसा एकदम जमत नाहीं. मग विश्वविद्यालयाची गोष्ट दूरच! मुसलमानी विश्वविद्यालयाच्या चालकांस सरकाराकडून असें सांगण्यांत आल्याचें समजतें कीं, तुम्ही प्रथम पंचवीस लक्ष रुपये जमवाल

तर मग स्वतंत्र विद्यालयास सनद देण्याच्या प्रश्नाचा विचार करतां येईल. हिंदु विद्यालय काढावयाचें झालें तर त्याच्या चालकांसहि हाच जबाब मिळणार! अर्थात् अशा अडचणीमुळें काशी येथील सेंट्रल हिंदु कॉलेज हा मूलाधार घेऊन त्यावरच हिंदु विश्वविद्यालयाची रचना करावी अशी कल्पना सुचली; व खरोखरच ती कांहीं वावगी नाहीं. शक्य असेल तर विलायतेप्रमाणें किंवा यूरोप–अमेरिकेप्रमाणें हिंदुस्थानासहि प्रांताहाय स्वतंत्र विश्वविद्यालयें हवीं आहेत; पण तीं मिळणार कशीं? तिकडे द्रव्य अलोट व विद्यावृद्धीकडे तें खर्च करण्याची बुद्धि विशेष. यामुळें कोट्यावधि रुपये खासगतचे देऊन धनिक विद्याप्रिय गृहस्थांनीं निरनिराळ्या युनिव्हर्सिट्या स्थापण्यास मदत केली आहे. पण दरिद्री हिंदुस्थानांत तें कसें घडून येणार? निदान आपल्या समाजांतील दानधर्माचा ओघ केवळ उपयुक्त विद्यावृद्धीकडे वळेपर्यंत तरी हें होणें अशक्य आहे. बेझंटबाईंनीं हिंदी शिक्षणास स्वतःस वाहून घेतलें; पण लोकांचा थिऑसफीविषयीं अनादर म्हणून त्यांस पंचवीस लक्ष रुपये मिळत नाहींत; आणि पंडित मदनमोहन यांच्याविषयीं लोकांत आदर आहे खरा, पण विश्वविद्यालयाच्या कार्याकडे स्वतःस सर्वस्वीं वाहून घेण्यास त्यांना ईश्वर बुद्धि देत नाहीं! मिळून भट आहे तर तीथ नाहीं आणि तीथ आहे तर भट नाहीं हींच रड!

हिंदुस्थानच्या परिस्थितीमुळें उत्पन्न होणारें हें वैगुण्य घालविण्यास एकच उपाय आहे; व तो, जवळ जवळ एकाच दिशेस जाणाऱ्या अनेक शक्तींचा उपयोग करून संघ बनविणें हा होय. यंत्रशास्त्रांतील दांत्यांच्या चाकांसारखा हा उपयोग होय. हीं दंतमय चक्रें आपले दांत परस्परांवर घांसतील तर त्यापासून घातक ठिणग्या मात्र पडतील; पण तेंच एखाद्या योजकानें दांत्यांत दांते बसून जातील अशी चक्रांची रचना केल्यास त्यांपासून उपयुक्त शक्ति उत्पन्न होईल. हिंदुधर्मांत आज शेंकडों पंथ आहेत व पुढेंहि शेंकडों पंथ राहतील. प्रत्येक पंथास आपापल्या विशिष्ट मतांचें धर्मशिक्षण देणारें 'विश्वविद्यालय' हवें, असें वाटणें स्वाभाविक आहे, पण मिळणें मात्र अशक्य आहे. पण तेंच या सर्वांनीं मिळून आपापल्यामध्यें सर्वसाधारण असें हिंदुधर्मतत्त्व काय आहे याचा विचार करून त्या तत्त्वाचें शिक्षण ज्यांत दिलें जाईल असें हिंदु विश्वविद्यालय काढावयाचें

मनांत आणलें तर तें मात्र सर्वथा शक्य आहे. सनातनधर्मी व थिऑसफिस्ट यांच्यामध्यें सहकारिता होण्यास ज्या अडचणी दिसतात त्याहीपेक्षां हिंदुधर्मांतर्गत निरनिराळ्या पंथांची एकवाक्यता होण्यास अडचणी अधिक दुर्धर आहेत. कारण थिऑसफी हा कोणच्याच धर्मास किंवा धर्मपंथास विरोधी असा नाहीं. थिऑसफी हा धर्मच नव्हे, तें एक तत्त्वज्ञान आहे; प्रत्येक धर्मपंथांतलें रहस्य त्याच्या अनुयायांस सांगून त्या पंथावर प्रेम वाढविण्यास सांगणारें व शिकविणारें असें तें ज्ञान आहे. यास्तव सनातनवाद्यांची आणि थिऑसफिस्ट लोकांची एकवाक्यता होण्यास कांहीं हरकत नाहीं, असें आम्हांस तरी वाटतें.

थिऑसफीचीं तत्त्वें व थिऑसफिकल सोसायटीच्या राज्याचा कारभार या दोन गोष्टी वास्तविक पृथक् आहेत. पैकीं दुसरी गोष्ट कोणास नापसंत असल्यास त्यास पहिलीहि नापसंत झालीच पाहिजे असें नाहीं. बेझंटबाईमध्यें बुद्धिमत्ता, वक्तृत्व, करारीपणा व परिश्रमशीलता या गुणांचा उत्कर्ष असल्यामुळें या गुणांचा आश्रय करून असणारे कांहीं दुर्गुणहि आहेत. त्यांचा स्वभाव हट्टी आहे; आपलें वर्चस्व सर्व गोष्टींत असावें असा त्यांचा अट्टाहास असतो; थिऑसफिकल सोसायटीच्या कारभारांत आपलें वर्चस्व राहण्याकरितां क्षुद्रमनाच्या राजकारणी पुरुषांनाच सुचतील अशा युक्त्या कल्पना व क्लृप्त्याहि त्यांनीं वेळोवेळीं योजल्या आहेत; पाश्चिमात्य लोकांच्या श्रेष्ठत्वाविषयीं त्यांच्या कल्पना अँग्लोइंडियन लोकांस साजतील अशाच आहेत; आणि हिंदी राजकारणांत, थिऑसफीचा व तिच्या संस्थांचा बचाव करण्याकरितां म्हणा किंवा कसेंहि म्हणा, त्यांचा झोंक सरकारचें पक्षपातित्व करण्याकडे असतो, या सर्व गोष्टी उघड आहेत. तथापि, व्यक्ति व संस्था यांच्यांतील भेद कोणींहि विसरतां कामा नये. थिऑसफी म्हणजे केवळ ॲनि बेझंट नव्हे–विशेषतः बनारसचें सेंट्रल हिंदु कॉलेज म्हणजे निवळ थिऑसफी नव्हे–हें प्रस्तुत वादांत लक्षांत ठेवण्यासारखें आहे. शिवाय पंडित मदनमोहन व ॲनि बेझंट या व्यक्ति एकत्र आल्या असतां पंडितजी म्हणजे बाईस सर्वस्वीं हार जाऊन त्यांच्या पचनीं पडतील असें आमचें मन सांगत नाहीं. सनातनवाद्यांमध्येंहि नेट व करारीपणा आहेच. आणि कदाचित् या दोन शक्तींच्या एकत्र संचारानें मधलीच एखादी दिशा

सर्वमान्य होण्यासारखी निघेल, हेंच अधिक संभवनीय दिसतें. मनुष्य जसजसा मोठमोठ्या संस्थांची उपाधि आपल्यामागें लावून घेऊं लागतो, तसतशी त्याच्या अंगची वक्रता, खांचाखोंचा व विक्षिप्तपणाचे अवगुण घांसून निघतात. संस्थेविषयीं पत्करलेल्या मोठ्या अहंकारबुद्धींत व्यक्तिविषयक छोटा अहंकार निमीलन पावतो, असाच जगांतील अनुभव आहे. या दृष्टीनें पाहतां पंडितजी व बेझंटबाई यांनीं एकजुटीनें वागावें असें आम्हांस वाटतें. एवढेंच काय, पण कलकत्त्याच्या कौन्सिल ऑफ एज्युकेशननें (राष्ट्रीय-शिक्षण-मंडळानें)हि या दोघांस येऊन मिळावें व सर्वांनीं मिळून हिंदु युनिव्हर्सिटीची कल्पना सिद्ध करावी, असेंहि आम्ही म्हणतों. कारण हिंदी राष्ट्राच्या प्रगतीस योग्य असें शिक्षण देणें हें ध्येयसेंच काय, पण तिघांचे प्रत्यक्ष साधनमार्गहि जवळजवळ एकच आहेत. द्वैतांतून अद्वैत सिद्ध करणें हें जें आपल्या वेदांताचें मर्म आहे तेंच आपण आपल्या व्यवहाराला लावून वागूं लागलों तर किती तरी कल्याण होणार आहे !

हिंदु युनिव्हर्सिटी*

एक महिन्यापूर्वी हिंदु युनिव्हर्सिटीच्या स्वागतार्थ मुंबईस भरलेल्या सभेची हकीकत व तीन आठवड्यांपूर्वी पंडित मदनमोहन मालवीय यांच्याशीं झालेल्या आमच्या प्रतिनिधीच्या मुलाखतीची हकीकत केसरीच्या वाचकांनीं वाचली असल्यामुळें, त्यांना हिंदु युनिव्हर्सिटीच्या योजनेची बरीच कल्पना आली असेल. तथापि, या योजनेसंबंधानें आमचें स्वतःचें म्हणणें काय आहे हें सांगण्याची सवड पाहतां पाहतां आज मिळाल्यामुळें तें थोडक्यांत सांगण्याचा आमचा विचार आहे. सुमारें एक वर्षापूर्वी या विषयावर लिहितांना प्रस्तुत योजनेस आम्हीं सर्वसाधारणपणें आपली संमति दर्शविली होती; व तेंच आमचें मत अद्यापि कायम आहे. येवढेंच नव्हे तर नामदार पंडित मदनमोहन मालवीय यांनीं नेट धरून आपल्या कल्पनेला इतकें परिणत स्वरूप आणलें याबद्दल त्यांचें अभि-

* केसरी, तारीख ८ एप्रिल सन १९१३ इसवी.

नंदन करावें तेवढें थोडेंच होणार आहे असें आम्हांस वाटतें. कारण सन १९०५ सालीं बनारस येथील राष्ट्रीयसभेच्या प्रसंगीं पंडितजींनीं सर्व प्रांतांच्या पुढाऱ्यांची सभा भरवून त्यांच्यापुढें आपली योजना मांडली, ना० बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं नेहमींप्रमाणें वक्तृत्वपूर्ण असें भाषण केलें, व इतर प्रांतांतील पुढाऱ्यांपैकीं कित्येकांनीं आपण अमुक अमुक मदत करूं असें जाहीर केलें परंतु खरें बोलावयाचें म्हणजे त्या वेळीं या कल्पनेस मूर्त स्वरूप येईल अशी आम्हांस फारशी आशा वाटलीच नाहीं.

पण याचें कारणहि आम्ही सांगूं शकतों, व तें असें कीं, कोणतीहि योजना ही मूळ एखाद्या कोणच्या तरी मनुष्याची खास कल्पना असते, व तिला मूर्त स्वरूप येण्याला जो उत्साहपूर्वक उद्योग अवश्य असतो तो तोच मनुष्य करूं शकतो. एकाची कल्पना व दुसऱ्याचा उद्योग हें सहसा शक्य नसतें; कां कीं, ममत्वबुद्धि हीच सर्व उद्योगांची जननी आहे. ममत्व हें अहंकारमिश्रित असो किंवा निरहंकारयुक्त असो, पण ममत्व पाहिजे; नाहींतर हातून उद्योग होणारच नाहीं. 'पैसा असला म्हणजे राजाची राणीसुद्धां मिळते' अशी एक ग्राम्य म्हण आहे. पण कितीहि पैसा देऊं केला तरी दुसऱ्याचें मूल दाखवून कोणच्याहि स्त्रीला पान्हा फोडणें अशक्य आहे ! तसेंच राजाच्या राणीलाहि जर पुत्रमुख पहावें अशी इच्छा असली तर गर्भारपण व बाळंतपण यांचे क्लेश व कष्ट सोसले पाहिजेत. त्याकरितां भाडोत्री 'नर्स' ठेवून काम भागण्याची युक्ति आधुनिक शास्त्रनिष्णातांनाहि अद्यापि साधलेली नाहीं. सार्वजनिक कामाचीहि गोष्ट अशीच आहे. ज्याच्या बुद्धींत एखाद्या कल्पनेची गर्भधारणा होईल तोच तिच्याकरितां खटपट करील व झीज सोशील. आणि हिंदु युनिव्हर्सिटीची कल्पना पंडितजींची होती या गोष्टीचा मुख्य पुरावाहि हाच कीं, ते आपल्या वकिलीच्या दसराला गांठ मारून महिन्याची कांहीं नाहीं तरी हजार दोन हजार रुपयांची प्राप्ति बुडवून, युनिव्हर्सिटीकरितां वर्गणी मिळवावयाला बाहेर पडले; व जोंपर्यंत हा उद्योग स्वार्थत्यागपूर्वक करण्यास ते बाहेर हिंडतील, तोंपर्यंत हिंदु-युनिव्हर्सिटीची कल्पना फळाला येणार याविषयीं आम्हांला केव्हांहि शंका वाटणार नाहीं.

हिंदु युनिव्हर्सिटीची मूळ कल्पना १९०५ सालीं पुढें आली, तेव्हां-

पासून अवघ्या सात वर्षांत तिला अनेक बाजूंनीं बरेंच स्वरूप आलें आहे. युनिव्हर्सिटीच्या फंडाची रक्कम आतांपर्यंत सुमारें पंचवीस लक्ष रोख जमली आहे, व ही रक्कम कमींत कमी एक कोटिपर्यंत नेण्याचा तिच्या पुरस्कर्त्यांचा इरादा आहे. एवढेंच काय, पण आषणांस निदान तीन कोटि रुपये मिळाले पाहिजेत अशी महत्त्वाकांक्षा मदनमोहन यांनीं बाळगल्याचें दिसतें. अल्पसंतुष्टता हा ब्राह्मणाचा धर्म खरा; पण तो केवळ त्याच्या स्वार्थाचा संबंध येतो तेथपर्यंतच समजावयाचा. परार्थ काय किंवा परमार्थ काय, यासंबंधानें ब्राह्मणानें अल्पसंतुष्ट असण्याचें कारण नाहीं; व त्रिवेणीक्षेत्रांतल्या या ब्राह्मणपंडितानें हिंदु विद्यालयाकरितां सामान्य मनुष्याच्या कल्पनेला अतीत अशी वर्गणीची रक्कम जमविण्याची ईर्षा धरली ही गोष्ट त्याच्या परार्थपरायणतेस शोभणारीच आहे. देशांतील मनुष्यांची दृष्टि मोठी होणें ही देशाच्या उत्कर्षाची एक खूणच आहे. १८९७ सालीं टिळकांच्या बचावाकरितां उभारलेली रक्कम ७०।८० हजारांपर्यंत गेली तेव्हां सर्व आश्चर्यानें थक्क झाले. पण समर्थविद्यालयाला किंवा पैसाफंडाला पाऊण पाऊण लाख रुपये वर्गणी जमली तेव्हां तितकें आश्चर्य वाटलें नाहीं; कारण दृष्टि मोठी होत चालली होती. ना० गोखल्यांच्या स्नेह्यांनीं व 'सर्वेट्स् ऑफ इंडिया' च्या हितचिंतकांनीं बिनबोभाट व या कानाची बातमी या कानाला न कळतां गेल्या ७।८ वर्षांत जी रक्कम गोखल्यांच्या स्वाधीन केली ती सुमारें दोन लाखपर्यंत तरी असावी! परलोकवासी जमशेटजी टाटा यांनीं शास्त्रीय शोधांच्या शाळेकरितां ३२ लक्ष रुपये दिले तेव्हां ती आधुनिक दानपद्धतींत एक क्रांतीच घडून आल्यासारखी वाटली. पण आज पहावें तों पंडित मदनमोहन हिंदु युनिव्हर्सिटीच्या कार्याकरितां तीन कोटी रुपये जमविण्याच्या गोष्टी बोलत आहेत!

आणि भावनेच्या मानानें थोडें तरी फळ आल्यावांचून राहावयाचें नाहीं. जगामध्यें इतर देशांत जेथें शिक्षणाचा फैलाव झालेला आहे, तेथेंहि अशाच गोष्टी घडत असतात. अमेरिकेंत १८७१ ते १९०१ या तीस वर्षांत मिळून खासगी लोकांनीं साठ कोटि रुपये युनिव्हर्सिट्या काढण्याकरितां खर्च केले; म्हणजे दरसाल सुमारें दोन कोट रुपये खासगी वर्गणी देण्यांत आली. इंग्लंडांतहि या तीस सालांत साडेसात कोटि रुपये इतकी खासगी वर्गणी

युनिव्हर्सिट्यांप्रीत्यर्थ देण्यांत आली. हिंदुस्थान, अमेरिका व इंग्लंड यांच्याहून गरीब आहे खरें पण हिंदु युनिव्हर्सिटीसारखी संस्था स्थापण्यास लागणारे दोन किंवा तीन कोट रुपये देण्याला कांहीं हिंदुस्थान गरीब नाहीं! सरकारनें एकंदरीनें शिक्षणावर किती पैसा खर्च कराषा व ते खरोखर किती खर्च करतात या प्रश्नाचा विचार या बाबतींत करण्याचें कारण नाहीं. त्यांचा बरेवाईटपणा त्यांचा त्यांना. पण हिंदु युनिव्हर्सिटीसारख्या विशिष्ट धर्माच्या संस्थेला सरकार पैशाची मदत करील किंवा त्यांनीं ती करावी अशी आमची अपेक्षा नाहीं. किंबहुना या बाबतींत नुसतें गप्प बसायला काय घ्याल असेंच सरकारास विचारण्याची पाळी आहे. अशा वेळीं हिंदु युनिव्हर्सिटी ही आम्हां हिंदुलोकांची आवडती संस्था, व तिच्याकरितां आम्ही हिंदु लोक काय करीत आहों, इतक्यापुरताच कोणीहि विचार करणार. सरकारनें करावें तें केलें नाहीं, म्हणून आम्हीं करावें तें न करणें हें केव्हांहि ठीक नव्हे. शिवाय हिंदु युनिव्हर्सिटीची ही योजना अशा प्रकारची आहे कीं, शंभरन्–शंभर वर्षें गेलीं तरी अशा योजनेस हात घालावा असें सरकारच्या कधींहि मनांत येणार नाहीं. पण आम्हीं हिंदु युनिव्हर्सिटी स्थापण्यासारखें महत्कृत्य करून दाखविलें तर आपलें कर्तव्य न केल्याबद्दल सरकारास ईर्षा वाटून तें करण्यास ते उद्युक्त तरी होतील.

सुदैवानें विद्यादानाची प्राचीन परंपरा आम्ही अद्यापि विसरलों नाहीं. तक्षशिला, नालंद या ठिकाणीं असलेलीं प्रचंड प्राचीन विद्यापीठें, पदरीं दहा दहा हजार विद्यार्थी बाळगून, त्यांना अन्नवस्त्र फुकट देऊन शिकविणारे वसिष्ठ, शौनक यांसारखे प्राचीन कुलपति यांची स्मृति नष्ट होण्यापूर्वीच आधुनिक कालानुरोधानें शिक्षण देण्याचा धर्मादाय करण्यास आपण हिंदु लोकांनीं सुरवात केली आहे. संस्कृत ही मृतभाषा; पण तिला सरकारदरबारीं कोणी फारसें विचारीत नाहीं, अशी स्थिति असतां आम्ही किती तरी संस्कृत पाठशाळा अद्यापि खासगी रीतीनें चालवीत आहों! इतर प्रकारच्या खासगी शिक्षणसंस्थाहि कांहीं थोड्या नाहींत. मद्रासचें पाछापाचें कॉलेज व शाळा, पुण्याचें डेक्कन एज्युकेशन सोसायटीचें कॉलेज व शाळा, तळेगांवचें माजी समर्थविद्यालय, मुंबईची गोकुळदास तेजपाळची संस्था, अहमदाबादची रणछोडलाल छोटालाल टेक्निकल इन्स्टिटयूट, चिनुभाई

माधवलाल यांची शास्त्रीय शिक्षणाची शाळा, सिंधमधील दयाराम जेठमल कॉलेज, कलकत्त्यास व मुंबईस प्रेमचंद रायचंद यांनीं युनिव्हर्सिटीस देणग्या देऊन केलेलें आपलें स्मारक, लाहोर येथील आर्यसमाजाचें दयानंद अँग्लोवेदिक कॉलेज, हरिद्वारचें गुरुकुल व शीखांचें सरदार दयाळसिंग मिजिथा कॉलेज, अमृतसर येथील खालसा कॉलेज, मीरत येथील नानकचंद ट्रस्टच्या शाळा, दिल्ली येथील हिंदु कॉलेज, अलाहाबाद येथील कायस्थ पाठशाळा, बनारस येथील सेंट्रल हिंदु कॉलेज, बांकीपूर येथील बहार नॅशनल कॉलेज, भागलपूर येथील तेजनारायण जुबिली कॉलेज, मुझफरपूर येथील भूमिहर कॉलेज, कलकत्ता येथील सिटी कॉलेज, रिपन कॉलेज व मेट्रोपॉलिटन इन्स्टिटयूशन, तसेंच कलकत्त्याचें नॅशनल कॉलेज, कौन्सिल ऑफ एज्युकेशन आणि नॅशनल मेडिकल कॉलेज, बारिसाल येथील ब्रजमोहन इन्स्टिटयूशन, महाराजा कासिमबझार यांचें कृष्णनाथ कॉलेज, आग्रा येथील बळवंत रजपूत हायस्कूल—वगैरे अनेक खासगी शिक्षणसंस्था हिंदु लोकांच्या शिक्षणविषयक धर्मबुद्धीची साक्ष आज देत आहेत. असें असल्यामुळें या सर्वांहून श्रेष्ठ व सर्व हिंदूंना साधारण असें हिंदु लोकांचें एखादें खास विद्यापीठ असावें असें वाटणें साहजिकच आहे.

हिंदु युनिव्हर्सिटीमध्यें किती निरनिराळ्या कॉलेजांचा समावेश व्हावा हें अर्थात् पैशाच्या मदतीवर अवलंबून राहील; पण प्रसिद्ध झालेल्या योजनेवरून पाहातां खालील सात कॉलेजें काढण्याचा चालकांचा हेतु दिसतो. (१) संस्कृत कॉलेज, यांतच धर्मशिक्षणाची व्यवस्था केली जाईल. (२) भाषा व वाङ्मय यांचें कॉलेज; (३) शास्त्रें व उद्योगधंदे यांचें कॉलेज; (४) शेतकी कॉलेज; (५) व्यापारी शिक्षणाचें कॉलेज; (६) वैद्यक कॉलेज; (७) संगीत व ललितकला यांचें कॉलेज. इतकीं निरनिराळीं कॉलेजें उत्तम रीतीनें चालण्याला सालिना दोन कोटी रुपयांचें व्याज लागेल असें धेऊन चालण्यास हरकत नाहीं. एकटा मुंबई इलाखाच घेतला व त्यांतील सरकारी कॉलेजें तेवढीं लक्षांत घेतलीं तरी त्या सर्वांवर मिळून सालिना सुमारें ८।९ लक्ष रुपये खर्च होतो, व इतकें कायमचें उत्पन्न येण्याला अडीच तीन कोट रुपये व्याजीं लावून ठेवावे लागतील! बनारस येथील हिंदु युनिव्हर्सिटींत सर्व हिंदुस्थानांतील लोक येणार,

अर्थात् विद्यार्थ्यांचा भरणा तेथें बराच होईल. यास्तव एकंदर युनिव्हर्सिटी-वर खर्च सालिना पांच सहा लक्ष रुपये आल्यास नवल नाहीं. पण या बाबतींत आंथरूण पाहूनच हातपाय पसरणें जरूर आहे; व आमचें स्वत:चें तरी मत असें आहे कीं, वर निर्दिष्ट केलेलीं सातहि कॉलेजें सुरवातीस काढलींच पाहिजेत असें नाहीं. उदाहरणार्थ, वरील यादीपैकीं शेतकी कॉलेज, व्यापारी शिक्षणाचें कॉलेज आणि ललितकलांचें कॉलेज हीं सुरवातीस नसलीं तरी चालतील. संस्कृत विद्येचें व धर्मशिक्षणाचें कॉलेज, भौतिक शास्त्रें व उद्योगधंद्याचें कॉलेज आणि वैद्यक कॉलेज हीं मात्र प्रारंभींहि अवश्य आहेत; व ऐहिक आणि पारमार्थिक या दोनहि प्रकारच्या साधनांच्या दृष्टीनें सुरवातीस एवढी व्यवस्था झाली तरी पुरे. याशिवाय प्राचीन विद्यासंशोधनाचें एक खातें हिंदु युनिव्हर्सिटीस जोडलें तर शिक्षणाच्या हरएक बाबतींत जुन्या नव्याचा मेळ घालण्यास तें उपयोगी पडेल. हिंदु युनिव्हर्सिटीचा मुख्य उद्देश सरकारी संस्थांत जें व ज्या प्रकारचें शिक्षण आज मिळण्यासारखें नाहीं तें व त्या प्रकारचें शिक्षण मिळवून देणें हाच मुख्यत: असला पाहिजे. उदाहरणार्थ, हिंदुधर्माचें शिक्षण आज कोणत्याहि सरकारी संस्थेंत मिळणें शक्य नाहीं. अर्थात् हें शिक्षण देणें हें हिंदु युनिव्हर्सिटीचें पहिलें काम आहे. शास्त्रीय शिक्षण सरकारी संस्थांत मिळतें; पण तें फार थोडें आहे. वैद्यक शिक्षण देणारीं कॉलेजें हिंदुस्थानांत कांहीं आहेत; पण आमच्या लोकांनीं स्वतंत्र रीतीनें चाल-विलेलें व इस्पितळांची जोड असलेलें वैद्यक कॉलेज हिंदुस्थानांत नाहीं तें बनारस युनिव्हर्सिटीनें उपलब्ध करून द्यावें.

हिंदु युनिव्हर्सिटीच्या चालकांच्या योजनेप्रमाणें हीं सर्व सातहि कॉलेजें निघोत किंवा पैशाच्या कमतरतेमुळें त्यांतील थोडीं निघोत. कसेंहि असलें तरी एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, हिंदु लोकांची अशी स्वतंत्र युनिव्हर्सिटी झाल्यानें सरकारी नोकरींत प्रवेश झालेला नसतांहि विद्वान् म्हणून खरी मान्यता पावणें, व विशेष अधिकारयुक्त वाणीनें आपल्या ज्ञानाचा फायदा लोकांस मिळवून देणें या गोष्टी साध्य होतील. 'प्रोफेसर' या नांवांतच कांहीं विशेष जादू आहे असें नाहीं. पण ज्ञान किंवा विद्वत्ता मोजण्याचें तें एक सर्वमान्य व सर्वसाधारण अस माप असतें. विलायतेंत व युरोपांत

'प्रोफेसर' या शब्दाला जो अर्थ आहे त्यावरून पाहतां कोणताहि एखादा सिद्धांत किंवा मत एखाद्या युरोपियन प्रोफेसरानें काढलेलें किंवा प्रतिपादलेलें आहे असें कळलें म्हणजे त्या सिद्धांताविषयीं किंवा मताविषयीं आपल्या मनांत, ती व्यक्ति माहीत नसतांहि, बऱ्याच उच्च दर्जाचा आदर उत्पन्न होतो. युरोपखडांतल्या इतके विद्वान् व निष्णात खासगी लोक हिंदुस्थानांत आज पुष्कळच आहेत असें आमचें म्हणणें नाहीं तरी पण जे थोडे आहेत त्यांच्या मान्यतेला प्रतिष्ठित असें खासगी अधिष्ठान आज मिळत नाहीं. इकडील कॉलेजांतील प्रोफेसरीच्या जागाचशा काय पण पदव्यासुद्धां फारच थोडया, व त्याहि सरकार किंवा तत्प्रेरित युनिव्हर्सिट्या यांच्याच हातीं असल्यामुळें त्या फारच थोडया नेटिव लोकांच्या हातीं येतात. इकडील युनिव्हर्सिट्यांत बहुतेक भरणा युरोपियन प्रोफेसरांचा! आणि इकडील एखाद्या नेटिव्हाची विद्वत्ता स्वतंत्रपणें मापणें झाल्यास युरोपकडे धांव घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हिंदु युनिव्हर्सिटी झाली असतां ही स्थिति थोडीबहुत तरी पालटेल.

हिंदु युनिव्हर्सिटींत अमुक शिक्षक असूं नये असें म्हणण्यापर्यंत सरकारचा प्रवेश या संस्थेंत होणार आहे ही गोष्ट अर्थात् चांगलीशी नाहीं. पण हिंदुधर्मांत ज्याप्रमाणें कोणच्याहि श्रौतस्मार्त कर्माच्या प्रारंभीं श्रीगणपतीचें आवाहन व पूजन हीं अवश्य आहेत त्याप्रमाणें कोणचीहि सार्वजनिक स्वरूपाची शिक्षणसंस्था हल्लीं स्थापावयाची झाल्यास संकल्पित कर्म तडीस जाण्याकरितां व 'अविघ्नमस्तु' असा आशीर्वाद मागून घेण्याकरितां सरकारचें आवाहन व पूजन करणें अवश्य होऊन राहिलें आहे. ज्या शिक्षणसंस्था सरकारची मदत घेणार नाहींत त्या जिवंत राहाण्यास पात्रच नाहींत हें, कांहीं वर्षांपूर्वी सरकारानें लिहून ठेविलेलें महावाक्य आपल्या डोळ्यापुढें आहेच. शिवाय, स्वतंत्र कायद्याचा मंत्र जपल्याशिवाय हिंदु युनिव्हर्सिटीची प्राणप्रतिष्ठा होणें शक्य नाहीं असें तिच्या चालकांस वाटून त्यांनीं त्या अर्थाची खटपट पूर्वीपासून सुरू केली असल्यामुळें हिंदु युनिव्हर्सिटीचा कायदा करून देण्याबद्दल सरकार काय घालील त्या अटी कमीच म्हटल्या पाहिजेत! पण तें असो; हिंदी युनिव्हर्सिटींत शिक्षण द्यावयाचें तें एकदेशी भाषेंतून दिलें जाणार नाहीं, असें जें चालकांनीं ठरविलेलें दिसतें

मात्र आम्हांस पसंत नाहीं. 'वाघाच्या शिकारीची तयारी करावी तेव्हां कोल्ह्याची शिकार होते' या न्यायानें देशी भाषेंतूनच शिक्षण देऊं असा चालकांनीं मूळपासून संकल्प करावा तेव्हां कोठें निम्मेशिमें देशी भाषेंतून व निम्मेशिमें इंग्रजी भाषेंतून शिक्षण दिलें जाईल अशी व्यवस्था पदरांत पडेल. हिंदी भाषा ही हिंदुस्थानांतील सर्व लोकांस समजते व या भाषेच्या द्वारें जितकें होईल तितकें युनिव्हर्सिटीचें कामकाज करावयाचें असा चालकांनीं निश्चय केला तर देशी भाषेचा बस बसण्यास खचित मदत होईल. हिंदुस्थानांतून जर्मनींत व जपानांत शिकण्यास जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरवातीस जर्मन व जपानी भाषा चांगल्या न आल्यामुळें त्यांचें जर अडत नाहीं तर हिंदुस्थानांतील कोणत्याही भागांतून नवीन युनिव्हर्सिटींत गेलेल्या विद्यार्थ्यांस किंवा शिक्षकास कामचलाऊ हिंदी लवकरच येऊं लागण्यास फारशी अडचण पडेल असें आम्हांस वाटत नाहीं.

हिंदु युनिव्हर्सिटींत बिझांटबाईचा समावेश केल्यानें तिजवर थिऑसफीचा पगडा पडेल असाहि एक आक्षेप या बाबतींत आहे. पण तो मात्र आम्हांस महत्त्वाचा वाटत नाहीं. कोणत्याहि गोष्टीची अतिशयोक्ति झाली म्हणजे ती हास्यास्पद होते, व थिऑसफीच्या कांहीं अंगांचेंहि असेंच झालेलें आहे. तथापि, थिऑसफीचे चालक परकी व परधर्मी असतां त्यांनीं हिंदुधर्माचा पक्षपात धरून आपलें सर्व बुद्धिवैभव हिंदुधर्माचें महत्त्व व वैभव खुलवून दाखविण्याकडेच खर्च केलें आहे, ही गोष्ट विसरतां येत नाहीं. थिऑसफीबाह्य अशा व्यावहारिक हिंदुधर्मांत गुरूंचें थोतांड आणि शिष्यांची अंधश्रद्धा हीं काय थोडीं दिसून येतात? या प्रकरणांत जर गुरुशिष्यांचें 'हिंदुत्व' अमान्य होत नाहीं तर थिऑसफिस्टांचें 'हिंदुत्व' तरी कां अमान्य व्हावें? निदान ज्या उद्योगी, उत्साही व कार्यनिष्ठ स्त्रीनें आपल्या हिमतीवर सेंट्रल हिंदु कॉलेजसारखी संस्था निर्माण केली, तिचा हिंदु युनिव्हर्सिटीच्या चालकांत समावेश झाला म्हणून आम्ही नाराज आहों, असें म्हणणारांनीं 'न करत्याचा वार शनिवार' या म्हणीस पुष्टि देण्याशिवाय दुसरें कांहीं केलें नाहीं असें आम्ही तरी म्हणूं. शेंपन्नास सनातनी प्रमुख गृहस्थांमध्यें एकट्या-एक ॲनि बिझांटबाईस घेतल्यानें हिंदु युनिव्हर्सिटीचा किल्ला थिऑसफिस्ट शत्रूंच्या हस्तगत होईल हें म्हणणें

आक्षेपकांच्या न्यायबुद्धीस न शोभणारें आहे एवढेंच नव्हे तर हिंदु युनिव्हर्सिटीच्या चालकांत सामील होणाऱ्या प्रमुख गृहस्थांस नादान ठरविणारें आहे ! तात्पर्य, जगांतील कोणचीहि गोष्ट सर्वांना हवी तशी सोळा आणे असत नाहीं, हा सिद्धांत खरा असला तरी 'अधिक चांगलें' मिळेल या निरुद्योगी आशेवर चालत हातीं आलेलें 'चांगलें' गमावणें हें कांहीं समंजसपणाचें लक्षण नव्हे. यास्तव ज्यांना हिंदु युनिव्हर्सिटीस द्रव्याची अगर इतर मदत करण्याची खरी इच्छा असेल त्यांनीं निदान अशा भ्रामक आक्षेपांना भिऊन तरी हात आंखडून धरण्याचें कारण नाहीं, असें आमचें म्हणणें आहे.

बनारस हिंदु कॉलेजांतील फूट.‡

एखाद्या समुदायांत किंवा संस्थेंत मतभेदाचा पूर लोटला म्हणजे तो कोणत्याना कोणत्या तरी मार्गानें वाहून जावा लागतो; आणि परस्पर दोषारोप व फूट या मार्गानें तें कार्य प्रायः घडून येतें असें आढळतें. हिंदुस्थानांतील थिऑसफिकल सोसायटींत आज दोन तीन वर्षें जो मतभेद माजून राहिला होता, त्याला बिझांटबाईवर मद्रास हायकोर्टात झालेल्या दिवाणी दाव्यानें एक तोंड लागलें होतेंच; पण गेल्या आठवड्यांत बनारस हिंदु कॉलेजांतील प्रिन्सिपाल अरंडेल, प्रो० वुडहाऊस, प्रो० तेलंग, प्रो० गुर्टु वगैरे दहावीस शिक्षकांनीं राजीनामे दिल्यानें या मतभेदास आणखी एक तोंड लागून थिऑसफिकल सोसायटीच्या पोटांत रक्त नासून मतभेदाची कालवाकालव किती होऊन राहिली होती हें आतां लोकांना उघड पहावयास मिळत आहे. बिझांटबाईंच्या अवतारकृत्याच्या पोरखेळावर टीका करितांना आम्हीं म्हटलेलें वाचकांस आठवत असेलच कीं, बाईंच्या विरुद्ध बोलणें म्हणजे कांहीं थिऑसफीच्या विरुद्ध बोलणें नव्हे, याचें एक प्रत्यंतर, बाईवरील दाव्याचे कामीं उभयपक्षांत थिऑसफिस्ट लोक असल्यानें मिळालेंच होतें, व प्रस्तुतच्या बनारस कॉलेजांतील फुटीनें त्याच गोष्टीचें आणखी विशेष

‡ केसरी, तारीख ६ मे १९१३ इसवी.

प्रत्यंतर येत आहे. सदर राजीनाम्यांच्या मुळाशीं अवतारकृत्याचा पोरखेळ हाच आहे. राजीनामे देणाऱ्या शिक्षकांचें म्हणणें असें आहे कीं, कॉलेजच्या मॅनेजिंग कमिटींतील बहुमत बिझांटबाईंविरुद्ध असून त्यांनीं तिचा छळ चालविला आहे. या दोषारोपांतील 'छळ' खरा असो वा खोटा असो; इतकें मात्र खास कीं, ज्यांच्या हातीं बनारस हिंदु कॉलेजाचीं सूत्रें आहेत त्यांतील निम्याहून अधिक लोकांना बिझांटबाईंची अवतारक्रीडा नापसंत आहे. या बहुमतवाल्यांत कॉलेजचे एक ट्रस्टी भगवानदास हे आहेत. हे गृहस्थ स्वतः बडे थिऑसफिस्ट असून आजवर बाईंचा उजवा हात असें त्यांना मानण्यांत येत असे. पण कृष्णमूर्तीच्या शरीरांत मैत्रेयमुनी परकायाप्रवेश करून जगास ज्ञान शिकविण्याकरितां अवतार घेणार, या शुभवर्तमानाची घोषणा बाई करूं लागल्यामुळें त्यांचें व बाईंचें बनेनासें झालें. तेव्हांपासून बाईंना आपला हा उजवा हात डाव्या हातासारखा भासूं लागला; व पुढें पुढें तर तो गळून पडेल तरी बरें असेंहि वाटूं लागलें. बनारस कॉलेज थिऑसफिस्ट लोकांनीं मूळ काढलें तरी त्याला 'थिऑसफिकल कॉलेज' हें नांव न देतां 'हिंदु कॉलेज' हें व्यापक नांव ज्याअर्थी देण्यांत आलें, त्याअर्थी तें थिऑसफीच्या निरुंद तत्त्वाच्या अनुरोधानें न चालविलें जातां, हिंदुधर्माच्या प्रशस्त व व्यापक तत्त्वांच्या अनुरोधानें चालविलें जावें, अशीच अपेक्षा कोणीही समंजस मनुष्य करणार. पण खुद्द कॉलेजच्या संस्थापक बाई, कॉलेजचे प्रिन्सिपाल व इतर शिक्षक यांनीं सर्व सनातन हिंदुधर्माभिमान्यांनाच काय, पण कित्येक प्रमुख थिऑसफिस्टांनाहि मान्य न होणारा असा विशिष्टांतला विशिष्ट पंथ काढून एकंदर थिऑसफिकल सोसायटीच्या नांवाला बट्टा लावण्याची पाळी आणली, त्यामुळें कॉलेजच्या व्यवस्थापक मंडळांत सहजच मतभेद माजला! बाईंना मित्र शत्रूसारखे भासूं लागले; विरोधी मत प्रतिपादन करणें हा त्यांना छळ वाटूं लागला; व अखेर प्रतिकूल मतवाद्यांचें बहुमत झाल्यानें बाईंच्या थोड्याशा कट्टया अनुयायांचे राजीनामे मंजूर होऊन बल्लारी येथें स्वतंत्र थिऑसफिकल कॉलेज काढण्याच्या गोष्टी आतां ऐकूं येऊं लागल्या आहेत! बाईंनीं अशा रीतीनें सवता सुभा स्थापून त्यांत काय वाटेल तें केल्यास आम्हाला त्यांत मन घालण्याचें मुळींच कारण नाहीं. पण 'हिंदु' या नांवानें चालणारें बनारसचें

कॉलेज ही त्यांची खासगी मत्ता नसल्यानें, त्यांतील बखेडा मोडून बिझांटबाईच्या व्यक्तीस देवाप्रमाणें मानणारी मंडळी त्यांतून निघाली हें फार चांगलें झालें असेंच म्हटलें पाहिजे. 'हिंदु युनिव्हर्सिटी' निघाल्यास बनारस हिंदु कॉलेज हें त्या संस्थेस जोडलें जावें अशी योजना ठरलेली आहेच. पण पुढें कांहीं दिवसांनीं होणारी ही गोष्ट आजच अशा रीतीनें घडून येईल अशी अटकळ नव्हती. "माझें या कॉलेजांतील काम संपलें होतें" असें स्वतः बाईच म्हणतात, त्याअर्थी त्यांच्या उपद्व्यापी आत्म्यानें या कॉलेजच्या कुडीचा त्याग करावा, व परकायाप्रवेश—विद्येच्या साहाय्यानें दुसऱ्या एखाद्या संस्थेंत शिरावें, अशी त्यांना त्यांच्या महात्म्या गुरूंकडून आज्ञा झाली असण्याचाहि संभव आहे. कसेंहि असो, झालें तें एका अर्थी बरें झालें असेंच म्हटलें पाहिजे. अलाहाबाद व बनारस येथील सनातनी हिंदु व थिऑसफिस्ट बाई यांची गांठ पडली असतां, कोण कुणास खाईल व पचनीं पाडील याविषयीं पुष्कळांस शंका होती. पण आम्हीं अंदाज केल्याप्रमाणें बिझांटबाईच्या पक्षालाच हार खावी लागली आहे.

बनारस हिंदु कॉलेजांत झालेल्या या फाटाफुटीपासून बराच बोध घेतां येण्यासारखा आहे. कोणत्याहि शिक्षणसंस्थेंत शिक्षणबाह्य अशा विषयांचा कितपत प्रवेश करितां येईल किंवा यावा हा एक वादग्रस्त प्रश्नच आहे; व फक्त खास सरकारी खेरीजकरून इतर सर्व शिक्षणसंस्थांना त्या वादग्रस्ततेचा अनुभव केव्हां ना केव्हां थोडा ना थोडा तरी येतोच. बनारस हिंदु कॉलेज ही केवळ खासगी संस्था; राजकारणाशीं तिचा संबंध मुळींच नव्हता; व जो होता तो सरकारास सर्वस्वीं मानवेल असाच होता; कारण बिझांटबाई तरुण मुलांनीं राजकारणांत पडूं नये असें जीव तोडतोडून उघड प्रतिपादन करीत असत हें प्रसिद्धच आहे. पण राजकारण शिक्षणबाह्य हें जसें त्या मानीत, तशा इतर कित्येक गोष्टी त्या मानीत नसत. उदाहरणार्थ, मुलांस थिऑसफीचें म्हणजे विशिष्ट धर्ममतपंथाचें शिक्षण देणें हें शिक्षणाला सोडून नाहीं असें त्या समजत; येवढेंच नव्हे तर मुलांनीं बाईच्या अवतारकृत्याच्या पोरखेळांत सामील व्हावें, 'पूर्वेकडील ताऱ्या'चें म्हणजे नव्या अवताराचें चक्राकार निशाण त्यांनीं आपल्या छातीवर लटकवावें व स्वतः बाईना देव मानून तिची पूजा करावी, या गोष्टी शिक्षणाला

सोडून नाहींत असें त्या मानीत हें उघड आहे. हिंदुधर्मशिक्षण देणें हा जरी सदरहू कॉलेज काढण्याचा एक मूळ हेतु असला तरी, हिंदुधर्मशिक्षण म्हणजे काय आणि थिऑसफीच्या अंतरंगांतल्या अंतरंगांत बनावट पावलेली व्यक्तिविषयक सजीव मूर्तिपूजा म्हणजे काय, यांतील विवेक बाईनीं केव्हां केला होता असें दिसत नाहीं. हिंदुधर्मात मूर्तिपूजा, अवतार, गुरुभक्ति वगैरे गोष्टी आहेत, नाहीं असें नाहीं. पण या तीनहि बाबतींत बिझांटसांप्रदायाची मजल इतकी पुढें गेली आहे कीं, सुशिक्षित हिंदुसमाजास त्या मुळींच आवडणें शक्य नाहीं. मद्रास-मेल पत्राच्या एका प्रतिनिधीनें बाईंची मुलाखत या बाबतींत घेतली तेव्हां त्या असें म्हणाल्या कीं, माझ्या हातीं कॉलेज होतें तोंपर्यंत तेथें उदारमतवादी असा हिंदुधर्म शिकविला जात होता; पण आतां यापुढें फार कोत्या धर्मतत्त्वांचा असा हिंदुधर्म तेथें शिकविला जाईल. आम्हांला तर हें वर्णन ऐकून हंसूंच येतें. रुंद आणि निरुंद, व्यापक व कोता, उदार व अनुदार या शब्दांच्या अर्थाची बाईनीं अगदीं उलटापालटच केलेली दिसते! सनातनी हिंदुधर्मात जातिभेदासारख्या गोष्टी आहेत; पण कितीहि झालें तरी एकट्या एक मर्त्य व्यक्तीस ईश्वरपदावर अधिरूढ करूं पाहणें ही खास कोत्या मनाची किंवा अनुदारपणाची कमाल आहे असेंच कोणीहि म्हणेल.

बनारस कॉलेजांतील शिक्षकांनीं राजीनामे देण्याचें एक तात्कालिक कारण असें दिसतें कीं, कॉलेजचे प्रिन्सिपाल मि० अरुंडेल यांनीं कॉलेजांतील बिझांटबाईंच्या भगत मंडळीस गेल्या आक्टोबरांत एक पत्र लिहिलें होतें, तें कोणी एकानें मिळवून अलाहाबादच्या 'लीडर' पत्रांत प्रसिद्ध केलें; आणि या पत्रावरून व्यक्तिपूजेचें बंड कॉलेजांत किती माजलें होतें हें उघड दिसून येतें. या पत्रांत सर्व भगत मंडळींनीं बिझांटबाईला चिकटून राहावें कांहीं केल्या सोडून देऊं नये, असा उपदेश केलेला असून त्याच्या समर्थनार्थ खालील विधान केलेलें होतें. "She (Mrs. Besant) will one day become one of the greatest rulers of the world of Gods and men." बिझांटबाई या पुढेंमागें देव व माणूस यांच्या जगावर—यांच्या राज्यावर—राज्य करणाऱ्या श्रेष्ठ विभूतींपैकीं एक श्रेष्ठतम विभूति होतील! खुद्द कॉलेजच्या प्रिन्सिपालची मजल येथपर्यंत गेल्यावर

बिचाऱ्या विद्यार्थ्यांना बिझांटबाईंसंबंधानें पूज्यबुद्धि व्यक्त करावयाला शब्दच शिल्लक उरत नाहींत हें उघड होत नाहीं काय? पण विद्यार्थ्यांना शब्द शिल्लक उरोत वा न उरोत, असल्या प्रकारचा भोळेपणा व श्रद्धाळूपणा कॉलेजांतील मुलांत पसरूं देणें हें उदार शिक्षणाच्या आद्यतत्त्वांवर घाला घालूं देण्यासारखें नाहीं काय? या खुळेपणाच्या प्रसारास आळा घालणें जरूर आहे असें कॉलेजच्या व्यवस्थापक मंडळास वाटल्यास त्यांत नवल तें काय?

अलीकडे आमच्या शिक्षणसंस्थांतून धर्मशिक्षण दिलें जात नाहीं यामुळें शिक्षणाला एकांगीपणा येतो ही गोष्ट जरी खरी असली तरी, बनारस कॉलेजमध्यें जें विशिष्ट शिक्षण दिलें जात होतें तशा प्रकारचें धर्मशिक्षण दिल्यानें आमच्या तरुण पिढीचें मोठें कल्याण होईल असें आम्हांस वाटत नाहीं. भौतिकशास्त्राच्या शिक्षणानें मन नास्तिकपणाकडे झुकतेंच हें आधीं खरें नाहीं; त्यामुळें जें काय होतें तें इतकेंच कीं, कोणतीहि गोष्ट निरनिराळ्या प्रमाणांच्या भट्टींत तावून सुलाखून घेण्याची इच्छा होऊं लागते, व मन असतें त्याहूनहि अधिक साशंक दिसतें. पण भौतिकशास्त्रांच्या शिक्षणानें मनाचे बंध तुटतात आणि तें नास्तिक बनतें असेंहि क्षणभर घेऊन चाललें तरी, बनारस कॉलेजांत अंधश्रद्धेनें जो धुमाकूळ घातलेला आढळतो तो खचित त्याहूनहि वाईट. कॉलेजच्या संस्थापक या नात्यानें बिझांटबाईंविषयीं कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या मनांत आदरबुद्धि असणें हें रीतीचें आहे. पण त्या ईश्वरपदावर अधिरूढ आहेत असाच जवळ जवळ ग्रह प्रिन्सिपाल व विद्यार्थी यांनीं करून घ्यावा याहून मनाच्या दुर्बलतेचें आणखी लक्षण तें कोणतें? जें खासगीपत्र प्रसिद्ध केल्याबद्दल कॉलेजांतील कित्येक शिक्षक रागावले आहेत, तें प्रि० अरुंडेल यांचें पत्र वाचलें म्हणजे त्यांच्या श्रद्धाळूणाची किळस आल्यावांचून रहात नाहीं. बिझांटबाई व त्यांचें खास शिष्यमंडळ यांपैकीं बाईंनीं सर्वज्ञत्वाचा मक्ता आणि शिष्यमंडळानें श्रद्धेचा मक्ताच जसा काय घेऊन टाकला आहे! ज्ञानाच्या कामांत बाईंचें स्वावलंबन जितकें धाडसाचें, तितकेंच त्यांच्या शिष्यमंडळाचें परावलंबन हास्यास्पद होय. हें परावलंबन कोठवर जातें हें दाखविण्याकरितां गेल्या आठवड्यांत येथील थिऑसफिकल लॉजमध्यें रा० गजानन भास्कर वैद्य यांच्या झालेल्या व्याख्यानाचा सारांश

आम्हीं गेल्या केसरींत मुद्दाम दिला होता. त्यावरून वाचकांस हें दिसून आलें असेल कीं, 'ऑरडर ऑफ धि स्टार ऑफ धि ईस्ट' या कळपांतील मेंढरांच्या श्रद्धाळूपणापलीकडे जगांत अंधश्रद्धेची मजल जाणेंच शक्य नाहीं. सर्व कांहीं अमुक असें आहे; तें कां ? तर बाई सांगतात, आणि बाई कधींहि खोटें बोलत नाहीं म्हणून ! पण, या बाई हेतुपुरःसर खोटें सांगत नाहींत येवढ्यावरच जर त्या म्हणतात तें सर्व खरें असें घेऊन चालावयाचें तर पूर्वाश्रमीं बाईनीं नास्तिक ज्ञानप्रवर्तन केलें तें तरी खरें कां मानूं नये ? तेव्हां कांहीं त्या खोटें बोलत नव्हत्या ! पण एकाच जन्मांत दोन निरनिराळ्या व विरोधी कृति करणाऱ्या बाईचें समर्थन त्या केवळ खोटें बोलत नाहींत असल्या पोकळ युक्तिवादानें होणें अशक्य आहे. खुद्द वेदांनाहि जितकें स्वतः प्रामाण्य नाहीं तितकें बिझांटबाईना आहे असें म्हणणाऱ्यांची कींव करण्यापलीकडे कोण काय करणार ?

असल्या कमकुवत मनाचें प्रदर्शन खासगी मनुष्यानें आपल्यापुरतें आपल्या घरीं केलें तर त्यास कोण विचारावयास जाईल ? पण हिंदुधर्म-शिक्षण देणें हेंच ज्यांचें वैशिष्ट्य म्हणून सांगण्यांत येतें त्या कॉलेजांत प्रिन्सिपालपासून मुलांपर्यंत जर असली अंधश्रद्धा बोकळलेली दिसूं लागली तर अशा कॉलेजापासून सार्वजनिक हित न होतां उलट नुकसान होईल असें कोणासहि वाटेल; आणि कॉलेजच्या व्यवस्थापक मंडळास तें तसें वाटलें, ही आनंदाची गोष्ट होय ! थिऑसफीच्या शरीरांतील दूषित रक्त हळूंहळूं ठिकठिकाणीं बाहेर पडूं लागलेंच आहे; या सर्वाचा निचर होऊन ही आगंतुक विकृति लवकर नाहींशी होईल आणि थिऑसफीच्या मूलभूत शुद्ध तात्त्विक विचारसरणीला फिरून आपलें काम पूर्ववत् चालविण्याची संधि मिळेल तर त्याच्या योगानें, केवळ थिऑसफीच्या पटांत ज्याचें नांव नोंदलेलें नाहीं अशा विचारी मनुष्यासहि बरें वाटेल !

काशी येथील नवीन विद्यापीठ

बनारस हिंदु-युनिव्हर्सिटीची मुहूर्त-मंगल-शिला स्थापण्याचा जो समारंभ गेल्या शुक्रवारीं घडून आला त्याचा त्रोटक वृत्तांत आज दुसरीकडे दिलाच आहे. हा समारंभ खरोखरीच अपूर्व होय; व लॉर्ड हार्डिंज यांनीं आपल्या भाषणांत त्याच्या अपूर्वतेचें जें रसभरित वर्णन केलें तें सर्वांशीं यथार्थ असेंच आहे. लोकप्रिय व सत्कार्योत्तेजक अशा प्रस्तुतच्या व्हाइसरॉयसाहेबांना 'पायाचे दगड बसविण्या'चे प्रसंग आपल्या पांच वर्षांच्या कारकीर्दीत इतके आले कीं, आपला धंदा सरकारी नोकरी हा आहे असें सांगण्याऐवजीं फुकट्या गवंड्याचा आहे असें सांगण्याची जर त्यांना एखादे वेळी विनोदी लहर आली, तर तें त्यांचें उत्तर, ते स्वतः 'फ्रीमेसन' नसले तरी, कोर्टातील शपथेपुरतें खरें ठरण्याचा संभव आहे. लॉर्ड हार्डिंज यांनीं काशीस परवां बसविलेला पायाचा दगड त्या अनेक दगडांच्या खाणींतूनच निघालेला असेल, त्यांच्या हातांतील करणीचें सोनें किंवा त्या करणीनें त्या दगडाला लावलेला चुना यांतहि या प्रसंगीं कांहीं विशेष गुण होता असें नाहीं; पण पुरुषभाग्यापेक्षांहि दगडाचें भाग्य गहन असतें; म्हणूनच एकाला घराच्या मागीलदारीं व दुसऱ्याला देवघरांत अभिषेक करून घेण्याचें नशिबीं येतें. "अखिलभरतखंडांतील प्रमुख आर्यजनांचा हा प्रचंड मेळा आज जो या साध्या संगमरवरी पाडथऱ्यानें या ठिकाणीं एखाद्या लोहचुंबकाप्रमाणें आकर्षण करून आणला आहे याचें कारण काय असेल बरें?" असा जो नवल-प्रश्न टाकून लॉर्ड हार्डिंज यांनीं आपल्या भाषणास सुरुवात केली, व त्या प्रश्नाचें त्यांनीं स्वतःच जें उत्तर दिलें, तीं दोनहि त्यांच्या सहृदयतेस शोभण्यासारखींच होतीं. त्यांनीं बसविलेल्या दुसऱ्या अनेक दगडांनीं ब्रिटिश सरकारच्या या नाहीं तर त्या खात्यांचा पाया रचण्यास प्रारंभ केला असेल. पण काशीस बसविलेल्या या दगडानें हिंदूंच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या नवयुगाचाच पाया घातला असें लॉर्ड हार्डिंज यांनीं म्हटलें व तें बऱ्याच अंशानें खरेंहि आहे. आतां राष्ट्रीय शिक्षणाच्या अनेक लक्षणगुणांपैकीं अधिकारस्वातंत्र्य

केसरी, तारीख ८ फेब्रुवारी १९१६.

हें एक प्रमुख आहे; व हिंदु-युनिव्हर्सिटीचा कायदा बनवितांना कांहीं कांहीं महत्त्वाचे अधिकार आपल्या हातीं ठेवण्याचा सरकारानें जो आग्रह धरिला त्यामुळें या नवीन शिक्षणसंस्थेला थोडासा कमीपणा आला आहे ही गोष्ट खोटी नाहीं; इतकेंच नव्हे, तर प्रस्तुतसारख्या आनंदभराच्या प्रसंगींहि आमच्या मनाला ती दुःख दिल्याशिवाय राहात नाहीं. तथापि तिच्या विकलांगत्वावर विशेष भर न देतां आहे अशा अपूर्ण-गुणसंस्थेकडून कां होईना; पण हिंदु राष्ट्राचा कोणता, किती व कसा फायदा होण्याचा संभव आहे याचाच विचार आमच्या किंवा इतर कोणाहि हितचिंतकाच्या मनांत आज मुख्यतः आल्यास त्यांत नवल नाहीं.

काशी येथील 'नवीन' विद्यापीठ असें जें बनारस हिंदु युनिव्हर्सिटीला आम्हीं विशेषण दिलें तें साभिप्राय आहे; कारण काशीची एकंदर पुरातन परंपरा एका दृष्टीनें विद्यापीठांनींच रचिलेली आहे. गंगेचें सान्निध्य व श्रीविश्वेश्वराचा निवास यामुळें काशीला पुण्यक्षेत्राचें अपूर्व महत्त्व आलें आहे खरें. तथापि सर्व ऐहिक पारमार्थिक कृत्यांची परिसमाप्ति ज्ञानांतच होते, या दृष्टीनें पाहतां ज्ञान म्हणजे परा-अपराविद्या तिचा लाभ करून देण्याची जी उज्ज्वल परंपरा काशीस आज शेकडों वर्षें अखंड चालू राहिली आहे तिच्या योगानें या क्षेत्राचें महत्त्व विशेष मानलें जात आहे. काशी हें क्षेत्र म्हणूनच पंडित लोक तेथें पूर्वापार जाऊन राहिले असतील, किंवा तेथें पाठशाला स्थापन झाल्या असतील; पण काशीचे साधू व काशीचे पंडित यांपैकीं अधिक ख्याति कोणाची आहे हें आम्ही सांगण्याचें कारणच नाहीं. काशीक्षेत्राच्या पुण्याईनें मिळणारें मोक्षवैभव खरें पण अदृश्य आहे. पण तेथील विद्यापीठाच्या लौकिकाचें वैभव खरें असून शिवाय दृश्यहि आहे. वसिष्ठगौतमादिकांचीं विद्यापीठें पौराणिक काळचीं; त्यांची कच्ची माहिती फारशी उपलब्ध नाहीं. तक्षशिला, नालंद वगैरे ठिकाणचीं विद्यापीठें ऐतिहासिक काळांतलीं असलीं तरी त्यांची माहिती फक्त अंधुकच मिळते. पण श्रीक्षेत्र काशी येथील विद्यापीठें प्राचीन या सदराखालीं पडण्यासारखीं जुनीं असलीं तरी त्यांची माहिती इतकी मिळते कीं, विद्यापीठांतर्गत सांप्रदायांचा अनेक शतकांपर्यंतचा वंशवृक्ष रेखाटतां येतो. तक्षशिला, नालंद वगैरे विद्यापीठांप्रमाणें काशीचीं जुनीं विद्यापीठें 'नष्ट' या सदराखालीं न

येतां अजून चालूच आहेत. उत्तरहिंदुस्थानांत हिंदु राजांची सत्ता नाहींशी होऊन त्यांच्या जागीं मुसलमान आले, व मुसलमानांचा पांचसहाशें वर्षांचा अंमल नाहींसा होऊन त्यांच्या जागीं इंग्रज आले; तरी काशीच्या विद्यापीठांचें काम अबाधितपणें चालूच आहे. व या करारीपणाचें बक्षीस म्हणूनच कीं काय, जुन्या विद्यापीठांची परंपरा नाहींशी होऊं लागण्यापूर्वीच ईश्वरकृपेनें हिंदु–युनिव्हर्सिटीसारखी संस्था स्थापन होऊन फिरून एका नव्या सांप्रदायाचा पाया त्याच क्षेत्रीं रचिला गेला. अशा रीतीनें नव्या-जुन्यांचा सांधा दोनहि परंपरांच्या सजीवावस्थेंत झाल्यामुळें त्यापासून एक नवीनच पण जातिवंत असें विद्यावृक्षाचें कलम निर्माण होऊन त्याला पुढें मधुर फळें येतील अशी आशा करण्यास जागा आहे. आणि ही आशा सफळ होवो असें आशीर्वचन हिंदु–युनिव्हर्सिटीचे सर्व हितचिंतक आजच्या प्रसंगीं ईश्वराजवळ मागतील.

काशी येथील नवीन विद्यापीठ पुढें काय काय कामगिरी करील हें आज सांगणें कठीण आहे. तथापि हिंदु विद्यापीठाची कल्पना इतक्या थोड्या काळांत इतक्या मूर्त स्वरूपाला आली एवढीच नुसती गोष्ट विचारांत घेतली तरी ती हिंदुसमाजाच्या कर्तृत्वाची साक्ष देत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सन १९०५ सालीं बनारस येथील राष्ट्रीय सभेच्या प्रसंगीं या युनिव्हर्सिटीच्या कल्पनेचें बीजारोपणच नसलें तरी तिचा उघड उच्चार झाला. त्यानंतर सुमारें चार पांच वर्षेंपर्यंत त्या कल्पनांकुराला फारशी पालवी फुटलेली दिसली नाहीं. पण गेल्या चार वर्षांत ना० पंडित मदनमोहन व दरभंग्याचे महाराज यांच्या परिश्रमामुळें संस्थेकरितां सुमारें एक कोटि रुपयांचा फंड जमला, आणि वरिष्ठ कौन्सिलांत तिच्या घटनेचा कायदा मंजूर होऊन चालू आठवड्यांत इमारतीच्या पायाचा दगडहि बसविला गेला या गोष्टीचें पुष्कळसें श्रेय त्यांतल्या त्यांत पंडित मदनमोहन यांनाच आहे; कारण त्यांनीं वकिलीचा धंदा सोडून सर्व काळ या कामीं घालविला. नाहीं तर इतर वकील मंडळी पहा! वकिलींतून उरल्या फावल्या वेळीं, दारीं पक्षकार हातीं पैशाची थैली घेऊन उभा राहून खुणावीत नसेल तेव्हां, सार्वजनिक कामाकडे फक्त उद्योग-वैचित्र्यप्रियतेनें डुंकून पाहाणाऱ्या, केवळ तुरगब्रह्मचर्याप्रमाणें लोकहितव्रत पाळणाऱ्या व येवढ्याशा मोबदल्याच्या आधारावर नामदारीसारखा मोठा

मान व लोकविश्वास मिळवूं पाहाणाऱ्या आमच्या वकीलमंडळींनें पंडित मदनमोहन यांचें उदाहरण खरोखरच डोळ्यापुढें ठेवून गिरविण्यासारखें आहे. आमच्यांतील कित्येक नामांकित वकिलांपेक्षां पंडितजी कमी वयोवृद्ध आहेत; त्यांच्या संग्रहीं असलेला पैसा यांच्यापेक्षां पुष्कळ कमी आहे; आणि ते निपुत्रिकहि नाहींत. असें असतां ते अंगीकृत कार्य यशस्वी करण्याकरितां वकिलीचा धंदा सोडतात, आणि वाढती सिद्धि व वाढता द्रव्यलाभ यांच्या योगानें आमच्या बुद्धया वकीलमंडळीच्या धंदा करण्याच्या बुद्धीला दिवसानुदिवस नवीन तारुण्याचा भर येतो! हिंदु युनिव्हर्सिटीचें महत्त्व तिला एक कोटि रुपया मिळाला येवढ्यावर नाहीं. कारण ती यशस्वी व्हावयाची तर आणखीहि कोट दोन कोट रुपयांची अपेक्षा आहे, पण केवळ खासगी प्रयत्नानें पंडित मदनमोहन यांनीं हिंदु विद्यापीठाकरितां अल्पावधींत एवढा मोठा फंड जमविला हें त्यास केवढें भूषणास्पद आहे! आमच्या जुन्या धर्मादायपद्धतीप्रमाणें आमच्या राजेमहाराजांच्या संपत्तीला जें एकांगी वळण पूर्वी लागलें होतें तें पंडितजींच्या परिश्रमानें बदललें; व १९०५ सालीं कोणास कल्पनाहि आली नसेल इतका मोठा फंड त्यांनीं आज जुळविला. असो; व्यक्तीच्या कर्तृत्वाप्रमाणें हिंदुसमाजाच्या स्वाभिमानाचाहि पुरावा या वर्गणींत मिळतो. हिंदु लोकांची राजकीय प्रवृत्ति त्यांच्या धर्मप्रवृत्तीइतकी उत्साही व जोरदार नाहीं ही गोष्ट पहावी त्या दृष्टीनें कोणी चांगली किंवा वाईट म्हणेल. पण हिंदुत्वबुद्धि ही हिंदु राष्ट्रीयत्वाचें प्रधान अंग असल्यामुळें ती तरी अद्यापि त्यांच्यांतून नष्ट झालेली नाहीं, इतकेंच नव्हे, तर पूर्णपणें जागृत आहे हें बनारस युनिव्हर्सिटीच्या उदाहरणावरून सिद्ध होतें याबद्दल आनंद वाटतो.

हिंदु युनिव्हर्सिटीची प्रत्यक्ष कामगिरी अद्यापि घडून यावयाची आहे. तथापि कोणती कामगिरी या संस्थेपासून होण्यासारखी आहे याचा स्थूल मानानें कयास आज केल्यास तो फारसा चुकण्याचा संभव नाहीं. हिंदु-यु.चा पहिला फायदा म्हटला म्हणजे संस्कृत विद्येच्या पुनरुज्जीवनाला चालन मिळणार, हा होय. ब्रिटिश अमलाखालीं यापूर्वी स्थापन झालेल्या विद्यापीठांतून संस्कृत भाषेच्या अभ्यासाची थोडीबहुत व्यवस्था झालेली आहे. तथापि तो अभ्यास केवळ संस्कृतविद्यामंदिराच्या अंगणांत प्रवेश

होय. हिंदु यु.मध्यें संस्कृत भाषेचा अभ्यास तर विशेष होईलच; पण संस्कृतभाषाकरंडकांत सांठवून ठेवलेल्या विद्यारत्नाचा परामर्ष इतर म्हणजे पाश्चात्य विद्याभिमानी विद्यापीठांकडून जितक्या आदरबुद्धीनें घेतला जात असे त्याहून अधिक आदरबुद्धीनें व यथाप्रमाण अधिक उल्हासाचा शिक्षणोपक्रम या नवीन विद्यापीठांत होईल. दुसरी गोष्ट ही कीं, इतर विद्यमान विद्यापीठें बहुधा परीक्षा घेऊनच आपलें काम संपवितात. या नवीन विद्यापीठांत परीक्षांप्रमाणें प्रत्यक्ष शिक्षणाची सोयहि केली जाईल. केवळ परीक्ष्य-परीक्षक या भावनेनें उत्पन्न होणारा संबंध गुरुशिष्यांच्या संबंधाइतका निकट नसतो. व जुन्या वसिष्ठ–गौतमांच्या गुरुकुलांचें हृदयंगम कल्पनाचित्र जरी काशी येथील नव्या विद्यापीठांत तंतोतंत रेखाटलेलें किंवा रंगविलेलें समकालीन लोकांच्या दृष्टीला दिसलें नाहीं, तरी आधुनिक विद्यापीठांतील हा मुख्य दोष या नव्या विद्यापीठांत निघून जाऊन तेवढ्यापुरता तरी गुरुकुलपरंपरेचा उद्धार होईल असें वाटतें. तिसरी गोष्ट म्हणजे धर्मशिक्षणाची होय. जुन्या युनिव्हर्सिट्यांतून शिक्षणच मुळीं दिलें जात नव्हतें, तर मग धर्मशिक्षण कोठून दिलें जाणार हें दिसतच आहे. पण राज्यकर्ते विधर्मी व त्यांची प्रजा विविधधर्मी यामुळें कॉलेजांतूनदेखील धर्मशिक्षण न देण्यास सरकारास आयतीच सबब सांपडत होती. पण काशी येथील नवें विद्यापीठ हें बोलून-चालून उघडाउघडीं प्रत्यक्ष नांवानेंहि 'हिंदु' असल्यामुळें तेथें चालकांच्या मनाप्रमाणें धर्मशिक्षण देण्यास पूर्ण मोकळीक आपोआप मिळेल. लॉर्ड हार्डिंज यांनीं परवांच्या आपल्या भाषणांत धर्मशिक्षणाची महती प्रांजलपणानें गायली.पण धर्मशिक्षणाची आवश्यकता मान्य असतांहि त्यांना सरकारी युनिव्हर्सिट्यांतून तें देण्याची व्यवस्था करतां आली नाहीं, यावरूनच स्वतंत्र युनिव्हर्सिटीची आवश्यकता किती होती हें उघड दिसून येतें. चौथा फायदा असा आहे कीं, सर्व हिंदुस्थानच्या हिंदूंना मनानें एकत्र करणारी अशी ही विद्यापीठाची संस्था होईल. काशीक्षेत्र हें जसें धर्मदृष्ट्या त्यांचें आज मुख्य केंद्र आहे तसें हिंदु–युनिव्हर्सिटी हें धर्मशिक्षणदृष्ट्या यापुढें त्यांचें मुख्य केंद्र होण्याचा संभव आहे. सन १८९८ सालीं मिसेस बिझांट यांनी बनारस सेंट्रल हिंदु कॉलेज काढलें; त्याचा हेतु धर्मशिक्षणाचा प्रारंभ करण्याचा होता, व तो प्रारंभ झालाहि. पण कॉलेजांत युनिव्हर्सिटीप्रमाणें

शिक्षणसीमा पोंचवितां येत नाहीं हें एक, व शिवाय थिऑसफी ही वास्तविक व्यापक असतां लोकमतानें तिला विशिष्ट पंथाचें स्वरूप आलें आहे, यामुळें थिऑफिस्ट चालकांकडून चालविलेल्या या कॉलेजास देशांतील हिंदु समाजाकडून मिळावें तितकें पाठबळ मिळालें नाहीं. पण आज तेंच सेंट्रल हिंदु कॉलेज हें हिंदु-युनिव्हर्सिटीचे मुख्य मध्यवर्ती कॉलेज झालेलें पाहून मिसेस बिझांट यांना कृतार्थता वाटेल व ती सकारण आहे असें आम्हीहि प्रांजलपणानें म्हणतों.

असो. सर्व हिंदूंना मनानें एकीकृत करणारें हें नवें विद्यापीठ म्हणजे आमच्या भावी राष्ट्रीय इमारतीचा एक मुख्य स्तंभच उभारला गेला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. या एका विद्यापीठांत संस्कृतभाषेला विशेष मान मिळाला तरी इंग्रजी भाषेला कमी मान मिळेल असें मुळींच नाहीं. व अभ्यासविषयांच्या दृष्टीनें पाहिलें तर पाश्चात्य ज्ञानास व सुधारणेसच अग्रपूजेचा मान मिळेल असेंच म्हणावें लागतें. केवळ ज्ञानाला देश, धर्म, जाति किंवा भाषा यांचा विटाळ कधींहि होऊं शकत नाहीं. व खरें विश्वबंधुत्व जर कोणत्या एका पायावर रचलें जाईल तर तें शुध्द ज्ञानाच्या पायावर. या ज्ञानाच्या प्रगतींत गेल्या कांहीं शतकांत पाश्चात्य राष्ट्रांनीं वर जागा मिळविली आहे, ती जागा जरी आम्हांस हिसकावून घ्यावयाची नाहीं तरी स्वतः आम्हांला या जागेपर्यंत जाण्याची आकांक्षा आहे. याकरितां हिंदु-युनिव्हर्सिटींत पाश्चात्य ज्ञानाचा, त्याच्या योग्यतेनुरूप आदरपूर्वक जरूर परामर्ष घेतला जाईल. हिंदु-युनिव्हर्सिटी म्हणजे तींत जुन्या संस्कृत ग्रंथांशिवाय दुसरें कांहीं शिकवूं नये किंवा शिकविलें जाणार नाहीं अशी वेडी समजूत बहुधा कोणाची नसेल असें आम्हांस वाटतें, व असल्यास ती निखालस चूक आहे असेंच आम्ही म्हणूं. पण ज्ञान हें मुख्य व भाषा ही गौण असल्यामुळें पाश्चात्य ज्ञानच पण तें देशी भाषेंतून शिकविल्यास अधिक सुलभरीतीनें शेकतां येतें व अधिक सुखानें पचनीं पडतें; याकरितां नवीन युनिव्हर्सिटींत देशीभाषेच्या द्वारें शिक्षण देण्याचा प्रयोग प्रशस्तपणें केला जाईल व हा फायदा लहानसहान नव्हे; इतकेंच नाहीं, तर तो प्रयोग यशस्वी झाल्यास शिक्षणपद्धतींत क्रांति होऊन सरकारी युनिव्हर्सिट्यांनाहि ही सुधारणा अंगीकारण्याशिवाय गत्यंतर नाहींसें होईल. हा बिनमोल फायदाहि

होण्याचा संभव बराच आहे. याशिवाय राष्ट्रीय दृष्टीनें शिक्षणाच्या इतर कांहीं सोयीहि करण्याचें नवीन विद्यापीठाच्या चालकांचे मनांत आहे. उदाहरणार्थ, सिव्हिल सर्व्हिस परीक्षा देण्याला विलायतेस जावें लागलें तरी त्या परीक्षेचा अभ्यास करण्याची सोय हिंदुस्थानांत होऊं नये असें नाहीं, व ही सोय काशीस आम्ही पुढेंमागें करूं असें पंडित मदनमोहन यांनीं मुंबईच्या एका भाषणांत सांगितल्याचें आमच्या वाचकांस स्मरत असेलच. पण शिक्षणविषयांप्रमाणें शिक्षणगुणालाहि महत्त्व असतें. ही युनिव्हर्सिटी बोलूनचालून खासगी,तेव्हां तिच्या परीक्षा सोप्या होऊन तिजकडून मिळणाऱ्या पदव्या पोकळ किंवा 'बोगस' ठरण्याचा संभव आहे, अशी शंका काढलेली आमचे ऐकिवांत आहे. परंतु लायकीच्या दृष्टीनें हिंदु-युनिव्हर्सिटीचे पदवीधर इतर पदवीधरांच्या तोडीचे निपजतील, किंबहुना या विद्यापीठाच्या परीक्षा सरकारी परीक्षांहून आम्ही अधिक सकस ठेवूं अशी चालकांची उमेद असल्याचें व्हाइसराय यांनीं आपल्या भाषणांत बोलून दाखविलेंच आहे.आणि पदवीधरांची लायकी कायम राहणें हेंच केव्हांहि विद्यापीठाविषयीं आदराला कारणीभूत होत असल्यानें या बाबतींत हिंदु युनिव्हर्सिटीचे विद्यमान व भावी चालक विशेष खबरदारी घेतील असा आम्हांस भरंवसा वाटतो.

*समर्थ विद्यालयावर गदा !

दडपशाहीच्या बकासुराची पाळी गेल्या आठवड्यांत 'समर्थ विद्यालया'-वर येऊन पडली आहे ! १९०८ सालीं बेकायदेशीर अत्याचारांना प्रतिबंध करण्याकरितां कायदेशीर अत्याचाराच्या स्वरूपाचे जे नवीन प्रबंध निर्माण झाले त्यांमध्यें फौजदारी कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा (Criminal Law Amendment Act) या नांवाचा एक होता. या कायद्याच्या १६ व्या कलमानें 'बेकायदा समित्या-सभा' वगैरे बंद करण्याचा अधिकार सरकारनें स्वतःस घेऊन ठेवलेला आहे. हा कायदा लावून बंगाल्यांत यापूर्वी 'अनुशीलन समिति' वगैरे संस्था बंद करण्यांत आल्याचें प्रसिद्धच आहे. शिक्षण देणाऱ्या शाळांना सुदैवानें आजपर्यंत तो लावण्यांत आलेला नव्हता. परंतु गेल्या शुक्रवारीं सिमला येथें हिंदुस्थानच्या सरकारी ग्याझिटाचा जादा अंक निघून, त्याच्या द्वारें वरील कायद्याच्या १६ व्या कलमाखालीं तळेगांव येथील 'समर्थ विद्यालय' ही संस्था बेकायदेशीर ठरविण्यांत आली, असें जाहीर करण्यांत आलें आहे. कोणत्याहि सरकारी ठरावास एक कारण म्हणून लागत असतें; व प्रस्तुत प्रकरणीं खुद्द कायद्याच्याच शब्दांनीं, जें कारण म्हणून सांगण्यांत आलें आहे तें असें कीं, 'समर्थ विद्यालयाचा हेतु कायदेशीर सुव्यवस्था राखण्याच्या कामीं अडथळा करणें असा असून सार्वजनिक शांततेस हें विद्यालय विघातक आहे.' हें कारण खरें आहे अगर नाहीं यावरच प्रस्तुतच्या ठरावाची न्याय्यान्याय्यता सर्वस्वीं अवलंबून राहील.

समर्थ विद्यालयाचा हेतु 'महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळा'च्या व खुद्द विद्यालयाच्या हस्तपत्रकांत स्पष्ट करून सांगितलेला आहे. १९०६ सालीं ऑगस्ट महिन्यामध्यें महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळानें जें हस्तपत्रक प्रसिद्ध केलें त्यांत समर्थ विद्यालयाचा व त्याच्या धर्तीवर निघणाऱ्या इतर विद्यालयांचा हेतु खालीलप्रमाणें दिलेला होताः—"राष्ट्रहिताच्या सर्व उद्योगांचा पाया राष्ट्रीय शिक्षणावर आहे, हें आजकाल कोणास सिद्ध करून दाख-

* केसरी, तारीख १४ जून १९१०.

विण्याचें कारण उरलें नाहीं. राष्ट्रीय बुद्धिशिक्षणाबरोबर कलाकौशल्य व उदीम-धंद्यांचें शिक्षण दिल्याशिवाय हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति सुधारण्याची आशा नाहीं. सरकारदरबारीं, तसेंच लोकांच्या वतीनें राष्ट्रसेवा करणारे लोक शुद्धशील, सामर्थ्यवान् व प्रगतिप्रिय असेच पाहिजे आहेत. पुढील पिढीस असें वळण लावण्यासाठीं, शारीरिक व नैतिक सामर्थ्यानें साऱ्या जगांतील कोणत्याहि सन्मान्य राष्ट्रांतील लोकांची बरोबरी करतील असे त्या पिढींतील तरुण निपजावेत, यासाठीं आज जोरानें प्रयत्न करणें हें राष्ट्रांतील प्रत्येक समंजस माणसास इष्ट वाटत आहेच. परंतु विचार करण्यांत काल घालविण्यापेक्षां एकदम कार्यास प्रारंभ करणें हेंच योग्य असें जाणून श्रीक्षेत्र करवीर येथें स्थापन झालेल्या **'समर्थ विद्यालय'** नांवाच्या शाळेचा फायदा घेऊन आम्ही खालीं सही करणारे अशा प्रकारच्या शाळा सर्व महाराष्ट्रांत स्थापल्या जाव्या म्हणून हें विनंतिपत्र प्रसिद्ध करीत आहों. या प्रकारच्या शाळांमध्यें हातकाम पुष्कळ व्हावयाचें आहे; शास्त्रीय शिक्षणहि द्यावयाचें आहे. तेव्हां हें मोठ्या खर्चाचें काम आहे. *** असे विचार मनांत आणून ज्या कोणाचा खालीं सही करणारांवर विश्वास असेल त्यांनीं आपल्या हातून होईल तेवढें द्रव्यसाहाय्य या महाराष्ट्र-विद्याप्रसारक-मंडळास द्यावें. सर्व प्रकारचा शिक्षणक्रम देशांतल्या देशांत पुरा होऊन अवलोकनानें प्राप्त होणारा अनुभव मिळविण्यास विश्वपर्यटण करणारे शोधकहि कांहीं निपजावेत, अशासाठीं सर्व शिष्यवर्ग कडकडीत ब्रह्मचर्याच्या व स्वधर्माचरणाच्या शिस्तींतून बाहेर पडला पाहिजे." परंतु याहूनहि ताजा पुरावा हवा असल्यास मिळण्यासारखा आहे. १९०९ सालच्या सप्टेंबर महिन्यामध्यें महाराष्ट्र-विद्याप्रसारक-मंडळानें नवीन हस्तपत्रक काढलें; त्यांत खालील मजकूर आहे.

"देशांतील तरुण पिढीस व्यापक आणि सर्वांगपूर्ण अशा प्रकारचें शिक्षण सर्वसंमत पद्धतीनें देणें, उच्च पूर्वपरंपरा आणि राष्ट्राच्या सांप्रतच्या व भविष्यकालीन श्रेष्ठ गरजा यांस अनुरूप अशा प्रकारचें—योग्य शिस्त ठेवून—त्यांच्या मनास वळण देणें व त्यांचें शील बनविणें आणि तद्द्वारा राष्ट्रकार्यांतील आपापला योग्य वांटा उचलण्याची त्यांचे अंगीं पात्रता आणणें, राष्ट्रानें ठरविलेले सदाचाराचे नियम कायम ठेवून त्यांस बरच्या

पायरीस नेणें, हाच राष्ट्रीय शिक्षणाच्या कोणत्याहि निर्दोष योजनेचा मुख्य व नियामक हेतु असला पाहिजे. अशा प्रकारें जें शिक्षण द्यावयाचें तें जसें औपपत्तिक तसेंच व्यावहारिक आणि वाङ्मयात्मक, शास्त्रीय व औद्योगिकहि असलें पाहिजे. याच शिक्षणाचे अभ्यासक्रमांत धार्मिक व नैतिक शिक्षणाचाहि अंतर्भाव अवश्य केला पाहिजे. शारीरिक शिक्षणाकडेहि काळजीपूर्वक लक्ष देऊन सर्वच शिक्षणसंस्थांस मूलभूत असलेल्या अशा योग्य शिस्तीकडेहि पूर्ण लक्ष दिलें पाहिजे. शिवाय हें सर्व शिक्षण विद्यार्थ्यांस त्यांच्या मातृभाषेचे द्वारें देणें अगत्याचें आहे." याच वेळेस समर्थविद्यालयाच्या चिटणिसानीं माहितीपत्रक प्रसिद्ध केलें, त्यांत विद्यालयांतील शिक्षणपद्धति कशी काय आहे याविषयीं खालीलप्रमाणें माहिती दिली आहे.

" प्रत्येक विषय शिकवितांना व्यावहारिक दृष्टि ठेवून अनवश्यक भाग गाळलेला आहे. शक्य तितकें मूर्त वस्तूचे द्वारें व निरनिराळीं उदाहरणें देऊन स्पष्ट ज्ञान देण्याची योजना केली आहे. परीक्षांचा काच नाहींसा करून घोकंपट्टीला अजीबात फाटा दिला आहे. शास्त्रीय विषय शिकवितांना वरील इयत्तेंतील विद्यार्थ्यांनीं स्वतः प्रयोग करावे अशी तजवीज केली आहे व हस्तकौशल्य, बिनचूकपणा व कल्पनाशक्ति यांची वाढ व्हावी म्हणून शिल्पशाळेंत त्यांचेकडून हातकाम करून घेतलें जातें. इंग्रजीमध्यें प्रवेश करून देतांना व पुढेंहि संभाषणपद्धतीचा उपयोग केला जातो. संस्कृत व्याकरणाचा निरर्थक बोजा कमी करून वाङ्मयाची ओळख सुलभ रीतीनें करून दिली जाते. भूगोलांतील नुसत्या याद्या पाठ करणें नीरस व निरुपयोगी आहे, म्हणून कोणत्याहि देशाचा भूगोल त्या देशाचा इतिहास शिकवितांना तयार करून घेण्यांत येतो. एकंदरीनें शिक्षणशास्त्रांतील नवीन नवीन सर्वमान्य पद्धतींच्या साहाय्यानें शिक्षण देण्याचें धोरण ठेवलें आहे."

या पत्रकांतील शब्दांमधून हल्लींच्या ठरावाचें कारण, वाच्यार्थानें तर राहोच, परंतु सरळ बुद्धीच्या कोणत्याहि मनुष्यास लक्षणेनें अगर व्यंजनेनेंहि सप्रमाण सिद्ध करून देतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. यास असेंहि एक प्रत्यंतर आहे कीं, याच हेतुपत्रकाच्या आधारावर विद्यालयास शेंकडों सद्गृहस्थांनीं प्रथमपासून लहानमोठ्या देणग्या दिल्या; व या देणग्यांची रक्कम आज सुमारें पाऊण लाख रुपयांवर गेलेली आहे ! देणगी देणारांमध्यें

'सर्व तऱ्हेच्या मतांचे, सर्व दर्जांचे व अनेक जातींचे लोक आहेत, ही गोष्ट महाराष्ट्र-विद्याप्रसारक-मंडळाच्या वर्गणीची जी नांवनिशीवार पोंच केसरीमध्यें वेळोवेळीं प्रसिद्ध झाली आहे तिजवरून कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखी आहे. समर्थ विद्यालयाच्या चालकांचा हेतु क्षणभर सरकार आरोप करितें तसाच होता असें घेऊन चाललें तरी वर्गणी देणारे हे शेंकडों अगर हजारों लोक सरकारच्या सत्तेशीं विरोध करण्यास तयार झालेले होते, व कायदेशीर सुव्यवस्थेचा त्यांना वीट आल्यामुळें तिला अडथळा करण्यास समर्थ विद्यालयाच्या द्वारें त्यांनीं एक प्रकारें उपक्रमच केला होता, असें मानणें ही भोळेपणाची अगर आपमतलबी कल्पनाशक्तीची कमाल झाली, असेंच म्हटलें पाहिजे. बरें, दाखवावयाचा हेतु एक व खरा हेतु एक असें असावें, अशी कल्पना केली तर या कल्पनेस समर्थनपर असा कोणता पुरावा सरकाराजवळ होता हें आम्हांस कळत नाहीं. 'कायदेशीर सुव्यवस्थेचे शत्रु' अशा प्रकारचा जो दुर्लौकिक आज समर्थ विद्यालयाच्या पदरीं नाहक बांधण्यांत येत आहे त्यास अनुसरून विद्यालयांतील शिक्षक अगर विद्यार्थी यांचें कोणतें वर्तन कोठें घडलें हें बहुजनसमाजास कळेल तर फार चांगलें होईल. आमची अशी समजूत आहे कीं, विद्यालयांतील एकाहि शिक्षकावर अगर विद्यार्थ्यावर कायदा मोडल्याचा अगर शांततेचा भंग केल्याचा खटला झालेला नाहीं; मग तो शाबीद होऊन शिक्षा होणें तर दूरच! ज्यांनीं शांतता व व्यवस्था मोडण्याचा विडाच उचललेला होता असें सरकार म्हणतें, ते विद्यालयाच्या स्थापनेपासून तीनचार वर्षेपर्यंत हेतुसदृश कांहीं तरी कृति केल्याशिवाय स्तब्ध बसतील, हें मनुष्यस्वभावाविरुद्ध–विशेषत: तरुणांच्या स्वभावाविरुद्ध–आहे असें आम्हांस वाटतें. समर्थ विद्यालयाच्या स्थापनेपासून अलीकडे गेलेला काळ शांततेचा खचित नव्हता. या धामधुमीच्या काळांत सरकारी व निमसरकारी शाळांतील कित्येक विद्यार्थी बेकायदेशीर कृत्यें करून तुरुंगांत पडले असतां, समर्थ विद्यालयांतील एकहि विद्यार्थी कोणत्याहि प्रकारच्या खटल्यांत सांपडला नाहीं व शिक्षेस पात्र झाला नाहीं! तसेंच पोलिसांनीं विद्यालयाचे अनेक वेळां अवचित झाडे घेतले असतांहि त्यांना तेथें नांव ठेवण्यासारखें केव्हां कांहींहि सांपडलें नाहीं; यावरून काय अनुमान काढावयाचें हें उघडच आहे. सार्वजनिक शांततेचा भंग करण्यासारखें तरी विद्या-

लयांतील विद्यार्थ्यांच्या हातून काय घडलेलें आहे ? गेल्या तीन वर्षांत सुटीच्या निरनिराळ्या प्रसंगीं, विद्यालयाच्या चालकांनीं विद्यार्थ्यांस बरोबर घेऊन प्रसिद्ध स्थळें व क्षेत्रें पाहून येण्याची पद्धति ठेवली होती. परंतु यांपैकीं कोणत्याहि प्रसंगीं या विद्यार्थ्यांनीं कोणाची कुरापत काढली, कोणास मारहाण केली, असा बोभाटा कधींहि आला नाहीं. इतकेंच नव्हे, तर विद्यालयांतील विद्यार्थ्यांची जूट, त्यांचे एक पद्धतीचे व टापटिपीचे पोषाख, त्यांच्या तोंडावरील तेज, शारीरिक श्रम करण्याची त्यांची हौस व तयारी, आणि सर्वांत मुख्य म्हटलें म्हणजे त्यांची शिस्त, विनयशीलता व कोणाच्या अध्यांत अगर मध्यांत न पडतां नाकापुढें पाहून चालण्याची त्यांची तऱ्हा, या गोष्टींनीं ते जेथें जेथें गेले तेथें तेथें प्रेक्षकांच्या मनावर अनुकूल असाच ग्रह झाल्याचें आमच्या कानावर आलें आहे. तसेंच या विद्यालयाच्या खुद्द तळेगांव येथील व्यवस्थेंत व कामकाजांत गुप्त असें कांहींहि नव्हतें. वाटेल त्यास वाटेल तेथें जाऊन विद्यालयाचें वाटेल तें काम पाहाण्याची पूर्ण मोकळीक होती; व वस्तुतः शेंकडों लोकांनीं तेथें जाऊन हें काम वेळीं अवेळीं पाहिलेंहि आहे. तात्पर्य, 'सार्वजनिक शांततेस हें विद्यालय मोठा धोका उत्पन्न करणारें आहे' अशा प्रकारचा भयंकर आरोप विद्यालयावर ठेवलेला पाहून महाराष्ट्रांतील लोकसमूहास खचित अत्यंत उद्वेग वाटल्यावांचून राहणार नाहीं.

आतां लोकांस कधींहि कळत नाहींत अशा ज्या कित्येक गोष्टी सरकारास केव्हां केव्हां कळतात असें सरकारतर्फे पुष्कळ वेळां सांगण्यांत येतें, व हें कांहीं अंशीं खरेंहि आहे. लोकांना माहिती मळलेल्या मार्गांनीं येऊन कळते; माहिती मिळण्याचे सरकारचे मार्ग याहून वेगळे व गुप्त असतात ही गोष्ट आम्हांस कबूल आहे. परंतु त्याच्याबरोबर हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे कीं, या गुप्त मार्गांनीं मिळणारी माहिती पुष्कळ वेळां खोटी, बनावट, निदान भ्रामक व एकतर्फी असते; आणि कोणाहि व्यक्तीस अगर संस्थेस अशा माहितीचे आधारावर शिक्षा करण्याचे पूर्वी त्यास अगर तीस ही माहिती सांगून तिजविषयीं आरोपितांचें काय म्हणणें—काय खुलासा—आहे हें विचारणें, हें तत्त्व न्यायबुद्धीच्या अगदीं मुळाशीं आहे हें कोणीहि कबूल करील. १९०८ च्या कायद्यानें सरकारास एखादी संस्था बेकायदे-

शीर ठरविण्याचा अधिकार दिला असला तरी तिला बेकायदेशीर ठरविण्यापूर्वी आपलें म्हणणें कळविण्यास सवड देऊं नये, असें सदर कायद्यांत कोठेंहि सांगितलेलें नाहीं; व विशेष परिस्थितींत सरकारनें आपणास हवे ते अधिकार कायद्यानें घ्यावे हें तत्त्व कबूल करणारासदेखील त्या अधिकारांचा उपयोग अन्यायानें झालेला पाहून राग आल्याशिवाय राहणार नाहीं, अशी आमची समजूत आहे. आम्हांस जी माहिती आहे तिजप्रमाणें समर्थ विद्यालयाच्या शिक्षणपद्धतींत सरकारास अपवादास्पद असें अमुक एक वाटत आहे, अगर अमुक अमुक दुरुस्ती न केली तर त्याचे अमुक अमुक परिणाम होतील, असें विद्यालयाच्या चालकांस सरकारी अधिकाऱ्यांकडून कधीं स्पष्ट कळविण्यांत आलें होतें असें वाटत नाहीं. उलट विद्यालयाच्या चालकांनीं सरकारास विद्यालय पसंत नसावें असें कळतांच, सरकाराचा गैरसमज दूर करण्याची आपल्याकडून खटपट केली होती असें आम्हांस माहीत आहे. १९०७ च्या नोव्हेंबर महिन्यांत समर्थविद्यालय तळेगांवास आलें. त्यानंतर पुढील आक्टोबर महिन्यांत प्रो० विजापूरकर यांनीं नामदार गव्हर्नरसाहेब यांस पत्र पाठवून विद्यालयासंबंधीं कांहीं खुलासा समक्ष नामदारांच्या कानावर घालण्याची परवानगी मागितली होती; परंतु या सुमारास विश्ववृत्तावरील खटल्यास सुरवात झालेली असल्यामुळें खटल्याचें काम चालू असतां आरोपीला आपणास भेटूं देण्यापासून गैरसमज उत्पन्न होण्याचा संभव आहे, या सबबीवर विजापूरकर यांनीं मागितलेली परवानगी नाकारण्यांत आली. १९०९च्या जानेवारींत प्रो० विजापूरकर यांजला शिक्षा झाली. त्यानंतर दोन महिन्यांचे आंत त्यांच्या जागीं आलले महाराष्ट्र-विद्याप्रसारक मडळाचे चिटणीस व समर्थविद्यालयाचे मुख्याध्यापक रा०ज. वि. ओक यांनीं विजापूरकरांनीं उपक्रम केलेल्या कामाकरितांच ना० गव्हर्नरसाहेबांची गांठ पडण्याची परवानगी मागितली. "विद्यालयांत राजद्रोही असें कांहीं शिकविलें जात नाहीं, अशा प्रकारची तुमच्याकडून आगाऊ खातरजमा होत असेल तर भेटीची परवानगी मिळेल" असें नामदारसाहेबांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीकडून उत्तर आलें; व रा० ओक यांनीं तशी खातरजमा केल्यानंतर तीपटून मुलाखतीची परवानगीहि मिळाली. सदरहू मुलाखत खासगी असल्यामुळें तींत काय घडलें हें कळणें जरी अशक्य आहे, तरी पण आम्हांस असें

वाटतें कीं, ना० गव्हर्नरसाहेब व रा० ओक यांचें बोलणें चालणें होऊन साहेबांचा गैरसमज घालविण्याचा रा० ओक यांनीं शक्य तो प्रयत्न केला असावा. पुढें सप्टेंबर महिन्यांत विद्यालयाचें नवीन हस्तपत्रक निघालें, तेव्हां त्याची एक प्रत रा० ओक यांनीं नामदारसाहेबांकडे अवलोकनार्थ पाठविली; परंतु सरकारचें समाधान झालें अगर न झालें, अथवा सरकारास आणखी कांहीं माहिती अगर खुलासा पाहिजे, याविषयीं विद्यालयाच्या चालकांकडे विचारपूस करण्यांत आली नाहीं. परंतु 'सामोपचारा'नें वागविण्याच्या अनुग्रहास विद्यालय पात्र नाहीं, असें सरकारास वाटलें असें घेऊन चाललें तरी, प्रत्यक्ष 'दंड' करण्यापूर्वी 'अमुक अमुक गोष्टी करा, नाहीं तर अमुक अमुक रीतीनें सरकार तजवीज करील' असा एखादा निर्वाणीचा रोखठोक इषारा तरी सरकारानें देणें जरूर होतें. शीलवंत शूर शिकारी लोक दुष्ट श्वापदासहि गोळी घालण्यापूर्वी आपला जीव बचावण्याची संधि त्यास देतात असें म्हणतात. राष्ट्रांच्या युद्धाला कोणताच कायदा लागू नाहीं, तथापि हत्यार चालविण्यापूर्वी परस्परांनीं असा निर्वाणीचा इषारा (Ultimatum) देणें हेंच शिष्टसंमत आहे असें गणिलें जातें. लष्करी कायद्यापेक्षां अधिक तडकाफडकी निकाल करण्याचें दुसरें कायदेशीर साधन नाहीं, असें असतांहि, लष्करी शिक्षा होण्यापूर्वी लष्करी कोर्ट भरून आरोपितास जाब विचारावा लागतो. परंतु १९०८ च्या या कायद्याच्या अमलाचे कामीं सरकारनें लष्करी न्यायमनसुब्यावरहि ताण केली असें म्हणण्यास हरकत नाहीं !

समर्थविद्यालय अशा रीतीनें तडकाफडकी बंद झाल्याबद्दल लोकांस जी हळहळ वाटत आहे, तिचें मुख्य कारण असें आहे कीं, या विद्यालयाच्या योगानें महाराष्ट्रांत इष्ट असा एक शिक्षणविषयक नवीन प्रयोग करून पाहण्यांत येणार होता. राष्ट्रीयत्वाच्या पोषणास जीं अनेक अंगें लागतात, त्यांच्यापैकीं कित्येक अंगांच्या दृष्टीनें पाहतां सदर विद्यालयांतील शिक्षण विद्यमान इतर संस्थांपेक्षां अधिक पूर्णत्वानें मिळण्याचा संभव होता. विद्यार्थ्यांचें ब्रह्मचर्य, शारीरिक मेहनत, घरदार सोडून राहण्याची व थोड्या पैशांत काटकसरीनें निर्वाह करून व जाडेंभरडें अन्न खाऊनहि शरीरसंपत्ति सुदृढ ठेवण्याची सवय, देशी भाषा आणि शिक्षणक्रम व पुस्तकें यांची

सुधारणा यांच्या साहाय्यानें अल्पकाळांत बरेंच शानार्जन होण्याचा संभव, परीक्षांचा व घोकंपट्टीचा त्रास चुकवून विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी करण्याची संधि, साक्षर शिक्षणाबरोबरच हस्तकौशल्य व धंदेशिक्षण यांची योजना, आणि केवळ सरकारी नोकरीवर भिस्त न ठेवतां व पदवीची लालसा न धरून स्वावलंबनाचे तत्त्वावर भावी आयुर्यात्रा सफल करण्याची महत्त्वाकांक्षा—इत्यादि गोष्टींच्या दृष्टीनें पाहतां समर्थविद्यालयाच्या प्रयोगशाळेंत होणारा प्रयोग महाराष्ट्रास मननीय वाटत असून प्रियहि होता, ही गोष्ट केवळ किरकोळ चिल्लर देणग्यांच्या योगानें विद्यालयाचे वर्गणीची जी प्रचंड रक्कम अवघ्या दोनतीन वर्षांत जमा झाली तिजवरून उघड होत आहे. उघडी हवा, शिस्त, नियमितपणा, व्यायाम वगैरेंच्या योगानें या विद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या तोंडावर जो रसरशीतपणा दिसूं लागला होता त्यामुळें या प्रयोगांतील प्रमेयभूत एक कार्य तरी एव्हांच सिद्ध झालेलें दिसत होतें. तसेंच देशी भाषेंतून शिक्षण देणें, शिक्षणोपयोगी नवीन ग्रंथमाला निर्माण होणें, या गोष्टींच्या बाजूनें चाललेला प्रयत्नहि यशस्वी होण्याचा रंग आला होता. यामुळें इतर बाबतींतील यश दिसण्यास हें विद्यालय जिवंत राहिलें नाहीं याबद्दल विद्यालयाच्या चालकांस व त्याच्या आश्रयदात्यांस वाईट वाटणें अगदीं स्वाभाविक आहे.

आतां दुसरे पक्षीं, समाजांतील कित्येक लोकांस व सरकारास विद्यालयासंबंधीं सर्वच गोष्टी पसंत पडण्याचा संभव नव्हता, हेंहि आम्ही जाणून आहों. कोणतीहि नवीन संस्था त्या विषयांतील जुन्या संस्थांना आपल्याबरोल अप्रत्यक्ष दोषारोपाचें किंवा निंदेचें एक चिन्हच आहे, असें वाटणें स्वाभाविक आहे; व महाराष्ट्र-विद्याप्रसारक मंडळाच्या हस्तपत्रकांतून अगर तत्समर्थनपर अशा इतरत्र प्रसिद्ध झालेल्या लेखांतून जुनी शिक्षणपद्धति व जुन्या शिक्षणसंस्था यांच्या दोषदर्शनाचा ध्वनि निघण्यासारखा होता, हें नाकबूल करण्यांत फारसा अर्थ नाहीं. तथापि असला ध्वनि केवळ अपरिहार्य आहे हें विसरतां कामा नये. आपल्या इलाख्यांतील शिक्षणाचा इतिहास लक्षपूर्वक पाहणारांस असें दिसून येईल कीं, प्रथम सर्वस्वीं सरकारी शाळा, त्यानंतर खासगी परंतु सरकारी ग्रँट घेणाऱ्या निमसरकारी शाळा, त्यानंतर ग्रँट घेणाऱ्या परंतु त्यांतल्या त्यांत स्वतंत्र अशा शाळा,

त्यानंतर ग्रँट बिलकूल न घेणाऱ्या व सर्वस्वी स्वतंत्र परंतु सरकारी विश्वविद्यालयास जोडलेल्या अशा शाळा, अशा परंपरेनें हा इतिहास निर्माण झालेला होता; व समर्थ विद्यालय हें याच परंपरेंतील फक्त पुढची एक पायरी होय. या परंपरेंतील प्रत्येक पुढची रक्कम ही तिच्या मागच्या रकमेची अप्रत्यक्ष निंदक होय अशी त्या त्या वेळीं समजूत होती. पण वस्तुतः पुणें-न्यू स्कूल जन्मास आल्यामुळें सरकारी हायस्कुलानें त्याचा हेवा अगर द्वेष करण्यास जितकें सबळ कारण होतें त्याहीपेक्षां आज न्यू स्कूलसारख्या संस्थांनीं समर्थ विद्यालयासारख्या संस्थेचा द्वेष करण्यास कारण कमी सबळ आहे. सरकारच्या दृष्टीनेंहि पाहतां, विद्यालयांत शिकविलीं जाणारीं कित्येक पुस्तकें अगर दिले जाणारे कित्येक पाठ नापसंत असतील; तथापि एवढ्यामुळें तें अशा रीतीनें वज्राघातानें रसातळास पोंचवावयास पाहिजे होतें, असें आम्हांस वाटत नाहीं. शिक्षणसंस्थांनीं होतां होईतों इतर व्यवसायांत, विशेषतः उलाढालीच्या राजकीय चळवळींत तरी होतां होईतों न पडणें बरें, व हें तत्त्व विसरून विद्यालयाच्या चालकांच्या हातून प्रथम प्रथम कदाचित् वर्तन घडलें असण्याचा संभव आहे. तथापि, विद्यार्थी काय व शिक्षक काय यांचें गेल्या सालांतील वर्तन पाहिलें असतां तें वरील तत्त्वास सहसा सोडून गेलें नव्हतें, अशीच कबुली कोणासहि द्यावी लागेल. विद्यालयांत शिकविलीं जाणारीं विशिष्ट पुस्तकें सरकारास अप्रिय असल्यास नवीन कायद्यानें त्यांस तीं सरकारजमा करतां आलीं असतीं, व विद्यालयांतील शिक्षण जर खरोखर बेकायदेशीर असतें तर नेहमींचा फौजदारी कायदा लावून खटले वगैरे करून व अद्दल घडवून तें त्यांस बंद पाडतां आलें असतें. परंतु कोणच्याहि प्रकारचा स्पष्ट दोषारोप न करतां, खुलासा न मागतां, पुरावा न घेतां, चौकशी न चालवितां, एकदम समर्थ विद्यालय कायमचें बंद करण्यांत आलें हें भावी पिढ्या 'अस्मानी सुलतानी' या म्हणीपैकीं दुसऱ्या आपत्तीचें समर्पक उदाहरण म्हणून देऊं लागतील यांत संशय नाहीं. ग्रँट न घेतां किंबहुना विद्यमान विश्वविद्यालयाशीं संबंध न ठेवतां स्वतंत्र रीतीनें चालण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या शिक्षणसंस्थेबद्दल सरकारास थोडासा संशय येणें हें जरी स्वाभाविक असलें तरी तो संशय एकदम असा दारुणपरिणामी करणें हें खचित न्याय्य नाहीं.

विद्यालयाच्या चालकांवर रोष झाला असला तरी त्यांस तडजोड करण्याची संधि देणें हेंच सरकारचें कर्तव्य होतें; व तें त्यांनीं केल्यावर जर विद्यालयाचे चालक आपला हट्टच चालविते तर मग या वज्राघाताबद्दल सरकारास कोणाला फारशीं नांवें ठेवतां आलीं नसतीं. परंतु झाला हा प्रकार मात्र सर्वस्वीं अन्यायाचा झाला, असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

राष्ट्रीय शिक्षणाचें पुढें काय ?

समर्थ विद्यालयासंबंधानें सरकारचा अखेरचा हुकूम प्रसिद्ध झाल्यापासून 'राष्ट्रीय शिक्षणाचें पुढें काय?' हा प्रश्न त्या शिक्षणाच्या सर्व हितचिंतकांपुढें येऊन उभा राहिला आहे. खुद्द समर्थ विद्यालयासंबंधानें नांव ठेवण्यासारख्या विवक्षित गोष्टी कोणत्या होत्या हें सरकार दाखवून देईल अशी जी आशा कांहीं थोड्या श्रद्धाळू लोकांस वाटत होती निष्फळ झाली. दुसऱ्या बाजूनें समर्थ विद्यालयाचें शिक्षकमंडळ व विद्यालयांत ठेविलेल्या मुलांचा पालकवर्ग यांनीं सरकारच्या मुक्या आक्षेपांस देतां येईल तितकें उत्तर देऊन ते यापुरत्या आपल्या कर्तव्यांतून मोकळे झाले आहेत. 'महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळा'च्या हातीं समर्थ विद्यालय बंद झाल्यानें जी जमीन, इमारत वगैरे मिळकत व अल्पशी रोकड रक्कम शिल्लक असेल, तिचें काय करावयाचें हा प्रश्न मुळींच बिकट नाहीं. कारण योग्य उपयोग करितां येईपर्यंत ही मिळकत व हा पैसा जागच्या जागीं पडून राहण्यास फारशी हरकत नाहीं. दुसरा एक बराचसा बिकट प्रश्न होता, तो समर्थविद्यालयांतील विद्यार्थ्यांचें पुढें काय होणार हा होय. विद्यालयांतील मुलें आपापल्या घरीं गेलीं असून सुदैवानें त्यांतील बहुतेकांचे पालक कमीअधिक संपन्न व सुखवस्तु असल्यामुळें, विद्यमान इतर कोणत्याहि शिक्षणसंस्थेंत त्यांचा समावेश न झाला तरी त्यांच्या पुढील आयुष्यक्रमाचा कांहीं एखादा भला मार्ग बहुधा निघेल यांत शंका नाहीं. तथापि, शिक्षणक्रम अपुरा राहिलेलीं व इतर शाळांत समावेश न पावलेलीं हीं मुलें एकदम धंदा तरी काय करणार ?

* केसरी तारीख ८ नोव्हेंबर १९१०

यास्तव त्यांस पोटाचा धंदा शिकून होईपर्यंत शिक्षण देण्याची कांहीं तरी व्यवस्था महाराष्ट्रानें करणें जरूर आहे असें आम्हांस वाटतें.

परंतु मुख्य प्रश्न वर सांगितल्याप्रमाणें राष्ट्रीय शिक्षणाच्या भावी आयुष्यक्रमासंबधानें उपस्थित होतो. सन १९०६ सालीं जेव्हां प्रथम राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना जोरानें मूर्तस्वरूपानें पुढें आली तेव्हांच्या व हल्लींच्या स्थितींत जमीनअस्मानचें अंतर पडलें आहे, हें कोणीहि कबूल करील. या चार वर्षांत सरकारानें पिच्छेहाट करणारे दडपशाहीचे कायदे व त्यांहूनहि अधिक घातक असा कायद्यांचा अंमल करून जवळ जवळ एक पिढी पालथी घातली. अजूनहि हें सत्र सुरू आहे; व तें केव्हां थांबेल हें सांगवत नाहीं. देशांत कृत्रिम कां होईना परंतु बरीचशी शांतता उत्पन्न झाल्यामुळें या कायद्यांचा अंमल प्रत्यक्ष पुढें चालू राहण्याचें कारण उरणार नाहीं; तरी पण पटावर आलेले दडपशाहीचे कायदे रद्द न होतां ते तसेच राहणार यांत शंका नाहीं. अशा प्रकारचे कायदे अस्तित्वांत येतील, व दडपशाहीचें असें हें सत्र सुरू होईल या गोष्टीचें आकलन ऊर्फ भविष्य १९०६ सालीं राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीस उपक्रम करणाऱ्या पुढाऱ्यांना करितां येणें शक्य होतें किंवा कसें हा वादग्रस्त प्रश्न आहे; व अशा प्रकारचें भविष्य करितां येण्यासारखें असतें तरीहि त्यांनीं मूळ अंगिकारलेला मार्ग सोडून दिलाच पाहिजे होता कीं काय, याबद्दलहि वाद असूं शकेल. परंतु हल्लीं तरी गेल्या तीन सालांत मिळालेल्या मौल्यवान अनुभवाचा फायदा राष्ट्रीयशिक्षणाच्या पुरस्कर्त्यांनीं करून घेतला पाहिजे, ही गोष्ट निर्विवाद आहे.

सदरहू अनुभवांतील मुख्य दोन गोष्टी आमच्या मतें या होत. पहिली गोष्ट पैशासंबंधानें. एक तर टिळक, देशमुख, वैद्य, विजापूरकर वगैरे मंडळी पुढारी असून त्यांनीं खटपट जातीनें केली व सरकाराची विद्यालयासंबंधाची प्रतिकूलताहि अद्यापि जगजाहीर व्हावयाची होती; अशी स्थिति असल्यानें राष्ट्रीयशिक्षणाच्या या कार्यास तीन वर्षांत साठ पांसष्ट हजार रुपये मिळाले. गेल्या सालांत कित्येक पुढारी जाग्यावर नव्हते हें खरें; परंतु सरकारची प्रतिकूलता व्यक्त झाल्यानें हे पुढारी जाग्यावर असतां ज्या देणग्या व धार्मिक वर्गण्या लोकांनीं कबूल केल्या होत्या त्या पूर्वीइतक्या त्वरित वसूल होईनाशा झाल्या. या गोष्टीवरून अनुमान निघतें तें हेंच कीं, महाराष्ट्रांत

स्वार्थत्यागाचें बीं जरी उत्कृष्ट रुजलें आहे, तरी महाराष्ट्रीयांची स्वाभाविक गरिबी म्हणजे द्रव्याची कमतरता, व देण्याची इच्छा असतांहि सरकारच्या प्रतिकूलतेमुळें दात्यांस वाटणारी भीति, यांच्यामुळें राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यास मिळू शकणाऱ्या द्रव्याची मर्यादा किती सकुचित आहे, हें उघड दिसून येत आहे. 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'च्या गेल्या पंचवीस वर्षांच्या इतिहासांत लोकांनीं दिलेल्या देणगींची रक्कम सुमारें चारपांच लक्ष रुपये झाली हें खरें. तथापि या पंचवीस वर्षांत, तिच्या उत्तम लोकप्रियतेचे दिवस, तिच्यांतील कित्येक खटपटी सभासदांनीं वर्गण्या मिळविण्याकरितां केलेल्या अविश्रांत श्रमाचे दिवस, आणि गेल्या दोन वर्षांत सरकारास अप्रिय असलेलें समर्थ विद्यालय पुढें आल्यामुळें सोसायटीस पैसे देणें हें एकप्रकारें सरकाराच्या मताशीं आपलें मत जुळतें असें दाखविण्याच्या इच्छेनें उत्पन्न झालेल्या कृत्रिम औदार्यबुद्धीचे दिवस, हे सर्व या पंचवीस सालांत येतात, ही गोष्ट विसरतां कामा नये. पण सर्व महाराष्ट्रानें पंचवीस वर्षांत लोकांना प्रिय, सरकारास प्रिय व उभयप्रिय अशा सर्व शिक्षणसंस्थांस मिळून दिलेल्या रकमेहून अधिक रक्कम बंगाल्यांतील एका जमीनदारास एकटघा संस्थेस देतां आली, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

परंतु दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे सरकार व राष्ट्रीय शिक्षणाची यापुढें निघणारी कोणतीहि संस्था यांच्या दरम्यानच्या संबंधाविषयींची होय. पैशाची अडचण मोठी असते, नाहीं असें नाहीं. तथापि, समर्थ विद्यालय हें बेकायदा आहे असें ठरून तें बंद झालें नसतें तर द्रव्याच्या अभावामुळें बंद पडण्याची पाळी त्यास खचित आली नसती. नदीच्या ओघाप्रमाणें समाजाच्या औदार्याचाहि ओघ वाढत्या प्रमाणावर राहिला असता, असें विद्यालयाचे चालकांनीं घेऊन चालण्यास फारशी हरकत नव्हती. पण सरकारची प्रतिकूलता हा जो रोग विद्यालयास जडला तोच शेवटीं असाध्य ठरला, हें आतां उघड आहे. तेव्हां शिक्षणाच्या कामाला देणग्या देण्याची महाराष्ट्रीयांची बुद्धि पूर्ववत् कायम आहे असें मानून बेकायदा ठरण्याच्या गंडांतरांतून समर्थ विद्यालयासारख्या किंवा राष्ट्रीय शिक्षणाच्या दुसऱ्या कोणत्याहि शाळा यापुढें कशा वांचविता येतील, व वांचविलें असल्यास तर खरें राष्ट्रीय शिक्षण देण्याचें त्यांचें अंग शाबूत ठेवून त्या वांचविता

येतील कीं नाहीं, हा प्रश्न पुढें येतो. राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न खुद्द राष्ट्राच्या इतिहासाशींच गुंतलेला असल्यामुळें, एखाद्या विवक्षित प्रयत्नाच्या यशायशावर राष्ट्रीय शिक्षणाच्या सर्व भावी आशा अवलंबून राहणें शक्य नाहीं. तळेगांवचें समर्थ विद्यालय शाबूद राहून व सुधारून अपेक्षेप्रमाणें वृद्धि पावलें असतें तरी त्या एका संस्थेनें सर्व महाराष्ट्राचें काम भागण्यासारखें होतें, असें मानतां येत नाहीं. उलटपक्षीं एक समर्थ विद्यालय बुडालें म्हणून 'जग बुडालें' असेंहि म्हणतां येणार नाहीं. प्रत्येक पिढीस आपआपल्या काळीं हा प्रश्न आपापल्या रीतीनें सोडवावा लागतच असतो; व समर्थ विद्यालय अवघ्या तीन वर्षांत बुडाल्यामुळें आजच्या पिढीस राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न दुसऱ्यांदां हातीं घ्यावा लागणार आहे, तरी तो तिनें घेतलाच पाहिजे. "कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ?" या पंतांच्या उक्तीप्रमाणें राष्ट्रीय शिक्षणाचें घर फिरून बांधण्यास सुरुवात झाली पाहिजे. कोळ्याचें जाळें कितीहि वेळ फाटलें तरी तो तें फिरून विणतोच. मोडलेलें घरटें पक्षी इतक्या निश्चयानें पुनः पुनः बांधतात कीं, एकदां बांधलेलें घरटें मोडल्याचें जणूं काय त्यांना दुःखच होत नाहीं ! व असें जर आहे तर एकदां बिघडलेली गोष्ट फिरून घडवून आणण्याची हाव मनुष्यानें धरल्यास त्यांत नवल करण्यासारखें कांहींच नाहीं.

परंतु मनुष्यें व पशुपक्षी यांच्या पुनर्रचनेच्या प्रयत्नांत एक महत्त्वाचा फरक असतो, व तो हा कीं, पशुपक्षी यांना आपल्या उपजत बुद्धीस अनुसरून फक्त एकाच ठराविक पद्धतीनें घर बांधतां येतें. दूरदृष्टि किंवा अनुभवजन्य ज्ञानानें सुधारण्याची पात्रता त्यांच्या अंगीं नसते. हे दोनहि गुण ईश्वरानें मनुष्याला दिले आहेत; व यामुळें कोणत्याहि एका घटनेचा बिघाड झाला असतां तिच्या जागीं दुसरी घटना करावयाची झाली तर, पूर्वीच्या प्रयत्नांत आपल्या हातून कोणते दोष झाले होते, व नवीन प्रयत्नांत ते आपणांस कसे टाळतां येतील—बाहेरून अनपेक्षित अशीं कोणतीं विघ्नें कशीं येतात व तीं टाळणें कसें शक्य आहे—यांचा विचार व विचाराचा अंमल मनुष्यमात्रास करितां येतो. समर्थ विद्यालय काढतांना, तें पुढें ज्या कारणांनीं बुडालें त्या कारणांची अटकळ कदाचित् करतां येण्यासारखी नसेल; पण तो अनिष्ट परिणाम प्रत्यक्ष घडून आल्यावर

तरी त्याची मीमांसा करून, तसाच परिणाम फिरून घडूं नये याविषयींची खबरदारी राष्ट्रीय शिक्षणाच्या जुन्या व नव्या पुरस्कर्त्यांस घेतां येण्यासारखी आहे, असें आम्हांस वाटतें. बागेंत एखादें नवीन झाड लावलें असतां त्याची वाढ कितपत झाली आहे हें पाहण्यास त्याचीं मुळेंच वरचेवर उपटून पाहाणें हा शहाणपणाचा मार्ग नव्हे; हें पाहण्याचे खरे इतर मार्ग आहेत. पण दुर्दैवानें कांहीं अकल्पित कारणांनीं तें झाड उपटलें गेलेंच तर त्याच्या मुळांकडे नीट पाहिलें असतां त्याच्या वाढीची कल्पना विशेष समर्पक रीतीनें करितां येईल यांत मात्र शंका नाहीं. तात्पर्य, राष्ट्रीय शिक्षणाची एक शाळा बुडाली तरी हताश न होतां, जरूर तर निराळ्या प्रकारची—दुरुस्त केलेली व सुधारलेली—राष्ट्रीय शाळा काढतां येणें शक्य आहे कीं नाहीं ? असल्यास तें कोणत्या धोरणानें शक्य आहे ? सरकारची हरकत न येईल अशा प्रकारानें पण ज्यास राष्ट्रीय हें नांव देतां येईल असें शिक्षण देणें अशक्यच आहे कीं काय ? वगैरे गोष्टींसंबंधानें फिरून एकवार चर्चा करण्याची वेळ आलेली आहे. 'राष्ट्रीय' शिक्षणाच्या अंगांचा व उपांगांचा ज्यांत सर्व बाजूंनीं साधकबाधक विचार केला आहे, अशी एक लेखमाला केसरींतून सवडीप्रमाणें खंडशः देण्याचें आम्हीं योजिलें आहे; व राष्ट्रीय शिक्षणाचे अभिमानी लोक या चर्चेस प्रश्नोत्तर, सूचना, टीका वगैरेंनीं मदत करतील अशी आम्हांस आशा आहे.

स्त्रियांची युनिव्हर्सिटी*

गेल्या डिसेंबरांत मुंबईस भरलेल्या सामाजिक परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें प्रो० कर्वे यांनीं जें प्रास्ताविक भाषण केलें त्यावरून आमच्या महाराष्ट्र देशांत तरी उपयुक्त व उच्च प्रतीच्या स्त्रीशिक्षणाची सोय होण्यासाठीं एखादें व्यापक व सर्वांगसुंदर खासगी विद्यापीठ लवकरच निघेल अशी आम्हांस आशा वाटत होती. प्रो० कर्वे यांनीं या कामी आजपर्यंत जे परिश्रम केले आहेत व जी झीज सोसलेली आहे त्यावरून, आणि विशेषतः जपानचें उदाहरण घेऊन त्यांनीं राष्ट्रीय व व्यापक स्त्रीशिक्षणाची जी दिशा आपल्या भाषणांत वाचकांपुढें मांडली त्याजवरून स्त्रियांची ही भावी युनिव्हर्सिटी निवळ एकदेशी नव्हे तर राष्ट्रीयदृष्ट्या व्यापक होईल असें वाटत होतें. पुणें येथील फीमेल हायस्कूल स्थापन झालें तेव्हांहि स्त्रीशिक्षणासंबंधाच्या अशाच प्रकारच्या व्यापक कल्पना कांहीं लोकांच्या मनांत आलेल्या होत्या; पण या हायस्कूलची देखरेख बऱ्याच अंशीं सरकारी धोरणानें चालत असून शिक्षकांत विधर्मी लोकांचें निदान प्रथमतः तरी, अधिक प्राबल्य असल्यामुळें या शाळेंतून कांहीं मुली मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिकून जरी तयार झाल्या आहेत तरी तेवढ्यानें राष्ट्रीयदृष्ट्या स्त्रीशिक्षण ज्या तऱ्हेचें असावें तशी व्यवस्था या शाळेकडून झालेली नाहीं. सामान्यतः पाहिलें तर कोणासहि जें शिक्षण द्यावयाचें तें त्याच्या पुढील आयुष्यक्रमाला उपयुक्त व सहाय्यकारी होईल असेंच दिलें पाहिजे; किंबहुना जें शिक्षण विद्यार्थ्यास त्याच्या "पुढील आयुष्यक्रमांत नालायक बनवील" त्याला "शिक्षण हें नांव देणेंच चूक होय" असें म्हटलें तरी चालेल. सामान्यतः लेखन, वाचन व हिशेब हें शिक्षण सर्वांसच पाहिजे; आणि ज्याची खुषी व योग्यता असेल त्यास विद्यादेवीच्या मंदिरांतील उच्च पायरीपर्यंत जाण्याची सवड आणि मोकळीकहि असली पाहिजे, हीं तत्त्वें आम्हांस पूर्णपणें मान्य आहेत. पण शिक्षणाची व्यवस्था करतांना एवढीं दोनच सामान्य तत्त्वें लक्षांत ठेवून चालत नाहीं. प्रचलित

* केसरी. तारीख २२ फेब्रुवारी १९१६

समाजव्यवस्थेप्रमाणें विद्यार्थ्यास पुढें आयुष्यांत काय करावयाचें आहे त्याप्रमाणें, म्हणजे त्याला अनुकूल होईल असें शिक्षण त्यास देणें जरूर असतें. हिंदुस्थानांतील हल्लींच्या शिक्षणपद्धतींत जो मोठा दोष आहे तो हा कीं, सर्व विद्यार्थ्यांस त्यांच्या त्यांच्या लायकीप्रमाणें किंवा आवडीप्रमाणें पुढें जो आयुष्यकम किंवा धंदा स्वीकारावयाचा असेल त्याला अनुकूल असें शिक्षण आमच्या शाळांतून त्यांस मिळत नाहीं. याचा परिणाम असा होतो कीं, एखाद्या मारवाड्याचा किंवा सुताराचा मुलगा एकदां इंग्रजी शाळेंत शिकून तयार झाला म्हणजे तो पुढें आपला मूळचा धंदा विसरून नोकरीकडे धांव घेऊं लागतो; आणि मोठी नोकरी न मिळाली तर त्याचें आयुष्य बहुतेक फुकट गेल्यासारखें होतें. हल्लींचें स्त्रीशिक्षणहि अशाच प्रकारचें आहे; पण याखेरीज हल्लींच्या स्त्रीशिक्षणाची दुसरी उणीव ही कीं, तें सर्व सरकारच्याच ताब्यांत असल्यामुळें त्यांत इंग्रजी भाषेला विशेष महत्त्व देण्यांत येतें, आणि धर्मशिक्षणाच्या नांवानें तर तेथें बहुतेक भोंपळ्याएवढें पूज्य असतें. प्रस्तुत शिक्षणपद्धतींतील हे दोष आम्ही आज नवीन सांगतों असें नाहीं. ते लोकांच्या लक्षांत येऊनआज पुष्कळ वर्षें झालेलीं आहेत; आणि परवां काशी येथें हिंदु विश्वविद्यालयाची जी स्थापना झाली ती बऱ्याच अंशीं वर लिहिलेले दोष लक्षांत येऊन झालेली आहे, हें वाचकांस माहीत असेलच. या सर्व गोष्टी लक्षांत आणल्या म्हणजे स्त्रियांस जें शिक्षण मिळावयाचें त्याची दिशा काय असली पाहिजे या गोष्टीचा सहजच निर्णय करितां येतो. स्त्रीवर्गांपैकीं कांहीं एम्. ए., कांहीं बॅरिस्टर व कांहीं डॉक्टर झाल्या तरी तो अपवाद असून सामान्य स्त्रीवर्गाचें प्रमुख ध्येय मनूनें म्हटल्याप्रमाणें 'उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनम् । प्रत्यहं लोकयात्रायां एतत्स्यात्स्त्रीनिबंधनम् ॥' हेंच राहणार हें निर्विवाद आहे. स्त्रीशिक्षणासाठीं नांवाजलेल्या मोठमोठ्या प्राच्य किंवा पाश्चात्य देशांत हीच स्थिति आहे, आणि हिंदुस्थानांतहि त्याहून भिन्न असूं शकणार नाहीं हें उघड आहे. पुरुषवर्गांत शिक्षणाचा ज्या ज्या मानानें अधिक प्रसार होईल त्या त्या मानानें त्यांच्या सहधर्मचारिणीहि अधिक सुशिक्षित पाहिजेत हें कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं. पण सुशिक्षित म्हणजे काय याचा विचार केला तर त्यांस मिळणारें शिक्षण अनादिकालापासून चालत आलेल्या त्यांच्या गार्हस्थ्य आयुष्यक्रमास

लायक असेंच असलें पाहिजे असें म्हणावें लागतें; आणि हें तत्त्व लक्षांत आणलें म्हणजे स्त्रियांचें शिक्षण देशी भाषेंत व्हावें, त्यांत योग्य प्रतीच्या धर्म-शिक्षणाचा समावेश झालेला असावा आणि आमच्याकडील कुटुंबव्यवस्थेला तें अनुसरून असावें असें म्हणणें प्राप्त होतें. या बाबतींत किरकोळ मतभेद असले तरी सामान्यतः या गोष्टी सर्वांसच मान्य होतील व आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आतां या पुढला प्रश्न म्हटला म्हणजे स्त्रियांच्या शिक्षणाकरितां जी युनिव्हर्सिटी काढावयाची तिची रचना स्त्रीशिक्षणाच्या या सर्व उद्देशांस अनुकूल अशी कशी राखावी हा होय. प्रो० कर्वे यांनीं सामाजिक परिषदेपुढें केलेल्या आपल्या भाषणांत यासंबंधाचा फारसा ऊहापोह केलेला नव्हता. पण गेल्या केसरींत त्यांनीं हातीं घेतलेल्या स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीसंबंधानें घटनेचे जे नियम प्रसिद्ध केले आहेत ते पाहिले म्हणजे या युनिव्हर्सिटीचें स्वरूप असावें तितकें राष्ट्रीय व व्यापक नाहीं असें दिसून येतें. पहिल्यानें "हिंदी (Indian) स्त्रियांची युनिव्हर्सिटी" हें नांवच घ्या. हिंदी हा शब्द आम्ही अलीकडे हिंदुस्तानांतले रहिवासी–मग ते खिस्ती असोत, पार्शी असोत, मुसलमान असोत, वा जैन किंवा बौद्ध असोत–या अर्थानें वापरतों; आणि स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या नांवांत हा शब्द केवळ औपचारिक असेल तर या युनिव्हर्सिटींत स्त्रियांस जें शिक्षण मिळणार तें कोणत्या धर्माचें, अगर कोणत्या धर्माच्या विशिष्ट गृहस्थितीचें किंवा सर्व धार्मिक गृहव्यवस्था सोडून नुसतें बौद्धिक असणार? आणि तेंहि कोणत्या देशी भाषेच्या द्वारा असणार इत्यादि अनेक प्रश्न उपस्थित होतात. प्रो० कर्वे यांनीं सामाजिक परिषदेपुढें जें भाषण केलें त्यावरून स्त्रियांस या युनिव्हर्सिटींत जें शिक्षण द्यावयाचें तें देशी भाषेच्या द्वारें द्यावें असें त्यांचें मत असल्याचें दिसून येतें. अर्थात्, महाराष्ट्रांत जी स्त्रियांची युनि-व्हर्सिटी निघावयाची तींत जें शिक्षण मिळणार तें मराठी भाषेच्या द्वारें मिळालें पाहिजे हें उघड आहे; आणि असें असेल तर ही युनिव्हर्सिटी मुख्यत्वें महाराष्ट्रांकरितांच आहे असें म्हणावें लागतें. महाराष्ट्रांतील या संस्थेचें इतर प्रांतांत अनुकरण होईल, नाहीं असें नाहीं. आणि दरएक प्रांतीं तत्रस्थसमाजस्थितीस अनुकूल अशा प्रांतिक संस्था एकाच नियामक

मंडळीच्या ताब्यांत आल्यास त्या संघास भारतवर्षीयत्व येईल. पण त्यामुळें महाराष्ट्रांत निघणारी संस्था आजच हिंदी झाली असें होत नाहीं. असो, पण नुसत्या नांवाकरितां भांडत बसण्यांत कांहीं हशील नाहीं. हेतु व उद्देश काय ते पाहिले पाहिजेत. आणि ते पाहिले म्हणजे त्यांत धार्मिक शिक्षणाचा कोठेंच उल्लेख केलेला आढळून येत नाहीं. ही उणीव आमच्या मतें महत्त्वाची होय. कारण पुरुषांच्याहि शिक्षणक्रमांत धार्मिक शिक्षणाची आवश्यकता आम्हांस आतां जर अधिकाधिक भासूं लागली आहे, व हिंदु युनिव्हर्सिटीची स्थापनाहि त्याचसाठीं आहे, तर स्त्रियांच्या शिक्षण-क्रमांत याची उपेक्षा करून कसें चालणार ? नियमांमध्यें दाखल केलेल्या उद्देशांहून इतर उद्देश ठरविण्याचें काम मुख्य म्हणजे सेनेटसभेकडे ठेवलेलें आहे खरें; पण आमच्या मतें धर्मशिक्षणाच्या उद्देशाबद्दल अशी टाळाटाळी करणें इष्ट नाहीं, तो मूळ उद्देशांतच घातला पाहिजे. आणि त्याच-बरोबर या संस्थांचें नियामकत्व सर्वस्वीं लोकांच्याच ताब्यांत राहील असाहि एक कायमचा नियम पाहिजे. स्त्रियांची युनिव्हर्सिटी सरकारच्या ताब्यांत जाऊं नये अशी प्रो० कर्वे यांची इच्छा असल्याचें जाहीर झालें आहे; पण अशा प्रकारच्या सदिच्छा नियमांत कायमपणें नमूद झाल्या नसल्या तर कालमानाप्रमाणें किंवा ग्रँट-इन्-एडच्या लालचीनें त्यांत पुढें विपर्यास होतो असें आढळून आलें आहे. फार काय सांगावें, पण आमच्या कायदेकौन्सिलांत कायदे करणारे सरकारी सभासद बोलण्यांत एक इच्छा प्रतिपादन करतात आणि पुढें कार्यद्याच्या शब्दाचा अर्थ निराळा होतो असा अनुभव आहे. म्हणून ज्या संस्थेचें नियामकत्व केवळ लोकांच्या ताब्यांत असावयाचें तिच्या घटनेच्या नियमांत ती गोष्ट स्पष्टपणें नमूद असली पाहिजे. एरवीं पुढें नियामक मंडळींत अनेक प्रकारच्या कल्पना निघण्याचा संभव आहे. धर्मशिक्षण हेतूमध्यें घातलें म्हणजे हिंदुधर्म का मुसलमानी धर्म, पार्शी-धर्म का ख्रिस्ती धर्म असा पुढें सहजच प्रश्न निघतो; पण त्याचें उत्तर हिंदु-धर्म, असेंच प्रकृत स्थलीं द्यावें लागेल असें आम्हांस वाटतें. स्त्रियांच्या या विद्यापीठांत इतर धर्मांच्या स्त्रिया आल्या तर त्यांस घेऊं नये असें आम्ही म्हणत नाहीं; पण त्याचा मुख्य उद्देश हिंदुधर्मांतील स्त्रियांस महाराष्ट्रभाषेच्या द्वारा धार्मिक आणि इतर

शिक्षण देण्याचा असला पाहिजे; किंबहुना हिंदु-युनिव्हर्सिटीचेंच या बाबतींत स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीनेंहि अनुकरण केलें पाहिजे असें आम्हांस वाटतें.

शेवटचा प्रश्न नियामक मंडळाच्या रचनेसंबंधाचा होय. सभापति, सभेचे उपपति वगैरे संज्ञा आणि विद्यापीठांतील घटनेचीं कलमें प्रस्तुतच्या सरकारी युनिव्हर्सिटी-नियमांतूनच घेतलेलीं असल्यामुळें त्यांबद्दल कांहीं मतभेद होण्याचा संभव नाहीं; पण साधारण सदस्य (Ordinary Fellow) कोणीं निवडावे याबद्दल जो नियम आहे त्यानें स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीस संकुचित, वैयक्तिक व एकदेशीय स्वरूप येतें असें थोड्या विचारांतीं कोणाचेंहि लक्षांत येईल. गेल्या पंचवीस तीस वर्षांत महाराष्ट्रांत स्त्रीशिक्षणाची जी वाढ झालेली आहे ती कांहीं केवळ हिंगण्याच्या आश्रमांतच झाली आहे असें नाहीं. पुणें आणि मुंबई येथें स्त्रियांकरितां हायस्कुलें व सेवासदनें निघालीं आहेत इतकेंच नव्हे, तर विवाहित स्त्रियांस सोईवार पडतील अशा तऱ्हेच्याहि स्त्रियांच्या कांहीं शाळा (होम क्लासेस) निघाल्या आहेत. या सर्व एका बाजूस ठेवून केवळ एका अनाथबालिकाश्रमाच्या मंडळीच्या सभासदांनीं या युनिव्हर्सिटींतील ६० फेलोंपैकीं ३० म्हणजे निम्मे फेलो कां निवडावे हें आम्हास समजत नाहीं. युनिव्हर्सिटी ही संस्था व्यापक असून तिच्यांत स्त्रीशिक्षण पाहिजे म्हणणाऱ्या सर्व प्रकारच्या मतांच्या व आचाराच्या लोकांचा योग्य प्रमाणांत समावेश झालेला असला पाहिजे. प्रो० कर्वे यांनीं अनाथ-बालिकाश्रम स्थापन करून तो नांवारूपास आणला ही गोष्ट कोणासहि नाकबूल नाहीं व कित्येकांस असेंहि वाटण्याचा संभव आहे कीं, तेच जर स्त्रियांची युनिव्हर्सिटी स्थापन करण्यासाठीं उद्योग करणार तर या युनिव्हर्सिटीचें पुढील धोरण ठरविण्याचें काम अनाथ बालिकाश्रमाच्या मंडळींच्या ताब्यांत त्यांनीं कां ठेवूं नये ? डेक्कन एज्युकेशन सोसायटीची पहिली रचना अशीच नव्हती काय ? पण आमच्या मतें हा कोटिक्रम बरोबर नाहीं. हिंगण्यांतील 'अनाथ-बालिकाश्रमा'च्या प्रस्तुतच्या पाट्या बदलून तेथेंच त्याऐवजीं जर 'हिंदी स्त्रियांची युनिव्हर्सिटी' अशी नवी पाटी लावावयाची असेल—म्हणजे अनाथ बालिकाश्रमाच्या धोरणावरच जर भावी युनिव्हर्सिटी व्हावयाची असेल—तर स्त्रियांच्या हिंदी युनिव्हर्सिटीची रचना हल्लींच्या नियमांत आहे त्याप्रमाणें ठेवण्यास हरकत नाहीं. पण

अनाथ बालिकाश्रमाचें धोरण न स्वीकारतांहि स्त्रीशिक्षणास जे अनुकूल आहेत त्या सर्वांचा या युनिव्हर्सिटींत समावेश होणें जर इष्ट आहे तर साधारण सदस्य (Ordinary Fellows) याच्या निवडणुकीचा हल्लींचा जो नियम आहे तो अवश्य बदलला पाहिजे असें आमचें मत आहे. कोणाहि मनुष्यास एखाद्या गोष्टीचा स्वयंस्फूर्तीनें उपक्रम करितांना आपल्या धोरणावरच पुढें तिची सर्व व्यवस्था व्हावी असें म्हणण्याचा हक्क आहे ही गोष्ट आम्हास मान्य आहे. पण अशा उद्योगास सार्वजनिक स्वरूप न येतां संकुचित व एकदेशीय व वैयक्तिक स्वरूप येत असतें हें मात्र विसरतां कामा नये. स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीस असें वैयक्तिक स्वरूप येऊं नये अगर असूं नये असाच प्रोफेसर कर्वे यांच्या सामाजिक परिषदेपुढल्या भाषणाचा रोख आहे; पण आतां प्रसिद्ध झालेली स्त्रियांच्या हिंदी युनिव्हर्सिटीची घटना पाहिली वर ती या रोंखाच्या अगदीं विरुद्ध आहे. अशा प्रकारच्या एकदेशीय घटनेसहि रुचिवैचित्र्यामुळें मदत करणारे कांहीं लोक असतील, नाहीं असें नाहीं; पण सार्वजनिकदृष्ट्या विचार केला तर अनाथ-बालिकाश्रम ही संस्था स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीची एक शाळा असावी, आश्रमानें सर्व युनिव्हर्सिटीस गवसणी घालण्याचा प्रयत्न करूं नये, युनिव्हर्सिटी अधिक व्यापक व मोकळी ठेवावी, असें आम्हास वाटतें. सामान्य जनसमूहाची मदत व सहानुभूति स्त्रियांच्या या युनिव्हर्सिटीस नको असेल तर गोष्ट निराळी. तसें असेल तर नांव 'हिंदी-युनिव्हर्सिटी' असलें तरी वस्तुतः-ती हिंगणें-युनिव्हर्सिटीच होईल; आणि मग अर्थातच लोकांतली त्याबद्दलची सहानुभूति त्या मानानें मर्यादित राहील. पण स्त्रियांची ही युनिव्हर्सिटी अशी मर्यादित असूं नये अशी आमची मनापासून इच्छा आहे; आणि प्रो० कर्वे यांसहि ती अमान्य असल्याचें दिसत नाहीं. स्त्री-शिक्षण हा विषय मोठा व्यापक आहे आणि हिंदुधर्म व महाराष्ट्रभाषा यांनीं जरी त्याची व्याप्ति मर्यादित केली तरी त्यांतहि अनेक प्रकारच्या आचारांच्या व विचारांच्या लोकांचा समावेश होण्यास पुष्कळ जागा आहे. या लोकांचा समावेश जर या युनिव्हर्सिटींत खरोखरच करावयाचा नसेल तर तसें लोकांस प्रथमच उघड सांगावें हें चांगलें. सध्यां जे नियम प्रसिद्ध झाले आहेत, त्यांत उघडपणें तसें सांगितलेलें नाहीं; पण पोटनियमांच्या

रचनेवरून ही गोष्ट व्यक्त होत आहे. करितां हे नियम एक तर बदलले पाहिजेत किंवा युनिव्हर्सिटी या मोहक नांवाखालीं हिंगण्यांतील अनाथ-बालिकाश्रमाचेंच धोरण आम्हांस पुढें चालवावयाचें आहे ही गोष्ट लोकां-पुढें स्पष्ट मांडली पाहिजे. हिंगणें येथील आश्रमाचीच युनिव्हर्सिटी झाली तर त्यांत कोणासहि कांहींएक वाईट वाटण्यासारखें नाहीं; मात्र मग त्यास महाराष्ट्रांतील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटींचें व्यापक स्वरूप देणें योग्य होणार नाहीं. तदर्थ निराळेच प्रयत्न करावे लागतील. प्रो० कर्वे यांचें अनाथबालिका-श्रमावरचें ममत्व प्रसिद्ध आहे; पंण हें ममत्व क्षणभर बाजूला ठेवून व्यापक दृष्टीनें स्त्रीशिक्षणाच्या संस्था स्थापन करण्याचा त्यांनीं प्रयत्न केल्यास ते हल्लींच्यापेक्षांहि अधिक प्रशंसेस पात्र होतील इतकें सुचवून, आणि वर दाखविलेल्या प्रकारचे दोष लवकर काढून टाकण्याचा ते प्रयत्न करितील अशी आशा प्रदर्शित करून हिंदी स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या घटनेबद्दलचा हा लेख येथें संपवितों.

पुणें फीमेल ट्रेनिंग कॉलेज*

स्त्रीशिक्षणाच्या सवलती आपल्या इकडे आधींच फार कमी आहेत ही गोष्ट आतां खुद्द सरकारासहि पटून त्या सोयी वाढविण्याचा उपक्रम करणें लोकमतामुळें त्यांना प्राप्त झालें आहे. या नवीन सोयी केव्हां होतील तेव्हां होवोत; पण हल्लीं ज्या थोड्या सोयी आहेत त्याच नाहींशा होऊन उलट त्यांचे जागीं ज्या गैरसोयी होत आहेत त्या दूर करण्याचा प्रयत्न सरकार प्रथम करील तर बरें होईल. विद्याखात्याचें धोरण अरेरावीचें असून होतां होईतों प्रत्येक शिक्षणसंस्थेचें चालकत्व युरोपियन लोकांच्याच हातीं ठेवावें असा त्याचा कटाक्ष प्रसिद्धच आहे. अलीकडे हायस्कूलच्या हेडमास्तरांच्या कांहीं जागांचे पगार वाढविण्यांत आले त्याचा हेतु 'नेटिव्ह' शिक्षकांना जास्ती पगार द्यावा हा नसून जागा मोठ्या करून त्यांवर युरोपियन आणावे हा होता. पण युरोपियन लोक मोठे तालेवार

* केसरी, तारीख १६ मे १९१६.

असल्यामुळें त्यांना या मोठ्या पगाराच्या जागाहि अपुऱ्याच पडतात, आणि अशा रीतीनें युरोपियन शिक्षक न मिळाल्यामुळें त्या जागा शेवटीं नेटिव्हांच्याच गळीं पडतात ही गोष्ट वेगळी. असो; शिक्षणसंस्थांचें चालकत्व विजातीय व विधर्मीय लोकांच्या हातीं देण्याचें धोरण सदोष असलें तरी मुलांच्या शाळांसंबंधानें त्याचे अनिष्ट परिणाम तितके भा- नाहींत. पण स्त्रीविद्यार्थ्यांच्या सोयीकरितां काढलेल्या शाळांचें चालकत्व तरी अशांच्या हातीं जाणें अत्यंत अनिष्ट आहे ही गोष्ट सरकारास कल्पनेनें आकलन करतां येण्यासारखी नसेल तर लोकांनीं तरी ती त्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण स्त्रीशिक्षणाची बाब अधिक नाजुक असून तिच्यांत जर चालकांच्या अपात्रतेमुळें कृत्रिम भर पडली तर स्त्रीशिक्षणाचा पाय पुढें पडावयाचा त्याऐवजीं मागेंच पडेल. पुणें येथील 'फीमेल ट्रेनिंग कॉलेज'चें जें हल्लीं स्थित्यंतर होऊं घातलें आहे तो प्रकार अशापैकींच असून त्याविषयीं वेळींच गवगवा न होईल तर फार अनिष्ट परिणाम होईल.

पुणें येथील 'फीमेल ट्रेनिंग कॉलेज' ही या इलाख्यांत नेटिव्ह स्त्रियांना शिक्षकिणींचा धंदा शिकविण्याची एवढी एकच शाळा आहे. हें कॉलेज व 'फीमेल हायस्कूल' या दोनहि संस्था आजवर एकाच इमारतींत म्हणजे बुधवार पेठेंतील हुजूरपागेंत असत. पैकीं 'फीमेल हायस्कूल' ही संस्था खासगी सोसायटीच्या ताब्यांत आहे. सरकार जरी सर्व शिक्षक आपल्या खर्चानें हायस्कूलला पुरवितें तरी शाळा स्थापन करण्याच्या वेळीं लोकांनीं पैसे दिले होते हें एक आणि नेटिव्ह स्त्रीविद्यार्थ्यांच्या सोयी गैरसोयी नेटिव्ह लोकांसच अधिक कळूं शकतात—त्यांच्या बोर्डिंग वगैरेवर देखरेख ठेवणें ती नेटिव्ह लोकांच्याच तर्फे ठेविली जाणें अधिक सोयीचें आहे—या दोनहि कारणांकरितां सरकारनें फीमेल हायस्कूलची सर्व व्यवस्था 'फीमेल—एज्युकेशन—सोसायटी'कडे ठेविलेली आहे. फीमेल ट्रेनिंग कॉलेज ही संस्था सर्वस्वी सरकारी खर्चानें स्थापलेली व चालविलेली आहे ही गोष्ट खरी. तथापि ती हुजूरपागेंतच फीमेल हायस्कूलच्याशेजारीं असून दोनहि शाळांतील विद्यार्थिनींची राहण्याची वगैरे जागा एकच असल्यामुळें, फीमेल ट्रेनिंग कॉलेजची देखरेखहि स्वाभाविकपणें सदर सोसायटीकडेच

सोंपविण्यांत आली होती. पण फीमेल ट्रेनिंग कॉलेजचें चालकत्व हल्लीं एका युरोपियन बाईकडे असल्यामुळें, व त्यांतूनहि या बाईचा स्वभाव कोणतीहि गोष्ट मिळती घेण्याचा नसल्यामुळें, फीमेल ट्रेनिंग कॉलेजला उढ्वळ आली आहे. सोसायटी व सदर बाई यांच्या दरम्यान मतभेद असतां सोसायटीच्या चालकांचेंच डायरेक्टरसाहेब यांनीं वास्तविक [illegible]यास पाहिजे. कारण सोसायटींत शहरांतील कित्येक सुजाण पुढारी असून त्यांच्या मताला मान देणें अधिक समंजसपणाचें झालें असतें. पण बाई युरोपियन असल्यामुळें तिचा वशिला थेट इन्स्पेक्टर व डायरेक्टर यांजकडे पडला; व सोसायटीलाहि हें मोतीं नाकापेक्षां जड झाल्यामुळें फीमेल ट्रेनिंग कॉलेजची ही पीडा हुजूरपागेबाहेर गेल्यास आपल्याला सुख लागेल असें वाटून सोसायटीनेंहि ट्रेनिंग कॉलेज बाहेर घालविण्यास संमति दिली असावी. पण असें झाल्यानें स्त्रीविद्यार्थिनींची गैरसोय एकंदरीनें किती झाली ही गोष्ट त्यांनीं लक्षांत घेतली असती, तर डायरेक्टर यांजकडे जाऊन त्यांजपुढें आपली तक्रार रीतसर मांडल्याशिवाय सोसायटीनें कॉलेज बाहेर नेण्यास सहसा संमति दिली असती असें आम्हांस वाटत नाहीं. सोसायटीकडे फक्त फीमेल हायस्कूलची देखरेखच कायदेशीरपणें येते आणि सरकार आपण होऊन ट्रेनिंग कॉलेज बाहेर नेईल तर त्याचा हात सोसायटीस धरतां येणार नाहीं ही गोष्ट आम्हास कबूल आहे. तरी पण फीमेल ट्रेनिंग कॉलेजमधील विद्यार्थिनींचें हिताहित पाहण्याची जबाबदारी सदर सोसायटीकडेच आहे असें मानण्याची संवय लोकांना आजवर पडलेली असल्यामुळें ते या कामीं सोसायटीस, अज्ञानानें कां होईना, पण दोष दिल्याशिवाय राहणार नाहींत.

फीमेल ट्रेनिंग कॉलेज हें हुजूरपागेंतून बाहेर पडणार येवढेंच नव्हे, तर गांवाबाहेर जाणार ही गोष्ट किती गैरसोयीची आहे हें खालील थोड्याशा हकीकतीवरून लक्षांत येईल. फीमेल ट्रे. कॉ.मध्यें जागा नाहीं या सबबीवर अलीकडे विद्यार्थिनी घेण्याचें बंद करण्यांत आलें होतें. तथापि हल्लीं विद्यार्थिनींची बटसंख्या १०२ आहे. यापैकीं वर्गवारी लावतां ५० विद्यार्थिनी ब्राह्मण व ४० ब्राह्मणेतर मिळून ९० विद्यार्थिनी हिंदु आहेत; व बाकीच्या बारांपैकीं ४ खिस्ती, ४ ज्यू व ४ मुसलमान आहेत. दुसऱ्या दृष्टीनें पाहतां या

१०२ पैकीं ७५ मुली बोर्डिंगांत राहणाऱ्या व २७ बाहेरून शाळेच्या वेळेपुरत्या येणाऱ्या आहेत; पण २७ पैकीं २३ मुली हुजूरपागेजवळच्या पेठांतून येणाऱ्या असून ४ मुली रास्ते वगैरे पेठांतून येणाऱ्या आहेत. फीमेल ट्रेनिंग कॉलेजांतील मुलींच्या अभ्यासक्रमांत शिकविण्याचें शिक्षण घेणें हा एक भाग असल्यामुळें फीमेल ट्रेनिंग कॉलजला जोडून प्रॅक्टिसिंग स्कूलहि असावें लागतें. आजवर हें प्रॅक्टिसिंग स्कूलहि हुजूरपागेंतच असल्यामुळें निदान ७५ मुलींना हुजूरपागा सोडून बाहेर जाण्याचा प्रसंग मुळींच येत नव्हता; व २३ मुली जवळच्या पेठांतल्या असल्यामुळें त्यांना आपल्या पालकांच्या घरीं राहून जवळच्या जवळ शाळेंत जातां येत असे. म्हणजे १०२ मुलींपैकीं ९८ मुलींची सोय चांगल्या रीतीनें होत असे. पण सोसायटीचें व आपलें बनत नाहीं या सबबीवर कॉलेजवरच्या युरोपियन बाईनें आज कित्येक दिवसांपासून कॉलेज हुजूरपागेंतून हलविण्याचा एकप्रकारें निश्चय केला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. कॉलेज हुजूरपागेंतून बाहेर जावयाचें तर भाडें वगैरेचा खर्च वाढणार. तेव्हां त्याची कोणीकडून तरी तरतूद आहे असे दाखविण्याकरितां, कांहीं दिवसांपूर्वी हिंदुस्तानसरकारकडून मिळालेल्या विशेष देणगींतून मुंबईसरकारनें ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थिनींकरितां ज्या नवीन ५० स्कॉलरशिपा ठेवल्या होत्या त्यांपैकीं अवघ्या २१ खर्ची घालून २९ स्कॉलरशिपा बाई दरवर्षी शिलकी टाकीत आल्या आहेत. या तजविजीनें कॉलेज बाहेर नेण्याचा सर्वच खर्च भागण्यासारखा आहे किंवा काय याची नक्की माहिती आम्हास नाहीं. तथापि, म्युनिसिपालिट्यांच्या मुलींच्या शाळांतून शिक्षकिणी मिळत नाहींत अशी ओरड चोहोंकडे होत असतां, बाईनीं आपण होऊन अधिक स्कॉलरशिपा मागावयाच्या तें बाजूसच राहून सरकारनें दिलेल्या स्कॉलरशिपांतून त्यांनीं सेव्हिंग करणें हें अत्यंत गैर होय एवढें मात्र आम्हास समजतें. बाहेर उठून गेलेल्या ट्रेनिंग कॉलजचा खर्च शिलकी स्कॉलरशिपांतून भागो वा न भागो, कॉलेज गांवांतून उठून बाहेर जाणें याच गोष्टीस आमची पहिली मुख्य हरकत आहे. विद्यार्थिनींकरितां ट्रेनिंग कॉलेज आहे, ट्रेनिंग कॉलेजकरितां कांहीं विद्यार्थिनी नाहींत. निदान या युरोपियन बाईकरितां तरी कॉलेज किंवा विद्यार्थिनी यांपैकीं कोणीच नाहीं, तर या दोहोंकरितां बाईला सरकारनें

फगारी नोकर ठेविली आहे ही जर गोष्ट खरी, तर केवळ बाईच्या सोयीकरितां ट्रेनिंग कॉलेज उठवून बाहेर नेणें व विद्यार्थिनींची गैरसोय करणें हें अत्यंत गैर होय हें डायरेक्टरसाहेबहि थोड्याशा विचारांतीं कबूल करतील असें आम्हास वाटतें.

१०२ पैकीं ९० विद्यार्थिनी हिंदू असून या सर्व तर गांवांत राहणाऱ्या आहेतच; पण उरलेल्या १२ पैकींहि कांहीं गांवांतच राहणाऱ्या आहेत. ट्रेनिंग कॉलेज बाहेर दूर आगाखानाच्या बंगल्यावर नेल्यानें या सर्वांची गैरसोय किती होईल याची कल्पना कोणासहि सहज करितां येईल. १०२ विद्यार्थिनींपैकीं ७५ विद्यार्थिनी खुद्द बोर्डिंगांत राहणाऱ्या आहेत, व कॉलेजाबरोबर बोर्डिंगहि बाहेर जाणार आहे या गोष्टीनें ही गैरसोय यत्किंचितहि कमी होत नाहीं. कारण आई-बापांच्या घरून शाळेंत जाणाऱ्या २७ विद्यार्थिनींना आज जीं फार तर १०।१५ मिनिटें शाळेस जाण्याला लागत असतील त्याऐवजीं यापुढें त्यांना सुमारें पाऊण तास किंवा तासहि लागेल. इतकी मजल रोज चालून जाणें हें मुलींना कष्टाचें आहेच; शिवाय या कष्टांत उन्हाळ्याच्या दिवसांत उन्हाचा व पावसाळ्याच्या दिवसांत पावसाचा त्रास यांची भर पडणार आहे. बाहेर नेलेल्या बोर्डिंगांतील मुलींचे शिकण्याचे कांहीं तास कदाचित् बोर्डिंगच्या जागेंतच जातील. परंतु प्रॅक्टिसिंग स्कूलमध्येंहि त्यांचे कांहीं तास जावयाचे असतात, व हें स्कूल बोर्डिंगच्या बंगल्यांत जागा नसल्यामुळें रास्त्यांच्या वाड्यांत ठेवणार असल्याचें समजतें! अर्थात् तसें झाल्यास बोर्डिंगांतील ७५ विद्यार्थिनींनाहि रोज २०।२५ मिनिटांच्या रस्त्यावर एक खेप नित्य करावी लागेल. अशा रीतीनें नवीन व्यवस्थेंत दिवसां शाळेपुरत्या जाणाऱ्या व बोर्डिंगमध्यें राहणाऱ्या मिळून सर्वच विद्यार्थिनींच्या मागें रोजची पायपिटी लागणार आहे. सदर युरोपियन बाईला स्वतः तांगा ठेवतां येत असल्यामुळें तिला स्वतःला पायपिटी करावी लागणार नाहीं हें खरें; पण आपल्या विद्यार्थिनींना या पायपिटीचे श्रम किती होतील याची कल्पना जर बाईस करतां येणार नाहीं तर त्या आपल्या जागेस नालायक आहेत; आणि कल्पना होत असूनहि जर त्या नवीन व्यवस्था अमलांत आणीत असतील तर त्या त्याहूनहि अधिक नालायक आहेत असेंच आम्ही म्हणूं.

पण या व्यवस्थेस पायपिटीच्या श्रमापेक्षां दुसराहि एक मोठा आक्षेप आहे, तो हा कीं, पूर्वी बोर्डिंग गांवाच्या मध्यभागीं व घरंदाज लोकांच्या वस्तींत होतें तें यापुढें लष्करांत म्हणजे बकाली वस्तींत जाणार! या १०२ विद्यार्थिनींपैकीं निम्या म्हणजे ५० विद्यार्थिनी ब्राह्मण जातीच्या आहेत; याकरितां त्यांच्या दृष्टीनें नवीन व्यवस्थेस जोराची हरकत घेण्याचा आम्हाला हक्क आहेच; पण ४० विद्यार्थिनी ब्राह्मणेतर असल्या तरी हिंदूच आहेत. अर्थात् त्यांच्याहि पालकांना त्यांनीं बकाली वस्तींत राहणें आवडेल किंवा घरंदाज वस्तींत राहणें आवडणार नाहीं असें आम्हास मुळींच वाटत नाहीं. खिश्चन, ज्यू व मुसलमान मिळून ज्या १२ विद्यार्थिनी उरतात त्यांचें वकीलपत्र घेण्यास आम्हास अधिकार नाहीं असें कोणीं म्हटल्यास तें आम्ही मान्य करूं. परंतु बकाली वस्तींत राहणें हें त्यांनाहिं प्रिय व हितकर असेल असें आमच्यानें म्हणवत नाहीं. बोर्डिंगच्या इमारतींतील व्यवस्था नव्या इमारतींत कदाचित् जुन्या इमारतींतल्याप्रमाणेंच असणें शक्य आहे. तथापि भरवस्तींत असणाऱ्या शिक्षणसंस्थेवर आसपासच्या समाजाचा जो दाब किंवा जी देखरेख सहजासहजीं राहते तिला नवीन व्यवस्थेंतील बोर्डिंग मुकेल हें निश्चित आहे. लष्करच्या हद्दींत घरंदाज कुटुंबें कांहीं रहात असलीं तरी तीं दूरदूर राहतात. आणि सोल्जर व उडाणटप्पू, बदफैली वगैरे लोकांचा मुळसुळाट गांवापेक्षां लष्करांत अधिक असणार हें डायरेक्टरसाहेबांस नाकबूल करतां यावयाचें नाहीं. शिवाय बोर्डिंगापासून रास्त्यांच्या वाड्यापर्यंत रोज मुलींची जी परेड निघणार तिचें जाहीर प्रदर्शन सर्वथा अनिष्ट आहे. शिकणाऱ्या मुली झाल्या तरी त्यांना थोड्याबहुत पडदपोशीची अपेक्षा नसते असें नाहीं. बोर्डिंगांत राहणाऱ्या मुलींपैकीं बऱ्याच मुली परगांवाहून स्कॉलरशिपा घेऊन येथें राहण्यास आलेल्या असतात; व आजपर्यंत शहरच्या मध्यभागीं हुजूरपागेसारख्या बंदिस्त ठिकाणीं बोर्डिंग असल्यामुळें त्यांना व त्यांच्या दूरगांवच्या पालकांना जो निर्धास्तपणा वाटत असे तो यापुढें वाटणार नाहीं. तात्पर्य, कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी फीमेल ट्रेनिंग कॉलेजची ही नवी व्यवस्था एका गोऱ्या मास्तरीणबाईखेरीजकरून इतर सर्वांसच अत्यंत गैरसोयीची आहे. एकट्या बाईच्या

हौसेकरितां किंवा तिच्या लाडाकरितां इतक्या मुलींची गैरसोय करणें हा अन्याय होय असें म्हणण्याचा हक्क लोकांना खास आहे. लोकांच्या या दृष्टीनें डायरेक्टरसाहेबांनीं या प्रश्नाकडे पूर्वी पाहिलें आहे कीं नाहीं हें आम्हास माहीत नाहीं. गांवांतील हल्लींची जागा बरीचशी संकुचित आहे म्हणून नवीन व्यवस्था बरी असें कदाचित् त्यांस भासविण्यांत आलें असेल; पण नवीन व्यवस्थेंत; आमच्या माहितीप्रमाणें, बोर्डिंगांतील जागा वाढल्या किंवा स्कॉलरशिपा वाढून पूर्वीपेक्षां अधिक मुलींच्या शिकण्याची सोय करण्यांत आली अशी गोष्ट मुळींच नाहीं; तर केवळ सोसायटी व बाई यांची कुरकुर मिटविण्याच्या पायीं ही सर्वस्वी गैरसोयीची नवी व्यवस्था डायरेक्टरसाहेबांनीं खुशाल मंजूर केलेली असावी. हुजूरपागेंतील जागा संकुचित असली तर सरकारास पुढेंमागें गांवांतच दुसरी एखादी जागा मिळाली असती, किंवा सक्तीनें घेतां आली असती. उलटपक्षीं लष्करांत आज मिळालेला बंगला किंवा उद्यां मिळणारी जागा ही तरी मोफत मिळणार असें थोडेंच आहे! पण इतका सर्व बाजूंनीं विचार करण्याचें डायरेक्टरसाहेबांचें काय अडलें आहे? आम्हास तर हा सर्व जुलमी व बिनमुर्वतखोरपणाचा प्रकार चीड आणण्यासारखा वाटतो; व नवीन व्यवस्थेंत डायरेक्टरसाहेबांनीं लोकांची काय सोय पाहिली याचा जाब जाहीर रीतीनें देणें त्यांना प्राप्त आहे.

नाथीबाई कन्याशाळेचें संमेलन*

ही शाळा स्थापन होऊन चार वर्षें झालीं. ता. २२ एप्रिल रोजीं दुपारीं साडेचार वाजतां फडतरे यांचे वाड्यांत न. चिं. केळकर यांचे अध्यक्षतेखालीं या शाळेचा बक्षिससमारंभ व मुलींचें संमेलन ह्या दोन गोष्टी थाटानें साजऱ्या झाल्या. समारंभास मुलींचे पालक व इतर प्रमुख स्त्री-पुरुष मिळून सुमारें ७०० मंडळी हजर होती. मुलींचीं संभाषणें व गाणीं झाल्यानंतर शाळेच्या लेडी सुपरिंटेंडेंट श्री० वारूबाई शेवडे यांनीं रिपोर्ट वाचून दाखविला व शाळेची आर्थिक स्थिति जरी सुधारली आहे तरी या शाळेंत मिळणाऱ्या शिक्षणाला सरकारी मान्यता नसल्यामुळें वरच्या वर्गांतून मुली फारच कमी आहेत. लोकांच्या मनांत स्वाभिमानाची ज्योत उत्पन्न झाल्याशिवाय स्त्रियांचे राष्ट्रीय शिक्षणासंबंधीं केले जाणारे प्रयत्न यशस्वी होणार नाहींत, असें सांगितलें. त्यानंतर बक्षिससमारंभ आटोपल्यावर अध्यक्ष न. चिं. केळकर यांचें भाषण झालें. ते म्हणालेः—

प्रो० कर्वे ह्यांची अल्पावधींतील स्त्रीशिक्षणविषयक कामगिरी खरोखरच चिकाटीची व अत्यंत प्रशंसनीय आहे. या ठिकाणीं आज आपण जी शाळा पाहात आहों तें त्यांच्याच परिश्रमाचें फल होय. ही शाळा चिरायू होऊन प्रो० कर्वे यांच्या स्त्रीशिक्षणविषयक कळकळीची साक्ष देत राहील, असा मला पूर्ण भरंवसा आहे.

गेल्या दोनतीन वर्षांत एक नवीन संस्था नवीन दिशेनें चालवून दाखविण्यापलीकडे आम्हांला विशेष कांहीं करून दाखवितां आलें नाहीं असें रिपोर्टांत सांगण्यांत आलें आहे. पण माझ्या मतें हेंच त्यांनीं विशेष करून दाखविलें आहे. या शाळेला सरकारी मान्यता नसल्यामुळें तिच्यांत देण्यांत येणाऱ्या शिक्षणावर लोकांची श्रद्धा बसत नाहीं ही तक्रार खरी आहे. इमारती मोठ्या, शिक्षक मोठ्या पगाराचे, हा थाट असला कीं, शिक्षण शंभर नंबरी झालें असा रूढ समज झालेला दिसतो. मुंबई युनिव्हर्सिटीच्या

* केसरी ता. २६ एप्रिल १९२३.

सीनेटचे सभासद व स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या सीनेटचे सभासद यांची निःपक्षपातानें तुलना केली तर कोणालाहि स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीला मानच द्यावा लागेल. पण जनतेच्या डोळ्यांवर हा बाबतींत भुरळ पडलेली असल्यामुळें मुंबई युनिव्हर्सिटीनें ठरविलेला अभ्यासक्रम कितीहि सदोष असला तरी तो चांगलाच असला पाहिजे असा समज अजूनहि शिल्लक आहे.

स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतींत इंग्रजीचें फाजील स्तोम माजविणें केव्हांहि रास्त होणार नाहीं. आज मुलांच्या बाबतींतहि कांहीं नवीन युनिव्हर्सिट्यांनीं शिक्षणाचें व परीक्षेचें माध्यम मातृभाषा हीच कबूल केली आहे. मुंबई युनिव्हर्सिटींत देखील पुढेंमागें ही सुधारणा होईल. आज सुशिक्षित पुरुषांत स्वतःच्या अभ्यासानें व परिश्रमानेंच इंग्रजी वाङ्मयांत प्राविण्य मिळविलेलीं माणसें सांपडतात. अशा रीतीनें सुशिक्षित स्त्रियांना देखील स्वतःच्या परिश्रमानें प्राविण्य मिळवितां येणार नाहीं कशावरून ? सर्व स्त्रियांना पुरुषांप्रमाणें व पुरुषांबरोबरच शिक्षण देण्याचा आग्रह धरल्यामुळें स्त्री-शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होणें शक्य दिसत नाहीं.

कन्याशाळेच्या पूर्वीच्या रिपोर्टांत फीमेल हायस्कुलांत शिकणाऱ्या मुलींना कन्याशाळेंत आणण्याचा प्रयत्न केला जात नाहीं असें म्हटलें आहे. पण माझ्या मतें नवीन दिशेनें सुरू केलेल्या स्त्रीशिक्षणाच्या अभिमानी मंडळींनीं पुण्यांतील पालकांचीं मनें वळवून सरकारी हायस्कुलांतील मुलींना कन्याशाळेंत आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत मला मुळींच वावगें वाटणार नाहीं. आपल्या स्वाभिमानास व प्रामाणिक मतास जीं तत्त्वें पटतात त्यांचा प्रसार अवश्य केला पाहिजे. पुणें शहरांत इंग्रजी उच्च शिक्षण देणाऱ्या अशा दोनच शाळा आहेत व हें शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या नियमित आहे. ही स्थिति वाळूच्या घड्याळाप्रमाणें आहे. आणि यामुळें एका भांड्यांत वाळू कमी होऊन ती दुसऱ्या भांड्यांत खात्रीनें वाढली तर त्याबद्दल कोणी विषाद बाळगण्याचें कारण नाहीं. नाटकांत जशीं मुलें पळवून नेतात तसें एका शाळेतील मुली दुसऱ्या शाळेंत नेण्याचे प्रयत्न केले जात नाहींत. असें आहे तर याविषयीं कोणालाहि वाईट वाटण्याचें कारण काय ? फीमेल हायस्कुलांत दिल्या जाणाऱ्या शिक्षणासंबंधीं व तेथील बकाली (कॉस्मापालिटन) स्त्रीशिक्षकासंबंधीं अनेक तक्रारी ऐकूं येत होत्या व अजूनहि मधून

मधून ऐकूं येतात. पूर्वी गांबांत दुसरी शाळाच नसल्यामुळें ह्या गोष्टी अपरिहार्य म्हणून सहन कराव्या लागत. पण सध्यां या नवीन निघालेल्या शाळेनें ही स्थिति पूर्णपणें पालटलेली आहे. आमच्या समाजांतील मुलींपुढें आमच्या परंपरेस शोभतील व आमच्या चालीरीतींचा ज्यांना अभिमान असेल अशाच स्त्री-शिक्षकिणींचीं उदाहरणें पाहिजेत व अशा उदाहरणांमुळेंच आमच्या मुलींना वळण लागेल. स्त्रीशिक्षणास जुन्या लोकमताचा असलेला विरोध दूर करण्यांत मागील दोन तपें गेलीं. ह्याच्या पुढील कार्य म्हणजे देशकालवर्तमान याचा विचार करून स्त्रियांच्या प्रचलित शिक्षणपद्धतींत फरक करणें व त्या शिक्षणावर लोकमताचें नियंत्रण ठेवणें हें होय. त्या तत्त्वाचाच शेवटीं विजय होणार याबद्दल मला पूर्ण खात्री आहे. सध्यां आपल्या स्त्रियांना मुंबई युनिव्हर्सिटीच्या पदव्या जितक्या अभिमानास्पद वाटतात तितक्या हिंगण्याच्या युनिव्हर्सिटीच्या पदव्या अभिमानास्पद वाटत नाहींत, ही गोष्ट आपल्यामध्यें स्वाभिमान कमी झाला आहे ह्याचीच द्योतक होय.

यानंतर प्रो० कर्वे ह्यांनीं केळकर यांचे शेवटीं आभार मानतांना केळकर यांनीं आपल्या कन्येचें मुद्दाम स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचाच अभ्यास करण्यासंबंधीं मन वळविलें व आपला राष्ट्रीय शिक्षणाविषयीं आदर व्यवहारांत आणून दाखविला म्हणून त्यांचा गौरवपर उल्लेख केला. शेवटीं हारतुरे पानसुपारी झाल्यावर राष्ट्रगीत म्हणण्यांत येऊन समारंभ पुरा झाला.

खोडसाळ टीकेस उत्तर*

पुणें येथील कन्याशाळेच्या वार्षिक समारंभासंबंधानें 'ज्ञानप्रकाश'कारांनीं ता. २७ एप्रिल व ता. १ मेच्या अंकांत जी हलकटपणाची व्यक्तिविषयक टीका केली आहे तिजवरून 'ज्ञानप्रकाश'कारांचा सहजच मत्सर व्यक्त होतो. पुणें शहरांतील समारंभांना अध्यक्ष नेमण्याची पात्रता स्वतः ज्ञानप्रकाशकार अगर त्यांच्या कंपूंतले इष्टमित्र यांच्या अंगीं नसल्यास, त्यांना बेकारपणामुळें लाभलेली अखंड फुरसत तरी काय उपयोगी पडणार ? एखाद्या गाढवाला देखील आपणाला कोणी कोतवाली घोडा म्हणून सजवील का, अशी आकांक्षा मनांतून उत्पन्न होत असेल, पण तिचा काय उपयोग ? पुण्यांत कोणीं कोणत्या प्रसंगीं कोण अध्यक्ष नेमावे याचाहि उपदेश लोकांना ज्ञानप्रकाशकार करूं लागलेले पाहून मत्सरानें त्यांचा मेंदू बिघडला याविषयीं कोणासहि शंका उरणार नाहीं. मात्र स्वतः केळकरांनाच ज्ञानप्रकाशकारांची कींव येऊन, चार ठिकाणीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंति झाली असतां प्रकाशकारांच्या मत्सराची आग पेटते म्हणूनच मी तें स्वीकारीत नाहीं, असें त्यांनीं जाहीर केल्यास बिघडलेल्या प्रकाशकारांच्या मेंदूला किंचित् विश्रांति मिळण्याचा संभव आहे. केळकरांना निमंत्रणें करणारांनींहि ही गोष्ट लक्षांत ठेवून कांहीं प्रसंगीं गय खाल्ली तर ज्ञानप्रकाशकारांवर ती दयाच होईल. पहावें, ज्ञानप्रकाशकारांच्या या दोन लेखांतील करुणालापाचा कांहींतरी उपयोग होतो का !

येथील हुजूरपागेंतील शिक्षण असावें तितकें लोकसंमत नाहीं, व त्याला कॉस्मॉपॉलिटन म्हणजे बकाली स्वरूप आहे, अशीं विधानें केळकर यांनीं कन्याशाळेच्या बक्षिससमारंभाचे दिवशीं अध्यक्ष या नात्यानें केलीं, म्हणून ज्ञानप्रकाशकारांनीं केळकरांवर आग पाखडली आहे. या बाबतींत केळकरांच्या भाषणाचा रोख विद्यमान स्थितीपेक्षांहि फीमेल हायस्कूलच्या पूर्व इतिहासावर विशेष होता ही गोष्ट खुद्द ज्ञानप्रकाशांतच केळकरांच्या भाषणाचा जो रिपोर्ट आला आहे त्यावरून उघड दिसून येणारी आहे.

* केसरी ता. ४ मे १९२३.

हायस्कूलच्या व्यवस्थेसंबंधाचा वाद नवा नसून तीसपस्तीस वर्षांपासूनच तो चालत आलेला आहे. नांवाला सेक्रेटरी म्हणून पुण्यांतील कोणी कोणी खासगी गृहस्थ या संस्थेचे ऋणानुबंधी वेळोवेळीं असले तरी, मुख्य अध्यापिकाबाई या कोणी खास युरोपियन किंवा तत्सम किंवा तद्भव असतात, व त्यांच्या देखरेखीखालीं चालणारें शिक्षण हिंदुधर्माच्या दृष्टीनें बकाली स्वरूपाचें असावें यांत आश्चर्य नाहीं. कोणीहि मुख्याध्यापक झाला तरी तो आपणाला प्रिय अशा संस्कृतीचेंच घोडें पुढें दामटणार. पण उलट लोकांचेंहि पाहणें असेंच असणार कीं, स्त्रीशिक्षणाला झालें तरी राष्ट्रीय म्हणून कांहीं दिशा आहे, व या दिशेनें आंखलें गेलेलें शिक्षण इतर शिक्षणापेक्षां अधिक चांगलें. खुद्द मुंबई युनिव्हर्सिटींतील शिक्षण घेतलें तरी त्यांतहि हा बकालीपणा दिसून येतो. परकी भाषेला फाजील महत्त्व व विदेशी संस्कृतीच्या ध्येयाचा जुलूम या गोष्टींनीं मुंबई युनिव्हर्सिटीचें शिक्षण पूर्वी तर दूषित होतेंच; पण अद्यापिहि तें पुष्कळ तसेंच आहे. न्या० रानडे, कै० मोडक प्रभृतींपासून परवां प्रो० हरिभाऊ लिमयांपर्यंत मातृभाषेच्या प्रगतीच्या प्रयत्नास मुंबई युनिव्हर्सिटीच्या सेनेटमध्यें जो अडथळा झाला त्याचें कारण सेनेटमधील बकालीपणा हें तर आहेच, पण शिवाय त्याच्या जोडीला युनिव्हर्सिटीची शेंडी मुंबईसरकारच्या हातीं असणें हेंहि एक कारण आहे. अशा परतंत्र व बकाली युनिव्हर्सिटीच्या परीक्षांना मुली तयार करण्याचें काम हुजूरपागेंतील शाळा करते. म्हणून निदान ज्या अंशानें मुंबई युनिव्हर्सिटी लोकमतानुवर्ती नाहीं, त्याच अंशानें हुजूरपागेंतील शाळाहि लोकमतानुवर्ती नाहीं हें म्हणावयास चोरी कसली? शिवाय स्त्रियांकरितां म्हणून कांहीं वेगळ्या प्रकारचें शिक्षण असावें ही गोष्ट मुंबई युनिव्हर्सिटीच्या डोक्यांतहि अद्यापि येत नाहीं.

मौज ही कीं, खुद्द विलायतेंत स्त्रीशिक्षणाचा इतका प्रसार असतां तेथें देखील शाळांतून स्त्रिया व पुरुष यांचें शिक्षण एकत्र होऊं नये व उभयतांचा अभ्यासक्रमहि वेगवेगळा असावा ही गोष्ट मान्य होऊन चुकलेली आहे. केवळ सरकारी नंबरी विद्यांशिवाय स्त्रीशिक्षणाची इमारत इतर कशानेंहि बांधली जाऊं नये हेंच मत खरें व सर्वमान्य असतें तर, एका इंग्लंड-स्कॉटलंडांत स्त्रीशिक्षणाचीं अठरा वेगवेगळीं युनिव्हर्सिटीवजा कॉलेजें,

वेगळ्या पदव्या, वेगळे डिप्लोमे, वेगळीं सर्टिफिकिटें अमलांत आलीं नसतीं. पण आमच्या इकडे पाहावें तों विलायतेवरहि ताण! आमच्यापैकीं कांहीं स्त्रीशिक्षणेच्छु लोकांना पाहावें तों स्त्रीविद्यार्थ्यांना अगदीं शंभर नंबरी इंग्रजी भाषा आली पाहिजे, त्याशिवाय चालत नाहीं. आणि जीं पुस्तकें, जो अभ्यासक्रम, पुरुषांना तोच स्त्रियांनाहि लागू करावा असा त्यांचा आग्रह असतो. कां तर त्यांत यत्किंचित् फेरबदल केला तर स्त्रियांना कमीपणा देऊन त्यांचा उपमर्द केल्याचा गुन्हा घडेल! पुण्यांतील लोक अद्यापि आपल्या मुली हुजूरपागेंतील शाळेंत पाठवितात, एवढ्यावरून तेथील शिस्त व शिक्षण पूर्णपणें लोकसंमत आहे, त्यांत सुधारण्यास जागा नाहीं, असें त्याच्या कोणा कट्टया भगतास म्हणावयाचें असेल तर त्यानें खुशाल म्हणावें; पण राष्ट्रीय शिक्षणाच्या एका विशिष्ट नमुन्यावर रचलेल्या, हिंगणें युनिव्हर्सिटीला जोडलेल्या, कन्याशाळेच्या समारंभप्रसंगीं त्या संस्थेंतील विद्यार्थिनींची संख्या वाढवावी, व ही वाढ होण्याला हुजूरपागेंतील विद्यार्थिनींची संख्या कमी व्हावी लागली तरी त्यांत विषाद मानण्याचें कारण नाहीं, असले उद्गार कोणीं काढल्यास त्यानें औचित्याचा भंग न होतां औचित्यांत भरच पडली, असें कोणासहि म्हणावें लागेल. मग मत्सरानें वेडावलेले ज्ञानप्रकाशकार कांहींहि म्हणोत.

याच समारंभांत बोलतांना केळकरांनीं सर विठ्ठलदास ठाकरसी यांची टवाळी केली असा एक आरोप ज्ञानप्रकाशकारांनीं केला आहे. परंतु तो सर्वस्वी खोटा व द्वेषमूलक आहे. केळकर यांनीं इतकेंच दर्शविलें होतें कीं, ठाकरसी यांनीं भारतमहिला—विद्यापीठाला पंधरा लाख रुपयांची देणगी देऊं करतांना अशी एक अट घातली आहे कीं, सदर विद्यापीठानें स्वतःचे निराळे पंधरा लक्ष रुपये तरी जमवावे, किंवा विद्यापीठाला सरकाराकडून मान्यता तरी मिळवावी, म्हणजे पंधरा लाखांवरचें नुसतें व्याज देत न बसतां ऐनजिनसी देणगीचे पंधरा लाख रुपये आपण विद्यापीठाच्या स्वाधीन एकदमच करूं. याबरून सरकारच्या मान्यतेच्या एका नुसत्या शब्दाला आज पंधरा लाख रुपयांची किंमत आहे; असें समीकरण सिद्ध होत नाहीं काय? व तीच नक्की गोष्ट, सरकारी मान्यतेच्या जुलमाविषयीं तक्रार करतांना, मुद्याची म्हणून केळकरांनीं सांगितली, यांत ठाकरसी यांच्याविषयीं

अवमान्यतेचा ध्वनि देखील नाहीं. पण केळकरांना कोणीकडून तरी नांवें ठेवण्याच्या भरांत ज्ञानप्रकाशकारांच्या डोळ्यांना हें कसें दिसावें ? खुद्द ठाकरसी यांनाहि सरकारी मान्यतेचा उपयोग दिसत असला तरी हुजूरपागेंतील शिक्षण व भारत महिला-विद्यापीठांतील शिक्षण यांपैकीं त्यांना मनांतून कोणतें अधिक मान्य होतें, हें त्यांच्या देणगीवरूनच सिद्ध होतें. पण एक वेळ ठाकरसीसारखा गुजराथी गृहस्थ महिलाविद्यापीठाच्या सेनेट सभेवर विश्वास टाकील, पण मुंबई युनिव्हर्सिटीच्या व सरकारी मान्यतेच्या मोहास बळी पडणारे आमचे कित्येक महाराष्ट्रीयच या राष्ट्रीय स्त्रीशिक्षणाला नाराज होतात हें दुर्भाग्य होय. लोकमताच्या गोष्टी केळकरांनीं कशाला बोलाव्या, अशीहि एक खोंच ज्ञानप्रकाशकारांनीं मारली आहे. पण त्यांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं, लोकमताशीं एकदोन बाबतींत केळकरांना आज झगडावें लागत असलें तरी ते पायावर खडे उभे आहेत, व एकदोन बाबतींत प्रतिकूल असलेलें लोकमत फिरून खेंचून आपल्याकडे आणूं अशी त्यांना उमेद आहे. बिचारे ज्ञानप्रकाशकार व तत्पक्षीय मवाळ यांची व लोकमताची फारकत कधींच होऊन त्यांना हल्लींच्या मार्गानें डोकें वर काढण्याचा मुळींच संभव नाहीं !

प्रो० कर्वे व राष्ट्रीय स्त्रीशिक्षण*

तारीख १८ एप्रिल रोजीं हिंगणें-आश्रमातर्फे प्रो० कर्वे यांचा वाढदिवस साजरा करण्यांत आला. मुख्य वक्ते प्रो० वामनराव जोशी यांचें भाषण झाल्यावर न. चिं. केळकर यांस बोलण्यास विनंति करण्यांत आल्यावरून ते म्हणाले, "प्रो० कर्वे हे संस्थेंतील लहान मुलींचे आजोबा होत. त्यांना आजोबांचा वाढदिवस ही बहुधा न ऐकलेली गंमत अशी वाटेल. पण आपले आजोबा आपल्या भावी शिक्षणाकरितां किती खटपट करीत असत हें त्यांना थोरपणीं समजूं लागल्यावर लहानपणीं पाहिलेल्या या वाढदिवसाची किंमत कळून येईल. प्रौढ स्त्रियांना तर कर्वे यांच्या कामगिरीचें महत्त्व सांगावयास नको व लहान गोष्टींना मोठ्यांची उपमा देऊन जर त्यांच्यापैकीं कोणी असें म्हणतील कीं, कर्वे यांनीं स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत नवीन राज्य स्थापलें तर तें अयथार्थ होणार नाहीं.

नवीन राज्य स्थापण्याला प्रथम जुन्या राज्याची सत्ता नष्ट करावी लागते. स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत महाराष्ट्रांतील जुन्या मताचे किंवा दूषित पूर्वग्रहांचें स्वामित्व नष्ट करण्यास कर्वे हे प्रामुख्यानें कारणीभूत आहेत. तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत स्त्रीशिक्षणाविषयीं लोकमत काय होतें व तें आज काय आहे हें पाहणारास लाक्षणिक अर्थानें कर्व्यांनीं एक नवें राज्य स्थापलें हें म्हणणें पटल्याशिवाय राहावयाचें नाहीं. विष्णुशास्त्री हे स्वतःकडे स्वराज्यसंस्थापक शिवाजीची उपमा मराठी भाषेच्या बाबतींत घेत होते. ती जितकी खरी तितकीच स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत कर्व्यांनीं नवें राज्य स्थापलें ही उपमा खरी ठरेल. स्वराज्य स्थापणें म्हणजे प्रथम—सत्तेच्या क्षेत्रांत क्रांति घडवून आणून तेथें नवी सत्ता व नवी परंपरा स्थापित करणें. नवीन राज्य स्थापणें म्हणजे द्रव्यनिधि, क्षेत्रमर्यादा, अधिकारी मंडळ, कारभाराची व्यवस्था वगैरे गोष्टी निर्माण कराव्या लागतात. कर्वे यांनीं शहरापासून पांच मैलांवर लहानशा झोंपडींत विधवा-साहाय्यक-आश्रम निर्माण केला. त्याची आतां इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटी बनून अनेक एकर जमीन,

* केसरी, तारीख २१ एप्रिल १९२४

लाखो रुपयांच्या इमारती, प्राथमिकापासून पदवीग्रहणापर्यंत आंखीव शिक्षणक्रम, लोकनियुक्त सल्लागार मंडळ, नियमबद्ध परीक्षा, योग्य अधिकारी मंडळ व स्वतःप्रमाण पदव्या निर्माण केल्या आहेत. या सर्वांचा फायदा घ्यावा तितका लोक घेत नसतील तर तो कर्व्यांचा दोष नव्हे. मागणीनंतर पुरवठा हा अर्थशास्त्रांतील सिद्धान्त बदलून टाकून मागणीच्या आधीं पुरवठा सिद्ध केला. राष्ट्रीय शिक्षणाची अशी सर्वांगीण सिद्धता म्हणजे स्त्रियांकरितां वेगळें शिक्षण, वेगळी योजना, मराठी भाषेचा शिक्षणांत सार्वत्रिक उपयोग वगैरे गोष्टी असतांना केवळ सरकारी मान्यता नाहीं म्हणून पुरुषांच्या कॉलेजांत पुरुषी-शिक्षण घेण्याला लोक आपल्या मुली अद्यापि पाठवितात ! हा कर्व्यांच्या कर्तृत्वाला कमीपणा नसून लोकांच्या सरकारविषयक परवशतेचा तो पुरावा आहे. हल्लीं सर्व गोष्टींत प्रगति असल्यानें महिलाविद्यापीठाच्या चालकांनीं कांहीं दिवस नेट धरल्यास पुढेमागें सरकार आपण होऊन या संस्थेला मान्यता देईल. जेथें रशियन सोव्हिएटला मान्यता मिळते तेथें असल्या शिक्षणविषयक प्रश्नास कालांतरानें मान्यता मिळेल यांत काय संशय ! सालिना साठ-पाऊणशें हजार रुपयांचें उत्पन्न, भरपूर इमारती, योग्य शिक्षकवर्ग व श्रेष्ठ पदवीदानापर्यंत शिक्षणाची सोय इतक्या गोष्टी असतांहि हें विद्यापीठ अजून लोकांच्या डोळ्यांत भरत नाहीं म्हणतात. आपण दुसऱ्याच्या डोळ्यांत न खुपण्याची खबरदारी कर्वे घेऊं शकतील, परंतु त्यांची कामगिरी दुसऱ्यांच्या डोळ्यांत भरत नसली तर त्यांनीं तरी काय करावें ? ती भरण्याला लोकमताचें अंजन पाहणाराचे डोळ्यांत वरचेवर घातलें पाहिजे. महिला-विद्यापीठ किंवा टिळक-विद्यापीठ अशा राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्थांना सरकारकडून मान्यता मिळण्यास खुद्द सरकार हें अधिक लोकतंत्र झालें पाहिजे. आम्ही कौन्सिलांत झगडतों तें याच हेतूनें. उपयुक्त लोकमतानुवर्ती संस्थांना सरकारी मान्यता व सरकारी कराचा पैसा यांचा लाभ होणें हा स्वराज्याच्या चळवळींतील एक अंगभूत हेतु असतो. या दृष्टीनें आमची कौन्सिलांतील चळवळ ही आज कोणीं विध्वंसक म्हटली तरी राष्ट्रीय शिक्षणाचे विधायक म्हणविले जाणारे जे प्रयत्न सुरू आहेत त्यांना ती उपकारकच होईल. परवां दिल्लीस दिल्ली युनिव्हर्सिटीचें कॉन्व्होकेशन मीं पाहिलें. तेथें मुळांत कांहींएक नसून केवळ दिल्ली—

सरकारच्या दिमाखाचें हेंहि अंग सजावें म्हणून त्याला शेणामेणाचे अवयव लिंपण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा हास्यास्पद देखावा दिसला ! खेळांत जेथें कांहीं नाहीं, तेथें सरकारी मान्यता, व स्वावलंबनानें जेथें इतकी सिद्धता त्याला मान्यता नाहीं असले थेर यापुढें न चालू देणें हा स्वराज्याच्या चळवळीचा या पुढील क्रम आहे. बनारस हिंदु युनिव्हर्सिटीचे पंडित मालवीय यांचें कार्य ज्या महत्त्वाचें त्याच महत्त्वाचें कार्य व्यक्तिशः कर्वे यांचेंहि होय. पण सरकारी कायदा व सरकारी देणगी यांच्यामुळेंच तेथें शेंकडों विद्यार्थी बी. ए. च्या वर्गांत आणि येथें यंदा एकहि मुलगी नाहीं असा फरक दृष्टीस पडतो. पण अखेर असला फरक काढून टाकणें हेंच राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रयत्नाचें खरें यश होय."

जुन्या विद्यापीठांची आरती !

गेल्याचे मागील शनिवारीं कलकत्ता येथील वार्षिक पदवीदानसमारंभाचे वेळीं लॉर्ड कर्झन यांनीं हल्लींच्या विद्यापीठांची आरती केली ! आजपर्यंत कधीं कोणास न मिळालेला, म्हणजे विद्यापीठाचे चॉन्सलर किंवा अध्यक्ष या नात्यानें एकसारखीं सहा वर्षेंपर्यंत नवीन पदवीधर लोकांस उद्देशून भाषण करण्याचा मान लॉर्ड कर्झन यांस मिळाला, तेव्हां अशा चिरपरिचित संस्थेसंबंधानें त्यांच्या मनांत कृतज्ञता व सहानुभूति वसत असावी अशी कल्पना करणें स्वाभाविक होतें. परंतु वस्तुतः तसा प्रकार मुळींच नाहीं. गेलीं पांच वर्षें लॉर्ड कर्झन यांनीं कलकत्ता येथील व इतर विद्यापीठांचा पाडाव कोणच्या रीतीनें होईल, त्यांस थोडेबहुत उरलेलेंहि स्वातंत्र्य नष्ट होऊन तीं सरकारच्या खात्यांपैकींच खातीं कशीं होऊन राहतील, याच गोष्टीचा विचार करण्यांत घालवून अखेरीस त्यांनीं आपला कारस्थानी हेतु यंदां सफलतेस नेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या हेतुसिद्धीस त्यांना थोडीथोडकी कुलंगडीं करावीं लागलीं नाहींत. परंतु आपल्या दीर्घनिश्चयी स्वभावाप्रमाणें त्यांनीं आपला हट्ट पुरविला व

° केसरी, तारीख २३ फेब्रुवारी १९०४

एखाद्या चक्रवर्ती शककर्त्या राजास शोभेल अशा दिमाखानें "हिंदुस्थानांतील उच्च शिक्षणाचा जुन्या मनूचा अवतार आज समाप्त झाला व त्याचे ठिकाणीं लवकरच नव्या मनूचा अवतार सुरू होणार!" अशी द्वाही त्यांनीं आपल्या भाषणानें फिरविली. "हें मन्वंतर, ही क्रांति घडवून आणण्याचे कामीं आम्हीं उच्च शिक्षणाचा घात केला असा आम्हांवर जो लोकापवाद आहे तो व्यर्थ होय; उलट मृतसंजीवनी वीर्यवल्लीच्या रससिंचनानें विद्यापीठें व त्यांत शिक्षण पावणारे तरुण लोक यांजमध्यें आम्हीं नवीन आयुष्य घालून त्यांस सतेज व सत्त्वसंपन्न केलें, यास्तव आम्हांस शिरच्छेद करणाऱ्या चांडाळाची उपमा न देतां दिव्य अश्विनीकुमारांचीच उपमा दिली पाहिजे असा लॉर्ड कर्झन यांनीं हक्क सांगितला. आज चाळीस वर्षें अस्तित्वांत असणाऱ्या या विद्यापीठांनीं विद्यार्थ्यांस केवळ परीक्षार्थी बनविलें; त्यांच्याकडून त्यांस खरें शिक्षण असें मिळालें नाहीं, मात्र खऱ्या शिक्षणाची त्यांनीं लालसा उत्पन्न केली व ही लालसा पूर्ण करण्याकरितांच युनिव्हर्सिटी बिलाचा अवतार असून त्याचा अंमल झाल्याबरोबर सर्व कांहीं जुनें व वाईट तेवढें जाऊन (घटोत्कचाचे मायावी बाजाराप्रमाणें?) त्याचे जागीं नवें व चांगलें येऊन बसणार! या घडामोडीस लोकपक्षानें अनुकूल व्हावें म्हणून आम्हीं आपली शिकस्त करून पाहिली, परंतु लोक आपला हेका सोडीनात तेव्हां निरुपायास्तव आम्हांस, आमच्या धोरणाप्रमाणें चालून लोक नको नको म्हणत असतां, हें अमृतमय औषध त्यांचे तोंडांत बोंडल्यानें आम्हांला घालावें लागत आहे. हिंदुस्थानांतील विद्यापीठें विलायतेंतील विद्यापीठांसारखीं होण्यास लागणारीं सर्व साधनें इकडे नाहींत; परंतु या कामीं लागणारें मुख्य द्रव्य म्हणजे सुबुद्ध व तरुण विद्यार्थीगण तो हिंदुस्थानांत आहे. देशाच्या तरुण पिढीनें देशाचा बचाव करणें हें तर पवित्र कृत्य आहेच; परंतु खुद्द तरुण पिढीचाच बचाव करणें हें त्याहूनहि अधिक पवित्र आहे; व तें करण्याचा युनिव्हर्सिटी बिलाचे योगानें आम्हीं उपक्रम केला आहे. अज्ञान हेंच असंतोषाचें मूळ होय, व जितकें शिक्षण अधिक अस्सल तितकी राजानिष्ठा अधिक चोख अशी सरकारची व इंग्रज लोकांची खातरी असल्यानें ते या कामीं कंबर बांधून नेटिव लोकांस मदत करण्यास तयार झाले आहेत." इत्यादि मुख्य मुद्दे लॉर्ड कर्झन यांच्या

भाषणांत होते. या सर्व मुद्दयांचें खंडन करीत बसण्यांत कांहीं हंशील नाहीं; फक्त इतकेंच सांगितलें असतां पुरें होईल कीं, बोलणाराचे तोंडास हात कोणीं लावावा, अशी एक म्हण आहे ? व प्रस्तुत प्रसंगीं बोलणारा हा सर्वाधिकारसंपन्न व मनस्वी असल्यामुळें त्याच्या तोंडास हात लावणें तर अशक्यच होय. परंतु अधिकार हीच काय ती शहाणपणाची खूण असें जोंपर्यंत कोणी मानीत नाहीं; स्वार्थसाधु लोक वाग्जाल पसरण्यांत कसे प्रवीण असतात, आणि शिक्षण व विशेषतः वक्तृत्वकला यांची मदत स्वार्थसाधु मनुष्यास मिळाली असतां तो तें वाग्जाल किती विस्तृत, तलम व सफाईदार बनवूं शकतो याचा जोंपर्यंत लोकांस अनुभव आहे; लॉर्ड कर्झन यांच्यामध्यें आंवाक्यापेक्षां उपक्रम व खाण्यापेक्षां मचमच किती अधिक असते हें जोंपर्यंत लोक जाणून आहेत; तोंपर्यंत त्यांच्या ह्या वाग्जालांत कोणीहि बंधन पावेल अशी भीति बाळगावयास नको. लाटसाहेबांनीं आपण उच्च शिक्षणाचे व हिंदुस्थानच्या तरुण पिढीचे मित्र असें भासविण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी एके पक्षीं हें मिठास भाषण आणि दुसरे पक्षीं युनिव्हर्सिटी बिल व मि० टाटा यांची उदार देणगी विफल करण्यास कारणीभूत झालेली त्यांची राजनीति, हीं ध्यानांत आणिलीं असतां वृद्ध चाणक्याच्या

"परोक्षे कार्यहंतारं प्रत्यक्षे प्रियवादिनं।
वर्जयेत् तादृशं मित्रं विषकुंभं पयोमुखम्"।

या वचनाची आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं.

बरें, हा जो नवा मनु प्रवर्तित केल्याचें श्रेय लॉर्ड कर्झनसाहेब मागतात त्यांत व पूर्वीच्या मनूंत फरक तरी असा कोणता पडला आहे कीं, ज्याबद्दल साहेबबहादुरांनीं आपली आपण टिमकी वाजवावी ? जुन्या विद्यापीठावर जे मुख्य आक्षेप आणिले जातात ते येणेंप्रमाणें:—१ या विद्यापीठांतून शिकविण्याची वगैरे सोय केलेली नाहीं व त्याचें काम केवळ परीक्षा घेण्याचें असल्यामुळें विद्यार्थी हे निवळ परीक्षार्थी बनतात. २ विलायतेंतील विद्यापीठाप्रमाणें इकडे कॉलेजांतील मुलांस राहण्याच्या सोई, मोठमोठीं पुस्तकालयें, रसायनशाला व विद्यारुचि उत्पन्न करून लालसा शमविणारी

अन्य साधनसामुग्री नसते. ३ विद्यार्थ्यांस आपापल्या संस्थांचा व संस्थांच्या परंपरेचा किंवा सांप्रदायाचा वाटावा तितका अभिमान वाटत नाहीं. ४ त्यांचे आंगीं विद्याव्यासंगप्रियता, स्वावलंबन, सत्यप्रीति व स्वातंत्र्यप्रीति, कर्तव्यतत्परता, इत्यादि गुण येत नाहींत. इ. इ. आणि वरील सर्व दोष ज्यांत समूळ नाहींसे होणार असें मन्वंतर या बिलानें आपण प्रवर्तित करीत आहों असं लार्ड कर्झन यांचें म्हणणें आहे. परंतु या दोन गोष्टींचा मेळ कसा पडतो या दृष्टीनें पाहाणारास या बिलामध्यें तसें कांहीं सांपडेल असें आम्हांस वाटत नाहीं. कारण सिलेक्ट कमिटीनें जो मसुदा तयार करून कौन्सिलापुढें मांडला आहे. व जो बहुधा आणखी एक महिन्यानें आहे असाच कौन्सिलांत पास होणार, त्या मसुद्यांत ग्रथित झालेल्या एकंदर कलमांचा सारांश थोडक्यांत खालीं दिल्याप्रमाणें आहे.

विद्यापीठांची आजपर्यंतची रचना होती तींत फेरफार केला आहे तो असा कीं, पूर्वीच्या सेनेट (मुख्य) सभेंतील सभासदांची संख्या कमी करून हल्लीं असें ठरविण्यांत आलें आहे कीं, मुंबई, कलकत्ता व मद्रास येथील विद्यापीठांत या सभेच्या सभासदांची संख्या फक्त शंभरपर्यंत व इतर विद्यापीठांत ही संख्या पाउणशेंपर्यंत असावी. या संख्येपैकीं फक्त दहा सभासद पदवीधरांनीं निवडावे, सुमारें दहा सभासद कांहीं विवक्षित अधिकारांवर असलेले लोक असावेत; व बाकीचे चान्सलर म्हणजे स्थानरत्वें गव्हर्नर जनरल किंवा गव्हर्नर यांनीं नेमावे. विद्यापीठांतील धाकटी म्हणजे कार्यकारी सभा असते तींत विद्याखात्याचे मुख्य अधिकाऱ्यास कायमचें स्थान असावें. व्हाईस चान्सलर हा चेअरमन असावा; व गव्हर्नरसाहेब फर्मावतील त्याप्रमाणानें परंतु निमेहून कमी नाहींत इतके कार्यकारी सभेचे सभासद कॉलेजांचे अध्यक्ष किंवा प्रोफेसर या वर्गांपैकीं असावे. मुख्य सभेचे सभासद फक्त पांचच वर्षें अधिकारारूढ असावेत व त्यानंतर त्यांनीं वाटेल तर फिरून निवडणुकीस उभें राहून सभेंत प्रवेश करून घ्यावा. या सर्व बाबतींत ज्यास लॉर्ड कर्झन यांनीं महत्त्वाची सुधारणा म्हणून म्हटलें आहे, किंबहुना नवीन मन्वंतराचा ज्या सुधारणेवर पाया रचला गेला आहे ती ही कीं, हल्लीं विद्यापीठांच्या मुख्य सभांमधून दोन अडीचशें सभासद असतात त्यांच्या ऐवजीं फार तर शंभर ठेवा-

वयाचे, व केवळ अधिकारगुणानें ज्यांस सभासदत्व मिळालें आहे अशांखेरीज बाकीचे सर्व सभासद पांच वर्षांनीं स्थानभ्रष्ट होण्यास पात्र व्हावयाचे. कार्यकारीसभेच्या रचनेंत मुख्य सुधारणा म्हटली म्हणजे शिक्षकवर्गास तींत दिलेलें अढळ बहुमत ही होय; व या सर्वांचा निष्कर्ष एवढाच कीं, विद्यापीठांतील सभासद प्रथमतः शेकडा ७० या प्रमाणानें सरकारचे हस्तक नेमतां यावे, मुख्य सभेंतून कार्यकारीसभेंत निवडून जाणाऱ्या सभासदांचें प्रमाणहि सरकारानेंच ठरवावें, व कार्यकारी सभेमध्यें होणाऱ्या सर्व गोष्टी सरकारी अधिकारी व कॉलेजचे प्रोफेसर यांनीं आपल्या मताप्रमाणें कराव्या. अशा रीतीनें सरकारी बारीक चाळणींतून बाहेर पडलेल्या सभासदांस तरी स्वतंत्र व भरपूर अधिकार असावे अशी कोणीही अटकळ करील; परंतु दुर्दैवानें वस्तुस्थिति तशी नाहीं. सरकारच्या हस्तकांनीं बहुमताच्या जोरावर केलेल्या नियमांत अगर व्यवस्थेंतहि (सरकारच्या दृष्टीनें) उच्च शिक्षणास विघातक असा थोडाबहुत अंश कदाचित् राहण्याचा संभव आहे. या शंकेनें, विद्यापीठाबाबद नियम करणें, नवीन कॉलेजें स्थापण्यास परवानगी देणें, अगर पूर्वी ज्यांस परवानगी मिळाली आहे त्यांची काढून घेणें इत्यादि बाबतींत अखेर निकाल देण्याचा व त्याजवर 'सरकारास मंजूर' असा छाप मारण्याचा अधिकार, गव्हर्नराचे नांवानें सर्व हुकमत चालविणारा, असा सेक्रेटरीएटमध्यें जो कोणी 'गोमागणेश पितळी दरवाजा' त्यावेळीं अधिकारारूढ असेल त्यास या बिलानें देण्यांत आलेला आहे. विद्यापीठांचे मुख्य घटक जीं कॉलेजें त्यांचे बाबतींत जी सुधारणा म्हणून करण्यांत आलेली आहे ती एवढीच कीं, मुलांना रहाण्याच्या जागा, फंड, शिक्षकवर्ग, रसायनशाळा, पुस्तकालयें वगैरेसंबंधानें पूर्ण लक्ष पोंचवून म्हणजे या सर्वांची यथास्थित तजवीज झालेली आहे असें पाहून नंतर नवीन कॉलेजें उघडण्यास परवानगी देण्यांत यावी अशी या बिलांत सूचना आहे. परंतु तरुण विद्यार्थीवर्ग केवळ परीक्षार्थी न बनावा एवढ्याकरितां जी काय तजवीज या बिलांत केलेली आहे ती एवढीच कीं, शिक्षणाचे वर्ग काढण्यास व त्यांत शिक्षक नेमण्यास विद्यापीठास आजपर्यंत स्पष्ट शब्दांनीं अधिकार नव्हता तो देण्यांत आला आहे.

परंतु या सर्वांमुळें शिक्षणक्रमाची खरी सुधारणा कशी होणार ? म्हणजे वर सांगितलेले दोष नाहींसे होऊन हल्लीं असलेलीं विद्यालयें आहेत याहून अधिक संपन्न व सधन कशीं व्हावीं व एकदम सधन-संपन्न अशीं होऊन नवीन विद्यालयें कशीं अस्तित्वांत यावीं; विद्यार्थ्यांची परीक्षेची गोडी कमी होऊन खऱ्या विद्येचीच गोडी त्यांस कशी लागावी; व त्यांचे आंगीं करारीपणा, स्वाभिमान, स्वावलंबन वगैरे राष्ट्रीयत्वास पोषक असे गुण कसे यावे; हें आम्हांस तरी समजत नाहीं. सदरहु बिलानें हे सर्व दोष घालवून या सर्व सुधारणा जर कोणी करून दाखवील, तर त्यास खरोखर विसाव्या शतकांतला बडा किमयागार म्हटला पाहिजे. परंतु लॉर्ड कर्झन यांची जिव्हा जरी बहुभाष आहे व तिजमध्यें लपंडावाची करामत जरी बरीच दिसून येते, तरी त्यांचेजवळहि किमया आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आणि प्रोफेसर गोखले यांनीं आपल्या असंमतिदर्शक मिनिटांत म्हटल्याप्रमाणें हल्लींच्या बिलाच्या योगानें विद्यापीठें हीं सरकारचीं खातीं बनतील, सरकारच्या तावडींतून उरेल तो विद्यापीठासंबंधी अधिकार युरोपियन सभासद आणि सरकारी व मिशनरी कॉलेजांतील युरोपियन प्रोफेसर यांचे हातीं जाईल, व नेटिव सभासदांचे हातीं काडीचाहि अधिकार न राहतां असुक एक सुधारणा आपण केली आहे असा अभिमान किंवा करूं अशी आशा त्यास यापुढें बाळगतां येणार नाहीं. इतक्या गोष्टी मात्र या बिलाचे निश्चित परिणाम म्हणून आज सांगतां येतील. याहून अधिक म्हणजे लॉर्ड कर्झन म्हणतात तें, संशयग्रस्त किंबहुना दुरापास्तच आहे असें म्हटलें तरी चालेल. या बिलाचे सर्वस्वीं भयंकर परिणाम शिक्षणक्रमावर झाल्याशिवाय राहणार नाहींत व त्यांतील मुख्य परिणाम हा कीं, सरकारचे कदरेमुळें यापुढें खासगी कॉलेजें निघणें बहुधा असंभाव्य होईल. कारण एकेवेळीं लोकशिक्षण खासगी लोकांच्या हातीं द्यावें असा सरकारचा जाणूनबुजून प्रयत्न होता व खाजगी कॉलेजांची भरभराट होण्यास अवश्य अशी जी स्वतंत्रता व लोकाश्रय हीं मुबलक मिळण्यासारखीं होतीं; खासगी शिक्षकाचा धंदा बहुमानाचा असें लोकांस वाटत असून खासगी प्रयत्नानें उभारल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या भव्य इमारतींचा उज्ज्वल देखावा कल्पनादृष्टीपुढें उभा राहाण्यासारखा होता; व इतक्या सर्व गोष्टींमुळें

विद्यापीठांत ज्यांनीं कीर्ति मिळविली आहे असे तरुण लोक स्वार्थत्याग करून पुढें येण्यास तयार होते; अशा वेळींहि फारच थोडीं कॉलेजें स्थापित झालीं व जीं झालीं त्यांस परिपक्वता येण्यास बराच काल व बरेच श्रम लागले. हें जर आपण पाहतों, तर हल्लींच्या या बदललेल्या मनूंत, म्हणजे ज्या वेळीं सरकार व लोक यांना परस्पर हेतूंसंबंधानें अधिकाधिक संशय उत्पन्न होऊं लागले आहेत व सर्व शिक्षणाच्या दोऱ्या होतां होईतों आपल्या हातीं ठेवाव्या अशी सरकारास अनिवार इच्छा झाली आहे, अशा वेळीं नवीन कॉलेजें निघणें हें किती दुर्घट काम आहे याची कल्पना सहजच होणार आहे, व शिक्षणक्रम सर्वथा सरकारचे हातीं गेला म्हणजे त्याचे परिणाम आपल्या राष्ट्रीयत्वास किती घातक होतील हें निराळें सांगावयास नको. तात्पर्य, युनिव्हर्सिटी बिलाचें खरें स्वरूप हें अशा प्रकारचें असतां त्याचे गुणानुवाद लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या भाषणांत जे गाइले आहेत ते ऐकून लॉर्ड कर्झन हे स्वतः तरी बुद्धिमंद असावे किंवा हिंदुस्थानच्या लोकांस तरी ते बुद्धिमंद मानीत असावे, याहून तिसरी गोष्ट संभवत नाहींसें वाटतें. पण त्यांतल्यात्यांत पहातां लॉर्ड कर्झन यांस बुद्धिमंद म्हणण्याचें धाडस आमचे हातून होणार नाहीं. दोहोंत दोन मिळविले असतां चार होतात ही गोष्ट समजणें जितकें सोपें आहे तितकेंच, एखाद्या देशांत परकीय सरकाराचे हातीं शिक्षण जाणें म्हणजे त्या देशांतील राष्ट्रीयत्वाचा नाश होणें, ही गोष्ट समजणेंहि सोपें आहे. परंतु लॉर्ड कर्झन हे परकीय व राज्यकर्ते असल्यामुळें त्यांना आपल्या ज्ञानापेक्षां आपल्या कर्तव्यतत्परतेची बूज राखणेंच अधिक जरूर आहे. तेव्हां त्यांनीं कलकत्ता येथील आपल्या भाषणांतील उद्गारांप्रमाणें असंबद्ध, अतिशयोक्तिप्रचुर व भ्रामक असे उद्गार काढावे यांत कांहीं नवल नाहीं. या बिलासंबंधानें लोकमताच्या सर्व पक्षांचें मत अगदीं एक असून तें बिलास सर्वथा प्रतिकूल आहे, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. न्या० चंदावरकर यांनीं सुद्धां मागें युनिव्हर्सिटींत झालेल्या वादविवादांत या बिलाच्या उपयुक्ततेविषयीं आपलें शंकानिरसन झालें नाहीं असे उद्गार काढले व अधिकारीवर्गाच्या अप्रियतेस पात्र होण्याचें थोडेंसें साहस केलें. यापेक्षां हें बिल खरोखरच घातक आहे असें

ठरविण्यास दुसरा पुरावा कोणता पाहिजे ? किंवा दुसरे पक्षीं पाहतां डॉ० भांडारकर यांच्या सारख्या स्वदेशविद्वेषी गृहस्थांना कलकत्त्यास जाऊन सिलेक्ट कमिटीमध्यें ना० गोखले यांच्याविरुद्ध मत देऊन युरोपियन सभासदांच्या बहुमतास पुष्टि आणणें जरूर वाटलें याहून हें बिल देशास घातक आहे हें सिद्ध करण्यास, निराळा पुरावा आणखी कोणता पाहिजे ?

देशी भाषेंतून शिक्षण*

दिल्ली येथील वरिष्ठ कायदे कौन्सिलांत देशी भाषेंतून शिक्षण देण्याबद्दल ना० राम रायनिंगार यांनीं जो ठराव कौन्सिलपुढें आणला होता त्याबद्दलचा उल्लेख पूर्वी आम्हीं केलाच आहे. परंतु त्याची जास्त चर्चा तेव्हां केली नसल्यामुळें आज त्यासंबंधानें विचार करीत आहोंत. कायदेकौन्सिलांत ना०दादाभाई, ना० गझनवी, ना० बानर्जी, महमुदाबादचे राजे, ना०सर फाजलभाई, ना० इब्राहिम रहिमतुल्ला व सीतानाथ राय यांचीं या ठरावावर थोडींबहुत विरुद्ध भाषणें होऊन ना० कुशल पालसिंग व मदन मोहन मालवीय या दोघांनींच काय तो ना० राम रायनिंगार यांच्या ठरावास दुजोरा दिला होता. वरिष्ठ कायदेकौन्सिलांत आम्ही जे कौन्सिलर निवडून देतों त्यांच्यामध्यें इतके लोक देशी शिक्षणाच्या थोडेंबहुत तरी विरुद्ध बोलणारे निघाले ही आश्चर्याची गोष्ट आहे; व त्यावरून कायदेकौन्सिलांत निवडून जाणाऱ्या लोकांसहि या विषयाचीं तत्त्वें अद्याप पुरीं कळलीं नाहींत असें म्हणणें भाग पडतें. परंतु त्यांतले त्यांतच समाधानाची गोष्ट ही कीं, कायदेकौन्सिलांतील नेटिव सभासद नेहमीं एकमेकांचे पाठराख्ये असतात असा जो त्यांच्यावर कित्येकदां सरकारतर्फे आक्षेप घेण्यांत येतो तो खरा नसून या मेंबरांपैकीं बहुतेक किंवा सर्वच आपापलें मत निर्भयपणें प्रतिपादन करणारे आहेत असें या विषयावरील वादविवादावरून पुरें सिद्ध झालें आहे. ना० राम रायनिंगार यांच्या ठरावाविरुद्ध चार पांच मुसलमान सभासदांचीं भाषणें व्हावींत यांत कांहीं विशेष आश्चर्य नाहीं. पण ना०दादाभाई

* केसरी, तारीख १३ एप्रिल १९१५

किंवा कलकत्त्याचे ना० सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या सारख्यांनींहि कांहीं पोकळ शंका काढून या ठरावाविरुद्ध बोलावें हें खरोखरच विचित्र होय. या सभासदांची अशी समजूत झालेली दिसते, कीं देशी भाषेंत शिक्षण देणें म्हणजे इंग्रजी विद्येचें शिक्षण बुडविणें होय; आणि इंग्रजी विद्या, इंग्रजी इतिहास, इंग्रजी नीतिशास्त्र व इंग्रजी आधिभौतिकशास्त्रें यांच्या अभ्यासाखेरीज देशोन्नति होणें ज्याअर्थीं अशक्य आहे, त्याअर्थीं देशी भाषेंत शिक्षण दिल्यानें हिंदुस्थानचें पाऊल मागें पडत जाऊन अखेरीस शास्त्र्यांचा आणि पुराणिकांचाच सर्व देशभर सुळसुळाट होईल! कित्येकांच्या मनांत अशीहि शंका आलेली दिसते कीं, हल्लीं जी राजकीय चळवळ चालू आहे ती इंग्रजी शिक्षणाचें फल असून ही ज्याअर्थीं इकडील इंग्रजसरकारास प्रिय नाहीं त्याअर्थीं देशी भाषेंतून शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू झाल्यास त्या निमित्तानें अखेर इंग्रजी शिक्षणाचा प्रसारहि सरकारमार्फत कमी कमी होत जाईल. पण आमच्या मतें या सर्व शंका निर्मूल आहेत. देशी भाषेंत शिक्षण देणें याचा अर्थ शिक्षणाचे विषय बदलणें असा समजावयाचा नाहीं, हें प्रथमतः लक्षांत ठेविलें पाहिजे. तसेंच हल्लीं आमच्यावर राज्य आहे तें इंग्रज लोकांचें असल्यामुळें आमच्यापैकीं कांहीं लोकांना इंग्रजी भाषेंत चांगलें तरबेज झालें पाहिजे, आणि आफिसांतून नोकरी धरणाऱ्या दुसऱ्या लोकांस इंग्रजी भाषेचें बरेंचसें ज्ञान असलें पाहिजे, ही गोष्ट निर्विवाद आहे. केवळ राज्यकर्त्यांची भाषा म्हणूनच इंग्रजीस हें महत्त्व आहे असें नाहीं; तर प्राचीन काळीं संस्कृत आणि मध्यंतरीं हिंदी या भाषांप्रमाणें सध्यांच्या काळीं प्रांताप्रांतांतील दळणवळण चालण्यास इंग्रजी भाषा हें एक साधन झालें असून रेलवे व तारायंत्राप्रमाणें इंग्रजी भाषाहि देशाचें एकीकरण करण्यास कारणीभूत झाली आहे. पण या सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी हिंदुस्थानांतील तीस कोट लोक सुशिक्षित कसे बनतील या प्रश्नाचा जेव्हां विचार करावयाचा तेव्हां देशी भाषांकडे लक्ष गेल्याखेरीज रहात नाहीं. किंबहुना देशी भाषेंतून शिक्षण द्या, असें म्हणणारे जे लोक आहेत त्यांचा मुख्य मुद्दाहि हाच आहे असें म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानांत देशी भाषा किती आहेत हें पाहूं गेल्यास त्यांची संख्या सुमारें तीनशेंपेक्षांहि अधिक आहे असें आढळून येतें! आणि हें जर खरें तर

या तीनशें देशी भाषांतून शिक्षण सुरू करावयाचें कीं काय, आणि करावयाचें म्हटल्यास तें प्रायः अशक्य आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण वर ज्या दुसऱ्या कांहीं गैरसमजुती सांगितल्या त्यांप्रमाणें हीहि आमच्या मतें एक गैरसमजूतच आहे. देशी भाषांचा ज्या वेळेस विचार करावयाचा, त्या वेळेस एकाच भाषेच्या अनेक पोटभेदांचा विचार करावयाचा नाहीं. उदाहरणार्थ, मराठी भाषा घ्या. कोंकणची मराठी निराळी, गोंव्याची मराठी निराळी, देशस्थी मराठी निराळी आणि मोगलाईंतील मराठी निराळी इ०मराठी भाषेचेहि पुष्कळ प्रकार आहेत. किंबहुना इंग्रजी भाषेचे याच मासल्याचे प्रकार अद्याप इंग्लंडमध्यें आढळून येतात. पण इंग्लंड देशाची भाषा इंग्रजी आहे या सिद्धांतास जसा बाध त्यानें येत नाहीं, तद्वतच महाराष्ट्र भाषेचे अनेक प्रकार असले तरी महाराष्ट्रांत किंवा दक्षिणेंत (वऱ्हाड, नागपूर व मोगलाई धरून) १५।२० जिल्ह्यांची भाषा मराठी आहे असें म्हणण्यास कांहींच बाध येत नाहीं; आणि हाच न्याय गुजराथी, कानडी, बंगाली, हिंदी वगैरे भाषांसहि लागू पडतो. भाषाभेदाची दृष्टि व्यापक करून अशा रीतीनें हिंदुस्थानचे विभाग केले तर आठ-दहांपेक्षां ते अधिक होणार नाहींत. हिंदुस्थानासारख्या मोठ्या देशाचे अशा रीतीनें आठ-दहा निरनिराळे प्रांत झाल्यास त्यांत कांहीं अपूर्व प्रकार अगर कांहीं घोंटाळा होण्यासारखाहि नाहीं. अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे देशी भाषेंतून शिक्षण देण्याच्या प्रश्नास जें रूप येतें तें इतकें उज्ज्वल, उपयुक्त व शुद्ध आहे कीं, त्याविरुद्ध तक्रार करण्यास आमच्या मतें कांहींच जागा रहात नाहीं. देशांतील लाखों–किंबहुना कोट्यवधि लोकांस इंग्रजी भाषा आंगवळणीं पडेल ही गोष्ट असंभवनीय होय. त्यांना जें शिक्षण द्यावयाचें तें त्यांच्या त्यांच्या भाषेच्या द्वारेंच पाहिजे; आणि हें शिक्षण नुसत्या प्राथमिक शिक्षणानें ज्याअर्थीं पुरें होत नाहीं, त्याअर्थीं दुय्यम प्रतीच्या शिक्षणाच्या शाळांतहि शिक्षणासाठीं देशी भाषेचाच उपयोग केला पाहिजे याबद्दल शंका रहात नाहीं. सध्यां असलेल्या मध्यम प्रतीच्या शाळा म्हणजे हायस्कुलें वगैरे यांतून जे विद्यार्थी पढविले जातात त्यांचीं पांच सात वर्षें फक्त इंग्रजी भाषेचे शब्द, त्यांचें अनियमित स्पेलिंग व उच्चार, आणि देशी भाषांहून भिन्न अशी वाक्यरचना शिकण्यांतच जात

असतात. आमच्या मतें कालाचा हा शुद्ध अपव्यय होय. यांपैकीं शेंकडा पंचाण्णव विद्यार्थ्यांस साधारण लिहिण्याबोलण्यापलीकडे इंग्रजी भाषेच्या ज्ञानाची उभ्या जन्मांत आवश्यकता पडत नाहीं. अर्थात् या साधारण इंग्रजी लिहिण्या-बोलण्यासाठीं त्यांच्या आयुष्याचीं महत्त्वाचीं पांच सात वर्षें खर्ची पडावीं हें व्यक्तिदृष्ट्याच नव्हे तर राष्ट्रीय शिक्षणदृष्ट्याहि मोठेंच दुर्दैव होय. आणि याला उपाय आहे कीं नाहीं, हा प्रश्न पुष्कळांच्या मनांत घोळूं लागला आहे. बरें, इंग्रजी भाषेची याप्रमाणें पांच सात वर्षें घोकंपट्टी करूनहि ती भाषा चांगली येते काय ? नाहीं. मॅट्रिक झालेल्या लोकांस कॉलेजांतील प्रोफेसराचें इंग्रजी व्याख्यान समजत नाहीं अशी प्रोफेसरांची व इंग्रजींतील साधीं पत्रेंहि लिहितां येत नाहींत अशी इंग्रजी अमलदारांची कुरकुर आहे; आणि उलटपक्षीं इंग्रजी उच्चार आणि स्पेलिंग घोकण्यांत पांच सात वर्षें घातल्यामुळें गणित, पदार्थविज्ञान, इतिहास, रसायनशास्त्र वगैरे महत्त्वाचे शास्त्रीय विषयहि त्यांस यावे तितके येत नाहींत असें राष्ट्रीय शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे. तात्पर्य, इंग्रजी अंमलदारहि खुष नाहींत आणि राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्तेहि खुष नाहींत अशी स्थिति झालेली आहे. ही स्थिति सुधारणें हें सरकारी विद्याखात्याचें पहिलें कर्तव्य होय. पण तिकडे लक्ष न देतां अलीकडे कांहीं वर्षें सरकारी शाळांतून व कॉलेजांतून राजद्रोहाचीं कोळिष्टकें कोणत्या कोपऱ्यांत लागलेलीं आहेत, हें पाहून किंवा कल्पून तींच केरसुणीनें दूर करण्याचा शाळाखात्यांतील अधिकाऱ्यांस उद्योग लागला आहे. शाळाखात्याचे मुख्य प्रधान ना० बटलर यांनीं ना० राम रायनिंगार यांनीं पुढें आणलेल्या ठरावाचा अशा प्रकारें विपर्यास केला नाहीं ही मोठ्या सुदैवाची गोष्ट होय. देशी भाषांतून शिक्षण देणें म्हणजे शिक्षणाचे विषय बदलणें नसून तेच विषय थोड्या परिश्रमानें सर्वांस कसे समजून देतां येतील, हा या वादांतील मुख्य मुद्दा आहे; असें जें ना० बटलरसाहेबांनीं म्हटलें आहे तें यथार्थ आहे. ज्या भाषेंत शिक्षण दिलें जातें ती भाषा देशी असेल तर विषय अधिक सुगम होतील, इतकेंच नव्हे तर, ज्ञानाचाहि जास्त प्रसार होऊन तें या देशांत स्थिरावेल, व त्याबरोबरच देशी भाषांचा उत्कर्ष होऊन प्रांतोप्रांतीं एक प्रकारचें विशिष्ट ज्ञानसामर्थ्य उत्पन्न होईल हें निर्विवाद आहे. सरकारास ही गोष्ट इष्ट नाहीं असें नाहीं.

उलट, प्राच्य विद्येऐवजीं पाश्चिमात्य विद्येचें शिक्षण देण्याचा सरकारनें जेव्हां निश्चय केला, तेव्हां त्यांनीं आपल्या डोळ्यापुढें हेंच धोरण ठेवलेलें होतें. पाश्चिमात्य विद्यांचें शिक्षण देशी भाषेंत दिल्यानें हें धोरण अधिकाधिक सिद्धीस जाईल हें सांगावयास नकोच. सध्यां लढाई सुरू असल्यामुळें या प्रश्नाचा सरकारांत जितका ऊहापोह व्हावयास पाहिजे तितका होण्यास सवड नाहीं हें आम्ही जाणून आहों. पण ना० बटलरसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें लढाईनंतर तरी या प्रश्नाच्या विचारास अग्रस्थान मिळेल, व त्याचा निःपक्षपातबुद्धीनें विचार होऊन शाळांतील व क्लॉलेजांतील अभ्यासक्रमांत देशाला हितकारक असें इंग्रजीचें व देशी भाषांचें प्रमाण ठेविलें जाईल अशी आम्हांस उमेद आहे. देशांतील तरुण पिढी विनाकारण परकी भाषा शिकण्यासाठीं मारायची किंवा त्यांस उपयुक्त शिक्षण देऊन शक्य तितकें अधिक सुशिक्षित करावयाचें हा मुख्य मुद्दा आहे; आणि किरकोळ बाबतींत कितीहि मतभेद असला तरी या मुख्य प्रश्नाचा लवकर समाधानकारक निकाल लावणें अत्यंत जरूर आहे, हें कोणीहि नाकबूल करणार नाहीं.

मातृभाषा हाच स्वराज्याचा पाया *

'No scheme of self-Government, however, benevolently or generously it may be bestowed upon us, will ever make us a self-governing nation if we have no respect for the languages our mothers speak.' —M. K. GANDHI.

'कोणी कितीहि परोपकार बुद्धीनें किंवा औदार्यबुद्धीनें कशाहि उत्तम घटनेचें स्वराज्य आम्हांस दिलें तरी आमच्या माता जी भाषा बोलतात तिजविषयीं आमच्या मनांत आदरबुद्धि नसल्यास आम्ही खरे स्वराज्यभोगी होणार नाहीं.' —महात्मा गांधी.

मुंबई येथें गेल्या आठवड्यांत भरलेली प्रांतिक शिक्षणपरिषद बऱ्याच अंशांनीं यशस्वी झाली असें म्हणतां येईल. ती सरकारनें किंवा मुंबई

* केसरी, तारीख १० जुलै १९१७

युनिव्हर्सिटीनें भरविलेली नव्हती ही गोष्ट खरी; तथापि तिचें अध्यक्षस्थान मुंबई हायकोर्टाचे एक वेळचे ॲक्टिंग चीफ जस्टिस व मुंबई-युनिव्हर्सिटीचे सरकारकडून दोनदां नेमणूक झालेले व्हाइस चॅन्सेलर सर नारायण चंदावरकर यांनीं स्वीकारलें होतें; आणि इलाख्यांतील दुय्यम प्रतीच्या व उच्च शिक्षणसंस्थांतून अगर अशा संस्थांबाहेर राहूनहि शिक्षणाकडे मोठ्या आवडीनें लक्ष पुरविणारे असे अनेक नामांकित गृहस्थ व स्त्रियाहि हजर होत्या. परिषदेस सरकारी विद्याखात्याचे अधिकारी किंवा नोकर आले नव्हते ही गोष्ट खरी; परंतु ते हजर न राहण्याला मुख्यतः दोन कारणें होतीं. एक असें कीं, सरकारी विद्याखात्याला शिक्षणाच्या कामीं खासगी रीतीनें झालेला कोणताहि प्रयत्न—मग तो केवळ चर्चात्मक कां असेना—फारसा आवडत नाहीं. लोककल्याणाच्या विचाराचा सर्व मक्ता आपणाकडे आहे अशी सरकारानें आपली भावना करून घेतलेली असते, तेव्हां सरकाररूपी शरीराचे अवयवभूत असे जे विद्याधिकारी तेहि अशा भावनेचे अंशभागी झाले असल्यास त्यांत नवल नाहीं. पण त्यांतूनहि कांहीं विद्याधिकारी अशा भावनेपासून मुक्त असले तरी आपल्या नोकरपेशाची सरकारी शिस्त त्यांना आड येते, व सदर शिक्षणपरिषदेसारख्या सभांना त्यांना हजर राहतां येत नाहीं. सरकारी अधिकारी किंवा नोकर हजर नसल्यामुळें या परिषदेस एकांगीपणाचें स्वरूप सकृद्दर्शनीं येण्यासारखें होतें. परंतु कित्येक बाबींवर परिषदेंत जो कसून व कडाक्याचा वादविवाद झाला, त्यावरून पाहतां तेथें कोणतेंहि एककल्लीपणाचें मत प्रभावी झालें नसून, परिषदेनें मंजूर केलेल्या ठरावांना संकीर्ण विचाराचें स्वरूप सहजच आलेलें आहे. हे ठराव लोकमतनिदर्शक असले तरी सरकारावर ते कोणत्याहि रीतीनें बंधक होऊं शकत नाहींत. फार काय, पण या बाबतींत मुंबई-युनिव्हर्सिटीदेखील सर्वस्वीं स्वतंत्र असल्यानें परिषदेचे ठराव मानणें अगर न मानणें हें सेनेटच्या मर्जीवर अवलंबून आहे. पण हे ठराव म्हणजे नसले तरी विचारपूर्वक केलेल्या शिफारशी या नात्यानें त्यांना बरीच आहे. एवढेंच नव्हे तर, सरकारनें किंवा युनिव्हर्सिटीनें [illegible] धुडकावून लावल्या तरी पुढेंमागें केव्हां तरी या शिफारशी अमलांत आल्यावांचून राहणार नाहींत, अशी आशा बाळ

नाहीं. एरवीं लोकमत जें सर्वत्र विखुरलेलें असतें तें अशा परिषदांनीं एकीकृत होतें, आणि सरकारी विद्याखातें किंवा निमसरकारी युनिव्हर्सिटी यांच्यावर हल्ला चढविण्यापूर्वी लोकमताच्या सेनेची तयारी बाहेर कशी काय आहे याचा पुढाऱ्यांना अंदाज घेतां येतो.

शिक्षणपरिषदेचें काम आपटण्यापूर्वीच गेल्या अंकीं आम्हीं आशा प्रदर्शित केल्याप्रमाणें देशी भाषांसंबंधानें दोन महत्त्वाचे ठराव परिषदेनें बहुमतानें का होईना; पण मंजूर केले. पैकीं एक ठराव मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत प्रश्नांचीं उत्तरें आपल्याला देशी भाषेंतून देण्यास विद्यार्थ्यांना मोकळीक असावी, असा होता. या विषयावर दुमत झालें. तथापि बहुमतानें मंजूर केलेला ठराव अध्यक्षांनीं आढेवेढे न घेतां परिषदेचा निकाल म्हणून ग्राह्य मानला. दुसरा महत्त्वाचा ठराव भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापण्यासंबंधाचा होता तोहि बहुमतानें मंजूर झाला असता; तथापि अध्यक्षांना शिक्षणव्यवस्थेंतील ही राज्यक्रांतीच होय असें वाटल्यावरून त्यांनीं या प्रश्नाचा निकाल निदान लांबणीवर पडावा या हेतूनें त्याच्या विचाराकरितां पोटकमिटी नेमणें अधिक प्रशस्त असें ठरविलें व मूळ सूचना करणारांनींहि तोडजोडीदाखल ही उपसूचना मान्य केली. तथापि परभाषेच्या मरणाला फार तर पोटकमिटीची ही एक रात्र आडवी येईल, याहून अधिक कांहीं होणार नाहीं असें आम्हांस वाटतें. कारण मातृभाषेला एकंदर शिक्षणाच्या कार्यांत कोणतें स्थान असावें याविषयीं एकंदर लोकमताचे तोंडचे आतां फिरल्यासारखें झालेलें असून भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापणें ही जी या विषयांतील अंतिम सुधारणा ती केव्हांना केव्हां तरी अमलांत आलीच पाहिजे असा तज्ज्ञांचा समज झालेला आहे, व तो यथार्थ आहे असें आम्हासहि वाटतें. कर्म-धर्मसंयोगानें मुंबईच्या 'टाइम्स'पत्रानें सदर शिक्षणपरिषदेवर लेख लिहितांना इतर गोष्टींची उपेक्षा करून आम्ही ज्या दोन गोष्टी इष्ट म्हणून ल लेखांत उल्लेखिल्या होत्या त्याच दोन गोष्टींस 'टाइम्स'पत्रानें नेमका घेतला आहे. ज्या दोन गोष्टी आम्हांस इष्ट वाटाव्या त्याच नेमक्या [illegible] अनिष्ट [illegible] वाटाव्या याचा अर्थ 'टाइम्स'ला हिंदी लोकांचें शिक्षण- [illegible] व्हावेंसें वाटते [illegible] असा आम्ही करीत नाहीं, तर एकाच विषया- [illegible] परकीय हे पाहात असतां त्यांच्या दृष्टीमध्यें स्वभावतःच

इतका मोठा फरक पडत असतो, इतकाच त्याचा आम्ही अर्थ करितों. देशी भाषांसंबंधानें आमची जी दृष्टि तीच उद्यां इंग्लंडमध्यें कोणत्या भाषेच्या द्वारें शिक्षण द्यावें असा प्रश्न निघाला असतां 'टाइम्स'कारांचीहि होईल. म्हणजे उदाहरणार्थ, आम्ही जसें महाराष्ट्रांतील मुलांना मराठीच्या द्वारें शिक्षण मिळालेंच पाहिजे असें म्हणतों, तसेंच 'टाइम्स'कारहि इंग्रज मुलांना इंग्रजीच्या द्वारें शिक्षण मिळालें पाहिजे असेंच म्हणतील, फ्रेंच किंवा जर्मन भाषेंतून मिळावें असें केव्हांहि म्हणणार नाहींत. फार काय पण एखाद्या विषयावर जर्मन किंवा फ्रेंच भाषेंतील ग्रंथ उत्तम आहेत असें ठरलें तरी 'टाइम्स'कार इंग्रजी भाषेचा आग्रह सोडणार नाहींत. पण हिंदुस्थानाविषयीं बोलणें निघालें म्हणजे मात्र हिंदुस्थानांत मातृभाषा म्हणून कांहींएक चीज आहे किंवा नाहीं अशी माहिती नसल्याप्रमाणेंच ते बरळूं लागतात. हिंदुस्थानांत आज इंग्रजांचें राज्य आहे व उद्यांहि राहील अशी दृढ समजूत असली तरी राज्यकर्त्यांची भाषा झाली म्हणून शिक्षणांत तिला किती महत्त्व किंवा कोणतें स्थान द्यावयाचें या विषयीं 'टाइम्स'कारासारख्या लोकांना सामान्य तारतम्यहि रहात नाहीं, म्हणूनच त्यांच्या बोलण्याला बोलणें असें न म्हणतां बरळणें असेंच नाइलाजानें म्हणावें लागतें. भाषेसारख्या गोष्टीचा इतका अभिमान धरून तिच्या द्वाराशिवाय इतर द्वारानें हिंदी लोकांचें शिक्षण होऊं नये किंवा होणारच नाहीं असा जेव्हां ते आग्रह धरतात तेव्हां त्यांचें हें गाढ बुद्धिमांद्य पाहून हंसूं आल्याशिवाय राहातच नाहीं. या लोकांची एकंदर विचारसरणी पाहिली तर ती अशी दिसते कीं, हिंदी मुलांना शक्य तर पाळण्यांतलीं गाणींसुद्धां त्यांच्या आयांनीं इंग्रजी भाषेंतून म्हणावीं, व धूळपाटीवर अक्षरें घालून द्यावयाचीं तीं 'अ, आ, इ, ई' हीं न घालून देतां 'ए, बी, सी, डी,' हींच जर घालून देतां आलीं तर फार बहार होईल, व हिंदुस्थानांतील शिक्षणाचा सर्व प्रश्न अत्यंत समाधानकारक रीतीनें कायमचा सुटेल ! दुर्दैव इंग्रजांचें कीं, हिंदी आया व दाया या अद्यापि घरांत इंग्रजी बोलूं लागल्या नाहींत व गांवठी तात्या पंतोजी इंग्रजीशिवाय दुसरें कांहीं जाणत नाहींसे झाले नाहींत. पण हें दुर्दैव कायमचें टिकेल अशी भीति त्यांना असेलसें वाटत नाहीं. आज प्राथमिक शिक्षणांत देशी भाषांना जो थारा मिळालेला आहे तो त्यांनीं

केवळ नाइलाज.नें म्हणून दिलेला आहे. प्राथमिक शिक्षणहि इंग्रजी भाषेंतून देण्याची तरफदारी करण्यास ते कचरले नसते. पण प्राथमिक शिक्षण इंग्रजींतून देण्याइतके इंग्रजी शिकलेले शिक्षक त्यांना आज मिळूं शकत नाहींत म्हणूनच नाइलाज. पण पांचपन्नास वर्षांनीं ही अडचण दूर होऊन धूळपाटीवर इंग्रजी अक्षरें दिसणार नाहींत अशी त्यांची निराशा झालेली नाहीं, हें त्यांच्या मनोभूमींत किंचित् खोल प्रवेश करून पाहणाराला तेव्हांच दिसून येईल. प्राथमिक शिक्षण देशी भाषेंतून दिलें जातें तें, ती पद्धति स्वाभाविक म्हणून नव्हे तर ती पद्धति नाहींशी करण्यास शिक्षकांचें वैपुल्य नाहीं म्हणूनच होय, अशी त्यांची विचारसरणी उघड उघड दिसते !

अशी विचारसरणी असल्याबद्दल आम्ही इंग्रजांस दोष देत नाहीं; पण त्यांना दोष न दिला तरी राष्ट्राच्या दृष्टीनें आमचें म्हणून कांहीं पाहणें आहेच कीं नाहीं ? हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य झालें म्हणून हिंदी लोकांना जसें डोक्यावर उभे राहून चालतां येणार नाहीं तसेंच परकी भाषेंतून प्राथमिक काय, दुय्यम काय, पण उच्च शिक्षणहि निरंतर देऊन चालणार नाहीं, हीच आमची दृष्टि असली पाहिजे. मात्र ती आमच्यांतील कित्येक सुजाण म्हणविणारांनाहि अद्याप लाभलेली नाहीं एवढ्याचेंच राहून राहून वाईट वाटतें. शिक्षकांच्या अभावामुळें प्राथमिक शिक्षण आज इंग्रजींतून न देणें हें जसें इंग्रजांना अपरिहार्य वाटतें तितकेंच अत्युच्च शिक्षण देशी भाषांतील ग्रंथाभावामुळें आज इंग्रजींतून देणें अपरिहार्य आहे असें आम्हांस वाटतें. तरी पण इंग्रजी शिक्षण फैलावून प्राथमिक शिक्षणहि देणारे शिक्षक इंग्रजी पढलेले मिळावे हा जसा इंग्रजांचा प्रयत्न मनांतून सुरू आहे तसाच उच्चतम शिक्षण देण्याचे ग्रंथहि देशी भाषांतच पैदा व्हावे असा आमचाहि प्रयत्न आहे. अर्थात् हे दोन प्रयत्न सर्वस्वीं परस्परविरोधी अशा दिशांनीं चाललेले असून त्यांची एकवाक्यता होणें मुळींच संभवनीय नाहीं. एक पश्चिमेकडे तोंड करून चाललेला तर दुसरा पूर्वेकडे तोंड करून चाललेला अशी वास्तविक स्थिति असतां, जणुं काय हे दोघेहि एकाच दिशेनें चाललेले आहेत असा आजवर कित्येकांना खराखुरा भ्रम झाला व कित्येकांनीं तो तसा करून घेतला. पण हा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ असाच

निरंतर चालणें अशक्य होतें; व मुंबईच्या शिक्षण-परिषदेंत देशी भाषाभिमान्यांनीं आपलें मनोगत स्पष्ट शब्दांनीं बोलून दाखविल्यामुळें या विरोधी विचारसरणीची धडक किंवा टक्कर होऊन, आजवर झोंपेंत चालणारे हे लोक खाडकन् जागे झाले व हिंदी लोकांची शिक्षणाच्या बाबतींतील खरी राष्ट्रीय आकांक्षा काय आहे हें या झोंपाळूंना आतां पुरें स्पष्ट दिसून आलें, हा या शिक्षण-परिषदेचा आमच्या मतें सर्वांत मोठा फायदा झालेला आहे. प्रस्तुत अग्रलेखाच्या शिरोभागीं महात्मा गांधी यांच्या उद्गारांचें जें अवतरण आम्हीं घेतलें आहे तें वाचकांनीं या ठिकाणीं फिरून एक वेळ वाचल्यास ही आकांक्षा कशा प्रकारची आहे हें त्यांना कळून येईल. थोड्या दिवसांपूर्वी रंगून येथील एक बॅरिस्टर पी. जे. मेहता, एम्. डी. यांनीं 'व्हर्न्याक्युलर्स ॲज मीडिया ऑफ इन्स्ट्रक्शन इन् इंडियन स्कूल्स ॲंड कॉलेजेस्' या नांवाचें एक लहानसें पुस्तक लिहिलेलें आहे, व त्या पुस्तकाला गांधी यांनीं जी प्रस्तावना जोडली आहे तींतील तें शेवटचें वाक्य आहे. सदरहू इंग्रजी पुस्तक देशी भाषाभिमानी लोकांनीं मिळवून अवश्य वाचावें अशी आमची त्यांस शिफारस आहे.

सदर प्रस्तावनेंत गांधी यांनीं फार थोडक्यांत पण अतिशय उत्कृष्ट तऱ्हेनें देशी भाषाभिमान्यांचें म्हणणें मांडलेलें आहे. त्यांत त्यांनीं दोनच पण अत्यंत समर्पक अशीं उदाहरणें दिलीं आहेत. त्यांवरून हिंदुस्थानांत इंग्रजी भाषेच्या द्वारें शिक्षण द्यावें असें म्हणणारे लोक अद्वितीय अशा अजागळ कोटींत पडतात हें दिसून येईल. पहिलें उदाहरण ज्यू लोकांचें. ज्यू लोकांना स्वतःचा असा देश नाहीं. जगाच्या अनेक व दूरदूरच्या भागांत आज शेंकडों वर्षें ते कायमची वसाहत करून राहिलेले आहेत; व त्या त्या देशांचे नागरिक बनलेले आहेत आणि फिरून ज्यू लोकांचा म्हणून एखादा स्वतंत्र देश होईल अशी आशाहि त्यांना करणें शक्य नाहीं. अर्थात् ज्या देशांत ते कायम राहिले त्या देशांत प्रचलित असलेली भाषाच त्यांनीं मातृभाषा मानली असती तरीहि नवल वाटलें नसतें. परंतु हिंदुस्थानांत हिंदी लोकांचा जो परस्पर नित्यसंबंध येतो, तसा संबंध येण्याचा संभवहि नसतां केवळ सर्व जगभर पसरलेल्या ज्यू लोकांना परस्पर नैमित्तिक व्यवहार करतां यावा म्हणून त्यांनीं आपल्या 'यिडिश' नामक मातृभाषेर

सर्व भाषांत उच्चस्थान देऊन तिच्यांतूनच ते मुलांना शिक्षण देतात. ज्या देशांत ते राहतात त्या देशाची भाषा त्यांना येत नाहीं असें नाहीं, उत्तम येते. तथापि परभाषेंतील ग्रंथ वाचून त्यांच्या आत्म्याचें खरें खरें समाधान होत नाहीं. म्हणून इतर लोकांनीं गोधडीवजा ठरवलेल्या व अवमानलेल्या पण ज्यू लोकांना मातृस्थानीं असलेल्या 'यिडिश' भाषेस त्यांनीं संस्कार देऊन व ग्रंथसमृद्ध करून एक दोन पिढ्यांतच नांवारूपास आणलें आहे. जगभर पसरलेल्या व म्हणून कायमचा वियोग पावलेल्या ज्यू लोकांची ही स्थिति, तर हजारों वर्षें एकत्र राहून, हजारों बंधनांनीं एक गठ्ठा बनलेल्या हिंदी, बंगाली, मराठी, कानडी, गुजराथी, तामील, तेलगू वगैरे प्राचीन व परिणत भाषा बोलणाऱ्या लोकांनीं आपापल्या भाषांच्या द्वारेंच शिक्षण —मग तें कितीहि उच्च कोटींतलें असो—मिळविण्याची आकांक्षा धरल्यास त्यांस नांव कसें ठेवतां येईल ? ✓

दुसरें उदाहरण दक्षिण आफ्रिकेचें. तेथील डच लोकांची 'टाल' नामक भाषा व इंग्रजांची इंग्रजी भाषा यांचें द्वंद्व आज कित्येक वर्षें चालू आहे; व तेथेंहि बोअर लोकांच्या मातृभाषाभिमानाचा विजय होऊन इंग्रजीलाच हार खावी लागली. हीं उदाहरणें देऊन गांधी यांनीं असें म्हटलें आहे कीं, "देशी भाषांवरून ज्यांचा विश्वास उडाला त्यांचा स्वतः आपल्यावरूनच विश्वास उडाला असें म्हटलें पाहिजे. देशी भाषेवरील अप्रीति हें राष्ट्रीय अधोगतीचें लक्षण होय." पण सुदैवानें ही अधोगति हिंदी लोकांना येण्याची पूर्वी केव्हां भीति असली तरी आज तरी ती खास नाहीं, तिनें निश्चयानें उलट खाल्ली आहे, असें मुंबई येथील शिक्षण-परिषदेवरून आम्हाला म्हणण्यास हरकत नाहीं. देशी भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापल्या जाव्या या तत्त्वाचा सदर परिषदेंत मान्यतेनें व स्पष्टतेनें उघड उच्चार झाल्यामुळें देशी भाषांच्या स्वराज्याचें निशाणच या परिषदेंत रोवलें गेलें असें आम्ही म्हणतों. अर्थात् या निशाणाभोंवतीं यापुढें अनेक युद्धें होतील; तथापि अखेर देशी भाषांचाच विजय होणार हें सांगण्याला कोणी ज्योतिषी किंवा भविष्यवादी नको.

[२]*

सरहू विषयावर गेल्या अंकीं आम्हीं उ
त्यांचा आणखीहि कांहीं दृष्टींनीं विचा
मरलेल्या शिक्षण-परिषदेंत देशी भाषांचा
युनिव्हर्सिटया स्थापल्या जाव्या अशी सूचन
मंजूर होण्याचा रंग दिसला, तेव्हां परिषदे
त्यांनीं "ही तर शिक्षणांतील राज्यक्रांतीच
उद्गार काढले असें म्हणतात. याच विषयासंबंध
पत्रानें अशाच अर्थाची टीका करून वरती असेंहि म्हटलं का, स्वा. १९१५
चर्चेंत देशी भाषांच्या अभिमान्यांनीं म्हणजे पर्यायतः मराठीच्या अभि-
मान्यांनीं हुल्लड किंवा दंगल करून गर्दी–मारामारींत आपलें काम साधून
घेतलें. शिक्षण-परिषदेचा हा ठराव युनिव्हर्सिटीच्या सेनेटमध्यें मंजूर होऊन
त्याला सरकारची मान्यता मिळून भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापन होईपर्यंत
डोळे पांढरे होतील. आजच्या परतंत्रतेमुळें राष्ट्राची अशी स्थिति असतां
शंभर वर्षांपूर्वीची मराठा कान्फिडरसी–अर्थात्–महत्त्वाकांक्षी मराठे
सरदारांचा संघ–फिरून निर्माण झाली असून तिनें आपल्या जुन्या लुटारू-
पणाच्या स्वाऱ्यांना जणुं काय फिरून प्रारंभ केलाच अशा तऱ्हेचे उद्गार
एकदम मनांत उत्पन्न झालेल्या भीतीमुळें कां होईना, पण शहाण्यासुर्त्या
लोकांनीं काढलेले ऐकून कोणास हंसूं आल्यावांचून राहणार नाहीं ? राज-
कीय सुधारणांप्रमाणें शिक्षणविषयक सुधारणाहि हल्लींच्या परतंत्र स्थितींत
मंद पावलांनींच चालत जाणार व ती अखेर पुरी अमलांत येईपर्यंत तिच्या
उपयुक्ततेचें शिक्षण तिला आज विरोध करणारांनाहि अखेर मिळणार
याविषयीं आम्हांस शंका नाहीं. पण एखाद्या यक्षिणीच्या कांडीनें चमत्कार
घडून आल्याप्रमाणें ही सुधारणा आज ताबडतोब घडून आली असें
घेऊन चाललें तरी त्यांत वावगें तें काय आहे, याचा विचार प्रतिपक्षीयांनीं
शांत मनानें करावा अशी आमची त्यांस विनंति आहे.

---

* केसरी, तारीख १७ जुलै १९१७

लक्षांत घेतली पाहिजे ती ही कीं, देशी
ह्याचा अर्थ त्यांना फक्त आपल्यापुरती
ी भाषेनें दुसऱ्या देशी भाषेच्या प्रांतावर
ापल्या हस्तगत करावा अशी कोणत्याहि
व तशी इच्छा जर खरोखर कोणा देशी
मान्यांनीं तिला विरोध करावा हें स्वाभा-
ाषेनें दुसरीवर स्वारी करण्याचा हा प्रश्न
एका परकी भाषेविरुद्ध संघ करून आपा-
ांचाच हा प्रयत्न आहे. मुंबई इलाख्यांत मुख्य
शी भाषा मराठी असल्यामुळें इतर भाषांचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांना सहजच अशी शंका येते कीं, देशी भाषांच्या स्वराज्याच्या नांवाखालीं मराठे लोक सर्व इलाखाभर आपल्याच भाषेचें स्तोम माजवूं पहात आहेत व वर्चस्व स्थापूं पहात आहेत; पण अशा लोकांना आम्ही प्रांजलपणें व प्रामाणिकपणें असें आश्वासन देतों कीं, भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापणें किंवा देशी भाषांतून शिक्षण देणें ह्या सुधारणांची तरफदारी करितांना ज्याची मातृभाषा मराठी नाहीं अशा एकाहि मनुष्यावर मराठी शिकण्याची अप्रत्यक्ष कां होईना पण सक्ति व्हावी अशी आमची बिलकुल इच्छा नाहीं. किंबहुना, आम्ही जेव्हां मराठीची बाजू पुढें मांडतों, तेव्हां उपलक्षणानें कानडी, गुजराथी, सिंधी वगैरे भाषांचीहि बाजू गर्भित रीतीनें पुढें मांडीत असतों. मराठीचे पुरस्कर्ते युनिव्हर्सिटींत किंवा लोकमतप्रदर्शक वर्तमानपत्रांच्या मुलुखांत प्रमुख आहेत ह्या गोष्टीचा आमच्या कानडी, गुजराथी, सिंधी वगैरे बंधूंनीं विषाद न मानतां उलट आनंदच मानला पाहिजे; कारण ह्या इतर भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या लहान असल्यामुळें त्यांच्याकडूनच ह्या मोठ्या सुधारणांची तरफदारी होण्यास सुरवात झाली असती तर युनिव्हर्सिटीनें किंवा सरकारनें या प्रश्नाची उपेक्षा किंबहुना उपहासहि केला असता. पण मराठी भाषा बोलणाऱ्या दोन कोटी लोकांच्यातर्फे हा प्रश्न मांडण्यांत आला असतां त्याचीहि वासलात वरीलप्रमाणें लावण्याची सरकारची छाती होणार नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे. मराठ्यांकडे म्हणजे मराठींच्या अभिमान्यांकडे या चळवळीचें

धुरीणत्व येत असलें तरी तिचा हेतु इतर सर्व देशी भाषांचा आपल्या बरोबरीनें हक्क सांगण्याचा आहे व या चळवळीस फळ मिळाल्यास मराठीप्रमाणें इतर भाषांनाहि तें मिळाल्याखेरीज रहाणार नाहीं. 'मातृभाषा हाच स्वराज्याचा पाया' अशी आमची समजूत असल्यामुळेंच कर्नाटक कॉलेजसारख्या कर्नाटकाकरितां स्वतंत्र संस्था निघाल्यास आम्ही त्यांचें अभिनंदन करितों व राजकीय स्वराज्याच्या चळवळींत सर्वस्वी एक असतां कानडी वाङ्मयाचा अभ्यास व प्रसार करणाऱ्या साहित्यसंस्था निघाल्यास या त्यांच्या स्वतंत्रपणाच्या बाण्याचें आम्हांस केव्हांहि कौतुकच वाटतें. अशाच दृष्टीनें बडोदें, ग्वाल्हेर व इंदुर ह्या संस्थानचे राज्यकर्ते मराठे असले तरी संस्थानांतील प्रजा मुख्यतः इतर भाषा बोलणारी असल्यामुळें त्यांनीं सरकारी दप्तराची भाषा गुजराथी किंवा हिंदी केल्यास आम्हाला मनांतून त्यांचें बिलकूल वाईट वाटत नाहीं. मराठी मुलखाच्या सरहद्दीला लागलेल्या व एकवार मराठीच्या अमलाखालीं असलेल्या मुलखांतील आमच्या बंधुवर्गाविषयीं आमची मनःस्थिति अशाप्रकारें निर्मळ असल्यामुळें सिंध वगैरे प्रांतांतील आमच्या बांधवांना आमच्या देशी भाषेच्या पुरस्काराच्या हेतूविषयीं यत्किंचितहि अंदेशा येण्याचें कारण नाहीं हें सांगणें नकोच.

पण देशी भाषांच्या या वादांत ज्यांना स्वतःची म्हणून भाषा आहे अशांचें समाधान वरील विचारसरणीनें थोडेंबहुत करितां येईल. पण हल्लीं सरकारदरबारीं किंवा युनिव्हर्सिटींत दुर्दैवानें अशा लोकांचें वर्चस्व आहे कीं, त्यांना हिंदुस्थानांतील कोणत्याहि देशी भाषेचा अभिमान नाहीं. व ज्यांना आगंतुक कारणांनीं इंग्रजीसारख्या परभाषेचा भलताच अभिमान उत्पन्न झालेला आहे. आजपर्यंत ज्या कारणाकरितां राजकीय चळवळीच्या प्रगतीस मुंबई शहराचा जाच आम्हाला भासत होता तींच कारणें या देशी भाषेच्या सुधारणेच्या प्रगतीस अद्यापि आड येत आहेत असें कष्टानें म्हणावें लागतें. यांत दोष असला तर माणसापेक्षां परिस्थितीचाच अधिक आहे हें आम्ही जाणत नाहीं असें नाहीं. पण दोष कोणाचाहि असला तरी असला जाच दूर व्हावा याविषयीं आम्हास झगडणें सारखेंच प्राप्त आहे, व केवळ हाच झगडा करण्याकरितां शिक्षण-परिषदेंत मराठी भाषेच्या अभिमान्यांनीं पुढाकार घेतलेला होता. मुंबई शहर हें मुंबई

इलाख्याच्याच नव्हे तर एका अर्थानें सर्व हिंदुस्थानच्या राजधानीचें शहर आहे व तेथील कारखानदारी, श्रीमंती, व्यापार वगैरे गोष्टी या राजधानीस अनुरूप अशा व सर्व हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीच्या आहेत ही गोष्ट आम्ही आनंदानें कबूल करितों. पण एवंगुणविशिष्ट अशा या शहरास राष्ट्रीय-भावनेच्या दृष्टीनें शुद्ध बकाली असें कंगाल नांव देण्याशिवाय गत्यंतर नाहीं याचें आम्हास वाईट वाटतें. मुंबईतील सत्ता ही मुंबईतील लोकसंख्येच्या मानानें पहातां सर्वस्वीं व्यस्त प्रमाणांत असलेली आढळून येईल. मुंबईतील शेंकडा सत्तर इतकी लोकसंख्या मराठ्यांची आहे. त्याच्या खालोखाल नंबर गुजराथी व हिंदुस्थानी भाषा बोलणारांचा लागेल, व एका अर्थानें मुंबईच्या वातवरणांत दगडी कोळशाच्या धुराच्या बरोबरीनें इंग्रजी भाषा मिसळल्याचा भास होत असला तरी ज्यांची मातृभाषा खरोखरी इंग्रजी आहेत अशा लोकवस्तीचा नंबर सर्वांत खालीं लागेल यांत शंका नाहीं. असें असतां मुंबई शहरांत पहावें तों अभिमान सर्व इंग्रजी भाषेविषयीं! मातृभाषा म्हणून कांहीं पदार्थ आहे किंवा मुंबई शहराबाहेर मुंबई इलाखा म्हणून कांहीं आहे अशी कल्पनाहि येथील प्रस्थप्राय बनलेल्या लोकांच्या स्वप्नांतहि कधीं येत नाहीं. व त्यामुळेंच सर्व शिक्षणविषयक सुधारणांची या शहरीं गळचेपी होते. पण त्यांतल्या त्यांत विशेष दुःखाची गोष्ट ही कीं, आपल्या धंद्याच्या निमित्तानें मुंबई शहरीं वास्तव्य घडलेल्या मराठी, गुजराथी, कानडी वगैरे लोकांनाहि इंग्रजी भाषेचा अंमल कोणत्या बाबतींत किती चालावा याचा विवेक रहात नाहीं. व्यापार व राज्यकारभार या बाबीपुरती इंग्रजी भाषा अवश्य असली तरी शिक्षणाच्या कामीं किंवा घरींदारींहि इंग्रजीचें वर्चस्व असण्याचें कारण नाहीं; हा सूक्ष्म विचार केवळ धंदेवाईक लोकांना आपल्या धंद्याच्या गर्दीत दिसून न आला तरी शिक्षकवर्ग व राष्ट्रीय भावनेच्या दृष्टीनें विचार करणारे लोक यांना अशी डोळेझांक करतां येणें शक्य नाहीं; म्हणून मुंबई शहरीं मातृभाषांच्या स्वराज्याचें निशाण रोंवण्याचें काम अत्यंत अवघड असलें तरी त्या कामास खरा प्रारंभ तेथेंच झाला पाहिजे, व तसा प्रारंभ शिक्षण-परिषदेंत झाला याबद्दल आम्हास समाधान वाटतें. मुंबई शहराची पारस्थिति विशेष प्रकारची असल्यामुळें फार तर इतकें म्हणतां येईल कीं, मुंबई-इलाख्यांत महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक, सिंध हे जसे भाषेच्या दृष्टीनें

स्वतंत्र पोटप्रांत होतात तसाच मुंबई शहर हाहि एक स्वतंत्र पोटप्रांत असावा व वर सांगितल्याप्रमाणें मुंबई शहरीं इंग्रजी मातृभाषा असणारांची संख्या सर्वांत थोडी असली तरी इंग्रजीच्या अभिमान्यांचे सर्व चोचले पुरविण्याला किंवा इंग्रजीला मनसोक्त धुडगूस घालण्याला मुंबई शहर हें मोकळेंच सोडून देण्यास सर्व लोकांनीं तयार व्हावें. पण सर्व इलाखा म्हणजे कांहीं मुंबईशहर नव्हे. ह्या दृष्टीनें, विद्येचें आदिपीठ जी युनिव्हर्सिटी तिचें संस्थान मुंबई शहरीं असलें तरी तिचें धोरण व तिचा कारभार मुंबई शहराच्या तंत्रानें न चालतां इलाख्याच्या तंत्रानेंच चालला पाहिजे, हा हक्क किंवा तो बजावण्याचा आग्रह आम्ही केव्हांहि सोडणार नाहीं.

मातृभाषाविषयक सुधारणांसंबंधानें लिहितांना मुंबईच्या एका प्रमुख इंग्रजी पत्रानें असें ध्वनित केलें आहे कीं, देशी भाषांतून शिक्षण देणें, परीक्षा घेणें व भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापन करणें या कल्पना दिसण्यांत जरी मोहक दिसल्या तरी त्या अव्यवहार्य म्हणून तरी त्याज्य होत. या बाबतींत या पत्राकडून इतकी सौम्य भाषा वापरली गेली याचेंहि कारण झालें तरी शिक्षण-परिषदेंत मातृभाषाभिमान्यांनीं विशेष जोर धरून या अंध आक्षेपकांच्या डोळ्यांवर सत्य तत्त्वाचा प्रकाश बराचसा पाडला हेंच होय. पण टीकेची भाषा सौम्य असली म्हणून विरोधाची अढी मोडलेली आहे असें घेऊन चालणें शहाणपणाचें होणार नाहीं व मातृभाषांच्या प्रगतीच्या मार्गांत अव्यवहार्य असें अगडबंब नांव देऊन जे किल्लेकोट उभारण्यांत येतात त्यांच्यावर कसून हल्ला करून ते वेळींच जमीनदोस्त करून टाकले पाहिजेत. स्वराज्याच्या मागणीच्या मार्गांतहि संभावितपणानें विरोध करूं इच्छिणारे लोक हाच अव्यवहार्यतेचा अडथळा आणीत असतात ही गोष्ट आतां प्रसिद्धच आहे. पण कोणतीहि सुधारणा व्यवहार्य किंवा अव्यवहार्य हें ठरणें तिच्या पुरस्कर्त्यांच्या उद्योगावर व जोरकसपणावरच अखेर अवलंबून असतें; हें जसें स्वराज्याच्या चळवळींत आतां बरेंचसें प्रत्ययास आलें आहे, तसेंच या शिक्षणविषयक सुधारणेच्या कामींहि तें आपणांस प्रत्ययास आणून देतां येईल. मात्र देशभाषांची ही चळवळ कांहीं प्रमुख लोकांनीं स्वतःच तिला वाहून घेऊन नेटानें करीत राहिलें पाहिजे. मुंबई युनिव्हर्सिटी ही इलाख्यांतील लोकांकरितां आहे, लोक कांहीं या युनिव्हर्सिटीकरितां नाहींत हें जें

या विषयांतील आद्यतत्त्व तें युनिव्हर्सिटीच्या दारावर लिहून ठेविलें पाहिजे व तें तेथें सुवर्णाक्षरांनीं लिहिण्यास सोयीनें परवानगी न मिळेल तर पूर्वी युरोपांत ल्यूथरनें पोपला धाब्यावर बसवून आपल्या धर्मविषयक सुधारणांचीं अक्षरें वेशीवर जशीं खिळे ठोकून चढाविलीं तशींच आमच्या शिक्षणसुधारकांनींहि तीं मुंबई युनिव्हर्सिटीच्या दारावर निश्चयाचे खिळे ठोकून चढविलीं पाहिजेत. मातृभाषेच्या द्वारें सर्व प्रकारचा शिक्षणव्यवहार करणें ही गोष्ट कदाचित् थोड्याबहुत खर्चाची असेल किंवा या सुधारणेमुळें युनिव्हर्सिटीच्या कचेरीचा कारभार थोडाबहुत वाढेल ही गोष्ट आम्हास कबूल आहे. पण सर्व राष्ट्रीयत्वाच्या मुळाशीं असलेल्या अशा हिंदी भाषांचा विचार करीत असतां ५।५० हजार रुपये खर्च अधिक लागेल किंवा युनिव्हर्सिटीच्या कचेरींत १०।५ कारकून अधिक ठेवावे लागतील, किंवा १०।२० परीक्षक आणि १००।५० शिक्षक अधिक नेमावे लागतील अशा पोरकट सबबींवर ही सुधारणा आम्हीं मागें पडूं दिली तर त्यांत सरकारच्या शहाणपणापेक्षां आमच्या पुरुषार्थाचीच परीक्षा अधिक होणार आहे. असले प्रश्न जगांत आज पहिल्यानें हिंदुस्थानांत उत्पन्न झाले आहेत असें नाहीं. राजाची भाषा एक व प्रजेची भाषा दुसरीच अशा प्रकारची भानगड यापूर्वी कमींतकमी १०।५ देशांत तरी उपस्थित झालेली होती व त्या प्रत्येक ठिकाणीं अखेर मातृभाषांच्या पुरस्काराचाच जय झाला ही गोष्ट मुंबईतील धेंडांनीं व सरकारानेंहि लक्षांत बागविली पाहिजे. येथील फर्ग्युसन कॉलेजांतील एक प्रोफेसर व शिक्षाविचारमंडळाचे अध्यक्ष रा० विश्वनाथ बळवंत नाईक, एम्. ए. ह्यांनीं ह्या विषयावर एक निबंध लिहून नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यांत या वादग्रस्त प्रश्नाचा निकाल इतर देशांतून लोकांनीं कसा लावून घेतला ह्याची साधार माहिती दिलेली आहे. ती या प्रश्नाचा विचार करणारांनीं एकवार अवश्य वाचावी अशी आमची शिफारस आहे. जी स्थिति आज इंग्रजी अंमलामुळें हिंदुस्थानांत उत्पन्न झाली आहे तीच पूर्वी रशियन अमलाखालीं फिनलंडांत, ऑस्ट्रियन अमलाखालीं हंगेरींत व ब्रिटिश अमलाखालीं कानडा व दक्षिणआफ्रिका यांमध्यें उत्पन्न झाली होती. पण त्या त्या ठिकाणीं प्राथमिक शिक्षणापासून वरिष्ठ शिक्षणापर्यंत सर्व व्यवहार प्रजाजनांच्या मातृभाषेंतूनच झाला पाहिजे असा निकाल होऊन

तो अमलांतहि आलेला आहे. दक्षिण आफ्रिकेंत या प्रश्नावर रणें माजून त्या वादाला राजकीय स्वरूप प्राप्त झालें होतें. पण १८८२ सालापासून पुढें १०।५ वर्षें डच लोकांनीं जी जोराची चळवळ केली तीमुळें सरकारी कमिशन नेमण्यापर्यंत पाळी येऊन अखेर डच भाषेच्या वतीनेंच निकाल लागला व कमिशननें असा अभिप्राय दिला कीं, प्रजा या नात्यानें मुलांना योग्य शिक्षण म्हणजे ज्ञान कोणतें द्यावें हें ठरविण्याचा अधिकार आपला आहे असा जरी सरकारास हक्क सांगतां आला तरी आपल्या मुलांना कोणत्या भाषेच्या द्वारें शिक्षण मिळावें हें ठरविण्याचा हक्क सर्वस्वीं आईबापांनाच असला पाहिजे. सदर कमिशननें असाहि अभिप्राय दिला कीं, परभाषेच्या द्वारें शिक्षण देण्यानें कोणत्याहि विषयांत पूर्णता अशी येत नाहीं, व विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीवर विनाकारण दाब पडून वरती त्यांच्या बुद्धिमत्तेची मात्र हानि होते; म्हणून कोणत्याहि शाळेंत डचमधून शिकवावें किंवा इंग्रजींतून शिकवावें हें ठरविण्याचा अधिकार शाळाखात्याला बिलकुल असूं नये. हगेरीमध्यें हा वाद अशाच रीतीनें संपून तेथ कित्येक शाळांतून दोन दोन काय पण तीन तीन भाषांतूनहि शिक्षण देण्यांत येतें. दोन भाषांतून शिक्षण देणाऱ्या शाळा १६०० असून तीन भाषांतून शिक्षण देणाऱ्या शाळा कमींत कमी १०० आहेत. हिंदुस्थानासारख्या प्रचंड देशाचा नामनिर्देश एका शब्दानें होतो. एवढ्यामुळें सर्व देशांत एकच भाषा चालावी अशी भ्रामक कल्पना कित्येकांच्या डोक्यांत येते. पण हिंदुस्थानांतील एकेक पोटप्रांत एवढा मोठा आहे कीं, तो युरोपांतील दोन दोन तीन तीन स्वतंत्र देशांहूनहि मोठा भरूं शकेल ही वस्तुस्थिति मात्र त्यांच्या लक्षांत येत नाहीं. मुंबई इलाख्यांतील मराठी तर राहोच पण गुजराथी, कानडी वगैरे भाषा बोलणारांची संख्या एवढी मोठी आहे कीं, त्या प्रत्येकाकरितां एकेक स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढली तर हवी, असें असतां एकट्या मुंबई शहरांतील बकाली वस्तीच्या आग्रहामुळें त्यांच्या मातृभाषा दडपून टाकून त्यांना परकी भाषेंतून शिक्षणव्यवहार करावयास लावणें ही राष्ट्रीयदृष्ट्या जुलमाची परमावधि होय. हा भाषाविषयक प्रश्न वर सांगितलेल्या देशांतून स्वराज्याकांक्षेच्या जोरावरच सोडविण्यांत आला व त्याच आकांक्षेच्या जोरावर आपण तो येथेंहि सोडवूं, अशी उमेद आम्हाला खचित वाटते.

देशी भाषांतूनच परीक्षा घ्या*

एका वर्षांत मुंबई युनिव्हर्सिटीचे दोन पदवीदानसमारंभ अलीकडे होऊं लागले आहेत. या गोष्टीचे इतर फायदे काय होत असतील ते असोत; परंतु समारंभाचे अध्यक्ष म्हणजे चॅन्सेलर किंवा व्हाइस-चॅन्सेलर यांना शिक्षणसंबंधीं भाषण करण्याचा पूर्वी वर्षांतून एकच प्रसंग येत असे ते आतां दोन येऊं लागले आहेत हा एक फायदाच म्हणावयास हरकत नाहीं. गेल्या मंगळवारीं युनिव्हर्सिटीचा जो सहामाही पदवीदानसमारंभ झाला त्यांत सुदैवानें व्हाइस-चॅन्सेलर डॉ० मॅकिकन यांनीं एक अत्यंत महत्त्वाचा विषय चर्चेसाठीं घेतला होता. तो विषय म्हटला म्हणजे हायस्कुलांतून शिक्षण कोणत्या भाषेच्या द्वारें दिलें जावें हा होय. शाळांतून घोकंपट्टी बरीच होत असते या मुद्याला अनुलक्षून बोलतांना 'घोकंपट्टी टाळण्यास उपाय काय?' हा प्रश्न सहजच त्यांच्यापुढें आला! व त्याचें उत्तर देतांना त्यांना ही गोष्ट मुख्यतः कबूल करावी लागली कीं, घोकंपट्टी कांहीं अंशीं टाळावयाची तर विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावयाचें तें मातृभाषेंतूनच दिलें पाहिजे; एरवीं त्याना कोणत्याहि विषयांतील मूळ कल्पना व सिद्धांत नीट समजणार नाहींत. व हाच मुद्दा पुढें चालू करून ते म्हणालेः—"याकरितांच शिक्षणखात्यानें शहाणपणानें शिक्षणाच्या व परीक्षा घेण्याच्या कामीं मातृभाषांचा उपयोग करण्याला उत्तेजन दिलें आहे. परंतु या सवलतीचा फायदा बराचसा घेतला जात नाहीं; आणि अगदीं लहान मुलांनाहि कांहीं कांहीं विषय प्रारंभापासून परक्या भाषेच्या द्वारें शिकावे लागतात. परकी भाषा त्यांना समजत नाहीं व तिच्या द्वारें आपला अर्थ स्पष्ट करून कसा सांगावा हेंहि कळत नाहीं. याचा परिणाम असा होतो कीं, केवळ आपल्या स्मरणशक्तीवर भार टाकून त्यांना घोकंपट्टी करावी लागते; व लहानपणीं लागलेली ही संवय विद्यार्थ्यांच्या प्रौढदशेंतहि कायम राहते. माझें स्वतःचें तर असें मत आहे कीं, शिक्षणाचें द्वार या नात्यानें इंग्रजी भाषेचा आमच्या सर्व शाळांतून फाजील उपयोग केला जातो; व

* केसरी, तारीख २२ ऑगस्ट १९१६

त्याचा प्रारंभहि विद्यार्थ्यांच्या फार लहानपणापासून होतो. वरील गोष्टीनें इंग्रजी भाषेला यथाप्रमाण मदत होते, असें मात्र नाहीं; किंबहुना इंग्रजीचा उपयोग अधिक बेताचा पण यथायोग्य कालीं सुरूं केल्यास त्यापासूनच इंग्रजी भाषेचा अभ्यास व तिचें ज्ञान अधिक चांगलें होईल."

डॉ० मॅकिकन यांचे वरील उद्गार ऐकून कोणासहि समाधानच होईल. परंतु देशी भाषांस आपण असें उचलून धरलें तर पुढेंमागें सर्वस्वीं त्यांचें प्रस्थच बोकाळेल कीं काय, अशी चोरटी भीति वाटून त्यांनीं पुढें लगेच आपला हात थोडासा आंखडता घेतला व ते म्हणाले, "मीं वर जी मातृभाषांची तरफदारी केली आहे तिचा अर्थ असा मात्र घ्यावयाचा नाहीं, कीं युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेतील प्रश्नोत्तरांचे कागदहि विद्यार्थ्यांच्या मातृभाषेंतून लिहिण्याची परवानगी द्यावी. ही परवानगी द्यावी असें म्हणणारे फाजील उत्साही असे कित्येक लोक आहेत; परंतु त्यांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं, ही परीक्षा मातृभाषेच्या द्वारें घेऊं लागल्यास अतिशय गोंधळ होईल; एवढेंच नव्हे, तर ही त्यांची मागणी मान्य झाल्यास विद्यार्थ्यांचें भावी यशहि धोक्यांत सांपडेल. युनिव्हर्सिटींत परीक्षेकरितां हल्लीं एकच भाषा चालू आहे व पुढेहि ती एकच चालू ठेवली पाहिजे. अर्थात् इंग्रजी हीच ती भाषा होय. हायस्कुलांतच, म्हणजे युनिव्हर्सिटींत प्रवेश होण्यापूर्वीच, इंग्रजी भाषेच्या द्वारें विषय कसा शिकावा व मांडावा हें विद्यार्थ्यांस चांगलें येऊं लागलें पाहिजे. इंग्रजी भाषा या विषयावरील प्रश्नोत्तरें विद्यार्थ्यांस इंग्रजींतून देतां येतील असें मानलें, तर त्या भाषेंतून त्यास इतर विषयांवरील प्रश्नोत्तरेंहि देण्याइतकी इंग्रजी भाषेची ओळख त्याला झाली आहे असेंहि मानण्यास काय हरकत? उलट विषय मूळ देशी भाषेंत शिकल्यामुळें त्यांची समजूत त्याला अधिक झालेली असणार, व यामुळें इंग्रजी भाषेंतून त्यांची मांडणीहि अधिक चांगली करतां येईल."

डॉ० मॅकिकन यांना प्रस्तुत भाषणांत देशी भाषांची तरफदारी करण्याची इच्छा कां झाली याचें नक्की कारण आम्हास सांगतां येत नाहीं. पण ज्या फाजील उत्साही मातृभाषाभक्तांचा डॉ०साहेबांनीं निषेध केल्याचें वर सांगितलें आहे त्यांनीं या बाबतींत डॉ० साहेबांस लिहिलेलें पत्र

कदाचित् कारणीभूत झालें असावें. या फाजील उत्साही मातृभाषाभक्तांचें नांव 'शिक्षाविचारमंडळ' असें असून त्यानें शिक्षणासंबंधीं हातीं घेतलेल्या अनेक विषयांपैकीं मातृभाषेच्या द्वारें शिक्षण देणें हा एक आहे. सदरहु मंडळ पुणें येथें अलीकडे नुकतेंच स्थापन करण्यांत आलेलें असून त्यामध्यें केवळ शिक्षण हाच ज्यांचा व्यवसाय असे पुण्यांतील अनेक गृहस्थ आहेत. सदर मंडळाचे अध्यक्ष प्रोफेसर नाईक यांनीं नुकतेंच एक जाहीर पत्र बऱ्याच देशी व विदेशी पुढाऱ्यांना पाठविलें असून मातृभाषेच्या प्रश्नासंबंधानें अभिप्राय जमविण्याचें त्यांचें काम सुरू आहे. याच जाहीरपत्राची एक प्रत डॉ० मॅकिकन यांजकडे गेली होती, व पदवीदानसमारंभाच्या वेळच्या आपल्या भाषणांत मातृभाषेच्या विषयाचा उल्लेख त्यांना त्यावरूनच सुचला असण्याचा संभव आहे.तसें असेल तर 'शिक्षाविचारमडळा'ला सुदैवानें आपल्या मोहिमेच्या पहिल्या तोंडींच सामन्याला महारथी भेटला म्हणावयाचा ! असो. डॉ० मॅकिकन यांना भाषणविषयाची सूचना कशानेंहि होवो, त्यांच्या भाषणांतील वर दर्शविल्याप्रमाणें निम्मा भाग मातृभाषांना अनुकूल असाच आहे व याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. पण अशा प्रकारची अनुकूलता अशा लोकांकडून आजच प्रथम मिळाली आहे असें नाहीं. मातृभाषांवर बहिष्कार घालण्याचा पहिला कठीण काळ निघून जाऊन बरेच दिवस झाले. वर युनिव्हर्सिटींत व खालीं हायस्कुलांत अर्थात् निरनिराळ्या प्रकारानें का होईना; मातृभाषेचा परामर्ष घेण्याची चळवळ होऊन लोकमताचा विजय झाला; आणि युनिव्हर्सिटींत एम्. ए. च्या परीक्षेस देशी भाषा या विषयाची निदान ऐच्छिक म्हणून तरी गणना करण्यांत आली, व तसेंच खालीं हायस्कुलांतून देशी भाषांतून शिक्षण द्यावें व परीक्षाहि घेण्यास परवानगी असावी असा सरकारनें कांहीं दिवसांपूर्वी हुकूम सोडला. पण दिसण्यांत जरी या गोष्टींनीं मातृभाषेच्या मार्गातील अडचण नाहींशी झाल्यासारखी दिसली, तरी वस्तुतः ती नाहींशी झाली नाहीं. कारण बाले-किल्ला सर झाला नाहीं तोंपर्यंत किल्लयाचा इतर भाग सर करण्यापासून फारसा लाभ होत नाहीं. तोच न्याय प्रस्तुत प्रकरणींहि लागू पडल्याचें दिसून येतें.

हायस्कुलांतील शिक्षण पूर्ण झाल्याचा दाखला मिळण्यास किंवा युनि-

व्हर्सिटींत म्हणजे कॉलेजांतील शिक्षण सुरू होण्यास मॅट्रिक्युलेशन परीक्षा हेंच काय तें एक द्वार आहे; व ही परीक्षा जोंपर्यंत केवळ इंग्रजी भाषेंतून घेतली जाते तोंपर्यंत खालीं हायस्कूलांत देशी भाषांच्या द्वारें शिक्षण देण्याची परवानगी सरकारी हुकमानेंहि दिली गेली तरी ती बहुशः फुकट जाते असा अनुभव आजवर आलेला आहे. कांहीं कांहीं शिक्षणसंस्थांनीं शाळाखात्याकडून ही वट-परवानगी मिळण्यापूर्वीच आपापल्यापुरती खास-परवानगी काढून मातृभाषांच्या द्वारें शिक्षण देण्याचा प्रयोग करून पाहाण्यास सुरवात केली होती. व त्या प्रयोगानें एक गोष्ट निर्विवादपणें सिद्ध झाली कीं, विद्यार्थ्यांच्या जन्मभाषेच्या द्वारानें शिक्षण दिल्यास त्याला विषय चांगला समजतो, शिकण्या-शिकविण्याचा त्रास पडत नाहीं, व पुष्कळ वेळ लागण्याऐवजीं थोड्या वेळांत काम भागतें. पण हा प्रयोग सिद्ध झाला तरी देशी भाषांचा सर्रास उपयोग करण्याची त्यांची इच्छा मात्र पूर्णपणें तडीस गेली नाहीं. क्षणभर असाहि चमत्कार दृष्टीस पडूं लागला कीं, शाळाखात्यानें दिलेल्या परवानगीचा पुरा फायदा घ्यावयास लोक तितके तयार नाहींत! लोकांची या बाबतींत पुरी तयारी नसणें ही गोष्ट सर्वस्वी खोटीच होती असें नाहीं. कारण मातृभाषेंतून शिक्षण देण्याचे वर्ग व इंग्रजीच्या द्वारें शिकण्याचे वर्ग निरनिराळे असत; व विद्यार्थी वा‌य किंवा पालक काय, त्यांची धाव पहिल्या वर्गाकडे जावी तशी न जातां दुसऱ्या वर्गाकडे जाई. पण या तऱ्हेवाईकपणाचें खरें मर्म काय याचा उमज प्रथम कोणासच झाला नाहीं. वास्तविक आपल्या मुलास कोणत्याहि विषयाचें ज्ञान मिळावयाचें तर तें थोड्या वेळांत बिन त्रासानें व चांगलें मिळावें असें कोणास वाटणार नाहीं? व या तीनहि दृष्टींनीं परकीय भाषेपेक्षां देशी भाषांचें द्वारच अधिक श्रेयस्कर ही साधी गोष्ट न समजण्याइतके ते जडबुद्धि किंवा परंपरेचे अंधभक्त होते असें नाहीं. तर खरी गोष्ट ही होती कीं, विद्यार्थी व त्यांचे पालक ह्यांची भिस्त मॅट्रिक्युलेशनवर व तेथें तर देशी भाषेला मज्जाव आणि सर्व परीक्षा इंग्रजी भाषेच्या द्वारेंच दिली पाहिजे! अर्थात् ज्या ध्येयाकरितां हायस्कुलांतील शिक्षण मिळवावयाचें तेंच जर सर्व इंग्रजी भाषेंत नटलेलें व गुरफटलेलें असलें, तर हायस्कुलांत देशी भाषेला कोण विचारणार!

'मॅट्रिक्युलेशन परीक्षा इंग्रजींत वास्तविक घेऊं नये; पण ती घेतली गेली म्हणून तरी खालच्या इयत्तांतील शिक्षण जर आयतें देशी भाषांतून मिळतें तर तें कां घेऊं नये ! व परीक्षा देतां येतात तर त्या कां देऊं नयेत ?' हें लोकांस आजहि उमजलें व पटलें तर बरेंच. पण एका दृष्टीनें पाहातां लोकांचेंहि म्हणणें बरोबर आहे. युनिव्हर्सिटीच्या अधिकाऱ्यांनीं तरी मॅट्रिक्युलेशची परीक्षा देशी भाषांतून कां घेऊं नये ? हायस्कुलांतील परीक्षा जर देशी भाषेंतून घेतलेल्या चालतात तर मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेनेंच काय केलें ? जी विचारसरणी खालच्या परीक्षांस तीच तंतोतंत याहि परीक्षेस लागू होण्यासारखी आहे. हेंचसें काय, पण पुढें कॉलेजांतील परीक्षांनाहि हीच विचारसरणी कां लागूं करूं नये हाहि प्रश्न विचारार्ह आहे; पण तो व्यापक असल्यामुळें आज त्याचा विचार आम्ही करीत नाहीं, तो तसाच सोडून देतों. तथापि मॅट्रिक्युलेशनपुरती तरी ती विचारसरणीआज एकदम लावण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. मुंबई युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेला दरवर्षी सुमारें तीन चार हजार विद्यार्थी बसतात व त्यांतील हजाराच्या आंतबाहेर पास होऊन त्याहीपेक्षां थोडे विद्यार्थी वर कॉलेजांत जातात. या विद्यार्थ्यांपैकीं शेंकडा फार तर पांच चार विद्यार्थ्यांची जन्मभाषा इंग्रजी असेल पण तेवढ्याकरितां बाकीच्या ९०।९५ वर इंग्रजीच्या द्वारेंच परीक्षा देण्याची सक्ति कां व्हावी हें कळणें कठीण आहे. डॉ॰ मॅकिकन यांनीं हा मुख्य प्रश्न सोडून कांहीं किरकोळ अडचणीच पुढें आणल्या. मॅट्रिक्युलेशन परीक्षा देशी भाषांतून घेतली तर गोंधळ व घोटाळा उडेल असें ते म्हणतात. आम्हाला मुळींच तसें वाटत नाहीं. फार फार तर देशी भाषा म्हणजे मराठी, गुजराथी व कानडी या तीनच होत; व या तीन भाषा जाणणारे परीक्षक युनिव्हर्सिटीला मिळणार नाहींत हें मुळींच संभवनीय नाहीं. खर्च वाढल्यास विद्यार्थ्यांमागें रुपया दोन रुपये वाटले तर जास्त घ्यावे. पण मुख्य मुद्याच्या महत्त्वाच्या मानानें हा खर्च म्हणजे कांहींच नाहीं. निरनिराळ्या भाषेंत प्रश्नोत्तरें देण्याची परवानगी दिल्यास परीक्षक निरनिराळे होऊन बक्षिसें व स्कॉलर्शिपा कोणास द्याव्या हें ठरविण्याला तारतम्यभावाचें माप एकच राहणार नाहीं, अशीहि एक अडचण कोणी पुढें आणतील. पण तिच्यांतहि कांहीं अर्थ नाहीं; कारण भाषा बदलली तरी उत्तरांतील मजकूर

चदलेल असें नाहीं. शिवाय एकाच भाषेंत, म्हणजे इंग्रजींतच, आज प्रश्नोत्तरें दिलीं जातात तेव्हां झालें तरी एकच परीक्षक सर्व कागद स्वतः तपासतो असें नाहीं. अर्थात् आजहि तारतम्याचें धोरण एकाच मापानें आंखलें जाऊं शकत नाहीं. असें असतांहि बक्षिस व स्कालर्शिप शेवटीं कोणास द्यावी हें निश्चित करण्यास कांहीं मार्ग सांपडतोच, राहत नाहीं; व आजहि जी गोष्ट होते तीच उद्यां निरनिराळ्या भाषांतून उत्तरें देण्याची परवानगी दिल्यासहि घडून येईल. तात्पर्य, इच्छा असेल तर मार्गाहि सांपडेल; पण ही इच्छा होणें युनिव्हर्सिटीच्या अधिकाऱ्यांना कसें भाग पाडावें हीच काय ती मुख्य अडचण आहे. आतां ही गोष्ट आम्ही जाणून आहों कीं, मातृभाषेचा प्रवेश अभ्यासांत किंवा परीक्षेंत होण्यास आमच्यापैकीं कित्येक लोक अद्यापि अज्ञानामुळें प्रतिकूल आहेत; व कित्येक पार्शी वगैरे लोक मातृभाषेचा अभिमान नसल्यामुळें प्रतिकूल आहेत. अर्थात् अशा लोकांची समजूत घालणें हेंच 'शिक्षाविचारमंडळा'सारख्या लोकांचें पहिलें कर्तव्य आहे. तें त्यांनीं झटून केल्यास युनिव्हर्सिटीच्या सेनेट-सभेंतील हिंदु, मुसलमान व पार्शी इतके सर्व एका बाजूस येतील; व तसें झाल्यास युरोपियन सभासदहि आपला विरोध सोडून देतील किंवा मग त्यांनीं तो न सोडला तरीहि अडणार नाहीं. कारण, युरोपियन सभासद वजनदार असले तरी सुदैवानें बहुमत तरी त्यांचें नाहीं. मातृभाषेंतून परीक्षा होण्यासंबंधानें आणखीहि थोडेंसें विवेचन आम्हास करावयाचें आहे; पण त्यास आज स्थलावकाश नाहीं.

युनिव्हर्सिट्या व देशी भाषा*

मुंबई युनिव्हर्सिटीच्या गेल्या पदवीदानसमारंभाच्या वेळीं व्हाइस चान्सेलर डॉ० मॅकिकन यांनीं देशी भाषांतून शिक्षण देण्याच्या सुधारणेस अनुकूल असे उद्गार काढले होते हे 'केसरी'च्या वाचकांस स्मरत असेलच. कलकत्ता युनिव्हर्सिटीचा पदवीदानसमारंभ दोन आठवड्यांपूर्वी झाला, त्याहि प्रसंगीं व्हाइस चान्सेलर डॉ० सर्वाधिकारी यांनीं अशाच प्रकारचे उद्गार काढले. हिंदी विश्वविद्यालयाच्या अत्युच्च पीठांवरून देशी भाषांचा अशा रीतीनें पुरस्कार होऊं लागला आहे त्याअर्थी या भाषांच्या दैन्यांचे दिवस संपून नशीब उघडण्याची वेळ आतां जवळ येत चालली असें मानण्यास फारशी हरकत नाहीं. 'देशी भाषांतून शिक्षण देणें आज सोईचें नाहीं, कारण त्या भाषा जितक्या ग्रंथसमृद्ध असाव्या तितक्या अद्याप झाल्या नाहींत,' ही एक मुख्य तक्रार असते;व दुसरी तक्रार अशी असते कीं,'शिक्षणाच्या कामीं देशी भाषांचा विशेष उपयोग होऊं लागल्यास विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषेशीं परिचय त्या प्रमाणानें कमी होत जाऊन, त्यांचें इंग्रजी भाषेचें ज्ञान जें आधींच कमकुवत असतें तें आणखीहि कमकुवत होईल.' डॉ० सर्वाधिकारी यांनीं आपल्या भाषणांत या दोनहि आक्षेपांना योग्य उत्तर दिलें आहे. बंगाली भाषेसंबंधानें त्यांनीं असें सांगितलें कीं, चॉसर किंवा बीड या जुन्या इंग्रजी ग्रंथकारांच्या वेळेच्या पूर्वीच इकडे बंगाली वाङ्मयानें स्वदेश समृद्ध करून आपल्या संपत्तीचा फायदा दुसऱ्या देशांना देण्यास सुरवात केली होती; हल्लींहि मोठमोठे विद्वान् लोक बंगाली वाङ्मयाचें कौतुकच करतात; व कोणत्याहि विषयावरील सशोधनात्मक चर्चेस बंगाली भाषा पुरी पडत असल्याचा अनुभव येत आहे. बंगाल्यांतच काय पण कोणत्याहि सजीव राष्ट्रांत अशीच गोष्ट असणार. जपानमध्यें शास्त्रीय अभ्यास व शास्त्रीय संशोधन हीं झपाट्यानें चालू आहेत आणि एका दृष्टीनें जपान हा इंग्रजी राष्ट्राचा पूर्ण पक्षपातीहि आहे. पण इंग्रजी भाषा अधिक समृद्ध म्हणून जपानानें कांहीं तिचें दास्य पतकरलेलें नाहीं, तर बऱ्या वाईट रीतीनें स्वदेशी भाषेवरच निर्वाह करून घेतला आहे.

---

* केसरी, तारीख २३ जानेवारी १९१७

मुंबई विद्याखात्याचे माजी डायरेक्टर मि० शार्प यांनीं जपानच्या शिक्षणपद्धतीसंबंधानें जो एक ग्रंथ लिहिलेला आहे त्यांत त्यांनीं खालील आशयाचे उद्गार काढलेले आहेत. "पन्नास वर्षांपूर्वी पाश्चात्य शिक्षणाच्या भोक्त्यांना वरच्या वर्गास इंग्रजी शिक्षण मिळालें म्हणजे तेंच हळुहळू झिरपत खालच्या लोकांपर्यंत जाईल असें वाटत होतें. ही आशा जी हिंदुस्थानांत फारशी सफळ झाली नाहीं ती जपानांत मात्र पुष्कळशी सफळ झाली. त्याचें कारण जनतेला जें शिक्षण मिळालें तें सर्व देशी भाषेतून, हें होय. जपानी भाषा ही शिक्षणविषयक व्याख्यानांना निरुपयोगी ठरेल असें कित्येक जपानी लोकांनाहि वाटत होतें; पण फुकुसावा वगैरे प्रसिद्ध प्रोफेसरांनीं ही समजूत चुकीची असल्याचें स्वतःच्या उदाहरणानें सिद्ध करून दिलें, आणि मुलांचें शिक्षण जपानी भाषेंतून झाल्यास तें परभाषेपेक्षां निम्या किंवा तिजाई वेळांत होतें असें अनुभवास आल्यामुळें परदेशी मिशनरी लोकांनाहि आपल्या शाळांतून स्वभाषा वर्ज करून जपानींतूनच शिक्षण द्यावें लागलें."

भाषेची अडचण असली तरी ती मनुष्याच्या इच्छेपुढें कितीशी टिकणार? धन्यानें म्हणजे मनुष्याच्या इच्छेनें सांगितलेलें काम भाषेला एखाद्या आज्ञाधारक दासीप्रमाणें केलेंच पाहिजे. करून करूनच तिच्या कामाला सौष्ठव व सौकर्य येत असतें. नवीन शब्द हाताशीं तयार नसल्यामुळें प्रथम थोडी अडचण वाटणें स्वाभाविक आहे. पण थोड्याशा प्रयत्नानें ही अडचण दूर होते; व ती सर्वस्वीं दूर नच झाल्यास फार तर जरूरीपुरते परभाषेंतील शब्द घेतल्यानें काम भागतें. एखाद्या रोगावर हटकून गुणकारी असें स्वदेशी औषध न मिळाल्यास आपण परदेशी औषध घेऊन गरज भागवितों. औषध स्वदेशी नाहीं म्हणून अडून बसून प्रकृति बिघडवून घेत नाहीं. 'पण औषध परदेशी घ्यावयाचेंच तर मग आधीं धर्मांतर करून बाटतहि कां नाहीं? कारण तुम्हांस परदेशी औषध घ्यावयाचें आहे.' असें जर कोणी सांगूं लागला तर तें जितकें हास्यास्पद होईल तितकेंच, गरजेखातर एखादा शब्द परदेशी घ्यावा लागला किंवा परभाषेंतील पुस्तकें वाचावीं लागलीं तर तेवढ्यामुळें सर्व शिक्षणव्यवहारच अजीबात परभाषेंतून करा हें सांगणेंहि हास्यास्पद होईल. आज असे पुष्कळ विषय आहेत कीं,

ज्यांचा अभ्यास इतर युरोपियन भाषांतूनच विशेष झालेला असून त्यावर इंग्रजी भाषेंत फारसे ग्रंथ नाहींत. हे विषय शिकण्याचा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे इंग्रज विद्यार्थ्यांनीं त्या त्या देशांतील विद्यापीठांत राहून अभ्यास करणें हाच होय. पण तें शक्य नसल्यानें इंग्लंडांतील विद्यालयांतच जर त्यांचा अभ्यास करावयाचा झाला तर, त्या त्या परकी भाषेंतून शिक्षण न देतां इंग्रजी भाषेंतूनच शिक्षण देण्यांत येतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हिंदुस्थानासहि हाच न्याय लागूं व्हावा एवढेंच देशी भाषांच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे.

इंग्रजी भाषेच्या कोत्या ज्ञानासंबंधाच्या आक्षेपाला डॉ० सर्वाधिकारी यांनीं जें उत्तर दिलें तें समर्पक तर आहेच, पण कित्येकांस तें विरोधाभासात्मकहि वाटण्याचा संभव आहे. ते म्हणतात, 'देशी भाषांच्या द्वारें शिक्षण दिल्यानें इंग्रजीचें ज्ञान कच्चें राहील हें खरें नसून उलट आज विद्यार्थ्यांचें इंग्रजीचें ज्ञान कच्चें आढळतें; त्याचें कारण बहुतेक शिक्षण परदेशी भाषेच्या द्वारें होतें हेंच होय.' आधीं एक तर केवळ इंग्रजी भाषेच्या ज्ञानाला फार फाजील महत्त्व देण्यांत येतें. इंग्रजी ही ज्यांची मातृभाषा ते लोक ती भाषा जितकी चांगली बोलतात तितकीच ती विजातीय लोकांनाहि चांगली बोलतां आली पाहिजे असा आग्रह कोणीं काय म्हणून धरावा ? भाषा आणि केवळ विषयज्ञान या दोन गोष्टी अगदीं वेगवेगळ्या व स्वतंत्र आहेत. डॉ० जॉर्ज अॅडॅम् स्मिथ यांनीं असें स्पष्ट मत दिलें आहे कीं, ऑक्सफर्ड, केंब्रिज वगैरे इंग्रजी युनिव्हर्सिट्या किंवा एडिंबरो वगैरे स्कॉटिश युनिव्हर्सिट्या यांच्यांतील विद्यार्थ्यांशीं, केवळ बुद्धिसंपत्तीच्या दृष्टीनेंच तुलना करूं गेल्यास, हिंदी विद्यार्थी कांहीं कमी भरणार नाहींत. अर्थात् हिंदी विद्यार्थ्यांचा कमकुवतपणा असेल तर तो विषयज्ञानाच्या भरण्यांतच मुख्यतः असतो; पण त्याचें कारण मात्र ते विषय त्याला स्वदेशी भाषेंतून शिकतां येत नाहींत, परदेशी भाषेंतून शिकावे लागतात हेंच होय. म्हणून देशी भाषांतून शिक्षण देण्यास सुरुवात केल्यानें शिक्षणाचें कार्य शंभर वर्षें मागें ढकलल्यासारखें होईल असें जें कित्येकांना भय वाटतें तें खरें नसून उलट तें पुढेंच ढकलल्यासारखें होईल.

भाषा हा केवळ विचारांचा पोषाख होय. आचारांतील काय किंवा

विचारांतील काय, पोषाख हा किती मर्यादेपर्यंत परकी स्वीकारावा हें समंजस मनुष्यास सांगणें लागत नाहीं. परकी पोषाखाच्या या निषेधाला "आम्हीं आज आमचा जुना पोषाख तरी सर्वस्वीं कोठें ठेवला आहे ?" हें कांहीं उत्तर होऊं शकत नाहीं. कोणत्याही देशांत कालानुरोधानें नवीन नवीन प्रकार पाहून जुन्या पोषाखांत हळुहळू फरक पडत जाणारच. पण उदाहरणार्थ, आमचा आंगरखा जाऊन लॉंग कोट त्याचे जागीं आला, एवढ्याकरितां मुद्दाम रुमाल किंवा पागोटेंहि टाकून साहेबी टोपीच कां घालीत नाहीं ? असें कांहीं कोणीहि समंजस मनुष्य विचारीत नाहीं. हिंदी विचारांच्या पोषाखांतहि इंग्रजीच्या अनुकरणानें बराच फरक पडलेला आहे. केवळ कल्पनाच इंग्रजी नव्हेत तर भाषेची रचना, ठेवण, मांडणी हींसुद्धां थोडींशीं इंग्रजीच्या वळणावर गेला आहेत व जात आहेत हें आम्हास कबूल आहे. पण तेवढ्यामुळें देशी भाषा अजीबात टाकून व्यवहाराला इंग्रजी भाषाच घ्या असें कोणास कसें म्हणतां येईल ? बचनागाचीं झाडें जेथें पुष्कळशीं आहेत अशा रानांत वस्ती करावी लागल्यास नित्य पिण्याच्या पाण्याबरोबर बचनागाचा थोडथोडा अंश पोटांत गेल्याशिवाय राहणार नाहीं हें खरें. पण हें कारण देऊन भात-भाकरीच्या ऐवजीं नित्य बचनागाची पूडच कां खात नाहीं असें कोणीं विचारलें तर शोभेल काय ? मनुष्याची प्रकृति प्रसंगोपात्त विषहि पचनीं पाडूं शकते. पण विषापासून मृत्यु न येतां तें केवळ पचनीं पडण्यास त्याचें सेवन फारच स्वल्पांशानें व्हावें लागतें ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं.

पण इंग्रजीच्या फाजील भोक्त्यांना देशी भाषांकडे पाहाण्याची ही दृष्टीच नाहीं त्याला त्यांनीं काय करावें ? हे लोक हिंदी मुलांचें प्राथमिक शिक्षण पहिलीं तीन चार वर्षें देशी भाषांतून व्हावें एवढी तरी सवलत मेहेरबानगी करून देतात. पण नोएल्स म्हणून एक इतके परोपकारी इंग्रज गृहस्थ आढळण्यांत आले आहेत कीं, त्यांनीं शिक्षणांतून हिंदी लिपीच्या लिपी वर्ज करून टाकावी व प्राथमिक शिक्षण देखें तेंच मुळीं रोमन म्हणजे इंग्रजी मुळाक्षरांच्या द्वारें देण्यास सुरुवात करावी असें टाइम्स ऑफ इंडियांतून अनेक वेळां प्रतिपादिलेलें आमच्या वाचण्यांत आलें आहे. हिंदी लोकांच्या कल्याणाची कोण ही घाई ! परोपकारित्वाचा कोण हा

उतावळेपणा ! इंग्रज लोक हिंदुस्थानांत आम्हांस सुधारणेचें शिक्षण देण्याकरितां गुरु म्हणूनच अवतरले तेव्हां "आपणासारिखे करिती तात्काळ, नाहीं काळ वेळ तयालागीं" या सद्गुरुलक्षणाचा अंगिकार त्यांनीं केल्यास काय नवल ? पण असल्या सद्गुरूंच्या उपदेशाला यश येण्याला दुर्दैवानें शिष्यहि तसाच उतावळा व वैराग्यसंपन्न असावा लागतो. पण आम्ही हिंदी लोक तशा प्रकारचे शिष्य नाहीं. फार काय, पण या गुरूचें शिक्षणहि आम्ही डोळे मिटून स्वीकारावयास तयार नाहीं. इंग्रजांच्या शिकवणींत आम्हांस जें चांगलेंसें दिसेल तें आम्ही घेणार नाहीं असें नाहीं; पण तें आम्ही इंग्रजांच्या सोयीनें न घेतां आमच्या सोईनें घेऊं ही गोष्ट आमच्या परोपकारी गुरूंनीं जितकी लक्षांत ठेवावयास पाहिजे तितकी त्यांनीं लक्षांत ठेवलेली दिसत नाहीं. चांगलें किंवा अनुकरणीय खरें; पण तें रूपानें, पोषाखपेहरावानें, व शक्य तितकें गुणानेंहि आम्हांस आमचें असें वाटूं शकेल तरच, व तेंहि त्यावर आमचा शिक्का मारूनच आम्ही घेऊं. विजातीय आचारविचार प्रकृतीस मानवण्यास व गुणकारी होण्यास ते हिंदी राष्ट्रीय जठराच्या द्वारें पिचून, पचून व आमच्या पिंडासारखे बनून राष्ट्रीय शरीरांत मिसळले पाहिजेत. नाहीं तर कांच किंवा हिरा सुंदर दिसला म्हणून खाल्ला तर तो शरीराचें तेज न वाढवितां उलट आंतडीं कापूनच बाहेर पडणार. एखादें रसायन वीर्यवान् म्हणून कच्चें खाल्लें तर तें अंगावर फुटल्याशिवाय राहत नाहीं. तसेंच इंग्रजी वाङ्मयांतील कांहीं विचारांच्या हव्यासामुळें आपण अधीर होऊन स्वभाषा टाकून परभाषेचा जर सर्वस्वीं अंगिकार केला तर राष्ट्राच्या सर्व संस्कृतीच्या परंपरेचाच समूळ उच्छेद होतो ही गोष्ट इंग्रजी भाषेचा फाजील पक्षपात करणारे लोक अगदींच विसरून जातात.

सुदैवानें परभाषेच्या समर्थनाचा हा अतिरेक फक्त कांहीं मायेफिरू किंवा वेड्या व्यक्तींपुरताच असतो; व वर दर्शविल्याप्रमाणें आमच्या युनिव्हर्सिटयांचे देशी व विदेशी व्हाइस-चॉन्सेलरहि आतां देशी भाषांचें समर्थन करूं लागले आहेत. पण देशी-विदेशी भाषांच्या या युद्धांत निकराच्या हल्ल्याचें व निकराच्या बचावाचें जें एक ठिकाण आहे तेथपर्यंत अद्यापि मजल पोंचावयाची आहे. हें ठिकाण म्हणजे केवळ शिक्षणच नव्हे तर परीक्षाहि देशी भाषांतून घेतल्या जाव्या हा सिद्धांत

होय. डॉ० मॅकिकन यांनीं ही मारामार या ठिकाणापर्यंत केव्हां तरी जाऊन पोंचणार असें चाणाक्षपणानें हेरून, 'शिक्षण देशी भाषांतून दिलें तरी परीक्षा मात्र इंग्रजींतूनच घेतल्या जाव्या,' असें आपल्या भाषणांत प्रतिपादन करून ठेवलें आहे, हें वाचकांस आठवत असेलच. पण ही अट वास्तविक अव्यवहार्य आहे. परीक्षा जोंपर्यंत देशी भाषांतून घेतल्या जाणार नाहींत तोंपर्यंत देशी भाषांतून दिलेल्या शिक्षणाचा पुरा फायदा आमच्या पदरांत केव्हांहि पडणार नाहीं. शिक्षण व अभ्यास यांचें पर्यवसान जोंपर्यंत परीक्षांच्या द्वारेंच व्हावयाचें आहे,तोंपर्यंत अभ्यासापेक्षां व शिक्षणापेक्षां परीक्षांनाच विद्यार्थ्यांनीं अधिक महत्त्व दिल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. पण या तारतम्यभावाचा प्रत्यक्ष परिणाम एकदम असा होतो कीं, देशी भाषेंतून शिक्षण मिळण्याची सोय असली तरी ती टाकून देऊन इंग्रजी भाषेंतून मिळणाऱ्या शिक्षणाच्या सोयीचाच ते एकांगी फायदा घेऊं इच्छितात. उघडच आहे, ज्या गांवाला जावयाचें नाहीं त्याची वाट कोण पुसणार ? बरें, शिक्षण देशी भाषेंतून द्यावयाचें पण परीक्षा मात्र इंग्रजींतूनच घ्यावयाची हा आग्रह तरी विपरीतच नव्हे काय ? पचायला चांगली व रुचीला स्वादिष्ट म्हणून खीर केली, पण ती वाडग्यांत न देतां ताटांत ओतली आणि चमचाहि न देतां विलायती त्रिशूळी कांट्यानें खावी असा आग्रह धरला तर ती पोटांत कशी जाणार ? कांट्यानेंच खावयाचें तर जाडाभरडा पावाचा तुकडा तरी बरा. सारांश, शिक्षणक्रमाचें मैदान देशी भाषांना मोकळें सोडलें तरी चालेल, पण परीक्षेची खिंड तेवढी इंग्रजी भाषेच्या हातीं राहिली पाहिजे, असा ज्या कारणाकरितां परभाषाभिमान्यांचा आग्रह त्याच कारणाकरितां उलट देशी भाषाभिमान्यांचा आग्रहहि देशी भाषांतूनच परीक्षा व्हाव्या असा असणार. ज्याच्या हातीं खिंड किंवा किल्ला त्याच्याच हातीं केव्हांहि भोंवतालचें सर्व मैदान राहणार हें उघड आहे.

मॅट्रिक्युलेशनची परीक्षा इंग्रजींतूनच घेतली जावी असा आग्रह धरणारांचा हेतु पुढें कॉलेजांतील सर्व शिक्षणक्रमहि इंग्रजींतूनच निरंतर व्हवा असा असतो हें उघड आहे. पण देशी व विदेशी भाषांचा खरोखरच जर विरोध आहे असें मानलें तर तो हायस्कूलच्या शिक्षणापर्यंतच आहे. अशी तरी कोणीं आपली समजूत काय म्हणून करून घ्यावयाची ? कॉलेजांतील

शिक्षण झालें तरी तें देशी भाषांतून देणें अशक्य कां मानलें जावें ? पण कोणी तसें मानिनात का ? तळमजला पडला म्हणजे त्याच्या वरचा मजला जसा न पाडतां आपोआप पडतो तशीच भाषा व शिक्षण यांची स्थिति आहे. वरिष्ठ शिक्षणांत प्रवेशच देशी भाषांच्या द्वारें झाला म्हणजे वरिष्ठ शिक्षणहि देशी भाषांच्याच द्वारें दिलें जावें हें आपोआपच स्वाभाविकसें दिसूं लागतें. तसेंच सर्व वरिष्ठ शिक्षण देशी भाषांतून द्यावयाचें तर मग युनिव्हर्सिटीच्या युनिव्हर्सिटीच देशभाषामय होण्यास काय हरकत ? ही गोष्ट कोणी आज उच्चारण्याची देखील सोय नाहीं, कारण या विचार-सरणीला एकदम जहाल हेंच काय पण अराजक असें सुद्धां नांव मिळा-वयाचें ! पण वरील नांवांनीं डागलेल्या कित्येक इतर सत्य सिद्धांतांप्रमाणें हा सिद्धांतहि पुढें मागें व्यवहार्य ठरल्याशिवाय राहणार नाहीं असा आम्हास तरी भरंवसा आहे. इंग्रजीचें महत्त्व विशेष म्हणून अभ्यास-क्रमांत त्याला इतरांच्या मानानें वाटेल तर थोडें अधिक महत्त्व द्या; पण महाराष्ट्रांतील युनिव्हर्सिटी मराठी, बंगाल्यांतली बंगाली, हिंदुस्थानांतील हिंदी, गुजराथेंतील गुजराथी, कर्नाटकांतील कानडी, आंध्रांतील तेलगू व दक्षिणहिंदुस्थानांतील तामीळ हवी; असें म्हणण्यांत कांहीं अपराध घडतो किंवा पाप होतें असें आम्हास वाटत नाहीं. जे आज मॅट्रिक्युलेशनची परीक्षा सुद्धां देशी भाषांतून होऊं नये असा आग्रह धरतात त्यांच्या गळ्यांतून सर्व युनिव्हर्सिटीच देशभाषामय व्हावी हा घांस सुखानें खालीं कसा उतरणार? पण त्यांच्या गळ्यांतून तो उतरो वा न उतरो, आमच्या तरी गळ्यांतून तो खालीं सुखानें उतरूं शकतो. लॉर्ड सिडेनहॅम यांनीं पौर्वात्य देशांकरितां ज्या प्रांजल विचारसरणीची 'स्पेशल' शिफारस केली आहे तिचाच आश्रय करून आम्हीहि असें म्हणतों कीं, "हा घांस इंग्रजांच्या गळ्यांतून न उतरला तरी आम्हाला चालेल. आमच्या लोकांच्या गळ्यांतून उतरला म्हणजे पुरे. कारण हिंदी युनिव्हर्सिटींत विद्यामृत प्राशन केल्यानें आमच्या राष्ट्राचें पोट भरावयाचें आहे, इंग्रजी राष्ट्राचें नव्हे. मग वरिष्ठ शिक्षण झालें तरी तें देशी भाषेंतून आम्हांला मिळावें असें म्हणण्यास चोरी किंवा भीड कां ?" इंग्रज लोकांची कल्पनाशक्ति फार आकुंचित असते हें खुद्द चिरोलसाहेबांनींहि कबूल केलेलें आहे. केवळ त्या दोषामुळेंच, हिंदुस्थानांत

भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापल्या जातील या भावी गोष्टीचा उजेड त्यांच्या डोक्यांत अद्यापि पडत नाहीं. पण उज्ज्वल कल्पनाशक्तीची त्यांची वाण आपण हिंदी लोक आपल्या स्पष्टोक्तीनें भरून काढूं या म्हणजे झालें. उज्ज्वल कल्पनेचा उपयोग कोणतीहि गोष्ट कोणीं सांगितल्याशिवाय आपोआप समजणें हा असतो. पण स्पष्टपणें वरचेवर सांगितलेली गोष्टहि न समजण्याइतके कांहीं मंदबुद्धि इंग्रज लोक खास नाहींत!

सक्तीचें शिक्षण व त्याचा खर्च*

ना. गोखले यांनीं वरिष्ठ कायदेकौन्सिलापुढें सक्तीच्या शिक्षणासंबंधानें जें बिल आणलें आहे तें सरकारमार्फत बहुतेक म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांच्याकडे अभिप्रायासाठीं पाठविण्यांत आलें होतें; आणि गेल्या महिना अखेर त्यांपैकीं बऱ्याच संस्थांकडून सदर बिलास अनुकूल असे अभिप्राय लिहून गेल्याचें समजतें. शाळेंत जाण्याचें ज्यांचें वय आहे अशा खेड्यापाड्यांतल्या मुलांनीं शाळेंत जावें, घरीं राहून उनाडूं नये, याविषयीं आईबाप व इतर पालनकर्ते यांजवर कायदेशीर सक्ति करितां यावी, हेंच कायतें मुख्य तत्त्व सदर बिलाच्या मुळाशीं आहे. पण या तत्त्वांतून अनुषंगभूत असे दोन प्रश्न सहजच उद्भवतात. पैकीं एक असा कीं, मुलें शाळेंत न जाण्यास त्यांची स्वतःची उनाडकी हौस किंवा त्यांच्या पालनकर्त्यांची हयगय हें जसें एक कारण असतें, तसेंच मुलें शाळेंत घातलीं असतां त्यांना द्यावी लागणारी फी देण्यास पालकांना ऐपत नसणें हेंहि एक असतें, नाहीं असें नाहीं. शहरांत राहणाऱ्या आम्हां लोकांना मुलांस शाळेंत पडणाऱ्या फीच्या अडचणीची चांगलीशी कल्पना कदाचित् येणार नाहीं. परंतु खेडेगांवांतून—म्हणजे एकंदरीनें शाळेंत जाण्यास योग्य अशा वयाच्या मुलांचा जेथें भरणा, तेथें ही अडचण पुष्कळ पालकांना चांगलीच भासत असेल यांत शंका नाहीं. शेतकरी व कामगारवर्गाच्या कुटुंबांत होतां होईतों प्रत्येक मुलामाणसानेंहि कांहींतरी पोटास मिळविण्याची आवश्यकता असते. शिवाय खेडेगांवांतून रोकड

* केसरी, तारीख ११ जुलै १९११

पैशाची टंचाई फार. यामुळें साधारण गरीब कुटुंबांत शाळेंत जाण्यासारखीं चार मुलें असलीं तर त्यांनीं मोलमजुरी करून महिन्याचेकाठीं आठ बारा आणे मिळवून आणण्याची जेथें अपेक्षा असणार, तेथें उलट त्यांचे पोटास घालून वरती त्यांचे विद्येकरितां महिना आठबारा आणे खर्च करणें हें ज्यांना उरावर दगड ठेवल्यासारखें होणार असेच आईबाप खेडेगांवांत पुष्कळ. अर्थात् आईबापांचीं मुलें शाळेंत न जातां घरीं राहिलीं, तर त्यांस त्यांची हयगय हेंच केवळ कारण नसून दारिद्र्य हेंहि कारण असणें शक्य आहे; आणि शिक्षणाची सक्ति करणें हें पाप नसून पुण्यच आहे, असें जरी कोणास वाटलें तरी दारिद्र्याचा हा प्रश्न त्यानें विसरतां कामा नये. पण याचा अर्थ शिक्षणाची सक्ति कोठेंहि करूंच नये असा नव्हे, तर ही सक्ति करावयाची झाल्यास बिनऐपतदार आईबापांच्या मुलांस तरी अगदीं फुकट शिक्षण मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे, हाच होय. वरील दोहोंतून मिळून निघणारा तिसरा प्रश्न असा कीं, शिक्षणाची सक्ति करावयाची म्हणून इकडे शिक्षण मोफत दिलें पाहिजे आणि दुसरीकडे सक्ति केल्याचे योगानें शाळेंत जाणाऱ्या मुलांची संख्या पुष्कळच वाढणार, तेव्हां इतक्या मोठ्या संख्येस फुकट शिक्षण द्यावयाचें म्हणजे शिक्षणावरचा खर्चहि पुष्कळ वाढणार, मग तो कोणीही करो. अशा रीतीनें शिक्षणाच्या चांगल्या कामींहि कां होईना; पण कायद्याची सक्ति करणारच, तर शिक्षण फुकट मागण्याचा पालकाचा हक्क आणि वाढत्या व सक्तीच्या शिक्षणास लागणाऱ्या पैशाची तरतूद, या तीन बाबी ना० गोखले यांच्या बिलासंबंधानें विचार करितांना आपोआप पुढें येतात. या तिन्ही बाबींची व्यवस्था सर्वमान्य अशा रीतीनें करण्याचा प्रयत्न ना०गोखले यांनीं आपल्याकडून शक्य तितका केला आहे. तथापि, हा प्रयत्न कोणत्या बाबीसंबंधानें साधला आहे व कोणत्या बाबीसंबंधानें साधला नाहीं, याचा आपण थोडासा विचार करूं.

सक्तीचा प्रश्न वास्तविक मुळींच अवघड नाहीं. कारण, एक तर कायद्याची सक्ति ही आम्हां हिंदुस्थानांतील लोकांच्या पांचवीलाच पुजलेली असते असें म्हणण्यास हरकत नाहीं. सर्वसाधारणतः जो कायदा घडण्याच्या कामीं लोकांस बहुमताचा हक्क नसतो त्या प्रत्येक कायद्याचा अंमल तत्त्वतः कितीहि कायदेशीर म्हणजे 'कॉन्स्टिटयूशनल' असला तरी त्या

लोकांवर तो एक प्रकारचा 'कॉन्स्टिटयूशनल' जुलूमच म्हणण्यास हरकत नाहीं. अशा स्थितींत ज्यांची सक्ति होते अशा वाईट कायद्यांबरोबर कांहीं चांगले कायदेहि होऊं शकतात; व लोकांचें कायदेकौन्सिलांत बहुमत नसतांहि त्यांनीं स्वतः बहुमतानें केल्याप्रमाणेंच ते त्यांस मान्य होणें संभवनीय असतें. उदाहरणार्थ, अमुक एक वयाच्या आंत मुलाच्या देवी काढल्याच पाहिजेत, अमुक एक कालावधींत जन्ममरणाची वर्दी दिलीच पाहिजे, खानेसुमारीचा कारकून घरीं आला असतां त्यास कुटुंबांतील माणसांची माहिती पुरविलीच पाहिजे, अथवा कोर्टांतील साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत चढलें असतां शपथ घेतल्यावर सांगावयाचें तें सांगितलेंच पाहिजे, वगैरे गोष्टी सर्वमान्य, सर्वसंमत अशा कायदेशीर सक्तीचीं उदाहरणेंच होत. ना० गोखले यांच्या बिलानें शिक्षणाच्या कामीं कांहीं आईबापांवर सक्ति होणार हें जरी सकृद्दर्शनीं खरें असलें तरी तिचा समावेश वरील 'सर्वमान्य' सक्तीच्या उदाहरणांतच करण्यास हरकत नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें कायद्याच्या सक्तीनें हिंदुस्थानांतील समाजाचे अंगास आजवर जीं अनेक भोंकें पडलेलीं आहेत त्यांत शिक्षणविषयक सक्तीनें पडणारें भोंक दिसून येईल किंवा शरीरास जाणवेल असें मुळींच नाहीं. कायद्याची सक्ति आली म्हणजे तिजबरोबर योग्य सवलतीहि याव्या लागतात व ना० गोखले यांच्या बिलांत या बाबतींतल्या सवलती भरपूर ठेविल्या आहेत, हें मागें तारीख २१ मार्चच्या केसरींत या विषयावर लिहितांना आम्हीं स्पष्ट करून दाखविलेंच होतें. तात्पर्य, धार्मिक पुण्य व सामाजिक हित साधावयाचें तर व्यक्तिमात्रास थोडीबहुत तरी यमनियमांचीं बंधनें सोसल्याशिवाय गत्यंतरच नसतें; आणि आजारांत पथ्य करण्याप्रमाणें व औषध घेण्याप्रमाणें हीं बंधनें सोसण्यास मनुष्य बहुधा आपखुषीनेंच तयार असतो. शिक्षणासारख्या विषयांत आणि ना० गोखले यांच्या बिलांत योजलेल्या सवलती पाहिल्यावरहि आम्ही या सक्तीच्या विरुद्ध आहों असें म्हणणारे जे लोक निघतील त्यांत तत्त्वप्रिय बाणेदार लोकांपेक्षां वावदूक कांगावखोरांचाच भरणा अधिक असणार हें अगदीं उघड आहे. शिक्षणापासून आधींच झालेल्या एवढया लोकजागृतीस भिऊन प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करणें म्हणजे वेडयाच्या हातीं कोलीत देण्या-

प्रमाणेंच घातक आहे असें म्हणणारे कांहीं थोडे सद्भावी अधिकारी, व अधिकारी म्हणतात तेंच वेदवाक्य असें मानून त्यांच्या निषेधास री ओढणारे त्यांचे कांहीं हिंदी बगलबच्चे आहेत; यांचा समावेश वर सांगितलेल्या वावदूकांतच आम्ही करितों हें सांगावयास नकोच.

ज्यांना शिक्षणाची सक्ति मान्य आहे त्यांना शिक्षण फुकट दिलें जावें हें सहजच मान्य होतें. आतां सक्ति केली म्हणून आपल्या मुलांस शिक्षण फुकट मिळावें असें सर्वच आईबाप म्हणूं लागतील तर तेंहि बरोबर होणार नाहीं! कारण लक्ष्मी आणि सरस्वती यांचें विसंवादित्व बहुधा सनातन किंवा अनादिसिद्धच आहे; आणि द्रव्यांत लोळत असतां विद्येकडे पाठ फिरविणारे लोक कांहीं थोडे नसतात. श्रीमंत आईबापांचीं मुलें मूर्ख, खुळीं व अचरट असावयाचीं असा जो कांहीं अंशीं नियमच बनून गेला आहे त्याचें कारण झालें तरी हेंच होय. अर्थात् अशा आईबापांवर-मोफत शिक्षणाची सवलत न ठेवितांहि—मुलांस शाळेंत पाठवण्याबद्दल सक्ति करणें यांत कांहींच वावगें नाहीं! आणि ना० गोखले यांच्या बिलांत झालें तरी शिक्षणविषयक सक्तीच्या भरीस पडून गरिबांबरोबर श्रीमंतांसहि मोफत शिक्षणाची खैरात त्यांनीं वांटली असा अप्रयोजकपणा त्यांचे पदरीं बांधतां येईल असें कांहींएक नाहीं. मुलांस शाळेंत पाठविण्यासंबंधानें सक्ति करावयाची ती कोणी, कोणावर, केव्हां, कशा रीतीनें करावी, योग्य कारणाकरितां माफी कितपत मिळावी, आणि गुन्हेगारासहि झालें तरी शासन कोणचें व कितपत व्हावें, यासंबंधांतील नियमाप्रमाणेंच, फीची सूट देणें झाल्यास ती कोणास किती मिळावी, याविषयींचे नियमहि ना० गोखले यांच्या बिलांत बीजरूपानें आहेत; व ते थोड्याबहुत फरकानें सर्वमान्य होतील असें आम्हांस वाटतें. तथापि, तिसरी बाब म्हणजे मोफत व सक्तीच्या खर्चाच्या योजनेविषयींची. ही मात्र वरील दोन्हीहून अधिक वादग्रस्त आहे, यांत शंका नाहीं. प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी खरोखर मुख्यतः कोणाची आहे? आज या शिक्षणावर लोक व सरकार यांजकडून होत असलेल्या खर्चाचें परस्पर प्रमाण काय पडतें व याच दिशेनें आणखी एक पाऊल पुढें टाकावयाचें तर त्याचा खर्च कोणीं व किती सोसावा, हे प्रश्न उपस्थित होतात.

तत्त्वतः राजनीतींत झालें तरी वेदांताप्रमाणें अद्वैतच आहे. म्हणजे राजा व प्रजा यांत भेदभाव नाहीं. प्रजेचे हक्क आणि राज्यकर्त्यांचे अधिकार यांची मांडणी निराळी असली तरी त्यांचा हेतु एकच आहे; आणि प्रजाजन आपखुषीनें स्वतःवर कर लादून घेत असल्यामुळें सरकारी खजिन्यांतील पैसा हा आपलाच आहे, या उदात्त कल्पनेची प्रतीति त्यांस होऊं शकते. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, ऑस्ट्रेलिया या स्वतंत्र व प्रजासत्ताक राष्ट्रांत हें राजकीय अद्वैत प्रत्यक्ष सिद्ध होतें. पण हिंदुस्थानसारख्या देशांत म्हणजे जेथें प्रजेची काडीवरहि व्यवच्छिन्न व संपूर्ण अशी सत्ता नाहीं त्या ठिकाणीं सरकार व प्रजा या दोन आत्म्यांचें द्वैत भासमान झाल्यास व त्यांच्या परस्पर हक्कांमध्यें खराखुरा विरोध दिसल्यास त्यांत नवल नाहीं. अर्थात् हिंदुस्थानांत प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारची कीं लोकांची व त्याला लागणारा खर्च कोणीं करावा? सरकारनें कीं लोकांनीं? असा हा विरोधमूलकवाद हिंदुस्थानांत उत्पन्न होणारच. आज खरोखर पाहूं गेलें असतां प्राथमिक शिक्षणावरचा ताबा सर्वस्वीं सरकारचे हातांत आहे. त्याची प्रत्यक्ष व्यवस्था बऱ्याच ठिकाणीं म्युनिसिपालिट्या व क्वचित् लोकलबोर्डें यांच्या हातीं आहे; आणि या शिक्षणाचा खर्च कांहीं ठिकाणीं सरकार सर्व स्वतः करीत असून म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांना कांहीं ठराविक प्रमाणावर त्या खर्चास सरकार मदत देत आहे. अशा स्थितींत सक्तीचें व मोफत शिक्षण देण्याचें ठरलें तर लागणारा अधिक खर्च 'सर्वस्वीं सरकारनेंच सोसावा' अथवा 'सर्वस्वीं लोकांनींच सोसावा' हें म्हणणें युक्तिविरुद्ध नसलें तरी परंपरेविरुद्ध खास आहे. ज्याचा ताबा त्याचा खर्च हें म्हणणें वास्तविक सरळ आहे. आणि वास्तविक चाललेंहि पाहिजे. पण एक तर सरकाराकडे सर्व ताबा म्हणून सरकारानेंच सर्व खर्च सोसावा हें तत्त्व शिक्षणाप्रमाणें इतर ठिकाणीं आपण लागूं करूं लागलों असतां आज बहुधा अनवस्था प्रसंग येणार. कारण कोणच्याहि राज्यांत सरकारचा पैसा म्हणजे प्रजेपासून कराच्या योगानेंच वसूल केलेला असणार. अर्थात् सरकारानें पैसा खर्च करावा याचा अर्थ इतकाच होतो कीं, एक तर तिजोरींत उतरणाऱ्या सर्वसाधारण शिलकेंतून तो व्हावा; अथवा आज शिल्लक नसेल तर चालू खर्चांत काटकसर करून शिल्लक उरवावी व तींतून करावा. दुसऱ्या शब्दांनीं

चोलावयाचें तर असें म्हणूं कीं, प्रजेवर आहे त्याहून प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष कराचें ओझें न वाढतां, आणि ज्या खात्यांवर व कामांवर होणारा खर्च आपल्या हिताकरितांच आहे असें प्रजेस वाटतें त्या खात्यांकडे व कामांकडे आजमितीस तोडून दिलेला तनखा कमी न होतां, अधिक लागणाऱ्या खर्चाची व्यवस्था परस्पर व्हावी. नवीन कराची बाब वगळली म्हणजे बाकी उरलेलें हें भांडण केवळ खात्यांखात्यांचेंच आहे, व अशा तऱ्हेचीं खात्या-खात्यांतील भांडणें इकडेच काय पण स्वतंत्र व प्रजासत्ताक राज्यांतहि असतातच. उदाहरणार्थ, लष्करी खातें व सिव्हिल सर्व्हिस यांवरील खर्च कमी करावा आणि तो पैसा लोकशिक्षणाकडे द्यावा असें आज आमचें आग्रहाचें भांडण आहे. आणि तसें झाल्यास प्राथमिक शिक्षणावर होणारा अधिक खर्च सरकारनें सोसला असें म्हणण्यास आम्हीं तयार होऊं—मग इलाँचा आमच्यावरील करभार एक पैनेंहि कमी न झाला तरी चालेल ! पण वर दर्शविल्याप्रमाणें वरील अर्थानें वाढत्या प्राथमिक शिक्षणाचा खर्च सर्व सरकारानेंच सोसावा हें म्हणणें बरोबर नाहीं. उलटपक्षीं हा सर्व खर्च लोकांचा लोकांनींच सोसावा—त्यांना शिक्षण मोफत व सक्तीचें पाहिजे असेल तर आपला आपण कर बसवून तो खर्च त्यांचा त्यांनींच भागवावा, हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर शिक्षणास प्रथम सुरवात सरकारच्या स्वतःच्या इच्छेनेंच झाली—तेव्हां कोणीं बिल आणलें नव्हतें—तरी शिक्षणा-चा खर्च इंग्रज सरकारनें विलायतेंतून पैसा आणून केला नव्हता, लोकां-वरील करांतूनच तो देण्यांत आला होता, व आज इंग्रज सरकारच्याहि इच्छेच्यापुढें जाऊन शिक्षण सक्तीचें करा असें जरी लोक म्हणत आहेत, तरी हा जादा खर्च करण्याचे कामीं सरकारनेंहि आपला भाग उचललाच पाहिजे. राज्यकारभारास लागणारा सर्व पैसा प्रजाच कराच्या रूपानें घुरविते या दृष्टीनें पहातां तिजोरींतला सर्व पैसा लोकांचा, आणि करानें जमवि-लेल्या पैशावर सरकारची खरी अनियंत्रित सत्ता आहे या दृष्टीनें तोच पैसा सरकारचा म्हणतां येईल. शिक्षणावर लागणारा खर्च लोकांनीं करावा, असें सरकार जेव्हां म्हणतें तेव्हां त्याचा अर्थ लोकांनीं अधिक कर देऊन करावा असाच होईल; पण तोच खर्च सरकारनें करावा असें जेव्हां लोक म्हणतात तेव्हां तो पैसा आपणच दिलेला असतो—सरकार विलायतेंतून पैसे आणीत

नाहीं–हें त्यांस माहीत नसतें असें नाहीं. पण एकदां बसलेली करपट्टी माफ किंवा कमी होण्याची जर आशा नाहीं, तर त्या करपट्टीच्या पैशांतून शिक्षणासारख्या सत्कार्याला खर्च झालेला पैसा आपल्याच खिशांत परत आला, असें समाधान मानण्याची लोकांची तयारी असते इतकेंच.

पण सरकार व लोक एवढेच जे दोन राजकीय समाजाचे भाग पूर्वी होते त्यांत म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्डें अस्तित्वांत आल्यापासून एका तिसऱ्या भागाची भर पडली आहे. १८८२ सालीं स्थानिक स्वराज्य देण्यांत आलें त्यावेळीं सरकार व स्थानिक स्वराज्याच्या संस्था यांच्या दरम्यान कामाची, उत्पन्नाची व खर्चाची वांटणी करण्यांत आली. पैकीं प्राथमिक शिक्षण हें म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांजकडे देण्यांत आलें. विवक्षित कर बसविण्यास त्यांना परवानगी देण्यांत येऊन या उत्पन्नापैकीं कांहीं भाग त्यांनीं शिक्षणाकडे खर्चावा व त्यांस या कामीं मदत म्हणून सरकारानेंहि कांहीं रक्कम देत जावी, असें ठरलें. लोकलबोर्डास लोकलफंड, टोलदस्तुरी वगैरे करांचें उत्पन्न तोडून दिलेलें असतें, आणि शिक्षणावर बोर्डें जो खर्च करतील त्याच्या एकद्वितीयांशाइतकी रक्कम मदतीदाखल सरकार देतें. म्युनिसिपालिट्यांना घरपट्टी, जकात वगैरे सर्वसाधारण स्वरूपाचे कर बसविण्याचा अधिकार दिलेला असतो; आणि शहरांतून प्राथमिक शाळा चालविण्याचें काम त्यांजकडे देऊन त्यांवर आपल्या उत्पन्नांतून त्यांनीं जरूर तो खर्च करावा आणि त्यांनाहि या खर्चाच्या एकद्वितीयांशाइतकी मदत सरकारनें दरसाल द्यावी अशी पद्धत आज अमलांत आहे. ना० गोखले यांचें बिल पास झालें तरी सरकार व स्थानिक कमिट्या यांनीं मिळून वाढता खर्च सोसावा हेंच अनुमान परंपरेवरून निघणार. कारण बिलापूर्वी जेथें थोडीं मुलें शिकत होतीं तेथें तीं कांहींशीं जास्त शिकूं लागणार इतकेंच. पण यामुळें आज जी शिक्षणपद्धति व दोघांनीं मिळून खर्च करण्याची व्यवस्था रूढ झाली आहे तिच्यांत एकदम कांहीं विलक्षण फेरफार होण्यास कारण आहे असें नाहीं.

तथापि, हा खर्च दोघांनीं मिळून करावयाचा झाला तरी प्रत्येकानें किती हिस्सा सोसावा हा प्रश्न राहतोच. आज सरकार लोकलबोर्डामार्फत होणाऱ्या प्राथमिक शिक्षणावरील खर्चास एकद्वितीयांशापासून दोन

तृतीयांशापर्यंतहि खर्च सोसतें; व म्युनिसिपालिट्यांमार्फत होणाऱ्या प्राथमिक शिक्षणावरील खर्चास सरकार एकतृतीयांशापासून एकद्वितीयांशापर्यंत मदत देतें. पण ना० गोखले यांचे बिलाप्रमाणें शिक्षण सक्तीचें झाल्यास सरकारच्या मदतीचीं हीं दोन्ही प्रमाणें वाढल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आज म्युनिसिपालिट्यांस लोकलबोर्डापेक्षां कमी मदत सरकार देतें. पण शहरांतील लोकांस शिक्षणासंबंधीं एक प्रकारची हौस वाटते, म्युनिसिपालिट्यांमधून लोकलबोर्डापेक्षां सुशिक्षित लोकांचा भरणा जास्त असतो, व शहरांतील प्राथमिक शाळांची व्यवस्था सर्वस्वीं म्युनिसिपालिटयांच्याच हातीं असते, इत्यादि गोष्टींमुळें सरकाराकडून मिळावी तितकी मदत मिळाली अगर न मिळाली तरी आपल्या एकंदर उत्पन्नांतून शाळाखात्याकडे म्युनिसिपालिटया बराच खर्च करितात. शिवाय शिक्षणाची सक्ति झाली तरी शाळेंत जाणाऱ्या मुलांची संख्या जी शहरांतून वाढेल ती म्युनिसिपालिटयांच्या आवांक्याबाहेर जाईलच असें नाहीं. तात्पर्य, आज म्युनिसिपालिटयांस शिक्षण-विषयक खर्चाच्या जवळ जवळ निम्या रकमेइतकी मदत सरकाराकडून हातीं पडते. तिचें प्रमाण वाढवून तें दोन तृतीयांश सरकारची मदत व एकतृतीयांश म्युनिसिपालिट्यांचा खर्च असें प्रमाण कायमचें ठरून गेल्यास शिक्षणाच्या सक्तीचा अंम्मल करणें म्युनिसिपालिट्यांस परवडेल. लोकलबोर्डास आज निम्याहून थोडी अधिक मदत सरकाराकडून मिळत आहे तिचेंहि प्रमाण वाढलें पाहिजे. म्हणजे कमींत कमी दोन हिस्से सरकारी मदत व एक हिस्सा लोकलबोर्डाचा खर्च असें हें प्रमाण—शिक्षणाच्या सक्तीचा प्रश्न असो वा नसो—आजच ठरणें जरूर आहे. कारण लोकलबोर्डाच्या शाळांची म्युनिसिपल शाळांच्या मानानें फारच दैन्यावस्था आहे. शिक्षण सक्तीचें झाल्यास लोकलबोर्डाच्या शाळेंतील मुलांची संख्या हल्लींहून बरीच वाढेल खरी; पण सक्तीच्या शिक्षणाचा कायदा एखाद्या क्षेत्रास लागूं करावा किंवा नाहीं, ही गोष्ट बिलानें केवळ ऐच्छिक म्हणून ठरविली असल्यानें फारशी लोकलबोर्डें आपली सांपत्तिक स्थिति सुधारेपर्यंत कायदा लागू करून घेण्यास कबुली देणार नाहींत हें उघड आहे.

प्रस्तुत बिलांत खर्चाच्या हिस्सेरशीचा हा प्रश्न अजीबात वगळलेला

आहे, व उलटपक्षीं बिलांतील आठव्या कलमांत, जी म्युनिसिपालिटी अगर जें लोकलबोर्ड हा कायदा आपल्यास लागू करुन घेईल त्यास, सरकारची मंजुरी मिळवून, केवळ प्राथमिक शिक्षणाकरितां म्हणून मुद्दाम निराळा कर लोकांवर बसवितां यावा–व असा कर बसविल्यास त्या कराचें सर्व उत्पन्न मात्र केवळ प्राथमिक शिक्षणाकडेच खर्च व्हावें अशी परवानगी ठेविली आहे. या दोन गोष्टी एकत्र घेतल्या असतां सक्तीनें दिलेल्या शिक्षणाचा वाढता खर्च सर्वस्वीं लोकांनींच आपला आपण सोसावा अशी बिल पुढें आणणाराची अपेक्षा आहे असें दिसेल; पण वस्तुस्थिति तशी नाहीं. कारण सदरहू बिल पुढें आणतांना ना० गोखले यांनीं जें भाषण केलें त्यांत खर्चाच्या वांटणीचें विवेचन त्यांनीं केलें आहे; व प्राथमिक शिक्षणाचा यापुढील खर्च दोन हिस्से सरकारनें सोसावा व एक हिस्सा लोकांनीं म्हणजे स्थानिक कमिटीनें सोसावा असें म्हटलें आहे. "स्थानिक सरकार व स्थानिक कमिट्या यांनीं सक्तीच्या शिक्षणाचा खर्च परस्पर किती सोसावा, याविषयीं बिलाच्या अठराव्या कलमामध्यें हिंदुस्थान-सरकारनें स्पष्ट नियम ठरवून द्यावा असें लिहिलेलें आहे; अर्थात् मी असें गृहीत घेऊन चाललों आहें कीं, प्रांतिक सरकारास शिक्षणाच्या कामीं अधिक खर्च करतां यावा म्हणून कांहीं जास्त रक्कम अथवा उत्पन्नाच्या बाबी हिंदुस्थानसरकार आपल्या स्वतःच्या तनख्यापैकीं तोडून देईल; आणि अशा रीतीनें प्रांतिक सरकार अधिक खर्च करण्यास तयार होईल तर शिक्षणाच्या सक्तीच्या तत्त्वाचा लाभ आपणांस होतो म्हणून वाढत्या खर्चास मदत करण्या-करितां जरूर तर स्थानिक कमिट्याहि मोठ्या खुशीनें आपणां स्वतःवर शिक्षणा-पुरता लहानसा कर बसवून घेतील. पण, ज्या ज्या ठिकाणीं प्रस्तुत बिलाचा अंमल करण्याचा प्रसंग येईल त्या त्या ठिकाणीं तो अंमल यशस्वी व फलद्रूप होणें हें खुद्द सरकार वाढत्या शिक्षणावर किती खर्च करण्यास तयार आहे यावरच सर्वस्वीं अवलंबून राहील. मला वाटतें कीं, प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत कमींतकमी दोनतृतीयांश इतका खर्च सरकारानेंच सोसला पाहिजे असें म्हणण्याचा हक्क प्रजेस आहे." या उल्लेखावरून लोकांनीं स्वतःवर शिक्षण-विषयक कर बसवून घ्यावा यावर ना० गोखले यांचा जितका रोंख आहे तितकाच, किंबहुना त्याहूनहि अधिक सरकारानें

ग्रॅन्टच्या रकमा वाढवाव्या व खर्चाचा बोजा अधिक संभाळावा यावर आहे हें उघड दिसून येतें. तथापि नवीन कराची योजना प्रत्यक्ष बिलांत झाली, पण सरकारानें अधिक खर्च करण्याविषयींची शिफारस फक्त ना० गोखले यांच्या भाषणांतच राहिली; यामुळें बिलाच्या एकंदर स्वरूपाविषयीं गैरसमज होण्यास पुष्कळ लोकांच्या मतें योग्य कारण घडलें आहे. पुष्कळ लोकांचा असा समज झालेला आहे कीं, हें बिल पास झालेंच तर नवीन कर बसविण्याच्या कलमास मात्र कायद्याचें स्वरूप येईल, सरकारनें अधिक खर्च करण्याची शिफारस ही पुराणांतील वांग्याप्रमाणें नामदारांच्या भाषणांतच राहून जाईल, नवीन कराच्या कलमाचा फायदा घेऊन ठिकठिकाणीं कर बसविण्याचें सुरू होईल, व हळुहळू सरकार मात्र खर्चाच्या कामीं अखेर आपलें अंग काढून घेईल. तात्पर्य, बिलाचा अंमल होईल, मुलांवरील शाळेंत जाण्याची व आईबापांवरील कर देण्याची सक्ति पदरांत पडेल, आणि सरकारावर खर्चाची सक्ति करण्याचें साधन कायद्यांत नसल्यामुळें सरकार मात्र सुटून जाईल! वरील प्रकारची विचारसरणी अगदींच असमंजसपणाची आहे असें नाहीं. कारण कायद्यांतील शब्दांचा अंमल व्हावा आणि त्या शब्दांचें अनुपान ज्या भाषणांतून सांगितलेलें असतें त्यांतील आश्वासनें व वचनें खुद्द सरकारतर्फे दिलीं गेलीं असलीं तरी तीं विसरलीं जावीं हा अनुभव ज्यांच्या मनांत पक्का बिंबला आहे त्यांना प्रस्तुत बिलांतील ही धरसोड संशयास्पद व भीतिप्रदच वाटणार. प्रत्यक्ष बिलांत नवीन कर बसविण्याचें कलम जसें घालतां येतें त्याचप्रमाणें खर्चाच्या वांटणीचें कलमहि घालतां कां येऊं नये हा कोणाचाहि प्रश्न झाला तरी अगदीं सरळच आहे. आठवें व अठरावें कलम एकत्र करून लोकांनीं स्वतःवर बसविण्याचा कर आणि सरकारानें संभाळण्याचा खर्चाचा बोजा, यांविषयीं एकाच प्रकारची कायदेशीर व्यवस्था असावी अशी लोकांची अपेक्षा असणें स्वाभाविक आहे. प्रस्तुत बिल पास झालें तरी, अमुक एखाद्या क्षेत्रास तें लावावयाचें कीं नाहीं हें सरकार व स्थानिक संस्था या उभयतांच्या विचारें व्हावें असें कायद्यांत ठरविलें आहे तें बरोबर आहे; पण उभयतांच्या विचारें बिलाचा अंमल व्हावा असें ठरल्यास, सरकारानें व स्थानिक कमिट्यांनीं खर्च किती किती सोसावा याविषयीं शंका किंवा मतभेद होण्याचें राहूंच नये हें बरें. निदान सरकारी खर्चाच्या हिश्शाचीं

कनिष्ठ प्रमाणें तरी कायद्यांत स्पष्ट ठरवून द्यावीं; या मागणींत वावगें असें कांहींच नाहीं. आतां कदाचित् हें बिल पुढें आणतांना, प्रथमच सरकारी खर्चाच्या प्रमाणाचें कलम त्यांत समाविष्ट कां केलें नाहीं ? व सरकारानें खर्चाचा बोजा हल्लींहून अधिक सोसलाच पाहिजे ही जाणीव, ना० गोखले यांस असतां तो भाग त्यांनीं आपल्या भाषणांतच कां आणिला ? बिलांत कां घातला नाहीं ? याला कांहीं विशिष्ट कारणें असल्यास तीं आम्हांस तरी माहीत नाहींत. परंतु हा प्रश्न केवळ ना० गोखले यांच्या योजनेबद्दल गैरसमज होण्याचाच नसून, इतर रीतींनीं लोकांस इष्ट असलेल्या या बिलास लोकमताचा पाठिंबा कसा मिळेल याविषयींचा आहे. शिक्षण मोफत दिलें जावें व शिक्षणाच्या कामीं सक्तीहि करण्यांत यावी याबद्दल फारसा मतभेद नाहीं; लोकांस तें हवेंच आहे. नवीन योजनेमुळें खर्च वाढणार तो मात्र बऱ्याच प्रमाणानें सरकारानें सोसावा असें लोकांचें आग्रहपूर्वक म्हणणें असून, सरकार तसें करण्यास तयार होईल तर स्वतःहि खर्चाचा थोडाबहुत अंश सोसण्यास लोक आज नाकबूल नाहींत. पण सरकार अमुक एक खर्च करण्यास तयार आहे हें स्पष्ट शब्दांनीं कायद्यांत ग्रथित व्हावयाचें नसेल तर प्रस्तुतचें बिल नामंजूर झालें तरी लोकांस चालेल ! शिक्षणाची जर लोकांस इतकी कळकळ वाटते तर त्याकरितां त्यांनीं थोडीशी झीज सोसण्यास आपण तयार आहों असेंहि दाखविलें पाहिजे, हें म्हणणें सयुक्तिक आहे; पण शिक्षण हें इतक्या प्रचंड खर्चाचें काम आहे कीं, समाजाच्या मनांत स्वार्थत्यागाची नुसती खाई पेटली तरीहि तो खर्च समजाचे हातून कधींहि सोवणार नाहीं. शिवाय, तो त्यांनीं सोसावा तरी कां ? फ्रान्सचें सरकार जर प्राथमिक शिक्षणावर शेंकडा सत्तर इतका खर्च सोसतें आणि आयर्लंडांत खुद्द ब्रिटिश सरकारच शेंकडा साडेएक्याण्णव खर्च सोसतें तर हिंदुस्थानानेंच असें काय पाप केलें आहे, कीं येथें मात्र शेंकडा पन्नास हीच सरकारी खर्चाची मर्यादा झाली, असें लोकांनीं मान्य करावें ? तात्पर्य, सरकारवर खर्चाची जबाबदारी किती पडावी याचा उल्लेख प्रस्तुत बिलांत तें पुढें येतांनाच व्हावयास पाहिजे होता. निदान सरकारास बंधक असा या बाबतींतील उल्लेख पुढें सिलेक्ट कमिटीच्या प्रसंगीं तरी त्यांत आला पाहिजे. तसा तो न येईल तर खर्चाचें प्रमाण

ठरविण्यास हिंदुस्थानसरकारनें नियम करावे या पोकळ आशीर्वादाबर लोकांचा कधींहि भरवंसा बसणार नाहीं, अगर सरकारानें दोनतृतीयांश खर्च करावा या ना० गोखले यांच्या भाषणांतील उल्लेखानेंहि त्यांचें समाधान होणार नाहीं. खर्चाच्या बाबींत सरकार जोंपर्यंत कायद्यानें स्वतःस बांधून घेण्यास तयार नाहीं, तोंपर्यंत स्थानिक कमिट्यांनीं स्वतःवर कर बसविण्याची सूचना ही घरांत शिरणाऱ्या उंटाच्या पिल्लाप्रमाणें लोकांस भीतिप्रदच वाटेल यांत शंका नाहीं.

[२]*

प्राथमिक शिक्षण वाढविण्याचे कामीं आपणास अधिक खर्च करावा लागेल, यामुळें सरकार ना० गोखले यांच्या बिलास प्रतिकूल असण्याचा संभव आहे; आणि याच गोष्टीस अनुसरून 'सरकार जर स्वतः दोनतृतीयांश खर्च सोसण्यास कायद्यानें बांधून घेण्यास तयार असेल तरच प्राथमिक शिक्षण मोफत करितां येईल व सक्तीचें करण्यास परवडेल, आणि तसें होईल तरच लोकहि स्वतः थोडा अधिक खर्च करण्यास तयार होऊन क्वचित् ठिकाणीं आपला आपणावर शिक्षणविषयक करहि बसवून घेतील'–असें मागील लेखांत आम्हीं दर्शविलेंच होतें. हल्लीं सरकार प्राथमिक शिक्षणावर जो खर्च करितें तो आंकडा स्वतः प्रमाणानें मोठासा दिसतो, आणि मधूनमधून हिंदुस्थानसरकारकडून 'स्पेशल ग्रँट्स्' म्हणून खैरातीवजा ज्या रकमा देण्यांत येतात त्यांच्या योगानें अतज्ज्ञ मनुष्याचे डोळे दिपल्यासारखे होतात खरे; परंतु हिंदुस्थानचा विस्तार, लोकसंख्या, सालिना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांच्या रूपानें होणारें उत्पन्न, या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या असतां सरकारकडून प्राथमिक शिक्षणावर सालोसाल व कायम होणारा खर्च असावा तितका नाहीं,–या कामीं सरकारची अद्यापि कुचराई होत आहे–असेंच म्हणावें लागेल. अशी स्थिति असल्यामुळें शिक्षण सक्तीचें केल्यानें यापुढें तें वाटेल तितकें फैलावलें तरी त्याचा दोनतृतीयांश खर्च आम्ही सोसूं, असें बांधून घेण्यास सरकार नाखूष नसेल तरच

* केसरी, तारीख १८ जुलै १९११

नवल! आणि वस्तुतः सरकार या गोष्टीस नाखुष असल्यामुळेंच ना० गोखले यांच्या बिलास तें शक्य तितका प्रतिबंध करणार, हेंहि आपण आज समजूनच चालण्यास हरकत नाहीं. युनिव्हर्सिटींत, बोर्डांत अगर कोठेंहि हा प्रश्न निघाला तरी सरकारी अधिकारी शिक्षणविषयक सक्तीच्या तत्त्वास प्रतिकूल मत देत आहेत, याचा अर्थ काय हें कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं.

सरकारनें या बिलावर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सर्व स्थानिक कमिट्यांचीं मतें मागविलीं असून त्यांपैकीं बहुतेक बिलास अनुकूल आहेत हें मागें आम्हीं सांगितलेंच आहे. या कमिट्यांना शिक्षण सक्तीचें होऊन फैलावल्यास आपल्यावर पडणारा खर्चाचा बोजा वाढेल हें माहीत नसेल ऊर्से संभवत नाहीं. किंबहुना कित्येक म्युनिसिपालिट्यांनीं बिलावर मत देतांना सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याचा अंमल आपल्या अधिकारक्षेत्रांत पुढेंमागें झाला असतां खर्च अधिक किती होईल व तो कशा रीतीनें पुरवितां येणें शक्य आहे, वगैरे मुद्द्यांचा विचारहि केलेला आढळून येतो. अर्थात् अशा कमिट्यांचें अनुकूल मत हें केवळ निर्विकल्पक किंवा अविचाराचें असें न म्हणतां सविकल्पक व सुविवेकशीलपणाचें आहे असेंच मानावें लागेल. लोकलबोर्डामधून अद्यापि सरकारी अधिकाऱ्यांचेंच मतप्राबल्य असल्यामुळें तेथें ना० गोखले यांच्या बिलास पूर्ण संमति मिळणें अर्थातच शक्य नव्हतें. पण या बोर्डामधूनहि जे खासगी व लोकनियुक्त सभासद आहेत त्यांचें मत स्वतंत्र घेतां आलें असतें तर त्यांचेंहि मत बिलास अनुकूल असेंच पडलें असतें, याविषयीं आम्हांस शंका नाहीं. तात्पर्य, प्राथमिक शिक्षणासंबधानें स्वतःला थोडाबहुत अधिक कर द्यावा लागला तरी तो देऊन शाळा व शिक्षण फैलावण्याची जनतेची आज मोठ्या हौसेची तयारी आहे. असें असतां योग्य हिस्सेरशीनें आपणावर पडणाऱ्या खर्चास भिऊन सरकार मात्र मागें घेणार हें उघड होण्याचा प्रसंग आहे. स्थानिक स्वराज्य होण्यापूर्वी म्युनिसिपालिट्या प्राथमिक शिक्षणावर करावा तितका खर्च करीत नाहींत, अशी चोहोंकडे तक्रार होती, आणि ही तक्रार योग्य आहे अशाविषयींचा पुरावा १८८२ सालच्या 'एज्युकेशन कमिशन'पुढें भरपूर मांडण्यांत आला होता. त्याच वेळीं सरकारचा प्राथमिक शिक्षणावरील खर्च

फार थोडा आहे, तो अधिक व्हावयास पाहिजे, अशीहि तक्रार सरकार-विरुद्ध त्याच कमिशनपुढें मांडण्यांत आली होती. दोन्ही तक्रारी बरोबर आहेत असा अभिप्राय कमिशननें दिला; तेव्हांपासून अलीकडे दोघांचाहि शिक्षणावरील खर्च वाढला आहे खरा; पण एकंदरीनें पाहातां म्युनिसिपालिट्यांकडून झालेल्या वाढीच्या प्रमाणानें सरकारचा खर्च वाढला आहे असें म्हणतां येत नाहीं.

आपण पुणें म्युनिसिपालिटीचेंच उदाहरण घेऊं. सन १८८४ सालीं पोलीस खर्चाची सूट देऊन शिक्षणाचा खर्च सरकारनें पुणें म्युनिसिपालिटीवर घातला. तेव्हां हा खर्च सुमारें पांच हजार होता. तोच आजमितीस जवळजवळ ३३।३४ हजारपर्यंत गेला आहे. या खर्चापैकीं सरकारनें निम्मा खर्च ग्रँटच्या रूपानें सोसावा, असा करार १८८४ सालानंतर लवकरच करावा लागला; कारण म्युनिसिपालिटयांस सर्व खर्च एकटयानें सोसणें शक्य नव्हतें. पण निम्मी ग्रँट देण्याचें हें आश्वासन पाळण्यांत सरकाराकडून आजपर्यंत विलक्षण ढिलाई दाखविण्यांत आलेली आहे. म्युनिसिपालिटीकडे शाळांची प्रत्यक्ष व्यवस्था असल्यामुळें, मुलांच्या वाढत्या संख्येस अनुसरून शाळा, शाळामास्तर व शाळांचा खर्च वाढविणें, हें म्युनिसिपालिटीचें कर्तव्य होतें व तें तिनें केलें. पण सरकारची ग्रँट मात्र दरसाल निम्मेनिम्म तिच्या पदरांत केव्हांच पडली नाहीं. शाळांची प्रत्यक्ष व्यवस्था म्युनिसिपालिटीकडे होती हें जरी खरें आहे, तरी खर्च वाढत होता हें सरकारास कळत नव्हतें असें नाहीं. कारण, म्युनिसिपालिटीच्या एकंदर जमाखर्चाचें बजेट तर दरसाल सरकाराकडे जातेंच, परंतु शिक्षणसंबंधी कमिटीनें मंजूर केलेलें स्कूलबोर्डाचें बजेट तर शाळाखात्यामार्फत मुद्दाम मागविण्यांत येत असतें. पण ग्रँट काय द्यावयाची याचा ठराव मात्र साल दरसाल न होता तो पांच पांच वर्षांनींच करावा, असें ठरविण्यांत आल्यामुळें, या पांचांपैकीं चार वर्षेंपर्यंत कमिटीचा खर्च वाढावा पण ग्रँट मात्र निम्यापेक्षां कमी पदरांत पडावी, असें होत असतें! उलटपक्षीं, म्युनिसिपालिटीचा खर्च एखादे वर्षीं कमी झालाच तरी ग्रँटची रक्कम कमी होऊं नये, असें मात्र होत नाहीं. कारण ग्रँटचा आंकडा प्रत्यक्ष खर्चावरून ठरविलेला असतो.

पण ही ढिलाई येवढ्यानेंहि संपली नाहीं. कारण वरचेवर ग्रँटचा

आंकडा ठरविण्याचा करार असतां १९०२ सालापासून आजपर्यंत नऊ वर्षांत ग्रँटचा नवीन हिशेब करण्याची पर्वणीच सरकारानें आणूं दिली नाहीं! यामुळें कमिटीचा शिक्षणावरील खर्च मात्र साल दरसाल वाढत गेला पण सरकारी ग्रँटचा आंकडा मात्र पूर्वीचाच कायमचाच राहिला. हल्लीं ग्रँट वाढविण्याचें प्रकरण सुरू असून फिरून ग्रँट वाढेल असा अदमासहि आहे. तथापि, नवीन व्यवस्था झाल्याशिवाय ही ढिलाई पुढेंहि अशीच चालेल हें उघड आहे. आमचा तर अदमास असा आहे कीं, १८८४ सालापासूनचे पुणें म्युनिसिपालिटीच्या शाळाखात्याचे हिशेब पाहिल्यास मूळच्या पोलिस खर्चाच्या कितीतरी पटींनें कमिटीचा शिक्षणावरील खर्च वाढला आहे; आणि निम्मी सरकारी ग्रँट मिळावी असा करार झाला असतांहि त्याचा योग्य अंमल साल दरसाल वक्तशीर न झाल्यामुळें खुद्द पुणें म्युनिसिपालिटीचे असे लाख सवालाख रुपये तरी आजपर्यंत शिक्षणावर करारा-बाहेर अधिक खर्च झाले असले पाहिजेत. ठराविक रकमेबाहेर शिक्षणाचा खर्च कमिटीनें जाऊं दिला नसता तर तिला नको कोण म्हणणार होतें! पण असें करावयाचें तर कमिटीच्या शाळांतून अमुक एक संख्येहून अधिक मुलें आलीं तर त्यांना मज्जाव करावा, आम्ही घेत नाहीं म्हणावें, हींच गोष्ट कमिटीच्या कपाळीं आली असती. हायस्कुलें, सायन्सकॉलेज यांसारख्या वरिष्ठ प्रतीच्या शिक्षणसंस्था यांजमध्यें अशा रीतीनें सरकार विद्यार्थ्यांस खुशाल मज्जाव करितें. पण नुसतें साधारण लिहिणेंवाचणें संपादन करण्यास येणाऱ्या मुलांस "आमच्या शाळेंत सोय नाहीं. तुम्ही अशिक्षित राहिलां तरी आम्हांस चालेल" असें म्हणणें कोणत्याहि म्युनिसिपालिटीस लांछनास्पदच झालें असतें. पुण्याच्या कमिटीनें ती गोष्ट न करतां स्वतः झीज सोसली हें तिला भूषणास्पदच आहे. पण अशा रीतीनें म्युनिसिपालिट्या शिक्षणाच्या हौसेखातर अधिक खर्च करतात, म्हणून सरकारची भरपूर ग्रँट देण्याची जबाबदारी कोणत्याहि रीतीनें कमी होत नाहीं. स्थानिक कमिट्यांकडे शिक्षण सोंपविण्यांत आलें त्या वेळीं अमुक एका मर्यादेपलीकडे त्यांनीं शिक्षणाचा प्रसार अगर त्यावर खर्च करूं नये, अशी शर्तहि लादण्यांत आलेली नव्हती. असें असतां कमिट्यांनीं हा वाढता खर्च एकट्यांनींच कां सोसावा?

लोकलबोर्डांच्या शाळांसंबंधानेंहि कदाचित् अशा प्रकारचीच तफावत दिसून आली असती. परंतु एक तर त्यांच्या अधिकारक्षेत्रांतील शाळांची व्यवस्था त्यांच्या स्वतःच्या हातीं नसते, यामुळें त्यांना शाळांचा तितका अभिमानहि वाटत नाहीं. दुसरें असें कीं, लोकलबोर्डांचा कारभार बहुधा जिल्हाधिकाऱ्यांच्या मताप्रमाणेंच चालतो; स्वतंत्र लोकमताची छाप त्याजमध्यें फारशी पडत नाहीं, यामुळें जिल्ह्यांतील शाळांची संख्या वाढविणें अगर न वाढविणें हें प्रायः सरकारच्या मनाप्रमाणेंच होतें. ग्रँटची टंचाई वाटल्यास, लोकलबोर्डें अधिक शाळाच काढीत नाहींत म्हणजे झालें. अथवा काढावयाच्या झाल्या तरी खुद्द कलेक्टर हे जिल्हाबोर्डांचे प्रेसिडेन्ट असल्यामुळें त्यांना वेळोवेळीं अधिक ग्रँट मिळण्यास पंचाईत पडत नाहीं. तथापि, जिल्हाबोर्डांतील लोकांसहि शिक्षणाचा फैलाव व्हावयास नको असें वाटतें, असें म्हणतां येणार नाहीं. कांहीं दिवसांपूर्वी ज्या लोकलबोर्डांना शिक्षण वाढवावयाचें असेल त्यांनीं आपल्या इच्छेप्रमाणें स्वतंत्र सेस म्हणजे कर बसवून शिक्षण वाढवावें, अशा अर्थाचें बिल एका विवक्षित लोकलबोर्डाचे सूचनेवरून सरकारास पुढें आणण्याचें सुचलें होतें. परंतु त्यावर चोहोंकडे प्रतिकूल मत पडल्यानें तें मागें घेण्यांत आलें असें म्हणतात. या बाबतींत जिल्हाबोर्डांनीं प्रतिकूल मतें दिलीं असलीं तरी त्याचें कारण त्यांना शिक्षणाचा फैलाव व्हावयास नको किंवा या फैलाव्याचा खर्च तीं यथाशक्ति सोसण्यास तयार नव्हतीं हें नव्हे, तर अशा प्रकारचें बिल मंजूर करून वाढत्या शिक्षणाच्या सर्व खर्चाची जबाबदारी बोर्डांवर लादून, व स्वतःवर नवीन कर बसवून घेण्याची लोकांना उदार मनानें परवानगी देऊन, स्वतः घोतर झाडून बाजूस सरण्याचा सरकारचा हेतु–निदान तशी प्रवृत्ति तरी–सदर बिलांत दिसत होती, हें होय. तात्पर्य, लोकलबोर्डें काय किंवा म्युनिसिपालिट्या काय आपणावर पडणारा वाढत्या शिक्षणाचा बोजा यथाशक्ति व यथाप्रमाण सोसण्यास त्या केव्हांहि तयार होत्या व पुढेंहि तयार राहातील. पण वाढत्या शिक्षणाच्या खर्चाचा गाडा सर्वस्वीं लोकांच्याच आंगावर कलंडण्याचा जर संभव दिसेल तर अर्थातच लोक भिऊन पाय मागें घेतील यांत नवल नाहीं. अशा रीतीनें त्यांनीं आपलें पाऊल मागें घेतल्यानें शिक्षणाचें पाऊल पडावें तितकें पुढें पडणार

नाहीं ही गोष्ट खरी; तथापि त्यास इलाज काय ? कर बसविण्याची व ते खर्चण्याची सर्व सत्ता जोंपर्यंत त्यांच्या हातीं नाहीं तोंपर्यंत ही असमाधानकारक स्थिति अशीच टिकणार !

अधिक कर न बसवितां आहे त्यांतल्या त्यांत प्राथमिक शिक्षण फैलावण्याचे दुसरेंहि एक दोन मार्ग आहेत. एक मार्ग अगदीं सरळ असून प्राथमिक शिक्षणावर खर्चण्यास जो पैसा हातीं असेल तो सर्वस्वीं शाळाखात्यानें चालविलेल्या शाळांकडेच न लावितां खासगी शाळांस मदत देऊन होतां होईतों अशा शाळांची संख्या वाढविणें, हा होय. अशा शाळांपासून मुख्य फायदा हा असतो कीं, शाळामास्तरांस आपल्या शाळांचा अभिमान अधिक वाटतो. गांवच्या लोकांचा ताबा सरकारी शाळांपेक्षां त्यांवर अधिक चालतो. लोकांनाहि स्वावलंबनानें शाळा चालविल्याबद्दल समाधान वाटून त्यांवर जरूर तर खर्च करण्यास ते तयार होतात; व असा खर्च करूनहि त्यांना प्रत्यक्ष कर दिल्यासारखें वाटत नाहीं. दुसरे पक्षीं अशा शाळांमध्यें कांहीं वैगुण्यहि असतें; व तें असें कीं, ट्रेनिंग कॉलेजांत शिकून तयार झालेले शिक्षक हवे तितके मिळत नाहींत, आणि शाळेंतील शिस्त व व्यवस्था कांहीं अंशीं सरकारी शाळांप्रमाणें राहूं शकत नाहीं. तथापि, या गुणावगुणांचा हिशेब केला असतां अशा शाळांपासून होणारे फायदेच अधिक भरतील असें आम्हांस वाटतें; व याच कारणाकरितां, गेल्या आठवड्यांत खासगी प्राथमिक शाळांस उत्तेजन देण्यासंबंधानें जो सरकारी ठराव प्रसिद्ध झाला आहे तो आम्हांस पसंत वाटतो. सदर ठरावांत असें म्हटलें आहे कीं, यापुढें ज्या ज्या ठिकाणीं खाजगी स्वरूपाच्या गांवठी शाळा आढळतील त्या त्या ठिकाणीं त्यांना सरकारी पटावर नोंदून सालिना दीडशें रुपयेपावेतों ग्रँट द्यावी; अशा शाळांस आसपासच्या लोकलबोर्डाच्या अगर युनिसिपालिटीच्या मास्तर वगैरेंनीं सर्व प्रकारची मदत द्यावी; पेनशनदार मास्तर अगर कांहीं तरी नोकरी मागावयास येणारे साक्षर पण निरुद्योगी लोक यांना खेडेगांवांतून शाळा काढण्यास सुचवावें व उत्तेजन द्यावें; खासगी शाळा चांगल्या चालविणाऱ्या शिक्षकांस विशेष प्रकारचें कांहीं बक्षीस द्यावें; ग्रँटची रक्कम सालांतून एकदां मिळावयाची ती खासगी शाळांच्या खर्चास उपयोगी पडेल अशा रीतीनें थोडथोडी मधून-

मधून द्यावी. तात्पर्य, अशा रीतीनें ज्या गांवांमध्यें म्युनिसिपालिट्या नाहींत अगर लोकलबोर्डाच्या शाळा होण्याचा लवकर संभव नाहीं अशा लहान-सहान खेडेगांवांतून खाजगी शाळा निघतील तितक्या काढाव्या; आणि प्राथमिक शिक्षणाचे जे अभ्यास सर्व शाळांस सारख्या रीतीनें आज लागू करण्यांत येतात ते तसें न करितां, अशा खेडेगांवांतील शाळांकरितां वेगळ्या प्रकारचे म्हणजे अधिक सोपे अभ्यास ठेवावे.

आमच्या मतें ही सर्व योजना चांगली आहे. कारण शिक्षणाच्या सक्तीचा कायदा जरी आज न झाला तरी, शाळेंत जाऊं इच्छिणारीं परंतु कोणच्याहि प्रकारची शाळा गांवात नसल्यामुळें ज्यांना शिक्षणास आज मुकावें लागत आहे अशा मुलांची थोडीबहुत तरी सोय वरील प्रकारच्या खासगी शाळा निघाल्या असतां होईल. लोकलबोर्डाची नवीन शाळा निघणें म्हणजे शाळेची कल्पना निघून ती प्रत्यक्ष अमलांत येईपर्यंत बराच खटाटोप असतो. शाळेंत मुलें किती येतील, शाळा कायम टिकेल कीं नाहीं, शाळेस चांगली इमारत कशी मिळेल, शाळेंत ट्रेनिंग कॉलेजांत शिकलेल्या शिक्षकांचा पुरवठा होईल कीं नाहीं, वगैरे गोष्टींच्या विचारानें बराच काळ जातो. व केव्हां केव्हां तर, कांहीं दिवसांपूर्वी शाळाखात्याचे मुख्य अधिकारी ना० मि० शार्प यांनीं भर कौन्सिलांत सांगितल्याप्रमाणें, शाळा काढण्याकरितां हातांत पैसे असूनहि शाळा कशा निघतील अशी अडचण येऊन पडते! ना० शार्प यांनीं दाखविलेली पैसे खर्च करण्याची अडचण हल्लींच्या पद्धतीप्रमाणें खरी असली तरी, खासगी शाळांस उत्तेजन देण्याच्या या नवीन ठरावाचा अमल व्हावा तसा झाल्यास ती अडचणहि निघून जाईल. प्राथमिक शिक्षणाच्या शाळेस झालें तरी शक्य असल्यास चांगली सुंदर हवाशीर इमारत असावी, शास्त्रीय पद्धतीनें शिकलेले शिक्षक असावे, किंडरगार्टन वगैरे नव्या रीतींनीं मुलांस शिकविण्यास साधनसामुग्री असावी हें सर्व इष्ट आहे खरें. तसेंच एखाद्या नमुनेदार शाळेंत जो विद्याभ्यास मुलें थोड्या काळांत अनायासानें करतील तो गांवठी किंवा खासगी शाळेंत होण्यास अधिक काळ लागेल व आयास होतील, हेंहि सर्व खरें. तरी पण हें सर्व साधेल तरच शाळा काढूं असें म्हणणें हें 'खाईन तर तुपाशीं

नाहीं तर उपाशी' या म्हणींतील अज्ञानी मनुष्याच्या हट्टासारखेंच असमंजसपणाचें आहे.

ज्याला आपण नमुनेदार शाळा म्हणतों त्या सर्व देशभर खेडयापाडयांतूनहि पसरूं असें म्हणण्याइतका पैशाचा किंवा उत्तम शिक्षकांचा पुरवठा हिंदुस्थानांतच काय पण कोणच्याहि देशांत भरपूर होणें बहुधा अशक्य आहे. मोठमोठ्या गांवांतूनच अशा नमुनेदार शाळा घालणें शक्य आहे; व ज्यांना अशा शाळांचा फायदा घेण्याची अनुकूलता असेल ते तो घेतीलच. शहरांतील व मोठ्या गांवांतील लोकांस हा फायदा सहज मिळतो, व खेडेगांवांतील सधन व विद्याप्रिय आईबाप आपलीं मुलें पैसे खर्चून शहरांत शिकण्यास ठेवितात; अर्थात् अशा मुलांना हा फायदा मिळण्यास थोडासा आयास पडत असला तरी तो त्यांस मिळणें अगदींच अशक्य नाहीं. पण शहरांत व गांवांत ज्यांचे आईबाप रहात आहेत, किंवा वर सांगितल्याप्रमाणें खेडेगांवांत रहात असतांहि शिक्षणाकरितां त्यांस शहरांत ठेवण्यास खर्च करण्याची ज्यांच्या आईबापांस शक्ति असते, अशीं मुलें वगळलीं असतां बाकीच्या मुलांनीं काय करावें ? चांगलें शिक्षण मिळणें शक्य नाहीं म्हणून त्यांनीं मुळींच अशिक्षित रहावें कीं काय ? शिक्षणांत सरसनिरस हा भेद जरी असला तरी निरस शिक्षण हें सर्वस्वीं अशिक्षणापेक्षां पुष्कळ बरें ! साक्षरतेचें साम्राज्य अमर्याद आहे; शिक्षण हें जन्मभरहि सुटत नाहीं; या दृष्टीनें पाहातां चांगला सुशिक्षित मनुष्यहि कांहीं बाबींत अर्धशिक्षित तर कांहीं बाबतींत अशिक्षितच असतो. तथापि या अशिक्षितपणाचा दाखला देऊन ज्याला साधारण लिहितां वाचतांहि येत नाहीं अशा शिक्षणेच्छु अशिक्षितांचें समाधान कसें करितां येईल ? प्राथमिक शिक्षणाविषयीं जें आज भांडण आहे तें झालें तरी, खेडयापाडयांतून मुलांस 'शास्त्रीय पद्धतीचें प्राथमिक शिक्षण' मिळत नाहीं म्हणून नव्हे. तर, खाणींतील मौल्यवान् पदार्थांप्रमाणें अंगीं अनेक उत्कृष्ट गुण बीजरूपानें वसत असतां, केवळ लिहितां वाचतां न आल्यानें ज्यांचा सर्व जन्म व्यर्थ जातो व ज्यांच्या गुणांच्या उपयोगास राष्ट्र मुकतें अशा मुलांकरितां शिक्षणाची कांहीं एक सोय केली जात नाहीं, हेंच तें भांडण आहे. बाळबोध मोडी लेखनवाचन आणि गणिताचीं मूलतत्त्वें हीं ज्यांस एकदां आलीं त्यांस साक्षरतेच्या समुद्रांत बिनभोपळ्यानें पोहतां

येऊं लागलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. यापुढील त्यांची सर्व कर्तबगारी त्यांचा उद्योग, ऐपत, धाडस व अखेर नशीब, इत्यादि गोष्टींवर अवलंबून राहील. आणि पोहावयास शिकलेल्या मनुष्यानें त्या कलेचा कांहींएक उपयोग न केल्यास त्याचा अपराध त्याजकडेच येईल. परंतु अज्ञान मुलांस जगविण्याप्रमाणेंच जगविलेल्या मुलांस लिहिणें वाचणें शिकविण्याची जबाबदारी प्रत्यक्ष त्याच्या पालकांवर व अप्रत्यक्ष रीतीनें सरकारवर असते, हेंच काय तें सर्व शिक्षण-विषयक चळवळीचें बीज आहे. मुलांस शिक्षण देण्या-संबंधानें समाजाचें व सरकारचें हें जें कमींत कमी कर्तव्य म्हणून सांगितलें तें घडून येण्यास खासगी शाळांचा बराच उपयोग होईल. ना० गोखले यांच्या बिलांत झालें तरी मुलांस शाळेंत पाठविण्याची सक्ति करावयाची म्हणून म्हटलें आहे ती लोकलबोर्डाच्या किंवा म्युनिसिपल शाळेंतच पाठविण्याची आहे असें नाहीं; कोणच्याहि शाळेंत कां होईना, परंतु मुलाच्या प्राथमिक शिक्षणा-कडे त्याच्या योग्य वयांत लक्ष पुरविलें म्हणजे झालें. मग मुलगा सरकारी शाळेंत जावो, बोर्डाच्या शाळेंत जावो, म्युनिसिपल शाळेंत जावो, खाजगी शाळेंत जावो अगर घरीं शिको, त्यांस हरकत नाहीं. हेंच सदर बिलाचें तात्पर्य आहे व याच दृष्टीनें खाजगी शाळांस उत्तेजन देण्याविषयीं जो सर-कारी ठराव प्रसिद्ध झाला आहे त्याचें आम्ही अभिनंदन करितों.

असो, नवीन कर न बसवितां आहे या करांतच वाढत्या शिक्षणास लागणाऱ्या खर्चाचा पुरवठा होऊं शकेल कीं नाहीं हाहि एक प्रश्न असून त्याचाहि विचार होणें जरूर आहे. तथापि, या प्रश्नाचा निकाल फिरून स्वतंत्र रीतीनें करण्यांत येईल.

°सोन्यासारखी संधि दवडली !

शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाल्याशिवाय देशाची सर्वांगसुधारणा होऊन तो उन्नतीच्या पंथास लागणार नाहीं या दृढ भावनेनें ना० गोखले यांनीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत दोन वेळां, शिक्षण सक्तीचें व मोफत करावें याविषयीं प्रयत्न केला; परंतु त्यास सरकारच्या विरोधामुळें यश आलें नाहीं हें प्रसिद्धच आहे. हिंदुस्थान देशाचा विस्तार अफाट असून त्यांत कित्येक प्रांत अत्यंत मागासलेले असल्यामुळें सर्व प्रांतांकडून सारखेंच पाठबळ मिळणें शक्य नाहीं हें ना० गोखले यांस आलेल्या अपयशावरून ओळखून, ना० पटेल यांनीं आपल्या मुंबई इलाख्यापुरता तरी हा प्रयत्न करून पाहावा अशी उमेद बाळगून सक्तीच्या मोफत शिक्षणाचा ठराव परवांच्या कौन्सिलपुढें मांडला. या कामांत कोणासहि आक्षेप काढण्यास जागा राहूं नये आणि आपला ठराव वादग्रस्त ठरूं नये या हेतूनें त्यांनीं आपल्या ठरावाच्या व्याप्तीचें क्षेत्र अगदीं संकुचित केलें; व सर्व खेड्यापाड्यांतून नव्हे तर फक्त ज्या गांवांत म्युनिसिपालिटी स्थापन झाली आहे अशा गांवांतून प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करावें एवढीच त्यांनीं मागणी केली. परंतु एवढी मर्यादित मागणीदेखील मुंबईसरकारनें मान्य केली नाहीं ही अत्यंत खेदाची गोष्ट होय. जगाच्या आधुनिक परिस्थितींत आणि देशांच्या चढाओढींत कोणत्याहि देशाचा टिकाव लागण्यास शिक्षणप्रसाराची किती आवश्यकता आहे, आणि तो प्रसार प्रारंभीं थोडीबहुत सक्ति केल्याशिवाय होणें कसें अशक्य आहे याचें विवेचन आतां करण्याची जरूरी राहिलेली नाहीं. हे सामान्य सिद्धांत सर्वमान्य झालेले आहेत; आणि ना० गोखले यांचें बिल फेंटाळून लावणारें हिंदुस्थानसरकार, अथवा ना० पटेल यांच्या ठरावास अर्धचंद्र देणारें मुंबईसरकार, या उभयतांसहि हें तत्त्व मान्य नाहीं असें नाहीं, यास्तव त्या सामान्य तत्त्वाच्या विवेचनांत न पडतां मुख्यतः ज्या मुद्दयांवर मुंबईसरकारनें या ठरावास आक्षेप घेतला त्या मुद्दयांचेंच परीक्षण करूं.

° केसरी, तारीख १२ डिसेंबर १९१६

ना० पटेल यांच्या ठरावावर शरसंधान करतांना ना० चौबळ यांनीं शिक्षणखात्याचीं सूत्रें वरिष्ठ सरकारच्या हातीं असल्यानें वरच्या धोरणानें आपण बांधले गेलों आहों या कोटिक्रमावरच सारी भिस्त ठेविली, आणि ना० गव्हर्नरसाहेबांनीं तर शिक्षणखातें हें वरिष्ठ सरकारच्या ताब्यांतलें खातें आहे असेंच ठांसून सांगितलें. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. जकात, अफू, मीठ, पोस्ट, रेल्वे इत्यादि खात्यांप्रमाणें शिक्षणखातें जर सर्वस्वीं वरिष्ठ सरकारच्या स्वाधीन असतें तर कोणाहि नामदारानें प्रस्तुतचा ठराव या कौन्सिलापुढें मांडला नसता, आणि तशी चूक कोणीं केली असती तर सरकारनें त्या ठरावास मुळांतच थारा दिला नसता हें उघड आहे. पण गव्हर्नरसाहेब म्हणतात कीं, या ठरावांतील तत्त्वाशीं आपली सहानुभूति असून असल्या महत्त्वाच्या विषयावरील उपयुक्त वाद-विवाद मुळांतच खुडून टाकण्याचें पाप करूं नये म्हणून आपण या वादविवादास परवानगी दिली. मद्राससरकारनें पंचायतबिलास जसा कौन्सिलच्या दरवाजांतच मजाव केला तसा या ठरावास नामदारांनीं केला नाहीं या त्यांच्या सौजन्याबद्दल आम्हीहि त्यांचे अंतःकरणपूर्वक आभारी आहों. परंतु आपल्या अधिकाराबाहेरच्या प्रभावर केवळ जिज्ञासाबुद्धीनें किंवा कौतुकानें त्यांनीं हा वाद होऊं दिला असा प्रभाषासून तर कांहीं रंग दिसला नाहीं. तशी वस्तुस्थिति असती तर प्रथमारंभींच त्यांनीं या गोष्टीचा खुलासा केला असता आणि सर्व नामदारांस कळविलें असतें कीं, 'या विषयावर पूर्वपक्ष-उत्तरपक्ष कसा काय होतो हें पाहाण्याकरितां या ठरावावर भवति-न-भवति करावयाची आहे, परंतु ठरावाची बजावणी करणें आमच्या अधिकारकक्षेच्या बाहेरचें असल्यानें या ठरावावर मतेंदेखील घेण्यांत येणार नाहींत.' परंतु प्रथम तसा बिलकुल रोंख नसतां अखेरीस हा वादविवाद ऐनरंगांत आल्यावर आतां हें धोंगडें आपल्या गळ्यांत येतें अशी धास्ती पडून नामदार सभासदांनीं आपणांस या संकटांतून मुक्त करावें अशी ते गयावया करूं लागले. यावरूनच अधिकारातिक्रमाची सबब लंगडी आहे हें उघड सिद्ध होतें. ना०चौबळ यांनीं विद्याखातें हें वरिष्ठ सरकार-च्या कक्षेतलें खातें आहे असें गैरवाजवी विधान करण्याचें धाडस केलें नाहीं; परंतु त्यांनीं या अडचणींतून पळवाट काढण्याकरितां अशी शक्कल लढविली कीं,

जेव्हांपासून हिंदुस्थानसरकारनें शिक्षणखातें पृथक् करून त्यावर स्वतंत्र अधिकाऱ्याची योजना केली त्या वेळेपासून प्रांतिक सरकारला वरच्या धोरणानें व तंत्रानें वागावें लागतें, ही गोष्ट सामान्यतः खरी असेल. परंतु ना० पटेल यांनीं जी मर्यादित व विशिष्ट मागणी केली होती ती मान्य करण्याला वरील अडचण मुळींच लागू पडत नाहीं; आणि हें विधान आम्ही दुसऱ्या कशाच्या आधारें करीत नसून खुद्द ना० गव्हर्नर व त्यांचे शिक्षणमंत्री ना० चौबळ यांनींच या ठरावाविषयीं बोलतांना जें अभिवचन दिलें त्याच्या आधारें करितों. कारण ना० चौबळ यांनीं तर स्पष्टपणें असें सांगितलें कीं, ग्रँट वाढविण्याची मागणी न करतां कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें शिक्षण मोफत केलें तर त्यास आमची आडकाठी नाहीं; आणि ना० गव्हर्नरसाहेबांनीं तर असें आश्वासन दिलें कीं, या कामासाठीं सरकारी कमिटी न मागतां जर तुम्ही एखादी खाजगी कमिटी नेमाल तर आम्ही त्या कमिटीस सर्व प्रकारें मदत करूं ! जी गोष्ट स्वतःच्या अधिकाराबाहेरची व वरिष्ठांच्या धोरणाला विरोधात्मक म्हणून त्याज्य ठरली त्या गोष्टीला खासगी रीतीनें तरी सरकार कशी मदत करूं शकेल ? समजा, खाजगी रीतीनें कांहीं नामदारांची कमिटी नेमली गेली तर तिनें पुढें सरकारच्या साहाय्यावांचून करावयाचें तरी काय ? याचा खुलासा नामदारद्वयांनीं केला असता तर त्यांच्या अभिवचनाला कांहीं महत्त्व आलें असतें. 'तुम्ही खासगी कमिटी नेमा आणि खासगी शाळा स्थापन करून शक्य असल्यास मोफत शिक्षण द्या; पण आमच्याकडे ग्रँट मात्र मागूं नका,' एवढाच जर या आश्वासनाचा अर्थ असेल तर याला गव्हर्नरसाहेबांची तरी परवानगी कशाला पाहिजे ?

'वरिष्ठ सरकार सक्तीच्या व मोफत शिक्षणाला प्रतिकूल आहे म्हणून नाइलाजास्तव आम्हाला हा ना० पटेल यांचा ठराव सरकारी रीतीनें मान्य करतां येत नाहीं, बाकी आमची कांहीं त्यास हरकत नाहीं.' असा जो वारंवार कांगावा करण्यांत येतो त्यांत तरी तथ्यांश किती आहे याचें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. हिंदुस्थानसरकारानें तरी ना० गोखल्यांचें बिल हाणून कां पाडलें ? वरिष्ठ सरकारनें हें कृत्य केवळ आपल्या लहरीनें केलें का त्याला दुसऱ्या कोणाचा आधार होता ? वस्तुस्थिति अशी आहे कीं,

त्या वेळीं हिंदुस्थानसरकारनें सर्व प्रांतिक सरकारांचीं मतें मागविलीं होतीं, आणि त्यांत बहुमत विरुद्ध पडल्यावरूनच ना० गोखल्यांचें बिल बुडालें. सक्तीच्या व मोफत शिक्षणाला विरोध करणाऱ्या या सर्वच शिष्टांची नामावळी देण्याचें आज प्रयोजन नाहीं. परंतु प्रस्तुत प्रकरणीं मुद्याची व खेदाची गोष्ट ही कीं, मुंबईसरकारानें त्या वेळीं या तत्त्वास जोराचा विरोधच केला होता, आणि अशाच इतर कांहीं प्रांतिक सरकारांच्या मतामुळें विरोधी पक्षाचें बहुमत झालें व शिक्षणप्रसाराचें गाडें अडकून पडलें! अर्थातच वरिष्ठ सरकारानें आपल्यावरची जबाबदारी त्या वेळीं प्रांतिक सरकारांवर टाकली आणि आतां प्रांतिक सरकार वरील सरकाराकडे बोट दाखवून स्वतः नामानिराळें होऊं पाहात आहे. वरिष्ठ सरकारनें म्हणावें प्रांतिक सरकार अनुकूल नाहीं आणि प्रांतिक सरकारनें सांगावें कीं, वरिष्ठ सरकारच्या तत्त्वाविरुद्ध आम्हास वागतां येत नाहीं. अशा रीतीनें ही टोलवाटोलवी चालली असून 'गडसास्वडयोर्मध्ये द्राडिडो लडबम्यहम्' अशी आमच्या शिक्षणाची अनुकंपनीय स्थिति झाली आहे!

या इलाख्यांतील शाळाखात्याचे अधिकारी ना० शार्प यांनीं प्रस्तुतच्या ठरावास विरोध करतांना अनधिकारित्वाची सबब पुढें आणली नाहीं हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. या विद्याधिकाऱ्यांची मनोरचना कांहीं अपूर्व आहे. यांच्याकडे कोणतीहि एखादी नवी सूचना घेऊन जा, कीं त्यांनीं एवढा खर्च कोठून करावयाचा असें रडगाणें गाण्यास सुरवात केलीच! परंतु मौज ही कीं, प्रांतिक सरकारनें आपल्या जमखर्चाची कशीबशी तोंडमिळवणी करून शाळाखात्याकडे मोठी रक्कम दिलीच तर एवढी रक्कम खर्च कशी करावी हेंच यांस कोडें पडतें! कै० रा० ब० जोशी यांनीं एका प्रसंगीं जमाखर्चाच्या अंदाजपत्रकावर वादविवाद करतांना प्राथमिक शिक्षणाकडे ७० हजारांची रक्कम अधिक मंजूर करावी अशी सूचना केली असतां याच राजश्रीनीं उठून सांगितलें कीं, 'तुम्ही रक्कम द्यायला तयार असाल, परंतु ती घेऊन मी खर्च कशी करूं?' अशा अधिकाऱ्यांच्या कारकीर्दीत वरिष्ठ सरकारनें प्रांतिक शिक्षणाकरितां देणगीदाखल दिलेल्या लाखों रुपयांच्या रकमा खर्च न होतां सालोसाल पडून राहाव्या यांत आश्चर्य तें काय! परंतु चमत्कार हाच कीं, प्रस्तुतच्या ठरावास विरोध करतांना यांनीं

ना०पटेल यांच्या खर्चाचा अंदाज चुकला असून १५ लक्षांऐवजीं ३० लक्ष रुपये अधिक खर्च येईल असें सांगितलें. ना०शार्पसाहेबांचा हा आंकडा तरी विनाकारण फुगविलेला नसेल कशावरून ? परंतु तो यथार्थ आहे असें जरी घटकाभर मानलें तरी त्यांत बिनसलें काय ? सातआठ कोटि उत्पन्नाच्या मुंबई इलाख्याला प्राथमिक शिक्षणासारख्या उपयुक्त कार्याकडे एवढी खर्चाची वाढ कांहीं विशेष नाहीं. शिवाय या ठरावाची बजावणी कशी करावी हें ठरविण्याकरितां कमिटी नेमा अशी सूचना होती आणि त्या कमिटीनें या खर्चाचा बोजा कोणकोणावर किती अंशानें बसवावा याचा निर्णय केला असता. आणि ती विभागणी मान्य करणें न करणें हें अखेर सरकारच्या स्वाधीनच होतें. पण असल्या भावी अडचणीच्या भीतीनें कमिटी नेमण्याचा ठरावदेखील फेंटाळून लावावा हा कोठला शहाणपणा ?

आयुर्वेदाची आणि देशी वैद्यांची भरकौन्सिलांत टर उडवून प्रसिद्धी पावलेले ले० कर्नल जॅक्सन यांना शिक्षणाच्या बाबींत सक्ति अमलांत कशी आणावी हेंच मोठें कोडें पडलें आहे. ते म्हणतात कीं, या कामीं जर पोलिसांची योजना करावी तर आधींच लोकांचें त्यांच्यासंबंधीं जें वाईट मत आहे त्यांत भर पडेल व पोलिसांचें नांव अधिकच अप्रिय होईल. पण जॅक्सनसाहेबांची ही भीति अगदीं अनाठायीं आहे. पोलिसांनीं आपल्या स्वतःच्या आजपर्यंतच्या अगम्य व अतर्क्य लीलांनीं आपलें स्वतःचें नांव इतकें बद्दू करून घेतलेलें आहे कीं, आतां शिक्षणाच्या पायीं थोडीबहुत सक्ति करण्यानें त्या बदनामींत अधिक भर तर पडणार नाहींच, पण उलट त्यांच्या अधिकाराचा या सत्कार्यास थोडाबहुत हात लागला तर त्यांच्या पापाचें पारडें थोडें तरी हलकें होईल. सन्माननीय गृहस्थांचा आदर करण्याकरितां प्रेमानें जमलेल्या समाजास दंडुक्याच्या धाकानें हांकून लावण्यांत ज्या पोलिसांना क्षिति वाटत नाहीं त्यांना लहान मुलांना उचलून शाळेंत नेण्याचें काम जुलुमाचें वाटेल किंवा त्यामुळें लोकांत त्यांच्याविषयीं अप्रीति उत्पन्न होईल ही कल्पना जॅक्सनसाहेबांखेरीज दुसरा कोणी शक्य मानील असें वाटत नाहीं. मुलें शाळेंत पाठविण्याबद्दल सक्ति करावी लागल्यास पोलिसांची संख्या वाढवावी लागेल, अशीहि दीर्घशंका या शहाण्यांनीं प्रदर्शित केली आहे. परंतु बडोदें, म्हैसूर अगर इतर ज्या कोणत्या

संस्थानांनीं अशी सक्ति सुरू केली आहे त्या संस्थानांतून या कायद्यामुळें पोलिसांच्या संख्येची वाढ करावी लागली असा दाखला नाहीं. शिवाय हे टीकाकार दुसरी एक गोष्ट अजीबात विसरतात ती ही कीं, बडोदें संस्थानांत अत्यंत मागसलेल्या व डोंगराळ प्रांतांतल्या वस्तींतहि ही सक्ति लागू करण्यांत आली आहे; परंतु ना० पटेल यांचा ठराव केवळ म्युनिसिपालिटी असलेल्या गांवांपुरताच मर्यादित होता. आणि असल्या गांवांतील समाज साधारणतः समजूतदार असून त्यास स्वाभाविकपणेंच शिक्षणाची आवश्यकता भासूं लागली आहे. अशा स्थितींत पोलिसांच्या जुलुमाचें व त्याच्या परिणामाचें भेसुर चित्र काढून भावड्या सभासदांस भेडसावण्याचें प्रयोजन काय?

आतां राहिलेल्या ना० चौबळ यांच्या एका आक्षेपाचें निरसन करूं. 'शिक्षण मोफत करण्याचें प्रयोजन काय? ज्या सुखवस्तु गृहस्थांना किंवा लक्षाधीशांना शाळेची फी देण्याची ऐपत आहे त्यांच्या मुलांनीं मोफत शिक्षण कां घ्यावें?' या मनोभावनेंत ना० चौबळांचा जो सात्त्विक रोषाचा बहाणा आहे तेवढ्यापुरती ती भावना अभिनंदनीय आहे. गृहस्थाश्रमीयांस अन्नछत्रांत जेवणें केव्हांहि वर्ज्यच आहे; परंतु तेवढ्यानें सक्तीचें शिक्षण मोफत करूं नये असें मात्र सिद्ध होत नाहीं. मोफत शिक्षणाविरुद्ध आक्षेप या दृष्टीनें वरील कोटिक्रम अगदीं भ्रामक आहे. तथापि तो गुप्त हेत्वाभासमूलक असल्यानें मोठमोठ्या वावदूकांसहि तो चकवितो, सबब त्याचें खंडन करणें जरूर आहे. सक्तीचें शिक्षण मोफत दिलेंच पाहिजे असा आमचा आग्रह आहे, परंतु प्रत्येकानें शिक्षण मोफतच घ्यावें अशी सक्ति करावी असें आम्हीं कधींहि प्रतिपादन केलें नाहीं. यास्तव ज्यांस ऐपत असेल त्यांनीं आपल्या मुलांसाठीं खुशाल शेंपन्नास रुपये पगार देऊन स्वतंत्र शिक्षक ठेवावा. त्यास कायद्यानें प्रतिबंध होऊं शकणार नाहीं. परंतु सामान्य जनाकरितां सक्तीनें द्यावयाचें शिक्षण बिनमोबदलाच दिलें पाहिजे. याला पाहिलें मुख्य कारण हेंच कीं, सक्ति आणि मोबदला हे दोनहि शब्दच अत्यंत परस्परविरोधी आहेत. एकाद्यास एखादी वस्तु घ्यावयास भाग पाडणें आणि त्याच वेळीं त्याच्यावर त्या वस्तूची किंमत लादणें हा दुहेरी अन्याय होय. तो कोणीहि मान्य करणार नाहीं. बरें, जेवढीं मुलें सक्ति

केल्यामुळेंच शाळेंत आलीं. तेवढ्यांस फी माफ व आपखुषीनें आलेल्या मुलांकडून मात्र फी वसूल करावयाची असें म्हटल्यास प्रत्येक शाळेनजीक साक्षीपुराव्याचें कोर्ट भरवावें लागेल. ज्याला ऐपत असेल त्याजकडून फी घ्यावी आणि अगदींच नादान असेल त्यास मात्र नादार घ्यावें म्हटलें तरी साक्षीपुराव्याचा कांहीं खटाटोप कमी व्हावयाचा नाहीं, यास्तव सक्तीच्या शिक्षणांत फी माफच केली पाहिजे.

वर दर्शविलेल्या कारणांखेरीज तिसरें एक बलवत्तर कारण हें कीं, शिक्षण मोफत केलें तरी ऐपतदार गृहस्थांकडून पर्यायानें शाळेचा खर्च वसूल करून घ्यावयाचाच असतो. शिक्षण मोफत केलें म्हणून शालागृहें कांहीं गंधर्वनगराप्रमाणें आकाशांतून आपोआप उत्पन्न होत नाहींत, किंवा त्या शाळेंतील शिक्षक वायुभक्षण करून विनपगारी काम करूं शकत नाहींत. अर्थातच हा खर्च समाजांतील संपन्न स्थितींतील लोकांकडून प्रत्यक्ष नाहीं तर अप्रत्यक्ष वसूल होत असतो; आणि शाळेंत येणाऱ्या प्रत्येक मुलाकडून डोईपट्टीप्रमाणें तो वसूल न करितां अप्रत्यक्ष कराच्या रूपानेंच वसूल करणें चांगलें. कारण अप्रत्यक्ष करपद्धतींत जुलूम कमी होतो आणि कोणावरहि त्याच्या ऐपतीच्या व इच्छेच्या बाहेर बोजा बसत नाहीं. शिक्षण सक्तीचें व मोफत करावयाचें ठरल्यास सुस्थितींतील म्युनिसिपालिटी आपल्या चालू कर-पट्टींतून तो खर्च भागवूं शकेल, आणि भिकार म्युनिसिपालिटीला त्याकरितां निराळ्या कराची तरतूद करावी लागेल. परंतु केव्हांहि या कराचा बोजा संपन्न स्थितींतील लोकांवरच पडणार असल्यानें त्यांच्या मुलांस अन्न-छत्रांत जेवल्याचें पाप तर लागणार नाहींच, पण उलट आपल्या पालकांनीं भरलेल्या कराच्या रकमेंतून भिकाऱ्यांच्या मुलांस फुकट विद्यादान दिलें जात आहे असें त्यांस अभिमानानें म्हणतां येईल.

सक्तीच्या व मोफत शिक्षणाचें महत्त्व लोकांच्या मनावर आतां इतकें बिंबलें आहे कीं, ते याकरितां जादा करहि देण्यास तयार आहेत. सिंध-मधून अशी सूचना पूर्वीच आली होती. मिठासारख्या आवश्यक पदार्थां-वरील करदेखील थोडासा वाढवा, पण शिक्षण मोफत व सक्तीचें करा; असें ना० गोखले यांनींहि उद्गार काढले होते. ना० बसू यांनीं औद्योगिक कमिशनपुढील साक्षींत नुकतें हेंच सांगितलें. अशा परिस्थितींत मुंबई-

सरकारनें या गोष्टींचा शांतपणें सहानुभूतिपूर्वक विचार करावयास पाहिजे होता. खर्चाचा अंदाज ना० पटेल यांच्या हिशेबाप्रमाणें पंधरा लक्ष रुपये होईल, किंवा ना० शार्प यांचा कमाल अंदाज खरा धरला तरी फार तर तीस लक्ष रुपये होईल. परंतु कमिटी नेमून प्रत्यक्ष योजना तयार केल्याशिवाय या गोष्टीचा निर्णय कसा व्हावयाचा ? हा ठराव मान्य करून सरकारनें कमिटी नेमिली असती तर तिनें नक्की अंदाज ठरविला असता, त्यांतील कितवा हिस्सा म्युनिसिपालिट्यांनीं सोसावा, कितवा भाग प्रांतिक सरकारनें आपल्या शिरावर घ्यावा आणि वरिष्ठ सरकारच्या देणग्यांतून किती मदत मिळावी याची चर्चा झाली असती. आणि या गोष्टीची शक्यता व सुलभता तेव्हांच प्रत्ययास आली असती. परंतु इतकी कळकळ व उत्सुकता न दाखवितां उलट खर्चाचा मोठा बाऊ करून आणि वरिष्ठ सरकारच्या धोरणास विरोध येईल ही काल्पनिक भीति पुढें करून, मुंबई-सरकारनें या सुधारणेच्या कामीं अग्रस्थान पटकावण्याची आणि इतर प्रांतांना उदाहरण घालून देण्याची सोन्यासारखी संधि हातची दवडली, याबद्दल आम्हांस खेद वाटतो. कारण आतां ही मागणी एकट्या मुंबई इलाख्यांतच पुढें आली नसून मद्रासच्या महाजनसभेनें शिक्षणमंत्री सर शंकरन् नायर यांजकडे हीच मागणी केली आहे. संयुक्त प्रांतांतल्या काँग्रेस-कमिट्याहि हीच विनंति करीत आहेत. फार तर काय, पण मागसलेल्या मुसलमानांच्या लीगनेंदेखील आपल्या सुधारणांच्या मसुद्यांत हिचा समावेश केला आहे. तात्पर्य काय कीं, ही गोष्ट कांहीं आतां फार दिवस टाळतां येत नाहीं. कोठेंना कोठें तरी याचा उपक्रम लौकरच होणार; मग विनाकारण विलंब करून हातचें यश कां गमावतां ?

*मुलांच्या शिक्षणांतील 'षड्रिपु'

पुणें शहरांत मुलांस आणि मुलींस मोफत व सक्तीचें प्राथमिक शिक्षण एकदमच द्यावें कीं काय या वादग्रस्त प्रश्नाचा निकाल फिरून एकवार गेल्या शनिवारीं भरलेल्या म्युनिसिपालिटीच्या सभेंत लागला. हें शिक्षण एकदमच द्यावें असें म्हणणारे लोकनियुक्त सभासद अवघे सहा निघाले! त्यांची तळी उचलून धरण्यास जरी सरकारनियुक्त असे दहा सभासद सरसावले तरी त्यानेंहि कार्यभाग झाला नाहीं. म्युनिसिपालिटीतील लोकनियुक्त सभासदांची संख्या सव्वीस आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे या प्रश्नावर शहरांत खरें लोकमत काय आहे याचा तेव्हांच अंदाज होतो. वरील ठरावास प्रतिस्पर्धी सूचना म्हटली म्हणजे हें सक्तीचें शिक्षण मुलांस प्रथम लागूं करावें व नंतर मुलीस लागूं करावें ही होय. पण म्युनिसिपालिटींतील मवाळांच्या जिकीरीस कंटाळून सभासदांनीं अखेर या सूचनेचा विचार पुढील महिन्यापर्यंत तहकूब ठेवला. पुढील महिन्यांत झालें तरी याहि सूचनेचा निकाल पहिलीप्रमाणेंच लागणार हें उघड दिसतें. कारण सक्तीच्या शिक्षणाचा कायदा अंशतः तरी लागूं करून पुण्यानें आपलें शिक्षण-विषयक प्रगतिपर कर्तव्य केलें हें श्रेय राष्ट्रीय पक्षाच्या पदरांत पडणार या भीतीनें गांगरलेले मत्सरग्रस्त मवाळ आपला सूड उगविणार, आणि निदान मुलांना तरी जें मिळालें असतें त्या सक्तीच्या शिक्षणास अपशकुन करणार, हें पुण्यांतलें एखादें पोरहि आज सांगूं शकेल. तसें झाल्यास या हेवेखोर व हेकेखोर घातकी वर्तनाची जबाबदारी सर्वस्वीं मवाळपक्षावरच राहील, आपणांवर उरणार नाहीं, इतकें तरी समाधान मानण्यास राष्ट्रीयांना जागा आहे.

पण हें समाधान कांहीं खरें किंवा टिकाऊ नव्हे. कारण सक्तीचें शिक्षण शहरांत लागू करण्याची तळमळ राष्ट्रीय पक्षास आज दीड वर्ष लागून राहिलेली असून केवळ या षड्रिपूंच्या असमंजस विरोधामुळें ती निष्फळ झाली आहे व अद्यापि होत आहे, हें पाहून त्या सभासदांप्रमाणें आम्हासहि अत्यंत खेद वाटतो. पण राष्ट्रीयांची मोफत शिक्षणाची योजना

---

*केसरी, तारीख १७ फेब्रुवारी १९२०

उलथून पाडून वरती त्यांनाच अप्रामाणिक म्हटलेलें पाहिलें म्हणजे मात्र जखमेंत मीठ भरल्याप्रमाणें आमच्या खेदांत संतापाची भर पडते. "शहरच्या सांपत्तिक स्थितीचा विचार न करतां वाटेल तितका कर बसवा, मुलांस व मुलींस दोघांसहि सक्तीचें शिक्षण एकदमच द्या, आणि संभाळा, तसें न कराल तर आम्हांस मुलांनाहि तें शिक्षण द्यावयाचें नाहीं." असा आततायीपणा करणारे लोक मात्र सच्चे प्रामाणिक! आणि "आज मुलांपुरता हा उपक्रम करूं या, लवकरच अधिक खर्च करण्याची तयारी करूं व मग मुलींनाहि या सक्तीचा फायदा देऊं." असें म्हणणारे राष्ट्रीय मात्र अप्रामाणिक! खासा न्याय! पण हा 'न्याय' असें जनता कधींहि म्हणणार नाहीं. कारण उघड्या डोळ्याला धडधडीत दिसणारा सत्यासत्याचा निर्णय न पाहण्याइतकी जनता आंधळी झाली नाहीं. आपण सर्वगुणसंपन्न आहों, विशेषतः त्या गुणांत प्रामाणिकपणा हा आपला फारच ठळक सद्गुण आहे, असें मवाळांना आत्मप्रेमामुळें वाटणें स्वाभाविक आहे. पण जगानें तसें म्हणावें लागतें येवढेंच काय ते त्यांत कठीण!

पण आम्ही म्हणतों त्याप्रमाणें मवाळांची ही टवाळी आहे, कीं त्यांचें हें खरोखर स्त्रीशिक्षणविषयक प्रेमच आहे याचा थोडासा खुलासेवार विचार आज करूं. प्रथम ही गोष्ट सांगितली पाहिजे कीं, शिक्षण ही वस्तु अत्यंत मौल्यवान् व उपयुक्त असून पुरुषांप्रमाणें स्त्रियानांहि ती अवश्य हवी याविषयीं कोणाचाच मतभेद नाहीं. राष्ट्रीयपक्ष हा स्त्रीशिक्षणाचा द्वेष्टा आहे असें म्हणणें म्हणजे ती त्या पक्षाची शुद्ध बदनामी होय. राष्ट्रीयपक्षानें आपलें शक्तिसर्वस्व व बुद्धिसर्वस्व आजवर राजकीय चळवळीवर खर्चलें याचें कारण, आजच्या स्थितींत राजकीय चळवळ–निर्भिड राजकीय चळवळ–तीव्र राजकीय चळवळ–हेंच पारतंत्र्याच्या रोगास लागूं पडणारें असें सर्वांत अधिक गुणकारी औषध आहे असा राष्ट्रीयपक्षाचा विश्वास आहे. आज जरी सुधारणांचा कायदा होऊन या रोगाचें एखाद-दुसरें लक्षण लोपण्याची आशा दिसत असली, तरी हा कष्टसाध्य रोग समूळ नाहींसा होण्यास हें औषध आणखी किती तरी वर्षें एकसारखें घेत राहिलें पाहिजे हें उघड आहे. शिवाय दुर्दैवानें तें औषध देण्याची जबाबदारी पुढेंहि राष्ट्रीयपक्षावरच पडणार असेंहि दिसतें. कारण सुधारणांच्या कायद्यानें

आपले हात स्वर्गाला टेकले, राजकीय मोक्ष पदरांत पडला, अशी खोटी भावना करून घेऊन राजकीय चळवळ थांबवा, चळवळ थांबवा, असा उपदेश मवाळ आजच करीत सुटले आहेत. कसेंहि असो; राष्ट्रीयपक्षानें राजकीय चळवळीची धुरा उचलली म्हणून त्याला योग्य अशा सामाजिक सुधारणांचें महत्त्व कळत नाहीं, किंवा त्या अमलांत आणण्यास तो प्रतिकूलच राहतो, हें म्हणणें खोटें आहे. आज प्रत्येक प्रांताकडे पाहिलें असतां राष्ट्रीय पक्षांत समाजसुधारणावादी लोक वाटेल तितके सांपडतील, व हे लोकहि केवळ तोंडानें बोलणारे नसून प्रत्यक्ष कृति करणारे आहेत. योग्य त्या मर्यादेंत योग्य त्या प्रकारचें स्त्री-शिक्षण ही सुधारणा त्यांना सम्मत असलेल्या सुधारणांपैकींच आहे.

पण स्त्रीशिक्षणाचें महत्त्व कोणीं कितीहि वर्णिलें तरी त्यामुळें पुरुष व स्त्रिया यांची समाजांतील स्थानाची अदलाबदल तर राहोच पण सर्वस्वीं बरोबरीहि तूर्त तरी होऊं शकत नाहीं. पुरुषांनीं मिळवावें व स्त्रियांनीं रक्षावें आणि सद्व्यय करावा हा क्रम जगांत अनादिकालापासून चालत आला असून सुधारणेच्या बाबतींत अग्रगण्य असणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांतहि तोच आज जारी आहे. स्त्रिया या पूजनार्ह देवता आहेत असें मनूनें म्हटलें आहे; पण संसाराकरितां लागणाऱ्या द्रव्याचें अर्जन स्त्रियांनीं करावें आणि पुरुषांनीं त्यांचे पोशिंदे होऊन राहावें असें मनूनें सांगितलें नाहीं. तात्पर्य, संसारांतील आर्थिक जबाबदारी पुरुषाची पुरुषानेंच प्रथम निस्तरली पाहिजे, व ही जबाबदारी त्याच्या हातून पार पाडण्यास लागणारें शिक्षण तो आपखुषीनें न घेईल तर तें त्याला सक्तीनेंहि प्रथम दिलें पाहिजे. हें शिक्षण पुरुषांबरोबर स्त्रियांनाहि देतां आलें तर तें हरप्रयत्नानें जरूर द्यावें. पण तें जर कोणत्याहि योग्य कारणानें दोघांना एकसमयावच्छेदेंकरून देतां येण्यासारखें नसलेंच, तर त्या शिक्षणाचा मान म्हणा, फायदा म्हणा किंवा त्याचा जाच म्हणा, पुरुषांनाच प्रथम होणें अपरिहार्य आहे. एकच वस्तु दोघांना सारखी मिळण्याइतकी मुबलक असली म्हणजे ती कोणास द्यावी हा प्रश्नच उद्भवत नाहीं. पण ती तशी नसून कोणा एकालाच देतां येते, किंवा दोघांना सारखी वांटून दिल्यास कोणासहि धड उपयोगी पडण्याइतकी ती लाभत नाहीं, असा बिनतोड प्रसंग आल्यास आधीं कोण व

मग कोण हा प्रश्न मात्र टळत नाहीं. आणि आर्थिक तत्त्वांवर रचलेल्या व चाललेल्या समाजाच्या आजच्या स्थितींत सक्तीचें शिक्षण खर्चाच्या ओझ्यामुळें आधीं कोणास द्यावें व मग कोणास द्यावें; असा प्रश्न दुर्दैवानें उत्पन्न झाल्यास त्याचेंहि स्पष्ट उत्तर उघड आहे.

हें स्पष्ट उत्तर देण्यास कोणाहि समंजस मनुष्यानें भिण्याचें किंवा माघार घेण्याचें कारण नाहीं. सुधारणावादी म्हणवून घेणें याचा अर्थ सुधारणेच्या नांवाखालीं वाटतील त्या एकांतिक सूचना कोणीं केल्यास त्यांनाहि सक्तीनें संमति देणें असाच असेल, किंवा त्यांचे दोष दाखविण्याची चोरी होईल, तर तें सुधारणावादित्व आम्हास नको. प्रस्तुत वादांतहि अशा एकांतिक सूचनाच करण्यांत येत आहेत. या कामीं ज्या पाश्चात्य देशांचा आचार कांहीं सुधारकांना स्मृतिग्रंथाइतका प्रमाण वाटतो त्यांचीच साक्ष देतां येईल. फार काय पुण्यांतील मवाळांचे गुरु ना० गोखले यांचीहि साक्ष त्यांच्या विरुद्ध जाईल. मुलांच्या सक्तीच्या शिक्षणांत मुलगे व मुली यांचा समावेश एकदमच झाला पाहिजे कीं काय, किंवा सक्तीच्या शिक्षणाच्या कामीं स्थानिक संस्थांनीं खर्चाचा बोजा किती सोसावा, सरकारानें किती सोसावा यांविषयीं गोखल्यांनीं ज्या कबुल्या पूर्वी दिल्या आहेत त्या झुगारून देऊन त्यांचे चेले केवळ स्त्रीशिक्षणाच्या नांवावर पुण्यांतील लोकांना झुलवूं पाहात आहेत. आठ वर्षांपूर्वी गोखल्यांनीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत सक्तीच्या शिक्षणाचें बिल आणलें त्या वेळीं त्यावर जो वादविवाद झाला त्यांत गोखल्यांनीं दिलेल्या तीन कबुल्या या वादांत विचारांत घेण्यासारख्या आहेत. 'मुलांचें शिक्षण व मुलींचें शिक्षण एकदमच झालें पाहिजे व तसें न बनेल तर मुलांचेंहि शिक्षण मागें टाकावें.' असें गोखल्याचें मत नव्हतें. शक्य असेल तर तें एकदम झाल्यास बरें; असें गोखल्यांप्रमाणें आम्हासहि वाटतें; पण तें शक्य नसल्यास वेगवेगळ्या वेळीं म्हणजे थोडें आगेंमागें झाल्यास चालेल; त्यांत मोठासा घातपात किंवा सुधारणेविरुद्ध गुन्हा घडत नाहीं—असें आमच्याप्रमाणेंच गोखल्यांनींहि पण मत दिलें होतें.

कोणत्याहि समाजांत मुलगे व मुली शेंकडा अमुक एका प्रमाणांत आपखुषीनें शाळेंत जाऊं लागतील, तेव्हां मग सक्तीचें शिक्षण त्यांच्यावर सुरू करण्यास योग्य होतें असें गोखल्यांनीं कबूल केलें होतें. या कबुलीचा

अवश्य परिणामच असा आहे कीं, मुलांचें हें प्रमाण केव्हांहि व कोठेंहि मुलींच्या आधीं इष्ट मर्यादेंत येणार म्हणून शिक्षणाची सक्तीहि मुलींच्या आधीं मुलांवरच करण्याची पाळी येणार! हा बिनतोड प्रसंग लक्षांत घेऊनच गोखल्यांना मुलांमुलींवर शिक्षणाची सक्ति आगेमागें झाल्यास चालेल अशी कबुली त्यांच्या विचारीपणामुळें द्यावी लागली. पुण्यांतील मुलांमुलींची खानेसुमारी लक्षांत घेतां काय दिसतें? हेंच कीं शाळेंत आपखुषीनें पाठविल्या जाणाऱ्या मुलांचें शेंकडा प्रमाण साठावर असावें; म्हणून मुलांवर सक्ति करण्यास योग्य ती वेळ आली आहे. याच्या उलट आपखुषीनें शाळेंत जाणाऱ्या मुलींचें प्रमाण शेंकडा वीस इतकेंहि पडतें कीं नाहीं, याची शंकाच आहे; म्हणून त्यांच्यावर शिक्षणाची सक्ति करण्याची वेळ अद्यापि आली नाहीं हें उघड आहे. गोखल्यांनीं अशी कबुली दिली होती कीं, हें प्रमाण शेंकडा तेतीसपर्यंत न पडेल तर शिक्षणाची सक्ति न केल्यास चालेल. हा मुद्दा सांगण्याचें कारण इतकेंच कीं, मुलींना सक्तीनें शिक्षण देण्याच्या मोहक कल्पनेनें भुरळलेले असे पुण्यांतील कित्येक 'रोमान्सबहाद्दर' असेंहि म्हणूं लागले आहेत कीं, मुलांमुलींचें शिक्षण सक्तीचें एकदम करतां येत नसेल तर तें मुलींनाच प्रथम लागूं करावें! एवढेंच नव्हे, तर ज्या मागसलेल्या वर्गांत आपखुषीनें शाळेंत जाणाऱ्या मुलींची संख्या शेंकडा पांचसहाहि भरत नाहीं त्या वर्गावरच ही सक्ति आधी करावी! याचें नांव वितंडवाद; याचें नांव करणेकऱ्याचा वसा!

ना० गोखले यांनीं सक्तीच्या शिक्षणाच्या खर्चाचा विचार करितांना या खर्चाचा दोनतृतीयांश–मुलींच्याच काय पण मुलांच्याहि शिक्षणाच्या खर्चाचा दोनतृतीयांश–सरकारनें सोसला पाहिजे असा आग्रह धरला होता. शिक्षणाचें बिल मुंबई-कौन्सिलापुढें आलें त्याहि वेळीं खर्चाच्या या प्रमाणावरच जोर दिला गेला होता. अर्थात् कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें सक्तीच्या शिक्षणाची योजना करावयाची तर सरकारी हिस्सा दोन-तृतीयांश धरूनच करावयास पाहिजे. पुणें म्युनिसिपालिटीच्या स्कूलबोर्डानें हा हिस्सा निमा धरला ही त्याची चूक होय; व मुलींच्या शिक्षणाप्रीत्यर्थ सरकारनें दोनतृतीयांशच काय; पण तीनचतुर्थांशहि खर्च सोसावा असें सयुक्तिकपणें म्हणतां येण्यासारखें आहे, तें सोडून मवाळपक्षानें तो हिस्सा

निमाच धरला ही त्याचीहि चूक होय. पण या चुकीमुळें पुण्याल्या लोकांवर खर्चाचा नवा बोजा किती बसणार याचा विचार त्यांत झाला नाहीं! जर सर्व शिक्षणाचा खर्च दोनतृतीयांश गोखल्यांच्या म्हणण्याप्रमाणें सरकार सोशील, व मुलींच्या शिक्षणाप्रीत्यर्थ याहून जादा देणगी देईल, तर पुण्यास हें सक्तीचें शिक्षण दोघांना एकदम देण्याला परवडेल. अथवा सर्वसंमत अशा एखाद्या नव्या करानें ही रक्कम जुळण्याचा संभव असेल तर गोष्ट निराळी; तसें झालें तरी सक्तीच्या तत्त्वाचे सामान्य आक्षेप उरतात ते वेगळेच. पण तें असो. "खर्चाचा हिशेब करतांना म्युनिसिपालिटी हल्लीं खर्च करते आहे तो लक्षांत घेऊं नये, यापुढें नवीन येणारा खर्च तेवढाच लक्षांत घ्यावा." असेंहि कित्येकांकडून सुचविण्यांत आलें आहे. पण ही चूक आहे. लहान मुलाला भात अधिक झाला म्हणजे 'त्यांतला तुला जो नको तो आधीं खा व हवा तो मागाहून खा' असें सांगण्यासारखाच वरील युक्तिवाद पोरकट आहे. कारण जुना खर्च झाला काय वा नवा काय, दोनहि देणारे लोक एकच आहेत हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

समाजाची सांपत्तिक स्थिति, कर देण्याची पात्रता वगैरे सामान्य पण अपरिहार्य गोष्टी लक्षांत न घेतां, आपण कांहींतरी एक नवी गोष्ट करणार आहों या कल्पनेनें नुसतें हुरळून जावयाचें असेल व कोंकरउड्याच मारावयाच्या असतील तर गोष्ट वेगळी. पण प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाचा हिस्सा सरकारनें किती सोसावा हा मुद्दा महत्त्वाचा असून त्यावर वेळींच जरूर तो जोर दिला पाहिजे. या बाबतींत तत्त्वाचा हातचा बाण घालवून मग ची ची करीत बसण्यांत अर्थ नाहीं. सक्तीचें शिक्षण देऊं इच्छिणाऱ्या सर्व म्युनिसिपालिट्यांनीं वेळींच हा आग्रह धरला तर सरकारास त्या प्रश्नाचा विचार करावा लागेल. नाहीं तर एका श्रीमंत किंवा हौशी म्युनिसिपालिटीचें उदाहरण परस्पर दुसऱ्यास दाखवून स्वतः सरकार नामानिराळें होण्याचा संभव आहे. या दृष्टीनें पाहातां सक्तीचें शिक्षण अमलांत येण्यास एखादें अधिक वर्ष लागलें तरी चालेल पण खर्चाच्या वांटणीचें तत्त्व उत्साहाच्या आवेशांत आपण गमावतां कामा नये. ही मोठी जबाबदारी आहे. हा प्रश्न केवळ व्यक्तिविषयक हौसेचा नाहीं. व्यक्तिविषयक औदार्यानें किंवा स्वार्थत्यागानें सुटण्यासारखा हा प्रश्न असता तर गोष्ट वेगळी, पण

दुर्दैवानें तसा तो नाहीं. पुणें म्युनिसिपालिटीच्या कराचें प्रमाण दरमाणशीं आजच इतकें भारी आहे कीं, मुंबईसारख्या श्रीमंत, धनाढ्य शहरच्या मनुष्यासहि त्याच्या उत्पन्नाच्या मानानें पुण्याच्या माणसांपेक्षां कमी कर पडतो. असें असतां मुंबईचें उदाहरण पुण्यास विचारांत कां घेऊं नये ? मुंबई म्युनिसिपालिटीनें पूर्वी ना० मेथा यांच्या सल्ल्यानें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा सर्व खर्च सरकारनेंच सोसला पाहिजे अशी मागणी केली होती; व खुद्द मुंबईनें आणखी दहा वर्षेंपर्यंत सक्तीचें शिक्षण मुलींस काय पण मुलांसहि लागूं करावयाचें नाहीं असें ठरविलें आहे. अशा स्थितींत पुण्यानें जर पुढें होऊन मुलांपुरतें सक्तीचें शिक्षण आजच सुरू केलें तर तें काय थोडें झालें ? मुंबईवर ताण करण्याचीच ज्याला तामस हांव असेल त्याच्याहि दृष्टीनें येवढ्यांत ती भागावी.

या बाबतींत ना० गोखले यांनीं ता. १६ मार्च १९११ रोजीं वरिष्ठ कौन्सिलांत केलेल्या भाषणांतील पुढील उतारा पुणें म्युनिसिपालिटींतील मवाळांनीं नीट लक्षांत घ्यावा. "It is obvious that the whole working of this bill must depend in the first instance upon the share, which the Government is prepared to bear of the cost of compulsory education wherever it is intorduced. I find that in England the Parliamentary grant covers about $\frac{2}{3}$ of the total expenditure on elementary schools. In Scotland it amounts to more than that preportion, whereas in Ireland it meets practically the whole cost. I think we are entitled to ask that in India at least $\frac{2}{3}$ of the new expenditure should be borne by the state." (सक्तीच्या शिक्षणाच्या बिलाची अंमलबजावणी सर्वस्वीं एका गोष्टीवर अवलंबून राहते हें उघड आहे. ती गोष्ट म्हणजे ज्या ठिकाणीं ती अंमलबजावणी होईल त्या ठिकाणीं लागणाऱ्या खर्चाचा कितवा हिस्सा सरकार सोसणार ही होय; किंबहुना सरकार किती हिस्सा सोडणार हीच गोष्ट सर्वांत आधीं ठरली पाहिजे. इंग्लंडमध्यें प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाचा सुमारें $\frac{2}{3}$ हिस्सा पार्लमेंट म्हणजे खुद्द सरकार देतें. स्कॉटलंडमध्यें हें प्रमाण $\frac{2}{3}$ हून अधिक पडतें; व आयर्लंडांत तर बहुतेक हा सर्व खर्च स्वतः सरकारच सोसतें. तात्पर्य, या शिक्षणाचा निदान $\frac{2}{3}$ इतका खर्च सरकारनें सोसावा अशी मागणी करण्याचा हक्क आम्हांस आहे.)

खुद्द विलायतेंतच जर ही स्थिति, तर आम्ही हिंदुस्थानांत काय कुबेराच बाप लागून गेलों आहों म्हणून सक्तीच्या शिक्षणाचा निम्याहून अधिक खर्च आम्हीं सरकारास मागूं नये? यावर कोणी असें म्हणेल कीं, आज तुम्ही जास्ती पडेल तो खर्च करून सुरुवात तरी करा म्हणजे पुढेंमागें सरकार तुम्हांस तो देईल. पण चालत्या मुलाला उचलून कडेवर घेण्याइतकें सरकार कांहीं वेडें नाहीं. लॉर्ड रिपन यांच्या वेळेपासून–प्राथमिक शिक्षण म्युनिसिपालिट्यांच्या स्वाधीन झाल्यापासून–सरकारनें शिक्षणखर्च सोसण्यांत जो कृपणपणा दाखविला त्याचा इतिहास ज्यांना माहीत आहे ते तरी हा नवा खर्च डोळे मिटून अंगावर घेण्याचा उपदेश म्युनिसिपालिट्यांना करणार नाहींत. यावर कोणी असें म्हणेल कीं, वर्ष दीड वर्षांत शिक्षणखातें दिवाणाच्या हातीं जाऊन लोकमतवादी कौन्सिलें निर्माण होणार आहेत, तेव्हां खर्चाचा हा प्रश्न पुढें सोडवून घ्यावा. पण त्यावर असें उत्तर देतां येईल कीं, आधीं हें खातें ज्याच्या हातीं जाईल तो खरा मुत्सद्दी 'दिवाण' असेल किंवा 'दिवाणा' असेल कोणीं सांगावें? शिवाय खर्चाचा प्रश्न जसा वर्ष दीड वर्षांनें सुटला तरी चालेल तसेंच सक्तीच्या शिक्षणाची योजनाहि हा निकाल लागल्यावर म्हणजे वर्ष दीड वर्षांनें अमलांत आली तरी कां चालूं नये? आज आपखुषीच्या तत्त्वावर जितके मुलगे किंवा मुली शाळेंत येतात तितक्या सर्वांची सोय पुणें म्युनिसिपालिटीनें केलेली आहे व जरूर ती अधिक व्यवस्था ती करीलहि. मुलांच्या शिक्षणास फी आहे ती फीहि मुलींस आज माफ आहे. अशा स्थितींत उभयतांना एकदम सक्तीचें शिक्षण सुरू करून खर्चाचा मोठा बोजा कमिटीनें पतकरावा, लोकांवर भारी कर बसवावे, हातचें तत्त्व गमवावें आणि मग सरकारच्या तोंडाकडे पाहात बसावें ही गोष्ट आम्हास पसंत नाहीं. शिक्षणाच्या सरळ स्वाभाविक वाढीनें पुणें स्कूलबोर्डचें बजेट सालोसाल रीतसर फुगत जाईल त्यास कोणीच ना म्हणणार नाहीं. किंबहुना सक्ति न करतां शिक्षणास उत्तेजन द्यावें म्हणून थोडीशी रक्कम लागल्यास ती मुद्दाम द्यावी. पण जुन्या किंवा नव्या सरकारशीं भांडून सरकारच्या गळ्यांत खर्चाचा योग्य हिस्सा घालीपर्यंत ना० गोखले यांनीं दर्शविलेलें तत्त्व सोडूं नये.

अवघ्या दोन वर्षांपूर्वी सक्तीच्या शिक्षणाचें बिल मुंबई कौन्सिलांत पास झालें

तेव्हां मुलामुलींच्या शिक्षणासंबंधानें कोणाचें काय मत होतें हेंहि पाहण्यासारखें आहे. ता. २६ जुलै १९१७ रोजींच्या वादविवादांत ना. काव्हर्नटन यांच्या टीकेस उत्तर देतांना खुद्द ना. पटेल यांनीं स्वतःच असें बोलून दाखविलें कीं, "बिलाला कायद्याचें स्वरूप आलें असतां प्रथम त्याची अंमलबजावणी मुलग्यांपुरतीच व्हावयाची आहे, कालांतरानेंच तो कायदा मुलींना लागू होईल. किंबहुना या कायद्याची सरास अंमलबजावणी करावयाची झाल्यास फक्त मुलांच्या शिक्षणाबाबद जो अधिक खर्च येईल तोच तेवढा तूर्त लक्षांत घेतला पाहिजे." मुलींच्या शिक्षणाकरितां अधिक खर्च लक्षांत घ्यावयासच नको असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. "We have only to consider the cost of the boys to start with." फार काय पण जे ना. परांजपे आज मुलांमुलींना सक्ति एकदमच झाली पाहिजे, नाहीं तर सगळें गांठोडें बुडेल असा कांगावा करीत आहेत त्यांचें स्वतःचेंहि मत तेव्हां तसें नव्हतें. ता. ३ डिसेंबर १९१७ रोजीं हें बिल दुसऱ्या वाचनाकरितां कौन्सिलापुढें आलें तेव्हां ना. खानबहादूर पीरबक्ष यांनीं सुचविलेल्या एका उपसूचनेस उत्तर देतांना ना. परांजपे असें म्हणाले आहेत कीं, हें बिल क्वचित् कोणी म्युनिसिपालिटी मुलींनाहि लावील असा संभव मानला तरी त्यांत फारसें बिघडेल असें नाहीं; पण तसें प्रथमच घडेल–म्हणजे बिल मुलींना ताबडतोब लागूं कोणी करील–अशी आमची मुळीं अपेक्षाच नाहीं. "Of course we do not expect that the bill will be immediately applied to girls." जी गोष्ट दोन वर्षांपूर्वी नामदार परांजप्यांच्या अपेक्षेच्याहि कक्षेबाहेर होती तीच आज इतक्या महत्त्वाची व निर्विवाद होऊन बसते कीं, ती न घडेल तर जग बुडेल! या मतांतरावरून पुण्याच्या मवाळपक्षांत प्रामाणिकपणाचे इरसाल कांदे कसकसे आहेत हें वाचकांनींच पहावें!

पाश्चात्य देशांतील दाखले किंवा खुद्द आपल्या गुरुजींचीं मतें यांची ओळख पुणें म्युनिसिपालिटींतील मवाळांना नसेल असें संभवत नाहीं. पण ना० गोखले हे एक शहाणे तर आपण सवाई शहाणे अशी ज्यांस घमेंड वाटत आहे त्यांना त्या ओळखीचें काय? 'काय हो, गोखले यांच्या मताचा आधार केसरीनें कां द्यावा? केसरीनें त्यांचीं मतें कधीं कोणत्या

बाबतींत मानलीं होतीं ?' असा प्रश्न यावर आम्हास कोणी करील हें आम्ही जाणून आहों, पण त्याला आमचें उत्तरहि तयार आहे. ना० गोखले यांचें एखादें मत चांगलें असल्यास तें चांगलें म्हणण्यास केसरीनें कधीं माघार घेतली नाहीं. पण तसेंहि न मानलें तरी गोखल्यांचीं मतें केसरीवर बंधनकारक होण्याचा हा प्रश्न नाहीं. तीं त्यांच्या अनुयायांनीं बंधनकारक मानावीं कीं नाहीं हा प्रश्न आहे. व त्याचें उत्तर हेंच कीं, पुराव्याच्या कायद्याप्रमाणें किंवा सामान्य व्यवहाराप्रमाणें पाहिलें तरी त्या मताचें बंधन त्यांना चादांत मान्य केलेंच पाहिजे. गोखले हे नेमस्त होते, पण त्यांचा नेमस्तपणा सुसंगत तरी होता. म्हणूनच वर दर्शविलेल्या मर्यादा सक्तीच्या शिक्षणांत त्यांनीं मान्य केल्या. पण आज त्यांच्या अनुयायांना घरच्या म्हातारीभोंवतीं तेवढा जहालपणा करावयास हवा आहे. सुधारणांचा पहिला हप्ता मिळावा म्हणून कांहीं तरी करून दाखवायला पाहिजे, म्हणून कांहीं तरी करूं या, असें म्हणून मुलांमुलींचें शिक्षण एकदम हातीं घेतलेंच पाहिजे अशी ओरड करीत सुटलेले व स्वतःस जबाबदार म्हणविणारे मवाळ स्वतःचें हंसें मात्र करून घेत आहेत. आम्ही तर स्वच्छ असें म्हणतों कीं, त्यांच्या या नाचरेपणाच्या मुळाशीं स्त्रीशिक्षणाची कळकळ ही खरी नसून कांहीं तरी करून लब्धप्रतिष्ठित बनण्याची हांव हीच आहे. जबाबदारीच्या भावनेला भुलून नसत्या बाजू अंगावर घेत घेत असेच हे जाणार असतील तर त्यांची 'जबाबदारी' लोकांना फारच भोंवणार हें भविष्य करण्यास फारशी हरकत नाहीं. सुधारणेचा जो नवा बाजार भरणार त्यांत 'उचलेगिरी' करून कांहीं हातीं लागतें कां पाहावें अशा भावनेनें आरंभिलेल्या उद्योगाचींहीं कच्चीं फळें आहेत. म्हणून मवाळांना त्यांचे स्त्रीशिक्षणासारखे जुने चोचलेच काय पण ज्यांची त्यांनीं आजपर्यंत "तेली, तांबोळी व गुंड" या शब्दांनीं संभावना केली त्यांना बगलेंत मारण्याचे नवे चाळेहि सुचूं लागले आहेत. टिळकांनीं पूर्वी ज्यांचें हित पाहिलें व ज्यांनीं टिळकांना मदत केली अशा सामान्य जनतेला जे मवाळ पूर्वी 'ब्रूटफोर्स' किंवा 'पशु' असें म्हणत असत त्यांनाच आतां 'पशुपति' ही पदवी देऊन मवाळांनीं त्यांची आराधना आरंभिली आहे. पण पशुपति हें दैवत थोडेंसें भोळें असलें, त्याला तांडव नृत्य व अर्धनरनारीनटेश्वरत्व प्रिय असलें तरी सच्चा उपासक

कोण व लुच्चा उपासक कोण हें थोडेंबहुत जाणण्याचें ज्ञान त्याला आहे हें मात्र मवाळांनीं विसरूं नये.

देशी राजकुमारांचें शिक्षण*

गेल्या आठवड्यांत कलकत्ता येथें ना० लॉर्ड कर्झन यांनीं राजकुमारांच्या शिक्षणाचे बाबतींत विचार करण्याकरितां एक कान्फरन्स भरविलें होतें. याप्रसंगीं हिंदुस्थानांतील विद्यमान लहानथोर कुमार-विद्यालयाचे अधिपति जमले होते. कार्यक्रम सुरू करितांना व्हाइसरॉयसाहेबांनीं अध्यक्षाचे नात्यानें नेहमींप्रमाणें विस्तृत व अर्थप्रचुर असें प्रास्तविक भाषण करून, त्यामध्यें देशी राजकुमारांच्या शिक्षणाची प्रस्तुतची स्थिति व तत्संबंधी अवश्य सुधारणा वगैरे गोष्टींचें समग्र पर्यालोचन केलें. नंतर दोन तीन दिवसपर्यंत जमलेल्या कुमार-विद्यालयाधिपतींनीं याच विषयासंबंधीं पोटमुद्द्यांचा सूक्ष्म विचार केला व कान्फरन्स बरखास्त झालें. या वाटाघाटींत अखेर निकाल काय ठरला हें अद्यापि निश्चयात्मक कळलें नाहीं. तथापि एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, हल्लींच्या राजकुमारांच्या शिक्षणक्रमांत व्यवहारोपयोगी असा बराच फेरबदल करण्यांत येईल; व कुमारांच्या शाळा किंवा कॉलेजें ह्यांची संख्या कांहींतरी वाढेल. लॉर्डकर्झन यांचें मन उदार असो अगर नसो, एवढें खरें कीं, त्यांच्या मुत्सद्दीगिरीला सर्व विषय सारखेच प्रिय असावे असें दिसतें; आणि त्यांची बुद्धि अकुंठित व कल्पना-शक्ति प्रबल असल्यामुळें एका विषयावरून दुसऱ्या विषयावर व दुसऱ्या विषयावरून तिसऱ्यावर ते मोठ्या लीलेनें उड्या मारूं शकतात. हिंदुस्थानां-तील राज्यकारभाराची त्यांची मुदत अवघी पांच वर्षांची असल्यामुळें व तेवढ्यांत मी कांहींना कांहीं तरी करून दाखवीन अशी त्यांना ईर्षा असल्यामुळें लळिताच्या एका रात्रींत अठरा सोंगें आणून दाखविणाऱ्या नटाप्रमाणें त्यांनीं मुत्सद्दीगिरीचे अनेकविध चमत्कार करून, किंवा राज्य-कारभाराचे दहावीस प्रश्न एखाद्या सर्कसमधील पात्राच्या हातावर नाचणाऱ्या चेंडूप्रमाणें खेळवून दाखवावे हें साहजिकच आहे.

*केसरी, तारीख ६ जून १९०४

देशी राजकुमारांचें शिक्षण हा विषय राज्यकारभारांतील महत्त्वाचा एक प्रश्न अशा रीतीनें इंग्रज सरकारापूर्वी येथें असणाऱ्या राज्यकर्त्यांस कधींहि भासलेला दिसत नाहीं. याचें कारण असें वाटतें कीं, हल्लींप्रमाणें प्रजा व मुख्य राज्यकर्ते यांमध्यें हक्कांचे दृष्टीनें पाहतां स्वतंत्र परंतु वस्तुस्थितीनें पाहातां प्रजेहूनहि अधिक परतंत्र असा राजेरजवाड्यांचा वर्ग, हा देश परकीयांच्या एक छत्राखालीं येण्यापूर्वी, कधींहि उत्पन्न झालेला नव्हता. देशी राजेरजवाड्यांच्या मुलांस पूर्वी जें शिक्षण मिळत असे तें घरच्या घरीं व राज्यकारभाराच्या धंद्यांतच मिळत असे. एखाद्या डोंबाऱ्याचे मुलास खरें 'व्यवहारापयोगी' शिक्षण मिळण्यास त्याला कधीं कोणत्या शाळेंत घालावा लागत नाहीं हें आपण नेहमीं पाहातों, त्याचप्रमाणें पूर्वीच्या राजेरजवाड्यांच्या मुलांस लष्करी शिक्षण खुद्द रणांगणांत व राजनीतीचें शिक्षण दुर्दैवानें वडिलांच्या गादीवर बसण्याचा प्रसंग आलेला नसल्यास गादीजवळ बसून पण राजदरबारांतच मिळत असे. यामुळें अर्थातच कर्झनसाहेबांना, आमच्या कुमारांचें शिक्षण व्यवहारापयोगी पण थोडेंसें लष्करी, परंतु एकंदरीनें निरुपद्रवी असें कसें करावें, हा जो बिकट प्रश्न येऊन पडलेला आहे, तो पूर्वी पडण्याचें कारण नव्हतें. दुसरें असें कीं, पूर्वी होऊन गेलेल्या मोठमोठ्या खुद्द राजांसच मिळालेलें शिक्षण जर लिहिण्यावाचण्यापलीकडे गेलेलें नव्हतें, तर राजकुमारांस तरी दुसरें शिक्षण कोठून मिळणार? व नुसत्या लिहिण्यावाचण्याचें शिक्षण देण्यास शाळा किंवा कॉलेजें काय करावयाचीं? खरोखरच, पूर्वी एकवेळ हिंदुस्थानांत प्रख्यात व पराक्रमी असे होऊन गेलेले राजे व इतिहासावरून पाहतां त्यांस जें शिक्षण मिळालें होतें तें शिक्षण या दोन गोष्टींचा एकत्र विचार केला असतां लॉर्ड कर्झन यांस देशी राजकुमारांच्या शिक्षणाबद्दल पडलेली चिंता पाहून आम्हांस आश्चर्य वाटतें व हंसूंहि येतें. जमीनअस्मानचें अंतर असणाऱ्या लहानमोठ्या गोष्टींची तुलना करणें हा एक दोषच आहे. तथापि प्रस्तुतचा मुद्दा स्पष्ट करून सांगण्याकरितां सदरहु दोषाचेंहि क्षणभर अवलंबन करण्यास आम्ही तयार आहों. राम व युधिष्ठिर यांच्या सत्कीर्तीचा दुंदुभि अजूनहि लोकांच्या कर्णरंध्रांत दुमदुमत आहे, परंतु हे राजे कुमारावस्थेंत असतांना त्यांस किती विषय शिकविले जात होते, त्यांस

कोणत्या शाळेंत घातलें होतें किंवा त्यांस वार्षिक परीक्षेंत किती मार्क मिळाले होते याचा कांहीं कोठें उल्लेख सांपडत नाहीं. अशोक व विक्रम यांपैकीं एकाचे हृदयांत झालेला धर्मोदय व दुसऱ्याच्या आंगचा पराक्रम हे जगविख्यात आहेत. परंतु यांना बाळपणीं शिकविल्या गेलेल्या क्रमिक पुस्तकांची याद कोठें मिळत नाहीं. भोजराजा हा बहुधा सर्व देशी राजांत अधिक विद्याव्यसनी व विद्वद्गुणग्राही असा मानला गेला आहे; परंतु त्याचे बालपणीं काव्यालंकारावरचीं कोणतीं संक्षिप्त पुस्तकें त्याचा शिक्षक त्यास शिकवीत होता हें कोणी सांगेल तर आमची ऐकण्याची इच्छा आहे. आधुनिक काळीं जणूं केवळ 'असतापासून सतच' निघावें त्याप्रमाणें मुसलमानी राज्याचे योगानें विध्वंस पावलेल्या स्वराज्याचे रक्षेमधून सर्वांगपूर्ण अशी हिंदुपदपातशाही स्थापित करणाऱ्या शिवाजी महाराजांस लिहितांवाचतां मुळीं येत होतें किंवा नाहीं याविषयीं इतिहाससंशोधक अद्यापहि वादविवाद करीत आहेत. तिकडे पश्चिमेकडे पाहिलें तरी हीच स्थिति दिसून येईल. आलेक्झांडराला लष्करी शिक्षण देण्यास एखादें सँडर्स्ट त्यावेळीं नव्हते हें खास आहे. इंग्लंडचा सर्वांत लोकप्रिय व सन्मान्य राजा आल्फ्रेड याच्या चरित्रांत कोठेंहि तो घोकंपट्टी करीत असलेल्या बुकांचा किंवा त्याला समजून दिल्या जाणाऱ्या एखाद्या नीतिबोधाचा (Moral Text-Book) उल्लेख सांपडत नाहीं. उल्लेख सांपडतो तो याच गोष्टीचा कीं, आल्फ्रेड राजानें केवळ बाल्यावस्थेंत असतांच स्वदेशाचे शत्रु जे डेन्स लोक त्यांचें विरुद्ध लढण्याचे कामीं आपल्या भावास मदत करण्यास एकदम धांव घेतली! रशियाचे पीटर धी ग्रेट राजानें आपल्या अमदानींत जितक्या सुधारणा एकदम केल्या, तितक्या दुसऱ्या कोणत्याहि राजानें क्वचित्च केल्या असतील. परंतु त्याचे बाळपणीं त्यास शिक्षणाचा आनंद अनुभविण्यास सांपडल्याचें दिसत नसून लहानपणापासूनच राज्योपाधीचे दगदगींत त्याचा काळ गेला असें दिसतें. जर्मनीचा प्रख्यात बादशहा फ्रेडरिक धि ग्रेट याचीहि गोष्ट अशीच आहे. पुढें एवढ्या पराक्रमी होणाऱ्या राजाला बाळपणीं घरकोंबडेपणाचा छंद लागावा, लष्करी परेडीनें कपाळशूळ उठावा, शिकारीचें भय वाटावें व फक्त आनंद काय तो येऊन जाऊन एखाद्या गवयाच्या पोराप्रमाणें अलगुज वाजवीत बसण्यांतच वाटावा, व या सर्वांकरितां बापाचे हातचे

चाबूक खाण्याचे भीतीनें आईच्या पाठीशीं दडणें हाच कायतो त्याच्या बाळपणाच्या शिक्षणाचा मासला असावा ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय? बालपणचें शिक्षण व तरुणपणचें कर्तृत्व यांमध्यें, निदान राज्यकर्त्यासंबंधीं तरी पाहातां, विशेष सबंध आहे असें मानणाऱ्यांस वरील प्रश्न सोडविणें थोडेंसें बिकट जाणार नाहीं काय? तात्पर्य, कर्तृत्वसंपन्न राजा निपजण्यास हल्लीं ज्यास आपण सुशिक्षण असें मानतों तें मिळणें अवश्यकच आहे असें आम्हांस तरी निदान वाटत नाहीं.

यास उलट प्रत्यंतर पाहणें झाल्यास असें दिसून येईल कीं, गेल्या तीस वर्षांत हिंदुस्थानांत राजकुमार कॉलेजें स्थापित होऊन सुशिक्षणाचे ढीगच्या ढीग पडले असतांहि नव्या पिढीच्या राजेरजवाड्यांमध्यें असा कोणता सद्गुणी अगर सुसंस्कृत मनाचा पुतळा निर्माण झाला आहे कीं, ज्याकडे बोट दाखवून या कॉलेजांची किंवा तीं स्थापन करणाऱ्या राज्यकर्त्यांची आपणांस धन्यता वाटेल? एवढेंच नव्हे तर, उलट हल्लींच्या शिक्षणाचे छापांतून बाहेर पडलेल्या राजकुमारांपैकीं कित्येक असे दाखवितां येतील कीं, ज्यांच्यावर शिक्षण हें पालथ्या घागरीवर ओतलेल्या पाण्याप्रमाणें वाहून गेलें व ते पूर्वीच्या शुद्ध व स्वयंभू मठपणामुळें किंवा दुर्गुणापायीं सरकारच्या व लोकांच्या केवळ तिरस्कारास मात्र पात्र झाले. दुसरे कित्येक असे दिसत आहेत कीं, त्यांस इंग्रजी शिक्षणानें म्हणजे साहेबांच्या सहवासानें फक्त औपचारिक व गोड गोड असें बोलतां मात्र येऊं लागलें, परंतु त्यांच्या आंगांतील रानदांडगेपणा खरोखर जसाच्यातसा राहून हें मिश्रण तिऱ्हाइताचे फसवणुकीस मात्र कारण झालें. दुसरे कित्येक स्वदेशप्रियतेचा डौल घालण्यास शिकले मात्र; परंतु नखशिखांत अंतर्बाह्य विदेशी बनले; व ब्रिटिश राज्याच्या धोरणाचें अनुकरण करण्याची चटक लागल्यानें, परंतु हातीं सत्ता किंवा अंतःकरणांत उदारता नसल्यानें त्यांचें थोतांड लोकांस व सरकारास कळून ते हास्यास्पद होत आहेत. दुसरे कित्येक अधिक साधेभोळे असल्यामुळें त्यांना लपवाछपवीचा प्रकार माहीत नाहीं खरें, परंतु आपल्या इंग्लिश गुरूनें शिकविलेल्या मंत्राच्या अहर्निश पाठामुळ स्वदेश हें नांव मुळीं त्यांस माहीत नाहींसें झालें आहे. राज्यांतील सर्व मुख्याधिकारी इंग्रजच पाहिजेत असें त्यांस वाटतें, व हिंदुस्थानची आर्थि

विलायतेची तिजोरी यांमध्यें अभेद प्रीति उत्पन्न झाल्यामुळें त्यांना आपल्या रयतेचे लाखों रुपये इंग्रजांचे कार्यास चुटकीसरशी देऊन टाकले तरी त्या-योगें आपण स्वदेशाचें कल्याणच करीत आहों असा त्यांस भास उत्पन्न होतो. अशांव्यतिरिक्त एखादा कोणी संस्थानिक शिक्षणाचे साहाय्यानें स्वावलंबी, महत्त्वाकांक्षी, स्वपरहितविवेकी व परतेजासहिष्णु असा निपजला असलाच तर उच्छृंखल खोड्याच्या बरगड्यांत टोंचणाऱ्या लोखंडी चक्राप्रमाणें व बाहेर न दिसतां तोंडाचें रक्त काढणाऱ्या कांटेलगामाप्रमाणें दुःसह अशा पोलिटिकल एजंटाच्या कैचीमुळें हताश व दुःखी होऊन तो एखाद्या कोंपऱ्यांत झुरत पडलेला असेल. ही सर्व स्थिति लक्षांत आणतां गेल्या तीस वर्षांत राज-कुमारांना जें शिक्षण देण्यांत आलें त्यानें राजकुमारांचा किंवा लोकांचा विशेष फायदा झाला असें आम्हांस वाटत नाहीं; व लॉर्ड कर्झन यांनीं हें शिक्षण कितीहि अधिक "व्यवहारोपयोगी" केलें तरी त्यापासूनहि कांहीं फायदा होण्याची आशा नाहीं. आमच्या म्हणण्याचा मुद्दा हाच कीं, खरें व्यवहारो-पयोगी शिक्षण जबाबदारी आंगावर पडल्याशिवाय येत नाहीं, मग तें शिक्षण राज्यकारभारासंबंधी अगर युद्धकलेसंबंधी असो. पैकीं युद्धकलेचें तर इंग्रजबहादरांच्या आश्रयछत्रामुळें नांवच काढण्याचें कारण उरलें नाहीं; व खरा राज्यकारभारहि संपुष्टांत येऊन त्याचें सूत्रचालकत्व सर्व पोलिटिकल खात्याचे अधिकाऱ्यांकडे गेलें आहे.

शिक्षणाचे मुख्य दोन नमुने मांडतां येतील; व हे दोन्ही नमुने उद्देश-भिन्नत्वामुळें पृथक् स्वरूपाचे आहेत. पैकीं पहिल्या नमुन्याचा उद्देश आत्म-विकास किंवा व्यक्तीची सुधारणा हा होय; व दुसऱ्या नमुन्याचा उद्देश समाजविकास किंवा एकंदर समाजाची अगर देशाची सुधारणा हा होय. पहिला नमुना स्वीकारला असतां त्यापासून स्वतः व्यक्ति रूपसंपन्न व चपल होऊन तिचे मनोविकार तीव्र होतील, व मनुष्याची प्रवृत्ति टापटीप, सुख-सेवन वगैरे गोष्टींकडे होईल. मात्र कर्तव्यबुद्धि त्याजमध्यें पुरी विकास पावणार नाहीं. या नमुन्याप्रमाणें शिक्षण पावलेल्या मनुष्यास स्वतः ज्ञान मिळविण्याची इच्छा होईल. परंतु मिळविलेल्या ज्ञानापासून समाजास फायदा कसा देतां येईल याकडे त्याचें विशेष लक्ष लागणार नाहीं. अशा शिक्षणाचा मनुष्य तत्त्वज्ञानी होण्यास लायक असतो. व ज्याला आपण दिव्यदृष्टि

म्हणतों ती अशाच मनुष्यास एखादेवेळीं येते. दुसऱ्या नमुन्याचें स्वरूप व परिणाम याच्या उलट आहेत. या नमुन्याच्या शिक्षणानें मनुष्य उद्योगी, व्यवहार-चतुर, बोलका होतो. परंतु तो विद्येचा दास बनत नाहीं. स्वतःच्या हक्कांचें रक्षण करण्याविषयीं तो दक्ष असतो व समाजघटना किंवा राजनीति वगैरे विषय त्यास अधिक प्रिय होतात. यांपैकीं शिक्षणाचा पहिला नमुना पूर्वी ग्रीस देशांत दिसून आला व दुसरा रोमन लोकांनीं अंगिकारिला होता. व किंचित् विचार करून पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, आपले राजेरजवाड्यांस जें शिक्षण द्यावयाचें तें दुसऱ्या नमुन्याचेंच असलें पाहिजे. म्हणजे ते समाजनेते किंवा समाजघटक अशा दृष्टीनें त्यांस शिक्षण दिलें पाहिजे. केवळ व्यक्तिशः त्यांचाच विकास होण्यासारखें शिक्षण त्यांस देऊन उपयोगी नाहीं. मनुस्मृतींत असें सांगितलें आहे कीं, "बालोऽपिनावमन्तव्यो मनुष्य इति भूमीपः। महती देवतां ह्येषा नररूपेण तिष्ठति॥" अल्पवयी राजकुमार व भावी राजा हे दोन्हीसारखेच मानले पाहिजेत; व श्लोकांतील दैविकस्वरूप जरी क्षणभर बाजूस ठेविलें तरी राजकुमारांचें बाळपणचें सर्व शिक्षण सर्वांशीं राज्यव्यवहारोपयोगी असेंच असलें पाहिजे असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु हल्लींचें शिक्षण पाहतां तें लॉर्ड कर्झन यांनींच सांगितल्याप्रमाणें बिलकूल राज्यव्यवहारोपयोगी नाहीं. ज्यांना पुढें राज्यकारभार करावयाचा त्यांना भूमितींतील गर्दभ-सिद्धांत (assproposition) किंवा संशयखोर साहेबांच्या चरकांतून सत्य व सत्त्व दोन्हीहि ज्यांतून पिळून निघालीं आहेत असा हिंदुस्थानचा इतिहास, किंवा पूर्वीच्या कथापुराणांतील उदार व महानुभाव विभूतींचें नांवहि ऐकूं येत नाहीं असा एखादा नीतिबोध, किंवा काथ्याच्या गादीवर घसरून पडणें हेंच ज्यांतील साहस, व गौरकाय तालिममास्तराचा कृपाकटाक्ष हेंच ज्यांचें बक्षीस, असे तालीमखान्यांतील लटुपटीच्या मर्दुमकीचे खेळ हे सर्व देशी राजकुमारांस शिकवून काय फायदा? जर त्यांनीं आपल्या पूर्वजांच्यासारखें नांव मिळवावें अशी सरकाराची खरी इच्छा असेल तर त्यांनीं त्यास भरपूर लष्करी शिक्षण देऊन व रणांगणावर त्यांस नेऊन इंग्लिश सरदारांच्या बरोबरीनें खांदा लावून भिडण्यास परवानगी दिली पाहिजे. ते खरे मुत्सद्दी व्हावे असा हेतु असेल तर त्यास आपले

सर्व अधिकार स्वतंत्रपणानें बजावण्याची परवानगी द्यावी. त्यांचा स्वदेशी-पणा कायम रहावा असें असेल तर युरोपियन शिक्षकांचें बंड मोडून जुन्या चालीचे शास्त्रीपंडित व नव्या पद्धतीनें शिकून विद्वान् झालेले उत्तम नेटिव शिक्षक यांचे स्वाधीन त्यांस करावें. म्हणजे ते शिक्षणाचे सर्व विषय देशी पद्धतीनें शिकून स्वाभिमानी होतील. व असें झालें तरच ते समाजाचे खरे कल्याणकर्ते होतील. हें जोंपर्यंत होत नाहीं व शिक्षणाचे बाबतींतहि आपला "हाचा" गमावण्यास इंग्रज सरकार तयार नाहीं. तोंपर्यंत कुमारांच्या शिक्षणाच्या सुधारणेबद्दल कितीहि लांब लांब गप्पा मारिल्या तरी त्या व्यर्थच आहेत असें आम्ही समजतों. त्यापासून राजकुमारवर्गाचें खरें हित कांहीं एक न होतां इतर प्रजाजनांप्रमाणें त्यांची ही अवस्था दिवसेंदिवस निकृष्टच होत जाणार.

*"प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते"

येथील फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल प्रो० रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे दोन वर्षांपूर्वी विलायतेंत विद्याभ्यासाचे कामीं उत्तम यश मिळवून स्वदेशास परत आले. ज्या संस्थेच्या अभिमानामुळें नांवाजण्यासारखा स्वार्थत्याग करून आजन्म शिक्षकाचें काम करण्याचें पत्करलें, त्या संस्थेच्या धुरीणत्वाचा म्हणजे मुख्य अध्यापकत्वाचा बोजा त्यांनीं आंगावर घेतला; त्यावेळीं इतर पुष्कळ लोकांबरोबर आम्हांसहि अशी आशा वाटत होती कीं, प्रि० परांजपे यांस विद्याव्यासंगाची जी गोडी विलायतेंत लागली, तीच इकडे आल्यावरहि कायम ठेवून त्यांनीं ज्या विषयांत विशेष प्राविण्य मिळविलें, त्यांतच अभ्यासाचा क्रम चालवून एखादा सुरेखसा नवीन शोध, एखादें नवें चटकदार प्रमेय, अगर गणितशास्त्रांतील विस्तृत ज्ञानाच्या एकीकरणास साधनीभूत असा एखादा ग्रंथ अगर प्राच्य व पाश्चात्य गणितग्रंथांचें तुलनादृष्टीनें परिशीलन करून त्यावर ते एखादा निबंध लिहितील; परंतु कॉलेजांतील विद्यार्थ्यांस नित्यक्रमागत दैनिक

* केसरी, तारीख १३ मे १९०५

पाठशिकविण्यापलीकडे त्यांच्या विशिष्ट विद्यापरिशीलनाचा प्रत्यय लोकांस कोणत्याहि तऱ्हेनें अद्याप आलेला नाहीं. अगर येईल असें त्यांच्या नित्यक्रमाच्या हकीकतीवरून दिसत नाहीं. येथेंच मजल खुंटती तरी बरें होतें; परंतु विशिष्ट गोष्ट ही कीं, प्रोफेसरमजकूर हे विलायतेस जाऊन आल्याची प्रतीति विद्यार्थ्यांस अगर त्यांच्या पालकांस जी आलेली आहे ती त्यांच्या विद्वत्तेपेक्षां इतर गोष्टींनींच अधिक आलेली आहे. ठरलेल्या हिंदु सणाच्या सुट्या जशाच्या तशा न देणें, परंपरागत चालत आलेल्या हिंदु-रिवाजांची विनाकारण थट्टा करून विद्यार्थ्यांचीं मनें कलुषित करणें, स्वाभिमान अगर स्वदेशाभिमान कोणीं विद्यार्थ्यांनीं दाखविला असतां नाक मुरडून त्यांची अवहेलना करणें, इत्यादि गोष्टींनीं प्रो० परांजपे यांनीं आपले अपक्व धार्मिक व राजकीय विचार कॉलेजांतील विद्यार्थ्यांवर केवळ अधिकारबलानें लादण्याचा प्रयत्न केल्याचें आमचे कानीं यापूर्वीच आलें असून त्याबद्दल प्रसिद्धपणें गवगवाहि झालेला होता. परंतु 'ईस्ट अँड वेस्ट' या नावाच्या मासिक पुस्तकाच्या मे महिन्याच्या अंकांत प्रोफेसर. मजकुरांनीं 'हिंदुस्थानांत धार्मिक शिक्षणाची आवश्यकता आहे काय?' अशा अर्थसूचक प्रश्नाच्या मथळ्याखालीं जो एक निबंध लिहिलेला आहे त्यामुळें त्यांची अविचारपरंपरा संपली नसून अद्यापि तिची वाढ होण्याचा संभव आहे हें पाहून आम्हांस खेद होतो. अलीकडे कांहीं विशिष्ट कारणा-मुळें फर्ग्युसन कॉलेजच्या शिक्षकवर्गानें या इलाख्यांतील वरिष्ठ विद्याधिकाऱ्यां-च्या इच्छेस मान देऊन सार्वजनिक विषयासंबंधीं मौनव्रत स्वीकारलें होतें. हें फर्ग्युसन कॉलेजाच्या मूळ उत्पादकांच्या हेतूंस कितपत धरून आहे याचा विचार आज आम्हांस कर्तव्य नाहीं. तथापि एका अर्थीं हें मौनव्रत बरें असें प्रोफेसर परांजपे यांच्या हल्लींच्या लेखावरून म्हणावें लागतें. कारण, एकतर सार्वजनिक प्रश्नांच्या वाटाघाटींत फारसा न पडणाऱ्या प्रोफेसरास आपलें काम चांगलें न करण्यास वेळेची तरी सबब राहूं शकत नाहीं. व भर्तृहरीनें 'स्वायत्तमेकांतगुणं विधात्रा विनिर्मितं छादनमज्ञ-मायाः' या श्लोकार्धांत म्हटल्याप्रमाणें मौनव्रत हें अज्ञतेवर छाया धरणारें एक छत्रच असतें. प्रो० परांजपे हे तरुण आहेत, बुद्धिवान् आहेत व गणितविषयांत त्यांनीं प्राविण्य संपादन केलें आहे; या गोष्टी आम्हांस

सर्वांशीं कबूल असून त्याबद्दल आम्ही सर्वथा त्यांचें अभिनंदनच करतों. परंतु वरील तिन्हींपैकीं एका किंवा सर्वहि गोष्टींमुळें धर्मविषयावर किंवा धर्मशिक्षण या विषयावरहि त्यांनीं ठाम मतें ठोकून द्यावीं अशा प्रकारची पात्रता त्यांचे ठिकाणीं आलेली नाहीं व येणें शक्यहि नाहीं. त्यास निराळ्या प्रकारचे संस्कार लागत असतात. प्रो० परांजपे यांचें अल्पवय असून बुद्धिसंस्कारास अनुकूल अशीं त्यांतलीं शेवटलीं वर्षें परदेशांत व परकीय आचारविचारांच्या निकट परिचयांत गेलेलीं आहेत. व इकडे आल्यावरहि लोकसमाजांत जितके ते मिसळावयास पाहिजेत तितके ते कधीं मिसळले नाहींत. विद्याध्ययन पूर्ण झालें तरी त्यांनीं संसारयात्रेंतील प्रथमाश्रमहि ओलांडला नाहीं, म्हणजे अर्थात् संसाराचीं सुखदुःखें व समाजाचें हितानहित यांचा त्यास सूक्ष्मानुभवहि झालेला नाहीं. व ज्या विषयावर त्यांनीं हल्लींचा लेख लिहिण्याचें धाडस केलें आहे, त्यावर आर्यवाङ्मयांतील तर राहूं द्याच, परंतु इंग्रजी वाङ्मयांतीलहि एखादा सर्वमान्य ग्रंथ वाचला असेल किंवा नाहीं याविषयीं शंकाच आहे. अशा स्थितींत आमच्या शाळांतून व विद्यापीठांतून किंबहुना त्यांतील विद्यार्थ्यांस कोणत्याहि रीतीनें धर्मशिक्षण देण्याची आवश्यकता नाहीं असें बेधडक विधान करणें यासारखें धाडस दुसरें कोणतेंहि नसेल. वास्तविक जबाबदारी न ओळखून व आपली अपात्रता ध्यानांत न आणतां केलेल्या विधानाची तिरस्कारपूर्वक अवहेलना हाच योग्य परामर्ष होय; परंतु प्रस्तुत प्रसंगीं फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल या नात्यानें प्रो० परांजपे यांस स्थानमाहात्म्याचा जो फायदा मिळत आहे तो लक्षांत घेतला असतां त्यांच्या सदोष विचारपद्धतीचें योग्य वेळींच खंडण करून फर्ग्युसन कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांस सावधगिरीचा इषारा देणें हें आमचें कर्तव्य आहे असें आम्ही समजतों.

प्रो० परांजपे यांच्या लेखांतील विधानें इतकीं असंबद्ध आहेत कीं, त्यांची एकवाक्यता करणें कठिण आहे; परंतु खालीं दिलेल्या कांहीं कांहीं विधानांवरून त्यांची विचारसरणी लक्षांत येईल.प्रोफेसर मजकूर असें म्हणतात कीं, 'धार्मिक शिक्षणाची आवश्यकता हें हल्लीं राष्ट्रीय स्वाभिमानाच्या रडगाण्याचें एक पालुपदच होऊन बसलें आहे. काँग्रेस घ्या किंवा कान्फरन्स घ्या, सर्वांचें म्हणणें एकच व तें हें कीं, मुलांना धार्मिक शिक्षण

यावें.'धार्मिक शिक्षणाचा हा विषय प्रोफेसर मजकूर म्हणतात त्याप्रमाणें आजकाल सार्वजनिक चर्चेचा होऊन बसला आहे हें खरें आहे. एवढेंच नव्हे; तर प्रोफेसर मजकुरांस कदाचित् माहीत नाहीं अशीहि एक गोष्ट या बाबतींत आम्हांस सांगतां येईल, व ती ही कीं, १८५४ सालीं शिक्षण या विषयावर हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी सर चॉर्लस वुड यांनीं लिहिलेल्या मिनिटापासून आजतागायत सरकारच्या असा कोणताहि ठराव अगर हुकूम नाहीं कीं, ज्यामध्यें धार्मिक शिक्षणास प्रत्यक्ष प्रतिबंध केलेला आहे, अगर अप्रत्यक्ष रीतीनें तसें शिक्षण देणारांचा उत्साह-भंग केलेला आहे. एवढेंच नव्हे तर, आम्हीं ऐकलें हें खरें असेल, तर प्राथमिक शाळांमधून तरी सामान्य धर्म व नीति यांसंबंधीं मुलांस दिवसांतून थोडेंबहुत शिक्षण देण्यांत यावें अशाविषयींची कांहींतरी योजना करण्याचा उपक्रम चालू आहे. बनारस येथें काढलेल्या सेंट्रल हिंदु कॉलेजास व मुंबईस चाललेल्या आर्यन् एज्युकेशन सोसायटीच्या शाळांस लोकाश्रय बराच आहे, व दुसरे पक्षीं ज्या शाळांतून धर्मशिक्षण दिलें जातें, त्यांस धर्मशिक्षणाचे सबबीवर ग्रँट देण्याचें नाकारण्याची विद्याखात्याची छाती नाहीं. या गोष्टी प्रसिद्ध असून प्रो० परांजपे यांसहि त्या माहीत असाव्या. तेव्हां अशा रीतीनें सर्वमान्य असलेली गोष्ट, ती सर्वमान्य आहे अशी प्रोफेसर मजकुरांची कबुली असतांहि ती त्यांसच तेवढी नापसंत कशी पडते हा प्रश्न सहजच उपस्थित होतो. यावर प्रोफेसर मजकुरांनीं दिलेलें उत्तर लक्षांत घेतां धार्मिक शिक्षणाची लोकमान्यता हीच त्यांच्या तिजविषयींच्या प्रतिकूल अभिप्रायाचें कारण होय असें म्हणावें लागतें. प्रोफेसर मजकुरांचें म्हणणें असें कीं, जी गोष्ट सर्वमान्य किंवा अत्यंत लोकप्रिय आहे तिजबद्दल प्रतिकूल अभिप्राय प्रगट करण्यास मनुष्यास धैर्य असावें लागतें. गोष्ट खरी आहे; पण असलें धैर्य किंवा ऐकक्कल्लीपणा दाखविणाऱ्या गृहस्थांचीं मतें नेहमीं खरींच असतात असें नाहीं. कारण, केवळ गतानुगतिकत्व हा जसा दोष आहे तसाच लोकप्रिय गोष्टीचा विनाकारण तिरस्कार करणें हाहि पण तितकाच मोठा दोष होय. एका आधुनिक नाटककारानें आपले एका पात्राचे तोंडून असें वदविलें आहे कीं, 'सर्व मनुष्यें सुलट्या पायानें चालतात व भुतांनीं मात्र उलट्या पायांनीं चालून ही परंपरा मोडली आहे; एवढ्याकरितांच मनुष्यांपेक्षां भुतें मला

अधिक प्रिय आहेत.' प्रो० परांजपे यांचें गतानुगतिकत्वाबद्दलचें वैर जर विक्षिप्त पात्राच्यासारखेंच असेल तर धर्मशिक्षणाच्या विरुद्ध त्यांनीं केलेल्या ओरडीस कोणीच महत्त्व देणार नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, लोकप्रिय असलेली गोष्ट जर खरोखरच सदोष व त्याज्य असेल तरच, तिची निंदा करणाऱ्याच्या धैर्याला कांहींतरी किंमत येईल. एरवीं नैतिक धैर्य व निखालस चारगटपणा हे दोन्ही शब्द समानार्थक झाल्याचें व्यवहारांत आपण पुष्कळ वेळां पाहतों. 'आपणास कोणी नांवें ठेवो' समाजविद्वेशी म्हणो किंवा देशद्रोही असेंहि म्हणो, त्याबद्दल आपणांस मुळींच पर्वा नाहीं व या बाबतींत आपण हर्बर्ट स्पेन्सर यांचेंच वळण गिरवीत आहों.' असें प्रोफेसर मजकुरांनीं आपल्या लेखांत स्पष्ट म्हटलें आहे! वळण अलौकिक खास आहे; परंतु कोणतेंहि वळण साधलें तर बरें, नाहींतर केवळ थोरामोठ्यांचें नांव सांगितल्यानें बचाव न होतां लिहिणारा हास्यास्पद मात्र होतो, ही गोष्ट प्रोफेसर मजकुरांनीं लक्षांत ठेवावयास पाहिजे होती. भाग्य पुण्याचें कीं, हर्बर्ट स्पेन्सररूपी सूर्याचा पश्चिमेस अस्त होऊन तो पुण्याच्या पश्चिम दिशेस धैर्यमेरूवर निर्भेळ तात्त्विक विचाराचा शोध करण्याकरितां पुनः उगवला! त्यांतूनहि फर्ग्युसन कॉलेज विशेष धन्य, कीं ज्यास तात्त्विक विचाराच्या सरणीनें हर्बर्ट स्पेन्सर यांशीं तुल्य व विनयमिश्रित नैतिक धैर्यानें त्याहूनहि कांकणभर सरस असा महानुभाव तरुण पुरुष प्रिन्सिपाल होण्यास मिळाला. अशा प्रकारचें अध्यक्षाचे अमदानींत विद्याधिकाऱ्याच्या इच्छेप्रमाणें कॉलेजांतील स्वदेशाभिमानावरून लवकरच बोळा फिरल्यास त्यांत विशेष आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं हें उघड आहे. असो; धार्मिक शिक्षणाचा विषय आजकाल सर्वमान्य व लोकप्रिय आहे व तत्प्रतिकूल मत व्यक्त करणारा माणूस देशद्रोही मानला जाण्याचाहि संभव आहे. अशी स्थिति प्रो० परांजपे यांस कबूल असतां, हें प्रतिकूल मत जितक्या सावधगिरीनें त्यांनीं लोकांपुढें मांडावयास पाहिजे होतें तितक्या सावधगिरीनें तें मांडलें नाहीं याबद्दल आम्हांस खेद वाटतो. त्यांनींच दिलेलीं उदाहरणें घेतां फ्रान्समध्यें जर्मनीची उघड स्तुति करणारास किंवा दक्षिण आफ्रिकेंत काळे गोरे सर्व लोकांस सारखे हक्क असावे असें म्हणणारास किंवा चीनमध्यें परकीय भुतें (Foreigndevils) देशांतून हाकून लावूं

इच्छिणाऱ्या बाक्सर बंडवाल्यांची निंदा करणाऱ्यांस जें प्रायश्चित्त मिळेल तसें प्रायश्चित्त प्रोफेसर परांजपे यांस स्थापणांस मिळणार नाहीं अशी खात्री आहे; व म्हणून एकवेळ देशद्रोही म्हणवून घेण्यांतहि त्यांस भूषण वाटत आहे असें दिसतें; परंतु वरील मताविरुद्ध बोलणारे जे कोणी थोडे लोक त्या त्या देशांत असतील ते आपल्या मतांचें समर्थन जितक्या शांतपणें करितात किंवा त्यांना त्या विषयांची जितकी माहिती असते तितकी मनाची समता किंवा माहिती प्रोफेसर मजकुरांनीं आपलीशी करून घेतलेली आहे काय ? असा त्यांस आमचा एक प्रश्न आहे. ज्या देशांतील लोकांचें अनुकरण करण्याची अनावर इच्छा प्रोफेसर मजकूर यांस झालेली दिसते, त्यांपैकीं इंग्लंडचेंच उदाहरण घेतलें तरी त्यांच्याच कबुलीवरून असें दिसतें कीं, केंब्रिज व ऑक्सफर्ड येथील विद्यालयांत प्रॉटेस्टंट मताच्या विद्यार्थ्यांवर कॉलेजांतील ईश्वरोपासनेच्या मंदिरांत जाऊन उपासना करण्याबद्दलची सक्ति कॉलेजच्या नियमावरून केली जाते. खरोखरच धर्मशिक्षणांत ग्राह्यांश मुळींच नसेल, तर इंग्लंडसारख्या सुधारलेल्या देशांत अशी सक्ति या विसाव्या शतकांत कां केली जावी, हें प्रोफेसर मजकूर सांगूं शकतील काय ? ईश्वरोपासना हा जर एक निरर्थक–बाष्कळपणाचा–प्रकार मानला तर ऑक्सफर्ड व केंब्रिज येथील विद्यार्थ्यांचा जो प्रत्यहीं इतका वेळ व्यर्थ जातो त्याबद्दल विद्याधिकारी अगर पालक वर्ग अगदींच दुर्लक्ष करतात व ते आपली जबाबदारी मुळींच ओळखत नाहींत असें म्हटलें पाहिजे. व दुसरे पक्षीं जर धर्मोपासनेंत जाणाऱ्या वेळाचा योग्य व्यय होतो असें म्हटलें, तर मग तितक्या वेळापुरतें तरी धर्मशिक्षण आमचे इकडील शाळांतून व कॉलेजांतून देण्यास कोणती हरकत आहे यांचेंहि उत्तर मिळावयास पाहिजे. प्रोफेसर परांजपे यांनीं काढलेला मुख्य आक्षेप असा आहे कीं, हल्लीं आपल्या राष्ट्रीयत्वाच्या सीमेंत हिंदु, मुसलमान, पारशी, खिस्ती वगैरे सर्व जातींचा समावेश होत असल्यामुळें अमुक एक धर्मशिक्षण देणें हें अगदीं अशक्य होय; व खऱ्या राष्ट्रीयत्वाचा अभ्युदय होण्यास धर्मशिक्षण हें साहाय्यभूत न होतां विघातक होईल. परंतु हें नुसतें विधान असून त्याचें समर्पक समाधान प्रोफेसर परांजपे यांच्या लेखांत मुळींच नाहीं. मुळांत एक चूक प्रोफेसर मजकुरांच्या विचारांत झालेली दिसते व ती ही कीं, त्यांचे म

शाळांतून वगैरे धर्मशिक्षण द्यावयाचें म्हणजे एकाच विवक्षित धर्माचें शिक्षण सर्व धर्मीयांस जणुं काय द्यावयाचें. परंतु असें मानण्यास बिलकूल आधार नाहीं. दुसरे पक्षीं पाहातां प्रत्येक धर्माच्या विद्यार्थ्यांस त्या त्या धर्माचें शिक्षण दिलें असतां जातिविरोध वाढून राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेच्या वाढीस धक्का बसेल हें म्हणणें व राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्यानें आपण सधन होण्याची इच्छा केली असतां एकंदर राष्ट्र तितक्या प्रमाणानें सधन न होतां व्यक्तिविषयक स्वार्थबुद्धीच्या विरोधामुळें एकंदर राष्ट्र निर्धन होईल हें म्हणणें, हीं दोन्हीहि सारखींच समंजसपणाचीं होत. एकाच शाळेंत अनेक धर्माचीं मुलें असूं शकतील व तितक्यांच्या धर्मशिक्षणाची निराळी व्यवस्था करणें हें त्रासाचें म्हणा अगर खर्चाचें म्हणा, कसेंहि म्हटलें तरी गैरसोयीचें आहे. असला किरकोळ मुद्दा प्रो० परांजपे यांनीं काढलेला नाहीं व त्यांनीं तो काढला असता तरी प्रत्येक शाळांतून—कॉलेजांतून संस्कृताप्रमाणें पर्शियन, लॅटिन, फ्रेंच वगैरे भाषा शिकवण्याची व्यवस्था केली जाते, हें ज्यांस माहीत आहे त्यांस वरील प्रश्नाचें उत्तर देणें अवघड जाणार नाहीं. परंतु मुख्य प्रश्न एवढाच आहे कीं, ज्या त्या धर्माचें शिक्षण तद्धर्मीयांस दिल्यानें राष्ट्रीयत्वास हानि येईल किंवा कसें? व यासंबंधीं एवढें सांगितलें असतां पुरें होईल कीं, धर्मशिक्षण म्हणजे जातिविरोधाचें शिक्षण नव्हे. अलीगड येथें मुसलमान लोकांनीं मुसलमानी धर्माचे पायावर शिक्षणाची रचना केली आहे व उलटपक्षीं बनारस येथील सेंट्रल हिंदु कॉलेजांतील शिक्षण हिंदु-धर्मतत्त्वावर रचलें आहे. एवढ्यावरून उद्यां अलीगड कॉलेजचा ग्रॅज्युएट व सेंट्रल हिंदु कॉलेजचा ग्रॅज्युएट यांची आगगाडींत गांठ पडली असतां ते एकमेकांच्या उरावर बसतीलच असें प्रो० परांजपे यांचें म्हणणें असेल तर मग धर्मशिक्षणाविषयीं वाद न करतां प्रोफेसर मजकुरांच्या अज्ञानाची व अदूरदर्शित्वाची कींव करावी लागेल; निदान एवढें तरी म्हणावें लागतें कीं, कॉंग्रेसच्या मंडपांत किंवा उंच पीठावर शेजारींशेजारीं बसणाऱ्या सभासदांस जातीनें व धर्मानें अस्सल व अभिमानी असणारे हिंदु असूं शकतात; ही गोष्ट प्रोफेसर मजकुरांस अवगत नसावी हें अत्यंत आश्चर्य होय.

प्रो० परांजपे यांचे लेखांत दुसरेहि एक दोन महत्त्वाचे मुद्दे विचार करण्यासारखे आहेत. धर्मशिक्षणाची आवश्यकता आज नाहीं एवढेंच

म्हणून ते राहिले नाहींत; तर खुद्द धर्मावरच त्यांनीं आपली गदा उगारलेली आहे, व हिंदुस्थानांत धर्मतत्त्वावर नीतीचा पाया रचलेला आहे, ही गोष्ट अगदीं घातक झालेली असून नीतीच्या पायावर धर्माची रचना झाली पाहिजे असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे ! परंतु धर्माहून नीति श्रेष्ठ व अर्थात् सर्वधर्मीयांस ती समान असें झालें तरी शाळांतून ती शिकविण्याचें कारण नाहीं असेंहि त्यांनीं मत दिलें आहे. या सर्व मुद्द्यांचा विचार करण्यास आज स्थलावकाश नाहीं. परंतु प्रोफेसर मजकुरांचा लेख वाचून त्यांची शिक्षकाच्या जबाबदारीची कल्पना अत्यंत संकुचित आहे; किंबहुना तिची व्याप्ति ठराविक धडा शिकवून धोतर झाडून मोकळें होण्यापलीकडे जात नाहीं एवढें सांगितल्यावांचून व त्याबद्दल अत्यंत खेद प्रदर्शित केल्यावांचून आजचा लेख पुरा करवत नाहीं.

शील सुधारणारें शिक्षण*

हिंदुस्थानांतील तरुणपिढीचें शील सुधारण्यास काय उपाय योजावे, यासंबंधानें अलीकडे सर्वत्र वाटाघाट सुरू आहे. मुंबईसरकारानें तर या बाबतींत विशेष लक्ष घातलें आहे. गेल्या आठवड्यांत मुंबई मुक्कामीं शिक्षक लोकांची परिषद् भरविण्यांत आली होती. त्या प्रसंगीं याच विषयावर कित्येक गृहस्थांनीं निबंध वाचले व खुद्द नामदार गव्हर्नरसाहेबांनींहि नीतिशिक्षणावर आपले विचार विस्तृतपणें बोलून दाखविले. धार्मिक व नैतिक शिक्षण देण्याकरितां नवीन शिक्षक, नवीन पुस्तकें, वगैरे साधनांचा उपयोग करण्याची पद्धति सरकार कदाचित् शाळाखात्याकडून अमलांत आणवील असाहि संभव आहे. धर्मशिक्षणाच्या आवश्यकतेविषयीं केसरीमध्यें सुमारें दोन महिन्यांपूर्वी आम्हीं लिहिलेंच होतें. तथापि या प्रसंगीं तोच विषय आणखी एक मजल पुढें नेऊन, त्याचा आपण विचार करूं.

वर सांगितलेल्या परिषदेंत निश्चयात्मक असा कोणताच ठराव मंजूर

* केसरी, तारीख १२ एप्रिल १९१०

झाला नाहीं; व एक दोन तास वादविवाद करून ठराव करण्यासारखा हा विषयहि पण नाहीं. परिषदेंत धर्म, नीति, नागरिकत्व, राजकाज व आरोग्यशास्त्र इत्यादि विषयांच्या शिक्षणासंबंधानें चर्चा झाली. आतां शील बनविण्याच्या दृष्टीनें म्हटलें तर एका धार्मिक शिक्षणाचा विचारहि पुरे आहे, व म्हटलें तर राजकाज व आरोग्यशास्त्र हेंचसें काय, पण आणखीहि अनेक बाबींचा समावेश त्या शिक्षणांत करावा लागेल. पण वास्तविक आपल्या एकंदर तरुण पिढीस आज कांहीं एक मोठाच नैतिक रोग झालेला आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कांहीं थोडीं मुलें अत्याचारी निघालीं, एवढ्यानें सर्वच तरुण पिढीच्या डोक्यांतील मेंदू बिघडला असें म्हणणें म्हणजे, मुलांच्यापेक्षां आपल्या स्वतःच्या वेडेपणाचाच पुरावा अधिक पटाविण्यासारखें आहे. तरुण पिढीस जर खरोखरच वाचा फुटण्याचा मार्ग असता तर तिनेंहि यावेळीं एका आवाजानें निषेधपूर्वक हीच गोष्ट सांगितली असती असें आम्हांस वाटतें. तसेंच शाळेंत दिसून येणारी मुलांची वर्तणूक व तीं अत्याचारी बनणें अगर न बनणें यांच्यामध्यें कांहीं दृढ व निकट संबंध असतो असेंहि आम्हांस वाटत नाहीं. परवां नाशिक येथील खुनाच्या खटल्यांत एका शिक्षकानें साक्ष दिली, तींत दोघां आरोपींबद्दल बोलतांना, त्यांची शाळेंतील वर्तणूक नांव ठेवण्यासारखी नव्हती—नांव घेण्यासारखी होती—असें सांगितल्याचें आम्हांस स्मरतें. नाशिकचा खटला सोडून इतर कित्येक खटल्यांतील तरुण आरोपींचें पूर्ववृत्त पाहिलें असतांहि असाच प्रकार असल्याचें आढळून येईल, असें आम्हांस वाटतें. तथापि, नामदार गव्हर्नरसाहेबांनीं परिषदेपुढें सांगितल्याप्रमाणें, धर्मबुद्धि व ज्ञान यांची फारकत झाल्यामुळेंच हिंदुस्थानांतील हल्लीची तरुण पिढी युरोपियन देशांतील तरुण पिढीपेक्षां अधिक नादान बनत चालली आहे, हें खरें आहे असें जर क्षणभर मानून चाललें तर ही फारकत रद्द कशी करितां येईल, याचा विचार करणें अगत्याचें ठरतें.

परिषदेंत धर्मशिक्षण व नीतिशिक्षण यांच्यामध्यें भेद मानण्यांत येऊन त्यासंबंधानें परस्पर विरुद्ध अशीं अनेक मतें प्रतिपादन करण्यांत आलीं. उदाहरणार्थ, मुंबईचे लॉर्ड बिशप यांनीं शाळांतून धर्मशिक्षणच द्यावें असें सांगितलें, फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल प्रो० र. पु. परांजपे यांनीं धर्मशिक्षण देऊंच

नये असें प्रतिपादन केलें; व ना० गव्हर्नरसाहेब व ना० शार्प, वगैरेंनीं धर्म-शिक्षण देणें गैरसोईचें असल्यामुळें फक्त नीतिशिक्षण द्यावें असें मत प्रदर्शित केलें. आमच्या मतें धर्मशिक्षण व नीतिशिक्षण यांच्यामध्यें बिनतोड विरोध आहे असें मानण्याची जी प्रवृत्ति दिसून येते ती बरोबर नाहीं. विशिष्ट धर्मतत्त्वांवरच अवलंबून नाहींत अशीं अनेक सार्वदेशीय व सार्वकालीन नीतितत्त्वें आहेत, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी धर्माच्या आश्रयानें हीं तत्त्वें अधिक खुलतात—एवढेंच नव्हे तर, त्या योगानें त्यांना बळकटीहि अधिक येते. मिल, स्पेन्सर, ब्रॅडलॉ, यांच्यासारख्या अलौकिक मनुष्यांस धर्मव्यतिरिक्त नीतितत्त्वें मानवतील; परंतु साधारण प्रतीच्या मनुष्यास स्वतःच्या धर्माशीं संलग्न असलेलीं नीतितत्त्वेंच जास्त उपयोगी पडतील. नीति ही केवळ आपल्या आंगच्या गुणांनींहि औषधाप्रमाणें परिणामकारक होण्यासारखी असली, तरी प्रकृतीच्या मानानें औषधास जसें अनुपान म्हणून लागतें, तसेंच नीतीस विशिष्ट धर्मविचाराचें अनुपान अवश्य आहे. समाजाची परंपरा राहण्यास धर्मपरंपरा राखावी लागते; व धर्मपरंपरा तुच्छ करून निव्वळ नीतितत्त्वें पुढें ढकलण्याच्या प्रयत्नास फारसें यश येण्याचा संभव नसतो. किंबहुना, नीतितत्त्वांस धर्माचा पाठिंबा पाहिजे यास दुसरें असेंहि कारण आहे कीं, कोणत्याहि नियमान्वयें आचार होण्यास आचार-प्रवर्तक असा एखादा शास्ता लागतो; व अशा प्रकारच्या शास्त्याची कल्पना मनांत जागृत नसेल तर आचारप्रवर्तन व्हावें तसें होणार नाहीं. अगदीं अखेरच्या स्थितींत धर्मविरहित नीतितत्त्वांना मनाशिवाय—सदसद्-विवेकबुद्धीशिवाय—दुसरा शास्ता राहत नाहीं; तथापि, बहुजनसमाज कोणत्याहि कृत्याची स्वतःच्या मनावरच सर्व जबाबदारी घेण्यास तयार असतांहि, त्या मनाला विशिष्ट मार्गानें प्रत्यक्ष ईश्वरी प्रसादाचा आधार मिळेल तर फार चांगलें असें त्यास वाटत असतें. या दृष्टीनें पाहातां नीति-शिक्षणाबरोबरच धर्मशिक्षणहि देतां आलें तर फार चांगलें असें दिसून येईल.

आतां धर्मशिक्षण द्यावयाचें तर तें कसें द्यावयाचें, हा प्रश्न राहतो. हा प्रश्न सकृद्दर्शनीं दिसतो तितका खरोखर अवघड नाहीं. ज्या धर्मांना फांटे फुटले नाहींत असे धर्म थोडे; बहुधा प्रत्येक धर्माला पंथांचें स्वरूप येऊन राहिलेलें आहे ही गोष्ट खरी. तथापि सर्वच विद्यार्थ्यांस एकाच पंथाचें

अगर मताचें शिक्षण सक्तीनें द्यावयाचें असें म्हटलें तरच धर्मशिक्षणाची व्यावहारिक अडचण खरी वाटण्याचा संभव आहे. धर्मशिक्षणाची सोय करावयाची म्हणजे मुख्य धर्माच्या व मुख्य धर्मपंथांच्या शिक्षणाची सोय करावयाची असाच अर्थ करावयाचा. व या व्यवस्थेस जरी थोडेबहुत पैसे लागतील, तरी भावी तरुणपिढ्यांचें सर्व हितच जर या शिक्षणावर अवलंबून आहे—जर हें शिक्षण दिल्याशिवाय तरुणपिढीचें शील खात्रीनें नाहींसें झालेंच पाहिजे अशी भीति कोणास खरोखरच वाटत असेल—तर त्यांनीं ते पैसे खर्च करण्यास तयार झालें पाहिजे ! हिंदुधर्मात अनेक पंथ आहेत खरे; तथापि, ख्रिस्ती धर्मात मुळींच पंथ नाहींत असें नाहीं. ख्रिस्ती धर्मात क्याथोलिक, एपिस्कोपेलियन, प्रेसबिटेरेनियन, मेथाडिस्ट, बॅपटिस्ट, वगैरे अनेक पंथ असतांहि आजपर्यंत शाळांतून ख्रिस्तीधर्मशिक्षण देणें हें इंग्लंडांत शक्य झालें होतें; जर्मनींत तर, भौतिकशास्त्रें (Sciences) शिकवितांना एकाच पंथाचें शिक्षण द्यावें, पण धर्मशिक्षण देतांना पंथापंथाचें शिक्षण द्यावें; हा सिद्धांतच ठरून गेला आहे. हिंदुस्थानांतहि अशीच पद्धति अमलांत आणण्यास सरकारास पंचाईत पडूं नये. कॉलेजमध्यें ज्याप्रमाणें पदवीच्या परीक्षेस अनेक ऐच्छिक विषय असतात, व त्यांपैकीं प्रत्येक विषयाच्या शिक्षणाची वेगवेगळी व्यवस्था केलेली असते, त्याप्रमाणें धर्मशिक्षणाची व्यवस्था करतां येणें अशक्य नाहीं.

आतां ही व्यवस्था कशी करतां येईल हें तारतम्यानेंच जाणलें पाहिजे. त्यांत हटवादानें कीसच काढीत बसल्यास अनवस्था होईल हें उघड आहे. हिंदुस्थानांत पांच चार मुख्य धर्म आहेत व प्रत्येक धर्मांत पांच चार पंथ असतात, यास्तव 'प्रत्येक शाळेंत व प्रत्येक कॉलेजांत इतर शिक्षक कितीहि थोडे असले तरी धर्मशिक्षक मात्र वीस पंचवीस असलेच पाहिजेत' हें बोलणें हटवादाचें झालें. परंतु तारतम्यानें व समंजसपणानें बोलावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, 'शहराच्या मानानें व कॉलेजें किंवा शाळा यांच्या मानानें निरनिराळ्या धर्मांच्या मूलभूत ग्रंथांचें शिक्षण देण्याची व्यवस्था करितां आली म्हणजे पुरे आहे.' आज मुंबईच्या विश्वविद्यालयांत दहा पंधरा देशी व परदेशी भाषा 'दुसऱ्या भाषा' म्हणून परीक्षांस ठेवलेल्या आहेत हें प्रसिद्धच आहे. तथापि कोणत्याहि कॉलेजांत इंग्रजी-

खेरीजकरून फार तर दोन भाषांचें शिक्षण दिलें जातें. पण तेवढ्यावरून कॉलेजें भाषाशिक्षणाचें आपलें काम करीत नाहींत असें कोणीहि म्हणत नाहीं. भलत्या कॉलेजांत भलती भाषा शिकणारा विद्यार्थी आल्यास त्याला 'विशिष्ट भाषेचा अभ्यास तूं आपला आपण कर, अगर दुसऱ्या कॉलेजांत जा,' असें सांगण्यांत येतें, पण असें सांगितल्यानें त्या विद्यार्थ्याच्या हक्काकडे दुर्लक्ष केलें असें मानण्यांत येत नाहीं.पण भाषांचीच गोष्ट कशाला ? अभ्यास-क्रमांतील इतर विषयांचीहि गोष्ट अशीच आहे.बी.ए.ला वनस्पतिशास्त्र,इंद्रिय-विज्ञानशास्त्र, प्राणिशास्त्र वगैरे ऐच्छिक विषय असतात. परंतु अशीं पुष्कळ कॉलेजें आहेत कीं,त्यांमध्यें पैशाची सोय नसल्यामुळें या विषयांचे वर्गच नसतात एम्. ए.च्या परिक्षेला पांच सात ऐच्छिक विषय असतात, परंतु कोणच्याहि कॉलेजांत फार तर एखाददुसऱ्या विषयाचाच वर्ग असतो. अशीच गोष्ट फार तर धर्मशिक्षणाची होईल. उदाहरणार्थ, पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांत उद्यां धर्मशिक्षणाची सोय करावयाचीच झाली व हिंदुधर्माचे एक दोन प्रोफेसर ठेवले तर कॉलेजनें विद्यार्थ्यांच्या धर्मशिक्षणासंबंधीं आपलें काम केलें असें म्हणतां येईल. आणि सदर कॉलेजांत पांच चार खिस्ती, पांच चार पार्शी व पांच चार मुसलमान विद्यार्थी असले तरी बायबल, झेंदा-वेस्ता किंवा कुराण शिकविण्यास शिक्षक नाहीं म्हणून या कॉलेजनें धर्म-शिक्षणाचें आपलें काम केलें नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं. जी गोष्ट धर्मांना तीच धर्मपंथांना लागू आहे; वास्तविक हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें शिकविण्याची जर सोय झाली तर धर्मपंथाच्या शिक्षणाची सोय करतां आली नाहीं याबद्दल कोणाची कुरकुरहि चालणार नाहीं. तसेंच एकाच शाळेंत असलेले खिस्ती, पार्शी, मुसलमान व हिंदु हे जर एकमेकांच्या उरावर बसत नाहींत, तर हिंदु धर्माच्या पोट पंथाचें शिक्षण दिलें जातें असें गृहीत घेऊन चाललें तरी त्यामुळें हे पंथवाले एकमेकांच्या उरावर बसतील हेंहि संभवनीय नाहीं. शिवाय धर्मशिक्षणाची सोय करणें म्हणजे धर्म-शिक्षणाची सक्ति करणें असें होत नाहीं.

मुख्य मुद्दा इतकाच आहे कीं, तरुण विद्यार्थी इतर ज्ञान संपादन करीत असतां—त्यांच्या बुद्धीचा व अंतःकरणाचा विकास होत असतां—धर्मासंबंधीं तात्त्विक विचारांचें शिक्षण मिळण्याची मात्र हल्लीं सोय नसते

ती व्हावी, व इतर ज्ञानाला धर्मशिक्षणाची जोड मिळून, तरुण विद्यार्थ्यांच्या मनाला समतोलपणा यावा; व हा हेतु आम्हीं वर दर्शविल्याप्रमाणें धर्मशिक्षणाची व्यवस्था केली असतां साधण्यासारखा आहे. शाळांतून व कॉलेजांतून ही व्यवस्था करणें क्वचित् अवघड वाटल्यास शहराशहरांतून तरी ही व्यवस्था होण्यास कांहींच हरकत नाहीं. उदाहरणार्थ, पुण्यासारख्या शहरांत एखादें स्वतंत्र धर्मशिक्षणाचें पीठ स्थापन करावें, त्यावर जुन्या व नव्या पद्धतीनें धर्मशिक्षण देणारे दोन तीन अध्यापक नेमावे, या अध्यापकांनीं आठवडयांतून ठराविक दिवशीं दोन तीन व्याख्यानें द्यावीं, हीं व्याख्यानें शाळा व कॉलेजें यांच्या वेळेखेरीज इतर वेळेंत आणि देवळांसारख्या पवित्र व विस्तृत जागेंत व्हावीं, आणि दर सहामाहींत विद्यार्थ्यांनें हीं व्याख्यानें अमुक एक ऐकल्याचा दाखला आणल्याखेरीज त्यास परीक्षेचा दाखला देण्यांत येऊं नये अशा प्रकारचा नियम करण्यांत यावा. धर्मव्यतिरिक्त इतर विषयांच्या शिक्षणाची योजना विलायतेंत याच तत्त्वांवर केली जाते, व तेंच तत्त्व इकडे धर्मशिक्षणास लावण्यांत आलें असतां काम भागेल. एका विलायतेंत डझन दोन डझन युनिव्हर्सिट्या आहेत. परंतु या सर्व युनिव्हर्सिट्यांतून सर्वच विषय शिकविले जातात असें मात्र नाहीं. शिवाय एखाद्या कॉलेजांतला एखादा प्रोफेसर एखाद्या विषयांत अत्यंत प्रवीण असला, किंवा त्याची शिक्षण देण्याची हातोटी उत्तम असल्याची प्रसिद्धि असली, तर इतर कॉलेजांतील विद्यार्थी फी देऊन त्याचीं व्याख्यानें ऐकण्यास त्या कॉलेजांत जातात ही गोष्ट प्रसिद्धच आहे. अशाच तारतम्यानें धर्मशिक्षणाची सोय करतां येणें शक्य आहे असें आम्हांस वाटतें. धर्म शिकवितांना निश्चयात्मक असें कांहीं शिकवितां येणार नाहीं, कुशाग्रबुद्धीच्या विद्यार्थ्यांस शिक्षकास पावलोपावलीं अडवितां येईल वगैरे आक्षेपहि निर्मूल आहेत. सामान्य धर्मतत्त्वें त्रिकालाबाधित असंतात, तेव्हां त्यांचें शिक्षण देणें मुळींच अवघड नाहीं. शिवाय नवीन पद्धतीनें तुलनात्मक धर्मविचारांचेंहि थोडेंसें शिक्षण दिलें असतां धर्मविचारांमधील एककल्लीपणाचा दोष टाळून धर्मशिक्षणाचा गुण तेवढा तरुण मुलांस प्राप्त करून देणें शक्य आहे. मतवैचित्र्य हें धर्मीतच असतें असें नाहीं. इतिहास, नीतिशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांत काय थोडें मतवैचित्र्य (Schools of Opinion) असतें ? व ते शिकवितांना नेम-

लेल्या ग्रंथांच्या कर्त्यांचीं मतें, शिक्षकांचीं मतें व परीक्षकांचीं मतें हीं सर्व निरनिराळीं असल्यानें, विद्यार्थ्यांचें मन तिरबाकडें होऊन जातें हा रोजचा अनुभव आहे. तेव्हां धर्मविषयांतील मतवैचित्र्य तेवढेंच दुस्तर होईल, आणि त्यांत मात्र गुरु व शिष्य गटांगळ्या खाऊन बुडतील, असें मानण्याचें कारण नाहीं. आजच्या स्थितींत, इतिहास शिकवून समता व दूरदृष्टि आणि अर्थशास्त्र शिकवून धनोत्पादकता व व्यावहारिक शहाणपण, हीं जितकीं विद्यार्थ्यांस प्राप्त करून देतां येत असतील, तितकी तरी धर्मशिक्षण दिल्यानें विद्यार्थ्यांस परमार्थाची चाड उत्पन्न करून देण्यास खास हरकत पडणार नाहीं.

धर्मशिक्षणाच्या शक्याशक्यतेचा व्यावहारिक विचार हा असा आहे. तथापि, तरुणपिढीस खरोखरच परमार्थबुद्धीचा लवलेशहि नसल्यामुळेंच आजचा हा सर्व घोटाळा होत आहे, व कोणच्याना कोणच्या रीतीनें त्यांस धर्मशिक्षण दिलें म्हणजे त्यांचें आज बिघडल्यासारखें झालेलें शील सुधारेल—असा जो सरकारचा ग्रह झालेला दिसत आहे तो कितपत खरा आहे, धर्मशिक्षणाबरोबरच आणखीहि कित्येक राजकीय गोष्टी सुधारण्यास हव्यात कीं नको, हा विचार स्वतंत्र आहे; व त्याचा विचार स्वतंत्रपणेंच पुढें एखादेवेळेस करण्याचें आश्वासन आम्ही वाचकांस देतों.

हीनजाति व शिक्षण*

हीनजातींच्या उन्नतीच्या प्रश्नासंबंधानें निवळ तात्त्विक विवेचनाचा फारसा उपयोग होत नाहीं, हें पूर्वी एकवार आम्हीं दर्शविलेंच आहे. तात्त्विक विवेचनास आम्ही कमी किंमत देतों असें नाहीं. परंतु आज तात्त्विक वाद निघाला असतां पुष्कळ लोक या भेदभावाचें समर्थनच करूं इच्छितील; व कित्येक थोड्या लोकांनीं हा भेदभाव समर्थनार्ह नाहीं असें उत्तर दिलें तरी त्या नुसत्या उत्तराचा फारसा व्यावहारिक उपयोग नाहीं. रणांगणांतील युद्धाप्रमाणें वादांतहि धर्मसमजुतींवर तोंडासमोरून हल्ला करणें कधींहि श्रेयस्कर होत नाहीं; बाजूनें हल्ला चढवून प्रतिपक्षाला तोंड फिरवावें लागेल असें केल्यानें यश मिळण्याचा अधिक संभव असतो. धर्मशरीराचे पाय म्हटले म्हणजे रूढ आचार हेच होत, आणि पायच फितूर झाले म्हणजे ते नेतील तिकडे देहास जावें लागत. अर्थात् स्पृश्यास्पृश्यविचार करतांना या बाबतींतील धर्मसमजूत पालटण्याचा वाद माजवीत न बसतां हा भेदभाव आचारांत नाहींसा होण्याची रूढि कशी पडेल, याचाच विचार अधिक अगत्याचा आहे. रूढि हा लोकसंमत व्यवहाराच्या पुनःपुनरुक्तीचा परिणाम आहे. अस्पृश्य मानलेल्या जातींस स्पृश्य करण्यास त्या दोहोंमधील व्यवहार वाढला पाहिजे. व व्यवहारसंबंध वाढण्यास अनुयोगी प्रतियोगीभूत ज्या व्यक्ति त्यांची परस्पर आकर्षणशक्ति वाढली पाहिजे. अर्थात् ही 'आकर्षण–शक्ति' कशी वाढेल या प्रश्नाचें जें उत्तर तेंच, हा स्पृश्यास्पृश्य भेद नाहींसा कसा होईल या प्रश्नाचेंहि आहे असें समजावें.

हीं आकर्षणकारणें अमुक एकाच प्रकारचीं असतात असें नाहीं, हें निरनिराळीं उदाहरणें देऊन दाखवितां येण्यासारखें आहे. सौंदर्य, स्वच्छता, बुद्धिमत्ता, सत्ता, संपत्ति, सच्छील, धार्मिकपणा, मान्यता व व्यावहारिक उपयुक्तता हीं या आकर्षक करणांचीं उपलक्षणात्मक उदाहरणें म्हणून देण्यास हरकत नाहीं. शरीरसौंदर्य हें आकर्षकतेचें कारण होऊन कृत्रिम भेदभावाच्या मर्यादा नाहींशा करण्यास कारणीभूत कसें होतें, याचें उदाहरण

* केसरी, तारीख ६ सप्टेंबर १९१०.

पुराणांतरीं मत्स्यगंधेचें होय. मत्स्यगंधा ही मासे मारणाऱ्या व मासे खाणाऱ्या कोळ्याची कन्या; परंतु ती अप्रतिम लावण्यवती असल्यामुळें क्षत्रिय राजाच्या राज्ञीपदास योग्य झाली. दुसरें एक चमत्कारिक उदाहरण रावबहादुर चिंतामणराव वैद्य यांनीं प्रसिद्ध केलेल्या 'बंडाच्या इतिहासा'च्या पुस्तकांत दिलेलें वाचकांस आढळून येईल. झांशी येथील एका दशग्रंथी विद्वान् ब्राह्मणास अत्यंत नीच मानलेल्या पद्मिनीगुणविशिष्ट स्त्रीसंबंधानें अनिवार मोह उत्पन्न होऊन त्यानें तिला स्त्रीप्रमाणें घरांत वागविल्याबद्दल हकीकत सदरहू पुस्तकांत दिलेली आहे. हीं उदाहरणें देण्यांत एखाद्या अलौकिक शरीरगुणाच्या अंगींहि धर्मबंधनाहून अधिक बळ कसें येऊं शकतें, व त्यामुळें स्पृश्यास्पृश्य भेद कसा नाहींसा होऊं शकतो, हें फक्त तात्त्विक-रीत्या सुचविण्याहून दुसरा हेतु नाहीं. राजसत्तेच्या अंगीं स्पृश्यास्पृश्य भेद समूळ नष्ट करण्याचें नसलें तरी तो पुष्कळसा शिथिल करण्याचें सामर्थ्य आहे, यांत शंका नाहीं. महारांचा स्पर्श झाला असतां स्नान करणारे सर्वच कर्मठ लोक गव्हर्नरसाहेबांचा हस्तस्पर्श झाल्यावर स्नान करतील असें नाहीं. संपत्ति ही वाटेल तें करूं शकते; व अस्पृश्य मान-लेल्या जातींतील एखाद्या मनुष्यावर लक्ष्मीची जर कृपा भरपूर झाली तर त्याला सामाजिक अपमानाचें दुःख फारसें सोसावें लागत नाहीं. धार्मिक-पणा अंगीं असल्यास अस्पृश्य मानलेल्या व्यक्तीचा आपल्यास स्पर्श होणें हा एक आपल्यावर उलट अनुग्रहच आहे, असेंहि उच्च वर्णांतील लोकांस वाटणें संभाव्य आहे, हें चोखामेळा व रोहिदास या दोन संतांच्या उदा-हरणांवरून कबूल करावें लागेल. मनुष्याचे अंगीं मान्यता इतर अनेक प्रकारांनींहि येऊं शकते. समजा, एखादा अंत्यज उद्यां मोठा कवि निर्माण झाला, अगर त्याचे अंगीं कल्पकतेचा विकास होऊन इकडील सृष्टि तिकडे करण्यासारखा त्यानें एखादा शोध लाविला किंवा यंत्र निर्माण केलें तर त्याजवरील निव्वळ अस्पृश्यतेचें लांच्छन फार दिवस टिकणार नाहीं, हें म्हणणें कोणासहि संमत होईल. एवढा मोठा अलौकिक गुण बाजूस राहो, पण साधारण सुशिक्षणाचे अंगींहि मान्यता उत्पन्न करून देण्याची शक्ति पुष्कळच आहे. याचा अनुभव आपणांस नेहमीं येतो. एखादा अशिक्षित अंत्यज दाराशीं आला असतां त्यास आपण दाराशींच उभा

करितों; परंतु तोच सुशिक्षित अंत्यज असला तर त्यास आपण घरांत घेऊन खुर्ची देतों.

सुशिक्षणाचा असाच कांहीं विलक्षण प्रभाव असतो कीं, त्याच्या योगानें उच्चनीच व लहानथोर हे सर्व कृत्रिम भाव लोपून जातात, व मनुष्या-मनुष्यामध्यें एकप्रकारचा बंधुभाव उत्पन्न होतो. शिवाय सुशिक्षित मनुष्य सहसा अस्वच्छ राहात नाहीं; त्याजमध्यें बुद्धीचा विकास व विद्येचें तेज निर्माण होतें व त्याची उपयुक्तताहि वाढते. अर्थात् एका सुशिक्षणानें इतकीं सर्व आकर्षण–कारणें उत्पन्न होतात. यास्तव अयोग्य स्पृश्यास्पृश्यभेद नाहींसा करावयाचा असेल तर अंत्यज जातीचें सुशिक्षण वाढणें हाच मुख्य व खरा उपाय आहे. अस्पृश्यता जाऊन स्पृश्यता येण्यासचसें काय, पण अन्य रीतीनेंहि त्यांची सामाजिक व सांपत्तिक स्थिति सुधारण्यास विद्या हीच उपयोगी पडणारी आहे; म्हणून अस्पृश्य मानलेल्या जातींनीं व त्यांच्या पुरस्कर्त्यांनीं शिक्षणावरच मुख्य भिस्त टाकली पाहिजे. कारण शिक्षण, सत्ता, संपत्ति अगर इतर कोणताहि विशेष गुण अंगीं नसतां अस्पृश्य जातींस जवळ घ्या असें म्हणणें यांत जरी मोठासा गुन्हा नसला तरी तें फारसें शक्य नाहीं. कारण हा प्रश्न किरकोळ एक दोन किंवा थोड्याशा व्यक्तींचा नसून सर्व समाजाचा आहे. केवळ दांडगाईनें स्पृश्यास्पृश्य भेद मोडून दाखविणें हें समाजांतील फक्त दहा पांच तत्त्वज्ञानी अगर पांच पंचवीस बाडग्या लोकांस शक्य आहे; परंतु एकंदर समाजांतील बहु-मतानें जोंपर्यंत कोणतीहि सुधारणा स्वीकृत केली जात नाहीं, तोंपर्यंत ती रूढ होत नाहीं. तोंपर्यंत या दहापांच तत्त्वज्ञान्यांनीं हा भेद मोडला व त्यांस लोकांनीं विशेष नांवें ठेविलीं नाहींत तरी त्यांस समाजबाह्य होऊन राहावें लागतें. ज्यांस आम्हीं बाडगे हें नांव दिलें आहे, त्यांच्या उपद्व्यापानें तर तत्त्वज्ञान्यांच्या खटपटीपेक्षां केव्हांहि कमीच फलप्राप्ति होणार. कारण समाज त्यांस बाडगे मानणार, एवढेंच नव्हे तर त्यांनीं केलेल्या कृत्यांचें समर्थन करण्याचें धैर्य त्यांच्या स्वतःच्या अंगीं नसल्यामुळें ते आपलें कृत्य उघडपणें कबूल करण्यास कचरणार; व त्यांच्या कृत्याबद्दल गवगवा झाला असतां ते आपल्यास प्रायश्चित्त वगैरे घेऊन आपल्या कृतीचें आपणच खंडण करणार; व सर्वांत वाईट गोष्ट असते ती ही कीं,

ज्यांना आम्हीं बाडगे ही संज्ञा दिली आहे, त्यांच्या कृत्यास उदात्त असा कोणताहि मूळ हेतु नसून केवळ सुखाची लालसा हाच त्यांचा हेतु असतो. स्पृश्यास्पृश्य भेद हा अयुक्तिक आहे, हें सिद्ध करण्याकरितांच केवळ जो तो भेद मोडून दाखवितो, त्याची गोष्ट वेगळी; त्याला तत्त्ववेत्ता म्हणण्यास तरी हरकत नाहीं. परंतु केवळ सौख्याच्या लालुचीनें जे तसें करितात त्यांनीं तत्त्वज्ञानाचा कितीहि आव आणिला तरी तो व्यर्थ होय.

तात्पर्य, बहुजनसमाजानें स्पृश्यास्पृश्य भेद नाहींसा करावा अशी जर इच्छा असेल तर अस्पृश्य मानिलेल्या जातींमध्यें वर वर्णन केलेले गुण आले पाहिजेत. ते गुण येईपर्यंत, हा भेदभाव मोडत नाहीं, असा गवगवा करणें फुकट आहे. विशेषतः तोंपर्यंत अस्पृश्य मानिलेल्या जातींनीं स्वतः स्पृश्यास्पृश्यतेचा वाद काढणें श्रेयस्कर नाहीं. हा भेदभाव आजकालचा नाहीं, तर शेंकडों वर्षांच्या संस्कारपरंपरेनें तो दृढ झालेला आहे; व तो नाहींसा होण्यासहि कदाचित् शेंकडों वर्षेंहि लागतील, असें म्हणणें वावगें नाहीं. लाट उठण्यास जितका वेळ लागतो, तितकाच ती लाट उठल्यावर खालीं बसण्यास लागतो, भांड तापण्यास जितका उशीर लागतो, तितकाच तापलेलें भांडें निवण्यास लागतो, हीहि अनुभवसिद्ध गोष्ट आहे. शिवाय दुसरें असें कीं, अस्पृश्य मानलेल्या जातीसुद्धां अशा प्रकारच्या भेदभावापासून स्वतः सर्वस्वीं अलिप्त असतात, असेंहि नाहीं. ज्यांना कोणतीच गोष्ट अस्पृश्य अशी नाहीं, त्या लोकांनीं सर्वच गोष्टींसंबंधानें स्पृश्यास्पृश्य भेदभाव नाहींसा करून टाकावा असें म्हणण्यांत फारसा अर्थ नाहीं. चरच्यास हात व खालच्यास लाथ हा प्रकार मध्यम जातीमध्यें दिसून येतो. ज्यांना वरची म्हणून एखादी जात अगर वर्ग असतो, त्यांस आपला समावेश त्या वरिष्ठ वर्गांत होण्याविषयीं जितकी उत्कंठा असते तितकी आपल्या खालच्या वर्गास आपणांमध्यें समाविष्ट करून घेण्याबद्दल असते काय, याचा ज्याचा त्यानें आपल्या मनामध्यें विचार करून पाहावा. सर्व मजले मोडून एकच मजला व्हावा, असें प्रतिपादन करण्याची व त्या प्रतिपादनाप्रमाणें आचरण करण्याची जोंपर्यंत आपल्या स्वतःच्या मनाची तयारी झालेली नाहीं, तोंपर्यंत विश्वबंधुत्वाच्या गोष्टी दुसऱ्यांशीं बोलण्यांत व वरिष्ठ वर्गास ते आपमतलबी म्हणून नांवें

ठेवण्यांत अर्थ तो कोणता ? मराठे लोक ब्राह्मणांस नांवें ठेवतील, परंतु अंत्यजांचे पंक्तीस बसण्याची स्वतः मराठ्यांची तयारी नसते. महार लोक ब्राह्मण व मराठे या दोघांसहि नांवें ठेवतील; परंतु ते स्वतः धेड वगैरे लोकांच्या हातचें पाणीहि घेत नाहींत, असें म्हणतात ! धेडांना अस्पृश्य अशी जात कोणतीच नसेल तर त्यांना मात्र वरील आक्षेप न लागतां आपल्याहून वरच्या सर्व जातींस नांवें ठेवितां येतील ! परंतु केवळ विश्वकुटुंबित्वाच्या उदार बुद्धीनें ते तसें करितात,असें कोणीहि म्हणणार नाहीं.

स्पृश्यास्पृश्यतेचा विचार करतांना अंत्यज जातीचे लोक कोणते धंदे करतात, हेंहि साधारणतः पाहणें जरूर आहे. विश्वकुटुंबित्वाच्या कितीहि गोष्टी सांगितल्या तरी गंध्याचा धंदा व खाटकाचा धंदा, हे दोन्हीहि सारखेच मानावे अगर दोन्ही धंदे करणाराच्या अंगीं समाजाकर्षक शक्ति सारखीच आहे, असें कोणीहि समंजस मनुष्य म्हणणार नाहीं. कित्येक लोक असा युक्तिवाद करितात कीं, अंत्यज लोक जे धंदे करतात ते जर कोणीतरी केलेच पाहिजेत, तर अंत्यजांनींच ते केले तर काय बावगें ? व ते तसे करीत असतांहि त्यांना स्पृश्य मानण्यास काय हरकत आहे ? आमच्या समजुतीनें हा युक्तिवाद बरोबर नाहीं. कृतज्ञतेनें स्वच्छतेची जागा भरून येऊं शकत नाहीं. व केवळ आपल्या पोटाकरितां अस्वच्छ धंदा करणारांबद्दल कृतज्ञताहि पण वाटत नाहीं. तसेंच हे अस्वच्छ धंदे केवळ सांपत्तिक अडचणीमुळें ते करितात, असेंहि म्हणणें बरोबर नाहीं. कारण इतर म्हणजे असले धंदे न करणारे लोक उपाशीं मरतात असें थोडेंच आहे ? अंत्यज लोकांइतकेच अशिक्षित असून त्यांच्याहून अधिक स्वच्छ धंदे करून पोटास मिळविणारे लोक किती तरी आहेत ! वरिष्ठ वर्गांनीं धर्म या नांवाखालीं मोडणाऱ्या कोत्या समजुती व मिथ्या अहंकारबुद्धि सोडून देऊन अस्पृश्य मानिलेल्या वर्गाबद्दल सहानुभूति व प्रेम बाळगलें पाहिजे, यांत तर शंका नाहींच; परंतु अंत्यज वर्गानेंहि वरिष्ठ वर्गास आपल्या पदवीस ओढूं अशी हांव धरण्यापेक्षां, स्वच्छता, शिक्षण वगैरे गुणांनीं आपण त्यांच्या बरोबरीचे होऊं अशी महत्त्वाकांक्षा बाळगणें अधिक श्रेयस्कर होईल. अशा तऱ्हेची महत्त्वाकांक्षा बाळगून त्याप्रमाणें जेव्हां त्याच्या

हातून वर्तन घडून येऊं लागेल त्या वेळीं वरिष्ठ वर्गाच्या कोत्या समजुती-बद्दल त्यांस नांवें ठेवण्याचा हक्क आपोआपच त्यांस प्राप्त होईल.

दुसरीहि एक गोष्ट अस्पृश्य मानलेल्या जातींच्या पुढाऱ्यांनीं आमच्या मतें लक्षांत ठेवावयास पाहिजे. ती ही कीं, आजच्या स्थितींत हजारों अंत्यज लोक खिस्ती धर्म स्वीकारतात, ही गोष्ट हिंदु पुढाऱ्यांच्या डोक्यावर हाणून 'तुम्ही यापुढेंहि आमची उपेक्षा कराल तर आणखीहि हजारों लोक हिंदुधर्म सोडून जातील,' असें दटावतात; परंतु हें बरोबर नाहीं. धर्मांतरामुळें हिंदुसमाजाची हानि फार होत आहे यांत शंका नाहीं; व हिंदुसमाजाच्या पुढाऱ्यांचे अद्यापिहि डोळे न उघडतील तर ती हानि अशीच होत जाईल, हीहि गोष्ट निर्विवाद आहे. तथापि, ज्यांना शिक्षण नाहीं अशा लोकांच्या हातून ऐहिक फायद्याच्या हेतूनें धर्मांतर झालें तर त्यांना फारसें नांव ठेवतां येणार नाहीं; परंतु अस्पृश्य जातींचे पुढारी या नात्यानें जे बोलूं इच्छितात, त्यांना तरी ऐहिक फायद्याकरितां धर्मांतर करण्यामध्यें कमीपणा किती आहे हें कळावें, अशी लोकांची अपेक्षा असते. अंत्यज लोकांनीं धर्मांतर करणें हें हिंदुसमाजावर आपल्या दुःस्थितीबद्दल सूड घेण्याचा उत्तम उपाय या दृष्टीनें कदाचित् समर्थनीय होईल; परंतु जर ते हिंदुसमाजांतील अवयव असें स्वतःस म्हणवून घेतात व हिंदुधर्माचा आपणास अभिमान आहे असें म्हणतात, तर केवळ ऐहिक फायद्याकरितां धर्मांतर करणें हें लांच्छनास्पद आहे, असें त्यांस कबूल करावें लागेल. शिवाय हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, केवळ धर्मांतर केल्यानें खिस्ती समाजांत अंत्यज लोकांस विशेष मान मिळतो असें नाहीं. धर्मांतर केल्याबरोबर धर्मदीक्षा देणारा पाद्री अंत्यजास आपली मुलगी विवाहास देण्यास तयार होईल तर कदाचित् गोष्ट वेगळी; परंतु तशी वस्तुस्थिति नाहीं. खिस्ती समाजांतहि खरी मान्यता मिळण्यास सुशिक्षण किंवा मान्यतेचीं वर सांगितलेलीं इतर कारणें असल्याशिवाय चालावयाचें नाहीं. उलटपक्षीं, हें सुशिक्षण अंगीं आल्यास ती मान्यता त्यांस हिंदुसमाजांत आजहि मिळण्यास कांहीं प्रत्यवाय आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. अकोला येथें एका सुशिक्षित अंत्यजानें शाळा काढली आहे. तेथें रा० टिळक हें तीन वर्षांपूर्वी मोठ्या खुषीनें पान-सुपारीस गेले होते. तसेंच थोड्या दिवसांपूर्वी वऱ्हाडांतील मोहप्पा गांवचे

एक सुशिक्षित महार गृहस्थ पुण्यास आले, त्यावेळीं त्यांचें व्याख्यान सार्वजनिक सभेनें आपल्यामार्फत, आपल्या दिवाणखान्यांत करविलें असून ते अगर इतर वक्ते यांजमध्यें कोणत्याहि बाबतींत यत्किंचितहि फरक करण्यांत आलेला नव्हता, व सदरहू प्रसंगीं कित्येक महार लोक श्रोतृवृंदांत येऊन नेहमींच्या श्रोतृवृंदांच्या जागीं बसलेले होते; व व्याख्यानानंतर एक दोघां महार गृहस्थांचीं भाषणेंहि झालीं ! सन १९०८ च्या मे महिन्यांत पुणें शहरांत मद्यपाननिषेधाची चळवळ झाली; त्या वेळीं पिकेटिंगच्या खटल्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांच्या धोरणाचा निषेध करण्याकरितां रेमार्केटांत जी जाहिरसभा भरली, तिजमध्यें लष्करच्या एका महार गृहस्थाची वक्ता या नात्यानें योजना करण्यांत आली होती. शिवाय सर्वसाधारणपणें असेंहि म्हणतां येईल कीं, सुशिक्षित असा कोणताहि अंत्यज आजकाल कोणाहि समंजस हिंदु गृहस्थाचे घरीं गेला असतां त्यास घरच्या बैठकीवर बसवून घेऊन अगर खुर्ची देऊन संभाषण करण्यास तो माघार घेणार नाहीं.

वास्तविक काल हा सर्व जातींना व वर्गांना समान पदवीस आणून पोंचविण्यास समर्थ आहेच. कारण गेल्या पन्नास वर्षांत सामाजिक व धार्मिक चालीरीतींत आपोआप बराच फरक पडलेला आहे. वास्तविक ह्या अवधींत कोणी नवीन स्मृतिकार उत्पन्न होऊन त्यानें स्पर्शास्पर्शाचीं बंधनें जीं आज इतकीं शिथिल झालीं आहेत, तीं तशीं करण्यास अनुज्ञा दिली आहे, असें मुळींच नाहीं. तथापि फरक मात्र पुष्कळच पडलेला आहे यांत शंका नाहीं. परंतु हें सांगून सर्व हवाला कालावरच द्यावा, असें म्हणण्याचा आमचा मुळींच हेतु नाहीं. आम्ही असेंच म्हणतों कीं, हरतऱ्हेच्या सुधारणा प्रत्येक व्यक्तीनें आपली जबाबदारी ओळखून घडवून आणून काळास आपल्या कृतीनें कलाटणी दिली पाहिजे. समाजांतील 'व्यक्तिस्वातंत्र्य' व 'व्यक्तिकर्तृत्व' हीं दोन्ही वगळलीं असतां, 'काल' म्हणून बहुधा कांहींच राहत नाहीं. कालास कोणतीहि गोष्ट करणें इष्ट असलें तरी व्यक्तिसत्तेच्या आधीन तो सर्वस्वीं आहे. काल येतो हें खरें; परंतु व्यक्तींनीं आणल्याशिवाय तो येऊं शकत नाहीं. पण वरिष्ठ जातींच्या लोकांस स्पृश्यास्पृश्य भेदाचे कामीं त्यांच्या कर्तव्याची आठवण करून देणें हें जितकें जरूर आहे, तितकेंच अंत्यज जातींनाहि त्यांच्या उन्नतिमार्गाची खरी दिशा

कोणती व ती दिशा लावण्यास वरिष्ठ वर्गाच्या प्रेमबुद्धीची अपेक्षा न धरतांहि त्यांनीं काय केलें पाहिजे, याविषयीं त्यांना उपदेश करणें जरूर आहे.

राष्ट्र व शिक्षण*

समाजाच्या किंवा राष्ट्राच्या प्रगतीला शिक्षणाची आवश्यकता किती आहे यावर, पुनरुक्तीचा दोष पदरीं घेतल्याशिवाय, विशेष कांहीं लिहिणें आजच्या मितीला बहुधा अशक्यच आहे, परंतु प्रत्येक पिढीलाचशी काय, पण प्रत्येक पिढीच्या दरम्यानहि वारंवार या विषयाची उजळणी होणें जरूर असतें. राष्ट्र व शिक्षण या दोन वस्तूंचा संबंध जरी नित्य व निश्चल असतो, तरी शिक्षण या वस्तूचें स्वरूप अनेक कारणांमुळें चलनशील राहतें; आणि राष्ट्राचा व शिक्षणाचा बऱ्याच अंशीं कार्यकारणभाव असल्यामुळें शिक्षणाच्या स्वरूपानुरोधानें राष्ट्रस्वरूपहि बदलत जातें. नदीच्या प्रवाहांत आपण उभें राहिलों असतां पायांखालची वाळू कणशः सरत असलेली शरीरास कळते. त्याचप्रमाणें सूक्ष्म अवलोकन करणाराला, समाजनदीच्या प्रवाहांतील वाळू हळुहळू सरत असून वेळोवेळीं समाजविषयक विचार बदलत असतात हें अनुभवास आल्यावांचून राहात नाहीं. गति हेंच चित्‌शक्तीचें मुख्य द्योतक आहे. आणि प्रवासांत असतां मार्गावर ठिकठिकाणीं मुद्दाम उभें राहून मागें वळून पहाणारास ज्याप्रमाणें नवीन नवीन देखावे दृष्टीस पडतात. त्याप्रमाणें राष्ट्र व शिक्षण यांचा सतत प्रवास सुरू असतां मार्गावर मधूनमधून विश्रांति घेऊन, तोंपर्यंत गांठलेल्या मजलेपासून दिसणाऱ्या भूरचनेचें आकलन करूं इच्छिणारास थोड्याशा अपरिहार्य अशा पुनरुक्तीबरोबर नवीन अशाहि कांहीं गोष्टी सांगतां येतील, असा भरंवसा आहे.

शिक्षणाचे स्थलपरत्वें साधारणतः दोन विभाग करितात. एक पौर्वात्य पद्धतीचें व दुसरे पाश्चात्य पद्धतीचें. पौर्वात्य पद्धति ही अद्यापि ठरावयाची आहे. परंतु नुसती पाश्चात्य पद्धतीच घेतली तरी निरनिराळ्या पाश्चात्य

* केसरी, तारीख २० डिसेंबर १९१०

देशांत अगदीं एकाच तत्त्वावर अगर पद्धतीवर शिक्षणाची रचना झाली आहे असें नाहीं. युरोपांत 'राष्ट्रीय शिक्षण' या शब्दाचा अर्थ निरनिराळ्या राष्ट्रांत निरनिराळा करितात; याचें कारण प्रत्येक राष्ट्राचें उद्दिष्ट एकच असलें तरी त्यांची मनोरचना भिन्न असते हें होय. उदाहरणार्थ, इंग्लंड व अमेरिका यांची शिक्षणपद्धति फ्रान्स व जर्मनी यांच्या शिक्षणपद्धतीहून भिन्न आहे. पहिल्या जोडींतील राष्ट्रांत व्यक्तिगुणावर फार भिस्त आहे. व व्यक्तिस्वातंत्र्याचा परिपोष मुख्यतः जेणेंकरून होईल असेंच शिक्षण दिलें जातें. उलट पक्षीं, फ्रान्स व जर्मनी या राष्ट्रांमध्यें सर्व भिस्त समष्टीरूप समाजाच्या गुणावर असल्यामुळें, केवळ समाजहितास व्यक्ति मदत कशी करूं शकेल, या दृष्टीनें विचार होऊन जरूर त्या बाबतींत व्यक्तिस्वातंत्र्यास आळाहि घालण्याची तयारी असल्यामुळें शिक्षणपद्धतीहि त्याच बेतानें रचली गेली आहे. पण या चारहि राष्ट्रांत राजकीय सत्ता व समाज यांचें सामानाधिकरण्य किंवा पूर्ण तादात्म्य असल्यामुळें सरकार शिक्षणाच्या बाबतींत सर्व सत्ता व अधिकार आपल्या हातीं ठेवितें तरी, राज्यकारभारांत अगदीं वरपर्यंत समाजाच्या हाताचा शिरकाव झालेला असल्यामुळें, सरकारच्या शिक्षण-विषयक धोरणाबद्दल व कृत्याबद्दल समाजास ममत्व व आपलेपणा वाटतो; आणि शास्त्रशोध व अनुभव यांच्या योगानें राष्ट्रीय शिक्षणपद्धतींत जे फेरबदल करणें इष्ट आहे असें वाटले ते सरकारच्या द्वारानें समाजास वेळोवेळीं घडवून आणतां येतात. हिंदुस्थानची स्थिति मात्र याहून बरीच भिन्न आहे. एक तर हिंदी समाजाची मनोरचना पाश्चात्य समाजाच्या मनोरचनेहून कांहींशीं भिन्न आहे; व दुसरी गोष्ट अशी कीं, समाज व सरकार यांच्यामध्यें वर दर्शविलेलें सामानाधिकरण्य व तादात्म्य नाहीं. यामुळें भावी पिढीस कोणत्या प्रकारचें शिक्षण देणें जरूर व इष्ट आहे, याविषयीं सरकार व समाज यांची सर्वांशीं एकवाक्यता होण्याची केव्हांच फारशी आशा नाहीं. पदार्थ व छाया यांच्या-प्रमाणें या दोहोंच्या मतांत कायमचें थोडेंबहुत अंतर राहणार. पण हें अंतर होतांहोईल तितकें नाहींसें व्हावें, व शिक्षणाच्या प्रश्नाकडे हिंदी समाजाच्या दृष्टीनें सरकारास पाहाण्यास भाग पाडावें अशा प्रकारची चळवळ, हाच राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीचा खरा अर्थ आहे.

शिक्षणासंबंधानें सरकारची दृष्टि व समाजाची दृष्टि या एक नाहींत, या

म्हणण्यापासून सरकारावर एक तऱ्हेचा दोषारोप केला जातो, असें कदाचित् सरकारतर्फे कोणी म्हणेल. परंतु हा दोषारोप मानलाच तरी तो कांहीं अंशीं अपरिहार्य आहे. त्याचा परिहार व्हावा अशी सरकारची जर खरोखरच उत्कट इच्छा असेल तर त्यांनीं आपलें शिक्षणविषयक धोरण हल्लींहून पुष्कळ बदललें पाहिजे यांत शंका नाहीं. कसें तें पहा, कोणत्याहि दोन सालीं सरकाराकडून शिक्षणावर होणारा खर्च पाहिला, तर त्यांत आजच्याहून उद्यां खास प्रगति आहे असें म्हणावें लागेल, हें आम्हांस कबूल आहे. तरी पण इतर राष्ट्रांच्या मानानें पाहातां, आजमितीस म्हणजे शिक्षणाच्या कामास सुरवात होऊन पन्नास वर्षें झालीं तरी, सरकाराकडून व्हावा तितका खर्च शिक्षणावर होत नाहीं. सर्व हिंदुस्थानांत म्हणजे सुमारें तीस कोट लोकसंख्येवर शिक्षणाकरितां सरकारी असा सुमारें तीनशें लक्ष व इतर सुमारें दोनशें साठ लक्ष रुपये म्हणजे लोकसंख्येच्या दरडोईस सालिना सुमारें अडीच आणे खर्च होतो. पण इंग्लंडांतील सव्वातीन कोटि लोकसंख्येवर सव्वावीस कोट रुपये म्हणजे दरमाणशीं सहा-सव्वासहा रुपये खर्च होतो! शिक्षणाच्या बाबतींत सरकाराचें धोरण सुरवातीस कितीहि उदार असलें तरी अलीकडे त्या धोरणांत मनानें पुष्कळ बदल पडला आहे. पूर्वी शिक्षणाचा जो प्रसार सरकार हौसेनें करीत असे तो, तें हल्लीं मोठ्या जुलमानें म्हणजे मुष्किलीनें व नाखुषीनें करतें. वरिष्ठ शिक्षणाच्या बाबतींत त्यांनीं हात आंखडला आहे. दुय्यम प्रतीचें शिक्षण देण्याचें काम होतां होईतों, लोकांनीं खासगी रीतीनें व जरूर तर मदत घेऊन करावें, असा प्रघात १८८२च्या कमिशनपासून पडला आहे, तो निराळ्या कारणाकरितां पण तसाच आजवर चालू आहे. प्राथमिक शिक्षण म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डे यांच्या अंगावर पडलेलें असून तें त्याच संस्थांनीं होतांहोईतों संभाळावें, व अधिक खर्च दिवसेंदिवस लागल्यास त्याकरितां बोर्डांनीं आपखुषीनें नवीन कर वगैरे बसवून तो आपला आपण संभाळावा, असा प्रघात हळुहळू पडूं पहात आहे. प्राथमिक शिक्षणाची फी अजीबात काढून टाकण्याच्या धोरणाला सरकारनें कांहीं योग्य व कांहीं अयोग्य कारणांकरितां वाटाण्याच्या अक्षता लावल्या असून, सक्तीनें शिक्षण देण्याचें तर ते नांवहि काढूं देत नाहींत. बरें, खर्चाचा पैसा मर्यादित

असल्यामुळें, वाङ्मयविषयक शिक्षणाकडून कमी करून सरकार तोच पैसा धंदेशिक्षणाकडे देत आहे, असें म्हणावें तर तसेंहि दिसून येत नाहीं. सर्व हिंदुस्थानांत व्यापारी शिक्षणाचें उदाहरण घालून देण्याकरितां सरकारानें काढलेली एकहि शाळा नाहीं. धंदेशिक्षणाची शाळा एकहि नाहीं असें म्हणतां येत नाहीं; पण आहेत त्या फार जुजबी व अपुऱ्या आहेत.

हें सर्व धोरण खचित राष्ट्रीय नव्हे. राष्ट्राचें शिक्षणांतर्गत हित थोडेंबहुत सरकारच्या मनांत आहेच, तरी पण हिंदुस्थानसरकारसारखें श्रीमान्, खर्चिक व सुधारलेलें सरकार शिक्षणासंबंधानें जें धोरण पत्करून बसलें आहे तेबढ्यावर त्याच स्थितींतल्या स्वसत्ताक अशा राष्ट्रांतील सरकार कधींहि संतुष्ट होऊन राहिलें नसतें. सर्वच पौर्वात्य देशांत शिक्षणासंबंधानें म्हणजे अशीच अनास्था आहे असें नाहीं. आपण जपानचें उदाहरण घेतलें तर असें दिसून येईल कीं, ज्या राष्ट्रांत सन १८६८ सालापर्यंत शिक्षणाच्या बाबतींत सरकार व लोक झोंप घेत स्वस्थ पडले होते, त्याच राष्ट्रांत अवघ्या चाळीस वर्षांच्या अवधींत त्याच बाबतींत इकडची सृष्टि तिकडे होऊन गेलेली दृष्टीस पडते. शिक्षणखातें स्थापन झाल्याबरोबर तीनच वर्षांत जपानी सरकारानें असें जाहीर केलें कीं, यापुढें ज्यांतील घरांमध्यें शिक्षणाचा प्रवेश झालेला नाहीं असें एकहि खेडें असतां कामा नये, व ज्याला लिहितां-वाचतां येत नाहीं, असा एखादा मनुष्य मिळेल असें एकहि घर उपयोगी नाहीं, असा बादशहाचा हेतु आहे. (It is intended that henceforth universally in a village there shall be no house without learning, and in a house no individual without learning.) हें घडवून आणण्यास शिक्षणाच्या कामीं सक्ति करावयास पाहिजे होती, व ती जपानसरकारनें केलीहि. जपानाप्रमाणें हिंदुस्थानांतहि शिक्षणावर सर्व सत्ता सरकारची असावी हें तत्त्व प्रतिपादिलें जातें व तें अमलांतहि आणण्यांत आलें आहे. पण जपानाप्रमाणें हिंदुस्थानांत शिक्षण फैलावण्यासंबंधानें व राष्ट्रोपयोगी असें करण्यासंबंधानें सरकारची दृष्टि पूर्ण राष्ट्रीय नाहीं. हिंदुस्थानांत शिक्षणावर सरकार जपानी सरकारइतकीच सत्ता गाजवितें; पण हिंदुस्थानांत जपानाप्रमाणें दर शंभरांपैकीं निदान ऐंशी-नव्वद मुलें साक्षर निपजतील अशी खबरदारी घेतली

जात नाहीं; जपानाप्रमाणें हिंदुस्थानांत साडेचार हजार सरकारी धंदे-शिक्षणाच्या लहानमोठ्या शाळा नाहींत; जपानाप्रमाणें हिंदुस्थानांत वरिष्ठ शिक्षणाचें काम आपलें आपण करूं शकतील असे स्वदेशी प्रोफेसर तयार होऊन युरोपियन प्रोफेसर येण्याचें बहुतेक बंद झालेलें नाहीं (जपानांत १८७७ सालीं बहुतेक प्रोफेसर युरोपियन होते ते कमी होत होत आज फक्त दहाच युरोपियन प्रोफेसर टोकियो युनिव्हर्सिटींत आहेत); जपानाप्रमाणें सरकारी खर्चानें पाठविलेले ऐशीं नव्वद विद्यार्थी परदेशांत जाऊन शिक्षण मिळवीत राहिलेले आहेत असें हिंदुस्थानांत दिसून येत नाहीं.

अमेरिकेंतील व युरोपांतील बहुधा सर्व प्रमुख देशांत लोकसंख्येपैकीं शेंकडा पंधरापासून वीस इतकीं मुलें शिकत असतात. ग्रीस, स्पेन व रशिया या तीन देशांत हें प्रमाण त्या मानानें फार कमी; तरी शेंकडा पांच सातपर्यंत असतेंच. जपानांत राष्ट्रशिक्षणास सुरुवात नुकतीच झाली आहे, तरी तेथें हें प्रमाण सातवर आहे. हिंदुस्थानांत मात्र हें अद्यापि चाराच्यावर गेलेलें नाहीं. प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचें प्रमाणहि अशाच बेताचें आहे; म्हणजे सरासरीनें दर एक मनुष्याच्या मागें अमेरिकेंत व इतर वसाहतींत दरसाल दहा शिलिंग (सात साडेसात रुपये), युरोपांतील प्रमुख देशांत सात-आठ शिलिंग व कमींत कमी इटलींत दोन तृतीयांश शिलिंग व रशियांत दोन शिलिंग असें पडतें. पण हिंदुस्थानांत हें प्रमाण सुमारें एक तृतीयांश शिलिंग आहे! वरिष्ठ शिक्षणावर होणाऱ्या खर्चाची तुलनाहि अशीच असमाधानकारक आहे. अमेरिका व युरोप यांतील मुख्य राष्ट्रांत हा खर्च दरसाल दरमाणशीं सहापासून अकरा पेन्स इतका होतो. ग्रीस, इटली, रशिया वगैरे मागसलेल्या देशांत मात्र तो दोनपासून चार पेन्स असतो. पण हिंदुस्थानांत पाहावें तो हा खर्च दरमाणशीं अवघा अर्धा पेनी आहे! कोणी म्हणेल कीं, हिंदुस्थान हा देशच गरीब आहे म्हणून किंवा त्यांत लोकवस्तीच फाजील आहे म्हणून दर माणशीं निघणारीं हीं प्रमाणें विपरीत दिसत असतील; पण तसें नव्हे. कोणत्याहि राष्ट्रांत करपट्टीच्या योगानें वसूल होणारा पैसा व त्या पैशांतून शिक्षणावर होणारा खर्च याचेंच प्रमाण घेतलें तर लोकसंख्येचा कांहींएक संबंध राहात नाहीं, व दारिद्र्याचा प्रश्नहि त्यांत येत नाहीं. राष्ट्र कराच्या रूपानें सरकारास पैसा देतें किती,

व त्यांपैकीं शिक्षणावरील खर्चाच्या रूपानें सरकार राष्ट्रास पैसा परत देत किती, या विचारांत शिक्षणावर खर्च करण्याची सरकारची इच्छा किती, इतकीच गोष्ट निश्चित ठरते; व या दृष्टीनें पाहातां असें दिसतें कीं, खुद्द इंग्लंड व वसाहती यांमध्यें कराच्या वसुलापैकीं शेंकडा दहापासून पंचवीस-पर्यंत इतका पैसा शिक्षणावर खर्च होतो; सीलोनसारख्या देशांत शेंकडा पांच-सहा इतका खर्च होतो; पण हिंदुस्थानांत मात्र हें प्रमाण शेंकडा दोनच्या पुढें जात नाहीं, याचा अर्थ काय होईल ?

पण शिक्षणावर एखाद्या राष्ट्रांत किती खर्च होतो, हा महत्त्वाचा मुद्दा असला तरी त्याहूनहि महत्त्वाचा असा दुसरा एक मुद्दा आहे व तो शिक्षणाच्या स्वरूपासंबंधाचा होय. राष्ट्राच्या व समाजाच्या मनोरचनेनुरूप शिक्षणाचीहि रचना असावी लागते, हें वर सांगितलेंच आहे. शिक्षण उत्कृष्ट कोणतें तर राष्ट्राच्या गरजा भागविण्यास सर्वांत अधिक उपयोगी पडेल तें. व हें ठरण्यास शिक्षणावर ज्यांची सत्ता आहे त्यांच्या मनांत राष्ट्रीय गरजा व आकांक्षा काय आहेत याचें उत्तम प्रतिबिंब पडलें पाहिजे. परंतु हिंदुस्थानांत ही गोष्ट आज आपणांस लाभत नाहीं. याचा दोष सर्वस्वीं सरकाराकडेच आहे असें नाहीं; व शिक्षणाच्या कामीं हिंदुस्थानांत लोक व सरकार यांची दृष्टि स्वाभाविकपणेंच तिरळी कशी राहते—एकाच्या डोळ्यानें दुसऱ्यास कां पाहतां येत नाहीं—याचा विचार पुढें एखाद्या प्रसंगीं एकेक मुद्दा घेऊन आपण करूं; परंतु वस्तुस्थिति आहे ती समाधानकारक नाहीं येवढें म्हटल्याशिवाय मात्र गत्यंतर नाहीं. शिक्षणापैकीं वरिष्ठ शिक्षणाचा भाग विश्वविद्यालयाच्या ताब्यांत आहे;परंतु तेथें लोकमत प्रबळ नाहीं. शिक्षणापैकीं कनिष्ठ व दुय्यम प्रतीचें शिक्षण सर्वस्वीं शिक्षणखात्याच्या ताब्यांत आहे तेथें तर लोकमताचा नुसता प्रवेश होणेंहि दुरापास्त आहे. यामुळें विश्वविद्यालय व शिक्षणखातें यांचे अधिकारी समाजाच्या मनोरचनेस योग्य असें शिक्षण देण्याचा आपल्याकडून शक्य तितका प्रामाणिकपणाचा प्रयत्न करीत असतांहि त्याचा परिणाम, तें जनतेस पटत नाहीं असा होतो, ही दुर्दैवाची गोष्ट आहे; परंतु केवळ अशी गोष्ट असल्यामुळेंच खासगी शिक्षणास होईल तितकें स्वातंत्र्य देण्याचा, आणि शक्य तर सरकारी मदत घेऊन व ती न मिळेल तेथें आपल्या पायांवर उभें राहून लोकांनीं आपलें आपण

राष्ट्राचें शिक्षण सुधारण्याचा उपक्रम कसा करावा हा प्रश्न उत्पन्न होतो. राष्ट्रीय शिक्षणामध्यें शिक्षणाचा राष्ट्रभर प्रसार कसा होईल व राष्ट्रास अत्यंत उपयुक्त अशा रीतीनें तें कसें देतां येईल, हेच दोन मुद्दे मुख्य आहेत. आणि विश्वविद्यालय किंवा सरकारी शिक्षणखातें यांत लोकमताचा ह्हावा तितका प्रवेश होत नाहीं, अशा स्थितींत शिक्षणाच्या बाबतींत निरनिराळे प्रयोग करून व निरनिराळ्या संस्था काढून लोकांनीं हें काम आपलें आपण किती व कसें करावें, याचाच विचार यापुढें आपणांस कर्तव्य आहे.

सरकार व शिक्षण*

नवीन कायदेकौन्सिलें झाल्यापासून त्यांजमध्यें शिक्षणासंबंधानें जितका वादविवाद झाला तितका दुसऱ्या कोणत्याहि विषयासंबंधानें झाला नसेल. तसेंच या विषयावरील वादविवादास इतरांपेक्षां अधिक फळ येण्याचाहि संभव दिसतो. असें होणें केवळ स्वाभाविकच नव्हे तर अपरिहार्यहि आहे. कोणत्याहि प्रगमनशील राष्ट्राच्या प्रगतीचा मूळ पाया शिक्षण हाच असतो, ही गोष्ट इतिहाससिद्ध आहे. हरएक प्रकारच्या शेतीला—मग ती जिराईत असो वा बागाइती असो—जमिनीची साधारण नांगरणी, कोळपणी हीं प्रथम झालींच पाहिजेत. जमीन नांगरून कोळपून झाली म्हणजे मग पुढें कोणचें पीक पेरायचें, व किती उत्पन्न येईल याचा विचार. शिक्षण हा कांहीं चैनीचा पदार्थ नव्हे. कित्येक श्रीमंत लोक आपल्या ख्यालीखुशालींत दंग होऊन विद्येला विसरून जातात, किंवहुना तिची अवहेलना करितात, असें पाहून कित्येकवेळां "शिकून शिकून तरी काय करायचें? पोटच भरायचें कीं नाहीं?" असा उद्गार तोंडून निघण्याचा संभव असतो;पण तो निव्वळ अविचाराचा उद्गार असतो हें लवकरच आपोआप आपल्या लक्षांत येतें. एक तर श्रीमंतांच्या श्रीमंतीलाहि मूळ कारण शिक्षण—बुद्धिविकास—हेंच असतें; व दुसरें असें कीं, श्रीमंत लोकांना झालें तरी

* केसरी, तारीख २१ मार्च १९११.

विद्येविषयीं खरा आदर वाटत नसतो असें नाहीं. आळसामुळें त्यांना स्वतःला विद्यार्जनाचे श्रम करवत नाहींत ही गोष्ट निराळी; परंतु विद्या हा टाकाऊ पदार्थ आहे असें म्हणणारा श्रीमंत विरळा. एवढेंच नव्हे तर अंगीं विद्या नसल्यास लक्ष्मीपुत्रांच्याहि मनाला एकप्रकारची हुरहूर किंवा तळमळ लागलेली असते. श्रीमंतीनें आंगचे इतर दुर्गुण एकवेळ झांकून जातील; पण निर्विद्येच्या कुरूपतेवर कशानेंहि पांघरूण पडणें शक्य नाहीं. सरस्वतीदेवीच्या अवकृपारूप गर्तेंत पडलेल्या अभाग्याला प्रत्यक्ष लक्ष्मीचा वरदहस्तहि वर काढण्यास समर्थ होत नाहीं. व हें मनांत येऊन, चोरीचा माल जवळ बाळगणाऱ्या अपराध्याप्रमाणें श्रीमंत मनुष्याचें मन साशंक व भित्रें असतें आणि त्याला आंतून तोडीत राहातें. विद्यारूप साध्य आणि शिक्षणरूप साधन या दोहोंना व्यक्तीपेक्षांहि राष्ट्रें अधिक मान देतात असें दृष्टोत्पत्तीस येतें. मागसलेल्या राष्ट्रास शिक्षणाशिवाय तरणोपाय नाहीं हें तर झालेंच; पण भरभराटीस आलेल्या राष्ट्रासहि शिक्षणाची किंमत अत्यंत वाटते हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. संपन्न राष्ट्राला खासगी व्यक्तीप्रमाणेंच द्रव्यमद चढतो व ऐषआरामाकडे त्याची प्रवृत्ति होते खरी; पण व्यक्ति व राष्ट्र यांमध्यें एक फरक असा पडतो कीं, आपल्या ऐषआरामांतहि व्यक्तीप्रमाणें राष्ट्राचें शिक्षणाकडे दुर्लक्ष होत नाहीं. संपन्न राष्ट्रें कालांतरानें नामशेष होतात याचें कारण त्यांजमध्यें शिक्षण थांबतें म्हणून नव्हे; तर शिक्षणानें अंगीं येणाऱ्या गुणांपेक्षां बलवत्तर असे दुर्गुण राष्ट्रास जडतात, किंवा जगाच्या घडामोडींत डेरास सव्वाशेर या न्यायानें दुसऱ्या एखाद्या राष्ट्राचा आत्मा परिणतदशेस येत असतो व वृद्ध राष्ट्रास मागें सारून पुढें जाणें हें त्या तरुण राष्ट्राच्या परिणतीस अवश्य ऊसतें म्हणून.

इंग्रज सरकार परकें आहे, हिंदुस्थानासंबंधीं राष्ट्रीयत्वाची भावना त्यांना असावी तितकी नाहीं, हिंदी लोकांच्या हितापेक्षां साम्राज्याच्या हिताकडेच त्यांच्या सुराज्यनौकेची नाळ अधिक झुकलेली असते; या सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी दुसरीहि एक गोष्ट तितकीच खरी आहे ती ही कीं, इंग्रज सरकारास शिक्षणाचें महत्त्व पुरें कळतें आणि हिंदुस्थान सुशिक्षित करून सोडावा, अशी बुद्धि त्यांच्या मनांत निरंतर वास करीत असते. वरिष्ठ शिक्षणासंबंधानें त्यांनीं मनाची चलबिचल दाखविली आहे; आणि

धंदेशिक्षणाकडे तर त्यांचें अक्षम्य दुर्लक्षच झालें आहे. पण प्राथमिक शिक्षणाविषयीं १८५४ सालीं जें धोरण एकदां त्यांनीं जाहीर केलें आहे; त्याचा अंमल आपणांवरून त्यांनीं आजवर ढळूं दिला नाहीं ही गोष्ट कबूल करणें भाग आहे. असें असतांहि शिक्षणासंबंधानें कायदे-कौन्सिलामध्यें इतका वादविवाद कां होतो? मग या गवगव्याचें कारण काय? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, प्राथमिक शिक्षणासंबंधानें सरकारचें धोरण जरी ठाम आहे, त्या धोरणाचा त्यांच्या मनावरचा अंमल जरी कायम आहे, तरी हातानें प्रत्यक्ष कृतींत उतरण्यास तें धोरण अद्यापि फार जाचतें ही गोष्ट लोकपक्षीय पुढाऱ्यांस पटत नाहीं. सरकारनें पाय अधिक लवकर उचलून टाकावा, इतर कार्यांत–विशेषतः दडपशाहीच्या कामीं–दिसून येणारा त्यांचा हव्यास, त्यांचा जोर, त्यांची दिलदारी, हीं शिक्षणाच्या बांड्यास हळींहून अधिक यावीं असें त्यांचें म्हणणें आहे. व केवळ यामुळेंच हा वादविवाद व हा गवगवा होत आहे. वरिष्ठ कौन्सिलांत ना० गोखले व मुंबई कौन्सिलांत ना० जोशी यांनीं बिलें व ठराव यांच्या योगानें जो उद्योग चालविला आहे त्याचा हेतु तरी सरकारचें पाऊल अधिक जोराने व जलद पडावें हाच आहे. सभाबंदीच्या कायद्याप्रमाणें राजकीय विरोधाची अगर गिरण्यांवरील जकातीप्रमाणें व्यापार-विषयक स्पर्धेची ती बाब नाहीं. ना० गोखले यांनीं शिक्षण सक्तीचें करण्याबद्दल जें बिल पुढें आणलें आहे, रा० ब० जोशी यांनीं मुंबई इलाख्यांत प्राथमिक शिक्षणाच्या शाळा दरसाल पांचशेंनीं वाढवाव्या असा जो ठराव मांडिला होता त्या सर्वांचा हेतु सरकारच्या हेतूशीं मिळूनच आहे. फरक काय तो साधनाचा. सरकारास वाटतें कीं, हल्लीं चालू असलेल्या गतीनेंच मजल गांठतां येईल. ना० गोखले व जोशी यांचें म्हणणें कीं, हल्लींच्या चालीनें चालल्यास सरकारला हिंदी लोक व इतर राष्ट्रें हंसतील आणि मजल केव्हांच गांठली जाणार नाहीं. सरकार म्हणतें कीं, लोकांना प्राथमिक शिक्षणाची फारशी हौस नाहीं; मग आम्हीं तें त्यांजवर बळेंच लादण्याची व त्याकरितां जरूर तितक्या नव्या शाळा काढण्याची जबाबदारी विनाकारण अंगावर कां घ्यावी? पण ना० मेथा यांनीं रा० ब० जोशी यांच्या सूचनेस अनुमोदन देतांना सांगितल्याप्रमाणें शिक्षणाच्या बाबतींत केवळ लोकांच्या प्रवृत्तीवरच बिसंबून चालावयाचें

नाहीं. शिक्षणासारखें राष्ट्रसुधारणेस दुसरें गुणकारी साधन नाहीं. बरें, सरकारास लोकांवर सक्ति करण्याचें मुळीं माहितच नसतें तर गोष्ट वेगळी. पण सरकारच्या सक्तीची मजल कोठवर जाऊं शकते हें उदाहरणें देऊनच आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. प्रजेस अप्रिय अशाहि गोष्टी केवळ आपले हिंमतीवर व करारीपणावर अमलांत आणण्याची इंग्रज सरकारची कीर्ति हिंदुस्थानांत चहूंकडे लोक गातच आहेत. अर्थात् शिक्षणासारख्या पवित्र कामीं जर सरकारानें सक्तीचा उपयोग केला तर त्यांस कोणी फारसें नांव ठेवील अशी भीति नको. सक्ति करणें ही चूक आहे असें मानलें तरी शिक्षणासारख्या कामीं ती केली गेल्यास इतर चुकांपेक्षां ती चूक पुष्कळ बरी. सरकारास कधीं नव्हे ती शिक्षणाच्या बाबती-पुरतीच सावधगिरी कोठून आठवते हें लोकांस सहसा समजत नाहीं. रशियासारख्या देशांत शेंकडा सव्वीस लोकांस लिहितां वाचतां येतें, असें असतां हिंदुस्थानांत मात्र ही मर्यादा शेंकडा सहाच्या पुढें अद्याप गेली नाहीं, हें लक्षांत घेणारांस ही सावधगिरी थोडी फाजिलच वाटेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही सक्ति कांहीं लोकांस नकोशी वाटते असेंहि घेऊन चाललें तरी त्या नापसंतीचे परिणाम इतर कित्येक बाबतींतल्या नापसंती-च्या परिणामाइतके दारुण कधींहि होणार नाहींत. बडोद्यासारख्या राज्यांत या सक्तीचा प्रयोग करण्यांत आलेला आहे; आणि तेथें प्रजा या कारणामुळें नाखूष झाली आहे अगर बिथरून उठली आहे, असें कोणाच्या ऐकिवांत नाहीं. असें असतां इंग्रज सरकारनें मात्र या कामीं माघार घेतली असतां तिचा परिणाम लोकांच्या मनावर अनिष्ट होईल, हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं.

ना० गोखले यांनीं या बाबतींत वरिष्ठ कायदेकौन्सिलापुढें जें बिल हल्लीं आणलें आहे त्यावरून सक्तीच्या शिक्षणांत किंवा शिक्षणाच्या सक्तींत भय वाटण्यासारखें कांहीं नसतें, हें कोणासहि दिसून येईल. सदर बिलांत खालीं दिल्याप्रमाणें योजना सुचविण्यांत आली आहे. सरकार ठरवील त्या इलाख्यांत सरकार ठरवील त्याप्रमाणें खर्चाची तरतूद करणाऱ्या म्युनिसि-पालिटीस अगर डि० लोकलबोर्डास आपल्या अमलाखालच्या आईबापांवर व इतर पालकांवर आपलीं मुलें शाळेंत शिकण्यास पाठविण्याची सक्ति

करितां येईल. ही सक्ति म्हणजे इतकीच कीं, सहा ते दहा या दरम्यानच्या वयांतील मुलांस शाळेंत पाठविणें त्यांस भाग आहे. शाळाखातें ठरवील तितके दिवस अशा मुलांची हजेरी शाळेंत लागलीच पाहिजे; तसें न झाल्यास आईबापांवर अगर पालकांवर खटला भरतां येईल. आणि त्यांनीं आपलीं मुलें योग्य कारण नसतां शाळेंत पाठविलीं नाहींत असें शाबित झाल्यास पहिल्या अपराधाकरितां जास्तींत जास्ती दोन रुपये व पुढील अपराधाकरितां जास्तींत जास्ती दहा रुपयेपर्यंत दंड करण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेट लोकांस दिला जाईल. हा दंड जास्त आहे असें कोणीहि म्हणणार नाहींच. परंतु गायकवाडी राज्यांत—म्हणजे जेथें असे खटले करण्यांत येतात तेथें—मुलाच्या शिक्षणाची हेळसांड करण्याचा गुन्हा करणाऱ्या आईबापांस जबर असा दंड कधींहि करण्यांत येत नाहीं. थोड्याशा दंडाच्या चुणुकेनें कायद्याचा हेतु सिद्धीस जातो असें आढळून आलें आहे; व ब्रिटिश मुलखांतहि अशा कायद्याचा अंमल अशा बेतानेंच होईल हें सांगावयास नको. सक्तीचा मुख्य भाग हा काय तो एवढाच आहे. परंतु ना० गोखले यांच्या बिलांत इतक्या सवलती ठेवल्या आहेत कीं, त्या जमेस धरल्या असतां अशा कायद्याचा अंमल कडक अगर त्रासदायक होईल असें मानण्यास मुळींच कारण नाहीं. या सवलती अशा आहेत कीं, नवीन कायद्याचा अंमल फक्त सहा ते दहा वर्षांच्या मुलांपुरताच होण्याचा आहे. शाळेंत जाण्याची सक्ति सामान्यतः मुलींवर करण्यांत येणार नाहीं; एखाद्या भागांत लोक मागसलेले नाहींत अशी सरकारची खात्री होऊन सरकारनें आधीं परवानगी दिली तरच त्या ठिकाणीं मुलींनाहि हा कायदा लागू करण्यांत येईल. तसेंच जी एकंदर जात मागसलेली आहे, असें सरकारास वाटेल व जिला हा कायदा लावून फारसा उपयोग होणार नाहीं अशी सरकारची खात्री पटेल अशा जातीवर या कायद्याप्रमाणें शिक्षणाची सक्ति करूं नये अशीहि सवलत ठेवण्यांत आली आहे. लहान मुलानें शाळेंत गेलेंच पाहिजे हें खरें; पण शाळा तरी घरांपासून अमुक एका लांबीपेक्षां अधिक लांब नसाव्या कीं, शाळा वाटेल तितक्या लांब असल्या तरी मुलांना गेलेंच पाहिजे ? या प्रश्नाविषयीं नामदार गोखले यांच्या बिलांत असा नियम घालण्यांत आला आहे कीं, मुलांच्या घरांपासून एक मैलाच्या आंत जर

शाळा नसेल तर शाळेंत जाण्याची त्यांजवर सक्ति होणार नाहीं. तसेंच शाळा एक मैलाच्या आंत असूनहि जर ती धर्मदृष्ट्या अग्राह्य वाटेल तरीहि पालकावर मुलास अशा शाळेंत पाठविण्याची सक्ति केली जाणार नाहीं. शाळा जवळ असूनदेखील मुलगा आजारी, पंगू, व्यंग असा असेल तर त्यास शाळेंत न पाठविण्यास तें योग्य कारण आहे असेंच मानण्यांत येईल. बरें, शाळा जवळ आहे, धर्माची अडचण नाहीं आणि मुलगाहि रोगी किंवा अशक्त नाहीं असें असतांहि आईबाप गरीब असल्यामुळें मुलगा घरींच राहावा अशी जर त्यांस जरूर असेल, किंवा शेतकाम वगैरे करणाऱ्या आईबापांस सुगीहंगामाच्या दिवसांत मुलगा घरच्या कामधंद्याकडे लावणें हें विशेष सोईचें होईल, तर अशाहि ठिकाणीं आईबापांवर मुलांस शाळेंत पाठविण्याची सक्ति केली जाणार नाहीं. वर नमूद केल्यापैकीं कोणतीहि अडचण नाहीं, पण मुलास शाळेंत पाठविण्यापेक्षां त्यास घरीं राहून घेऊन स्वतंत्र शिक्षक ठेवून स्वतःच्या देखरेखीखालीं त्याचें शिक्षण करणें हेंच संपन्न अशा आईबापांस अधिक इष्ट वाटणें शक्य आहे. अशा स्थितींतहि मुलें शाळेंत पाठविण्याची सक्ति आईबापांवर होणार नाहीं, असेंहि या नवीन बिलांत एक कलम घालण्यांत आलें आहे. सक्तीचें शिक्षण हें वास्तविक फुकटच दिलें जावें, निदान ज्यांच्यावर अशी सक्ति कायद्यानें करावी लागते त्यांना आपल्या मुलांस शाळेंत शिक्षण फुकट मिळेल ही जाणीव तरी समाधानकारक व उत्तेजनपर होईल. तथापि सरकारचा रोख फी काढून टाकण्याऐवजीं वाढविण्याकडेच हल्लीं आहे, ही गोष्ट लक्षांत घेऊनच कीं काय ना० गोखले यांच्या बिलांत अशी योजना केली आहे कीं, ज्या पालकाचें उत्पन्न महिना दहा रुपयांपेक्षां अधिक आहे अशाकडूनच मात्र ठराविक फी घ्यावी; महिना दहा रुपयांहून कमी उत्पन्न असणाऱ्या आईबापांकडून फी घेण्यांत येऊं नये; आणि दहा रुपयांवर उत्पन्न असलें तरी पालकाकडून फी घ्यावी अगर माफ करावी हें ठरविण्याचा अधिकार स्थानिक स्कूलकमिट्यांस असावा.

वरील सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या असतां आईबापांस खरोखर जाचक होईल अशी सक्ति या बिलांत फार थोडी आहे हें कोणासहि कबूल करावें लागेल. अल्पवयी मुलांनीं शाळेंत न जाण्यास जीं जीं म्हणून योग्य कारणें

मनांत आणणें शक्य आहेत, त्या सर्वांचा समावेश ना० गोखले यांनीं आपल्या बिलांत केलेलाच आहे. अर्थात् वरीलपैकीं कोणतेंहि कारण नसतां आईबापांनीं अल्पवयी मुलांस शाळेंत न घालणें व जरूर तर त्यांच्या शिक्षणावर थोडाबहुत खर्च न करणें हा गुन्हा मानण्यास कोणीहि समंजस मनुष्य हरकत घेणार नाहीं. आणि त्याजवर खटला करून रुपया दोन रुपयांचें प्रायश्चित्त घेणें त्याला कोणीं भाग पाडल्यास ती गोष्ट परमेश्वराचे घरीं पूर्णपणें रुजू होईल यांत शंका नाहीं. या बिलांतील शिक्षेच्या स्वरूपावरूनच या गुन्ह्याची खरी कल्पना येईल. वास्तविक तो खरा गुन्हाहि नाहीं व ती खरी शिक्षाहि नाहीं. आपल्या कर्तव्याचें ज्यांस विस्मरण पडलें आहे अशांना किंचित् हलवून जागें करावें, व अशा रीतीनें एकदां जागे झाले असतां त्या गोष्टीचें पालकांस पुन्हा विस्मरण होणार नाहीं एवढाच या बिलाचा उद्देश आहे. अशा सोज्ज्वळ आणि पवित्र कामीं लोक स्वतःवर कायदेशीर सक्ति करून घेण्यास आणि जरूर तर नवीन पिढीच्या शिक्षणाप्रीत्यर्थ आपखुषीनें थोडीशी करपट्टी स्वतःवर लादून घेण्यास तयार असतां, या कामींहि लोकपक्षास मदत देण्याची सरकारास इच्छा न होईल तर फक्त परमेश्वरालाच त्यांचें मन ओळखतां येतें, आम्हीं त्या कामीं हात टेकले असें म्हणणें भाग होईल.

शास्त्रीय शिक्षणाचा उत्कर्ष*

हिंदुस्थानांत राज्य करण्यास गव्हर्नर व गव्हर्नरजनरल विलायतेंतून थोड्या मुदतीनें आणण्याची जी चाल पडलेली आहे, तिजपासून कांहीं तोटे आहेत; पण तसेच कांहीं फायदेहि आहेत. खुद्द हिंदी लोकांना गव्हर्नर नेमण्याची वेळ येण्यास तर अद्यापि अवकाश आहेच; कारण हिंदी प्रजा काय बोलूनचालून मनुष्यकोटींतली. पण सिव्हिल सर्विस परीक्षा दिल्याच्या योगानें ज्यांना अतिमनुष्यकोटीचा दर्जा प्राप्त झाल्याचें मानण्यांत येतें, अशा अँग्लोइंडियन यक्ष-किन्नर-गंधर्वादिकांनाहि गव्हर्नरीचा मान दुर्मिळ आहे–'मनसोऽप्यभूमिः' अशांतला तो लाभ आहे. व या निराशा–सामान्यामुळें तरी हिंदी प्रजा आणि त्यांचे सिव्हिलियन राज्यकर्ते हे एका माळेला बसूं शकतात ही एक त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट होय. विलायतेंतून आलेल्या ताज्या, अलिप्त मनाच्या मुत्सद्द्याच्या शहाणपणाची सर हिंदुस्थानांत तपेंच्यातपें घालवलेल्या अँग्लो–इंडियन सिव्हिलियनास येणार नाहीं, अशीच अप्रत्यक्ष कबुली, दर पांच वर्षांनीं विलायतेंतून गव्हर्नर आणण्याचा प्रघात पाडून, सरकारानें स्वतःच दिली आहे. आणि या धोरणामुळें प्रांतानिहाय मधूनमधून जे थोडे उत्कृष्ट गव्हर्नर आम्हांला लाभतात त्यांच्या योगानें तें धोरण खरोखरच शहाणपणाचें ठरतें यांत शंका नाहीं. विलायतेंतून आणलेल्या गव्हर्नरांमध्यें 'बडे बापके बेटे पण कपाळकरंटे' असेही पुष्कळ असतात. पण अशा गृहस्थांमध्यें कधीं कधीं इतर विशेष गुण नसले तरी अँग्लो-इंडियनांत सहसा नसणारें दाक्षिण्य व संभावितपणा हा तरी हटकून असतो.

पण येवढ्यानें झालें नाहीं; कारण लॉर्ड रे व सर जॉर्ज क्लार्क यांची योग्यता वरील प्रतीच्या गृहस्थांहूहि फार अधिक आहे. त्यांच्याप्रमाणें यांच्याहि अंगीं सौजन्य व दाक्षिण्य असून शिवाय कर्तृत्व, विद्वत्ता आणि सुधारणावादित्व हे गुण त्यांजमध्यें विशेष प्रमुख होत. शिक्षणाच्या दृष्टीनें

* केसरी, तारीख ११ एप्रिल १९१४.

पाहिलें तर लॉर्ड रे व सर जॉर्ज क्लार्क यांच्यासारख्या उदात्त विचाराचे व दूरदर्शी गव्हर्नर मुंबई इलाख्यास पूर्वी क्वचितच लाभले असतील. या जोडीपैकींहि त्यांतल्यात्यांत ना० सर जॉर्ज क्लार्क हे अधिक नशीबवान् आहेत. लॉर्ड रे यांच्या कारकीर्दीत शिक्षणाच्या बाबतींत सुधारणेचा नुसता अरुणोदय झालेला होता; यामुळें शिक्षणास मोठमोठ्या देणग्या देण्याची बुद्धि धनिक लोकांस फारशी होऊं लागली नव्हती. प्रांतिक सरकारचें उत्पन्नहि तेव्हां बेताबाताचें असे; आणि हिंदुस्थानसरकाराकडून विशिष्ट कामाकरितां प्रांतिक सरकारास मोठमोठ्या रकमा जशा गेल्या दहापांच सालांत मिळाल्या तशा तेव्हां मिळत नसत. सर जॉर्ज क्लार्क हे इकडे येण्याचे पूर्वी या सर्व अडचणी दूर होऊन नवीन विचाराची भरती भरण्यास सुरुवात झाली होती; त्यांतच स्वतः सर जॉर्ज क्लार्क यांच्या अनुभवाची आणि उत्साहाची भर पडली, यामुळें गुण द्विगुणित झाला. आणि गेल्या बुधवारीं मुंबईस ना० गव्हर्नरसाहेबांनीं पायाचा दगड बसविण्याचा जो समारंभ केला तो एखाद्या इमारतीच्या पायाचाच नसून मुंबई इलाख्यांतील शास्त्रीय शिक्षणाच्या उत्कर्षाच्या पायाचाच होय असें आम्ही तर म्हणतों.

सर जॉर्ज क्लार्क यांची शिक्षणविषयक हौस केवळ स्थानिक नसून ती त्यांनीं, लॉर्ड रे यांचेप्रमाणेंच, येतांना विलायतेहून आणली होती. लॉर्ड रे यांचा कटाक्ष सर्वसाधारण शिक्षणावर होता, तथापि धंदेशिक्षणाचा पाया त्यांनींच इकडे घातला. सर जॉर्ज क्लार्क हे हुशार इंजिनियर व शास्त्रज्ञ असून स्वतः त्यांनीं प्रोफेसराचें कामहि कांहीं दिवस केलेलें आहे. विलायतेंत शिक्षणक्रमांत झालेल्या सर्व सुधारणा त्यांच्या डोळ्यापुढें होत्या; आणि यामुळें हिंदुस्थानांत येतांच इकडील शिक्षणक्रमांत कोणते फेरबदल करणें जरूर आहे, हें त्यांनीं आपल्या चौकस मनानें पाहून कुशाग्रबुद्धीनें तात्काळ ठरविलें. ना० गव्हर्नरसाहेब इकडे आल्यानंतर थोड्याच दिवसांत मुंबई विश्वविद्यालयाचे चान्सलर या नात्यानें त्यांना भाषण करण्याचा प्रसंग आला. त्या भाषणांत शिक्षणविषयक परिस्थितीवर त्यांनीं नवीन प्रकाश पाडला. पाश्चात्य देशांतील आधुनिक पद्धतीप्रमाणें इकडेहि शास्त्रीय शिक्षण फैलावणें जरूर आहे; पण हें काम पैशाचें असल्यामुळें धनिक लोकांनीं

घुदें सरसावावें आणि त्यांनीं उदार देणग्या द्याव्या, अशी आशा नामदारांनीं प्रगट केली.

अवघ्या तीन वर्षांत या आशावृक्षास फळ आलें. विश्वविद्यालयामध्यें नव्या सेनेटच्या द्वारें गव्हर्नरसाहेबांनीं वरिष्ठ शिक्षणक्रम दुरुस्त करून घेतला, व निवळ पुस्तकी विद्येच्या मानानें शास्त्रीय ज्ञान हें जें मागासलें होतें त्याला हात देऊन वरती काढलें. विश्वविद्यालयाचें आजवरचें काम शिक्षणक्रम ठरवून परीक्षा घेण्याचें; पण शिक्षण देण्याची व्यवस्था झाल्यावांचून शिक्षणक्रम बदलून व परीक्षा घेऊन काय उपयोग ? कॉलेजांची स्थिति पाहावी तर शास्त्रीय शिक्षणास लागणारी सर्व उपकरणसामुग्री सिद्ध करण्यास त्यांना ऐपत नाहीं. खासगी कॉलेजें बोलूनचालून गरीब ! त्यांतील शिक्षक फार तर पोट बांधून काम करतील. पण शास्त्रीय शिक्षणाचीं उपकरणें व साधनसामुग्री पैशाशिवाय कशी मिळणार ? खासगी कॉलेजें एक सोडलीं; पण सरकारी कॉलेजांत तरी ही सर्व सिद्धता असावी कीं नाहीं; पण घुर्णे-मुंबईचीं सरकारचीं कॉलेजें पहावीं तर तींच मुळीं या बाबतींत खासगी कॉलेजांहून नादान. लॉर्ड कर्झन यांनीं युनिव्हर्सिटी कमिशनच्या तोंडून खासगी कॉलेजांना जवळ जवळ 'टिनपॉट'—म्हणजे नादान—दरिद्री—म्हणून तोंडसुख घेतलें. पण कोट्याधीश सरकारानें तरी आपल्या कॉलेजांच्या अब्रूची कितपत लाज राखली होती याचा विचार त्यांनीं केला नाहीं. असो; विश्वविद्यालयानें परीक्षा घेण्याप्रमाणेंच शिक्षण देण्याचीहि व्यवस्था करावी, असें सदर कमिशनानें ठरविल्यापासून नव्या मन्वंतराचा उदय झाला; सरकारानें शिक्षणाच्या कामीं खासगी कॉलेजांस गेल्या पंचसहा सालांत विशेष देणग्या दिल्या; व सदर कॉलेजांनीं आपल्या स्वतंत्र स्फूर्तीनेंहि शास्त्रीय शिक्षणाची अधिक सोय केली. पण शास्त्रीय शिक्षण चांगलें द्यावयाचें तर त्याला अतोनात खर्च येतो; व यामुळें व्यक्तिशः प्रत्येक कॉलेजाला—मग तें खासगी असो वा सरकारी असो—तें आपापल्या घुरतें देणें अशक्य असतें. अर्थात् हें शिक्षण इलाख्यांत फक्त एक दोन ठिकाणींच द्यावें व सर्व द्रव्यशक्ति एकवटून त्या एक दोन संस्थाच चांगल्या संपन्न कराव्या अशी ना० गव्हर्नरसाहेबांची कल्पना होती व ती सर्वस्वीं सयुक्तिक होती.

सुदैवानें ना० गव्हर्नरसाहेबांच्या आकांक्षेनुरूप त्यांना मुंबई व अहमदाबाद येथील धनिक नागरिकांची मदत मिळाली. वास्तविक जगांत द्रव्य हवें तितकें पसरलेलें असतें पण तें एकत्र होण्यास कोणीतरी समर्थ किंवा कल्पक व्यक्ति लागते. लोहचुंबकाच्या साहाय्यानें खाणींतल्या लोहमिश्रित मातींतून लोखंड काढतां येतें; हिंदुस्थानांतहि श्रीमंत लोकांच्या खिशांतून पैसे बाहेर काढण्यास एखाद्या तांबड्या डगलेवाल्याच्या हातांतली सोनेरी मुलाम्याची भालदारी काठी सुवर्णचुंबकाचें काम फार चागलें करूं शकते, असा अनेक वेळां अनुभव आलेला आहे. अधिकारी लोक हे राजाचा अंश असल्यामुळें त्यांच्या शब्दास मान देऊन वर्गण्या देणें हें सर्वच बाजूंनीं चांगलें ठरतें. अगदीं व्यावहारिक अर्थ घेतला व उपकार-प्रत्युपकार या तत्त्वावर श्रीमंत लोक अधिकारी लोकांस देणग्या देतात असें म्हटलें तरी तेंहि ठीकच आहे. जगांत अगदीं निरपेक्ष अशीं खरीं गुप्त दानें कितीशीं असतात ? भगवद्गीतेंत यज्ञाची स्तुति करितांना सांगितल्याप्रमाणें—

देवान् भावयतानेन ते देवा भावयंतु वः।
परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ॥

परस्परसंभावनेचा हा प्रकार सनातनच आहे. परंतु दान निरपेक्ष असलें किंवा नसलें तरीहि तें करण्याच्या रीतींत औचित्य व अनौचित्य असा भेद होऊं शकतोच, असा पुष्कळांचा समज असतो; व तो सयुक्तिकहि असतो. यज्ञकुंडांत आज्य ओतावयाचें तें अल्युमिनमच्या चहादाणीच्या तोटीनें ओतलें तर कसेंसेंच वाटेल; त्या कामीं स्रुक्-स्रुवांची योजनाच प्रशस्त. त्याचप्रमाणें, आमच्या धनिक लोकांना स्वार्थयज्ञ करतांना मोठमोठ्या रकमांचें उदक सोडावयाचें तें गव्हर्नरसाहेबासारख्यांचे हातून सोडलें म्हणजेच खरें समाधान होतें ! मोठ्यांना मोठ्याच्या सहकारितेची इच्छा असणें स्वाभाविकच आहे. पण प्रस्तुत प्रसंगीं दुसरेंहि एक विशेष कारण होतें; व तें कारण म्हटलें म्हणजे स्वतः ना० गव्हर्नरसाहेबांची कुशल योजकता हें होय. सत्कार्याकडे वाहिलेल्या पैशाचा उपयोग नीट झाला तर बरा नाहीं तर त्यासारखी हानि नाहीं. पण ना० सर जॉर्ज क्लार्क यांचेसारखा अनुभवी शास्त्रज्ञ मार्गदर्शक मिळाल्यामुळें आपल्या देणगीचा चांगलाच

उपयोग होईल, असा योग्य भरंवसाहि मुंबईच्या व अहमदाबादच्या धनिक लोकांस वाटला असेल असें दिसतें.

कसेंहि असलें तरी ना० गव्हर्नरसाहेबांच्या भाषणानंतर लवकरच शास्त्रीय शिक्षणावर देणग्यांचा वर्षाव झाला. सर कावसजी जहांगीर यांनीं ४ लक्ष, सर जेकब सासून यांनीं १० लक्ष, सर करीमभाई इब्राहीम यांनीं ४½ लक्ष, सर चुनीभाई माधवलाल यांनीं ६ लक्ष रुपये दिले. सर करीमभाई यांनीं कांहीं स्कॉलर्शिपा–शिष्यवृत्तिहि–देऊं केल्या; व अशा रीतीनें मुंबईस व अहमदाबादेस मिळून सुमारें पांचसातशें विद्यार्थ्यांना शास्त्रीय शिक्षण यापुढें दरसाल मिळवितां येईल अशी योजना झाली. वर सांगितलेल्या २४½ लक्षांत सरकारानें स्वतः ५ लक्षांची भर घातली आहे. परंतु सरकारच्या ऐपतीच्या मानानें ही देणगी जरा थोडीच झाली, असें म्हणावें लागतें. असो; एवढी थोर कल्पना मनांत येतांच इतक्या लवकर ती सफळ झाल्याचें गव्हर्नरासारख्या अधिकाऱ्यांच्याहि अनुभवांत हें पहिलेंच उदाहरण असेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. वरील दानशूर मंडळींत हिंदु-मुसलमान-पार्शी–यहुदी-खिस्ती अशा सर्व मुख्य धर्मांचा समावेश झालेला आहे; आणि आजच्या स्थितींत या सर्व जातींनीं मिळून असेंच राष्ट्राचें काम करणें जरूर आहे. या पंचमुखी मारुतीनें पराक्रम केला तरच हिंदुस्थानाचा तरणोपाय आहे या गोष्टीचें निदर्शक मुंबईची ही नवी शास्त्रशाळा होय, अशी कल्पना खचित शोभेल.

शास्त्र-शिक्षणाचे फायदे कोणास आज नव्यानें सांगितले पाहिजेत असें नाहीं. असें असतां शिक्षणाची ही बाजू आजपर्यंत कां मागासलेली राहावी? या गोष्टीला अनेक कारणें आहेत. एक तर हिंदुस्थानांत भौतिक शास्त्रांकडे पूर्वीपासून लक्ष कमी, ही गोष्ट ना० गव्हर्नरसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें खरीच आहे. पौर्वात्यांची दृष्टि अध्यात्मविद्येकडे अधिक. एवढेंच नव्हे, तर ना०गव्हर्नरसाहेबांनीं उपनिषदांतला जो उतारा आधारादाखल घेऊन उपनिषदांतहि स्पेन्सरप्रमाणें 'सायन्स'चें म्हणजे भौतिकशास्त्राचेंच महत्त्व वर्णिलेलें आहे. 'शास्त्रा'ध्ययनानेंच मनुष्य उत्तमोत्तम अशा देवलोकाप्रत जातो–असें सांगितलें, त्याचा अर्थ मात्र तसा नाहीं. सदर उताऱ्यांत 'शास्त्र' या शब्दाचा अर्थ भौतिकशास्त्र नव्हे तर अध्यात्मविद्याच होय,

असें आम्हांस वाटतें. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, ज्या तऱ्हेचें व्यावहारिक शिक्षण पाश्चात्य विद्यालयांतून देतात, त्या प्रकारचें शिक्षण पाठशाळांतून देण्याची आमची परंपरा मुळींच नव्हती. पूर्वी धंदेशिक्षण काय किंवा कलांचें शिक्षण काय हें सर्व जातींतल्या जातींत आनुवंशिक परंपरेनें किंवा शिष्यत्व करून म्हणजे हल्लींच्या 'अप्रेंटिस' पद्धतीनें मिळत असे. तो काळहि गेला व ती पद्धतिहि गेली. हल्लीं वर्णाश्रमधर्म–व्यवस्थेची बहुतेक अव्यवस्थाच झाली असून, व्यावहारिक शिक्षणाची पाश्चात्यांची नवीन पद्धति अंगिकारण्याखेरीज आम्हांस गत्यंतर नाहीं.

ही गोष्ट लॉर्ड मेकॉले यांस कळत नव्हती असें मात्र नाहीं. पण लॉर्ड मेकॉले यांच्या वेळीं खुद्द इंग्लंडांत तरी भौतिकशास्त्राच्या शिक्षणाचें पाऊल कोठें पुढें पडलें होतें? व विलायती विहिरींत जें नव्हतें तें अँग्लो-इंडियनी पोहऱ्यांत त्यावेळीं कोठून येणार? मेकॉले यांच्या वेळीं जो वाद होता तो पुस्तकी ज्ञान व व्यावहारिक ज्ञान यांच्यामधील विरोधाचा नव्हता; तर इंग्रजी भाषा, वाङ्मय व तद्द्वारा मिळणारें पुस्तकी ज्ञान आणि पौर्वात्य किंबहुना संस्कृत भाषा, वाङ्मय व तद्द्वारा मिळणारें पुस्तकी ज्ञान–अशा दोनप्रकारच्या पुस्तकी ज्ञानांतील विरोधाचाच होता. नांवें ठेवावयाचींच तर मेकॉलेला ठेवून काय उपयोग? या नव्या युगांत जुनी परंपरा बुडवून नव्या पद्धतीचें शिक्षण देण्याची जबाबदारी पत्करणाऱ्या सरकारासच तीं ठेवलीं पाहिजेत. मेकॉलेच्या वेळीं पाश्चात्य विद्यालयांतूनहि व्यावहारिक शास्त्रशिक्षणाचा अंधारच होता. प्रकाश पडला तो गेल्या पन्नास वर्षांतच पडलेला आहे. पण या पन्नास वर्षांत स्वराज्यसुख भोगणाऱ्या सर्व राष्ट्रांनीं या प्रकाशापासून आपआपला फायदा करून घेतला–मग तीं राष्ट्रें पाश्चात्य असोत वा पौर्वात्य असोत अर्थात् जी गोष्ट इंग्लंड व जपान यांस शक्य झाली तीच हिंदुस्थानास कां होऊं नव्हती? ना० गव्हर्नरसाहेब म्हणतात त्याप्रमाणें हिंदी लोकांपेक्षां जपानी लोकांच्या मनाची रचना अधिक व्यवहारप्रिय असेल. पण हेंच जर खरें कारण तर आज तरी हिंदी लोकांचा स्वभावगुण बदलला आहे कशावरून? आणि तो बदलला नसतांहि शास्त्रशिक्षण देण्याचा आज जो प्रयत्न करावयाचा तोच पूर्वी करण्यांत आला असता तर आम्ही हिंदी लोक काय आडवे पडत होतों?

तेव्हां काय व आतां काय मार्गदर्शकपणाचें व शिक्षकाचें काम सरकाराकडे. आमच्याकडे होतें काय व आहे काय ? जुन्या व नव्या विश्वविद्यालयांत सेनेटें हीं नेहमीं सरकारच्याच हातचीं; त्यांचेंच त्यांत बहुमत. या सरकारमतप्रदर्शक विश्वविद्यालयांनीं ठरविलें असतें तर जें आम्ही आज शिकणार तेंच पूर्वीहि शिकलों असतों. पण हा सर्व दोष लॉर्ड मेकॉले यांचा नव्हे, आमच्या देशांतील विशिष्ट राज्यपद्धतीचा. गेल्या चाळीस वर्षांत सरकारानें जमेच्या खात्याचा कारभार जसा कसला व कमावला तसा कित्येक खर्चाच्या खात्यांचा कारभार कसला व कमावला नाहीं. आमच्या दृष्टीनें पाहाणार कोण ? परतंत्र स्थितींत तरी उत्कृष्ट राज्यकर्त्यांची परंपरा कोठें टिकते आहे ? लॉर्ड रे नंतर सर जॉर्ज क्लार्क हे वीस वर्षांनीं आले, दरम्यान सर्व अंधकारच. दरम्यानच्या कोण्या गव्हर्नराचा क्रिकेट खेळणें हा, तर कोणाचा शांतिब्रह्मपद पावणें हा मुख्य गुण. आणि सर जॉर्ज क्लार्क यांच्या मागून वीस वर्षें कशीं जातात हें तरी कोणास ठाऊक ? तात्पर्य, हिंदुस्थानांतली प्रगति म्हणजे 'नरहर देवाची' पालखी. कोणी भक्त यदृच्छेनें भेटल्यास त्यानें हातभार लावावा; जाईल तितकी जाईल, थांबेल तेथें थांबेल. स्वतः आमचे आम्ही खपून खर्चून शिक्षणाची प्रगति करूं म्हटलें तर, ना० गोखल्यांच्या शिक्षणविषयक बिलाची गत पुढील वर्षीं काय होते तें पहा आणि मग बोला. असो; तथापि मतवादाचे हे मुद्दे बाजूस ठेवून आजच्या पुरतें आज पाहूं. या दृष्टीनें शास्त्रशिक्षणाच्या कामास मनोभावानें मदत करून शिक्षणास निराळी दिशा दिल्याबद्दल ना० सर जॉर्ज क्लार्क यांचे मनःपूर्वक आभार मानणें जरूर आहे. हिंदी प्रजेचें पाऊल उद्योगधंद्यांत पुढें पडावें या हेतूनें म्हणा किंवा स्वतः त्यांनींच बोलून दाखविल्याप्रमाणें उज्ज्वल अशा राजकीय ध्येयांचें आतुरतेनें ध्यान करणाऱ्या तरुणांच्या मनास विरजण पडण्याकरितां म्हणा—व्यावहारिक शिक्षणाचा जो उपक्रम त्यांनीं केला तो आम्हांस सर्वस्वीं ग्राह्य व मान्य आहे. या व्यावहारिक शिक्षणाच्या योगानें राष्ट्रीय व राजकीय विचार बोथटणार किंवा खरोखर अधिक तीक्ष्ण होणार याचा वाद आज कशाला ? या गोष्टी भविष्यकाळाच्या पोटांत सांठविल्या आहेत, त्या त्यांचा तोच पाहून घेईल.

शेतकी–शिक्षण व सुधारणा*

कोणत्याहि गोष्टीला ज्याप्रमाणें दिशा आणि काळ हीं अपरिहार्य अंहेत, त्याचप्रमाणें भूमिहि अवश्य आहे. मनुष्य हा भूमीवर जन्माला येतो; भूमीपासून उत्पन्न झालेल्या पदार्थांवरच त्याची उपजीविका व आयुर्यात्रा होते; उद्भिज वनस्पतींप्रमाणें मनुष्यप्राणी हाहि एका अर्थानें भूमिज होय असें म्हणण्यास हरकत नाहीं; व तो मृत्यु पावल्यावर, त्याचें दहन झालें किंवा दफन झालें तरी, त्यानें भूमीपासून पूर्वी आपल्या फायद्याकरितां जें ऋण घेतलें तें त्याच भूमीला आपल्या अस्थींच्या रूपानें पुढच्या पिढीच्या फायद्याकरितां तो परत देऊन टाकतो. भूमि ही अधिष्ठान-सामान्य या नात्यानें मनुष्याला उपयोगी आहेच; पण इतर पंचमहाभूतांकडून मिळणाऱ्या देणग्यांचा उपयोगहि भूमीशिवाय मनुष्यास करितां येत नाहीं. भारतांत म्हटल्याप्रमाणें भूमि ही 'सर्व भूतांची प्रकृति' आहे.

अचला ह्यक्षया भूमिः दोग्ध्री कामानिहोत्तमान्।
दोग्ध्री वासांसि, रत्नानि, पशून् व्रीहियवांस्तथा ॥

भूमि हेंच सर्व संपत्तीचें आद्य व सनातन उत्पत्तिकारण होय. मानवी सुधारणेच्या इतिहासांत जीं अनेक स्थित्यंतरें दिसून येतात त्यांपैकीं पुष्कळांचें जमिनीची मालकी हेंच कारण होतें असें सूक्ष्म पाहणारास दिसून येईल. राजे लोकांची गजांतलक्ष्मी व त्यांचें छत्रचामरांकित ऐश्वर्य आणि अभिजात वर्ग वगैरेंची सत्ता यांचें मूळ कारण जमिनीची मालकी म्हणजे जमिनीचा उपयोग करण्याची स्वतंत्रता हेंच आहे.

एखाद्या राष्ट्राची पुष्कळ सुधारणा झाली तरी भूमि व भूमिगत वस्तूंवरील त्याचें अवलंबन कधींहि कमी होऊं शकत नाहीं; उलट या सुधारणेमुळें जमिनीची किंमत कमी न होतां वाढते. कलाकौशल्य व उद्योगधंदे यांपासून मिळणाऱ्या नफ्याचें प्रमाण जमिनीच्या लागवडीपासून मिळणाऱ्या नफ्याहून अधिक असतें हें खरें; तथापि, उद्योगधंद्याचे बाबतींत नांवाज-

* केसरी, तारीख ४ आक्टोबर १९१०

लेल्या व पुढें आलेल्या राष्ट्रांतहि जमिनीमध्यें गुंतलेलें भांडवल द्रव्योत्पादक उद्योगधंद्यांत गुंतलेल्या भांडवलाहून कितीतरी पट अधिक असतें. आपण इंग्लंडचेंच उदाहरण घेऊं. सर्व इंग्लंडांत मिळून (अर्थात् वसाहत वगैरे सोडून देऊन) आज जें राष्ट्रिय भांडवल म्हणून गुंतून राहिलें आहे तें अदमासें ६½ हजार कोटि रुपये आहे. पण उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें इंग्लंडची भरभराट असतां व शेतकी त्या प्रमाणानें मागसलेली असतांहि या भांडवलाच्या रकमेपैकीं सुमारें पांच हजार कोट म्हणजे पाऊणपट खुद्द शेतकी, शेतकीशीं संबंध असलेले इतर धंदे यांत म्हणजे जमिनींतच गुंतलेलें आहे. शेतकीमध्यें मिळणारा नफा उद्योगधंद्यांत मिळणाऱ्या नफ्याहून फार थोडा असतो. वर सांगितलेल्या पांच हजार कोटि भांडवलावर सालिना उत्पन्न (निवळ नफा नव्हे) सोळा टक्के सुटतें; तर उद्योगधंद्यांत गुंतलेल्या भांडवलावर सालिना वट नफा १२० टक्के सुटतो. नफ्याच्या उत्पन्नाचें प्रमाण इतकें कमीजास्त असतांहि राष्ट्रांतील भांडवल शेतींतच अधिक गुंतून पडलेलें असतें, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. एकाच देशांत शेतकी व उद्योगधंदे एकत्र नांदूं लागले तर अर्थातच शेतकीस या उद्योगधंद्यांचा पुष्कळ उपयोग होतो हें खरें; तथापि, हे दोन्ही एकत्र नांदत असतांहि त्यांचें परस्पर प्रमाण कसें असतें हें पाहणारास जमिनीचें महत्त्व कळून येईल. हिंदुस्थानांत शेतकीचें महत्त्व किती आहे याविषयीं तर वादच नाहीं. हिंदुस्थानांतील एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा सत्तर इतके लोक शेतकीवर अप्रत्यक्ष रीतीनें अवलंबून आहेत. हिंदुस्थान देश दरिद्री असल्यामुळें २५।३० कोट लोक मिळून सरकारी आंकडेच प्रमाण मानले तरी, सालिना ४-४½ शें कोटि रुपयांइतकीच म्हणजे दर माणशीं १५।२० रुपये संपत्ति निर्माण करितात हें खरें; पण या संपत्तीपैकीं बहुतेक संपत्ति शेतीपासूनच उत्पन्न झालेली असते. मुंबई इलाख्यांत शेतीपासूनच होणारें लोकांचें दरसालचें उत्पन्न सरकारी आंकड्यांप्रमाणें, सुमारें ३५ कोट रुपये आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे हिंदुस्थानांतील लोकांचें व सरकाराचें लक्ष शेतकीच्या सुधारणेकडे लागल्याशिवाय देशास ऊर्जितदशा येणें शक्य नाहीं, अशी कोणाचीहि खात्री होईल.

गेल्या दहा-पांच सालांत सरकारचें लक्ष शेतकी-शिक्षणाकडे व शेतकी-सुधारणेकडे लागलें आहे ही अभिनंदनीय गोष्ट होय. वास्तविक शेतकीच्या महत्त्वाच्या मानानें हें लक्ष फारच थोडें आहे असें म्हणावें लागेल. शेतकीपासून सरकारास प्रत्यक्ष पैशाचा फायदा कितीतरी आहे! निवळ शेतसाऱ्याचें हिंदुस्थानसरकारचें उत्पन्न सुमारें तीस कोट रुपये आहे; म्हणजे आगगाड्यांचें उत्पन्न वगळलें असतां बाकी उरणाऱ्या उत्पन्नाचा निम्मा अधिक भाग निवळ शेतकीपासून मिळतो. मुंबई इलाखाच शेतसाऱ्याच्या रूपानें सरकारास दरसाल सुमारें सहा कोट रुपये पुरवितो; आणि त्यांतले निम्मे रुपये जरी हिंदुस्थानसरकारकडे त्यांची वांटणी किंवा हिस्सा म्हणून जातात तरी या उत्पन्नापैकीं निदान तीन कोट रुपये तरी मुंबई सरकारास सालिना स्वतः खर्च करण्यास मिळतात. मुंबईसरकारच्या वांटणीस खर्चण्याकरितां जो एकंदर उत्पन्नाचा भाग दरसाल येतो, त्यापैकीं जवळ जवळ निम्मा माग शेतसाऱ्याच्या उत्पन्नाचा आहे. असें असतां शेतकीखात्यावर—एकंदर मुलकी कारभारावर नव्हे—व शेतकीच्या शिक्षणावर होणारा सरकारी खर्च फारच थोडा आहे असें कबूल करावें लागेल. शेतसारा वसूल करण्यास लागणाऱ्या अधिकाऱ्यांना व इतर नोकरांना जो पगार देण्यांत येतो तो अर्थात् शेतकीच्या सुधारणेकडे किंवा शिक्षणाकडे खर्च होतो असें म्हणतां येणार नाहीं. अशा कामाकडे मुंबई इलाख्यांत सुमारें ८०।८५ लक्ष रुपये सालिना खर्च होतात; व या खर्चांत मुलकी, सर्वे सेटलमेंट, लँड रेकॉर्ड, वगैरे जमीनबाबीच्या खात्यांच्या खर्चांचा समावेश होतो. तगाईच्या रूपानें दरसाल कित्येक लक्ष रुपये खर्चीं पडतात पण तें निव्वळ कर्ज होय. शेतकऱ्यांची स्थिति सुधारावी, लोकांस शेतकीचें शिक्षण मिळावें, या हेतूनें खर्च होणारी रक्कम फारच थोडी आहे. शेतकीचें शिक्षण देणाऱ्या शाळा गेल्या सालापर्यंत या इलाख्यांत मुळींच नव्हत्या; हें शिक्षण देणारें एक कॉलेज मात्र आज कांहीं वर्षांपासून सुरू असून त्याला हल्लीं चांगलें स्वरूप येत आहे. या कॉलेजावर सालिना सुमारें ५० हजार रुपये खर्च होतो. असेंच शेतकीच्या सुधारणेकडे म्हणून—म्हणजे इमारती, शिष्यवृत्ति (स्कॉलरशिपा), नमुन्याचीं शेतें, प्रयोग, यंत्रें वगैरेवर अलीकडे सालिना चारपांच लक्ष रुपये खर्च होतात. अशा रीतीनें, शेतकीसंबंधानें—लोकोपयोगार्थ म्हणून—

सुमारें सहा लक्ष रुपये खर्च होतो. पण वर सांगितल्याप्रमाणें शेतसाऱ्याचें सहा कोट रुपयांचें उत्पन्न लक्षांत घेतलें म्हणजे हा खर्च शेंकडा एक रुपाया याप्रमाणानें पडतो; फारसा अधिक पडत नाहीं हें लक्षांत येईल. आतां 'प्रत्येक बाबीचें उत्पन्न त्याच बाबीवर सरकारानें खर्चावें, प्रत्येक खात्याच्या दोन्ही तोंडांची अशा रीतीनें मिळवणी व्हावी' असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं, व तसें कोणी म्हणतहि नाहीं. कारण ज्या खात्यांपासून उत्पन्न मुळींच नसतें व असलें तरी फार थोडें असतें, अशीं शिक्षण, पोलीस वगैरेसारखीं खातीं सरकारास सुराज्य व्यवस्थेप्रीत्यर्थ राखावीं लागतात व त्यांवर पदरमोड करून त्यांस खर्चहि करावा लागतो. तथापि, शेतकीच्या वर दर्शविलेल्या महत्त्वाच्या मानानें शेतकीखात्याच्या लोकोपयोगी बाबींवर हल्लीं होणारा खर्च फारच थोडा आहे हें कोणासहि नाकबूल करितां येणार नाहीं.

हल्लीं होणारा हा खर्च मात्र कायम टिकणाराच आहे, व आज सरकाराचें या विषयाकडे ज्या रीतीनें लक्ष लागल्यासारखें दिसत आहे, त्या रीतीनें पाहतां तो पुढें कधींहि कमी होणारा नाहीं, उलटा वाढणाराच आहे. सरकारचें हें लक्ष अलीकडे दोन तीन मुख्य गोष्टींवरून दिसून येतें. १ शेतकीचें पद्धतशीर शिक्षण देण्यास सुरवात झाली आहे; २ पुसा शेतकीसंस्थेसारख्या निव्वळ शास्त्रीय संस्था शोधाकरितां स्थापण्यांत आल्या आहेत; आणि ३ शेतकीचीं आउतें, उपकरणें, बीं, खतें, पिकें वगैरे गोष्टींसंबंधानें सरकारी व खासगी रीतीनें प्रयोग व प्रदर्शनें करण्यांत येऊं लागलीं आहेत. या सर्व गोष्टी दिवसेंदिवस वाढतच जाणार,–कमी होण्याचा संभव नाहीं. या कामीं सरकारास लोकांची व लोकांस सरकारची मदत घेण्याची अपेक्षा व इच्छा दिवसेंदिवस वृद्धिंगतच होत चालली आहे. थोड्या दिवसांपूर्वीपर्यंत शेतकीसंबंधाच्या सभा म्हणजे अपूर्वच होत्या. राष्ट्रीयसभेच्या कार्यक्रमांत शेतकीचा केवळ अर्थशास्त्र व राजकारण यांच्या मिश्रस्वरूपांत विचार होई–अलीकडे राष्ट्रीयसभेच्या अनुषंगानें प्रदर्शनें भरण्याची चाल पडली होती पण त्यांत शेतकीच्या वस्तु ठेवल्या तरी केवळ खोगीरभरतीकरितां ठेवण्यांत येत. सरकारी व बिनसरकारी अशा मिश्र सभा क्वचितच होत, पण त्यांत शेतकीसंबंधाच्या सभा तर फारच क्वचित् असत. पण

अलकिडे पाहावें तर शेतकीपरिषदा व सभा वारंवार भरूं लागल्या असून त्यांत फार उपयुक्त अशा विषयांची चर्चा होऊं लागली आहे; व सर्वांत मौज ही कीं, ज्यांच्यापर्यंत पोंचण्यास अनेक अभेद्य कोश अगर कवचें भेदावीं लागत असल्यामुळें ज्या थोर थोर अधिकाऱ्यांचें तोंडहि शेतकरी लोकांस दिसणें पूर्वी प्रायः मुष्किलीचें होतें ते अधिकारी आतां शेतकी-सभांचे अध्यक्ष होतात, स्वतः भाषणें करतात, रयतवर्गापैकीं अर्धवट ज्ञानाच्या लोकांनीं केलेलीं भाषणें ऐकून घेतात व सभांपुढें आलेल्या सूचनांचा शांतपणें विचार करितात. अशा सभांचें महत्त्व व जरूरी सरकारास कोणत्याहि कारणानें कां पेटलेली असेना; पण ती पटलेली आहे याबद्दल वाद नाहीं.

हिंदुस्थानांतील शेतकीच्या सुधारणेसंबंधानें सरकार व लोक उभयतांनीं मिळून विचार करण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. पहिली गोष्ट ही कीं, देशांत शेतकीस उपयोगी असें क्षेत्र आजमितीस किती आहे? पड म्हणून फुकट सरकारजमा होऊन पडलेली कांहीं जमीन शेतकीच्या उपयोगी आणतां येण्यासारखी आहे कीं नाहीं? फॉरेस्ट या नांवाखालीं जी जमीन आज दाखल झालेली आहे, तिचा उपयोग रान ठेवण्यापासून अधिक आहे किंवा तिच्यापैकीं कांहीं शेतीच्या कामाकडे दिल्यास तिचा उपयोग अधिक होईल? वरील प्रश्नांचा निर्णय झाला तरी, अशा रीतीनें शेतकीचें आणखी एकंदर क्षेत्र फार तर किती वाढवितां येईल? आज शेतकीवर उपजीविका अवलंबून असणाऱ्या लोकांच्या मानानें हें क्षेत्र पुरें आहे काय? आज हें पुरें आहे असें घेऊन चाललें तरी लोकसंख्येची जी वाढ दिवसेंदिवस होत जाणार तिच्या मानानें हें क्षेत्र पुरें पडेल काय? एकंदर क्षेत्र आणखी फार तर किती वाढवितां येईल? क्षेत्र पुरें न पडेल तर शेतकीच्या उत्पन्नाचें प्रमाण हल्लींहून वाढवितां येईल कीं नाहीं? व वाढवितां येईल तर तें कोणत्या उपायांनीं? शेतकीच्या क्षेत्राच्या वाढीला मर्यादा असणारच; पण उत्पन्नाला ही मर्यादा नाहीं. एक बिघा जमिनींत कोणत्याहि उपायांनीं जास्तींत जास्त किती धान्य उत्पन्न करितां येईल, याला एखादी अंतिम सीमा म्हणून जरी असली, तरी ती कोणत्याहि देशांत अद्यापि येऊन पोंचली आहे असें दिसत नाहीं; कारण ज्या देशांत शेतकीला भौतिकशास्त्राची जोड

मिळाली आहे त्या देशांत दर बिघ्यामागें होणारें शेतकीचें उत्पन्न अद्यापि वाढतच आहे, व तें आणखी किती वाढेल हें कोणीं सांगावें ? हिंदुस्थानांत तर ही अंतिम मर्यादा अद्यापि फारच दूर आहे, यांत शंका नाहीं. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत—मुंबई इलाख्यांत—गहूं हा कोरडवाहू जमिनींत सरासरीनें ८ बुशेल पिकतो. पण इंग्लंडमध्यें हें उत्पन्न दर एकरीं ३२ बुशेलपर्यंत येतें. अमेरिका व बेलजियम या देशांत हें उत्पन्न याहूनहि अधिक येतें. अर्थात् आहे या क्षेत्रांतच जरी उत्पन्नाची शक्य ती वाढ झाली तरी शेतीचें एकंदर उत्पन्न आजच्याहून दुप्पट तिप्पट वाढण्याचा संभव आहे. हें उत्पन्न वाढण्यास पाण्याचा व खताचा पुरवठा पाहिजे तो कसा मिळणार ? उत्तम जातिवंत बांबियाण्यांची पैदास कशी होईल ? पाटबंधारे आणखी होण्यासारखे आहेत किंवा नाहींत ? व्यर्थ दवडूं न दिल्यामुळें किती खत देशांतल्या आजच्या स्थितींतहि वांचवितां येईल, व शिवाय रसायनशास्त्राच्या मदतीनें नवीं कृत्रिम खतें बनवितां येतील किंवा नाहींत ? शेतीच्या आउतांत व इतर उपकरणांमध्यें काय सुधारणा करितां येईल ? शेतीची पद्धत जुनी चांगली कोणती व नव्या पद्धतीची मदत तिला कशी होईल ? शेताच्या पिकांस रोगराई कशी होते व तिच्या निवारणाचे मार्ग कोणते ? गुरें व ढोरें यांची हलाखी कशी नाहींशी करितां येईल ? उत्पन्नाच्या दृष्टीनें किंवा जमिनीस विश्रांति देण्याच्या दृष्टीनें फायदेशीर अशीं कोणतीं नवीं पिकें लावतां येतील ? पीक पिकलें तरी त्याची कांडणी-मळणी करण्याचे फायदेशीर मार्ग कोणते ? चांगली किंमत येईपर्यंत धान्य ठेवावें लागलें तर तें कसें ठेवावें ? शेतकीला लागणारें भांडवल वेळेवर व थोड्या व्याजानें मिळण्यास काय उपाय योजावे ? शेतकरी लोकांना परस्पर साहाय्य करण्यास व परस्पर साहाय्यानें शेतकीच्या प्रत्येक कामांत स्वतःचा फायदा करून घेण्यास कसें शिकवावें ? तात्पर्य, अशा प्रकारचे शेंकडों प्रश्न सरकार व लोक या उभयतांनीं मिळून सोडविण्याचे आहेत. विदेशी सरकार व प्रजा यांच्या दरम्यान निवळ राजकारणाच्या बाबींत जो बिनतोड खडा विरोध कित्येक वेळां उत्पन्न होतो तसला विरोध सुदैवानें शेतकीसारख्या विषयांत उत्पन्न होत नाहीं. हिंदुस्थानांतले लोक आपणांतलाच एखादा मनुष्य इंग्रजांच्या बरोबरीनें गव्हर्नर नेमा असें म्हणू लागताल तर हिंदुस्थानांतल्या

व इंग्लंडांतल्या इंग्रजांना ती मागणी भीतिप्रद वाटण्याचा संभव आहे. पण हिंदुस्थानच्या एक एकर जमिनींतल्या गव्हाचें कमाल उत्पन्न इंग्लंडांतील खुद्द जॉर्ज बादशहाच्या शेरी जमिनीच्या एका एकरांतील कमाल उत्पन्नाइतकें झालेंच पाहिजे व या दोन उत्पन्नांत आज असणारें अंतर नाहींसें झालें पाहिजे, अशी महत्त्वाकांक्षा हिंदुस्थानच्या यःकश्चित् शेतकऱ्यानेंहि धरली तर तिची भीति इंग्रज राज्यकर्त्यांस वाटण्याचें कारण नाहीं. उलट पक्षीं, हें अंतर तोडण्याचा गुण एखाद्या कृत्रिम व रासायनिक खतांत असेल तर तें खत विलायतेहून विकत आणून आपल्या जमिनींत घालण्यास स्वदेशीचा पराकाष्ठेचा अभिमानी असलेला मनुष्यहि माघार घेणार नाहीं. राज्यकर्ते व प्रजाजन यांच्यांत स्वराज्याबद्दलचें वाग्युद्ध जोरांत सुरू असतांहि ज्या कित्येक गोष्टींसंबंधानें बिलकूल मतभेद न राहतां एक विचार व एक जूट होण्यासारखी आहे, त्यांपैकीं शेतीची सुधारणा ही एक होय, हें उघड आहे. तथापि शेतकीचें शिक्षण व सुधारणा यांच्यासंबंधानें सरकार व लोक यांनीं स्वतंत्र रीतीनें केलें पाहिजे, असेंहि बरेंच आहे; व या दृष्टीनें या प्रश्नाचा पुढील खेपेस विचार करूं.

पुण्याचें शेतकी कॉलेज*

पुणें येथें स्थापन झालेल्या शेतकी कॉलेजाची नवीन भव्य इमारत उघड-ण्याचा समारंभ गेल्या मंगळवारीं ना० सर जॉर्ज क्लार्क यांच्या हस्तें करण्यांत आला. सदर प्रसंगीं कॉलेजचे अध्यक्ष डॉ० हॅरोल्ड मॅन व ना० गव्हर्नरसाहेब यांनीं केलेल्या भाषणांवरून शेतकीसारखा विषय शिकविण्यास स्वतंत्र कॉलेज कां हवें हें चांगलें कळून येण्यासारखें आहे. सदरहू कॉलेजाची स्थापना होण्याचे पूर्वी शेतकीचें असें स्वतंत्र सरकारी खातें नव्हतें असें नाहीं; परंतु सरकारच्या दृष्टीनें व सरकारच्या तर्फेनें शेतकी-संबंधाची माहिती संग्रहित करणें, जमिनीची नोंद ठेवणें, प्रतबंदी व सेटलमेंट करणें हाच त्या खात्याकडील कामाचा मुख्य भाग होता. लॉर्ड मेयो यांच्या कारकीर्दीत शेतकीखातें जेव्हां प्रथम निघालें तेव्हां खुद्द मेयोसाहेबांची या खात्याची कल्पना इतकी संकुचित नव्हती, हें त्या वेळच्या कागदपत्रांवरून उघड दिसून येतें. तथापि कोणतेहि खातें परिणत स्वरूपास नेण्याला सहज बराच कालावधि लागतो. हें खातें जन्मून आज चाळीस वर्षें झाल्यानंतर, लोकोपयोगी व सरकारोपयोगी अशीं जीं या खात्याचीं मुख्य दोन अंगें तीं पृथक् होऊन सर्व्हे सेटलमेंट शाखा वेगळी; जमीननोंदणी, पीकपाण्याची पहाणी वगैरे शाखा वेगळी; व निवळ शेतकी शिक्षणाची शाखा वेगळी असे भाग झाले आहेत. शिक्षणशाखेचा जन्म इतक्या उशीरां व्हावा हें हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थितीचें एक दर्शक आहे. १८७७ सालचा दुष्काळ पडला नसता तर शिक्षणखात्याकडे सरकारचें लक्ष इतकें लवकर गेलें असतें किंवा नाहीं याची शंकाच आहे. एवढा मोठा दुष्काळ पडून गेल्या-वरहि या शाखेची वाढ व्हावी तितक्या जलद व सुसंगत रीतीनें झाली नाहीं. डॉ० मॅन यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत सांगितल्याप्रमाणें १८७७ च्या दुष्काळानंतर सरकारनें केलेला शेतकी शिक्षणाचा उपक्रम लवकरच थांबला. १८९१च्या सुमारास शिक्षणाच्या कल्पनेस फिरून अंकुर फुटले; पण सरकारी मदतीचें खतपाणी मुळांत पुरेसें न पडल्यामुळें

* केसरी, तारीख २५ जुलै १९११

ते अंकुरहि लवकरच जळून गेले. परंतु १८९६ ते १९०१ या पांच-सहा सालांत फिरून एकसारखे दुष्काळावर दुष्काळ पडून, शेतकीच्या सुधारणेचें महत्त्व सरकार अगर रयत पुनः कधींहि विसरणार नाहीं अशा कडक व दुःखद रीतीनें त्यांचा ठसा त्यांच्या मनावर पडला; आणि गेल्या मंगळवारीं ज्या इमारतीचा प्रवेशसमारंभ झाला त्याजकडे पाहिलें म्हणजे हल्लीं सरकारानें हातीं घेतलेली शेतकीच्या सुधारणेची चळवळ बरीच टिकाऊ आहे, ती पुष्कळ दिवस तग धरील, यांत शंका वाटत नाहीं.

सरकारी शेतकीखात्यावर मुख्य अधिकारी नेमावयाचा तो होतां होईल तों शेतकीचें शिक्षण मिळालेला असावा असा एक साधारण नियम ठरून गेल्यामुळें, गेल्या दहा-पंधरा वर्षांत या खात्यावर जे मुख्य अधिकारी आले त्यांना स्वतःला शेतकी शिक्षणाचें महत्त्व कळत होतें; अशा शिक्षणाची व्यवस्था ज्यांत नाहीं त्या शेतकीखात्याचा फोलपणा त्यांच्या लक्षांत आला; व त्यांच्याच उत्साहपूर्ण अशा शिफारसीमुळें शेतकी कॉलेजाची स्थापना झाली. अशा अधिकाऱ्यांपैकीं माजी कौन्सिलर सर जॉन मूर मॅकेन्झी हे एक होत; व हल्लींचें कॉलेज या स्थितीला आणण्याचें बरेंच श्रेय त्यांजकडे आहे. केवळ त्यांच्याच मेहनतीमुळें शेतकी शिक्षणास महत्त्व येऊन युनिव्हर्सिटीकडून त्याचा गौरव झाला; रेव्हेन्यू वगैरे खात्यांत त्यास विशेष मान मिळाला; ठिकठिकाणीं प्रयोगाकरितां सरकारी शेतवाड्या स्थापण्यांत आल्या; आणि डॉ० मॅनसारख्या तज्ज्ञ मनुष्याची कॉलेजच्या मुख्य अध्यापकाचे जागीं योजना होऊन, कॉलेजच्या केवळ इमारतीकरितां आठ-दहा लाख रुपये मंजूर करण्यांत आले. परवां उघडलेली शेतकी कॉलेजाची भव्य इमारत पाहिली म्हणजे सरकारच्या औदार्याचा या ठिकाणीं कांहींसा अतिरेक झाला असेंहि कित्येकांस वाटण्याचा संभव आहे. पंधरा वर्षांपूर्वी शेतकीशिक्षणाचें म्हणण्यासारखें नांवगांवहि नव्हतें; व आज पहावें तों कॉलेजांत अवघे शेंसव्वाशें विद्यार्थीहि नसतां त्यांच्याकरितां आठ-दहा लक्षांचा राजवाडा ! हें लक्षांत आलें म्हणजे सरकारी व्यवस्थेंत झालें तरी काय—जाईल तेथें हत्ती जाईल, नाहीं तेथें मुंगीहि जाणार नाहीं—हीच म्हण प्रत्ययास येते. परंतु सकृद्दर्शनीं दिसणारी ही अव्यवस्था आम्हांस एका अर्थानें इष्टापत्तीच आहे. कारण या मोठ्या इमारती म्हणजे शेतकी

शिक्षणाचे कामीं सरकारचें पाऊल मागें पडणार नाहीं याविषयींचा जनतेस तो एक जामीनच पटला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

नामदार गव्हर्नरसाहेब यांनींहि आपल्या भाषणांत असलेंच गोड भविष्य वर्तविलें आहे. शिवाय ते म्हणाले कीं, "मी जर हिंदुस्थानांतल्या राजकीय चळवळ करणाऱ्यांपैकीं एक असतों तर वेळीं अवेळीं सरकारच्या बोडक्याशीं तगादा करून शेतकीशिक्षणावर व शेतकीसुधारणेवर सरकारनें अधिकाधिक पैसा खर्च केला पाहिजे असें त्यांच्यामागें एकसारखें टुमणें लाविलें असतें." सर जॉर्ज क्लार्क यांच्यासारख्या हुषार, करारी, आग्रही, अप्रिय गोष्टीहि करण्याचें भरपूर धैर्य अंगीं असणाऱ्या व्यक्ति हिंदुस्थानांतील राजकीय चळवळ करणाऱ्या लोकांत दुर्दैवानें थोड्या आहेत. सर जॉर्ज क्लार्क हे गणेशखिंडींत अथवा कौन्सिल हॉलांत मुख्य स्थानीं बसून राजकीय चळवळ्या लोकांची विल्हेवाट लावणाऱ्या अधिकारावर जे आज आहेत, तेच त्यांच्याऐवजीं, एखाद्या यक्षिणीच्या प्रसादानें, स्वतः हिंदी बनून त्या मुख्यासनाच्या पायरीशीं हातांत विनंतिअर्ज घेऊन, तोंडावर आशा आणि निराशा यांची मिश्र छटा पोक्तपणानें संभाळून, राजनिष्ठापूर्ण अशा तीव्र रागानें आपलीं दुःखें गव्हर्नरसाहेबांपुढें मांडण्यास आमचे पुढारी म्हणून आम्हांस लाभले तर खरोखरच कितीतरी मौज होईल! राजाचा रंक आणि रंकाचा राव बनविणाऱ्या या यक्षिणीचे आम्ही कृतज्ञतेनें कितीतरी गोडवे गाऊं! पण अशा स्थितींत 'हिंदी सर जॉर्ज क्लार्क' यांच्या ओरडीची व हाकाटीची वासलात त्यांच्या गव्हर्नरानें कशी काय लाविली असती याचें खात्रीपूर्वक वर्णन मात्र 'इंग्रज सर जॉर्ज क्लार्क' यांच्या भाषणांत आढळत नाहीं. पण कदाचित्, हिंदी मागणारानें मागावें काय एवढेंच सांगण्याचा ना० गव्हर्नरसाहेबांचा हेतु असावा; देणाऱ्यानें काय द्यावें हें स्पष्ट करून सांगण्याचा त्यांचा इरादा नव्हता, असेंच मानलें पाहिजे. एखादा वर मागण्याला सुद्धां शहाणपण लागतें हें आम्हांस माहीत आहे. 'वरहि वरायास पाहिजे समज' असें पंतांनीं म्हटलेंच आहे. पण कोणच्याहि कालांत व कोणच्याहि लोकांत वर मागणाऱ्या भिक्षुकाच्या शहाणपणापेक्षां वर देणाऱ्या देवतेच्या औदार्याचेंच कौतुक अधिक करितात, असें नाहीं काय? हिंदी राजकीय चळवळ्यांनीं

ना० गव्हर्नरसाहेबांचा उपदेश इतर बाबतींत आजवर काय थोडा पाळला आहे ? भिक्षा मागण्याची, रडकथा गाण्याची व वेळीं अवेळीं खरखर-मुंडेपणा करण्याची त्यांनीं बाकी ठेविली आहे असें नाहीं; पण त्या मानानें त्यांना काय मिळालें ? बरें, शेतकीच्या सुधारणेकरितां तरी लोकांनीं मनसोक्त मागावें व सरकारनें आकंठ द्यावें, असा विलक्षण योग जमून येण्यासारखा आहे असें ना० गव्हर्नरसाहेबांच्या भाषणावरून कदाचित् वाटेल; परंतु याहि बाबतींत झालें तरी आजवर केवळ याचकाचाच कृपण-पणा बाधला आहे असें म्हणतां येणार नाहीं. कर्झनशाहीच्या अखेर सन १९०४ सालीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत शेतकी सुधारण्याचा प्रश्न निघाला होता, त्यावेळीं बिनसरकारी युरोपियन सभासद ना० मि० हॅमिल्टन यांनीं शेतकीसुधारणेवर होणारा खर्च फार थोडा आहे तो आणखी निदान तीस लक्षांनीं तरी वाढला पाहिजे, अशी तोंडभर मागणी केली होती. परंतु ती देण्यांत आल्याचें आम्हांस माहीत नाहीं. मग लोकांनीं मागावयाचें तितकें मागावेंच, परंतु सरकारानें द्यावयाचें तितकेंच द्यावें, असा केवळ अर्थवादा-त्मकच उपदेश ना० गव्हर्नरसाहेबांस करावयाचा होता कीं काय नकळे ! लोकांची मागणी व सरकारची देणगी यांचा हुकमी मेळ सहसा पडलेला आपण पहात नाहीं. कारण लोकांनीं मागितलें तेंच, तितकें व त्यावेळीं दिलें तर सरकारच्या इभ्रतीस कमीपणा येतो, अशीच सरकारची भ्रामक समजूत झाल्याचें दिसतें. अर्थात् वेळींच हुकुमी मागितलेलें अवेळीं स्वेच्छेनें दिलें गेल्यास त्याचें चीज व्हावें तितकें होऊं नये हें स्वाभाविकच आहे.

ना० गव्हर्नरसाहेबांनीं दुसऱ्याहि एका वादग्रस्त विषयाचा उल्लेख केला होता. हिंदुस्थानांत आज धान्याच्या बाबतींत 'मनसोप्यभूमिः' अशी स्थिति झाली आहे असें म्हणतां येत नाहीं. तरी पण धान्याचा हा तुट-वडा हल्लीं बहुधा सर्व सुधारलेल्या देशास भासतोच. अर्थात् धान्याचा तुटवडा हें प्रजेच्या दारिद्र्याचें द्योतक नव्हे. हिंदुस्थानांत पूर्वी धान्याची सुबत्ता होती, खाण्यापिण्याच्या बाबतींत हिंदुस्थानांत पूर्वी एक वेळ सुवर्णयुग अवतरलें होतें, अशा हिंदी लोक गप्पा मारतात; पण पूर्वी हिंदुस्थानांत धान्य पुष्कळ होतें म्हणजे काय तर लोकसंख्या थोडी होती. हल्लीं एक-तीस कोट लोकांना धान्य पुरतें; आणि एखादे वेळीं दुष्काळसा वाटला

तरी अगदींच धान्य मिळत नाहीं असें न होतां धारण मात्र वाढते, इतकेंच काय तें, तथापि आहे याहून धान्य अधिक पिकवितां यावें हें सर्वांसच इष्ट आहे अशा अर्थाचें ना० गव्हर्नरसाहेबांचें भाषण होतें. हिंदुस्थानांत शेतीचें उत्पन्न फार मोठें आहे. विशेषतः हिंदुस्थानांतून परदेशास बराच शेतीचा माल जातो व यामुळें देशांतील शेतकऱ्यांस पुष्कळच फायदा होतो. याही गोष्टीवर ना० गव्हर्नरसाहेबांनीं बराच जोर दिलेला होता. या दोन्ही गोष्टी नामदारसाहेबांनीं ज्या अर्थानें घुदें मांडल्या त्या अर्थानें त्या बऱ्याच वादग्रस्त आहेत. हिंदुस्थानांत मुख्यतः शेतकीचा धंदा चालतो, यामुळें ज्या देशांत कारागिरीवर मुख्य लक्ष असतें त्यांच्या मानानें शेतीचें उत्पन्न एकंदरीनें बरेंच झालेलें दिसतें खरें; परंतु देशांतील एकंदर लोकसंख्येस खरोखरच भरपूर पुरून उरेल तेवढेंच पीक परदेशास विक्रीस पाठविण्यांत येतें, किंवा शेतकऱ्यांचा नाइलाज म्हणून पोट बांधूनहि त्यांना आपलें धान्य बाजारांत न्यावें लागतें, या गोष्टीचा नीट विचार झाला पाहिजे. शिवाय देशांतून परदेशास जो शेतीचा माल रवाना होतो त्याची येणारी किंमतहि सर्वच नफ्यादाखल धरावयाची कीं काय ? देशांतून ८० कोटी रुपये किंमतीचा माल परदेशास गेला तर हे सर्व ८० कोटी केवळ नफ्यादाखलच समजावयाचे कीं काय ? हा माल तयार करण्यास कांहीं खर्च लागतो कीं नाहीं ? लागत असेल तर तो किती ? व तो खर्च वजा घालला असतां शेतकऱ्यांस निवळ नफ्यादाखल उरणारी रक्कम किती ? कारण ना० गव्हर्नरसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें शेतीच्या नफ्यावर तग धरून दुष्काळांतून शेतकऱ्यांस निभावून जातां येतें हें जर खरें असेल तर तो नफा किती याचा अंदाज कळलाच पाहिजे. नामदारसाहेबांनीं केलेल्या या मुग्ध विधानांच्या योगानें एका युरोपियन गृहस्थासहि शंका उत्पन्न होऊन त्यानें गेल्या शनवारच्या 'टाइम्स'च्या अंकांत एक पत्र प्रसिद्ध केलें आहे. तो म्हणतो, '८० कोट रुपये घेऊन हिंदुस्थानानें आपला सर्व निर्गत माल परक्यांच्या पदरीं घातला खरा; पण या ८० कोटींतून त्याच्या खर्चाचे पैसे किती निघाले व निवळ नफा राहिला किती ? कारण हा सर्वच नफा म्हणावयाचा तर पीक पिकवावयाला त्याला मुळींच खर्च पडला नाहीं, असें समजावयाचें कीं काय ?' शिवाय, हिंदुस्थानांत शेती मोठ्या प्रमाणावर आहे व शेतींत

नफाहि बराच होतो, असें घेऊन चाललें तरी वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणानें शेतीचा विस्तार किंवा नफ्याचें प्रमाण वर्षानुवर्ष टिकेल काय ? हाहि एक प्रश्नच आहे. शेतीला कारागिरीची जोड असल्याशिवाय कोणत्याहि राष्ट्राचा निभाव लागत नाहीं. अर्थात् हिंदुस्थानांत कारागिरी वाढविल्याशिवाय निवळ शेतीवर भिस्त टाकून राहणें धोक्याचें आहे, असाहि इशारा ना० गव्हर्नरसाहेबांनीं द्यावयास पाहिजे होता.

आतां विषयमाहात्म्यामुळें व स्थलमाहात्म्यामुळें कारागिरीसंबंधानें त्यांनीं उल्लेख केला नाहीं हें कदाचित् ठीक म्हणतां येईल; परंतु शेतकीच्या उत्पन्नासंबंधाचा, जुन्या काळच्या अन्नाच्या पुरवठ्याचा, सुवर्णयुग वगैरेचा विषयच नामदारसाहेबांनीं या भाषणांत काढला नसता तर फार चांगलें झालें असतें. गव्हर्नरसाहेबांसारख्यांच्या भाषणास प्रेसॲक्ट लागूं नाहीं; तेव्हां त्यांच्या भाषणाच्या योग्यायोग्यतेचा प्रश्नच नसतो. पण आम्हांस त्या वादांत पडतां येत नाहीं; व पडतां येत असलें तरी आजच्या लेखांत आम्हांस पडावयाचें नाहीं. कारण शेतकी शिक्षणावर खर्च करण्याचा व शेतकीसुधारणेचा जो उपक्रम सरकारनें केला आहे तो आम्हांस मनापासून चांगला वाटतो, व तो चांगला आहे असें स्पष्टपणें म्हणून आम्हांस सरकारचें या बाबतींत प्रामाणिकपणानें अभिनंदनच करावयाचें आहे. अर्थात् खिरींत मिठाचा खडा कां ? नामदारसाहेबांनीं केलेल्या पूर्वपक्षास उत्तर देण्यासारखें आहे व तें देण्याची वेळहि केव्हांतरी येईलच. आज आम्हांस म्हणावयाचें तें इतकेंच कीं, शेतकी शिक्षणाचें महत्त्व, शेतकीची सुधारणा व त्याजविषयीं चाललेला हल्लींचा उद्योग हा आजमितीस अपुरा असला तरी आहे तेवढा लोकांस सर्वस्वीं मान्य आहे. लोक व सरकार यांनीं परस्पर अभिनंदन करण्याचीच ती एक बाब आहे. प्राथमिक व उच्च प्रकारच्या शिक्षणांत लोकांची धांव पुढें असतां सरकारचा पाय मागें आहे; पण शेतकीच्या शिक्षणांत तरी त्याच्या अगदीं उलट स्थिति आहे, ही गोष्ट आम्ही आनंदानें कबूल करितों. शिक्षणाचा फायदा घेणाऱ्या विद्यार्थ्यांची थोडी संख्या आणि त्यांच्या शिक्षणावर होणारा पुष्कळ खर्च यांचें हें व्यस्त प्रमाण शेतकीशिवाय इतर विषयांत कोठेंहि दिसून येत नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे. शेतकी कॉलेजावर होणारा खर्च आणि

डॉ० गेस्ट-प्रभृति प्रोफेसरांचा उत्साह यांना साजेल अशी शेती-शिक्षणाची आमच्या मुलांत अद्यापि हौस आलेली नाहीं, व हें शिक्षण मिळवून खाजगी शेतीच्या सुधारणेकडे त्याचा उपयोग करण्याची बुद्धि त्यांच्यामध्यें व्हावी तितकी उत्पन्न झालेली नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे; पण ही स्थिति थोड्याच काळांत बदलून जाईल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

शिक्षण व राजकारण*

शिक्षण व राजकारण यांची पुरी फारकत व ताटातूट करण्याच्या हेतूनें दिल्लीसरकारनें कलकत्ता युनिव्हर्सिटीवर हल्ली जी स्वारी केली आहे तिला कलकत्तेकरांकडून जोराचा प्रतिकारहि सुरू आहे. गेल्याच्या मागील सोमवारीं कलकत्ता येथील टॉऊनहॉलांत युनिव्हर्सिटी-प्रकरणासंबंधानें लोक मत व्यक्त करण्याकरितां जाहीर सभा भरली होती. तिला हजारों लोक-आले असून सर्व प्रांतांतले निवडक प्रतिनिधीहि हजर होते. बंगालच्या पुढाऱ्यांमध्यें अलीकडे कित्येक वर्षें राजकारणाच्या बाबतींत जें लोकोत्तर ऐक्य दिसून आलें आहे तेंच सुदैवानें अजूनहि कायम असून, अशा भरीव लोकमताच्या दगडावर आपलें डोकें आपटून घेण्यास दिल्ली सरकारची राजनीति तयार होते कीं काय हें पाहणें आहे. पूर्वी बंगालच्या फाळणीच्या वेळीं बंगाल्यांत जशा प्रकारचा असंतोष माजला होता तसला असंतोष कलकत्ता-युनिव्हर्सिटीच्या प्रस्तुतच्या अपमानामुळें माजण्याचा संभव उघड दिसतो. "पूर्वीचे ते भोंगळपणाचे दिवस म्हणावें आतां विसरा, सरकारची बादशाहीचीं शस्त्रास्त्रें आतां पूर्वीपेक्षां अधिक साफसूफ व सज्ज असून कोणच्याहि चळवळीला त्यांना तेव्हांच लगाम घालतां येईल" अशी गर्वोक्ति जरी 'इंग्लिशमन्'सारख्या वर्तमानपत्रांनीं काढली आहे, तरी अशी सर्व राष्ट्रीय-चळवळ कोणासहि सुखकर होत नाहीं हें 'इंग्लिशमन्'ला झालें तरी माहीत नसेल असें नाहीं. कोणचीहि चळवळ लोक उगीच सुखासुखी करीत नाहींत; चळवळीमुळें त्यांना त्रासच सोसावा लागतो; व स्वार्थत्यागाच्या दिव्यांतून

* केसरी, तारीख ५ ऑगस्ट १९११

त्यांना पार पडावें लागतें; अर्थात् चळवळ करणें ती केवळ निरुपायानें करावी लागते याचेंच हें प्रस्तुतचें एक उदाहरण आहे. बंगाल्यांत आज सर्वप्रकारें शांतता नांदत होती. लॉर्ड हॉर्डिंजसारखे व्हाइसरॉय व लॉर्ड कारमायकेलसारखे गव्हर्नर लाभल्यानें पूर्वीचीं बरीचशीं शल्यें बंगाली राष्ट्राच्या हृदयांतून निघालीं होतीं. पूर्वीच्या चळवळीच्या युद्धांत उभयपक्षीं झालेल्या बहुतेक जखमा भरून आल्या होत्या. अशा स्थितींत असलें हें नवें प्रकरण नसतें उपस्थित करण्यापासून सरकारास तरी कोणचा मोठा लाभ होणार होता ? कित्येक विद्वान् आज दीड दोन वर्षें युनिव्हर्सिटींत आपलें काम बिनबोभाट करीत असणाऱ्या व्याख्यात्यांना, ते अलीकडे राजकारणांत पडल्याचा नसता आरोप उकरून काढून, बंगालसरकारच्या मनाविरुद्ध व कलकत्ता-युनिव्हर्सिटीसारख्या संस्थेचा उपमर्द करून कामावरून दूर करण्याचा आग्रह धरण्यानें दिल्लीसरकारला कोणतें सार्वजनिक हित साधावयाचें होतें हें त्यांचें त्यांनाच माहीत ! आधीं हे तिघेहि व्याख्याते राजकारणांत पडले होते हें खरें नाहीं; पडले असले तरी तें राजकारण म्हणजे कांहीं गुन्हेगारी उत्पन्न करण्यासारखें असल्याचें दिसत नाहीं; व यदाकदाचित् तें तसें असलें असें गृहीत धेऊन चाललें तरी, झाल्या गेल्या गोष्टी विसरून जाणें हें शहाणपणाचें ? कीं त्या गोष्टी कोणाला ठाऊक नसतां मुद्दाम उकरून काढून वेशीवर बांधणें हें अधिक शहाणपणाचें ? हे व्याख्याते आज पूर्वीसारखीं आपलीं व्याख्यानें देत राहते तर असा काय मोठासा घातपात होणार होता, कीं तो वांचविण्याकरितां सरकारनें हा एवढा उपद्व्याप करावा ? आणि सार्वजनिक असंतोष माजवावा ? कदाचित् हा प्रश्न जेव्हांचा तेव्हां निघता तर त्याचें कोणास कांहीं फारसें वाटलें नसतें. पण तो तसाच मनांत ठेवून भलत्या वेळीं तो बाहेर काढण्याच्या सरकारच्या या प्रयत्नानें त्यांच्या मनाच्या क्षमाशीलतेविषयीं लोक साशंक झाल्यास नवल काय ?

बरें, कारण नसतां उकरून काढलेली ही बाबहि कांहीं लहानसान आहे असें नाहीं. हल्लींच्या राज्यपद्धतींत लोकांना राजकीय कामकाजांत जें काय थोडेंसें स्वातंत्र्य उरलें आहे त्याच्या काळजालाच हा हात घातल्यासारखा होतो. शिक्षणाचें काम करणाऱ्या कोणाहि मनुष्यानें राजकारणांत पडूं नये हें तत्त्व दिसतांना साळसूदपणाचें व गोजिरवाणें

दिसतें खरें; पण त्याच्या पोटांतले पाय मोठे घातक आहेत. शिक्षण आणि राजकारण हे शब्दच इतके व्यापक आहेत कीं, त्यांनीं कोणत्याहि राष्ट्राचें एकंदर जीवित व्यापून टाकलेलें असतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. अर्थात् अशा दोन गोष्टींची पुरी आणि कायमची ताटातूट करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे त्या राष्ट्ररूपी शरीरांतला प्राण काढून घेण्याचा प्रयत्न करण्यासारखेंच आहे. हा प्रयत्न सरकार आज दहा-वीस वर्षें कसा करीत आहे; व जो जो प्रसंग सांपडेल त्या त्या प्रसंगीं आपल्या धोरणाचें एक एक पाऊल सरकार कसें युक्तिबाजपणानें पुढें टाकीत आहे हें पाहिलें म्हणजे त्यांच्या पाताळयंत्रीपणाचें कौतुक वाटतें! १८९७-९८ सालीं मुंबई इलाख्यांत शिक्षकांच्या मतस्वातंत्र्याचा प्रश्न निघालेला होता; पण तेव्हां तो तितका नेटाला लागला नाहीं. बंगालच्या फाळणीच्या प्रसंगीं हा प्रश्न थोडासा निघाला होता; पण विद्यार्थ्यांनीं सभांना जावें कीं नाहीं, त्यांनीं चळवळींत पडावें कीं नाहीं, हाच मुद्दा त्यांतल्या त्यांत विशेष प्रमुखपणानें त्यावेळीं पुढें आला होता; व प्रख्यात 'रिसले-सरक्युलर' निघून बंगाल्यापुरता तो प्रश्न त्यावेळीं निकालालाहि लागला. रिसले-सरक्युलर हें वास्तविक सर्व हिंदुस्थानावर उगारलेलें शस्त्र होतें; पण त्याचा प्रत्यक्ष अंमल बंगाल्यापुरताच झाला. इतर प्रांतांत म्हणजे मुलांना राजकारणांत पडावयास आज मुक्तद्वार आहे असें नाहीं; पण सदर सरक्युलरास प्रांतिक सरकाराकडून सर्वस्वी संमति मिळाली नव्हती व दडपशाहीच्या श्रुति-संग्रहांत त्यास सर्वत्र कायमचें असें स्थान मिळालें नव्हतें. शिवाय अलीकडे राजकीय चळवळ थांबल्यामुळें या गोष्टी कोणाच्या लक्षांत फारशा येत नव्हत्या. पण हातीं घेतलेलें काम पुरें करावयाचा सरकारचा कृतनिश्चय असल्यानें वेळ अवेळ न पाहतां त्यांनीं विद्यार्थ्यांच्या स्वातंत्र्यनाशाघुढची मजल मारून दडपशाहीच्या दोरीचा फांस आतां शिक्षकांच्या गळ्याशीं आणून भिडविला आहे! सबब याच वेळीं काय धडपड होईल ती उपयोगी! नाहीं तर एकदां का हें घातक तत्त्व रुजून त्यानें मूळ धरलें, म्हणजे मग काय, निराशाच!

विद्यार्थ्यांनीं राजकीय कामकाजांत पडूं नये हें तत्त्व व शिक्षकांनीं राजकीय कामकाजांत पडूं नये हें तत्त्व या दोहोंत नुसती जमीनअस्मानाची

तफावत आहे ! पहिलें तत्त्व झालें तरी सर्वस्वीं कोणास मान्य होईल असें नाहींच. कारण विद्यार्थी झाले म्हणून काय झालें ? समाजांतील ते एक घटकच आहेत. विद्याभ्यास करणें हें त्यांचें आद्य कर्तव्य असलें तरी तें कर्तव्य नीट केल्यावर व त्या कर्तव्यास बाध न येईल अशाच रीतीनें त्यांनीं सार्वजनिक कामांत लक्ष घातल्यास त्यांत वावगें तें काय ? ते केवळ 'विद्यार्थी' म्हणून जगाकडे डोळे उघडून पाहाण्याचा त्यांचा हक्क कसा नष्ट होतो ? विद्यार्थ्या-विद्यार्थ्यांमध्येंहि फरक आहेच कीं नाहीं ? प्राथमिक शाळेंतील अल्पवयी विद्यार्थी व कॉलेजांतील प्रौढ विद्यार्थी यांच्यामध्यें कांहींच विवेक करण्यासारखा नाहीं कीं काय ? ज्यांना 'उदयोन्मुख तरुण पिढी' असें उल्हासकारक नांव मिळतें, 'राष्ट्राची भावी आशा' अशा प्रौढ शब्दांनीं ज्यांचा गौरव होतो, त्यांनीं, केवळ अज्ञातवासांत राहिलेल्या प्रमाणें, आपल्या भावना व आपलें कर्तव्य हीं, कुणी हुडकावयास गेलें तरी त्यास दिसणार नाहींत अशा गुप्त रीतीनें दडवून ठेवावीं असा जुलूम त्यांच्यावर काय म्हणून ? राष्ट्राच्या तरुण पिढीचें यौवराज्य कडीकुलपांतच जावें असा आग्रह कां ? बरें, 'राजकारणा'चा त्यांना संपर्कहि लागूं नये हें जर सर्वतोपरी इष्ट, तर सरकाराला प्रिय अशा राजकारणाच्या समारंभांत त्यांचा उपयोग कां करितां यावा ? सरकारला आवडीचें असलें तरी राजकारण तें राजकारणच ना ? सरकारची बाजू सजत असेल त्या ठिकाणीं टाळ्या वाजवायला मुलें असलीं तरी चालतील, पण लोकांना किंवा मुलांना स्वतःला आवडणाऱ्या मनुष्याविषयीं त्यानीं चुकूनसुद्धां प्रेम किंवा आदर व्यक्त करूं नये, या एकतर्फी सक्तीस न्याय कोण म्हणेल ? राजकारण वगळावयाचें तर तें अजीबात व दोन्ही अंगांनीं तरी वगळावें ! मुलांचीं मनें अपक्व असल्यामुळें त्यांच्या मनाला वादग्रस्त गोष्टींचा संपर्क होऊं नये हें जर इष्ट असेल, व या तत्त्वाचा जर प्रामाणिकपणानें अंमल व्हावयाचा असेल, तर एखादी गोष्ट सरकारास प्रिय असली म्हणून काय झालें; ती 'वादग्रस्त' असल्यास तिजपासून मुलांना सरकारानेंहि दूरच ठेवलें पाहिजे. हिंदुस्थान देश अलीकडे श्रीमंत होत आहे कीं नाहीं ? पौर्वात्य देशांना प्रजासत्ताक पद्धतीचें वावडेंच आहे कीं काय ? वगैरे उघड उघड वादग्रस्त गोष्टींवर होणाऱ्या लोकमतनिदर्शक अशा व्याख्यानांस

विद्यार्थ्यांना जाण्याची जर मनाई होते, तर गव्हर्नर-उपगव्हर्नर झाले म्हणून काय झालें ? त्यांनीं तरी असल्या विषयांवर विद्यार्थ्यांस उद्देशून भाषणें कां करावीं ? वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांचें मत झालें तरी तें एकतर्फीच कीं नाहीं ? शुद्ध ज्ञानार्जनाच्या क्षेत्रांत लोकमतास मज्जाव व्हावा व एकतर्फी सरकारी मतांनीं मात्र हवा तसा प्रवेश करावा आणि राखून ठेविलेल्या खास कुरणांतल्या लष्करी घोड्याप्रमाणें त्या मतांनीं मात्र यथेच्छ धिंगाणा घालावा याचें सरकार झालें तरी कसें समर्थन करणार, हें आम्हांस कळत नाहीं !

पण ही विद्यार्थ्यांची गोष्ट झाली; व आपण क्षणभर असें घेऊन चालूं कीं, विद्याभ्यास करीत असतां विद्यार्थी राजकारणाच्या प्रत्यक्ष चळवळींत जितके कमी पडतील तितकें बरें. तरी पण विद्यार्थ्यांना जो निर्बंध घालावयाचा तोच शिक्षक, प्रोफेसर व व्याख्याते यांनाहि घालण्याची सरकारची इच्छा आहे हें दिल्लीसरकारच्या पत्रावरून आतां उघड उघड दिसत नाहीं काय ? राजकीय चळवळ करणाऱ्या मनुष्यास विद्याखात्याशीं संबंध ठेवूं द्यावयाचा नाहीं, व विद्यार्थीवर्गास आपल्या कक्षेबाहेर जाऊन अशा लोकांच्या वाऱ्यासहि उभें राहूं द्यावयाचें नाहीं; याच्यानंतर खुद्द शिक्षकांनींहि कोणत्याहि चळवळ्या लोकांशीं व चळवळीशीं संबंध ठेवावयाचा नाहीं ही गोष्ट ओघानेंच प्राप्त होते. या तीन निर्बंधांचे अभेद्य किल्लेकोट बांधून त्यांच्या आंत विद्यार्थिवर्गाला सरकार सुरक्षित ठेवणार ! 'रसद' पोंचवावयाचीच झाली तर ती फक्त सरकारमार्फत ! व आंत कोणास संचार करावयास मिळालाच तर तो खुद्द सरकारी अधिकाऱ्यांस ! पण हा प्रयत्न अप्रयोजकपणाचा आहे हें सरकारच्या लक्षांत यावयास पाहिजे होतें. कारण एक तर मनुष्य राखून किती राखणार ? खिस्त पुराणांत वर्णिल्याप्रमाणें, स्वर्गीय उद्यानभूमींत अशाच रीतीनें रक्षण करून ठेवलेल्या आद्य-मातापितरांनीं ज्ञानवृक्षाचें फळ तोडून शेवटीं खाल्लेंच कीं नाहीं ? बुद्धचरित्रांतलाहि दाखला या कामीं घेण्यासारखा आहे. गौतमबुद्ध हा आपला बाप राजा शुद्धोदन याचा अत्यंत प्रिय असा मुलगा असल्यामुळें, मुलाच्या दृष्टीला जगांतील दुःख म्हणून कसें असतें तें पडूंच नये अशी त्यानें योजना केली होती; पण केवळ चुकून घडलेल्या एका वृद्धाच्या

दर्शनानें शुद्धोदनाचे सर्व बेत फुकट जाऊन, राजपुत्राच्या अंगीं वैराग्य बाणून तो आईबापांस सोडून गेलाच कीं नाहीं ? हिंदी विद्यार्थ्यांना राजकारण म्हणजे काय असतें याची कल्पनाहि येऊं नये अशी सरकारची इच्छा खरी; पण ती अशा उपायांनीं सर्वांशीं कशी सफल होणार ? राजकीय पुढाऱ्यांचें विद्यागृहांत दर्शनहि न होऊं देणें हा एक मार्ग आहे खरा, पक्ष तो वास्तविक पहातां अगदीं अपुरा आहे.

समजा, कीं सरकारी व खाजगी सर्व शाळांतील विद्यार्थी बोर्डिंगहौसच्या कडी-कुलुपांत व पहाऱ्यांत ठेविलेले आहेत, व फक्त शिक्षणाच्या वेळीं आणि फक्त शिक्षकांचेंच दर्शन त्यांना होतें; आणि अभ्यासाचीं पुस्तकें किंवा तोंडपाठ करण्याचीं शिक्षकांनीं दिलेलीं टिपणें एवढेंच त्यांस वाचावयास मिळतें. अशी स्थिति जर विद्यार्थिदशेच्या अंतापर्यंत एकसारखी टिकणारी असती तर गोष्ट वेगळी. फोटोग्राफ घेणाऱ्या कॅमेराच्या अंतरंगांत आधीं सर्व अंधार करून ठेवलेला असतो, म्हणून फक्त ज्या एका लहानशा द्वारानें आंत प्रकाश येणार त्याच्या तोंडीं प्रकाश-निरोधक 'डायफ्रॅम' लहान बसवावा कीं मोठा बसवावा ही चिकित्सा शोभेल. पण शेंकडा नव्वद किंवा पंचाण्णव विद्यार्थी बोर्डिंगहौसच्या कैदखान्याबाहेर असतात; ते समाजांत इतर रीतीनें पूर्णपणें मिसळतात व वावरतात; समाजाचीं सुखदुःखें त्यांच्या प्रत्यक्ष नजरेस पडतात; आपले आईबाप, आप्तइष्टमित्र व तिऱ्हाईत लोकाहि सार्वजनिक विषयांची जी चर्चा–जो वादविवाद–करितात तो सर्व त्यांच्या कानीं जातो; लायब्ररींत नसलीं तरी घरीं किंवा बाहेर त्यांना सर्व प्रकारचीं वर्तमानपत्रें वाचावयास सांपडतात; या सर्व गोष्टी अगदीं उघड व खऱ्या आहेत. त्या सरकारनें आपणांस माहीत नाहींत असें म्हणण्यांत किंवा आम्ही त्या नाकबूल करण्यांत अर्थ कोणता ? पण त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, हें सर्व अगदींच स्वाभाविक आहे; आणि इतर कोणत्याहि देशांत काय किंवा हिंदुस्थानांत काय तें तसेंच असणार–किंबहुना ते तसें असलेंहि पाहिजे. त्यांत घाबरें असें कांहीं नाहीं ! शाळेंतील शिक्षणाचें प्रत्यक्ष काम सरकारकडे असलें किंवा त्यावर त्यांची देखरेख असली म्हणून विद्यार्थी हे कैदी या नात्यानें सरकारच्या स्वाधीन करण्याचा आईबापांचा केव्हांहि इरादा नसतो. अर्थात् शाळेंत

गेलें म्हणजे तेथें सहा तास सांखळ्या–वाळे घातलेले कैदी आणि बाकी घरीं व बाहेर अठरा तास 'पॅरोल'वर खुले केलेले नजरकैदी'-अशा तऱ्हेची विद्यार्थ्यांची उपपत्ति प्रतिपादन करण्याची सरकारची इच्छा असेल, किंवा त्यांची इच्छा असली तरी ती जगमान्य होईल असें आम्हांस वाटत नाहीं.

शाळेपुरती सर्वस्वी व शाळेबाहेर थोडीशी विद्यार्थ्यांना शिस्त म्हणून राहिली पाहिजे ही सामान्य गोष्ट आहे. पण शाळेंत केवळ पुस्तकी ज्ञानाखेरीज विद्यार्थ्यांना विशेष कांहीं देतां येत नाहीं–धार्मिक, नैतिक, सामाजिक वगैरे विषयांचें ज्ञान देण्याचें काम सरकारास विद्यार्थ्यांचे आईबाप व त्यांचा समाज यांजवरच जसें सोंपवावें लागतें, तसें राजकारणाचें ज्ञानहि याच मार्गानें त्यांना मिळाल्याशिवाय राहणार नाहीं, ही अनिर्वाह्य गोष्ट सरकारचे लक्षांत यावयास पाहिजे. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, राजकीय शिक्षणाचे विद्यार्थ्यांचे ज्ञानमार्ग इतके प्रशस्त व विविध असल्यामुळें केवळ राजकारणांत ते मन घालतात म्हणून विद्वान् लोकांना विद्यामंदिराच्या द्वारीं मज्जाव करणें हें, मैदानांत उभें राहिलें असतां आपला लहानसा तळहात पुढें करून सर्व सूर्यप्रकाश अडवून धरण्याच्या महत्त्वाकांक्षेसारखें हास्यास्पद आहे ! त्यामुळें दुसरें तिसरें तर कांहीं साधत नाहींच, पण सर्वशक्तिसंपन्न प्रभूच्या मनाची अनुदारता मात्र दिसून येते ! राजकारणांत पडणाऱ्या विद्वान् लोकांविषयींची सरकारची ही असहिष्णुता त्यांना खचित भूषणास्पद नाहीं. आतां प्रत्यक्ष शिक्षणाचें काम करीत असतां कोणत्याहि शिक्षकानें आपल्या परिस्थितीचा फायदा घेऊन सरकाराविषयीं अप्रीति उत्पन्न करण्यासारखा राजकारणाचा उपदेश विद्यार्थ्यांना करूं नये हें अगदीं रास्त आहे, व देशकार्याकरितांहि असला विश्वासघात कोणी करणार नाहीं व करूं नये. पण या विश्वासासंबंधाच्या मर्यादा कोणत्या आहेत हें मात्र विसरतां कामा नये. कारण 'शिक्षणाचें काम अंगिकारणाऱ्या मनुष्यानें इतर वेळींहि आपली सदसद्विवेकबुद्धि सरकारास विकून टाकल्याप्रमाणें जन्मभर वागलें पाहिजे, किंवा पूर्वी केव्हांहि राजकारणात पडलेला मनुष्य विद्यामंदिरांत पुढें केव्हांहि अस्पृश्यच मानला गेला पाहिजे' असा सरकारचा आग्रह असल्यास त्याचें समर्थन साक्षात् ब्रह्मदेवहि करूं शकणार नाहीं !

शिवाय, केवळ राजकारणाचा स्पर्श झाल्यामुळें पतित किंवा बहिष्कृत

होऊन सुशिक्षित लोक विद्यादेवीच्या प्रासादांगणाच्या कोंपऱ्यांतहि उभे राहण्यास अपात्र ठरले, ही गोष्ट हिंदुस्थानाखेरीज इतर कोणत्याहि देशांत कधीं कोणास पहावयास किंवा ऐकावयासहि सांपडणार नाहीं. इंग्लंडचेंच उदाहरण कां घ्यावें. इंग्लंडची व हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति कांहीं कांहीं बाबतींत वेगळी असेल; पण तेवढ्यामुळें इंग्लंडचा दाखला या कामीं मुळींच घेतां येणार नाहीं असें नाहीं. आणि इंग्लंडांत पहावें तर राजकारणांत अगदीं पुढारीपणानें पडणारे जे लोक त्यांना युनिव्हर्सिट्यांतून मजाव नसतो इतकेंच नव्हे, तर केवळ विद्याविषयक व्यवसाय करीत रहाणाऱ्या प्रोफेसरांहूनहि त्यांना अधिक मान मिळतो. इंग्लंडांतील युनिव्हर्सिट्यांच्या रेक्टरच्या जागा प्रायःविद्यमान किंवा पूर्वकालीन प्रधान-मंडळांतील लोकांकरितांच राखून ठेवलेल्या असतात असेंहि म्हणतां येईल. कॉन्झरवेटिव्ह झाले किंवा लिबरल झाले तरी इंग्रजच, ही गोष्ट खरी असली तरी, या दोन पक्षांतील मतभेदाची तीव्रता व त्यामुळें उत्पन्न होणारी विकारवशता इच्यापेक्षां, हिंदुस्थानांत राजकीय मतभेदामुळें उत्पन्न होणारी तीव्रता किंवा विकारवशता ही कांहीं विशेष आहे असें म्हणतां येणार नाहीं. इंग्लंडांत झालें तरी राजकीय चळवळीची मजल कोठवर जाते हें प्रसिद्धच आहे. कॉन्झरवेटिव्ह व लिबरल पुढारी किंवा पक्षपाति हे परस्परांवर जितकी कडक टीका करितात, एकमेकांस जितके अपशब्द बोलतात किंवा जसा अनुदार हेतूंचा आरोप करितात, तशी टीका, अपशब्द किंवा आरोप यांचा हिंदुस्थानांतील राजकारणांत कधीं उपयोग झालेला आढळत नाहीं. हें जर खरें, तर इंग्लंडांत राजकारणाच्या स्पर्शामुळें शिक्षणाला जी अपवित्रता येत नाहीं ती हिंदुस्थानांतच कां यावी ? इंग्लंडांत प्रधानमंडळ उलथून पाडण्याचा प्रयत्न तरी असतो; हिंदुस्थानांत ती कल्पनाहि नाहीं. केवळ लोकांच्या तक्रारीची दाद लावून घेणें किंवा राज्यकारभाराच्या एखाद्या खात्याच्या धोरणावर टीका करणें इतकें सौम्य स्वरूप हिंदुस्थानांतील राजकारणास असतां त्याचा नुसता स्पर्शहि शिक्षणाला इतका दुःसह कां वाटावा ? राजकीय पुढाऱ्यांच्या तोंडच्या उच्छ्वासानें आपल्या प्रशांत पुष्करणींत वादळ होण्याची भीति जर आंग्लविद्यादेवीला वाटत नाहीं, तर हिंद-विद्यादेवीला तरी ती भीति कां वाटावी ? हिंदी व इंग्रजी राजकारणांत कसाहि

फरक असो; पण विद्यार्थ्यांचें मन कोठेंहि झालें तरी तेंच. मग शुद्ध ज्ञानार्जनाच्या योगसमाधीचा भंग राजकारणाचा शब्द विद्यार्थ्यांच्या कानांवर पडल्यानें हिंदुस्थानांत होतो, आणि विलायतेंत मात्र होत नाहीं हें कसें?

अमेरिकेंतील हिंदी विद्यार्थी-संघ*

देशत्याग हा ज्या वेळीं सक्तीमुळें करावा लागतो त्या वेळीं त्यासारखें दुसरें दुःख नसतें; पण तोच स्वेच्छेनें करणें यासारखी उत्साहकारक गोष्ट दुसरी क्वचितच असेल. आज हिंदुस्थानांतील जितके म्हणून विद्यार्थी परदेशीं गेले आहेत तितके सर्व प्रायः स्वेच्छेनें गेले आहेत. म्हणून सुखासुखी केलेल्या या सहेतुक देशत्यागामुळें त्यांना दुःख न होतां आनंद व उत्साहच वाटत असला पाहिजे, व तो राष्ट्रकार्यास फार फायदेशीरहि आहे. वडिलार्जित घरांत राहून तें राखणें यांत भूषण नाहीं असें नाहीं; पण आपल्या हिंमतीवर व पराक्रमावर एखादें नवीन घर संपादन करणें हें त्याहूनहि अधिक भूषणास्पद आहे. देशांतल्या देशांत राहून काय होईल ती विद्या करावी अशा विचारानें चालणाऱ्या मनुष्याचें व्यक्तिशः रीतीप्रमाणें हित होईलच. पण परदेशीं जाऊन विद्यासंपादन करणारा मनुष्य स्वदेशांत न मिळणारी विद्या स्वतःपुरती तर मिळावितोच; पण दुसऱ्या विद्यार्थीबांधवांसहि या बाबतींत तो मार्गदर्शक होतो. शिक्षणाच्या जाति व पद्धति अनेक आहेत; पण कोणत्याहि एका देशांत बहुधा एकाच जातीचें व पद्धतीचें शिक्षण मिळूं शकतें, त्यांत विविधता येऊं शकत नाहीं. हा हिंदुस्थानचा नव्हे तर सर्वच देशांचा अनुभव आहे. हिंदुस्थानांत उत्तम सरकारी नोकर निपजतो; इंग्लंडांत शास्त्रीय शिक्षणापेक्षां भाषाविषय अधिक चांगले शिकविले जातात; उत्तम शास्त्रीय शिक्षण देण्याचा जर्मनीचा हातखंडा आहे; व व्यावहारिक धंदेशिक्षण पाहिजे असेल तर कोणासहि अमेरिकेंतच गेलें पाहिजे, हें आज ठरल्यासारखेंच आहे. म्हणून, विद्यार्थ्याची बुद्धिमत्ता कमीजास्त कशीहि असो, त्याला ज्या प्रकारचें शिक्षण हवें असेल त्यास अनुसरून त्यानें देशाची निवड केली पाहिजे. यामुळें एका देशांतील

* केसरी, तारीख २१ आक्टोबर १९१३

विद्यार्थी दुसऱ्या देशांत शिक्षण मिळविण्याकरितां जातात असा प्रकार हरहमेषा दिसून येतो. इंग्लंडांत एवढाल्या युनिव्हर्सिट्या आहेत तरी कांहीं थोडे इंग्रज विद्यार्थी जर्मनींत, व उलट कांहीं जर्मन विद्यार्थी इंग्लंडांत शिकण्यास दरवर्षी जातात. जपानचे विद्यार्थी इंग्लंड, जर्मनी व अमेरिका या तीनहि ठिकाणीं जातात. चिनी विद्यार्थी अमेरिका व जपान येथें जातात. रशियन विद्यार्थी स्वित्सर्लंडमध्यें जातात. हिंदुस्थानांत मात्र कोणत्याच देशाचे विद्यार्थी येत नाहींत. कारण त्यांना देण्यासारखें हिंदुस्थानच्या शिक्षणपद्धतींत विशेष असें कांहींच नाहीं. उलटपक्षीं, हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांना इंग्लंड, जर्मनी, जपान व अमेरिका यांपैकीं साधेल त्या देशांत जाऊन शिकण्यासारखें पुष्कळच आहे.

पण केवळ शिक्षण मिळविण्यापेक्षांहि दुसऱ्या अनेक गोष्टी आज हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांना परदेशीं जाऊन शिकावयाच्या आहेत; व इकडील शिक्षणाची जाति व पद्धति ही उद्यां बदलली तरीहि त्या अनिर्वाह्यच ठरतील. स्वावलंबनहि अशांपैकीं एक गोष्ट होय. शिक्षण हें साध्य असून स्वावलंबन हें एक निवळ साधन आहे. तथापि, स्वावलंबन हेंच स्वतः साध्य होण्याइतकें महत्त्वाचें असल्यामुळें तें शिकण्याकरितांदेखील परदेशीं जाणें जरूर पडलें तर जावें. देशांतल्या देशांतले मार्ग इतके ठराविक व मळलेले असतात कीं, सर्व जन्म अशा आयत्या मार्गांवरून फिरण्यांत गेल्यामुळें एक टीचभरहि नवा मार्ग शोधून काढण्याची पात्रता मनुष्याच्या अंगांतून नाहींशी होते. छातीइतक्या पाण्यांत मनुष्यानें जन्म घालविला तरी त्याला पोहतां म्हणून कधीं यावयाचें नाहीं; पण पुरुषभरापेक्षां अधिक पाण्यांत जाण्याचा प्रसंग जरी फक्त दोन चार वेळां त्याला आला तरी तेवढ्यांत तो पोहायला शिकेल. परदेशरूप खोल पाण्यांत शिरणारास दगा होण्याची भीति नसते असें नाहीं; कारण पोहावयाचा प्रयत्न करितांना पाण्याचा जोर न आंवरून कोणी बुडूनहि जावयाचे! पण दग्यांतून वांचून जो पोहावयास शिकेल त्याचा पाण्यांत डुंबण्याचा आनंद, वाटेल तेव्हां पाय टेंकतां येतील अशा उथळपाण्यांत डुंबणाराच्या आनंदापेक्षां खचित अधिक असेल यांत शंका नाहीं. 'केल्यानें देशाटन...मनुजा चातुर्य येतसे फार' हें जर खरें असेल तर परदेशीं जाऊन विद्या शिकणाराला विद्या यावयाची तीं

येऊन शिवाय चातुर्यहि येईल हें उघड आहे. निवळ पुस्तकी विद्येपेक्षां व्यावहारिक चातुर्य किंवा शहाणपण यांचा उपयोग व्यक्तीला काय किंवा राष्ट्राला काय पुष्कळ अधिक आहे हें सर्व जग कबूल करतें. हिंदुस्थानांतून परदेशीं विद्या शिकण्याला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची परंपरा फार तर चाळीस वर्षांच्या अलीकडची आहे. या बाबतींत पहिला मान इंग्लंडला मिळाला, व हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धतीला अनुसरून वरिष्ठ सरकारी नोकऱ्या मिळण्याला लागणारें जें शिक्षण इकडे मिळण्यासारखें नव्हतें तें मिळविण्याकरितांच या पिढीचे पुढारी विलायतेस गेले. त्यांपैकीं सत्येंद्रनाथ टागोर, सुरेंद्रनाथ बॅनर्जी वगैरे लोक अद्यापि विद्यमान आहेत; म्हणजे ही परंपरा इतकी नूतन आहे. सिव्हिल सर्व्हिसपेक्षां बॅरिस्टर होण्याकरितां बरेच हिंदी विद्यार्थी इंग्लंडला जाऊं लागले; व तो ओघ पुढें इतका वाढला कीं, कोणत्या कां कारणाकरितां होईना, पण खुद्द सरकारास इकडे लक्ष घालून तो थांबवावा लागला. विलायतेहून बॅरिस्टर होऊन आलेल्या हिंदी लोकांत नामांकित असे कांहीं थोडे निघाले; तरी पण प्रांतानिहायच्या कायद्याच्या परीक्षा दिलेल्यांतच अधिक नामांकित लोक निघाले. यामुळें बॅरिस्टरीच्या परीक्षेला गेलेल्या विद्यार्थ्यांनीं राष्ट्रीयदृष्ट्या कांहीं विशेष संपादन केलें असें म्हणतां येत नाहीं. उलट अशांतल्या बऱ्याच लोकांनीं घरच्या पैशाचा चुराडा केला एवढेंच नव्हे, तर देशी परंपरेला विसरून किंवा पायांखालीं तुडवून, बॅरिस्टर म्हणजे इस्तरीच्या कपड्यांनीं ताठलेला पण मनानें लिबलिबीत, तोंडानें मृदु पण स्वभावानें उद्दाम, वेशानें सुशिक्षित पण करणीनें अडाणी व राष्ट्रीयत्वाच्या बुद्धीला सर्वस्वीं आंचवलेला अजागळ प्राणी, अशा वर्णनास कित्येकांनीं आपल्या वर्गाला पात्र केलें. आजकाल बॅरिस्टर या नांवाला निःसंशय भूषणास्पद अर्थ आहे असें म्हणण्याचें धाडस कोणीहि करणार नाहीं. असो; खरें उपयुक्त असें शिक्षण मिळविण्याकरितां इंग्लंडला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची परंपरा बॅरिस्टरांच्या अलीकडची आहे, आणि जपान व अमेरिका इकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची तर त्याहून अलीकडची. पण एका बाजूनें इंग्लंडला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येला आळा पडूं लागून जपान व अमेरिका इकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या हळुहळू वाढत आहे.

परदेशीं जाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं तिकडे कायमचे रहिवाशी होऊन रहाणारे फार थोडे. बहुतेक थोड्याबहुत मुदतीनंतर स्वदेशीं परत येतात, व जे थोडे तिकडे कायमचे रहातात त्यांनाहि म्हणजे मातृभूमीचें विस्मरण पडतें असें नाहीं. आयरिश इतिहास वाचणारांच्या हें ध्यानांत असेलच कीं, केवळ विद्यार्थी म्हणून नव्हे तर कायमचा देशत्याग करून अमेरिकेंत जाऊन राहिलेल्या आयरिश लोकांच्या तिकडे पिढ्यानुपिढ्या झाल्या तरी मातृभूमीला ते कधींहि विसरले नाहींत. किंबहुना 'होमरूल' मिळविण्याच्या ज्या खटपटी आयरिश लोकांनीं गेल्या चाळीस वर्षांत केल्या, त्यांना सहानुभूति व रोकड पैशाची मदत अमेरिकन आयरिश लोकांकडून भरपूर झाली. परदेशांत राहून मातृभूमीचें नित्य स्मरण करणाऱ्या या आयरिश लोकांच्या मदतीशिवाय-विशेषतः त्यांनीं परदेशांत जगभर बनविलेल्या अनुकूल लोकमताशिवाय-'होमरूल'ची चळवळ या स्वरूपाला आली नसती असेंहि कित्येकांचें म्हणणें आहे. हिंदुस्थान सोडून परदेशीं जाऊन रहाणें हीं गोष्ट सर्वस्वीं अप्रिय; तथापि विद्यार्जनाकरितां म्हणा, उद्योगधंद्याकरितां म्हणा, फार काय पण कोणत्याहि कारणानें हिंदुस्थानांतील स्वस्थितीस कंटाळून व वैतागून कां म्हणाना, परदेशीं जाऊन राहिलेल्या हिंदी लोकांच्या हातून या देशास पुष्कळ मदत होण्याचा संभव आहे.

हिंदुस्थानांतून आजवर किती विद्यार्थी परदेशीं गेले किंवा आजमितीस किती विद्यार्थी परदेशांत आहेत, याची नोंद कोठें नसल्यामुळें नक्की आंकडे सांगतां येणें शक्य नाहीं. पण विलायतेंत सुमारें सहाशें, जपानांत दहापांच व अमेरिकेंत सुमारें दीडशें असावे असा अदमास आहे. इंग्लंडांतील विद्यार्थ्यांना मदत व्हावी किंवा त्यांचेवर देखरेख रहावी या हेतूनें सरकारतर्फे काय व्यवस्था झाली आणि ती तेथील विद्यार्थ्यांना कितपत आवडली अगर न आवडली हें केसरीच्या वाचकांना माहीत आहेच. पण सरकारी मदत असो अगर नसो, कोणत्याहि परदेशांत गेलेल्या विद्यार्थ्यांना स्वावलंबन सुचतें व हिंदुस्थानांत असतां त्यांना एकमेकांपासून जितकी मदत कधीं झाली नसती तितकी परदेशांत ते एकमेकांस करितात, ही आनंदाची गोष्ट होय. हल्लीं अमेरिकेंत असणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांच्या संघामार्फत जें एक 'बुलेटिन' ऊर्फ माहितीपत्रक आम्हांकडे आलें आहे, त्यावरून असें दिसतें

कीं, हे विद्यार्थी उद्योगी व उत्साही असे असून संघशक्तीनें त्यांना परस्परांचा फायदा करण्याची इच्छा आहे व हिंदुस्थानांतून आणखी विद्यार्थी अमेरिकेंत यावे असेंहि त्यांना वाटतें. सदर माहितीपत्रकांत हिंदुस्थान-असोसिएशनचे सेक्रेटरी सुरेंद्र मोहन बोस हे लिहितातः-" या दूरच्या देशांत दिवसेंदिवस अधिकाधिक शिरणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांच्या सैन्याच्या बिनीचे शिपाई आम्ही आहोंत, या नात्यानें आमच्यावर जबाबदारीचें फार मोठें ओझें आहे. आम्ही अमेरिकेंत आहों तोंपर्यंत आमचा उद्योग, आमची विद्यार्जनपात्रता, आमचें आचरण व आमची नियत या सर्व बाजूंनीं आमच्या मातृभूमीस शोभेल असेंच आम्हांस वागलें पाहिजे व पुढें आम्ही हिंदुस्थानास परत जाऊं तेव्हां अमेरिकेसारख्या नामांकित देशांत मिळविलेल्या शिक्षणाचें आम्हीं चीज करून दाखविलें पाहिजे. यांपैकीं पहिलें जोखमीचें काम आम्ही यथाशक्ति येथें करीत आहों, व त्यांत आम्हांस यशहि आलें आहे असें वाटतें. अमेरिकेसारख्या देशांत येऊन स्वावलंबनानें म्हणजे स्वतःच्या उद्योगानें पोटास मिळवून शिक्षण संपादणें हें काम बरेंच अवघड आहे. तथापि, तें आमच्यापैकीं पुष्कळांनीं पार पाडलें आहे. आम्ही हिंदुस्थानांत असतों तर बहुधा मध्यम प्रतीच्या विद्यार्थ्यांतच मोडलों असतों. पण येथील बऱ्या विद्यार्थ्यांच्या बरोबरीनें आम्हांस आपला दर्जा राखतां आला आहे. इकडे येणारे विद्यार्थी सर्वच चांगले निभावतात असें नाहीं; व कांहींच्या अपयशामुळें इतरांस कित्येक वेळां मान खालीं घालावी लागली आहे. तसेंच इकडून परत गेलेल्या कांहीं विद्यार्थ्यांनीं आपल्या हातून घडलेल्या व न घडलेल्याहि किरकोळ व क्षुद्र गोष्टींचा बडेजाव केली व गवगवा माजविला. आणि नसलेल्या पदव्या नांवापुढें लावणें किंवा केवळ पैसे भरून मिळणाऱ्या दिखाऊ पदव्या पैसे भरून विकत घेणें, अशा हीन वृत्तीच्या गोष्टी करणारे विद्यार्थीहि कांहीं निघाले. परंतु अशीं उदाहरणें थोडीं. आणि या वृत्तीस आळा बसावा याकरितां हिंदुस्थान-असोसिएशनचे कोण सभासद कोठें आहेत, काय शिकतात, काय करितात इत्यादि विश्वसनीय माहिती वेळोवेळीं प्रसिद्ध करून उपरिनिर्दिष्ट वृत्तीला आळा घालण्याचा आमच्या असोसिएशनचा हेतु आहे."

हिंदुस्थानांतून अमेरिकेस जाणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल व

त्यांच्यामध्यें उत्साह उत्पन्न करील अशीहि कांहीं माहिती सदर माहितीपत्रांत दिली आहे. तिजवरून असें दिसतें कीं, जगांत कोठेंहि मिळणाऱ्या शिक्षणाच्या तोडीचें शिक्षण देणाऱ्या अशा सुमारें वीस संस्था अमेरिकेंत आहेत. विद्येच्या अमुक एका विषयांत अमेरिकेंत शिक्षण मिळूं शकत नाहीं असें नाहीं. शिवाय उपपत्तीइतकाच व्यवहार व शास्त्राच्या बरोबरीनें कला शिकविण्यांत अमेरिका इतर देशांच्या पुढें आहे. भौतिक शास्त्रें व इंजिनियरिंग या विषयांतील व्यावहारिक शिक्षण थोड्या खर्चांत मिळविण्याला हिंदी विद्यार्थ्यांना अमेरिकेसारखी दुसरी सोय नाहीं. हेंच शिक्षण मिळविण्यास त्यांना युरोपांत फार अधिक खर्च येतो. अमेरिकेंतील रसायनशाला समृद्ध असतात, व हिंदुस्थानांत भौतिकशास्त्रांतील पदव्या मिळविलेल्या लोकांना या रसायनशालांचा फार उपयोग होण्यासारखा आहे. शिवाय प्रयोगशालांतील असिस्टंट, कारखान्यांतील इंजिनियर रसायनशालांतील मदतनीस या नात्यानें हिंदी विद्यार्थ्यांना बराचसा पगार व त्याहून मौल्यवान् असा अनुभव मिळण्यासारखा आहे. प्रोफेसरीचीहि जागा कोठें मिळणार नाहीं असें नाहीं. मात्र अमेरिकेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचें बरेंचसें शिक्षण हिंदुस्थानांत पुरें झालेलें असावें. एरवींच्या वेळीं पोटाला मिळविण्याचा धंदा करावा व कॉलेजच्या वेळीं कॉलेजांत जाऊन शिकावें ही जोड शक्य आहे. या द्वंद्वांत कित्येक चिरडूनहि जातात; पण जे विजयी होतात त्यांचा आनंद त्यांनाच विचारावा. केवळ हिंदी विद्यार्थ्यांकरितांच नव्हे, पण सामान्य रीत्या स्वतःचें पोट भरून किती विद्यार्थी अमेरिकन युनिव्हर्सिट्यांतून शिक्षण मिळवूं शकतात याची माहिती तिकडील युनिव्हर्सिट्यांत ठेविलेली असते. तीवरून अशा लोकांची संख्या बरीच असावी असें दिसतें. हार्वर्ड-युनिव्हर्सिटी ही साधारणपणें श्रीमंत विद्यार्थ्यांच्या लागी आहे. तथापि तिचे अध्यक्ष डॉ० लॉरेन्स लोवेल यांच्या मतें तेथील एक तृतीयांशपासून एक द्वितीयांशपर्यंत विद्यार्थी सर्वस्वीं किंवा अंशतः स्वतःच्या पोटाला मिळविणारे आहेत. स्टॅनफर्ड युनिव्हर्सिटीमधील बरेच विद्यार्थी स्वावलंबी आहेत. येल युनिव्हर्सिटीतील विद्यार्थ्यांनीं स्वतः शिकत असतां सुमारें १ लक्ष ९० हजार डॉलर उद्योगधंदा करून मिळविले, म्हणजे सालिना दरमाणशीं ५०० डॉलर याप्रमाणें ३८० विद्यार्थ्यांचा

सर्व खर्च निघण्याइतके पैसे मिळविले. कोलंबिया व हार्वर्ड या युनिव्हर्सिट्यांचे हे आंकडे १ लक्ष ६६ हजार डॉलर व १ लक्ष ३८ हजार डॉलर असे आहेत. कॉर्नेल युनिव्हर्सिटीतील १०६९ स्वावलंबी विद्यार्थ्यांनीं मिळून १ लक्ष ८४ हजार डॉलर मिळविले. प्रत्येकाला सरासरीनें सालिना १७३ डॉलर मिळवितां आले व आपल्या खर्चापैकीं एक तृतीयांश खर्च परस्पर काढतां आला. बऱ्याच विद्यार्थ्यांचा जेवणखाण व घरभाडें यांचा खर्च निघाला व १२४ विद्यार्थ्यांना तर याहून अधिक मिळालें. विद्यार्थ्यांना काम पुष्कळ तऱ्हेचें मिळूं शकतें, पण पडेल तें काम आंग मोडून करण्याची तयारी पाहिजे. अगदीं साधें व कोणालाहि करितां येण्याजोगें काम म्हटलें म्हणजे खानावळींत तीन तास काम करून तीन वेळां फुकट जेवावें. एखाद्या गृहस्थाच्या घरीं शेकशेगडीची व्यवस्था ठेवावयाची व त्याबद्दल घरच्या एका खोलींत फुकट राहून सामानसुमान वापरावयाचें. आतां कोणाशीं घरचे पैसे असले तर तें बरेंच; पण खरें म्हटलें तर घरचे अगदीं भरपूर पैसे नसले तर अधिक बरें. कारण त्यायोगानें विद्यार्थी चैनी व आयदी बनण्याचा संभव असतो. अगदीं जीव जाईल व रक्तशोष होईल इतकी आपत्ति नसावी; कारण अशा आपत्तीच्या अग्नींत गुणी व्यक्तिहि पिचून जातात. पण पैशाची थोडीशी तरी वाण विद्यार्थ्यांला असावी, म्हणजे जगाचा थोडासा अनुभव मिळण्यास त्यांना मदत होते. एका विद्यार्थ्यानें धर्मोपदेशक, कारकून, लायब्रेरियन, स्टेजमास्तर, कोचमन व खिडक्या रंगविणार इतकीं निरनिराळीं कामें केलीं! एका विद्यार्थ्याजवळ पश्चिम अमेरिकेहून पूर्व अमेरिकेला जावयास पैसे नव्हते; पण एका प्रेताची रवानगी त्याच्या मुक्कामापर्यंत व्हावयाची होती, व तें संभाळून न्यावयाचें काम करण्यामुळें त्याला आपला प्रवास बिनखर्चीकरितां आला! अर्थात् स्वावलंबन हें कांहीं अंशीं एक प्रकारचें दिव्य आहे. त्यांतून पार पडण्याला अंगीं विशेष गुण लागतात हें खरें; तरी पण साहस व आपत्ति यांच्या योगानें जगाचा जो अनुभव मिळतो तो सुखावलेल्या लोकांना मिळत नाहीं हें कांहीं खोटें नाहीं. स्वावलंबनाचें हें वर्णन करण्याचें कारण इतकेंच कीं, ज्याला अनुकूलता आहे अशांनीं तर अमेरिकेस जावेंच; पण ज्यांना तितकी अनुकूलता नाहीं, फक्त प्रवासखर्च व थोडीशी पोटगी इतकीच ज्यांच्याजवळ सामुग्री

आहे, अशांनींहि जाण्याचा विचार केल्यास त्यांत कांहीं फारसें वावगें होणार नाहीं.

असो; अमेरिकेंतील हिंदी विद्यार्थीसंघाचा अगदीं उघडपणें व केवळ शिक्षण मिळविण्याचाच हेतु आहे, आणि अमेरिकन प्रेसिडेन्ट डॉ० वुइल्सन यांनीं पाठविलेल्या सहानुभूतीच्या स्वदस्तूरच्या पत्रावरून पाहतां अमेरिकेंतील हिंदी असोसिएशनला म्हणजे हिंदी विद्यार्थीसंघाला राजमान्यतेचेंहि अधिष्ठान आहे. हे विद्यार्थी मातृभूमीला स्मरतात, ही गोष्ट प्रस्तुतच्या माहितीपत्रकावरून उघड होते; पण आईवरील मुलांच्या प्रेमापेक्षां मुलांवरील—विशेषतः परदेशांत गेलेल्या मुलांवरील—आईचें प्रेम अधिक असावें. अर्थात् या हिंदुस्थान-असोसिएशनला हिंदुस्थानांतील लोकांनीं शक्य तितकी मदत केली पाहिजे. हिंदुस्थानांतील हिंदी विद्यार्थी व अमेरिकेंतील हिंदी विद्यार्थी यांपैकीं अधिक सरस व महत्त्वाचा कोण, हें निराळें सांगावयास नकोच.

मोडी कीं बाळबोध ?

सदरहू वादग्रस्त प्रश्नासंबंधानें लोकमत व्यक्त करण्याकरितां पूर्वी कायदेकौन्सिलच्या बैठकींत ना० उपासनी यांनीं एक ठराव पुढें आणला होता. परंतु वेळाच्या अभावामुळें आणि कित्येक प्रमुख लोकनियुक्त प्रतिनिधींच्या उतावळेपणामुळें ना० उपासनी यांस आपला हा ठराव परत घ्यावा लागला. कौन्सिलच्या मार्च महिन्यांतील सभेपुढें तरी तो ठराव फिरून खास येईल अशी आम्हांस आशा होती, पण तो योगहि घडून आला नाहीं. या विषयासंबंधानें आम्हीं पूर्वी अनेक वेळां चर्चा केलेलीच आहे. तथापि पुढें मागें या प्रश्नावर कौन्सिलांत होणाऱ्या वादविवादाचें स्वरूप आगाऊ वाचकांच्या लक्षांत थोडेंबहुत आलेलें असावें, याकरितां वादांतील साधकबाधक गोष्टी संक्षेपानें आज त्यांच्यापुढें मांडण्याचा आम्हीं विचार केला आहे.

या वादांतील सर्वांत आधीं सुचणारा मुद्दा असा आहे कीं, सरकारदरबारीं आजवर मोडी लिपीचा प्रसार सर्व मराठी जिल्ह्यांतून असतां तिच्या ऐवजीं बाळबोध लिपी चालू करण्याची नवीन कल्पना निघण्याचें कारण काय ? याचें उत्तर इतकेंच कीं, कित्येक आळशी सिव्हिलियन

* केसरी, तारीख १४ एप्रिल १९१४

लोकांना मोडी लिपी वाचण्यास शिकण्याचा कंटाळा असून, केवळ आपल्या सोयीकरितां लिपी बदलावी असा त्यांचा आग्रह आहे; याहून दुसरें तिसरें कारण कांहीं नाहीं. इंग्रजी राज्य सुरू होण्यापूर्वी सरकारदरबारीं मोडी लिपीच सर्रास चालत असे यांत आश्चर्य नाहींच. पण इंग्रजी राज्य सुरू झाल्यानंतरहि, गेल्या तीन चार वर्षांपूर्वीपावेतों, मोडी लिपीविरुद्ध युरोपियन अधिकाऱ्यांनीं फारशी तक्रार केल्याचें कोठें नमूद नाहीं. असें असतां आजच मोडी लिपीची गैरसोय कित्येक युरोपियन अधिकाऱ्यांना भासूं लागावी, एवढेंच नव्हे तर केवळ त्यांच्या आग्रहामुळें मोडी लिपीचें अजीबात उच्चाटन होण्याचाच प्रसंग यावा, हें हल्लींच्या विपरीत काळाचें-च एक लक्षण म्हटलें पाहिजे ! सरकारदरबारीं मोडीस मज्जाव झाला म्हणजे खासगी रीतीनेंहि कोणीं मोडी लिहूं नये असा प्रतिबंध होत नाहीं हें आम्ही जाणतों; परंतु मोडी लिपीचा राजाश्रय मुळीं जावाच कां ? असला प्रश्न विचारण्याचा महाराष्ट्रीयांना हक्क आहे.

मोडी अक्षराचें वळण अलीकडे पूर्वीसारखें राहिलें नाहीं, व पेशवाई-तील मोडी लिपीपेक्षां हल्लींची मोडी लिपी दिसण्यांत कमी ठबदार दिसते या गोष्टी कदाचित् खऱ्या असतील. पण मोडी लिपी कितीहि वाईट असली तरी ती वाचतांच येत नाहीं इतकी वाईट कोठेंहि नसते. प्राथमिक शाळांतून लहानपणीं मुलांकडून मोडी हस्तलिखितें जीं काय वाचण्यांत येत असतील तितकींच हें खरें; परंतु मोडी लिपी ही घरचीच पडल्यामुळें जन्मभर प्रत्येकाला तिचा थोडा ना थोडा तरी परिचय राहतोच. यामुळें कोणाहि नेटिव्ह अधिकाऱ्यास मोडींत लिहिलेलें प्रकरण वाचावयास अड-चण पडली असें कधीं होत नाहीं. युरोपियन अधिकाऱ्यांना मोडी वाच-ण्यास थोडें कठीण जात असेल ही गोष्ट खरी; पण बाळबोध झालें तरी तें कांहीं त्यांच्या घरचें नव्हे ! अर्थात् त्यांना जसें बाळबोध शिकावयाचें तसेंच मोडीहि शिकावयाचेंच मग तें त्यांनीं नीट शिकून कां घेऊं नये ? आळस कां करावा ? सिव्हिलियन लोक हिंदुस्थानांतील लोकांवर राज्य करावयास येतात; व राज्य करून त्यांत यश मिळविणें हें राज्यकर्त्यांना प्रजेचें हृद्गत कळण्यावर अवलंबून असतें. अर्थात् प्रजेचें हृद्गत आपलेंसें करण्याची ज्यांची महत्त्वाकांक्षा असावी, किंवा निदान तें ज्यांचें कर्तव्य

असतें, त्यांना प्रजेची भाषा व लिपी यांचा पुरता परिचय करून घेण्याचा इतका जाच वाटावा हें खास शोभत नाहीं. अशा प्रश्नाकडे केवळ अधिकाऱ्यांच्या सोईच्या दृष्टीनेंच पहावयाचें, तर मग मोडी तर राहोच; पण बाळबोध तरी कां चालूं द्यावें? सर्व कामकाज इंग्रजींतच कां चालवूं नये? हायकोर्ट किंवा प्रिव्ही कौन्सिल हें जसें बिनछापलेला कागद सहसा हातांत धरीत नाहीं, त्याचप्रमाणें युरोपियन अधिकाऱ्यापुढें जाणारा कागद इंग्रजींतच असला पाहिजे असें सरकार ठरवील तर त्यांना तसेंहि करतां येईल; कारण त्यांजवळ लोकांचा पैसा मुबलक आहे.

पण सर्वांहून मुद्द्याची गोष्ट आहे ती पुढेंच आहे; व ती अशी कीं, युरोपियन अधिकाऱ्यांच्या सोयीकरितां मोडी बुडवून आज बाळबोध चालू करावयाचें; पण बाळबोध चालू झालें म्हणून तरी हे अधिकारी कामकाजाचे कागदपत्र स्वतःच्या डोळ्यांनीं कितीसे वाचून पहाणार हें दिसतेंच आहे! बहुधा सर्व काम चिटणीस, शिरस्तेदार, हेड क्लार्क हेच करतात. या त्रिवर्गाच्यावर साहेबलोकांचा असणारा विश्वास किंवा त्या अधिकाऱ्यांचें स्वतःचें इमान हाच सर्व कागदी राज्यकारभाराचा आधारस्तंभ म्हणण्यास हरकत नाहीं. बरें, या नेटिव्ह अधिकाऱ्यांचा युरोपियन अधिकाऱ्यांस एखादे वेळीं संशय आलाच, तर एकाचें काम दुसऱ्याकडून तात्पुरतें करून घेतां येण्यासारखें असतें व प्रसंगविशेषीं तसें करून घेतलें जातेंहि. स्वतः साहेबबहादूर अस्सल मराठी कागद आपल्या डोळ्यांनीं वाचणार व स्वारीच्या या वाचनावर न्यायमनसुब्याचें किंवा राज्यकारभाराच्या धोरणाचें पारडें फिरणार, असा प्रसंग म्हणजे तो एक कपिलाषष्ठीचा योगच म्हणावयाचा! पण दुर्दैव हें कीं, असल्या या कपिलाषष्ठीच्या योगाकरितां महाराष्ट्रांतली जुनीपुराणी आणि रोजच्या व्यवहारांतली लिपी खुशाल बुडबावी असा सल्ला देणारे अधिकारी सरकारास मिळतात व त्यांचा सल्ला ऐकण्याची त्यांनाहि बुद्धि होते. एकाच्या सोईकरितां हजारों लाखों लोकांची गैरसोय करणें यांत कांहीं विशेष वाईटपणा आहे असें अधिकाऱ्यांना वाटूंहि नये, याहून त्यांच्या मनस्वितेचा आणखी पुरावा तो कोणता हवा? कित्येक युरोपियन अधिकाऱ्यांना प्रजेशीं वागतांना आत्मौपम्य हें कशाशीं खातात हें देखील माहित नसावेंसें वाटतें, नाहीं तर आम्हीं त्यांस असा

उघड उघड सवाल विचारला असता कीं, "महाराज, सत्तेची गोष्ट सोडून द्या, पण एखाददुसऱ्या, कारकुनाचें मोडी अक्षर वाईट असतें याकरितां मोडी जर रद्द करावयाची तर कित्येक साहेब लोक इंग्रजी अक्षर फार वाईट लिहितात एवढ्याकरितां त्यांना त्यांची प्रचलित लिपी टाकून देऊन कॉपीबॉडांतील अक्षराप्रमाणें किंवा रोमन लिपीप्रमाणें इंग्रजी वर्ण लिहावयास सांगितलें तर तें कसें काय आवडेल ?" पण असा प्रश्न विचारून तो सक्तीनें त्यांजवर अमलांत आणण्याची सत्ता जर आमच्यापाशीं नाहीं, तर तो विचारण्यापासून फायदा काय हें आम्हांस दिसतेंच आहे.

सन १९०८ सालीं मोडी लिपीचा प्रश्न मुंबईसरकारापुढें आला होता; पण तेव्हां तो मोडीचें उच्चाटन करून तिच्या जागीं बाळबोधीची स्थापना करण्याविषयीं नव्हता; तर मोडी लिपीच पण ती अधिक सुबोध व सुवाच्य कशी करितां येईल याविषयीं होता. म्हणजे कागदोपत्रीं मोडी आहे तशी ठेवावयाची हें सरकारनें एखाद्या गृहीतकृत्याप्रमाणें मान्य केलेंच होतें. मात्र कित्येकांनीं सुचविल्याप्रमाणें, मोडी लिहितांना विराम-चिन्हें द्यावीं कीं नाहीं, शब्द तोडून लिहावे कीं नाहीं, आणि ह्रस्व-दीर्घांचा भेद जो हल्लीं मोडींत नाहीं तो कित्येक नवीन चिन्हांच्या योगानें अमलांत आणावा किंवा काय ? इतक्यापुरताच त्या वेळीं प्रश्न होता. ही सूचना हल्लीं न्यायखात्यांत असलेले एक मुनसफ रा० अत्रे, बी. ए. एल्एल्. बी. यांनीं त्या वेळचे शाळाखात्याचे अधिकारी मि० सेल्बी यांच्यामार्फत सरकारापुढें मांडली होती; आणि तिजवरून निघालेल्या सरकारी ठरावांत सामील असलेल्या कागदपत्रांवरून कोणालाहि असेंच दिसून येईल कीं, मोडी नाहींशी करून तिच्या जागीं बाळबोध आणणें ही विलक्षण कल्पना फारच थोड्या युरोपियन लोकांच्याहि डोक्यांत तेव्हां आलेली होती. या कल्पनेचा उगम बराचसा पुण्याचे माजी व साताऱ्याचे वर्तमान जज्ज मि० किंकेड यांजपासून झालेला आहे. पण मि० किंकेडसाहेबां-च्या योग्यतेच्या किंवा त्यांच्याहून अधिक योग्यतेच्या युरोपियन व नेटिव्ह अधिकाऱ्यांचे अभिप्राय जे सदर कागदपत्रांत आहेत त्यांवरून सरकारदरबारीं मोडी बंद पडून बाळबोध सुरू व्हावें असें त्यांपैकीं कोणीहि आपलें मत दिलेलें दिसत नाहीं. मि० सेल्बी यांनीं रा० अत्रे यांचा सूचना-अर्ज मुंबईसरकारकडे

पाठविला हें वर दर्शविलेंच आहे; व तो पाठवितांना मि० सेल्बीसाहेबांनीं असें मत दिलें आहे कीं, "मोडी लिपी ही सरकारी पत्रव्यवहार वगैरे कामकाजाला विशेष सोयीची आहे, इतकेंच नव्हे तर रा० अत्रे यांनीं सुचविल्याप्रमाणें ह्रस्व-दीर्घाच्या खुणा देत बसलें तर जलद लिहितां येणें हा जो त्या लिपीचा सर्वमान्य गुण त्यास कमीपणा येईल. हल्लींची मोडी लिपी वाचतां येण्यास जर कोणास क्वचित् पंचाईत पडत असेल तर एखाद्या लेखकाचें हस्ताक्षरच वाईट असतें म्हणून ! पण लिहिणारा अडाणी किंवा वाईट म्हणून लिपी दुर्बोध होणें हा प्रकार खुद्द इंग्रजी लिपींतहि दृष्टीस पडतोच. तात्पर्य, दोष असेल तर तो एखाद्या लेखकाचा, लिपीचा नव्हे." मि० सेल्बी यांचा युक्तिवाद बरोबर व त्यांचा दाखलाहि समर्पक आहे. इंग्रजी लिपी-देखील सुबोध व दुर्बोध अशा दोन्ही प्रकारांनीं लिहितां येते. उदाहरणार्थ, क्रॉफर्ड, आलिव्हंट, किंकेड, हिल्ल वगैरे गृहस्थांचें उत्कृष्ट हस्ताक्षर पाहिलें म्हणजे मोत्यांच्या सरांची आठवण व्हावी, आणि सेल्बी, कर्टिस, वगैरे गृहस्थांचें हस्ताक्षर पाहून धुळींत कोंबडीं नाचल्यासारखीं वाटावीं हें जें जमीन-अस्मानाचें अंतर त्याचें कारण केवळ व्यक्तिदोष, लिपीचा दोष नव्हे. पण अक्षर वाईट म्हणून मि० सेल्बीसाहेबांस 'तुमचें हस्ताक्षर आम्ही हातांत धरीत नाहीं' असें कोणी कधीं बोलला नाहीं, किंवा 'तुम्हाला अधिक चांगलें लिहितां येत नसेल तर हातचें लिहिणें सोडून द्या व सर्व काम टाइपरायटरवर करा' असेंहि कर्टिस साहेबांस कोणी सांगणार नाहीं. असो.

रा० अत्रे यांची सूचना मि० किंकेडसाहेबांप्रमाणें मि० जॅक्सनसाहेबांकडेहि पाठविण्यांत आली होती; पण त्यांनींहि मोडी काढून टाकावी असें मत दिलें नाहीं. उलट त्यांनीं असें मत दिलें कीं, "शाळांतून हल्लीं मोडी जितकें शिकवितात त्याहून अधिक शिकविलें जावें. बाळबोध फार तर अशा रीतीनें थोडें कमी होईल, पण तें निर्मूल करण्याचें कारण नाहीं !" अर्थात् मुख्य भर मोडीवरच राहील येवढेंच नव्हे तर ह्रस्व-दीर्घ वगैरेच्या खुणा नसल्या तरी मोडी समजण्यास पंचाईत पडणार नाहीं. रा० अत्रे यांची सूचना सुमारें दोन सवादोनशें गृहस्थांकडे पाठविण्यांत आली होती. त्यांपैकीं सुमारें सव्वाशें लोकांनीं त्यांना लेखी अभिप्राय दिले व या सव्वाशें-मध्यें कित्येक युरोपियन गृहस्थहि होते. पण नेटिव्ह काय व युरोपियन

काय, त्यांच्यांत मतभेद झाला तो, अत्रे यांच्या म्हणण्याप्रमाणें फक्त मोडींत ह्रस्व-दीर्घाच्या खुणा असाव्या किंवा नसाव्या एवढ्यापुरताच; मोडी नाहींशी करून तिच्या जागीं बाळबोधीची स्थापना करावी, असें सुचविणारे गृहस्थ किंकेडसाहेबांच्या जोडीला दुसरे फारसे आढळले नाहींत. उलट फॉसेट, वेल्स, फिट्झगिबन, बेथ्याम, फेअरबँक वगैरे युरोपियन गृहस्थांनीं रा० अत्रे यांच्या सूचनेप्रमाणें प्राथमिक शाळांतून बहुतेक लिहिण्याचें काम मोडींतूनच करावें असा अभिप्राय दिला होता. अर्थात् मोडीचा जर उपयोग होऊं नये अशीच कल्पना असेल तर लहानपणीं मोडीची इतकी काळजी घ्यावी व तिच्यावर इतका भर टाकावा असें कोणास वाटेल ? असो.

यापूर्वी तीन वर्षें व्हर्न्याक्युलर टेक्स्टबुक रिव्हिजन कमिटीपुढें हाच प्रश्न निराळ्या रूपानें निघाला होता. त्या वेळींहि कमिटीचे प्रेसिडेंट मि० कॉव्हर्नटन यांनीं असा अभिप्राय दिला होता कीं, " मोडी लिपींत दोष असले तरी नवीन खुणा वगैरेनीं नाहींसे होण्यापेक्षां मोडीचें वळण व पद्धति सुधारल्यानेंच ते दोष निघून जातील. हल्लीं परीक्षांतून वगैरे बाळबोधींत लिहिलें जातें त्याऐवजीं मोडींत लिहिण्याचाच प्रघात अधिक पाडावा म्हणजे काम भागेल." विद्याखात्याचे दुसरे अधिकारी मि० प्रायर यांनींहि १९०७ सालीं असा अभिप्राय दिला होता कीं, " मोडींत ह्रस्व-दीर्घाच्या खुणा नाहींत यामुळें मोडीचा अर्थ कोणाला कळला नाहीं किंवा त्याबद्दल कोणाला शंका आली, असें एकहि उदाहरण माझ्या आठवणींत नाहीं. कोणत्याहि लिपींत फेरबदल व्हावयाचे ते लोकांचे लोकांनींच केले पाहिजेत. त्यांच्यावर ते लादणें चुकीचें आहे." मि०प्रायर असें म्हणतात, पण मि०किंकेड यांचें मत असें दिसतें कीं, एखाद्या लिपींतील कांहीं थोड्या खुणाच काय पण सर्व लिपीच्या लिपीच सरकारदरबारीं अधिकाराच्या जोरावर बुडविण्यास हरकत नाहीं ! हे सर्व युरोपियन अभिप्राय झाले. युरोपियन अधिकाऱ्यांत किंकेडसाहेबांसारखे एक गृहस्थ तरी भेटले. पण या सर्व कागदपत्रांवरून पाहतां मोडी बुडवून बाळबोध चालू करावी, असें म्हणणारा एकहि नेटिव अधिकारी आढळला नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

रा० अत्रे यांनीं सुचविलेला प्रश्न मोडी लिपी 'दुरुस्त' करण्याचा होता; मोडी लिपी 'बुडविण्या'चा नव्हता. पण मि० किंकेड यांनीं मात्र एक

वेगळाच पंथ उपस्थित केला तो असा कीं, रा० अत्रे यांच्या सूचनेप्रमाणें शाळांतून मोडीकडे अधिक लक्ष देण्याचें कारण नाहीं, इतकेंच नव्हे तर सरकारी कागदपत्रांतूनहि यापुढें मोडी न लिहितां बाळबोधच लिहावी. किंकेडसाहेबांचा युक्तिवाद खालील प्रकारचा आहे. 'मोडींत सुधारणा करण्याचें कारण नाहीं, कारण मुळीं मोडीच नको. सार्वत्रिक प्रचार करतां येण्यासारखी एखादी लिपी असेल तर ती बाळबोधच होय. वायव्यप्रांत व मध्यप्रांत यांमध्यें अलीकडे बाळबोध (देवनागरी) लिपीच सुरू करण्यांत आली आहे. गुजराथ, सिंध व कानडा जिल्हा यांतहि बाळबोध सुरू करतां येण्यासारखें आहे. मोडी लिहावयास सोपी आहे; ती एकदोन आठवड्यांत लिहावयास शिकतां येते; पण मोडीवाचन मात्र लवकर येत नाहीं. पुस्तकें, वर्तमानपत्रें, छापखाने यांसंबंधाचें सर्व काम बाळबोधींतच होतें. कॉलेजांतील बरेचसे विद्यार्थी बालबोधींतच पत्रें लिहितात. हल्लीं फर्ग्युसन कॉलेजांतले २१६ विद्यार्थी, सायन्स कॉलेजांतले २४ व डेक्कन कॉलेजांतले ६५ विद्यार्थी मोडींत पत्रें लिहितात, पण त्याच कॉलेजांतील अनुक्रमें ११३, १६, व ३४ विद्यार्थी बाळबोधींत पत्रें लिहिणारे आहेत. बालबोधींत माझ्याशीं पत्रव्यवहार करणारे पुष्कळ गृहस्थ आहेत. माझ्या अनुभवावरून असें वाटतें कीं, बाळबोध लिपी दिवसेंदिवस वाईट होत जात आहे हें खरें नाहीं. कोर्टांतील कामकाजांत माझ्यासमोर बालबोध पत्रें पुष्कळ येतात, त्यांवरूनहि हेंच दिसतें. मोडीपेक्षां बाळबोध लिहिण्यास थोडा वेळ अधिक लागतो, पण मोडी शब्द तोडून कोणी लिहील तर मोडीलाहि बाळबोधीइतकाच वेळ लागेल. मी हल्लीं कांहीं प्रयोग करून पाहात आहें, त्यांजवरून बाळबोध मोडीइतकीच जलद लिहितां येते असें मला वाटतें. म्हणून बाळबोध प्रथम महाराष्ट्रांत सुरू करून मग तिचा फैलाव उत्तर-दक्षिणेकडे करावा. बाळबोध लिपीचे फायदे फार आहेत. हल्लीं शेंकडा पांच इतक्या युरोपियन अधिकाऱ्यांनाहि आपल्या हपिसच्या कामकाजाचे कागद वाचतां येत नाहींत ! यामुळें न वाचतां शेकडों कागदांवर त्यांना सह्या कराव्या लागत आहेत. मला मोडी साधारण बरें वाचतां येतें आणि तें शिकण्याला मला तीन वर्षें लागलीं. अर्थात् प्रत्येक प्रांतांतली नवी लिपी वाचावयास शिकावयाचें तर मला दहा वर्षें लागतील.

या करितां मोडीची तर सुधारणा करूंच नये पण बाळबोधीचा प्रसार मात्र सुरू करावा."

मि० किंकेड यांच्या या युक्तिवादास द्यावयाचें तें उत्तर देऊन या वादांतील आणखी कित्येक किरकोळ गोष्टींचा विचार आम्हांस करावयाचा आहे; पण तें काम पुढील खेपेवर टाकणें भाग आहे.

—२—

मोडी काढून तिच्या जागीं बाळबोध कां घुसडावें याविषयींचा किंकेडसाहेबांचा युक्तिवाद मागील खेपेस आम्हीं दिलाच आहे. त्यावरून कोणासहि हें दिसून येईल कीं, त्यांनीं दाखविलेलीं कित्येक कारणें लटकीं, तर कित्येक कारणें पोकळ व कित्येक निवळ भ्रामक अशीं आहेत. या बाबतींतली त्यांची सर्व स्फूर्ति स्वतःच्या अनुभवापासूनच निघालेली दिसते. "मी एवढा उद्योगी व मराठीचा भोक्ता, असें असतां माझ्यासारख्याला मोडी जलद वाचावयास शिकण्याला जर तीन वर्षें लागतात, तर माझ्याहून आळशी सिव्हिलियनांचें कसें काय होत असेल?" अशा विचारानें साहेबांच्या अंगावर कांटा आल्यासारखा दिसतो. पण ज्याला बाळबोध चांगलें वाचतां येतें त्याला मोडी चांगलें वाचतां येण्यास तीन वर्षें कां लागावीं हें आम्हांस समजत नाहीं. बरें त्यांतूनहि लागलीं तरी त्यांत बावगें तें काय झालें ? बाळबोध, कानडी व गुजराथी अशा तीनहि लिपी शिकण्यास प्रत्येकीं तीन-तीनप्रमाणें फार तर नऊ वर्षांचा अवधि लागेल, असें आपण घेऊन चालूं. पण सिव्हिलियनची एकंदर नोकरी पंचवीस वर्षें होत. त्यांतल्या पहिल्या नऊ वर्षांतील थोडासा खासगी वेळ आपल्या अमलाखालच्या प्रजेची लिपी शिकण्यास व तद्द्वारा तिचें हृद्गत ओळखण्यास खर्ची पडलीं तर त्यांत काय चुकलें ? किंकेडसाहेब मोडी व गुजराथी शिकले ते झालें तरी तीन तीन वर्षें रोज दोन दोन, चार चार तास लिखितें घेऊन वाचीत होते, असें थोडेंच आहे ! सहज फावल्या

* केसरी, तारीख २१ एप्रिल १९१४.

वेळीं थोडेंसें वाचावयाचें; पण मुख्यतः सरकारी कामकाज करीत असतांच थोडीशी हौस बाळगून शिरस्तेदाराकडून कागद वाचविण्याऐवजीं स्वतः हातांत घेऊन थोडयोडें वाचीत गेलें असतां सहज काम भागण्याजोगें आहे. पण केवळ तसें न झालें आणि अवांतर थोडासा वेळ घालवावा लागला म्हणून त्याचा एवढा उपकार कसला? सरकारी कागदपत्रांची आजवर लिपीच जर मोडी होती तर तीसुद्धां साहेबांनीं शिकूं नये कीं काय? मराठी लोक-मामलेदार निदान डेप्युटी कलेक्टर-केव्हां कर्नाटकांत तर केव्हां गुजराथेंत नेमले जातात. त्यांना नसेल का कांहीं अडचण येत? व येत असली तर ते कशी भागवीत असतील? मराठी डेप्युटी कलेक्टराला व युरोपियन असिस्टंट कलेक्टराला किंवा जज्जाला कानडी लिपीची अडचण सारखीच. पण लिपीची तक्रार सांगणारे किंकेडसाहेब जसे एकच, तसे आपल्या जिल्ह्यांतील लिपी वाचण्याची मनापासून खरी हौस बाळगणारेहि किंकेड एकच. बाकीच्यांची हकीकत किंकेडसाहेबांनीं सांगितली तीच खरी; म्हणजे शेंकडा पांचच युरोपियन अधिकारी मोडी कागदपत्र वाचूं शकतात. पण याचा अर्थ बाकीचे पंचाण्णव सर्वच दगड असतात असा नाहीं; किंवा या देवदूतांना कधींहि हस्तगत न होणारी अशी मोडी लिपी ही एक राक्षसी विद्या आहे असेंहि नव्हे. तर याचा अर्थ इतकाच कीं, शेंकडा पंचाण्णव युरोपियन अधिकारी स्वतः मोडी कागद वाचण्याचा मुळीं प्रयत्नच करीत नाहींत. फार काय, पण अक्षर अगदीं सुवाच्य असलें किंवा छापील बाळबोध अर्ज असला तरी किती साहेबलोक आपले कागद हातांत घेऊन स्वतः वाचण्याचा खऱ्या मनानें प्रयत्न करीत असतील हें किंकेडसाहेबांनींच सांगावें! मोडीच्या ऐवजीं बाळबोध सुरू करावयाचाच अवकाश, कीं प्रत्येक साहेब निदान महत्त्वाचे तरी सर्व कागद आपले आपण घेऊन वाचील, अशी जर आम्हांस खात्री पटेल तर आम्ही मोडीचा आग्रह कदाचित् सोडून देऊं! पण तें मुळीं शक्यच नाहीं. म्हणजे चिटणीस किंवा शिरस्तेदार यांना तितकेंच काम पडणार किंवा यांचें तितकेंच प्रस्थ राहणार, आणि बिचाऱ्या कारकुनाला व अर्जदाराला मात्र एकाच्या जागीं दीड तास खर्डे घांसावे लागून आमची जुनीपुराणी मोडी लिपी नष्ट होणार ती होणारच!

माझ्याशीं पत्रव्यवहार करणारे मित्र सुवाच्य बाळबोध लिहितात, अशीं एक कारण किंकेडसाहेब दाखवितात. पण तें या मित्रास मोडी नको म्हणून नाहीं तर किंकेडसाहेबांस मोडी येत नाहीं अशाच समजुतीनें होय. हीशी साहेबास बाळबोधींत लिहिलेलें, पत्र सुवाच्य असल्यास नवल काय? कॉलेजांतील अमुक इतकीं मुलें बाळबोध पत्रें लिहितात यावरून कांहींच ठरत नाहीं; कारण एक तर बहुसंख्या मोडी पत्रें लिहिणारांची, व अल्पसंख्या बाळबोध लिहिणारांची, हें किंकेडसाहेबांनीं दिलेल्या आंकड्यांवरून सिद्ध होतें. शिवाय विद्यार्थ्यांनीं बाळबोधींत लिहिलेलीं पत्रें बरींचशीं आपल्या अशिक्षित आप्त स्त्रियांना किंवा अर्धशिक्षित भावंडांना लिहिलेलीं असतात. कोर्टांत आपल्यापुढें आलेलीं पंधरा वर्षांच्या उमरीच्या एका मुलीचीं बरींचशीं प्रणयपत्रें बाळबोधींत लिहिलीं होतीं. व तीं सुवाच्य होतीं असेंहि एक प्रमाण किंकेडसाहेबांनीं दिलें आहे; तें वाचून तर हंसूंच येतें. कारण एक तर सुशिक्षित मुलींनाहि मोडी फारसें येत नाहीं. शिवाय हीं प्रणयपत्रें काळजीनें व कोरून लिहिलीं असल्यास त्यांत नवल काय? त्यांवरून फार तर त्या मुलीचें शिक्षण किंवा प्रेम यांविषयीं एखाद्या कोर्टानें अनुमान काढणें बरोबर होईल; पण त्यावरून एकंदर बाळबोधलिपीच्या स्थितीविषयीं अनुमान काढणें बरोबर होणार नाहीं. वायव्यप्रांत व मध्यप्रांत यांचा दाखला किंकेडसाहेबांनीं दिला खरा, पण ते त्या बाबतींत सर्वस्वीं घसरले असें आम्हांस वाटतें. वायव्य (आग्रा व औध) प्रांतांत देवनागरी लिपी सुरू केली आहे असें साहेब म्हणतात, पण आपण काय म्हणतों याचा अर्थच त्यांस कळला नसावा. कारण वायव्यप्रांतांत देवनागरी लिपी सुरू केली खरी; पण ती बाळबोध म्हणून नव्हे तर हिंदी म्हणून! वायव्यप्रांतांत पूर्वी मोडी होती ती काढून बाळबोध केली असें नाहीं, तर तेथें पूर्वी उर्दू लिपी चालू होती, पण हिंदी (नागर) लिपीचाल्यांवर उर्दू (मुसलमानी) लिपी लादणें हा फार दिवसांचा अन्याय होत होता तो दुरुस्त झाला इतकेंच काय तें. किंकेडसाहेबांनीं हिंदी-बाळबोध पाहिली आहे; पण हिंदी-मोडी अशी एखादी लिपी असावी असा त्यांचा समज दिसतो, तो मात्र निवळ भ्रम आहे. मध्यप्रांताचें त्यांनीं उदाहरण दिलें, तें मात्र या बाबतींत लागू आहे. पण मोडी काढून बाळबोध सुरू केलें

याचा परिणाम तिकडे चांगला झाला नाहीं, ही गोष्ट त्यांनीं लक्षांत घेतली नाहीं. सन १९०७ सालीं डॉ० भांडारकर यांनीं बाळबोध–मोडीवर जो लेखी अभिप्राय नमूद केला आहे त्यांत त्यांनीं या गोष्टीचा स्पष्ट उल्लेख केला आहे. ते म्हणतात, "कागदपत्रांच्या लिहिण्याला बाळबोध उपयोगी नाहीं, मोडीच हवी. बाळबोध लिहूं लागलें असतां तें हळुहळू दुर्वाच्य होतें. पूर्वी भटभिक्षुकांशिवाय बाळबोध कोणीच लिहीत नव्हतें. अलीकडे नागपूर प्रांतांतील सरकारी कचेऱ्यांतून मोडी काढून बाळबोध सुरू केलें आहे; पण त्याविषयीं तिकडील शाळाखात्यांतील एका पदवीधर मित्रानें मला असें कळविलें आहे कीं, सरकारी कागदपत्रांतलें बाळबोध गिजबिड व हेंगाडें होऊं लागून त्याची सुवाच्यता जात चालली आहे." छापखान्या-संबधीं सर्व कागदपत्र बाळबोधींत तयार होतात, असें किंकेडसाहेब म्हणतात पण तें सर्वांशीं खरें नाहीं. कारण मोडी कॉपी चालविणारे कंपॉझिटर लोक कोठेंहि थोडेबहुत असतातच, पण कंपॉझिटरवर्ग हा प्रायः अशिक्षित असतो; त्याची साक्षरता खरोखरीच अक्षरांची ओळख होण्या-पुरती. अर्थात् त्यांचें उदाहरण कारकुनी पेशाच्या लोकांना लावणें असमंजसपणाचें होय. शिवाय दुसरेंहि एक कारण आहे, तें असें कीं, छापखान्यांत निघणारें काम होईल तितकें शुद्ध असावें लागतें. ह्रस्व, दीर्घ, जोडाक्षरें वगैरेचे सूक्ष्म भेद यांत फारच बारकाईनें पाळावे लागतात, आणि मूळ प्रत मोडींत लिहिली तर कंपॉझिटरलोक इतक्या चुका करून ठेवावयाचे कीं, तसलें घाणेरडें मुद्रित शुद्ध करण्यापेक्षां फिरून सर्वच प्रत लिहून कंपोज करविलेली पुरवेल! छापलेलें काम कायम टिकण्याची अपेक्षा असते. पण सर्वच सरकारी कागदपत्रांची किंमत इतकी असत नाहीं. त्यांत ह्रस्व, दीर्घ, व्याकरणशुद्धता हीं थोडींबहुत कमी असलीं तरी चालतात, व कांहीं कांहीं सरकारी कागदपत्र तर इतक्या अनित्य स्वरूपाचे असतात कीं, सरकार त्यांचा मुद्दाम नाश करितें. तात्पर्य, ऋग्वेदसंहिता छापण्याची प्रत बाळबोधींत लिहितात म्हणून कोंडवाड्याच्या बारनिशीचे धोरणहि बाळबोधींतच लिहावे, असें कोणी म्हणूं लागेल तर त्याचे तोंडास हात कोण लावणार?

राहतां किंकेडसाहेबांनीं दाखविलेलें एक कारण रहातें; तें हें कीं, देव-

नागरी लिपी हीच काय ती एक अशी लिपी आहे कीं, मुंबई इलाख्यांतील सर्व प्रांतांस ती लागू करतां येईल. पण येथेंहि त्यांनीं खोल नजर घुरविलेली दिसत नाहीं. कारण संस्कृत भाषा सर्व देशी पोटभाषांची जननी असली तरी हिंदुस्थानांतील सर्वच संस्कृत ग्रंथ देवनागरी लिपींत लिहिलेले आहेत असें नाहीं. कारण प्रत्येक देशी भाषेच्या लिपींत लिहिलेले असेहि संस्कृत ग्रंथ बरेच आहेत. त्यांतूनहि आज संस्कृत भाषा सर्वत्र प्रचलित करावयाची असा जर प्रश्न असता तर " विनाकारण लिपी मात्र भिन्न कां ठेवितां ? " असें कोणालाहि विचारून अडविण्यांत स्वारस्य होतें. पण प्रस्तुत प्रश्न आहे तो निरनिराळ्या देशी भाषांत होणाऱ्या चालचलाऊ सरकारी व खासगी कागदपत्रांपुरता. शिवाय महाराष्ट्रांत आज बाळबोध व मोडी दोन्ही व्यवहारांत प्रचलित आहेत म्हणून एक काढून तिच्या जागीं दुसरी घालणें यांत आपण विशेष कांहींच करीत नाहीं, असें किंकेडसाहेबांस वाटणें स्वाभाविक आहे. पण सिंध, कर्नाटक, गुजराथ येथें सरकारदरबारचे सर्व कागदपत्र बाळबोधींत सुरू करणें हें काम किती दुष्कर आहे याची त्यांना कल्पनाच नाहीं असें आम्हांस वाटतें. मुंबई इलाखाभर बाळबोध सुरू करूं पाहणारे किंकेडसाहेब राष्ट्रीय भावनेच्या दृष्टीनें खुद्द नागरी-प्रचारणी सभेच्या किंवा-एक-लिपी-विस्तार-परिषदेच्या अत्यंत उत्साही अशा चिटणीसासहि लाज आणतात, असा क्षणभर देखावा दिसतो खरा; पण या देखाव्यानें कोणीहि विचारी मनुष्य फसणें शक्य नाहीं. किंकेडसाहेब परके असतांहि राष्ट्रीयत्वाच्या भावनेंत आम्हांस उदाहरण घालून देण्याची आकांक्षा त्यांनीं धरल्याबद्दल आम्ही साहेबांचे आभारच मानितों. पण बाळबोध लिपी सर्व इलाखाभर सरकार चालू करणार अशी आम्हांस आधीं खात्री पटेल तेव्हां एक वेळ या गोष्टीचा विचार करितां येईल. पण हें उज्ज्वल राष्ट्रकार्य साधण्याच्या ऐवजीं केवळ आळशी साहेब लोकांच्या सोयीकरितां महाराष्ट्राचें मात्र तूर्त नुकसान होणार अशीच उलट आज आमची खात्री असल्यामुळें त्यांच्या या सूचनेस विरोध करणें आम्हांस भाग आहे. दुर्दैव इतकेंच कीं, मुंबईच्या कायदेकौन्सिलांतील आमच्या कित्येक लोकनियुक्त प्रतिनिधींनाहि मोडीचें मर्म न कळल्यामुळें बाळबोधीची तळी उचलून किंकेडसाहेबांना 'राष्ट्रकार्य' करण्यास आपण मदतच करीत आहों.

असा त्यांना भ्रम झालेला दिसतो! आमच्या कित्येक नामदारांना मोडी हा काय पदार्थ आहे हेंच मुळीं माहीत नाहीं. मुलाप्रमाणें त्यांना अक्षरें काढून समजूत करून द्यावी लागते; व समजूत पटली तरी दुसरें कित्येक असें म्हणणारे भेटतात कीं, "तुम्ही राष्ट्रीयत्वाचे भोक्ते म्हणविता आणि बाळबोधीला विरोध करितां?" पण यावर उत्तर हेंच कीं, "होय; एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेंत आम्ही तुम्हांस केव्हांहि तिळभर हार जाणार नाहीं. पण बाळबोध देवनागरी झाली तरी ती तुम्ही आपल्या जिल्ह्यांत खासगी व सरकारी कागदमत्रांतून चालू करण्यास तयार आहां काय?" या प्रश्नाचें उत्तर द्या म्हणजे आमची अडचण तुम्हांस कळून येईल. देवनागरी लिपीचा अभिमान तुम्ही आम्हांस शिकवावयास नको. सुदैवानें महाराष्ट्रांत देवनागरी जितकी प्रचलित आहे तितकी बंगाल, मद्रास, पंजाब या इलाख्यांत किंवा सिंध, कर्नाटक, गुजराथ वगैरे प्रांतांत प्रचलित नाहीं; आणि प्रांताप्रांताच्या किंवा इलाख्या-इलाख्याच्या व्यवहाराचा प्रसंग येईल तेथें आम्ही अर्थात् देवनागरीचाच आग्रह व अभिमान धरूं, मोडीचा आग्रह धरणार नाहीं. पण केवळ महाराष्ट्रांतच—म्हणजे जेथें मोडी व बाळबोध यांची जवळजवळ समव्याप्तिच आहे तेथें-केवळ सरकारी कामकाज व खासगी कागदपत्र यांपुरती त्यांतल्यात्यांत अधिक सोईची म्हणून मोडी लिपीहि फार पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणें घुडेहि चालू राहावी तिच्यावर निरर्थक बहिष्कार घालण्यांत येऊं नये-असें आम्ही आग्रहपूर्वक म्हटलें तर त्यांत वावगें कोणतें? मोडी लिपी जर आपला प्रांत ओलांडून परक्या प्रांतावर स्वारी करूं पहात असेल तर एक गोष्ट निराळी. अहमदाबादच्या कोर्टांतील दप्तर मोडी लिपींत ठेवलें जावें असें जर मोडीच्या अभिमानानें आम्ही म्हणूं तर मग "सर्वांना साधारण अशी बाळबोध-देवनागरी-च असूं द्या" असें एखाद्या लल्लुभाई सामळदासानें म्हणावें; किंवा पार्शी-बाण्यानींहि आपले हिशेब गुजराथींत न ठेवितां मोडींत ठेवावे, असें आम्ही म्हणूं तर सर फेरोजशाह मेथा यांनीं मुंबई बेटाच्या सरहद्दीवर एखादा खंदक खणवून मोडीला प्रतिरोध करावा किंवा त्या खंदकांत मोडीला गाडहि करून टाकावी. एवढेंच नव्हे तर, महाराष्ट्रांतील एखाद्या जिल्ह्यांत जेथें मोडी सरकारी

दप्तरांत पूर्वी चालू नव्हती तेथें ती नवीन चालू करा असेंहि आमचें म्हणणें नाहीं. तसें असतें तरी विरोधांत कांहीं अर्थ होता. किंवा टाइम्सनें म्हटल्याप्रमाणें "मोडी लिपीरूपी शेतकऱ्यांच्या या वैरिणीला व सावकाराच्या मैत्रिणीला स्वेच्छाचाराला नसती नवी जागा करून देऊं नये, हें म्हणणें शोभलें असतें." पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, मोडी ही अनेक शतकांपासून चालत आली आहे. उत्तरेस ग्वाल्हेरीपासून दक्षिणेस हुबळीपर्यंत तिचा प्रसार आहे. मुसलमानांनीं महाराष्ट्रांत अमदानी गाजविली तेव्हां राजाला किंवा प्रजेला मोडीची अडचण झाली नाहीं; पेशवाईत तर सर्वत्र मोडीचा प्रसार होताच. पेशवाईनंतर देखील आज जवळजवळ शंभर वर्षेंपर्यंत सरकारदरबारचें सर्व कामकाज मोडीवर सुरळीत चाललें. आजकर शेंकडों युरोपियन अधिकारी मोडींत अगदीं निष्णात नसले तरी त्यांना तिचा जाच झाला नाहीं. एकहि नेटिव्ह अधिकारी किंवा खासगी गृहस्थ मोडी काढून टाकून बाळबोध सुरू करा असें म्हणत नाहीं. असें असतां केवळ एका किंकेडसाहेबांच्या लहरीखातर—किंवा त्यांच्या मताप्रमाणें सरसहा युरोपियन अधिकाऱ्यांच्या सोईखातर—कलमाच्या एका फटकाऱ्यासरशी मोडीला पदभ्रष्ट करून सरकार जर सक्तीनें बाळबोध पदारूढ करील, तर मग या दांडगाईस सीमाच राहिली नाहीं असें म्हटलें पाहिजे !

विद्यार्थी व सभा*

नवीन परिस्थितींत नवे घोटाळ्याचे प्रश्न उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. आमच्या हल्लींच्या विद्यार्थ्यांनीं सार्वजनिक कामांत किती पडावें व किती पडूं नये हा प्रश्न अशापैकींच एक होय. स्थलपरत्वें निरनिराळ्या प्रांतांत या प्रश्नानें निरनिराळ्या प्रमाणानें उचल खालेली आहे. पंजाब, संयुक्तप्रांत वगैरेमधून या प्रश्नांची चर्चा झालेली फारशी ऐकूं येत नाहीं. पण बंगालच्या फाळणीच्या चळवळीच्या वेळीं बंगाल्यांत या प्रश्नाला इतकें स्वरूप आलें होतें कीं, प्रख्यात रिस्लेसर्क्युलर हें बंगाली विद्यार्थ्यांमुळेंच जन्मास आलें, असें कदाचित् म्हणतां येईल. मद्रास हा अलीकडेच जागा झाला आहे, पण तेथें विद्यार्थ्यांचे संप होण्यापर्यंत मजल गेली आहे. नागपूर प्रांतांत त्याच्याहि पुढें मजल गेलेली असून विद्यार्थ्यांचें वर्तन व प्रांतिक सरकारचें धोरण यांच्या विरोधामुळें चिंता उत्पन्न झाली आहे. आणि मुंबई इलाख्यांत हा प्रश्न अद्यापि उतूं आला नसला तरी शिजत घातला गेला आहे यांत शंका नाहीं.

विद्यार्थ्यांनीं कोणत्या सार्वजनिक कार्यांत किती पडावें याविषयीं सरकार, शिक्षक व पालक या तिघांचीं निरनिराळीं मतें असल्यासारखें दिसतें. सरकारचें मत रिस्लेसर्क्युलरांत स्पष्टपणें नमूद आहेच. पण प्रत्यक्ष व्यवहारांत तें सदर सर्क्युलरापलीकडेहि जाण्याचा प्रयत्न करितें. एकाच वाक्यांत सांगावयाचें तर विद्यार्थ्यांनीं कोणत्याच जाहीर किंवा खाजगी सभेला गेलेलें सरकारास आवडत नाहीं; मग विषय कोणताहि असो, वक्ता कोणीहि असो. कारण कोणता वक्ता कोणत्या विषयाच्या चर्चेंत मुलांच्या कानीं न जावे असे शब्द उच्चारील याचा नेम नाहीं. अशी भीति त्यांना वाटते. शाळा सुटली म्हणजे मुलांनीं खेळण्याकरितां मैदानावर जावें, तेथून घरीं जावें व तेथून शाळेंत यावें, याखेरीज मुलांकरितां असा कोणताहि कार्यक्रम त्यांच्या दृष्टिकक्षेंत येत नाहीं. घरींदेखील विद्यार्थी कोणाशीं काय बोलतात, काय वाचतात याच्यावरहि जर सरकारास नजर किंवा कैद

* आत्मोद्धार, सन १९१८

ठेवितां आली तरीहि ती त्यास हवी आहे. पण घरोघर ठेवण्यास लागणारे इतके गुप्तपोलीस सरकारास कसे ठेवितां येणार ? नाहीं म्हणावयास सरकार या बाबतींत दोन अपवाद मोठ्या खुषीनें पत्करतें. एक असा कीं, सरकारमार्फत भरलेली किंवा सरकारचा अथवा सरकारपक्षीयांचा गौरव करण्याकरितां भरलेली सभा जाहीर असली तरी तिला विद्यार्थ्यांनीं खुशाल जावें. किंबहुना, प्रेक्षकवर्गानें एरवीं सभागृह भरून जाणें शक्य नसेल तर शिक्षकांकडून उत्तेजन देऊन मेंढरांप्रमाणें त्यांना सभागृहांत खुशाल वळवून न्यावें व मग तेथें त्यांनीं टाळ्या वाजविल्या, पायांचा खडखडाट केला, किंवा 'हिप हिप हुरे' म्हणत डोकीच्या टोप्या वर फेंकल्या तरी चालतील. दुसरा अपवाद म्हटला म्हणजे अधिकाऱ्यांनीं शाळांतून वगैरे जाऊन प्रचलित राजकारणांत तोंड घालून वाटतील ते एकांगी विचार विद्यार्थ्यांना ऐकविणें हा होय. अशा ठिकाणीं अधिकारी समाजांतील कोणाहि प्रतिष्ठित मनुष्याची उघड किंवा प्रच्छन्नपणें वाटेल तितकी निर्भर्त्सना करोत व त्यांच्या शिक्षकांसुद्धां सर्व समाजाला मान्य असलेल्या सिद्धान्तांविरुद्ध कितीहि टाकून बोलोत; ती कांहीं राजकारणी चर्चा होत नाहीं. मग तिच्यांत जिवंत राजकारण कितीहि खच्चून भरलेलें असो. या सर्वांचा अर्थ उघडच असा होतो कीं, विद्यार्थ्यांच्या कानांवर राजकीय विचार जाऊन त्यांचें शुद्ध कोवळं मन दूषित होऊं नये, अशी कांहीं सरकारची खरोखर इच्छा नाहीं; तर सरकारास अप्रिय, नावडते असे तेवढे विचार त्यांच्या कानांवर जाऊं नयेत. अर्थात् सरकारची दृष्टि शुद्ध तत्त्वाची नाहीं, तर केवळ आपमतलबीपणाची आहे. शिक्षण हें मोठ्या खर्चाचे काम आहे; लोकांना स्वतंत्र शाळा घालून चालवितां येत नाहींत; व पैशाच्या दृष्टीनें त्या स्वावलंबी होऊं शकल्या तरी परीक्षा, पदव्या, नोकऱ्या यांच्या मार्गानें त्यांना सर्वस्वीं सरकारावर अवलंबून रहाणेंच प्राप्त आहे—या एका गोष्टीचा सरकार निष्ठुरपणानें फायदा घेतें, व शिस्तीच्या नांवावर विद्यार्थ्यांना विशिष्ट प्रकारच्या राजकीय विचारांचे गुलाम बनवूं पहातें.

शिक्षकवर्गाची [illegible] या बाबतींत सरकारच्याइतकी पुढें जात नाहीं. खुद्द सरकारी इतर [illegible] एक घेतले तरी त्यांची खाजगी राजकीय मतें सर्वस्वीं वर कोणीं वा दृष्टीनें [illegible] असणें शक्य नाहीं. तथापि नोकरीच्या

बंधनामुळें त्यांना खाजगी मतें बाजूस ठेवून सरकारच्या हुकुमाची अंमलबजावणी करावी लागते. किंबहुना स्वतःचें नुकसान न व्हावें, म्हणून क्वचित् वरिष्ठ शाळाधिकारी ज्या सभांना विद्यार्थ्यांना एक वेळ धाडतील अशा सभांनाहि जाण्याला ते प्रतिबंध करितात. या सावधपणाच्या बाबतींत स्वतः सरकार एक हात उडी मारण्यास तयार असेल, तर सरकारी शाळामास्तर चार हात उडी मारण्यास तयार असतात. खासगी शाळामास्तर या बाबतींत अधिक स्वतंत्र असे दिसतात व थोडेबहुत तसे असतातहि; पण सरकारकडून द्रव्याची मदत घेतल्याशिवाय चालणाऱ्या शाळा फार थोड्या; सरकारी मदत घेतात त्यांच्या अधिकाऱ्यांना नाइलाजानें फार जपून वागावें लागतें. सरकारी शाळा-मास्तराच्या हातून चूक झाली असतां ती फार तर त्याची त्याला भोंवेल. पण मदत घेणाऱ्या शाळेंतील शिक्षकाची चूक झाली तर तिचें प्रायश्चित्त व्यक्तिशः त्यालाच न मिळतां संस्थेलाहि मिळतें. म्हणून संस्थेच्या ओढीनें त्याला विशेष सावधगिरी ठेवावी लागते. केवळ अशा विचारानेंच आपल्या विद्यार्थ्यांना पण, कोणत्याहि जाहीर सभेस जाण्याची सरसकट बंदी हे खाजगी शाळेंतील शिक्षक करतील तर त्यांच्या-संबंधानें गैरसमज होणार नाहीं. कारण शाळेच्या मुख्य उद्देशाकडे लक्ष देऊन व बोलूनचालून आपल्या परावलंबी स्थितीचा कमीपणा पदरांत घेऊन ते सरळ बुद्धीनें वागतात, असा त्यांच्या वर्तनाचा अर्थ होऊं शकेल. पण कांहीं शाळांचे शिक्षक असें दुटप्पी धोरण ठेवितात कीं, इकडे सरकारच्या हुकुमाप्रमाणें सर्वस्वीं चालावयाचें नाहीं आणि इकडे विद्यार्थ्यांस सर्वस्वीं मोकळीकहि द्यावयाची नाहीं. तर आपल्या पक्षाची सभा असल्यास, मग ती उघड उघड राजकीय चर्चेविषयीं कां असेना, तिला विद्यार्थ्यांना जाऊं द्यावयाचें, एवढेंच नव्हे तर हांकूनहि न्यावयाचें! उदाहरणार्थ, एकाद्या कॉलेजच्या लाईफमेंबर लोकांना विशिष्ट प्रकारची राजकीय चळवळ करण्याची मोकळीक असली पण इतर शिक्षकांना ती नसली, तरी अशा लाईफमेंबर लोकांनीं आपल्या पक्षाच्या अभिमानानें भरविलेल्या सभेस त्यांच्या कॉलेजला जोडून असलेल्या शाळांतील इतर शिक्षक आणि मुलेंहि आलीं तरी त्यांना चालतात. लाईफमेंबर स्वतः [illegible] कितीहि वाहात बोलले तरी तें ऐकून मात्र मुलांची शिस्त मांड्या दृष्टीनें बिघडत

नाहीं. पण प्रतिपक्षीयांनीं भरविलेली सभा असली म्हणजे मग ती कोणत्याहि विषयाची असो किंवा तेथें वक्ते कितीहि सौभ्य भाषणें करोत, त्यांची शिस्त हटकून बिघडते. तात्पर्य, तेथेंहि शुद्ध तत्त्वांचा अवलंब दिसत नाहीं, तर केवळ पक्षभेदाचा दिसतो.

विद्यार्थ्यांसंबंधानें तिसरेहि एक अधिकारी आहेत व ते पालनकर्ते होत. हेहि आपआपल्या परीनें विवक्षित सभांना मुलांना जाऊं देतात अगर जाऊं देत नाहींत. सरकार किंवा शिक्षक यांच्याप्रमाणें त्यांच्याहि ठिकाणीं पक्षभेद संभवतो. पुष्कळ वेळां पालकांना मुलें कोणत्या सभेला गेलीं अगर न गेलीं याचा विधिनिषेध नसतो व इतर रीतीनें मुलें बेशिस्त वागत नसलीं म्हणजे सभांना जाणें अगर न जाणें हें ते मुलावरच सोंपवितात. याचा प्रायः असा परिणाम होतो कीं, बहुतेक मुलें राजकीय सभांना जातात व पालकांकडून या कामीं त्यांना प्रतिबंध होत नाहीं. क्वचित् एखादा सरकारी नोकर आपल्या मुलांना राजकीय सभांना जाण्यास प्रतिबंध करितो; पण प्रायः सभांना न जाण्याची स्वतःवर येणारी आपत्ति ते मुलांवर सहसा आणीत नाहींत. एखादा पालक पक्षाभिनिविष्ट असला तर मात्र तो पक्षाभिमानामुळें आपल्या मुलास विवक्षित राजकीय सभांना जाऊं देत नाहीं, इतकेंच.

अशा रीतीनें मुलांची सभांन जाण्यासंबंधाची शिस्त या तीन निरनिराळ्या अधिकाऱ्यांमध्यें वांटली गेलेली आहे. या तिघांनाहि जी सभा संमत असेल त्याविषयीं वादच नाहीं; पण जेथें मतविरोध उत्पन्न होतो तेथें कोणाचा अधिकार चालावा, हा बिकट प्रश्न उभा राहातो. या प्रश्नाचें एकच उत्तर एकाच वाक्यांत देणें शक्य नाहीं. तथापि तें द्यावयाचेंच तर असेंच दिलें पाहिजे कीं, या बाबतींत सर्वांत श्रेष्ठ अधिकार पालकांनाच आहे. सरकार शाळा घालतें व त्यांवर खर्च करतें. म्हणून त्यांना अमुक सभांना मुलांनीं जावें व अमक्यांना जाऊं नये असा निर्बंध घालण्याचा निर्णयात्मक अधिकार असावा असें सकृद्दर्शनीं भासतें. पण वास्तविक सरकारचा पैसा हा लोकांचा म्हणजे पालकवर्गाचाच होय. त्या पैशाचा उपयोग अमुक रीतीनें व्हावा अगर अमुक रीतीनें होऊ नये हें म्हणण्याचा अधिकार इतर सरकारी खर्चाच्या बाबींप्रमाणें लोकानाच असला पाहिजे. मात्र कोणीं असें म्हणेल की, सरकारी खर्चाच्या इतर बाबींत शाळें तरी

अमुक असें असावें, अमुक तसें असूं नये असें लोक म्हणतात, पण त्यांच्या म्हणण्याप्रमाणें सरकार वागतें कोठें ? तसेंच शिक्षणाच्या खर्चाच्या बाबतींतहि होणार, व हें म्हणणें कांहीं खोटें नाहीं. निर्णयात्मक अधिकार सरकारच्या हातीं आहे हें आम्ही घेऊनच चालतों. जोंपर्यंत लोकांच्या हातीं हा निर्णयात्मक अधिकार आला नाहीं तोंपर्यंत सरकार आपला हट्ट चालविणारच, व जोंपर्यंत इतर रीतीनें लोकांना आपल्या स्वतंत्र शाळा काढतां येत नाहींत तोंपर्यंत सरकारचा हा हट्ट लोकांना मान्य करावाच लागणार. सरकारचा हुकूम अन्यायाचा आहे एवढें फार तर ते म्हणतील; पण केवळ मुलांना विवक्षित सभांना जाण्यास मोकळीक असावी या तत्त्वाकरितां मुलांचें शिक्षण मध्येंच संपवून, म्हणजे त्यांच्या भावी चरित्रक्रमाची नासाडी करून, मुलं घरीं बसवून घेईल असा पालक मिळणें शक्य नाहीं. राजकीय अधिकार हातीं नसल्यामुळें इतर अन्याय पालकांना नागरिक या नात्यानें सोसावे लागतात त्यांतच आणखी हा एक, असें म्हणून सरकारचा हट्ट पुरवूं देणें त्यांना प्राप्त आहे. पण हा हट्ट निमूटपणें पुरवूं द्यावयाचा किंवा त्यासंबधीं निषेध करीत राहावयाचें ? तक्रार करीत बसावयाचें कीं नाहीं ? हाच मुख्य प्रश्न आहे. व त्याचें उत्तर अस्तिपक्षीं सर्व प्रांतांतील पालक हळुहळू देऊं लागले आहेत.

आजकालची शिक्षणपद्धतिच अशी होऊन राहिली आहे कीं, शिक्षक व विद्यार्थी यांचा संबंध शाळेच्या ठराविक तासांखेरीज इतर येऊंच शकत नाहीं. शिक्षक भाडोत्री, शिक्षण भाडोत्री असें झाल्यावर पूर्वीचे गुरुशिष्यांचे निकटपणाचे व प्रेमळपणाचे संबंध आतां कसे राहणार ? व सरकार विद्यार्थ्यांना जी शिस्त ठेवूं पाहणार ती अशाच शिक्षकांच्या मार्फत. बाजारांत जाऊन पैसा टाकून जिन्नस विकत आणावा असलें व्यवहाराचें किंवा सवद्याचें रूप शिक्षणाला आलें आहे. शिवाय शिक्षण संपल्यावर विद्यार्थ्यांचें काय होणार किंवा काय व्हावें याची काळजी सरकारला जर अप्रत्यक्ष असली तर पालकांना ती प्रत्यक्ष असते. म्हणून शाळेंतील वेळापुरती शिस्त सरकार व त्यांचे प्रतिनिधि शिक्षक यांनीं ठेवावी आणि इतर वेळांतील शिस्त पालकांनीं ठेवावी, अशीच वांटणी स्वाभाविक होते, व ती योग्यहि आहे. शिक्षकांनीं तर या बाबतींत जो सरकारी हुकूम असेल

त्याचा वाटेल तर अंमल करावा आणि त्यांनीं तो निमूटपणें केल्यास त्यांस कोणीं दोषहि ठेवणार नाहीं. लोकांच्या हातीं सत्ता नसल्यामुळें परतंत्रपणाची जी स्थिति पालकांची तीच शिक्षकांची. वरिष्ठ शिक्षणापर्यंतच्या स्वतंत्र शाळा काढतां येत नाहींत म्हणून पालकांनीं वाटेल त्या सरकारी सर्क्युलरास मान लवविली पाहिजे; व सरकारी मदतीशिवाय आपली शाळा चालू शकत नाहीं किंवा शिक्षणखात्याकडून तिला मान्यता मिळूं शकणार नाहीं या भीतीमुळें शिक्षकांनींहि अशा सर्क्युलरला मान लवविली पाहिजे. म्हणजे पालक व शिक्षक दोघेहि या बाबतींत समदुःखी आहेत. पण शिक्षक व पालक यांच्यामध्यें वाद उत्पन्न होतो तो अशाच ठिकाणीं कीं, सरकारी हुकुमाचा प्रतिबंध नसतां किंवा 'होय नाहीं' म्हणण्याचा अधिकार शिक्षकांवर सोंपविला असतां पालकांना संमत असलेल्या अशाहि सभांना शिक्षक आपल्या पक्षाभिनिवेशामुळें विद्यार्थ्यांना सभेस जाऊं देत नाहींत. पण जो न्याय सरकार व पालक यांच्या दरम्यान लागू, तोच शिक्षक व पालक यांच्या दरम्यानहि लागू असला पाहिजे. कारण आपल्या मुलाचा पुढील आयुष्यक्रम कसा व्हावा किंवा त्यानें कोणत्या मताचा अभिमान अधिक धरावा हें ठरविण्याचा अधिकार पालकांनाच असला पाहिजे. जेथें विद्यार्थ्याला पालक नसल्यामुळें पालकत्वाचा अधिकार शिक्षकांकडे दुय्यमपणानें येतो तेथें गोष्ट वेगळी. पण पालक पायावर उभा असतां त्याच्या मुलाची शिस्त—अर्थात् शाळेबाहेरील शिस्त—लावण्याचा अधिकार शिक्षकांनीं कां मागावा हें समजत नाहीं. अमुक सभा राजकीय असली तरी ती तात्त्विक चर्चेच्या स्वरूपाची आहे, व अमुक सभा मतप्रदर्शक किंवा चळवळीच्या स्वरूपाची आहे हें आपण ठरवूं पाहाणें म्हणजे शिक्षकांनीं अधिकाराचा अतिक्रम करणें होय. व या अतिक्रमाच्या मागें जेव्हां पक्षाभिमानाची भूमिका असते तेव्हां तर वरील प्रकारची निवडानिवड करण्यानें या अतिक्रमाच्या दोषांत भरच पडते.

वरील चर्चा ही अर्थात् विद्यार्थ्यांना शिस्त लावण्यास हक्क सांगणाऱ्या तीन पक्षांच्या अधिकाराच्या बलाबलांसंबंधापुरतीच आहे. हें बलाबल ठरवितांना विद्यार्थी कोणत्याहि सभेस गेले असतां तेथें त्यांनीं कसें वागावें याचा विचार करण्यांत आला नाहीं. तो विचार अर्थात् स्वतंत्र आहे, व

त्याविषयींहि एकदोन शब्द लिहिणें प्राप्त आहे. विद्यार्थ्यांनीं वाटेल त्या जाहीर सभेस जावें असें जरी आम्हांस वाटतें, तरी येथें गेल्यावर त्यांनीं केवळ साक्षीभूतपणानें व तटस्थवृत्तीनें वागावें याविषयीं कोणाचाहि मतभेद असेल असें आम्हांस वाटत नाहीं. वास्तविक जाहीर सभा या प्रायः मत-प्रदर्शक असल्या, व त्यांतील ठराव अध्यक्ष अनुकूल व प्रतिकूल मतें विचारून मगच मंजूर करितात असा प्रघात असला तरी तो केवळ सर्व औपचारिक प्रकार असतो. जाहीर सभांपुढें आणलेला ठराव बहुमतानें नामंजूर झाला किंवा दुमत होऊन नुसत्या बहुमतानें मंजूर झाला असें उदाहरण सहसा कोणीं पाहिलें अगर ऐकलेंहि नसेल. याचा अर्थच हा कीं, अशा सभांतून वस्तुतः व्यक्तिशः मतें घेण्याचीं नसतात; तर केवळ सामुदायिक पसंती अगर नापसंती विचारावयाची असते. व अशा सामुदायिक पसंतींत अगर नापसंतींत इतर सभासदांबरोबर हजर असलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश झाला, तरी विद्यार्थ्यांनीं मतें दिलीं व सभेच्या कामांत त्यांनीं भाग उचलला असें म्हणणें सारासार विचारास सोडून आहे. निमंत्रित किंवा निवडलेल्या प्रतिनिधींच्या सभा असतात त्या जाहीर सभांहून वेगळ्या असतात. अशा सभांना विद्यार्थ्यांना प्रतिनिधि म्हणून कोणीं घेत नाहींत, व अशा सभांत विद्यार्थीहि प्रतिनिधि म्हणून जात नाहींत. तात्पर्य, व्याख्यानाच्या जाहीर सभा, किंवा सर्वसंमत ठराव मंजूर करण्याच्या जाहीर सभा अशांना विद्यार्थी गेले तर ते केवळ तेथें काय चालतें व भाषणें काय होतात हें पाहण्याकरितांच जातात. घरीं अगर लायब्ररींतून वर्तमानपत्रें वाचणें किंवा वडील माणसें, स्नेहीसोबती यांच्यांतील चर्चा ऐकणें हीं जशीं सार्वजनिक विषयांचें ज्ञान त्यांना होण्याचीं सुलभ साधनें आहेत तशांतलेंच जाहीर सभा हेंहि एक साधन आहे. व पहिल्या दोन गोष्टींना जोंपर्यंत प्रतिबंध केला जात नाहीं, तोंपर्यंत जाहीर सभांना जाण्याला प्रतिबंध करण्यापासून तरी काय फायदा? जाहीर सभांतून विद्यार्थी मत देऊन प्रौढ नागरिकांचे हक्क अकालीं बजावतात हा बाऊ अशा रीतीनें खोटा ठरल्यावर, सभांतून विद्यार्थी इतर कोणत्याहि रीतीनें अप्रशस्त वर्तन करितात कीं काय एवढेंच पाहाणें उरलें. व सभांतून चाललेला प्रकार केवळ साक्षीभूतपणानें पाहाण्याशिवाय विद्यार्थ्यांनीं इतर कांहीं करूं नये

असें आमचें मत वर दर्शविलेंच आहे. सभेंत गोंगाट करणें किंवा वक्त्याला बोलूं न देणें या गोष्टी प्रौढ सभासदानें केल्या तरी गर्हणीयच होत. मग त्या विद्यार्थ्यांनीं केल्या तर अधिकच गर्हणीय होत यांत शंका कसली ? आणि ही चूक किंवा हा अपराध करणाऱ्या विद्यार्थ्यांस शासन होणें जरूर आहे. मग तें सभापति करो, किंवा पालक करो किंवा या दोहोंनींहि न केलें तर शिक्षकहि करो. पण सभेंत गैरशिस्त वर्तन केल्याचा गुन्हा व केवळ सभेस गेल्याचा गुन्हा हे दोन्हीहि एकाच स्वरूपाचे मानले जाऊं नयेत. आतां विद्यार्थ्यांचा भरणा सभेंत पुष्कळ असतो व या अर्थानें सभा प्रौढ सभासदांच्या हातांत न राहतां विद्यार्थ्यांच्या हातांत जाते असेंहि एक म्हणणें आहे. पण ती तशी गेली तरी विद्यार्थी खरोखर काय करतात हें पाहिलें पाहिजे. विद्यार्थी आनंददर्शक किंवा संमतिदर्शक अशा टाळ्या प्रौढ सभासदांपेक्षां मोठ्यानें वाजवितात, किंवा क्वचित् एखाद्या वक्त्याचें भाषणच ऐकूं येत नसेल तर प्रौढ सभासद जेवढी गंभीरता ठेवितील तितकी विद्यार्थी ठेवीत नाहींत, हें खरें आहे. पण अमुक मत पसंत व अमुक नापसंत एवढ्याचकरितां विद्यार्थ्यांनीं वक्त्यास खालीं बसावयास लाविलें असें सहसा पाहण्यांत येत नाहीं. विद्यार्थ्यांची संख्या सभांतून कमी यावी असें वाटल्यास तिकिटें लावून सभा भरविण्याचा प्रघात हळुहळू पाडतां येणें शक्य आहे. व असें झाल्यास अल्पवयी मुलें आपोआपच गळतील. पण विद्यार्थ्यांना कोणत्याहि सभेस जाण्याला हरकत नाहीं, हें तत्त्व एकदां मान्य झालें म्हणजे असल्या बारीकसारीक सुधारणा करण्यास कोणी ना म्हणणार नाहीं.

हातकामाचें शिक्षण*

(एक शिक्षणविषयक सुधारणा)

अलीकडे सरकारानें योजिलेल्या कित्येक शिक्षणविषयक सुधारणांपैकीं हातकामाचें शिक्षण ही एक असून, दुय्यम प्रतीच्या सरकारी शाळांमधून मुलांस हातकाम शिकविण्याची तजवीज लवकरच अमलांत येणार आहे. हातकाम याचा अर्थ विशेष स्पष्ट करून सांगण्याची फारशी आवश्यकता नाहीं. आजकाल ड्रॉइंग हें दुय्यमप्रतीच्या शाळांमधून व इतरत्रहि कायमचें शिरून राहिलें असल्याचें महशूरच आहे. हातकाम ही ड्रॉइंगच्याच दिशेनें पण त्याच्या पुढची पायरी आहे. शाळेंतून ड्रॉइंग शिकविलें जातें तें अर्थातच थोडें शिकविलें जातें. मुंबई आर्टस्कूलमार्फत घेतल्या जाणाऱ्या ड्रॉइंगच्या 'ग्रेड'च्या परीक्षांस बसतां येण्याइतकें तें नसतें, व त्या परीक्षांस बसूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला वेगळी तयारी करावी लागते. पण जें थोडें ड्रॉइंगचें शिक्षण दिलें जातें त्याचा हेतु इतकाच असतो कीं, विद्यार्थ्याचा त्या विषयांत प्रवेश व्हावा, इतर विषयांप्रमाणें याहि विषयाची त्यास गोडी लागावी, व जर कदाचित् एखाद्या विद्यार्थ्याच्या अंगीं ड्रॉइंगच्या विद्येंत प्रवीण किंवा निष्णात होण्याची उपजत पात्रता असेल तर तिला कार्यक्षेत्र मिळावें. हायस्कुलांतून मिळणाऱ्या तुटपुंजी ड्रॉइंगच्या ज्ञानानें जशी कोणास 'ग्रेड'ची परीक्षा पास होतां येत नाहीं, त्याचप्रमाणें तीनाहि ग्रेड पास झालेल्या विद्यार्थ्यास झालें तरी खरी चित्रकला कोठें येतें ? चित्रकलाच काय पण शिल्पचिताऱ्याचें किंवा ड्राफ्ट्समनचें काम करावयाचें असेल तरी थर्डग्रेडवाल्या विद्यार्थ्यास त्या विषयाचें स्वतंत्र शिक्षण घ्यावेंच लागतें. सांगण्याचा मुद्दा हाच कीं, हायस्कूलच्या शिक्षणाचा हेतु निरनिराळ्या विषयांच्या मूलतत्त्वांची व त्याच्या सामान्य स्वरूपाची नुसती ओळख करून देण्याचा असतो; आणि ड्रॉइंगच्या बरोबरीनें हातकामाचें शिक्षण देण्याचा शाळाखात्याचा जो विचार आहे तो झाला तरी याच दृष्टीनें. ड्रॉइंग शिकल्यानें

---

* लोकशिक्षण, सन १९१५

एखाद्या वस्तूचें प्रत्यक्ष पाहून किंवा स्मरणानें रेखाचित्र काढतां येतें. पण वस्तूचें असें चित्र रेखाटतां येणें व ती वस्तूच हातानें बनवितां येणें या दोन गोष्टी अर्थातच भिन्न आहेत. ड्रॉइंगच्या साहाय्यानें चित्र काढतां आल्यास मनानें कल्पिलेल्या वस्तूला मूर्तस्वरूप देण्याच्या मार्गातील एक मजल गांठली हें खरें. पण मनांतील कल्पना कागदावर आल्यानें ती पाहण्यादाखविण्यासारखी किंवा समजून सांगण्यासारखी झाली, तरी तिचें अमूर्तत्व विशेषतः व्यवहाराशक्यता तितकीच कायम राहिली. कागदावर रेखांनीं काढलेल्या गाडींत बसतां येत नाहीं. इतकेंच नव्हे, तर चित्रांतील गाडी एकाच पातळींत काढलेली असल्यामुळें तिची जाडी, खोली, तसेंच तिचें घटकद्रव्य वगैरे चित्रांत अदृश्य राहणाऱ्या गोष्टी अमूर्त राहतातच. ड्रॉइंगच्या साहाय्यानें कल्पनागत वस्तूची माया किंवा आभास उत्पन्न करितां येतो. पण मायेनें किंवा आभासानें प्रत्यक्ष अनुभवाची बरोबरी कशी करवेल? म्हणून शिक्षणक्रमांत ज्या कारणाकरितां ड्रॉइंगचा समावेश करण्यांत येतो त्याचकरितां हातकामाच्या शिक्षणाचाहि समावेश करणें सयुक्तिक आहे हें कोणासहि कबूल करावें लागेल.

'शिक्षण' या शब्दाचा अर्थ मनुष्याच्या अंगीं असलेल्या गुणांचा किंवा शक्तींचा विकास होण्यास लागणारी पूर्वतयारी असा जर मानला, तर ज्या शिक्षणक्रमांत हाताकडून शिक्षणात्मक असें कांहींच काम करवून घेतलें जात नाहीं, तो सदोष ठरलाच पाहिजे. हातांत पुस्तक धरणें, किंवा पाटीवर आंकडे मोडणें, अथवा मजकूर लिहिणें याला हातकाम म्हणतां येत नाहीं. हातकाम म्हणजे जीवनोपयोगी अशा कलासंबंधी काम. पंचेंद्रियांकडून ज्ञान मिळविणें ही जशी एक शक्ति आहे त्याचप्रमाणें मिळालेले ज्ञान व्यक्त करणें हीहि एक शक्तीच आहे. लेख व भाषण हीं ज्ञान व्यक्त करण्याचीं साधनें आहेतच; परंतु हात हेंहि एक त्याच प्रकारचें साधन आहे. ही गोष्ट आजवरच्या शिक्षणक्रमांत गणिली जात नसे. शब्द व लेख यांनीं जी समजूत पडत नाहीं ती रेखाचित्र काढल्यानें अधिक पडते, ही गोष्ट सचित्र शिक्षणविषयक पुस्तकें व व्यापारी क्याटलॉग यांजवरून दिसून येते. आणि जी समजूत चित्रानेंहि पडत नाहीं ती वस्तूच्या अल्पप्रमाणावर कां होईना पण मूर्तस्वरूपाच्या नमुन्यानें पडते

ही गोष्ट प्रयोगशाळा, पदार्थसंग्रहालयें यांतून मांडलेल्या प्रतिमांवरून आणि यंत्रें वगैरेंच्या दुकानांत ठेवलेल्या नमुन्यांवरून उघड होते. म्हणून कोणतीहि इष्ट वस्तु निर्माण करण्याच्या धंद्याच्या हेतूनें नसेना कां, पण त्या वस्तूचें ज्ञान म्हणजे त्या वस्तूबद्दलची मनांतील कल्पना व्यक्त करण्याची शक्ति वाढविण्याच्या हेतूनें तरी सर्वसाधारण शिक्षणाच्या शाळांतून हातकामाचें शिक्षण देणें जरूर आहे. प्रत्यक्ष धंदा म्हटला म्हणजे तेथें अर्थातच निष्णातपणाची, प्राविण्याची, पूर्णज्ञानाची अपेक्षा आली, व इतक्या उच्च कोटीचें ज्ञान मिळण्यास स्वतंत्र धंदेशिक्षणाच्या शाळेंतच कोणासहि जावयास पाहिजे हें उघड आहे. पण लेखन किंवा भाषण यांचें अशा उच्च कोटीस पोंचलेलें ज्ञान तरी शाळांतून कोठें मिळतें? त्याचींहि मूलतत्त्वेंच काय तीं शाळेंत शिकविलीं जातात. प्रश्न इतकाच कीं, जीभ ही अर्थ व्यक्त करण्याचें एक साधन म्हणून मानली जाते, तसा हातहि कां मानला जाऊ नये? खरें म्हटलें असतां हाताचें तर या दृष्टीनें फारच महत्त्व आहे. हात हा स्पर्शेंद्रियाच्या अवयवांतिल प्रधान अवयव होय. कान, डोळे यांचें मुखत्यारपत्र हातास दिल्याशिवाय तर चालत नाहींच, पण वर दर्शविल्याप्रमाणें, जिव्हा व मन यांचेंहि काम पुष्कळ वेळां हातास मुखत्यारपत्र दिल्याखेरीज तडीस जात नाहीं.

शिक्षणाचा खरा, शास्त्रोक्त व उपपत्तिसिद्ध मार्ग म्हटला म्हणजे मनाची प्रत्यक्ष वस्तूशीं गांठ घालून देणें हा होय. ज्या गोष्टी मुलांस कित्येक व्याख्यानें देऊनहि कदाचित् समजणार नाहींत त्या त्यांस प्रत्यक्ष वस्तुदर्शनानें तेव्हांच समजतात. उदाहरणार्थ, ग्रहणाची कल्पना वस्तुसाहाय्यावांचून मुलांस समजावून देणें किती तरी कठिण आहे! पण वस्तूंच्या साहाय्यानें कां होईना, शिक्षकानें मुलास दुरून समजावून दिलेली गोष्ट जर मुलाच्या मनावर एकपट बिंबेल तर तीच गोष्ट, मुलानें स्वतः आपल्या हातानें करून तिचा अनुभव पाहिला असतां दसपट अधिक बिंबेल. ज्ञान जसें हातानें गोष्ट घडल्यानें डोक्यांत शिरतें तसें तें कानांतून किंवा डोळ्यांतून शिरत नाहीं. व जी गोष्ट ज्ञानार्जनाची तीच ज्ञान व्यक्त करण्याची. ज्ञानार्जनासंबंधानें अलीकडे किंडरगार्टन पद्धति अमलांत आलेलीच आहे. ज्ञान व्यक्त करण्यासंबंधानें ड्रॉइंगचा प्रघात पडला आहे तसाच तो हात-

कामाचाहि पडणें जरूर होतें. हात हा मनाचा जसा मदतगार आहे चूक काढणारा टीकाकारहि आहे. मनांतील कल्पना व्यक्त करतांना तसाच तोंडानें केलेल्या गडबडगुंड्यांत गुरफटून राहिलेली चूक सहसा लक्षांत येत नाहीं. पण तीच कल्पना हातानें व्यक्त करूं लागलें असतां झालेली चूक करणाराच्याहि लक्षांत चटकन् येते; मग पाहणाराच्या येईल तर नवल नाहीं. भूमितीचे सिद्धांत सत्य आहेत अशी मनाची खात्री असते खरी; व पूर्वीच्या भूमितिशिक्षणाच्या पद्धतींत त्या सत्यप्रमेयांचा उच्चार अनेक वेळां होऊन जाई. पण हल्लींच्या नव्या पद्धतींत मुलानें सिद्धांतकृत्य कंपासपट्टीच्या साहाय्यानें हातानें केल्यामुळें त्या सिद्धांतकृत्याच्या सत्यप्रतीतीचा जो आनंद त्याला लाभतो तो पूर्वीच्या पद्धतींत खास मिळत नसला पाहिजे.

पण केवळ एखादा गूढ विषय अधिक सुलभ रीतीनें शिकण्याकरितांच विद्यार्थ्याकडून हाताचा उपयोग करविला पाहिजे, एवढेंच नव्हे; तर शक्य असल्यास व शक्य असेल तेथपर्यंत जीवनोपयोगी अशा कलांचें ज्ञान मुलांस त्यांच्या अल्पवयांत मिळणें इष्ट आहे. अर्थात् या कलांचें शिक्षण म्हणजे तें पुस्तकांपेक्षां हातानेंच अधिक व्हावयाचें असतें. शिक्षणक्रमांत आजपर्यंत कलांवर सर्वस्वीं बहिष्कारच पडला आहे. पूर्वी इतिहास, न्याय, व्याकरण, तत्त्वज्ञान, गणित वगैरे विषयांवरच सर्व भर असे. अगदीं अलीकडे शास्त्रीय विषयांचा समावेश त्यांत होऊं लागला आहे. पण शास्त्र हा विषयसुद्धां एका अर्थी तात्त्विक व पुस्तकांच्या साहाय्यानें शिकण्याचा असतो. कलेच्या अभ्यासाची गोष्ट तशी नाहीं. कलेचें बहुतेक शिक्षण क्रियात्मकच असतें. शास्त्र हें समजून घेण्याचें व मनन करण्याचें असते; पण कला ही प्रत्यक्ष हातानें करण्याची क्रिया असते. शास्त्राच्या अभ्यासांत पुस्तकीज्ञान हें मुख्य व हस्तक्रिया ही गौण व उपकारक असते. याच्या उलट, कलांच्या अभ्यासांत हस्तक्रिया हीच मुख्य असून पुस्तकीज्ञान हें गौण व उपकारक असतें. मनुष्यमात्राच्या जीविताला तात्त्विकज्ञान व शास्त्रीयज्ञान अर्थातच उपयोगी आहे; कारण त्याच्या योगानेंच जीवनोपयोगाच्या व सुखाच्या नवीन कल्पना सुचतात. पण कल्पना बठविणें हें काम कलांचें अर्थात् हातांचें आहे व ही हस्तक्रिया जर बरोबर न होईल तर कल्पना सुचून आणि न सुचून सारख्याच निरुपयोगी होणार! 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' हा

समर्थांचा फटकारा तोंडाच्या बडबडीप्रमाणें डोक्यांतील ज्ञानासहि लागू आहे. म्हणून शास्त्रीय व तात्त्विक शिक्षणाच्या जोडीला कलांच्या शिक्षणाचा समावेश शिक्षणक्रमांत झाला तरच तें शिक्षण अविकलांग, सर्वांगसुंदर व यशस्वी होईल, एरवीं होणार नाहीं.

हस्तक्रियेची जोड मिळाल्याशिवाय, पर्वतांच्या गुहांतून राहणारे रानटी लोक किंवा पारध करून उपजीविका करणारे वनचर यांची आणि आर्किमिडीजपासून लॉर्ड केलविनपर्यंत झालेले सर्व तात्त्विक शास्त्रज्ञ यांची योग्यता सारखीच भरेल. कारण डोक्यांत ज्ञान पुष्कळ आहे व कल्पना हव्या तितक्या सुचतात, परंतु त्यांना मूर्त स्वरूप देण्याचें साधन किंवा कौशल्य जर पदरीं नाहीं तर त्याचा काय उपयोग ? आर्किमिडीजनें अशी एक प्रचंड कल्पना मनांत बांधली होती कीं, पहारेची तरफ लावून आपण जसा एखादा जड धोंडा उलथून टाकतो, तसाच पृथ्वीच्या बाहेर दुसऱ्या एखाद्या गोलावर आधार (फलक्रम) मिळून यथाप्रमाण पहार मिळेल तर ही पृथ्वी म्हणजे हा भूगोलहि सहज उलथून टाकतां येईल. कल्पना उदात्त खरी; व कोणी गणित करण्यासच बसेल तर पृथ्वी उलथून टाकण्यास केवढी शक्ति व ती उत्पन्न करण्यास साधनीभूत अशी केवढी पहार लागेल हेहि नक्की सांगतां येईल. पण उपयोग काय ? आर्किमिडीजची कल्पना कोणाच्याहि जन्मभर मनांतल्या मनांतच राहणार. क्रोधास चढलेला बालवीर कुश म्हणतो, 'मारीन पन्नग मी फोडिन शेषटाळू । भूगोल हा उलथितां मज नाहिं वेळू' पण याच्या उलट, जो खरोखरच आपल्या हातानेंच पहारेची तरफ चालवून आपल्या मार्गांतील दगडाचा अडथळा दूर करितो, किंवा दगडानें व्यापलेली भूमि आपलीशी करून उपयोगाला आणितो, त्याचें यश आर्किमिडीजच्या यशाहून व्यावहारिकदृष्ट्या खचित अधिक भरेल. जगांतील सुधारणेचा इतिहास हा निवळ तात्त्विक ज्ञानाचा इतिहास नसून सक्रिय ज्ञानाचा आहे, किंवा कलाकौशल्याच्या व कारागिरीच्या हत्यारांचा इतिहास आहे असें म्हटलें तरी चालेल. कुदळ, करवत, रंधा, हातोडा, गुण्या, टाकी आणि कानस या कारागिरीच्या अवघ्या सात हत्यारांनीं रानटी मनुष्य व सुधारलेला मनुष्य यांतील सर्व फरक निर्माण केला आहे. पूर्वी हीं हत्यारें माणसाच्या शक्तीनें

चालविलीं जात; आणि अलीकडे शास्त्रीय शोध लागल्यापासून हीं हत्यारें पंचभूतात्मक शक्तीच्या योगानें चालविलीं जातात. परंतु कारागिरीच्या हत्यारांचीं मूलतत्त्वें कायमच आहेत; व पंचभूतांची शक्ति मदतीला घेतली तरी मनुष्याच्या हस्तक्रियाकौशल्याची जरूर नाहींशी झालेली नाहीं. म्हणून या सुधारणेच्या काळीं देखील मुलांना लहानपणीं कारागिरीच्या हत्यारांची ओळख करून दिली पाहिजे. मातीच्या घरकुलापासून तों आधुनिक काळच्या राजवाड्यापर्यंत इमारती बांधण्याला, साध्या नांगरापासून तों सुधारलेलीं व गुंता-गुंतीचीं शेतकीचीं आउतें चालविण्याला, झाडाच्या बुंधांतून पोखरून केलेल्या डुबाऊ नावेपासून तों पी. ऍंड ओ.ची आगबोट बनविण्याला, धनगराच्या अंगावरील जटिली कांबळ्यापासून तों हिंदी संस्थानिकाच्या अंगावरील भरजरी वेलबुट्टीदार कपडा विणण्याला, साध्या सुगड पणतीपासून तों हजारों रुपये किंमतीचे नक्षीदार चिनी रांजण तयार करण्याला, हातकामाची व कारागिरीच्या हत्यारांचीच गरज लागते. डोंगरांत बोगदे खणणें, पाटबंधारे बांधणें व डोंगरी जमिनीचे बगीचे करणें इत्यादि उपयोगाच्या व सुखाच्या सोई कारागिरीच्या हत्यारांनीं हातच निर्माण करितात. शाळांतून ज्योतिष-शास्त्रासारखे विषय शिकवितात हें ठीकच आहे; कारण त्यानें मन उदात्त होतें. ज्यांच्या उष्णतेवर येथें घोटभर पाणीहि तापायचें नाहीं अशा लाखों मैल दूर असलेल्या तारकांच्या स्वरूपाचा व गुणधर्मांचा विचार कशाला शिकवितां असें आम्ही म्हणत नाहीं; तर तो विचार शिकवून त्याचबरोबर आपल्या पायाखालीं जळणाऱ्या सुखदुःखाच्या गोष्टींचा व्यावहारिक विचार व त्यास सक्रिय करण्याकरितां लागणारें हातकामाचें शिक्षणहि द्यावें असें कोणीं प्रतिपादिल्यास त्यांत वावगें तें काय आहे?

असो; हातकामाच्या शिक्षणाची उणीव आमच्याकडेच काय, पण सुधारलेल्या पाश्चात्य देशांतहि अगदीं अलीकडच्या काळापर्यंत होती. किंबहुना १८८० पावेतों हातकामाचें शिक्षण सर्व साधारण शिक्षणाच्या शाळातून द्यावें ही गोष्ट तिकडील शिक्षणशास्त्रप्रवीणांसहि सुचली नव्हती. निदान तिचा अंमल झाला नव्हता. त्यापूर्वी फ्रोबेल, पेस्टॅलोझी वगैरेंच्या सूचनेवरून किंडरगार्टन पद्धत अमलांत आली होती. पण १८६८ सालीं रशियामध्यें व १८७६ सालीं अमेरिकेमध्यें हातकामाच्या शिक्षणाच्या

प्रयोगांस सुरवात झाली, व १८८४च्या सुमारास तें शिक्षण कायम झालें. इंग्लंडमध्यें १८९९ च्या टेक्नीकल इन्स्ट्रक्शन ॲक्टानें हातकाम शिकविण्याच्या शाळांची सुरवात होऊन पुढील अवघ्या सहा वर्षांत या शाळांची संख्या हजारबाराशेंपर्यंत गेली. इंग्लंडप्रमाणें फ्रान्स, जर्मनी वगैरे राष्ट्रांतूनहि हातकाम शिकविण्याच्या शाळा आहेत. प्रत्येक राष्ट्रांत शाळांचे प्रकार, अभ्यासक्रम, या शाळांस लागणाऱ्या खर्चाची योजना व शिक्षणावर देखरेख करणारे अधिकारी ह्या सर्वांची योजना अर्थात् निरनिराळ्या प्रकारची आहे. परंतु ह्या सर्वांच्या मुळाशीं एकच तत्त्व आहे तें हें कीं, अल्पवयांत मुलांना हातकामाचें शिक्षण देणें श्रेयस्कर असून पुस्तकी शिक्षण देण्याची जबाबदारी जशी सरकारवर व पालकांवर आहे तशीच हातकामाचें शिक्षण देण्याचीहि आहे.

हातकामाचें शिक्षण देण्याच्या बाबतींत कित्येकांस प्रथम अशी एक शंका येईल कीं, मुलांच्या डोक्यावर आधींच अभ्यासाचा बोजा इतका असतां त्यांत आणखी भर टाकणें योग्य होईल कीं काय? कित्येकांच्या मतें शाळेंत मुलांस जें कवाईत तसेंच रेखाकला वगैरे शिकवितात तीच मुळीं चूक आहे. त्यांच्या मतें खऱ्या अभ्यासाच्या तासांतील कांहीं तासांचा अशा रीतीनें अपव्ययच होतो व ही ज्यांची आधींपासूनच कल्पना त्यांना त्यांतच हातकामाची भर पडल्यास मुलांवर तो निवळ जुलूम होत आहे असें वाटल्याशिवाय राहाणार नाहीं. पण केवळ पुस्तकी शिक्षण हेंच काय तें खरें शिक्षण अशी समजूत असणें हीच मुळांत खरी चूक होय, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. शिक्षणाची खरी उपपत्ति त्यांना माहीत नसल्यानें अशी चूक त्यांच्या हातून सहजच होते. पण कवाईत, रेखाकला वगैरेसारख्या गोष्टींनीं पुस्तकास जुंपलेल्या मुलांना एक प्रकारचा विरंगुळाच मिळतो. ड्रिल वगैरेनीं केवळ पद्धतशीर रीतीनें नुसता शरीरास व्यायाम होतो. सबब ती बाब या ठिकाणीं बाजूस ठेवूं, परंतु ड्रॉइंग शिकण्यावर मुलाचे आठवड्यांतून एक दोन तास जाऊन जर त्याच्या मोबदल्यांत त्याला वस्तूंच्या आकृतीचें साधारण मानानें दिग्दर्शन करण्याची पात्रता आली तर ते दोन तास फुकट गेले असें केव्हांहि म्हणतां येणार नाहीं. एखाद्या कारखान्यांत एखादा युरोपियन गृहस्थ गेला व एखादा नेटिव्ह गृहस्थ गेला व त्या

दोघांस एखादा नवीन पदार्थ बनविण्याचें सांगावयाचें असलें तर पुष्कळ वेळां असा फरक दिसून येईल कीं, युरोपिअन गृहस्थ कागद पेन्सिल मागून घेऊन उभ्या उभ्या चटदिशीं आपल्या मनानें योजलेल्या पदार्थांची आकृति रेखाटून कारखानदाराजवळ देईल. अर्थात् गिऱ्हाइकास काय पाहिजे याविषयीं कारखानदारास शंका न उरतां त्याची समजूत बरोबर पटेल. तोच नेटिव्ह गृहस्थ त्यास ड्रॉइंग येत नसेल तर आपल्या मनांतील कल्पना कारखानदारास समजावून सांगण्याचा अनेकपरी शब्द योजून प्रयत्न करील; पण गिऱ्हाइकाची कल्पना गिऱ्हाइकाजवळ व कारखानदाराची कारखानदाराजवळ असा बेबनाव कायम राहून त्यानें मागितलें एक व यानें तयार करून दिलें भलतें अशी स्थिति होणार हें अगदीं उघड आहे. व जी गोष्ट ड्रॉइंगची तीच हातकामाची. दुसरे कित्येक अशी शंका घेतील कीं, हातकामाचीं मूलतत्त्वें म्हणून तुम्ही शिकविणार, त्यानें विद्यार्थ्यास कोणची कला पुरी किंवा चांगलीशी येईल? शिवाय शाळेंत जाणारा मुलगा पुढें त्या कलेचा धंदा म्हणून थोडाच करणार आहे, कीं त्याला हें शिक्षण उपयोगी पडेल. श्रमविभागाचें तत्त्व आतां सर्वसम्मत आहे, एकाला सर्व विषय शिकवून ते धंदे करण्याची पात्रता अंगीं आणून देऊं पाहणें हें हास्यास्पद आहे. पण यावर उत्तर असें आहे कीं, शाळांतून जें हातकामाचें शिक्षण दिलें जाईल किंवा जावें तें कोणत्याहि कलेचा धंदा करण्याइतकें असेल अशी शिक्षण देणाराचीच जर अपेक्षा नाहीं तर इतरांनीं तरी ती कां बाळगावी? बोलूनचालून इतर विषयांप्रमाणेंच याहि विषयाचीं फक्त मूलतत्त्वेंच शिकविलीं जाणार. इतर विषयांचीं मूलतत्त्वें शिकून तरी त्या विषयांतील शिक्षण पूर्णतेस पावतें असें थोडेंच आहे. शाळेंत किंवा कॉलेजांतहि मुलांस जो इतिहास शिकवितात तेवढ्यानें कसलाहि मुलगा असला तरी तो इतिहाससंशोधक किंवा इतिहासवेत्ता थोडाच निपजतो? अथवा राजकीय किंवा सामाजिक व्यवहारज्ञान असें त्याला थोडेंच येतें? अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें शाळेंत शिकल्यानें मुलगा एकादी बँक काढूं किंवा चालवूं शकेल अगर एखादी बाजार पेठ हस्तगत करील, किंवा सोन्यानाण्याच्या प्रचंड देवघेवी करील असें थोडेंच आहे? बी.ए. परीक्षेला ज्योतिषशास्त्र ऐच्छिक विषय घेतला तरी साधारण ग्रहण वर्त-

वयाचें झाल्यास परंपरागत धंदेवाईक ज्योतिषीबुवांकडे जाऊन त्यांजकडून सारण्या शिकाव्या लागणारच. पण या सर्वांचें खरें कारण हेंच कीं, हर्बर्ट स्पेन्सर यानें म्हटल्याप्रमाणें कोणत्याहि विषयाचें खरें व्यवहारोपयोगी व पूर्ण असें ज्ञान शाळा किंवा कॉलेज सोडल्यानंतर मनुष्य जो उद्योग करील त्यापासूनच मिळणार आहे. खरें वाङ्मयज्ञान व नुसत्या वर्णलिपीचा परिचय या दोहोंत जें प्रमाण आहे तेंच प्रमाण कोणत्याहि कलेचा धंदा करण्यास लागणारें ज्ञान व तत्संबंधीं शाळेंत मिळणारें ज्ञान यांचेमध्ये आहे. सुतार, सोनार, लोहार, फिटर वगैरे लोकांचे धंदे करण्याइतकें हाताकामाचें शिक्षण शाळेंतून मिळणार नाहीं हें खरें, पण यांतील एखादा धंदा करण्याची पात्रता जर एखाद्या मुलाच्या अंगीं अव्यक्तरूपांत असली तर ती व्यक्त करून जरूर त्या मार्गानें पुढें अभ्यास चालविण्याची सूचना तरी या तुटपुंजी शिक्षणानें खास होईल व हा फायदा कांहीं लहान नाहीं. दुसरें असें कीं, आज शाळेंत जाणारीं मुलें किंवा त्यांचे पालक यांपैकीं कोणालाहि शिक्षण संपल्यावर केवळ लिहिण्यावाचण्याच्या म्हणजे सामान्यतः विद्वत्तेच्या नांवाखालीं येणाऱ्या धंद्याखेरीज इतर धंदा—म्हणजे आंगमेहनतीचा, कारागिरीचा वगैरे धंदा—करावा लागेल अशी फारशी आवश्यकता वाटत नसते ही गोष्ट खरी; परंतु शाळेंत जाणारीं शेंकडा शंभर मुलें पुढें केवळ विद्वत्तादर्शक धंदे करण्यास पात्र होतीलच असें मानणें आणि तदितर दुसरे धंदे त्यांस करावे लागण्याचा संभव आहे असें न मानणें यासारखी ढोबळ चुकी कोणतीच नाहीं. शाळेंत जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या पालकाला आपला मुलगा फरडा कारकून, लेखक, शिक्षक, प्रोफेसर, वैद्य, वकील, मुनसफ किंवा कारभारी होईल अशी इच्छा असणें स्वाभाविक आहे. पण पालकांची ही आकांक्षा खरोखर शेंकडा किती विद्यार्थ्यांच्या हातून सफळ होते व बाकीच्यांची पुढें शाळा सोडल्यानंतर किती हालअपेष्टा होते हा नित्याचा अनुभव आहेच. अर्थात् अशा स्थितींत विद्वत्तेव्यतिरिक्त एखाद्या कलेच्या तत्त्वांचा परिचय मुलांस शाळेंत झालेला असेल व तिची गोडी त्यास लागलेली असेल तर त्यापासून त्याचा कितीतरी उपयोग होईल बरें! पदवीधर झाला म्हणून तरी त्यानें एखाद्या जीवनोपयोगी व्यावहारिक कलेचाच धंदा करूं नये याला

तरी कारण काय ? एखाद्या चित्रकाराची अब्रू तो चित्रकार असून शिवाय बी. ए. असल्यास जशी कमी होत नाहीं, तसाच एखाद्या बी. ए. नें, समजा कीं, एखाद्या कारागिरीचा कारखाना काढला तरी कोणती हरकत नाहीं. उलट बी. ए. असल्यानें हुशार पण निरक्षर कारखानदारापेक्षां तो आपला कारखाना खचित अधिक यशस्वी करील.

श्रमविभागाचें ढोबळ तत्त्व कोणीहि मान्य करील; पण प्रत्येक मनुष्यास शक्य तर प्रत्येक उपयुक्त गोष्टीचें थोडथोडें उपयुक्त ज्ञान असल्यास त्याच्या योगानें श्रमविभागाच्या तत्त्वास बाध न येतां उलट व्यक्तिशः त्याचें स्वावलंबन मात्र वाढतें, ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे.

एखाद्याचा लेखकाचा धंदा चांगला चालत असला तर त्यानें मुख्यतः तोच करावा, माझ्या लेखनाचीं साधनें व उपकरणें हीं सुद्धां मीच बनवीन असा हव्यास त्यानें धरूं नये, ही गोष्ट खरी; पण लेखकानें स्वतःच टांकांचा किंवा पेन्सिलींचा घरचा कारखाना न काढला तरी टांक व पेन्सिली कशा करितात याचें सर्वसाधारण ज्ञान त्याला असल्यानें बाध येणार नाहीं. निदान एवढी गोष्ट खरी कीं, आपली पेन्सिल मोडली असतां ती स्वतः न करितां तें काम माझें नाहीं असें म्हणून जर तो त्याकरितां दुकानदाराकडे धांव घेईल तर श्रमविभागाच्या खऱ्या तत्त्वाला विशेष मदत न होतां हा मात्र सर्वस्वीं परावलंबी बनेल. कोणतीहि गोष्ट स्वतः धंदा म्हणून करणें वेगळें व तिची माहिती असणें वेगळें. ज्याला ही माहिती असते तो स्वावलंबी होतो. मनुष्यमात्राचें पीडेपासून रक्षण करणें हें पोलिसांचें कर्तव्य खरें; परंतु घरांत विंचू किंवा साप निघाला असतां तो आपल्या हातानें न मारतां जर कोणी पोलिसास बोलावण्याकरितां गेटाकडे धांवेल तर तो स्वतःस जितकें हास्यास्पद करून घेईल, तितकाच हातकामाच्या कलेतील सामान्य व बारीकसारीक सुद्धां गोष्टी माहीत नसणारा मनुष्य परावलंबनामुळें हास्यास्पद होतो. श्रमविभाग ही पोषाखीपणाला मुसती सबब आहे, याहून जास्त कांहीं नाहीं. आपलें लिहिण्याचें खुर्ची–टेबल स्वतःच उत्तम नमुनेदार करणें हें विद्वान् मनुष्यास न येणें किंबहुना तें येत असलें तरी इतर रीतीनें त्याच्या वेळेची किंमत अधिक येण्यासारखी असल्यामुळें तो वेळ त्यानें खुर्ची –टेबल करण्यामध्यें घालविणें हा अपव्यय होय, य ही गोष्ट अर्थशास्त्रालाहि

सम्मत होणार नाहीं, परंतु आज स्थिति मात्र अशी आहे कीं, विद्वान् किंवा विद्वानब्रुव लोकांना अंगरख्याचा एक टाका तुटला असतां तो आपल्या हातानें वेळींच घालण्याचें ज्ञान किंवा इच्छा नसते. अर्थातच इंग्रजी म्हणीप्रमाणें एकच टांका पण तो वेळेवर न घातल्यामुळें मागाहून एकाऐवजीं नऊ टांके घालावे लागतात. व मग शिंप्याच्या तोंडाकडे पाहात बसावें लागून वेळ व पैसा दोन्हीहि अधिक प्रमाणानें खर्च होतात. त्यांना साधा स्क्रू पिळतां येत नाहीं, वांकडा खिळा नीटनेटका करून कामास लावतां येत नाहीं, हातांतील काठी रंधून किंवा घांसून साफ करून घेतां येत नाहीं, तुटलेलें बटन लावितां येत नाहीं, साधें रंग वार्निस समजत नाहीं, साध्या यादीप्रमाणें जिन्नस आणून शाई बनावितां येत नाहीं, चित्रांस चवकट बसवितां येत नाहीं, तसबिरीचे डाग काढतां येत नाहींत–तात्पर्य, त्यांना काय काय करतां येत नाहीं, हें सांगूं गेलें असतां त्याची याद फारच मोठी होईल व याचें कारण एकच व तें हें कीं, अर्थशास्त्रांतील श्रमविभागाच्या तत्त्वाची पायमल्ली करण्याचें पाप आपल्या हातून घडण्याची त्यांना भीति वाटते असें नाहीं, तर असल्या साध्या किरकोळ बाबतींत लागणारें जें क्षुल्लक हातकामाचें शिक्षण तें त्या बिचाऱ्यांना वेळींच कोणीं दिलें नाहीं हें होय. तें मिळतें तर परावलंबनामुळें त्यांची अशी दुर्दशा झाली नसती. दुसरी एक सूक्ष्म गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. ती ही कीं, हातकामाचें शिक्षण मुलास दिलें असतां श्रमाचें किंवा हलकेंसलकें काम हातानें करणें यांत कमीपणा आहे अशी जी परंपरानुगत एक समजूत मोठ्यांप्रमाणें लहानांच्याहि मनांत खिळून राहिलेली आहे ती नाहींशी तरी होईल. वास्तविक सर्व जीवनोपयोगी कला कारागिरांच्याच हातीं असतात. व्यवहाराच्या सुखसोयी करण्याला त्यांचा जितका प्रत्यक्ष उपयोग होतो तितका विद्वानब्रुवांचा होत नाहीं. अर्थात् कारागिरांनाहि एक प्रकारची मान्यता आहे असेंच वास्तविक समजावयास पाहिजे. कला येत असतां तिचा धंदा म्हणून उपजीविकेकडे उपयोग करावा न लागला तर उत्तमच; पण कलेचा उपयोग धंद्याच्या दृष्टीनें केला तरी त्यांत कमीपणा तो कसला ? आमच्या इकडील वर्णव्यवस्थेंत श्रमविभागाचें बीज समाजव्यवस्थाकारांनीं रोंविलेलें आहे हें आपण म्हणतों खरें; पण श्रम-

विभाग याचा अर्थ एकानें सर्व मान्यता आपणांकडे घेऊन सर्व अवमान्यता दुसऱ्याकडे देणें असा विभाग मात्र खचित नव्हे. श्रमविभागाला असलेंच तर समान मान्यतेचेंच अधिष्ठान असावयास पाहिजे व तें मिळेल तर जीवनोपयोगी कलांचा धंदा करणाऱ्या लोकांना कमी मानण्याची व ते ज्या साधनांचा आणि उपकरणांचा उपयोग करितात त्यांचा उपयोग आपण केल्यास आपणास कमीपणा येतो असें मानण्याची जी एक मनाची संवय रूढ होऊन राहिली आहे ती नाहींशी होईल.

खऱ्या श्रमविभागपद्धतींत प्रसंगपरत्वें सेव्यसेवकभाव निरनिराळ्या लोकांत वांटून गेला तरी त्यापासून अन्यायाच्या किंवा गुलामगिरीच्या कल्पना मनांत येण्याचें कारण नाहीं. निदान हल्लींचा काळ तरी असा आलेला आहे कीं, त्यांत जन्मसिद्ध असे कोणतेच हक्क कोणासहि न राहतां सर्व हक्क स्पष्ट किंवा गर्भित करारानेंच उत्पन्न होतात व अशा हक्कांमुळें उत्पन्न झालेल्या अधिकारालाहि करारांचेंच म्हणजे परस्परसंमतीचेंच अधिष्ठान आहे. यामुळें पूर्वी पैसे देऊन कायमचा विकत घेतलेला गुलाम किंवा अशा गुलामाची संतति म्हणून बनलेला जो गुलाम त्याच्या हातून कितीहि मौल्यवान् कलेचें किंवा कारागिरीचें काम झालें तरी काम करणाऱ्याच्या कनिष्ठपणामुळें त्या कामालाहि एक प्रकारचा कमीपणा किंवा हलकेपणा चिकटून राहत असे, तसा प्रकार होण्याचें हल्लींच्या दिवसांत कारण उरलें नाहीं. तात्पर्य, गुलामगिरी व ईश्वरनिर्मित श्रमविभागाच्या कल्पनेनें कोणीं कोणचें काम करावें व कोणचें करूं नये याविषयीं पडलेलीं कृत्रिम बंधनें दोन्हीहि नाहींशीं झाल्यामुळें हुन्नर, कला व कारागिरी अर्थात् हातानें मेहनतीनें करण्याचें काम यांविषयीं हलकेपणा वाटण्याचें कारण नाहीं.

गरीब शाळामास्तरांची कैफियत*

प्राथमिक शाळामास्तरांची हलाखी व त्यांचे पगार वाढविण्याची आवश्यकता यांच्यासंबंधानें आम्ही केसरींतून वेळोवेळीं लिहीत आलोंच आहो. तथापि हल्लीं शिक्षकवर्गाच्या संघटित प्रयत्नानें आणि मुंबईसरकारच्या हलगर्जीपणानें हा प्रश्न निकरावर आल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. प्राथमिक शिक्षक लोक अत्यंत गरीब, सालस, निरुपद्रवी असून मेहनतीनेंहि असल्यामुळेंच त्यांच्या पगारवाढीचा प्रश्न सर्वांच्याहि मागें टाकण्याची विपरीत बुद्धि सरकारास झाली कीं काय न कळे ! पण एवंगुणविशिष्ट शिक्षकवर्ग हा देखील स्वाभिमानी असल्यामुळें, व सर्व परिस्थितिच आतां तशी बनत चालल्यामुळें त्या वर्गानें यापुढें सरकारचा मुलाजा किंवा भीडमुर्वत न घरल्यास त्यांत कांहीं विशेष आहे असें कोणास म्हणतां येणार नाहीं. पट्टेवाल्यापासून तों पट्टाभिषिक्त सिव्हिल सर्व्हंटापर्यंत सर्व दर्जाच्या सरकारी नोकरांनीं सरकारच्या डोक्याशीं पिस्तुल रोंखून आपले पगार वाढवून घेतले असतां, शिक्षकवर्गानें मात्र हात जोडून स्वस्थ बसावें व सरकार जी काय चत्कोर भाकर केवळ आपल्या खुषीनें देईल ती संतोषानें पदरांत घ्यावी अशी कोणीहि अपेक्षा करणार नाहीं. शिक्षकवर्गाचें महत्त्व सरकारला कळत नसलें तरी समाजाला चांगलें कळतें. शिक्षण व ज्ञान यांच्या नद्या पुढें मोठ्या फुगून पश्चिमसमुद्राला मिळोत, परंतु या सर्व नद्यांचे मूळ झरे ज्या क्षेत्रांत उत्पन्न होतात त्यांची बांधबंधस्ती व रखवाली करणें आणि त्या झऱ्यांचें पाणी शुद्ध व पवित्र राखणें हें जोखमीचें काम प्राथमिक शिक्षक लोकच करीत असतात. "देशांतील कायदे करण्याचें बहुमानाचें काम वाटेल त्यानें घ्यावें, पण कोंवळ्या मनाच्या मुलांना शिक्षण देण्याचें काम मला लाभो, याशिवाय मी ईश्वराजवळ दुसरें कांहीं मागत नाहीं," अशी एका प्रसिद्ध इंग्रज शिक्षकाची उक्ति सर्वमान्य होऊन ती तिकडे म्हणच बनून गेली आहे; व आमच्या इकडील शिक्षकवर्गालाहि ही म्हण योग्य अभिमानानें स्वत:स लावून घेतां येईल. एखादा कर्ता पुढारी पुढें कितीहि

* केसरी, तारीख २८ सप्टेंबर १९२०

नांवाजला तरी बालपणीं आपण ज्याच्याजवळ श्री-ग शिकलों त्याच्याविषयीं प्रेम व आदर तो निरंतर बाळगतो असें आढळतें, याचें कारण झालें तरी हेंच होय.

अशा शिक्षकवर्गाला विशेष सवलतीनेंहि सरकारनें वागविलें असतें तरी कोणीं त्यांस नांव ठेवलें नसतें; परंतु विशेष औदार्य दाखविण्याऐवजीं सरकारचा विशेष कृपणपणाच त्यांच्या वांट्याला आजवर आलेला आहे. दुसरीहि एक गोष्ट सांगितली पाहिजे, पण ती सांगण्यांत कोणावर शिंतोडा उडविण्याचा मात्र आमचा हेतु नाहीं. ती गोष्ट ही कीं, सरकारी नोकरीच्या बहुतेक खात्यांतून पट्टेवाल्यापासून तों हेडक्लार्क किंवा शिरस्तेदारापर्यंत प्रत्येकाला कांहींना कांहींतरी अवांतर मिळकत, किंवा प्रतिष्ठित भाषेनें बोलावयाचें तर 'दरबारखर्चाचा अंश' मिळूं शकतो. या सर्वांनींच पापानें हात धुतले आहेत असें म्हणणें नाहीं. तथापि स्थलकाल, कामकाजाचें महत्त्व व स्वतः मिळवत्या माणसाची हुशारी यांच्या अनुरोधानें या अनेक नोकरांना अडलेले किंवा काम फत्ते झालेले लोक खुषीनें अळ्ळावेलेले शिक्षक कांहींना कांहीं पोंचवूं शकतात ही गोष्ट नाकबूल करण्यांत. तिसऱ्या वर्षाचें दुर्दैवानें–किंवा सुदैवानेंच म्हटलेलें अधिक बरें–बि. ए. म्हणण्याचा प्रघात मात्र आपल्या पोटगींत अवांतर भर टाकण्यास ही पदवी अगदींच फुकट फार तर सरस्वतीपूजनाची मिळालेली सुपारी तां यू. एस. एफ. पास झालेल्या बनून हात चालविण्याचेंच त्यानें मनांत तर या मराठी बी. ए.ला फक्त 'शेणा'हून त्यास अधिक कांहीं खात्यांवयाचे तर त्यानें आणखी पंधरा वर्षें कदाचित् असा एक काळ होता पाहिजे. बरें, सरकारजवळ पगारवाढीस खेडेगांवचे साधेभोळे लोक शाळेलकवर्क्सखात्यासारख्या कांहीं खात्यांतून दारांच्या यादींत घालून त्याला दम्में कर्णासहि लाजविलें आहे. कारण नवीन धान्य, भाजी वगैरे पोंचवीत. पण ओव्हरसीअरला ६० रुपये पगार होता कूसहि नाहींशी झाली. खेडेगं ००० पर्यंत रुपये पगार झाल्याचीं उदाहरणें प्रमाणें मिळत नाहींत. क , डेप्युटी कलेक्टर यांचे पगाराहि बरेच वाढले लहानशी रक्कम मिळते; पण वॉप्पट वाढला, मामलेदाराचा दीडपट तरी वाढेल वजा घालतात असें म्हणतात ींत. पण १५०–२०० रुपये ज्यांस आगाऊच कीं, शाळामास्तरानें केवळ जन्या पगारांत ज्या प्रमाणानें वाढ झाली त्यापेक्षां

कनिष्ठ प्रतीच्या नोकरांच्या पगारांत अधिक वाढ झाली पाहिजे. दोहोंना एकच प्रमाण लावतां येत नाहीं ही गोष्टहि मुंबईसरकारनें लक्षांत घ्यावयास पाहिजे होती.

असो; हें सर्व युक्तिवादाचें विवेचन झालें. पण लक्ष घातलें असतां स्वतः सरकारास न सुचेल असा युक्तिवाद आम्ही अतज्ज्ञ टीकाकार कोणता करणार, किंवा सरकारास ठाऊक नाहींत अशीं कारणें आम्ही आपलें डोकें चालवून किती सुचविणार ? शाळामास्तरांना न्याय देण्याचें काम खात्याचा अभिमान धरून डायरेक्टरसाहेबांनींच करावयास पाहिजे होतें. अबकारी, फॉरेस्ट, पब्लिकवर्क्स वगैरे खात्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांनीं मात्र नेटानें आपली कारवाई यशस्वी करावी, आणि विद्याधिकाऱ्यांनीं मात्र रेंगाळत बसावें हें त्यांस फारसें भूषणावह नाहीं. इतर खात्यांतील कामाच्या मानानें शाळामास्तरांचें काम हलकें किंवा बिनश्रमाचें असें डायरेक्टरसाहेबांना वाटत असल्यास मग मात्र आमचा नाइलाज आहे ! 'चाकरी मिळेना तर माग भीक, व कोणी वाढीना तर पंतोजीपणा शीक' ही म्हण आजच्या शिक्षकांच्या हलाखीची पूर्णपणें द्योतक अशीच आहे. धर्मोपदेशक, भिक्षुक, मिशनरी यांच्याप्रमाणें शिक्षक लोकहि अनेक देशांतून विनोदाचा विषय होऊन बसलेले असतात. पण तें त्यांची कामगिरी कमी महत्त्वाची म्हणून नव्हे, तर त्यांच्या धंद्यांत सालसपणा व निरुपद्रवीपणा हाच गुण असतो म्हणून. गरीब गाईच्या पाठीवर कोणींहि थाप मारावी, चावऱ्या कुत्र्याच्या वाटेला कोण जाणार ? लेखणीनें डोळ्यांतलें काजळ काढून घेणारा कारकून, चावडींतील रकट्यावरून बादशाही गाजविणारा पाटील, दीड हात दंडुक्याच्या बळावर जुलूम करणारा पोलीस, लोकांना मद्यपी बनवून कलालाचें व सरकारचें घर भरणारा अबकारी खात्याचा नोकर, यांची कामगिरी सरकारच्या डोळ्यांत भरावी; आणि रात्रीं कोणाला न कळत शेतावर पडून धान्याला अंकुर फुटविणाऱ्या परोपकारी पावसाप्रमाणें लोकांच्या डोळ्याआड खेडेगांवांत बसून कोंवळ्या मुलांच्या मनाला वळण लावण्याचें कार्य करणाऱ्या शाळामास्तराचें काम सरकारच्या डोळ्यांत भरूं नये हा केवळ कालमहिमा म्हटला पाहिजे ! पण सरकार गप्प बसलें म्हणून स्वतः शिक्षकांना तरी गप्प बसतां येत नाहीं. आपल्या पोटाची व्यवस्था त्यांना पाहिलीच

पाहिजे. यामुळें अशा निरुपद्रवी लोकांकडूनहि चळवळ व संघशक्ति उत्पन्न करण्याचें काम झाल्याशिवाय राहिलें नाहीं. किंबहुना गुजराथेंतील शाळामास्तरांनीं संप करून एकदम चळवळीचें तीव्र रूप दाखविल्यापासूनच इलाख्यांतील शाळामास्तरांच्या चळवळीला सुरुवात झाली आहे. संपबाल्यांच्या मागणीप्रमाणें वॉर-अलावन्स तर देण्यांत आलाच. पण एकंदरीनें शाळामास्तरांच्या पगारवाढीबद्दल शाळाखात्यानें आपण होऊन पुढील योजना करावयास पाहिजे होती ती मात्र केली नाहीं. पुढें व्यक्तिशः अर्ज होऊं लागले, कायदे-कौन्सिलांतहि प्रश्नोत्तरें सुरू झालीं, तेव्हां सरकारनें मास्तरांचे पगार थोडथोडे वाढविले; पण ही वाढ वास्तविक कोणत्याहि नव्या पक्क्या योजनेस अनुसरून केली असें नसतां जुन्या स्केलप्रमाणें जो पगार ज्याला मिळावयास पाहिजे होता तो फार तर देण्यापलीकडे कोठेंहि मजल गेली नाहीं. याशिवाय पसंत्यनुरूप म्हणून शेंकडा दहा इतक्या जागांचे कमालीचे पगार वाढविण्यांत आले. पण त्यानें फारच थोड्या लोकांची गैरसोय निघाली. शिवाय बाजारभाव कडकल्यानें कनिष्ठ दर्जाच्या, सर्वांत कमी पगार मिळणाऱ्या लोकांचा म्हणून जो विशेष विचार व्हावयास पाहिजे होता तो झाला नाहीं. अर्थात् सामुदायिक चळवळ केल्याशिवाय भागत नाहीं असें पाहून प्रांतीय शिक्षकपरिषदेची कल्पना निघाली व पुणें व सोलापूर या दोन ठिकाणीं तिच्या बैठकीहि झाल्या दुसऱ्या बैठकींत मास्तरांच्या पगारवाढीबद्दल जी मागणी मं योग्य असावी अशी खात्री होण्यास, परिषदेचे अध्यक्ष सारखे विचारी व शांत डोक्याचे गृहस्थ होते. या सांगण्याची गरजच नाहीं. किंबहुना शाळामास्त पगाराची मागणी मर्यादित करून ती न्याय्य अ अभिप्राय दिल्यावरूनच शिक्षकवर्गानेंहि ती म मागणीबरहुकूम तरी पगार वाढावे, किंबहुना त्याला आतां एक क्षणाचाहि विलंब लागूं न धरल्यास तो वावगा आहे असें कोणासहि

असो; मागणी ठरली व ही मागणी अ याचा विचार शिक्षकवर्ग व त्याचे सल्लाग

म्हटलें तर चहूंकडे संपाचें हत्यार सर्वांनींच उचललें आहे, गुजरायेंत संप होऊनहि चुकला व विलायतेंतील प्राथमिक शिक्षक संप करणार अशा बातम्या जाहीर रीतीनें इकडे येऊन थडकल्या आहेत. या दृष्टीनें पहातां, शिक्षकवर्ग स्वभावतः सालस, निरुपद्रवी असतांहि त्यांनीं संपास प्रवृत्त व्हावें यांत कोणास आश्चर्य वाटणार नाहीं. तथापि हा अनिष्ट प्रकार घडून येऊं नये अशी आमची इच्छा असल्यामुळें असें आम्ही सुचवितों. सरकारनें या कामीं वेळींच लक्ष घालावें; व शिक्षकवर्गाचें भांडण कमाल-मर्यादेचा पगार अगर जागा बेसुमार वाढाव्या अशाकरितां नसून, केवळ जगण्यास जेवढा पगार आज अवश्य आहे तेवढाच मिळण्यापुरतें आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन ताबडतोब ती तक्रार सरकारानें दूर करावी. नाहीं तर संप होऊन सरकार व शिक्षक यांच्या संबंधांतील अब्रूचें कांचेचें भांडें एकदां फुटलें म्हणजे तें फिरून सांधलें जाणार नाहीं. शाळामास्तरांनीं संप केला म्हणून सरकारचें कोणतेंच काम प्रत्यक्ष अडणार नाहीं ही गोष्ट आम्हांस माहीत आहे. किंबहुना प्लेगांत शाळा बंद पडतात तशाच फारतर संपांत बंद पडतील असली उक्ति कित्येकांनीं काढल्याचेंहि आमचे कानावर आलें आहे. त्याला उत्तरच द्यावयाचें तर 'आमचेंहि या कामामुळें अडलें नाहीं' असें म्हणून व संप करून शिक्षक लोक उत्तर देण्यास समर्थ आहेत.

सरकारचा बेगुमानपणा अधिक किंवा शाळामास्तरांची तडफ अधिक [illegible] परीक्षा पहाण्याची ही वेळ नाहीं, व त्यांत फायदाहि [illegible] गोष्टी सामोपचारानें झालेल्या बऱ्या. पण शाळामास्तर [illegible] पाला अशा समजुतीनें ते आजवर रगडले गेले [illegible] येत नयेत इतकीच आमची इच्छा असल्यामुळें, [illegible] महत्त्व देऊन त्याची आज थोडक्यांत चर्चा केली [illegible] आवडतीं व तोडून दिलेलीं नावडतीं असा [illegible] संभव आहे. पण हेंहि खरें नाहीं. [illegible] केली अशा तोडून दिलेल्या खात्यांचीहि [illegible]. अर्थात् शाळाखात्याचे पगार न वाढले [illegible] विशेष तुच्छ मानतें व या एकाच खात्यांतील [illegible] विशेष अभाव आहे याशिवाय तिसरें

अनुमान आमच्यासारख्या तिऱ्हाइतास तरी काढतां येणें शक्य नाहीं; व या प्रकरणाचा निकाल लागेल तेव्हां या दोहोंपैकीं खरें अनुमान कोणतें हें आपोआपच सिद्ध होईल.

*हे जबाबदार दिवाण !

नवीन शिक्षणमंत्री रघुनाथराव परांजपे यांनीं जडजोखमीच्या सरकारी कार्यधुरेला मान लवविल्यापासून फार काळ लोटला आहे असें नाहीं; तथापि तेवढ्याहि काळांत त्यांना शिक्षणविषयक एखादी नक्की योजना लोकांपुढें मांडतां आली असती. पण अशा एकाद्या नक्की योजनेच्या-ऐवजीं त्यांनीं अनिश्चित तात्पर्याचीं अशीं दोनतीन जाहीर भाषणें मात्र केलीं. आम्ही तर काय बोलूनचालून राज्यकारभाराच्या कक्षेबाहेर राहिलेले बेजबाबदार लोक ! आम्हांला जबाबदार राज्यकारभाराच्या मर्यादा कळत नसल्यामुळें आम्हीं परांजप्यांच्या कारभारावर आजवर सदसा फारशी टीका केली नाहीं. पण या मर्यादा नीट ओळखणाऱ्या त्याच्याच पुढ्यांतील कांहीं लोकांनीं त्यांची अमर्यादा करून रेवडी उडविली आहे; अशा वेळीं आम्हीं एखादा टीकेचा शब्द लिहिला तर आतां हेतुविपर्यास तरी होणार नाहीं. परांजप्यांच्या मदतगार पक्षांतील एका पत्रानें तर परांजप्यांवर इतकी जहाल टीका एकसारखी चालू ठेविली आहे कीं, प्रो० काळ्यांना ती करणाराला पिसाळलेल्या कुत्र्याची उपमा द्यावीशी वाटली व 'ज्ञानप्रकाशकारां'नीं तिला आपली मान्यता दिली ! पण स्वतः ज्ञानप्रकाशकारांना ही टीका-पद्धति अगदींच अपरिचित आहे असें नाहीं. लो० टिळकांच्या मृत्यूच्या आधींपासूनच पण विशेषतः त्यांच्या मृत्यूनंतर ज्ञानप्रकाशानें केळकरांवर वेळीं-अवेळीं, सकारण निष्कारण, वेडीवांकडी, उलटीसुलटी, संस्कृत-प्राकृत अशी टीका किती केली असेल हें ज्ञानप्रकाशकारांना माहीतच आहे. असो, अशा टीकाकाराला प्रोफेसर काळ्यांनीं पिसाळलेला कुत्रा म्हटलें, तरी पण खुद्द काळे यांनाहि शिक्षणमंत्री परांजपे यांचें काम पसंत न पडल्याचें उघड

* केसरी, तारीख २८ जून १९२१

बोलून दाखविल्याशिवाय राहवलें नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यांनाहि सहा महिन्यांच्या कारभारांत व्हावी तेवढी प्रगति दिसून आली नाहीं. पण त्यांना परांजप्यांच्या मार्गांतील अडचणी दिसत नाहींत असा ज्ञानप्रकाशकारांचा त्याच्यावरहि शेरा आहेच. अडचणीची सबबच सांगावयाची, तर बाहेर राहून देखील ती कोणासहि सांगतां आली असती. त्याकरितां सहा महिन्यांत तीस चाळीस हजार रुपये खर्ची पडण्याचें फारसें कारण नव्हतें. इतकेंहि होऊन दुसऱ्यावर कुत्सित टीका करण्याची स्वतः परांजप्यांची द्वाड खोड जात नाहीं ती नाहींच. कौन्सिलाबाहेर राहणाऱ्या लोकांना त्यांनीं 'शेख महंमदा'ची उपमा दिली आहे. मॅकमिलन कंपनीलाच फिरून मराठी क्रमिक पुस्तकांच्या फायद्याचा आणखी एक वर्ष मलिदा चारतांना परांजप्यांनीं शेख महंमदाच्या गोष्टीचीं पानें चाळलेलीं दिसतात. 'घाण्याच्या बैला'ची गोष्ट कदाचित् या पुस्तकांत नसेल म्हणून ती मात्र कांहीं खोटी नाहीं. असहकारितावादी व कांहीं सहकरितावादीहि जर शेख महंमद ठरतात तर खुद्द परांजप्यांनाहि घाण्याच्या बैलाची उपमा देण्यास काय हरकत? प्रो० काळे ह्यांच्या टीकेप्रमाणें सहा महिन्यांत परांजप्यांनीं कांहीं प्रगति करून दाखविली नाहीं हें जर खरें असेल, तर एका युरोपिअनानें शिक्षणखात्याच्या घाण्याचें जूं मानेवरून टाकून दिलें व परांजप्यांनीं तेंच आपल्या मानेवर घेऊन डोळ्यासमोर पण हातभर अंतर कधीं न तुटेल अशा बांधलेल्या पांच हजार रुपयांच्या पेंडीकडे पाहून पूर्वीप्रमाणें वाटोळें फिरण्याचें काम चालविलें, यांत जनतेला लाभ तो कोणता झाला?

शिक्षणमंत्र्याची जागा हातीं येतांच सक्तीच्या शिक्षणाचा प्रश्न आजमितीस एकदम प्रचारांत आणणें शक्य नाहीं असें विधान परांजप्यांनीं केलें. त्याबद्दल त्यांच्याकडे लोक निंदाव्यंजक ठराव करून पाठवीत असल्याचें त्यांनींच कबूल केलें आहे. ठीकच आहे, लोक असे ठराव कां न करतील? परांजप्यांनीं विधान केलें त्यापेक्षां सरकार गोखल्यांना तरी वेगळें काय सांगत होतें? लोकांची तयारी कितपत आहे, हें अजमावणें रास्त आहे, पण त्याबद्दल परांजप्यांनीं लोकांना टोमणा मारण्याचें कारण नाहीं. लोकांची संमति, पैशाची अनुकूलता व थोड्या काळांत पुष्कळ घडवून आणण्याची शक्यता, या अडचणी जर खऱ्या, तर त्या मुंबईसरकारा-

प्रमाणें पुणें म्युनिसिपालिटीलाहि त्या कां नसाव्या ? पण पुण्यांतील राष्ट्रीय पक्षानें प्रथम मुलांचें शिक्षण मोफत व सक्तीचें करूं, नंतर कांहीं दिवसांनीं मुलींचेंहि शिक्षण तसेंच हातीं घेऊं, असें ठरविलें तेव्हां मात्र परांजप्यांनीं आपल्या बगलबच्चांना व्यर्थ चळवळ करण्याला एवढी कां मदत केली ? तात्पर्य, सरकारी कूटाबाहेर असतांना उदारमतवादित्वाच्या लांबलाब गप्पा झोकून, या कूटांत सामील होतांच परांजप्यांना 'नकार' हा कसा फुगवून, सुजवून, सजवून मांडावा या विद्येच्या संशोधनापलीकडे दुसरें कांहीं कर्तव्य राहिलेलें दिसत नाहीं, व हा नकार आणखी दोनतीन वर्षें तरी असाच टिकणार असेंहि त्यांनीं एकदमच सांगून टाकलें आहे. म्हणजे पुढें काय करणार असा प्रश्न विचारणारांची त्यांच्या प्रधानकीच्या मुदतींत राखण लागली.

शिक्षणाचें कार्य पार पाडण्याला पैसा लागतो ही गोष्ट खरी आहे. आणि हा पैसा सर्वस्वीं दारूच्या उत्पन्नांतून येणारा आहे हीहि गोष्ट प्रसिद्ध आहे. दारूच्या पैशाला आणि शिक्षणाच्या खर्चाला कायमचा मेळ घालण्याचें जनतेनें कधींहि कबूल केलेलें नव्हतें. नवीन सुधारणांत ही कारवाई घडून आली व नवीन सुधारणांचें तर आपण ढोलगे पिटलें, म्हणून आपणाला आतां तक्रार करण्यास जागा नाहीं, ही गोष्ट परांजप्यांच्या मनाला खाऊं लागली असावीशी दिसते. कारण या मुद्दयावर त्यांनीं खालीलप्रमाणें वाक्पुष्पें उधळलीं आहेत. "मद्यपाननिषेधामुळें पैशांत येणाऱ्या तुटीकडेहि डोळेझांक करून चालणार नाहीं. मद्यपानाची हकालपट्टी झाली तर ती आम्हांस हवीच आहे; पण द्रव्यसामर्थ्यावर त्याचे अप्रत्यक्ष परिणाम काय होतील याचा विचार करून त्याप्रमाणें आपलें धोरण बनविणें हहि अवश्य आहे." या विधानांत परांजप्याची मद्यपान-निषेधाची तकलुपी उत्सुकता दिसून येते, पण ती जशी लोकांस मान्य होणार नाहीं, तशीच द्रव्यशोषणाकडे नजर देऊन मद्यपाननिषेधाचे पाय तोडावे किंवा दारू थांबविल्यास शिक्षणाचे पाय तोडण्यास तयार व्हावें, ही सूचनाहि त्याज्यच वाटेल. शिक्षण हवें तर लोकांस दारू पिऊ द्या, असा ध्वनीहि परांजप्यांनीं आपल्या भाषणांत निघूं देणें त्यांना शोभत नाहीं. एकवेळ शिक्षण माग पडलं तरी चालेल, माझा तीन वर्षांचा सगळा कार्यक्रम ढांसळला तरा बेहेत्तर, पण मद्यपानाची हकालपट्टी झालीच पाहिजे असं म्हणण्याच तारतम्य परांजपे

दाखविते तरी शिक्षणमंत्री या नात्यानें त्यांची अब्रू कमी न होतां मद्यपान-निषेधक या नात्यानें ती जास्ती वाढली असती. शिक्षणाला पैसा पाहिजे, पण तो मिळण्याकरितां राखीव खात्यांशीं भांडावें लागणार हें उघड आहे. पण परांजप्यांनीं नुसती प्रधानकी गाजवावी आणि हें भांडण भांडण्याला मात्र कोणा भलत्या गांवचा पाटील बोलवावा ! आपलें म्हणणें राखीव खात्यानें ऐकलें तर त्यांना राजिनाम्याची भीति दाखवावी हें स्वाभिमानबुद्धि सांगणार; म्हणून 'राजिनाम्याच्या भीतीची' भीति परांजप्यांना एव्हां-पासूनच वाटूं लागली आहे. व त्यांनीं सांगून टाकलें आहे कीं, राजिनामा देऊं म्हणणारा मनुष्य सरकारच्या दृष्टीनें नालायक ठरेल. पण याच्या उलट आपलें कांहीं चालत नाहीं असें असतांहि जो प्रधान घाण्याच्या बैलाप्रमाणें मानेवर जूं घेऊन ठरीव वाटोळ्या रंगणांत फेऱ्या घालीत राहील तो लोकांच्या दृष्टीनें नालायक ठरेल हें परांजप्यांनीं विसरूं नये.

खेड्यांतील शिक्षण व अस्पृश्यवर्ग *

बुधवार, ता. २९ रोजीं श्रीशिवाजीमंदिरांत न. चिं. केळकर, यांचे अध्यक्षतेखालीं प्रो० कानिटकरांचें वरील विषयावर व्याख्यान झालें. अध्यक्ष प्रास्तविक भाषणांत म्हणाले, अस्पृश्यता घालविण्यास व्यक्ति, संस्था व प्रत्यक्ष राष्ट्रीय सभा प्रयत्न करीत आहेत. वर्णाश्रमवादी असूनहि महात्मा गांधी हे कट्टे स्पृश्यतावादी आहेत. परंतु अस्पृश्यता ही केवळ स्पर्श केल्यानें जाणारी नाहीं. स्पृश्य-अस्पृश्य यांतील फरक केवळ शिक्षणामुळेंच जाऊं शकेल. स्वच्छ कसें राहावें व मन उदार कसे ठेवावें हें केवळ शिक्षणा-नेंच समजेल. अस्पृश्यता केवळ ब्राह्मणच मानतात असें नाहीं. खेड्या-पाड्यांतून महाराला अस्पृश्य मानणारे ब्राह्मणेतरच ब्राह्मणांच्यापेक्षां जास्त आहेत. या वादांत केवळ ब्राह्मण व ब्राह्मणेतर असा भेद नसून स्पृश्य व अस्पृश्य असा भेद आहे. ब्राह्मण व मराठे या दोघांनींहि मिळून ही अस्पृश्यता घालविली पाहिजे.

* केसरी, तारीख ५ जुलई १९२१

यानंतर प्रो० कानिटकर म्हणाले, अध्यक्षांचें प्रास्ताविक भाषण मलाहि मान्य आहे. खेड्यापाड्यांत अस्पृश्य वर्ग जास्त आहे. प्रत्येक पदवीधरानें मनावर घेऊन त्यांस शिकविलें पाहिजे. मुंबई इलाख्यांत सुमारें २ कोटी लोकांपैकीं प्राथमिक सक्तीच्या शिक्षणास योग्य अशीं २४–२५ लाख मुलें निघतील. खेड्यापाड्यांतून शिक्षणाचा खर्च कमी येतो. पुण्यांत कदाचित् २५ रु. येईल. पूर्वी तीन कौन्सिलरांत राज्यव्यवस्थेचें काम भागत असे, पण सध्यां सात झाले आहेत व प्रत्येकाचा सालिना पाऊण लाख पगार जातो. या एकाच्या पगारांत ५००० मुलांचें शिक्षण होईल. पण एकटा पांच हजारांचें शिक्षण खाऊन जातो. दारूखात्याचें उत्पन्न कमी केलें तरी पोलिसखातें सरकार कमी थोडेंच करणार? पब्लिक वर्क्समधलेहि अवास्तव पगार वाढले आहेत. पण याकरितां इतर एक्झिक्यूटिव्ह ऑफिसरांशीं भांडणें प्रधानाचें काम आहे. पण पैसा उभारावयाचा कसा, कर कोणते वाढवावयाचे हें ठरविण्याचें मिनिस्टरचें काम आहें. हेंहि आम्हांलाच विचारलें तर मिनिस्टर कशाला? लहान मुलें एकमेकांस लागलेल्या तीन रुपयांचा खेळ करितात. मधल्यावर दाब देऊन एक रुपया त्यावर आडवा मारला, कीं त्याचा मार शेजाऱ्यास लागून तो लांब उडतो. शिक्षणमंत्री हा मधल्या दाबलेल्या रुपयासारखा आहे. चांगल्या बुद्धीनें का होईना, पण त्याचें कल्याण व्हावेंसें वाटत असेल तर त्यावर लोकमतानें प्रहारच केले पाहिजेत. दिवाणाच्या अंगाला न लागतां हा मार इतर खात्यांना लागेल. शिक्षण सक्तीचें केलेंच पाहिजे. त्याबद्दलचा अवश्य तेवढाच खर्च आम्ही सोसूं. मात्र प्रधानानें हक्काकरितां इतर खात्यांशीं भांडावयाचें कीं नाहीं, कसे कर बसवावयाचे, हें स्वतः ठरवावें. सक्तीचें शिक्षण हाच अस्पृश्यता जाण्यास उपाय आहे.

यानंतर डॉ० रुईकर यांनीं सांगितलें कीं, अस्पृश्यतेचा प्रश्न धर्माचा आहे. त्यावर शंकराचार्य मुळींच गप्प बसतात. त्यांनीं अस्पृश्यता गेली पाहिजे असें सांगावें. न सांगितल्यास लोकमतानें त्यांस तसें करण्यास भाग पाडावें.

प्रो० नाईक म्हणाले, सर्वांनीं हा प्रश्न हातीं घ्यावा. नॉर्वे देशांतल्याप्रमाणें दरवर्षी तीनच महिने लोकांना शिक्षण दिलें तरी हे खर्चाचा प्रश्न

आपण होऊन सोडविल्यासारखें होईल. स्वयंसेवकांनीं मला नांवें द्यावीं. त्यांना भरपूर काम मिळेल.

यानंतर अनाथ विद्यार्थिगृहाच्या कानिटकरांनीं सांगितलें, कौन्सिलें किंवा प्रधान आमचे नाहींत, पण प्राथमिक शिक्षणाचा खर्च चरक्याच्यावर भागूं शकेल.

उत्तरादाखल प्रो० कानिटकरांनीं थोडेंसें भाषण केल्यानंतर केळकर आपल्या भाषणांत म्हणाले, "मी व्यक्तीला अनुलक्षून बोलत नाहीं. एक क्ष प्रधान आहे असें समजून बोलतों. पण प्रधानानें आपल्याकडून शक्य तितका प्रयत्न केला आहे असें दिसल्याशिवाय आमचें समाधान व्हावयाचें नाहीं. कानिटकर म्हणाले कीं, दंड भक्कम करण्याकरितां मिनिस्टरवर आपण तडाखे दिले पाहिजेत. पण मिनिस्टर जर इतका स्वाभिमानी असेल व आम्हांलाहि वाटलें कीं, आपल्या तडाखे देण्यानें त्याला उपयोग होईल तर आम्हीहि आमच्याकडून कसूर करणार नाहीं. पण प्रधान स्वाभिमान दाखविणारा असला तर उपयोग ! नाहींतर चावून चिवट असें व्हावयाचें. व्याख्यात्यांनींच सांगितलें कीं, एकटे पराजपे ५००० विद्यार्थ्यांचें शिक्षण खातात. म्हणून मी त्यांना अशी जाहीर सूचना करतों कीं, त्यांनीं तात्पुरता लागणारा खर्च घेऊन निदान दोनतीन हजारांचें तरी शिक्षण आपल्या पगारांतून करावें. त्यानीं सिव्हिल सर्व्हिसचा नाद सोडून जन्मभर स्वार्थत्याग केला व आतां शेवटीं ६००० रुपये पगार घेण्यांत स्वार्थत्यागाची त्यांची परंपरा बिघडते असें माझें त्यांना सांगणें आहे. मोठेपणा राखण्याकरितां सहा हजार पगार घ्या. पण तो स्वतःजवळ मात्र ठेवूं नका. यानें सर्व गोष्टी साधतील. त्यांचा प्रामाणिकपणा दिसेल. अधिकाऱ्यांशीं त्यांचें वजन राहील, व त्यांच्याच शिक्षणकार्याला त्यांनीं मदत केल्यासारखें होईल; व असें तीन वर्षें लागोपाठ झालें तर मग परांजप्यांनाच इतर अधिकाऱ्यांना म्हणतां येईल कीं, 'कशाला तुम्हांला येवढा भाराभर पगार ? टाका थोडासा तुमच्यांतला. पण स्वतः परांजपे ही गोष्ट न करितां त्यांना सांगूं लागतील, तर ते उलट म्हणतील कीं, वेळ आली तेव्हां परांजप्यांनीं इतका पगार घेण्याला काय कमी केलें ?

प्रथमतःच कर बसविण्याचें प्रधान बोलूं लागेल तर सर्व फसेल. लोकांच्या स्वार्थत्यागाखेरीज ही गोष्ट होणार नाहीं हें मला मान्य आहे.

पूर्वी टिळकांनींहि जाहीर सभेंत सांगितलें होतें कीं, 'दारू बंद करण्याचा अधिकार तुम्हास आहे' असा हुकूम सरकारनें मला द्यावा, दारूच्या उत्पन्नाचे ४ कोटि रुपये मी सरकारला मिळवून देतों. पण आज प्रत्येक खात्याच्या प्रधानाची गोष्ट अगदींच मुलखावेगळी. त्यानें म्हणावें, "तुम्हांला दारू नकोना? द्या ४ कोटि रुपये." शिक्षणमंत्र्यानेंहि म्हणावें "शिक्षण पाहिजे ना? टाका ३ कोटि रुपये." प्रधानांना कांहीं जबाबदारी नाहीं. आम्ही ३ कोटि रुपये त्यांना मिळवून द्या; मग हे तेथें कशाला मिनिस्टर? चार कोटि रुपये कसे उभारावयाचे हें आम्हांलाच विचारावयाचें असेल तर तुम्ही घरीं होतां तें काय वाईट होतें? यांतला सगळा कावा असा आहे; लोकांनीं सुचवावें कोणकोणत्या खात्यांतून कसकसा वसूल करावा; सर्व बजेट लोकांनीं ह्यांच्याजवळ द्यावें; नंतर त्यांनीं सरकारला सांगावें "लोक इतके कर बसवून घेण्यास कबूल आहेत; हा घ्या त्यांचा कबुलीजबाब" पण हें होणार नाहीं. स्वतः मिनिस्टरनें झीज सोसली पाहिजे. स्वतः विचार करून स्कीम तयार केली पाहिजे व नंतर जाहीर करावें कीं, इतका खर्च लागेल, इतका कमी पडेल. असें प्रामाणिकपणानें केल्यास लोक कमी पडलेला पैसा जरूर देतील. परांजप्यांनीं प्रामाणिकपणानें अंग घासून व इतर खात्यांशीं वेळ पडल्यास भांडण्याची आपली तयारी दाखवून स्वतःची स्कीम जाहीर करून कार्याला लागावें. तूट येणारे पैसे मी त्यांना पुरवतों असें मी जाहीर रीतीनें सांगतों. पण जी गोष्ट व्यवहारज्ञानाच्या दृष्टीनें शेवटीं बोलावयास पाहिजे ती कर बसविण्याची गोष्ट, हे पहिल्यानेंच लोकांच्या तोंडावर मारतात व म्हणतात कीं, "शिक्षण पाहिजे तर टाका ३ कोटि रुपये." म्हणजे तुम्ही तेथें (प्रधान) आहांत हा जुलूमच झाला म्हणावयाचा! मग पूर्वी घरीं होतां तें काय वाईट होतें? स्वतःची स्कीम असल्याशिवाय कराची गोष्ट बोलणें म्हणजे विनाकारण आपली कूस दुसऱ्याला दाखविण्यासारखें आहे. आणि शिक्षणाचा पुत्रलाभच होणार नसेल तर कूस दाखवून तरी उपयोग काय? केळकर पुढें म्हणाले कीं, अनाथ विद्यार्थी-गृहाचे कानिटकर म्हणाले चरक्यांनीं हा प्रश्न सोडवितां येईल. पण मला तसें वाटत नाहीं. आज कौन्सिलें आमचीं नाहींत म्हणून काय झालें! आज असहकारिता केली आहे ती शाश्वत नसून अजीर्ण घालविण्याकरितां

केलेल्या उपोषणासारखी आहे. उपोषण हें जसें मरेपर्यंत करावयाचें नसतें त्याप्रमाणें असहकारिता ही जन्माची थोडीच करावयाची आहे! या उपोषणाचें पारणें फेडण्याची वेळ उद्यां येणार आहे. त्यावेळेला नुसतें पारणें नाहीं तर लखलखीत द्वादशी करूं.

शेवटीं परांजप्यांना हेच सांगावयाचें आहे कीं, त्यांनीं कसूर न करितां शक्य तर वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं झगडण्याची तयारी दाखवावी. स्वाभिमान शून्यतेनें लोकांनाच ४ कोटींचा हवाला विचारूं नये. आतां येवढा मोहरा इरेसच पाडण्याची वेळ आली तरी आम्हीहि पाहूं!"

दिवाणसाहेबांचा कारभार!

आमचे शिक्षणमंत्री रघुनाथराव परांजपे यांच्या कारकीर्दीचे दिवस अधिकाधिक लोटत चालले, तसतसा त्यांच्या कर्तृत्वाचा मोकळेपणा लोकनिदर्शनाला अधिकाधिकच येत चालला आहे. ते शिक्षणाचे अध्वर्यु व उदारमतवादित्वाचे अस्सल गड्डे, म्हणून प्रधानपद लाभल्यावर त्यांच्या हातून प्राथमिक शिक्षणाची प्रगति होईल अशी लोकांना थोडीबहुत अपेक्षा होती; पण ती सर्व निष्फळ ठरूं पाहात आहे. हल्लीं त्यांनीं सक्तीच्या शिक्षणासंबंधानें चौकशी करण्याकरितां एक कमिटी नेमिली आहे. पण ती नेमण्याच्या सरकारी ठरावांतच जी भाषा योजण्यांत आली आहे तिच्यावरून आपल्या दुर्बल धोरणांत टेकावयाला कोणी आधार पाहिजे म्हणून त्यांनीं ही कमिटी नेमून घेतली असावी असा भास होतो. आजवर तीन चार म्युनिसिपालिट्यांच सक्तीचें शिक्षण लागू करण्यास पुढें आल्या असा ठरावांत दोष दिला आहे. पण सरकारी ग्रँट एकंदर खर्चाच्या निम्म्याहून किती अधिक कोणास देण्याचा सरकारचा विचार होता याचा उल्लेख नाहीं, व म्युनिसिपालिट्यांची सांपत्तिक स्थिति परांजप्यांना माहीत नाहीं असेंहि नाहीं. सक्तीच्या शिक्षणाबद्दल लोकांनीं उत्सुकता दाखविली आहे असें म्हणून ठरावांत दिवाणसाहेबांनीं त्यांच्या तोंडाला स्तुतीचीं पानें

[१] केसरी, तारीख २६ जुलै १९२१

पुसलीं आहेत; पण खर्चाचा पैसा कोठून आणावा, सक्ति करावयाची ती कोणाकडून करवावी वगैरे तपशिलांच्या गोष्टीवर लोकांनीं निश्चित मत दिलें नाहीं, म्हणून असें निश्चित मत बनविण्याचें शहाणपण त्यांच्या अंगीं नाहीं, अशी गर्भित निंदाहि केली आहे. दिवाणसाहेबांच्या अंगावर खोगीर चढलें नव्हतें तेव्हां त्यांनीं स्वतः असल्या वादविवादांत पूर्वी भाग घेतला होता; पण वरील मुद्द्यांवर त्यांनीं तरी स्वतःचें निश्चित मत कोठें दिलें होतें ? मग इतर गांवढळ लोकांप्रमाणे रँगलरसाहेबांनाहि हें मत देण्या-इतकें शहाणपण नव्हतें असेंच समजावयाचें कीं काय ?

पण या ठरावांत याहीपेक्षां विशेष मौजेची व आश्चर्याची गोष्ट आहे ती ही कीं, 'जनतेंतील बहुमत शिक्षणविषयक सक्ति करून घेण्यास अनुकूल नाहीं,' म्हणून शिक्षण सक्तीचें करूं नये असा ध्वनि निघण्यासारखी भाषा वापरली आहे ! परांजपे दिवाण झाल्याबरोबर त्यांना एकेक नवीन शहाणपण सुचूं लागलें असलें पाहिजे. कारण पुणे म्युनिसिपालिटींतील राष्ट्रीय पक्षानें पुण्यांतील सर्व मुलग्यांना सक्तीचें शिक्षण देण्याचा प्रश्न पुढें आणला, तेव्हां मुलांबरोबर सर्व मुलींनाहि शिक्षण दिलें पाहिजे व तेहि सरकारच्या विशेष मदतीची अपेक्षा न बाळगतां दिलें पाहिजे असें थोतांड माजवून याच परांजप्यांनीं गोंधळ घातला तेव्हां त्यांचें हें शहाणपण कोठे गेलें होतें, कळत नाहीं ! सक्तीच्या शिक्षणाच्या खर्चाविषयीं ठरावांत लिहितांना तर, परांजप्यांच्या हातून सरकारी खर्चाच्या काटकसरीला कांहीं मदत होईल याविषयीं लोकांची कायमची निराशाच त्यांनीं करून टाकली आहे. या शिक्षणाला लागणारा बहुतेक पैसा नव्या करपट्टीनें वसूल करावयाचा हेंच जर दिवाणसाहेबांचें मत तर ते मत लोकांनीहि पूर्वी सहज देऊन टाकलें असतें. जितका पैसा यापुढें कोणत्याहि सरकारी कामाला नवीन लागेल तितका सर्व नव्या करांनीं वसूल करावा हें म्हणण्यास फारसें शहाणपण लागत नाहीं, व त्याकरितां प्रधानकीचा सालिना साठपांसष्ट हजार रुपये इतका खर्च रयतेला पाडण्याचेहि कारण नाहीं. कांहीहि असो; पुण्यांतील 'उदारमतवाद्यां'चे पुढारी आतां पुरे रंगणावर आले, व पूर्वीच्या त्यांच्या बडबडींत किती फेंसाळपणा, किती बालिशता व किती बढाईखोरपणा होता हें पाहण्याला लोकांना आतां पुरा अवसर मिळेल. हे अनाथांचे नाथ,

गरिबांचे कनवाळू, मागसलेल्यांचे पुढारी व हे अस्पृश्यांचे आलिंगनदाते, राष्ट्रीय पक्षाला जनतेच्या हिताची कळकळ नाहीं असें बरळत असत; पण तेच आतां प्रधानपदस्थ झाल्याबरोबर लोकांना शिक्षणविषयक सक्ति कितपत रुचेल याविषयीं त्यांना स्वतःलाच शंका येऊं लागली आहे !

गतवर्षी निवडणुकीच्या वेळीं ५ जुलै रोजीं याच परांजप्यांनीं आपला मॅनिफेस्टो ऊर्फ जाहीर विनंतिपत्रक काढिलें, त्यांत त्यांनीं मतदारांना जीं अठरा आश्वासनें दिलीं त्यांतलें पहिलेंच आश्वासन, कर्मधर्मसंयोगानें, सक्तीच्या शिक्षणाचें आहे. Compulsory primary education both for boys and girls (मुलांमुलींचें सक्तीचें प्राथमिक शिक्षण). वरील वचनांतून निसटून जातां येण्यासारखे पळवाटीचे शब्दहि त्यांनीं मॅनिफेस्टोंत घातलेले नव्हते. उलट मागासलेल्यांचा मी कट्टा दोस्त आहे, आणि हीनजन्म, स्त्रीजन्म किंवा दारिद्र्य यांपैकीं एकाहि कारणानें येणारा मागासलेपणा कोणाचा राहूं नये याकरितां कौन्सिलमध्यें मी समानतेचा पुरस्कार करीन असें लिहून त्यांनीं खुंटी हलवून बळकट केली होती. पण परांजप्यांचे टीकाकारच वेडे खरे. कारण 'प्रधानपद मिळालें असतां मी काय करीन' अशा अर्थाचा तो कांहीं त्यांचा मॅनिफेस्टो नव्हता ! फक्त मतदारांनीं आपल्यास कौन्सिलांत निवडून द्यावें एवढ्यापुरताच तो होता. आणि शिडीवरून भिंतीवर चढून गेल म्हणजे शिडी लाथाडून द्यावी हा राजमान्यतेचा राजमार्गच आहे ! निवडणूक होण्याकरितां परांजप्यांना जसा हा मॅनिफेस्टो काढावा लागला तसा प्रधानकी मिळविण्यालाहि एखादा मॅनिफेस्टो काढावा लागला असण्याचा संभव आहे. मात्र कदाचित् तो जाहीर लेखी नसून तोंडी असेल ! पण मॅनिफेस्टोंत परांजप्यांनीं काय काय घातलें असेल याची कल्पना आतां हळुहळू कांनासहि होण्यासारखी आहे.

सक्तीच्या शिक्षणाविषयीं चौकशीची कमिटी नेमून शिक्षणमंत्र्यांनीं एका दगडानें दोन पक्षी मारण्याचा बेत केला असावा असें दिसतें. एक तर सक्तीच्या शिक्षणाकरितां नवे कर बसविण्याच्या त्यांच्या 'उदार' कल्पनेस दुजोरा मिळेल. दुसरें, प्राथमिक शिक्षकांना जी पगारवाढ सरकारनें कबूल केली होती तिलाहि आयतांच खो बसला, या पगाराच्या बाबतींत जी कमिटी पूर्वी नेमली होती तिच्या शिफारसी सरकारनें मान्य केल्या, व

शिक्षकांनींहि निरुपायास्तव समेटादाखल त्या कबूल करून त्यांनीं योजलेला संपहि थांबविला. या कमिटींत स्वतः रँगलर परांजपे हे एक प्रमुख सभासद असून त्यांच्या आश्वासनावरच हें प्रकरण तेव्हां असें मिटलें. अर्थात् स्वतः परांजपे हेच पुढें शिक्षणमंत्री झाल्यानें कमिटीचीं पगारवाढीचीं आश्वासनें ताबडतोब अमलांत यावयास पाहिजे होतीं. पण परवां त्यांजकडे डेप्युटेशन गेलें त्यावेळीं त्यांनीं "मजकडून कांहींएक होणार नाहीं, तुम्ही चंदावरकरकमिटीकडे अर्ज करा, फिरून साक्षी पुराव्यापासून आपलें सर्व भांडण नव्यानें भांडा" असें सांगून लख्ख कानावर हात ठेवले म्हणतात!

तसें घडलें असेल तर या विश्वासघाताला जोड नाहीं! परांजपेसाहेबांची ही पुच्छप्रगति पाहून बिचाऱ्या शिक्षकवर्गाला काय वाटेल याची वाचकांनींच कल्पना करावी! दुय्यमपासून वरच्या सर्व शिक्षणशाखांच्या लोकांचे पगार वाटेल तसे वाढून पदरांत पडले देखील. याचें कारण त्यांचे वाली साहेब लोक, आणि प्राथमिक शिक्षकांची ही दुर्दशा; कारण त्यांचे वाली परांजप्यांसारखे दुर्बळ व बेभरंवशी नेटिव दिवाणजी! मिळून शिक्षक लोकांचें रक्षण अखेर त्यांचें त्यांनींच केलें पाहिजे असे ठरलें म्हणावयाचें! वास्तविक सक्तीच्या नव्या शिक्षणयोजनेचा व पूर्वी कबूल केलेल्या पगारवाढीचा कांहींएक संबंध नाहीं. ही वाढ योग्य म्हणूनच स्वतंत्र रीतीनें कबूल केलेली होती. चंद्रावरकर-कमिटीनें वाटेल तर ती लक्षांत घेऊन मगच आपली योजना निश्चित केली असती. पण बिचारे परांजपे तरी काय करणार? वरच्या जबरदस्त फिनान्सकमिटीला धक्का द्यावयाची शक्ति नाहीं, तेव्हां खालच्या शिक्षकवर्गाला लाथा देऊनच त्यांना आपलें पद संभाळलें पाहिजे!

निवडणुकीचा निकाल*

मुंबई युनिव्हर्सिटीच्या निवडणुकीचा निकाल अपेक्षेप्रमाणेंच लागून बॅ० जयकर निवडून आले. आपण पराभूत होणार ही जाणीव परांजपे यांना आधींपासूनच होती असें स्वत: त्यांनींच कबूल केलें आहे. एका दृष्टीनें ही निवडणूकच स्वराज्यपक्षाच्या यशाची खरी खूण मानावी लागते. कारण मतदार अशिक्षित नसून सात वर्षें मुरलेले पदवीधर होते. पण याहि पराभवाला कांहीं तरी कारण म्हणून सांगण्याचा मोह परांजपे व त्यांचे काळेगोरे स्नेही यांना आवरला नाहीं. त्यांनीं असें कारण जाहीर केलें आहे कीं, असंतुष्ट अशा पदवीधरांनीं परांजप्याविरुद्ध मतें दिलीं ! आजवर राजकीय चळवळीचे आधारस्तंभ 'फेल्ड' (नापास झालेले) बी. ए. असें सरकार म्हणत असे. आतां हा दर्जा वाढून पास झालेल्या पदवी मिळालेल्या सुशिक्षितांचाहि त्यांत समावेश होऊं लागला म्हणावयाचा ! या पुढें हें वर्णन 'नापास झालेल्या असंतुष्ट कौन्सिलरांना' लाभो अशी इच्छा आहे. खरेंच आहे, परांजपे यांना दिवाणगिरी एकदां मिळाली असून दुसऱ्यानें मिळावयाची ती बुडाली म्हणून त्यांचा असंतोष होतो; तर ज्यांना परांजप्यांनीं पहिल्यानेंहि लहानशी नोकरी दिली नाहीं त्यांना राग यावा हें साहजिकच आहे ! परांजपे हे आतां द्राक्षें आंबट म्हणून असेंहि बोलूं लागले आहेत कीं, 'बरें झालें स्वराज्यवादी निवडून आले. त्यांना दिवाणगिरी व विधायक कार्य कसें अवघड असतें हें चांगलें कळून येईल !' पण स्वराज्यपक्षीयांना दिवाणगिरीच्या अडचणी कळून येण्यास सरकारच्या व त्यांच्याहि इच्छेमुळें मार्ग नाहीं हें परांजपे जाणतातच. बाकी 'काम साधलें नाहीं' याची व्याख्या 'काम अवघड आहे' या पर्याय शब्दांनीं करणें हा प्रकार कांहीं नवा नाहीं. हें आपमतलबी समीकरण गणिताचें ज्ञान नसणाराच सोडवितो ! विधायक कामगिरीचें पिल्लूं फिरून या वादांत पुढें आलेंच आहे. पण स्वराज्यवादी हे जर बोलूनचालून सरकारच्या अडवणुकीकरितां कौन्सिलांत शिरताहेत, तर त्यांना विधायक कार्य करतां न

* केसरी, १९२३

आलें तर त्यांत फारसा तोटा नाहीं. 'आतां विध्वंसक टीकेची मात्र चंगाळी होईल' असें परांजपे यांनींच सांगितलें आहे, व स्वराज्यपक्षीयांना पूर्ण प्रांतिक स्वराज्य मिळेपर्यंत, हें सर्टिफिकीट पुरेसें आहे. 'असंतुष्ट' पदवीधरांप्रमाणें 'ऋणानुबंधी' वकीलवर्गावरहि परांजपे याचा आक्षेप आहे. पण ऋणानुबंधाचे आरोपांतून स्वतः परांजपे यांना मतें देणारे मतदार तरी कसे सुटणार ? कसेंहि असो; परांजप्यांना आपल्याविषयींचें लोकमत कळण्याचा आज जो प्रसंग आला तो तीन वर्षांपूर्वीच यावयाचा; पण तो टळून त्यांना तीन वर्षें दिवाणगिरी लाभली याबद्दल त्यांनीं असहकारितेच्या तीन वर्षांपूर्वीच्या हुल्लडीचे आभारच मानले पाहिजेत. मवाळपक्ष हा राष्ट्रीय पक्षाशीं तुल्यबल असें दाखविण्याचा प्रयत्न परांजपे यांनीं लो० टिळकांच्या आयुष्याच्या अखेरच्या सालीं कोणकोणत्या प्रकारांनीं केला; पुण्याचें मानपत्र, सोलापुरची प्रांतिक सभा, जुन्नर येथील जिल्हा परिषद इत्यादि प्रसंगीं ब्राह्मणेतरांचें उसनें पाठबळ घेऊन त्यांनीं कसा धिंगाणा घातला, याची आठवण परांजप्यांच्या मतदारांना होती. व तीन वर्षांच्या दिवाणगिरींतील गौरकाय व सरकार यांविषयींचें त्यांचें पक्षपातित्व लोकांच्या चांगलें नजरेस आलें, म्हणूनच त्यांचा पराभव झाला अशी आमची मीमांसा आहे. त्यांतूनहि जयकर हे सुसंस्कृतीनें त्यांच्याच योग्यतेचे आहेत; त्यांना निवडून दिलें यांत मतदारांनीं वाईट तें काय केलें ? टाइम्सनें म्हटल्याप्रमाणें जयकर हे 'परांजप्यांहून वेगळ्या पेठेंत राहतात.' शब्द मुग्ध असले तरी त्यांचें निंदाव्यंजकत्व झांकत नाहीं. खरेंच आहे, परांजपे यांचें घर 'राज' रस्त्यावर आहे, जयकरांचें स्वराज्यपक्षाच्या आळींत आहे! विधायक कार्य, विशेषतः दिवाणगिरी, अवघड आहे हें जर परांजप्यांना कळून चुकलेंच होतें तर, त्यांनीं आंबट द्राक्षांच्या या घोसाला फिरून हात घालण्याचे आधींच माघार घेऊन तो घेण्याला दुसऱ्याला मार्ग मोकळा सोडला असता तर त्यांना वादाची बाजू तरी परतवितां आली असती.

टिळक व इंग्रजी शिक्षणपद्धति *

(म. गांधींनीं सुरू केलेला एक महत्त्वाचा वाद)

पुण्यांत लो० टिळकांची प्रथम श्राद्धतिथि अत्यंत उत्साहानें व पुण्यास शोभेल अशा कार्यक्रमानें पाळली गेली याविषयीं कोणासहि समाधान वाटल्यावांचून रहाणार नाहीं. गतवर्षीं लो० टिळकांना तिलांजलि देण्याच्या दिवशीं लाला लजपतराय हे पुण्यास आले होते; यंदां प्रथम श्राद्धतिथीच्या दिवशीं महात्मा गांधी हे आले. अशा रीतीनें लो० टिळकांच्या और्ध्वदेहिक धर्मक्रियेच्या दोन महत्त्वाच्या दिवशीं लजपतराय व गांधी यांसारखे दोन सर्वश्रेष्ठ पुढारी पुण्यास लाभले; व त्यांनीं आपल्या वक्तृत्वपूर्ण शब्दांनीं केलेली टिळकांची स्तुति ऐकून व आपले समानधर्मी असे प्रमुख लोक इतर प्रांतांतहि आहेत हें पाहून, टिळकभक्तीविषयीं पुणेकरांचा आत्मविश्वास दृढतर झाल्यास नवल नाहीं. महाराष्ट्रांतील लोक आत्मीयबुद्धीनें टिळकांची भक्ति करितातच; पण आत्मिक भावनेपेक्षांहि अधिक प्रशस्त, विस्तृत व सात्त्विक असें अधिष्ठान आपल्या भक्तीला आहे असें महाराष्ट्रीयांनीं म्हटल्यास त्यांत कांहीं वावगें नाहीं. टिळकांच्या खऱ्या योग्यतेचें परीक्षण आजवर झालें याहून अधिक निरानिराळ्या दृष्टींनीं अद्यापि व्हावयाचेंच आहे व या दृष्टींपैकींच एक दृष्टि म्हणून खालील दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

यांचें कारण असें कीं, महात्मा गांधी यांनीं कांहीं महिन्यांपूर्वी इंग्रजी शिक्षणावर जवळजवळ बहिष्कार घालावा असें सुचवितांना असें एकविधान केलें होतें कीं, इंग्रजी शिक्षण टिळक न घेते तर ते झाले याहून अधिक मोठे झाले असते. व केवळ इंग्रजी शिक्षणामुळेंच ते खुरटून गेले. टिळक इंग्रजी शिक्षण न घेते तर कदाचित् पूर्वकालीन साधुसंतांप्रमाणें खरे लोकमान्य झाले असते; पण या शिक्षणामुळे या साधुसंतांच्या मानानें ते बाहुलीसारखे किंवा बटुवामनासारखे हलके भरतात. टिळकांच्या जोडीला उपरि-

* लोकसंग्रह, खास अंक १९२०

निर्दिष्ट लेखांत महात्मा गांधी यांनीं राजा राममोहन राय यांनाहि बसविल्याचें वाचकांस स्मरत असेल. मॉर्डन रिव्ह्यूचे संपादक व मि० अँड्रयूज यांना ही तुलना न आवडून त्यांनीं राजा राममोहन राय हे इंग्रजी शिक्षणामुळें खुरटले नव्हते व एका विशिष्ट दृष्टीनें पाहतां राममोहन राय यांची योग्यता, साधुवर्य चैतन्य यांच्याहून कमी नव्हती असें मॉर्डन रिव्ह्यूच्या एकदोन अंकांत सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. असाच प्रश्न लो० टिळकांच्या योग्यतेसंबंधानेंहि लक्षांत घेण्यासारखा आहे. व लोकसंग्रहाच्या वाचकांचें लक्ष या विषयाकडे वेधावें एवढाच प्रस्तुत लेख लिहिण्याचा माझा उद्देश आहे.

महात्मा गांधी यांच्या उपरिनिर्दिष्ट लेखांत 'पिग्मी' (बटुवामन) हा जो शब्द आला आहे त्यासंबंधानें प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं, तो कित्येक लोक मानतात त्याप्रमाणें निदाव्यंजक नाहीं. तो शब्द घालण्यात टिळकांना कमीपणा आणण्याचा गांधींचा उद्देश नसून, टिळक हे मोठे व लोकमान्य असले तरी त्यांच्याहून अधिक मोठीं लोकमान्येतर अशीं माणसें आपणांतच पूर्वी होऊन गेलीं; आणि विशेषेंकरून याचें कारणहि टिळकांना इंग्रजी शिक्षण घ्यावें लागलें, इतरांना तें घ्यावें लागलें नाहीं, एवढेंच प्रतिपादण्याचा त्यांचा हेतु होता असें मला वाटतें. जे लोक 'पिग्मी' या शब्दामुळें नाराज झालेले आहेत त्यांनीं गांधींच्या लेखांतील प्रस्तुत व अप्रस्तुत यांतील भेद ओळखला नाहीं असें दिसतें. गांधींना टिळकांची स्तुति विवक्ष्य नसून इंग्रजी शिक्षणाची निंदाच विवक्ष्य होती, हें जरूर लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. निदान टिळकांना तुलनादृष्टीनें किंचित् कमीपणा आणण्यासारखा शब्द वापरतांना गांधींच्या मनांत चैतन्य वगैरे साधूंविषयीं फाजील बहुमानबुद्धि होती,असें कोणीं वाटेल तर म्हणावें;पण स्वतःविषयींच्या अहंकारबुद्धीनें गांधींची ही चूक झाली असें कोणी मानण्याचें कारण नाहीं. कां कीं, लेखांत गांधींनीं टिळकांची व आपली तुलना करून त्यांच्यापुढें आपणहि बटुवामन आहों असें स्पष्ट म्हटलें आहे.

असो; टिळक मोठे कीं गांधी मोठे हा वादाचा मुद्दा नसून टिळक, राममोहन राय वगैरे इंग्रजी शिकलेले लोक चैतन्यादि साधूंहून फार कमी योग्यतेचे ठरतात कीं काय, हाच वादाचा मुख्य प्रश्न आहे. याचें उत्तर

देतांना दोन प्रकारची सावधगिरी ठेवणें जरूर आहे. एकीकडे टिळकांची व राममोहन राय यांची न कळत निंदा होईल एवढीच भीति मनांत बाळगणारा मनुष्य, तसें न व्हावें म्हणून, इंग्रजी शिक्षणपद्धतीला योग्य तो दोष देण्यापासून परावृत्त होण्याचा संभव आहे. दुसरे पक्षीं, इंग्रजीपेक्षां जुनी शिक्षणपद्धति अधिक चांगली असें सिद्ध करण्याच्या भरांत टिळक, राममोहन राय इत्यादि लोकांच्या खऱ्या योग्यतेकडे न कळत दुर्लक्ष होण्याचा संभव आहे. आमच्या मतें रामानंद चतर्जी व अँड्रयूज यांनीं पहिल्या प्रकारची चूक केली असून; महात्मा गांधी यांनीं दुसऱ्या प्रकारची चूक थोडीशी केली आहे. प्रथम अँड्रयूज वगैरेंच्या विचारसरणीकडे पाहूं. गांधींच्या हल्लघाचा मुख्य रोंख इंग्रजी राज्यांतील शिक्षणक्रमाविरुद्ध जितका आहे तितका इंग्रजी भाषेच्याविरुद्ध नाहीं, हें अँड्रयूज प्रभृतींनीं लक्षांत ठेवलें नाहीं. भाषा ही बिचारी कोणाचेंच कांहीं घोडें मारीत नसते. उलट इंग्रजी भाषेनें हिंदी लोकांना पूर्वकालीं अगम्य असलेलें असें एक नवीनच ज्ञानभांडार उघडून दिलें आहे. हा तिचा आमच्यावर उपकारच आहे; पण इंग्रजी भाषेबरोबर इतर गोष्टीहि इंग्रजी शिक्षणांत येतात व त्यांचाच परिणाम मुख्यत: आपल्या मनावर अनिष्ट होतो. भाषा तीच; पण तींत इष्ट ग्रंथांप्रमाणें अनिष्ट ग्रंथहि असूं शकतात. आणि अनिष्ट ग्रंथ वर्ज्य करून इष्ट ग्रंथ तेवढे विद्यार्थ्यांच्या हातीं पाडण्याची सत्ता हिंदी लोकांना मिळाल्यास इंग्रजी शिक्षणाशीं त्यांचें भांडण होण्याचें कारण नाहीं. व इष्ट व अनिष्ट हा भेद अत्यंत महत्त्वाचा आहे व ही सत्ता हातीं येईपर्यंत हा तंटा कायम राहणार हें उघड आहे. इंग्रजी भाषा ही हिंदी लोकांना परकी भाषा, हाहि येथें मुख्य मुद्दा नाहीं. कारण अमेरिकन लोक व इंग्रज लोक या उभयतांनाहि इंग्रजी ही मायभाषाच असली तरी खऱ्या राष्ट्रीय दृष्टीनें अमेरिकन व इंग्रज आपआपल्या मुलांना त्याच भाषेंतील वेगवेगळीं पुस्तकें शिकवतील व त्यांचे अभ्यासक्रमहि वेगवेगळे असूं शकतील. राजा राममोहन राय हे जसे इंग्रजी राज्याखालीं असतांना स्वेच्छेनें परशिअन व अरेबिक भाषा शिकले तसेच विद्याव्यासंगी टिळक स्वराज्य असतें तरीहि कदाचित् इंग्रजी भाषा शिकून, इंग्रजी वाङ्मय वाचून इंग्रजी भाषेंत एखादा ग्रंथहि लिहिते. पण केवळ इंग्रजी राज्य

असल्यामुळें नुसत्या इंग्रजी भाषेलाच शिक्षणक्रमांत एवढें महत्त्व आलें कीं, त्यांचीं अनेक वर्षें इंग्रजीच्या अभ्यासांत व्यर्थ गेलीं व इंग्रज विद्वान् हेच खरे विद्वान् व त्यांच्या मनावर आपला पगडा बसला तरच आपण जिंकली, अशा बुद्धीनें टिळकांनीं 'ओरायन' व 'आर्टिक होम इन् धी वेदाज्' हीं पुस्तकें मूळ मराठींत लिहावीं व इंग्रजांनीं त्यांचा इंग्रजींत भाषांतर करावीं असं न होतां, त्यांनीं तीं मूळ इंग्रजींत लिहिलीं व निदान मागाहून तरी त्यांनीं स्वतः त्या विषयावर स्वतंत्र ग्रंथ लिहावे तेहि लिहिले नाहींत, असा आक्षेप टिळकांच्या कित्येक भक्तांनींच घेतला आहे. इंग्रज विद्वानानीं आजपर्यंत एकाहि महाराष्ट्रीय विद्वानाच्या ग्रंथाचें भाषांतर केलें नाहीं आणि टिळकांनीं मात्र दोन महत्त्वाचे ग्रंथ केवळ इंग्रजींत लिहिले याचा दोष विद्यमान शिक्षणपद्धतीकडेच दिला पाहिजे. व राज्यपद्धतीपासून शिक्षणपद्धति भिन्न असूं शकत नाहीं असें कोणीं म्हटलें (व ते खरेच आहे) तरी शिक्षणपद्धतीचा दोष कांहीं कमी होत नाहीं. मॉडर्न रिव्ह्यूच्या संपादकांनीं म्हटल्याप्रमाणें राममोहन राय यांच्या वेळेपेक्षां टिळकांच्या शिक्षणाच्या वेळीं ही अनिष्ट शिक्षणपद्धति अधिक दृढमूलच झाली होती. राममोहन राय यांना कदाचित् इंग्रजी भाषेतून विचार करण्याची संवय लागलेली नसेल; परंतु टिळकांच्या वेळीं तेथपर्यंत मजल येऊन ठेपली होती. तात्पर्य, राममोहन राय किंवा टिळक काय दोघांनाहि पाश्चात्य शिक्षणपद्धतीनें शिक्षण न मिळतें तर त्यांचें इंग्रजी भाषेचें ज्ञान जरूरीपुरतें राहूनहि त्यांच्या मोठेपणाला हरकत आली नसती. कारण टिळक किंवा राममोहन राय हे त्यांचे देशाभिमानाचे विचार व आचार आणि व्यापक विद्वत्ता यांच्यामुळें मोठे मानले जातात, त्यांच्या इंग्रजीच्या ज्ञानामुळें नव्हे.

दुसरे पक्षीं, महात्मा गांधी यांच्या विचारसरणींत आम्हाला दोष हा दिसतो कीं, इंग्रजी शिक्षणपद्धतीची निंदा करण्याच्या भरांत त्यांनीं टिळक, राममोहन राय यांना कबीर, नानक, चैतन्य यांच्याहून कमी योग्यतेचे ठरविले आहेत. आमच्या मतें या तुलनेला समान अधिष्ठान असें फारसें नाहीं. साधु हे देखील देशभक्त असतात व देशभक्तांच्या अंगींहि साधुत्व असतें; परंतु लौकिक व पारलौकिक हे दोन पंथच वेगळे असल्यामुळें साधु व राजकारणी पुरुष यांची तुलना करण्यांत फारसें स्वारस्य नाहीं. पण तुलनेचा हा विषय

काढलाच तर महात्मा गांधी म्हणतात तें बरोबर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. प्रथमच ही गोष्ट निदर्शनास येते कीं, कबीर, नानक, चैतन्य आणि टिळक, राममोहन राय या दोन वर्गांची तुलना दोन प्रकारांनीं करतां येईल. एक मनःसंस्कृति व दुसरा जनतेवर परिणाम. पहिल्या दृष्टीनें पाहतां कबीराचे दोहरे व टिळकांचे लेख हे ताडून पाहिल्यास टिळकांची मनःसंस्कृति किंवा परिणति कबीराहून कमी होती हें सिद्ध करणें कोणासहि जड जाईल. कबीर हे जितके ईश्वराशीं तादात्म्य पावले होते, तितकेच टिळकहि देशाशीं तादात्म्य पावले होते. टिळकांच्या लेखांत यमकें साधलीं नसलीं किंवा ठराविक छंदोबद्ध रचना केली नसली, तरी सत्यज्ञान देणारीं व अनुभवाचीं वचनें कबीराच्या वचनाइतकींच खणखणीत, झणझणीत, समर्पक, मार्मिक अर्शी खचित सांपडतील, टिळकांचे लेख निर्यमक होते म्हणून त्यांना अधोगति मिळाली व दोहऱ्याच्या पायऱ्यामुळें कबीराला मोक्षपद गांठतां आलें, असें कोणास म्हणावयाचें तर त्यानें खुशाल म्हणावें. कारण या उभयतांचीं आजचीं पारलौकिक स्थानें पाहून येऊन कोण सांगणार ?

दुसरा मुद्दा घेतला तर तुलनेचा कांटा कबीरापेक्षां टिळकांकडेच अधिक झुकेल. कबीर कितीहि लोकप्रिय असला तरी त्या लोकप्रियतेची व्याप्ति एक दोन प्रांतांपुरतीच आढळेल; पण टिळकांची लोकप्रियता सर्व नऊ दहा प्रांतभर पसरलेली आहे. कबीराच्या दोहऱ्यांनीं हिंदी जनतेला जितकें अध्यात्मज्ञान झालें असेल तितकें स्वराज्याच्या हक्काचें ज्ञान टिळकांच्या सुप्रसिद्ध चतुर्दश अक्षरी मंत्रानें खचित झालें असलें पाहिजे. स्वतः कबीरानें राम आणि रहिम हे एकच आहेत असें म्हटल्यानें हिंदु-मुसलमानांची एकी जितकी झाली असेल त्यापेक्षां आज मौलाना महंमदअल्लींनीं, टिळक हेच माझे राजकारणांतले गुरु, असें परस्पर म्हटल्यानें ती एकी होण्याचा संभव खचित अधिक आहे. सामान्य जनतेवर कबीर किंवा चैतन्य किंवा नानक यांचा जेवढा परिणाम घडला तितका किंवा त्याहूनहि थोडा अधिकच निदान टिळकांचा तरी घडला असें आम्ही खात्रीनें म्हणूं शकतों. मग राजा राममोहन राय यांजविषयीं तें तितकें खरें असो किंवा नसो, फार काय पण गांधी हे विनयामुळें आत्मनिंदा कितीहि करोत, पण सर्व हिंदु-स्थान मिळून घेतलें असतां स्वतः त्यांनीं जनतेवर जो परिणाम घडविला

तेवढा वरील साधुसंतांनीं घडविला नाहीं असें आम्हांस तरी वाटतें. टिळकांचें नांव हिंदुस्थानभर पसरण्याला कबीर-नानकांच्या वेळीं नसलेलीं आगगाडी, तारायंत्रें वगैरे साधनें विशेष कारणीभूत झालीं असें कोणाचें म्हणणें असेल, तर त्यास आमची हरकत नाहीं. पण प्रत्यक्ष वस्तुस्थितीबद्दल तरी वाद असण्याचें कारण नाहीं.

तात्पर्य, गांधी म्हणतात त्याप्रमाणें प्रस्तुतची शिक्षणपद्धति सदोष आहे खरी; परंतु ती तशी ठरविण्याकरितां टिळक, राममोहन राय यांना कबीर-नानकांहून कमी लेखणें अवश्य नाहीं.

लो० टिळकांच्या चरित्रासंबंधीं
[विद्यार्थ्यांस चार उपदेशपर शब्द]

[मंगळवार ता. १७ ऑगस्ट सन १९२० रोजीं फर्ग्युसन कॉलेजांत श्री० तात्यासाहेब केळकर यांचें "लो० टिळकांच्या चरित्रासंबंधीं चार उपदेशपर शब्द" या विषयावर व्याख्यान झालें. अध्यक्षस्थानीं प्रो० काळे हे होते. व्याख्यानाच्या आरंभीं एका विद्यार्थ्यानें एक सुंदर पद्य म्हटल्यानंतर अध्यक्ष प्रो० काळे म्हणाले "माझ्या विनंतीला मान देऊन प्रकृति नादुरुस्त असतांहि तात्यासाहेब येथें आले हे त्यांचे आपणांवर फार उपकार आहेत. तात्यासाहेब हें 'राजेश्री' टिळकांचे उजवे हात आहेत. व टिळकांचे सतत सान्निध्यामुळें आपण या विषयावर मत देण्यास कदाचित् असावे तितके योग्य नाहीं असें परवां मराठा पत्रांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या लेखावरून वाटण्याचा संभव आहे. इंग्रजीतहि No hero is a hero to his valet de chamber अशी एक म्हण आहे तिचाहि असाच अर्थ आहे. तरीपण ते समतोल वृत्तीचे असल्याकारणानें 'अतिपरिचयात् अवज्ञा' होण्याचें कांहीं कारण नाहीं. थोड्याच दिवसांपूर्वी तात्यासाहेबांनीं केसरीपत्रांत "टिळक सुटले पुढें काय?" असा अग्रलेख लिहिला होता. परंतु "आतां टिळक

गेले पुढें काय ?" असा प्रश्न पुढें उभा राहिला आहे. असो. आतां मी आपला जास्त वेळ न घेतां रा० तात्यासाहेब यांस आपलें भाषण करण्यास विनंति करतों.]

आज तुमच्यापुढें भाषण करण्यांत माझ्या मार्गांत तीन अडचणी आहेत. एकतर माझी प्रकृति आज बरी नसल्यामुळें मला फार मोठ्यानें बोलतां येणार नाहीं. आतांहि थोडी थंडी वाजतेच आहे ! तसेंच मी विद्यार्थ्यांच्या पुढें भाषण करणार आहें. व विद्यार्थ्यांच्या पुढें कशा तऱ्हेचें भाषण करावें लागतें हें आपणांस माहित आहेच. दुसरें असें कीं, मी फर्ग्युसन कॉलेजांत बोलत आहें. यांत सकृद्दर्शनीं कांहीं अवघड दिसत नाहीं; परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणा, किंवा कांहीं म्हणा पण फर्ग्युसन कॉलेजचे व टिळकांचे ग्रह कांहीं जमले नाहींत ही गोष्ट खरी ! तिसरी गोष्ट म्हणजे आपल्या अध्यक्षांनींच आतां आपणांस सांगितलें कीं, मी त्यांचा अतीशय निकटचा स्नेही आहे. मला ही गोष्ट कबूल आहे. पण मलाहि इतरांच्या संबंधानें असें म्हणतां येईल कीं, 'लोकमान्य' हा शब्द एकाद्याच्या तोंडून न आला तरी, मनांतून तरी तुम्ही ही पदवी मान्य करतांच करतां. (टाळ्या) आपणापुढें हें जें पद्य नुकतेंच म्हणण्यांत आलें त्यापेक्षां टिळकांची अधिक स्तुति ती मी काय करणार ? मी केवळ त्यांची स्तुति करण्यासाठीं येथें आलों नाहीं. कारण मी कांहीं भाट नाहीं. तसेंच गुणदोषविवेचनाच्या पद्धतीनेंहि आज मी आपणापुढें बोलणार नाहीं. कारण टिळकांत जरी एकादा दोष असला तरी यावेळीं मीं तो दाखवावा अशी ही वेळ नाहीं. यावेळीं दोषचर्चा ही अप्रस्तुत आहे. व दोषाविष्करणाची ही वेळहि नाहीं. मी त्यांचें नुसतें गुणवर्णन करणार नाहीं; तसेंच नुसतें दोषाविष्करणहि करणार नाहीं. तर मग मी तुमच्यापुढें आज काय बोलणार आहें ? मी आज ॲप्रीसिएशनच्या म्हणजे गुणग्राहकतेच्या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहणार आहें. या दृष्टीनें पाहतां नुसती निंदा किंवा नुसती स्तुतीच करावयाची नसते, फक्त गुण पहावयाचे असतात; व त्यांतल्या त्यांत जो चांगला गुण असेल तो प्रामुख्यानें दाखवावयाचा असतो. त्यापासून आपल्याला काय बोध घेतां येईल हें पहावयाचें असतें.

कोणी म्हणतील कीं ही दृष्टि एकेरी आहे. परंतु गुणग्रहण हें नेहमीं एकेरीच असणार. सर्वगुणसंपन्न असा कोण आहे? कांहीं गुण परस्पर-विरोधी असतात व ते दोघे एकाच माणसाच्या ठिकाणीं असणें हें प्रायः अशक्य असतें. रानड्यांच्याविषयीं असें सांगतात कीं, रानडे म्हणजे केवळ क्षमासमुद्र होता! याच्या उलट टिळक हे तापट होते. आतां हे दोन्ही गुण एकाचवेळीं एका माणसांत असणें केव्हांहि शक्य नाहीं. परस्पर-विरोधी अशा गुणांचा वास फक्त एका परमेश्वराच्याच ठिकाणीं कल्पिलेला आहे. कसें तें पाहा. परमेश्वर हा सर्वज्ञ, प्रेमळ व न्यायी आहे असें म्हणतात. आतां, परमेश्वर जर सर्वज्ञ आहे तर त्याला लोकांचें दुःख कळत असलें पाहिजे. आणि परमेश्वर न्यायी असें म्हटलें तर प्रेमळ कसें म्हणतां येईल? पण सर्वगुणसंपन्नता ही एका परमेश्वरापाशींच संभवते. मानवी समाजांत जन्मास येऊन कोणीहि 'सुपरमॅन' कसा असूं शकेल? असो; आतांपर्यंत टिळकांच्या गुणांची इतकी चर्चा झालेली आहे, कीं एकाद्याला सांगितलें कीं, आजपर्यंत कोणास न दिसलेला असा एकादा टिळकांचा गुण सांग, तुला हजार रुपये बक्षिस देतों, तरी तें त्याला शक्य होणार नाहीं. तेव्हां मी तुम्हांला टिळकांचा एकादा कोणास न दिसलेला गुण दाखविणार आहें असें नाहीं. टिळकांचे गुण तेच, पण ते मी वेगळ्या पद्धतीनें आपणांपुढें मांडणार आहें. तींच फुलें पण चार माळ्यांपुढें दिलीं तर चौघेहिजण चार तऱ्हेनें हार गुंफतील. त्याचप्रमाणें टिळकांचे आजपर्यंत वर्णन केलेलेच गुण, पण ते जर निराळ्या तऱ्हेनें मांडून दाखविले तर ते नवीन दिसतील.

असो, प्रथम मी विष्णूसहस्रनामाप्रमाणें त्यांचे गुण आपणांपुढें म्हणून दाखवितों. पहा त्याचा काय बोध होतो? टिळक सद्वर्तनी होते, विद्वान् होते, स्वार्थत्यागी होते, देशभक्त होते, उद्योगी होते, पराक्रमी होते, धैर्यवान् होते. अर्थात् यानें आपणांस कांहींच बोध झाला नसेल. आतां हेच गुण पण ते एकमेकांवर कसे अवलंबून होते हें मी आपणांस दाखवितो. या सर्व परस्परावलंबी गुणांची मीं एक सांखळी तयार केली आहे ती अशीः—टिळक सद्वर्तनी होते, म्हणून त्यांच्या विद्वत्तेचें चीज झालें. ते विद्वान् होते म्हणून त्यांच्या स्वार्थत्यागाचा उपयोग झाला.

स्वार्थत्यागी होते म्हणून त्यांच्या देशभक्तीचें चीज झालें. देशभक्त होते म्हणून त्यांच्या उद्योगाचें चीज झालें. उद्योगी होते म्हणून पराक्रमाचें चीज झालें. पराक्रमामुळें धैर्याचें चीज झालें. व टिळक स्वतः धैर्यवान् होते म्हणून लोकांना उपदेश करण्याची त्यांना पात्रता आली.

ही सांखळी थोडी स्पष्ट रीतीनें दाखविणें जरूर आहे. 'टिळक सद्वर्तनी होते म्हणून त्यांच्या विद्वत्तेचें चीज झालें' हें कसें? टिळकांच्या अंगचा लहानपणापासूनचा पहिला गुण म्हणजे सद्वर्तन हा होय. मनुष्य नुसता विद्वान् असून उपयोग नाहीं. त्याच्या जोडीला सद्वर्तन हाहि गुण त्याचे अंगीं पाहिजे. या दोन गुणांची सांगड असल्यामुळेंच न्यू इंग्लिश स्कूल काढलें तेव्हां टिळकांच्या लायकीविषयीं कोणाला शंका आली नाहीं. खुद्द भांडारकरांनीं त्यावेळीं या प्रसंगासंबंधानें बोलतांना असे उद्गार काढले कीं, 'ही संस्था काढणाऱ्या लोकांत दोन सद्वर्तनी स्वार्थत्यागी एल्एल्. बी. आहेत ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे!' मनुष्य सद्वर्तनी असेल तरच त्याच्या विद्वत्तेचें चीज.

दुसरें, 'टिळक विद्वान् होते म्हणून त्यांच्या स्वार्थत्यागाचा उपयोग झाला.' मनुष्य विद्वान् असून स्वार्थत्यागी असेल तरच त्याचा उपयोग व चीज. जवळ ५ रुपये असून त्यांतून ८ आणे धर्म करण्यापेक्षां जवळ १००० रुपये असून त्यांतून ९०० देशकार्याला देणारा मनुष्य माझ्या मतानें जास्त श्रेष्ठ ठरेल. टिळक वकील झाले असते तर दरमहा हजारों रुपये मिळवितां येण्यासारखी त्यांची विद्वत्ता होती. परंतु त्यांनीं स्वार्थाचा त्याग केला व दरमहा ३० रुपयांवर स्वतंत्र पण दरिद्री आयुष्य पत्करिलें! हा खरा स्वार्थत्याग. अविद्वानाच्या स्वार्थत्यागाला जग काडीचीहि किंमत देत नाहीं हें लक्षांत ठेवा. स्वार्थी असता तर जगाला आग लावली असती अशा मनुष्यानें निःस्वार्थी होऊन देशाचा दास व्हावें हा केवढा गुण! सुभाषितकारानें धीर कोण हें सांगितलेंच आहे. 'विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि तऽएव धीराः' विकार हेतु असून त्याचा त्याग करतील ते धीर!

'टिळक स्वार्थत्यागी होते म्हणूनच त्यांच्या देशभक्तीचें चीज झालें.' स्वार्थत्यागाचा उपयोग देशभक्तीकडेच केला पाहिजे, तरच त्याचें चीज.

मला अशीं कांहीं माणसें माहीत आहेत कीं, ज्यांच्या अंतःकरणांत कधीं देशभक्तीचा लवलेशहि नव्हता! परंतु तोंडांतून एक शब्द उच्चारल्याबरोबर ज्यांची रवानगी तुरुंगामध्यें झाली व सुटल्यावरहि त्यांनीं कधीं देशभक्ति दाखविली नाहीं! माणूस उद्योगी असून मनावर घेईल तर हातून पराक्रम घडणार. उद्योग करीत असतांनाच पराक्रम केले पाहिजेत. न कळत पराक्रम एकाद्याच्या हातून पुष्कळ होतात; पण टिळकांचे पराक्रम तशांपैकीं नव्हते, टिळकांनीं सर्व उद्योग जाणूनबुजून केले असल्यामुळें त्यांना पराक्रम करतां आले. त्यामुळेंच त्यांच्या अंगीं असलेल्या धैर्याचें चीज झालें. व स्वतः त्यांच्या अंगीं एवढें अलोट धैर्य होतें म्हणूनच लोकांना उपदेश करण्यास त्यांना पात्रता आली, हें काय कोणास सांगावयास पाहिजे?

टिळकांच्या विरुद्ध नुकताच एके ठिकाणीं असा एक आक्षेप घेण्यांत आलेला आहे कीं, त्यांचें सर्व काम Destructive म्हणजे विघातक होतें. माझ्या मतें आक्षेप घेणारांनीं हा दोष म्हणून दाखवावयास नको होता. निदान तो यावेळीं तरी दाखवावयास नको होता! गुण सुद्धां दोषांच्या भाषेंत बोलतां येतात व दोष हे देखील गुणांच्या भाषेंत बोलतां येतात. दोष दाखविणारालासुद्धां यावेळीं असें म्हणतां आलें असतें—"डिस्ट्रक्टिव्ह काम ना? होय; डिस्ट्रक्टिव्ह काम टिळकांनींच करावें. तें त्यांनाच करतां येतें! डिस्ट्रक्टिव्ह काम कां होईना, पण पहा कसें बहादरीनें केलें!" दोष देणाराला हो काय? लागेल त्याला दोष देतां येईल. कर्व्यांना म्हणावें, 'तुम्हांला राजकीय कामांत काय करतां आलें?' व टिळकांना म्हणावें, 'तुम्हीं सामाजिक कामगिरी काय काय केलीत?' म्हणजे खासा रोजगार! कोणाबद्दल चांगलें म्हणून बोलतां यावयास नको! टिळकांच्याबद्दल जसा मला आदर वाटतो, तसाच गोखल्यांच्याबद्दलहि माझ्या मनांत कमी आदर नाहीं, ही प्रसिद्ध गोष्ट आहे. मलाहि गोखल्यांचेविषयीं असें लिहितां आलें असतें कीं, गोखल्यांना डिस्ट्रक्टिव्ह काम मुळींच करितां येत नव्हतें. दुसरें, आक्षेपकांनीं निदान राजकीय बाबतींत तरी टिळकांचेबद्दल असें म्हणावयास नको होतें. प्रत्यक्ष चिरोलसारख्या शत्रूकडून त्यांना The father of the Indian unrest म्हणजे "हिंदवी प्रमोक्षाचे

जनक" अशी पदवी मिळाली होती व ती सर्वथैव योग्य होती. कोणतेंहि राष्ट्र उदयोन्मुख होत असतें तेव्हां त्यांत अनरेस्टच उत्पन्न व्हावी लागते. इंग्रज श्रेष्ठ म्हणून त्यांच्याशीं नमून वागण्यांत नेहमीं जी एक फाजील आदरबुद्धि दाखविण्यांत येते, तिचा विध्वंसच झाला पाहिजे. कांहीं वेळां विध्वंसच योग्य असतो. लढाई सुरू असतां काय होत असतें ? दोन्ही पक्षांकडून लढाईची तोफ सुरू झाली म्हणजे मधल्या जमिनींत पखालींनीं पाणी टाकून शेताकरितां ती कांहीं कोणी नांगरावयास लागत नाहीं किंवा त्यावेळेला तेथें शहर कसें उठेल याचाहि कोणी विचार करीत बसत नाहीं. तोफांच्या माऱ्यानें सर्व वातावरण भाजून निघून तेथें No man's land उत्पन्न होते. चिटपांखरूंसुद्धां तेथें जिवंत रहात नाहीं मग माणसाची काय कथा ? जमीन भाजून काढल्यानंतरच पेरणी करतात ना ? टिळकांना त्यांच्या शत्रूंनीं तोफेची उपमा दिली असती तर ती जास्त समर्पक झाली असती. टिळकांच्या शत्रूंनीं देखील त्यांची राजकीय कामगिरी पाहून असें म्हणावयास पाहिजे होतें कीं, "वा; अहो टिळक म्हणजे केवढी तोफ!"

असो, टिळकांच्यावरील आक्षेपांचा कांहीं मी आज येथें विचार करणार नाहीं. कारणपरत्वें म्हणून येवढ्या एकाच आक्षेपाबद्दल बोललों. मीं आपणांस जी गुणमाला सांगितली त्यांतला मुख्य गुण कोणता हें आपणांस पहावयाचें आहे. जगांमध्यें रुचिवैचित्र्य आहे. अर्थात् कोणाला हा गुण विशेष आवडेल तर कोणाला तो आवडेल. पण माझ्या मतानें ज्योतिषी ज्याप्रमाणें कुंडलींतील ग्रहांवरून एक 'मुंथाग्रह' किंवा संकीर्णग्रह काढतात त्याप्रमाणें मीं एक सयुक्त गुण काढला आहे. संयुक्त गुण म्हणजे तुमच्या भाषेंत 'The resultant of so many forces' माझ्यामतें टिळकांचे मुख्य गुण म्हणजे निःस्वार्थीपणा, पराक्रम व धैर्य, आणि उद्योगीपणा. या चार गुणांच्या संयोगामुळेंच त्यांचें आयुष्य इतकें प्रभावी झालें. या गुणमिश्रणालाच इंग्रजींत 'Practical Power' असें म्हणतात.

निःस्वार्थीपणापासूनच त्यांचें चरित्र सुरू झालें म्हणून तो गुण सांगण्याची जरूरी नाहीं. टिळकांचें धैर्य असामान्य होतें. त्यांचें धैर्य केवळ प्रसंगापुरतें होतें असें म्हणणारे कांहीं लोक आहेत, परंतु मी निकट सहवासामुळें खात्रीनें असें सांगू शकतों कीं, जितका जोरानें निराशेचा आघात

होत असे, तितक्याच जोरानें किंबहुना त्याच्यापेक्षां जास्त जोरानें टिळक आपल्या कार्याला पुनः सुरवात करीत. त्यांच्या धैर्याविषयीं एकदोन गोष्टी सहज आठवल्या म्हणून त्या सांगतों. शिक्षा होण्यापूर्वी अर्धा पाऊणतास ते आपल्या लेह्यांशीं गप्पागोष्टी व विनोद करीत बसले होते. व तो विनोद ओढूनताणून आणलेला नसून अगदीं खरा व मनापासूनचा होता. नंतर खटल्याचा शेवटचा निकाल ऐकण्याकरितां आम्ही चौघेजण चौचाकींतून कोर्टांत जावयास निघालों. निकाल काय होणार याचें स्वप्न त्यांना पडलेंच होतें; पण अशा प्रसंगींसुद्धां त्यांनीं विनोदानें म्हटलें कीं, "जातांना आपण चौघेजण आहोंत. येतांना घोडयाचें ओझें एका माणसानें तितकेंच कमी होईल!" तसेंच, १९०८ सालीं त्यांच्यावर खटला झाला. त्यांत शेवटचे दिवशीं त्यांच्याकडला एक वकील हजर नव्हता. लेह्यांनीं विचारलें, "त्यांच्याबद्दल दुसरे दोन वकील देऊं का?" टिळकांनीं उत्तर केलें, "दुसरे दोन वकील आणून काय उपयोगी? एकाध्या मुलीला वीस वर्षांचा नवरा पाहून देण्याऐवजीं दहा दहा वर्षांचीं दोन मुलें तिच्यापुढें उभीं करावीं! असें केलें तर चालेल काय?" (हंशाच हंशा) असो, यावरून त्यांचें मन किती निष्काळजी व संकटाविषयीं बेफिकीर असे तें दिसून येतें.

टिळकांच्या अतुल पराक्रमामुळेंच लोकांवर त्यांची इतकी छाप बसली. वास्तविक पाहातां ते तुरुंगांत गेले हा पराक्रम असें मी म्हणणार नाहीं. त्यांना तुरुंगांत घालण्याची बुद्धि सरकारला ज्या कारणामुळें झाली तें कारण म्हणजे त्यांचे तेजस्वी लेख हा पराक्रम होय. "नो मॅन इज ए हीरो टु हिज व्हॅलेट डी चेंबर" अशी एक इंग्रजींत म्हण आहे. म्हणजे "राजाचें मोठेपण त्याच्या खासगी नोकराला काय?" परंतु टिळकाच्या बाबतींत तसें म्हणतां यावयाचें नाहीं. तुमच्या ज्यूलियस सीझर नाटकांतच अशाविषयीं एक प्रसंग आहेः—कॅशस हा ब्रूटसचें मन सीझर विरुद्ध वळवीत असतो व ते दोघे बोलत असतात. त्यांत कॅशस हा ब्रूटसला म्हणतो, "अरे हा सीझर इतका मोठा कशानें झाला? वास्तविक हा तुझ्या माझ्यासारखा यःकश्चित् मनुष्य! सर्व जगानें याच्या मोठेपणाकडे येवढें स्तिमित होऊन पहावें असें याच्यामध्यें आहे काय! मी व हा एकदां स्पेनमध्यें स्वारीवर गेलों असतां याला तेथें ताप आला; तेव्हां हा हाच

सीझर एकाद्या दीनदुबळ्या पोरीप्रमाणें मजपाशीं म्हणूं लागला कीं, 'कॅशस मला ताप आलारे!' तसेंच, पूर्वी लहानपणीं सीझर व मी टायबर नदींत पोहावयास पडलों असतां वाहतीला लागून हा सीझर बुडूं लागला तेव्हां याला मी मी वांचवला! असें असतां सीझर मोठा कशानें झाला? अशा यःकश्चित् साधारण मनुष्याला तुम्ही येवढा थोर समजतां?" पूर्ववयांत एकेकाळीं टिळकांच्याबरोबर असणाऱ्या कांहीं व्यक्तींना पुढें त्यांच्या उत्कर्षाबद्दल असेंच वाटे. परंतु टिळकांच्या सहवासांत चोवीस तास एकसारखा राहणारा मनुष्यसुद्धां टिळकांच्या गुणांची तारीफ केल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून, टिळक वॉज ए हीरो टु हिज व्हॅलेट डी चेंबर! रानडे देखील टिळकांच्या कांहीं गुणांचें प्रेमानें वर्णन करीत.

विद्यार्थ्यांनीं देखील टिळकांच्या अंगचे कांहीं गुण घेण्यासारखे आहेत. विद्यार्थीदशेत टिळक हे पुढें पुढें येणारे किंवा कांहींतरी उद्योग बगलेंत मारणारे विद्यार्थी नव्हते. चंदावरकरांनीं टिळकांचें असें वर्णन दिलें आहे कीं, "टिळक म्हणजे त्या वेळीं आमच्या वर्गांत एका कोपऱ्यांत बसणारा गरीब मुलगा होता. परंतु गणित व संस्कृत या विषयांत त्याचा हात धरणारा कोणी नाहीं हें सर्वांस पक्कें माहीत होतें. विद्यार्थीदशेंत त्याची देशभक्ति वाखाणण्यासारखी होती." नुसती देशभक्ति घेतली तर विद्यार्थीदशेंत प्रत्येकाच्या अंगांत देशभक्ति असते. फार काय पण विद्यार्थीदशेंत देशभक्त नाहीं असा मनुष्यच विरळा! (हंशा.) याचें कारण असें कीं, या वयांत मनाच्या भराऱ्या फार उंच असतात; भावी आयुष्याचें अत्यंत सुखमय व उज्ज्वल चित्र रेखाटावयाचा प्रयत्न प्रत्येक जण करतो. लांगफेलो यानें "यूथ" म्हणून कविता लिहिली आहे. त्यांत त्यानें तारुण्याचें फार सुंदर चित्र काढलें आहे.

"How beautiful is youth, how bright it gleams,
With its illusions, aspirations, dreams.
Book of beginings story without end.
Each maid a heroine each man a friend.
Alladins lamp fortunatus' purse.
That holds the treasure of the universe;

All possibilities are within its hands.
No danger daunts it, no foe withstands ;
In its sublime audacity of faith
Be thou removed, it to the mountain saith.
And with ambitious feet secure and proud
Ascends the ladder leaning on the cloud."

पहा बरें या कवितेंत तुमचें किती सुंदर चित्र काढलें आहे ! तुमचें वर्णन येईल तुम्हांला असें करितां ? या कवितेचा अर्थ तुमच्या लक्षांत आला असेल. अशक्य हा शब्दच तारुण्यांत मनाला माहीत नसतो. अडचणींचा पर्वत जरी मार्गांत आडवा आला तरी तरुणपणीं इतका आत्मविश्वास विलक्षण वाटत असतो कीं, पर्वताला तो म्हणतो, 'चल तूं दूर हो ! मला पुढें जावयाचें आहे.' तसेंच तरुण मनुष्य आपल्या महत्त्वाकांक्षेची शिडीहि अशी लावतो कीं, त्याचें एक टोंक जमिनीवर तर दुसरें टोंक आकाशांत उंच असणाऱ्या ढगावर ! पहा कशास काय संबंध ? पण विचार नसणें हेंच तरुणांचें लक्षण. पर्वत मार्गांत आडवा आला तर त्याला दरडावून दूर होण्यास सांगणें हाच तरुणपणा. पर्वत कसा दूर होईल, आपणांस बाजूनें गेलें पाहिजे, हा विचार त्याच्या मनांतच येत नाहीं. पण सगळी अडचण काय ती—ही धडाडी,हा जोम पुढील आयुष्यांत कायम ठेवणें यांतच आहे. वृद्ध लोक म्हणतात कीं, आम्ही आतां झालों. तरुण मुलेंच आतां राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत. हें त्यांचें म्हणणें अक्षरशः खरें आहे. तरुण असतांना आधार होते तसेच पुढेंहि आधारस्तंभ म्हणवून घेतां आलें पाहिजे. नाहींतर पूर्वी मानला जाणारा आधारस्तंभ पुढें चिपाडासारखा वाळून हलका झाला तर उपयोग काय ? अमका चांगला, तमका वाईट, असले वादहि व्यर्थ होत. टिळक मोठे कीं गोखले मोठे, असा शुष्क वाद करणारांना नेहमीं मी हेंच सांगतों कीं, यांतून तुमच्या दृष्टीनें जो कमी असेल त्याच्याइतके तुम्ही स्वतः मोठे व्हा म्हणजे झालें ! नुसता वाद करून उपयोग काय ? तुम्ही काय करितां ? तुमचें कर्तव्य काय, याची तुम्हांस जाणीव पाहिजे. टिळकांचें विद्यार्थ्यांस नेहमीं हेंच सांगणें असे. टिळकांची तरुण मुलांवर भक्ति होती, याचें कारण यांतून कर्ती माणसें निघण्याची त्यांना आशा असे. ज्याप्रमाणें एकाद्या तरुण

उपवर मुलीचा बाप जो जो तरुण भेटेल त्याच्याकडे पहात 'हा माझा जांवई होण्यास योग्य आहे काय ?' असा प्रश्न स्वतःला विचारीत असतो, त्याप्रमाणें प्रत्येक तरुणाच्या चेहेऱ्याकडे टिळक नजर लावून मोठ्या आशेनें पहात असत. टिळकांकडे कोणीहि तरुण गेला तर याचा राष्ट्रकार्याला काय उपयोग होईल याचा विचार ते करीत. ऑक्सफर्ड केंब्रिजला परवां आम्ही गेलों होतों, तेव्हां टिळकांनीं प्रत्येक विद्यार्थ्याला विचारलें कीं, "तूं पुढें काय करणार ?" आपण पुढें काय करणार हें जरी आपण ठरविलें असलें तरी पुढेंहि तें तसेंच हटकून अंमलांत येतें असें नाहीं. अरविंद घोष हे सिव्हिल सर्विसची परीक्षा घोड्यावर न बसतां आल्याकारणानें नापास झाले व त्यांच्या आयुष्याची सर्व दिशा बदलली. गोखले हे एंजिनियरिंगची परीक्षा पास होते तर एक बडे ऑफिसर झाले असते ! अर्थात् अशा गोष्टी क्वचित् होत असल्या तरीपण कांहींतरी निश्चित ध्येय प्रत्येकानें डोळ्यासमोर ठेवणें जरूर आहे. प्रत्येकानें राजकारणाचाच अभ्यास केला पाहिजे किंवा राजकारणांत प्रत्येकाचें डोकें चालेलच असें नाहीं. राजकारणाशिवाय दुसरे पुष्कळ विषय आहेत. देश हा त्यांतल्या मोठ्या माणसांवरून ओळखला जातो. बंगाल म्हटला म्हणजे आज आपल्या डोळ्यांसमोर एकदम दहावीस थोर व्यक्ति उभ्या राहतात. ते सर्वच पुरुष काय राजकारणी आहेत ? कोणी जगद्वंद्य कवि आहेत, तर कोणी वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र यांत शोध लाविले आहेत. एकादा विषय आला नाहीं तरी चालेल. तेवढ्यानें निराश होऊं नका. दुसऱ्यांत तुमचें डोकें चालेल. कांहींतरी मोठें कार्य करण्याची इच्छा धरा. स्वभावभेदामुळें तें राजकीय नसलें तरी चालेल ! तुमचें सध्यांचें कर्तव्य म्हणजे उत्तम तऱ्हेची विद्या संपादन करणें हें होय. अशी महत्त्वाकांक्षा तुम्हीं मनांत बाळगली पाहिजे कीं, येथील सर्वोत उच्च शिक्षण व सर्वोत उच्च पदवी मी मिळवीन. व नंतर ही सामुग्री बरोबर घेऊन मी देशकार्य करण्यास झटेन." (टाळ्यांचा कडकडाट)

सार्वजनिकसभेंतील व्याख्यान *

कलकत्ता येथें जादा कॉंग्रेसमध्यें अनपेक्षित रीतीनें व फारच थोड्या बहुमतानें बहिष्काराचे ठराव पास झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्यें खळबळ सुरू झाली. व कॉलेजें सोडावींत कीं काय यासंबंधीं जो तो विचार करण्यांत गर्क होऊन गेला. याच सुमारास केसरींतून "विद्यार्थ्यांची विद्यार्थ्यांस विनंति" प्रसिद्ध होऊन लगेच एकदोन दिवसांत सार्वजनिक सभेमध्यें विचारविनिमय करण्याकरितां व पुढारी या नात्यानें आपले विचार सांगण्याकरितां विद्यार्थ्यांनीं केळकरांना निमंत्रण दिलें. या सभेंत प्रारंभीं अनेक विद्यार्थ्यांचीं भाषणें झालीं. सरतेशेवटीं अध्यक्ष या नात्यानें भाषण करितांना त्यांनीं मुलांस स्वच्छ सांगितलें कीं, कलकत्त्याच्या कॉंग्रेसनें ठराव पास केला असला तरी त्यांत "स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून" असे शब्द घातले आहेत. हा ज्याच्या त्याच्या स्फूर्तीचा प्रश्न आहे, स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला अनुसरून केवळ स्वतःच्या स्फूर्तीनें जो कॉलेज सोडील त्याला मी डोक्यावर घेऊन नाचेन! कॉलेज सोडा असा सरसकट उपदेश मी करणार नाहीं. माझें मतच तुम्हांला पाहिजे असेल तर आज सभेला येण्याच्या आधींच माझीं मुलें मीं सरकारी कॉलेजांतून काढलीं आहेत! हा प्रश्न ज्याच्या त्याच्या स्वयंस्फूर्तीचा प्रश्न आहे."

कित्येकांना हें भाषण न पटून त्यांनीं मध्येंच गोंगाट करावयास सुरवात केली. त्यावेळीं किंचित् रागानें व किंचित् विनोदानें त्यांनीं मुलांस सांगितलें, "असा गोंगाट करूं नका; The best furnaces are those which give out no smoke; चांगल्या भट्टया त्या कीं ज्या आपला धूर बाहेर पसरूं देत नाहींत, हें वाक्य ध्यानांत ठेवून थोडे शांत बसा. कॉलेज सोडणें हा ज्याच्या त्याच्या स्फूर्तीचा प्रश्न आहे—"

यावर मध्येंच एका विद्यार्थ्यानें विचारलें, "पण ती स्फूर्ति तुम्ही उत्पन्न करणार कीं नाहीं?"

---

* आक्टोबर १९१०

यावर क्षणभर थांबून पण लगेच केळकरांनीं उत्तर दिलें—"हेंहि थोडें ज्याचें त्याच्यावरच अवलंबून आहे. कवीनें म्हटलेंच आहे, 'प्रभवति मणिः निंबोद्‌भाहे मणिः न मृदांचयः'!"

याच सभेंत केळकर यांनीं असेंहि सांगितलें कीं, "असहकारितेचा ठराव जरी पास झाला असला तरी त्याला थोडेंसें मुदतीच्या संपाचें स्वरूप आहे. शिक्षणावरील बहिष्कार कायमचा समजावयाचा नाहीं. म्हणून जे कोणी स्वतःच्या स्फूर्तीनें कॉलेजें सोडतील त्यांना शिक्षण हवें असल्यास सुमारें शंभर मुलांची सोय करण्याकरितां कॉलेज काढतां येईल." असें म्हणून केळकर यांनीं शंभर मुलांची फक्त दोन वर्षें शिक्षणाची काय तजवीज करितां येईल याविषयीं आपली कल्पना सभेंत वाचून दाखविली.

लो० टिळकांचें पुण्यांतील स्मारक*

पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें कै० लोकमान्य टिळकांच्या स्मारकाप्रीत्यर्थ पुणें शहरवासीयांची जाहीर सभा रविवार, ता. १९ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां श्रीजगन्नाथमहाराज यांनीं स्मारकाकरितां दिलेल्या त्यांच्या जागेंत (बंगलाबागेंत) भरविण्यांत आली. सभेस शहरांतील राष्ट्रीय पक्षाचे सर्व पुढारी व सर्व जातींचे लोक हजर होते.

म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष ल. ज. आपटे यांची अध्यक्षस्थानीं योजना झाल्यावर त्यांनीं सभेचा उद्देश थोडक्यांत सांगितला आणि लो० टिळकांच्या स्मारकाकरितां जमणाऱ्या फंडाचा उपयोग टिळक महाविद्यालय व इतर शिक्षण-विषयक संस्थेकडे करावयाचा असल्यानें आपणावर स्मारकाची जबाबदारी विशेष आहे, व ग्रंदेशिक्षणाची आज विशेष आवश्यकता असल्यानें फंड जमविण्याकरितां प्रत्येकानें मदत केली पाहिजे हें सांगून, कवडे शास्त्री यांस पहिला ठराव मांडण्यास सांगितलें. कवडे यांनीं आजपावेतों टिळक स्मारक फंडासंबंधानें झालेल्या कामाचा अहवाल वाचून दाखविला

* केसरी, तारीख २३ नोव्हेंबर १९२०

व त्याला दा. वि. गोखले यांनीं अनुमोदन दिल्यावर आतांपर्यंत झालेलें काम सर्वानुमतें मंजूर करण्यांत आलें.

यानंतर न. चिं. केळकर यांनीं ठरावांत असलेल्या मुख्य दोन गोष्टी, एक स्मारक-कमिटीची घटना व दुसरी तिनें काय काम करावयाचें, याचा उल्लेख केल्यावर दुसरा ठराव सभेपुढें मांडला तो असाः— 'कै० लो० टिळकांच्या स्मारकाप्रीत्यर्थ एक व्यापक स्वरूपाची संस्था स्थापन करण्यांत यावी, व प्राथमिक शाळा, दुय्यमशाळा, महाविद्यालय व विद्यापीठ (युनिव्हर्सिटी) येथपर्यंत या संस्थेची व्यापकता वाढविली जावी. पुणें असहकारिता-कमिटीनें काढलेल्या महाविद्यालयाची व्यवस्था व टिळक स्मारक-संस्थेतर्फे चालविलेल्या या शिक्षणसंस्था सरकारशीं संबंध न ठेवितां चालविण्यांत याव्या.

सदर शिक्षणविषयक स्मारकाचे हेतु पूर्णपणें सिद्धीस जाण्याची पुरेशी व्यवस्था झाल्यावर लोकमान्यांचें याशिवाय आणखी कोणत्या प्रकारचें स्मारक करावें याचा विचार सभासदांची सभा त्याकरितां मुद्दाम बोलावून करावा.'

स्मारक-सभेच्या घटनेसंबंधानें सांगतांना केळकर म्हणाले कीं, तिची घटना खालीं दिल्याप्रमाणें मुक्रर करण्यांत यावीः—'अध्यक्ष श्रीमंत जगन्नाथ महाराज; उपाध्यक्ष हजार किंवा त्याहून अधिक रुपये देणारे; कार्यकारी मंडळाचे सभासद पांचशें किंवा त्यांहून अधिक रुपये देणारे; शंभर किंवा त्यांहून अधिक रुपये देणारे साधारण सभासद; व शंभराहून कमी वर्गणी देणारे हितचिंतक म्हणून मानण्यांत यावेत. त्याचप्रमाणें शेठ गोकुळदास मयाचंद, शेठ किसनदास टिकमदास, श्री० नारायण रामजी गुंजाळ, यांची खजिनदारांचे जागीं; आणि शेठ रामदास गोवर्धनदास, विश्वासराव बळवंत डावरे, बाबुराव फुले, शेठ किसनदास विष्णुदास व कृष्णशास्त्री कवडे यांची चिटणिसांचे जागीं जी योजना झाली आहे ती कायम करावी.

'टिळक महाविद्यालयाची व्यवस्था यापुढें शि. म. परांजपे, न. चिं. केळकर, सी. के. दामले, द. रा. घारपुरे, ना. सी. फडके या पांच मंडळींवर सोंपविण्यांत यावी व या पांच मंडळींनीं महाविद्यालयांतील शिक्षक व इतर तज्ज्ञ गृहस्थांचें सल्लागार-मंडळ आपल्याला सल्ला देण्याकरितां नेमून घ्यावें.'

या योजनेसंबंधीं सांगतांना केळकर म्हणाले कीं, "ही योजना अशी आहे कीं, यांत कोणाला तक्रार करण्यास जागा नाहीं. स्मारक-फंडास जो जशी मदत करील तसा त्यास अधिकार देण्यांत येईल. शिक्षणविषयक बाबतींत तज्ज्ञांचा सल्ला मिळण्याचीहि योजना करण्यांत आली आहे. आम्हांस जितके उपाध्यक्ष व सभासद मिळतील तितके हवेच आहेत. अध्यक्षांची योजना त्यांनीं दिलेल्या अमूल्य देणगीमुळें जी करण्यांत आली आहे तीहि सर्वथैव योग्यच आहे." नंतर श्री० जगन्नाथ महाराजांनीं दिलेल्या देणगीची थोडक्यांत माहिती सांगून त्यांनीं केलेलें ट्रस्टडीड वाचून दाखविलें.

या ठरावास शेठ बाबूलाल नानचंद, सी. के. दामले, का. ठ. जाधव यांनीं अनुमोदन दिल्यावर ठराव सर्वानुमतें पास करण्यांत आला. शेवटीं प्रो० घारपुरे यांनीं महाविद्यालयाचा अहवाल वाचून दाखविला आणि कृ. प्र. खाडिलकर यांनीं अध्यक्षांचे आभार मानल्यावर स्मारकसभेचें काम संपलें.

पुणें येथील
राष्ट्रीय शिक्षणाची य

मागील अंकीं जाहीर केल्याप्रमाणें पुण्यास राष्ट्र संस्था निघत आहे तिचे हेतु व कार्यक्रम यांवि खालील माहितीवरून केसरीच्या वाचकांस होईल.

राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना कांहीं नवीन नाहीं; जुनीच वर्षांपूर्वी या कल्पनेला बराच जोर आला होता. कित्येकांना म्हणजे काय हें कळतदेखील नव्हतें! "तें एक खूळ आहे लोक बहाणा करीत. अखेर देशांत लोकमत तयार होऊन व सभेंत बहुमत पडून राष्ट्रीय शिक्षण हा विषय सर्वमान्य झाला. साली दादाभाई नवरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या राष्ट्री वळलेल्या चतुःसूत्रींत राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव हें एक सूत्र आहे. त राष्ट्रीय शिक्षणाचे लहानमोठे प्रयत्न अनेक ठिकाणी अनेक प्रांतांतून स्वावलंबनाचें तत्त्व लोकांच्या तोंडीं तेव्हां असल्यामुळें ज्या राष्ट्रीय शिक्ष च्या संस्था निघाल्या अगर योजल्या गेल्या त्यांचा पाया स्वावलंबना तत्त्वावर होता. पण त्या वेळचे प्रयत्न बहुतेक फसले. त्याचीं कारणें मा निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळीं घडून आलीं. बंगालमध्यें राष्ट्रीय शिक्षणाचें कॉलेज निघालें, परंतु त्याला हवीं तितकीं मुलें मिळालीं नाहींत. इतर कित्येक ठिकाणीं पैशाचा पुरवठा भरपूर न झाल्यामुळें शाळा बंद पडल्या. वऱ्हाडांत व मुंबई इलाख्यांत द्रव्याभावापेक्षां दडपशाहीच त्या शाळा बुडविण्यास अधिक कारणीभूत झाली. पण मध्यंतरीं ही राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना जरी थोडीशी दबली तरी बनारस हिंदु युनिव्हर्सिटी व अलीगड युनिव्हर्सिटी या संस्था अस्तित्वांत आल्या. यावरून राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेचा झरा आटला होता असें म्हणतां येत नाहीं. या संस्थांच्या चालकांनीं सरकारच्या पैशाची मदत घेतली होती व सरकारशीं संबंध ठेवला ही गोष्ट खरी; तथापि विद्यमान युनिव्हर्सिट्या

---

० तारीख ३० नोव्हेंबर सन १९२०

द्धति हीं सदोष आहेत व शिक्षण हें जितकें
अधिक असेल तितकें बरें, ही कल्पना न इटता
.. तीच कल्पना हल्लीं विशेष बळावली आहे व
.फत वगैरे कारणांनीं फिरून त्या कल्पनेचा स्फोट
हल्लीं चालू असलेले प्रयत्न झाले तरी फिरून एक वेळ
नाहींत असा प्रश्न कित्येकांना सहजच सुचतो. त्याचें
(गोष्ट आधीं सहसा घडणार नाहीं; व घडली असें घेऊन
.दरीनें स्वतंत्र व स्वावलंबी शिक्षणाचें पाऊल पुढेंच पडेल.
.ा भरत असतांहि समुद्राच्या पोटांतून उठलेली प्रत्येक लाट
अंतिम सीमा गांठीत नाहीं. इतर लाटांप्रमाणें तीहि वाटेंत
पण पहिल्या लाटेपेक्षां दुसरी अधिक पुढें जाते व दुसरीपेक्षां
.धिक पुढें जाते व अशा रीतीनें भरतीची रेषा पुढें पुढें ढकलली
ाष्ट्रीय प्रगतीचीहि गोष्ट अशीच आहे.

रा वर्षांपूर्वी राष्ट्रीय शिक्षणाला शिक्षणसुधारणेचें स्वरूप मुख्यतः
. आज त्याचें हें पूर्वीचें स्वरूप कायम असूनहि शिवाय असहकारितेच्या
ळवळीनें त्याला एक नवीन स्वरूप प्राप्त झालें आहे. पूर्वी सुधारलेल्या
शिक्षणाची व्यवस्थित रीतीनें सर्व तजवीज झाली म्हणजे मग हा प्रश्न कोठें
कोणीं हातीं घेतला तरी चालण्यासारखें होतें; पण असहकारितेच्या चळवळी-
मुळें सरकारशीं संबंध असलेल्या शिक्षणसंस्थांतून मुलें निघूं लागलीं आहेत,
म्हणून त्यांचें नुकसान न व्हावें याकरितां थाटमाटाची वाट न पहातां
मिळेल तसें शिक्षण देण्याची व्यवस्था करणें जरूर भासूं लागलें आहे.
राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळींत पूर्वी बौद्धिक तेज अधिक होतें; हल्लींच्या
त्याच चळवळींत पूर्वीचें बौद्धिक तेज असूनहि त्यांतच प्रबळ भावनेच्या
तेजाची भर पडली आहे. मुलांस कांहींएक शिक्षण न मिळतां तीं घरीं
स्वस्थ बसलीं किंवहुना उनाड झालीं तरी पुरवलें, पण सरकारशीं संबंध
असलेल्या शाळेंत त्यांनीं जातां कामा नये असें म्हणण्यापर्यंत महात्मा
गांधींची मजल आज गेलेली आहे. पण मुळींच शिक्षण नको येथवर
सर्वांचीच मजल जाणार नाहीं. प्रत्येक मनुष्याच्या मागें उपजीविका
ही जोंपर्यंत लागली आहे, व कोणाकडे भीक न मागतां आपल्या पायावर

स्वावलंबनानें उभें राहून प्रामाणिकपणें उदरनिर्वाह त्यानें केला पाहिजे, व राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या पायाचा हाच पहिला घडा होय हें ज्यांना मान्य असेल त्यांना बरीवाईट अर्धीमुर्धी कशी कां होईना; पण मुलांच्या शिक्षणाची सोय केलीच पाहिजे हें पटेल. दुसरें असें कीं, तडफेनें बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाल्यास शाळा सोडणाऱ्या मुलांची संख्या सहजच वाढेल, व एकामुळें दुसरें व दुसऱ्यामुळें तिसरें असें होऊं लागून असहकारितेमुळें राष्ट्रीय शिक्षणाला व शिक्षणाच्या सोयीमुळें असहकारितेला असें परस्पर बळ येऊं लागेल.

असहकारितेची चळवळ ही जशी प्रत्येक ठिकाणचे लोक आपापल्या सामर्थ्यावर करितात त्याचप्रमाणें नवीन शिक्षणाचा प्रश्नहि ज्या त्या ठिकाणच्या लोकांनीं शक्य तितका आपल्याच सामर्थ्यावर सोडविला पाहिजे. नवीन शिक्षणाचा उच्चार करितांच कित्येक केवळ भावनाप्रधान लोकांच्या मनांत जगड्व्याळ कल्पना येतात. त्यांना एकादें कॉलेज किंवा प्रांतिक युनिव्हर्सिटी निघूनहि समाधान होत नाहीं; तर सर्व हिंदुस्थानाला मिळून एक विश्वविद्यालय असावें व हरएक प्रांतांतून शिक्षणाचा कार्यक्रम, शिक्षणाची पद्धति व अभ्यासाचीं पुस्तकें देखील तींच असावीं असें वाटूं लागतें. कांहीं तर अशा विश्वविद्यालयाचें शिक्षण सर्व प्रांतांतून एकाच म्हणजे हिंदी भाषेच्या द्वारें चालल्याची कल्पना मनांत येऊन त्यांना भावी आनंदाची आगाऊच समाधी लागते. पण त्यांच्या लक्षांत हें येत नाहीं कीं, येवढ्या मोठ्या रचनेचा संकल्प करूं लागलों असतां त्याच्या पायाचा नकाशा हातानें रेखाटण्यांतच आपल्या चिमुकल्या शक्तीचा व्यय होऊन जावयाचा. म्हणून मोठ्या गोष्टी बोलण्यापेक्षां हातानें होईल तेवढी लहानशी पण स्वावलंबी कृति प्रत्येकानें केली तर त्यांतच अधिक श्रेय आहे.

पुण्यापुरता विचार आपण करूं लागलों तर असें दिसून येईल कीं, आज पुण्यांत खालपासून वरपर्यंत शिक्षण घेणारीं अशीं दहापंधरा हजार तरी मुलें आहेत व यांतील बहुतेक सरकारशीं कोणत्याना कोणत्यातरी रीतीनें संबंध असणाऱ्या संस्थांतून शिकत आहेत. हीं सर्व मुलें गांधींच्या इच्छेप्रमाणें एकदम बाहेर पडलीं तर त्याचा परिणाम सरकारावर अर्थातच होईल. पण ही नुसती कल्पना झाली. नुसतें कल्पनेचें घोडें नाचवून

कोणत्याच गांवची मजल गांठतां येत नाहीं. कारण या विद्यार्थ्यांत शेंकडा पंचवीस तरी असे असतील कीं, जे केवळ सरकारी नोकरीकरितां शिकत आहेत आणि स्वतः ते किंवा त्यांचे पालक यांची सर्व महत्त्वाकांक्षा सरकारी नोकरींत शिरून पुष्कळसा मान व पैसा मिळविणें यांतच गुरफटला आहे. असे लोक प्राण गेल्यानेंहि शाळा सोडणार नाहींत. मग गांधी नाहीं गांधींचे परात्पर गुरु त्यांच्यापुढें उभे केले तरी ते फुकट. दुसरे पक्षीं शेंकडा दहा वीस विद्यार्थी असे निघूं शकतील कीं, ते आपल्या तीव्र राष्ट्रीय भावनेमुळें शाळा सोडतील व शाळा सोडतांना पुढें आपली पोटा-पाण्याची काय सोय लागेल याचा विचारहि करणार नाहींत. अशाहि लोकांकरितां नवीन शिक्षणाची सोय झाली तर हवीच; मात्र हे लोक अशा सोयीकरितां अडून न बसणारे असल्यामुळें त्यांचा भार दुसऱ्यावर पडत नाहीं, व त्याबद्दल दुसऱ्यास जबाबदारी वाटण्याचेंहि कारण नाहीं. परंतु ते पंचवीस व हे दहावीस वगळले असतां उरलेल्या पन्नासपंचावन विद्यार्थ्यांची मनःस्थिति मध्यम व सरमिसळ असते. म्हणजे सरकारी नोकरीवर तर त्यांचें लक्ष नसतें; किंबहुना सरकारी नोकरी आजन्मांत करणार नाहीं असें लिहून देण्यासहि ते खुषीनें तयार होतील; पण उपजीविकेकरितां कांहीं तरी शिक्षणाची सोय आगाऊ ते पाहतील तेव्हांच त्यांचा पाय शाळांतून कायमचा निघेल. एरवीं एकाददुसऱ्या महिन्याच्या संपासारखी हुल्लड ते करतील, परंतु नवीन व पक्क्या आधाराशिवाय जुन्या शिक्षणाच्या सोयींना कायम मुकण्यास ते सहसा तयार होणार नाहींत. एका अर्थानें या त्यांच्या सावधगिरीस फारसें नांवहि ठेवतां येणार नाहीं. कारण राष्ट्रीय सभेचा असहकारितेचा ठराव घेतला तरी जोंपर्यंत सर्व पदवीधरांनीं पदव्या टाकल्या नाहींत, सर्व सोनेरी रुपेरी बिल्लेवाल्यांनीं बिल्ले परत केले नाहींत, सर्व वकिलांनीं वकिली सोडली नाहीं, किंवा सर्व परदेशी व्यापाऱ्यांनीं अशा मालाची विक्री थांबाविली नाहीं तोंपर्यंत सर्व विद्यार्थ्यांनीं मात्र शाळांवर बहिष्कार घालावा अशी अपेक्षा कोण कशी करील? व्यापारी, विद्यार्थी, वकील कोणीहि घेतला तरी ती एकाच हिंदी जनतेच्या खाणींतली माती! अर्थात् या निरनिराळ्या मातीच्या भांड्यांचा कच्चेपक्केपणा एकाच डिग्रीचा असणार. आतां मुलें हीं तरुण व भावनाप्रधान

म्हणून त्यांची डिग्री इतरांपेक्षां थोडी वर चढेल इतकेंच काय तें ! तरुण पिढीला राष्ट्राची भावी आशा किंवा आधारस्तंभ हें नांव देण्यांत येतें तें यथार्थ आहे; तरी पण या नांवानें त्यांना भुलवून त्यांना लोकोत्तर स्वार्थ-त्यागाच्या भरीस घालणें हें दुसऱ्यानें करितां कामा नये. त्यांनीं वाटेल तर स्वतः करावें. स्वतःच्या स्फूर्तीनें ते जें करतील तेंच खरें व तेंच लाभ-दायक होईल. कदाचित् ज्यानें म०गांधींप्रमाणें सर्वस्वी स्वार्थत्याग करून फकिरी पत्करली आणि सर्वनाशाच्या पायरीवर पाऊल ठेवलें त्याला सर-सकट विद्यार्थ्यांनीं शाळा व कॉलेजें एकदम सोडावीं हें म्हणणें शोभेल, व अशा तऱ्हेचा उपदेश स्वतः गांधींनीं आपल्या तोंडानें मुंबई, पुणें वगैरे अनेक शहरीं हजारों विद्यार्थ्यांना समक्ष केलेलाच आहे, तेव्हां राष्ट्रीय सभेचा ठराव व गांधींचा उपदेश या दोन गोष्टी लक्षांत घेतां विद्यार्थ्यांना आज मार्गदर्शकतेची वाण आहे असें म्हणतां येत नाहीं.

असो; राष्ट्रीय शिक्षणाच्या योजना पूर्वी अनेक झाल्या, पुढेंहि अनेक होतील. त्या सर्व निरनिराळ्या दृष्टीनेंच केल्या जाणार हें उघड आहे. पुण्याच्या असहकारिता-कमिटीनें आपली योजना करितांना खालील प्रकारची दृष्टि ठेवलेली आहे.

(१) मोठा जगड्व्याळ प्रयत्न करण्यांत अर्थ नाहीं. त्यामुळें हातास कांहींच येत नाहीं. म्हणून पुण्यांतील सर्व मुलें कॉलेजांतून नांवें काढून घेतील व दोन अडीच हजार मुलांकरितां शिक्षणाची सोय करूं ही अपेक्षा व्यर्थ आहे. पुण्यांतीलच काय पण कोठलींहि सर्व मुलें एकदम कायमच्या शाळा सोडतील हें शक्य नाहीं. शिवाय पंचवीसशें मुलांच्या शिक्षणाची कायमची सोय करणें कोणा चालकास एकदम झेंपणारहि नाहीं. दुसरे पक्षीं अगदींच कोणी मुलें येणार नाहींत असें निराश होण्याचेंहि कारण नाहीं. याकरितां प्रथम सुमारें शंभर मुलें कॉलेज सोडून येतील असा अंदाज करून त्यांच्यापुरती सोय करण्याचें असहकारिता-कमिटीनें ठरविलें आहे. विद्यमान कॉलेजांत प्रवेश न मिळालेलीं शंभर मुलें व हल्लीं कॉलेजांत शिकत असतां तीं मुद्दाम सोडून येणारीं शंभर मुलें यांत पुष्कळच तफावत आहे !

(२) राष्ट्रीय शिक्षण किंवा असहकारिता, कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी कॉलेजच्या दर्जाच्या मुलांची प्रथम सोय करणें हेंच सर्वांत अधिक युक्त आहे. बी. ए. झालेल्या लोकांकरितां शिक्षणाची सोय करण्याचें एक तर कारण नाहीं, कारण ते पदवी घेऊन पोटापुरतें मिळविण्याला तयार झालेले असतात. शिवाय नंतरचा Post-Graduate शिक्षणक्रम अति खर्चाचा असल्यामुळें एखाद्या मोठ्या युनिव्हर्सिटींतच त्यांची व्यवस्था होऊं शकते. दुसरे पक्षीं प्राथमिक शाळेंतील किंबहुना हायस्कूलचे वर्गांतील मुलें घेणें सोईचें नाहीं. कारण एक तर मुलें वयानें अज्ञान असतात म्हणून पालकांच्या संमतीशिवाय त्यांना स्फूर्ति असूनहि शाळा सोडतां येत नाहीं, दुसरें असें कीं, लहान मुलगा प्रयोगविषयक राष्ट्रीय शाळेंत घेतल्यास हें शिक्षण पुष्कळ दिवस चालवावें लागून तें कितपत यशस्वी होतें व मुलगा कितपत तरतरीत व उपयुक्त निघतो हें लोकांना दिसून येण्याला दीर्घ काळ लागतो. म्हणून कॉलेजांत शिकणारीं मुलें घेतल्यास तीं जरूर तर आईबापांच्या इच्छेविरुद्ध स्वतंत्र शिक्षण घेण्यास वयानें सज्ञान झालेलीं असतात; व दोन किंवा फार तर तीन वर्षांच्या शिक्षणानें तीं पोटाच्या उद्योगास कशीं लागतात, व सामान्य बी. ए.च्या तुलनेनें तीं कमीअधिक लायक कितपत ठरतात हें दिसून येऊं शकेल.

(३) नवीन संस्थेंत शिक्षणक्रम ठेवावयाचा त्यांत केवळ पुस्तकी ज्ञानाची तजवीज न करितां व्यावहारिक शिक्षणहि ठेवणें जरूर आहे. या हेतूनें कॉलेजच्या दर्जाच्या पुस्तकी शिक्षणाबरोबर हस्ताक्षर,टाईप रायटिंग,लघुलेखनपद्धति, बँकांचा सामान्य व्यवहार, जमाखर्च, कागदी चलन, प्रॉमिसरी नोटा, बॉण्ड वगैरेंची चालचलाऊ माहिती, तसेंच सोयीप्रमाणें कोणत्या तरी एका धंद्याचें शिक्षण इतक्यांची सोय असहकारिता-कमिटीनें आपल्या योजनेंत केलेली आहे. हल्लीं बी. ए.पर्यंतच्या अभ्यासक्रमांत निव्वळ पुस्तकी ज्ञानाचा समावेश असतो, पण तें ज्ञान व्यवहाराला फारसें उपयोगी पडत नाहीं. पुस्तकी तर्कशास्त्र, त्रिकोणमिति, शेक्सपिअरचीं नाटकें, संस्कृत नाटकें, इंग्रजी कादंबऱ्या असल्या गोष्टींचें ज्ञान व्यवहारास कांहींएक उपयोगी पडत नाहीं व मुलगा बी. ए. झाला तरी फिरून त्याला आपण असहाय असें वाटून मास्तरकीच्या धंद्याशिवाय दुसरा तरणोपाय उरत नाहीं. वरील

विषयांच्या अभ्यासानें मनाला एक प्रकारची संस्कृतीची कल्हई किंवा जिल्हई होते हें खरें, पण व्यवहारज्ञान किंवा द्रव्योत्पादक धंदा करण्याची पात्रता या दोनहि दृष्टींनीं तो निरुपयोगी ठरतो. तो धड पंडित नाहीं, व्यवहारचतुर नाहीं, अशी त्याची अर्धवट स्थिति होते. ही दुर्दशा टाळण्याकरितां हे व्यावहारिक विषय मुद्दाम घालण्यांत आले आहेत. सामान्य बी. ए. मनुष्य घेतला तर त्याचें इंग्रजी अक्षर सुमार असतें, बालबोध सामान्य असतें, व मोडी वगैरे जें व्यवहारोपयोगी लेखन तें त्यास मुळींच येत नाहीं. शिवाय बी. ए. झाल्यानंतर एखाद्या वर्गांत जाऊन टाईप रायटिंग किंवा लघुलेखन शिकण्यास त्याला लाज वाटते म्हणून तें आधींच सक्तीनें झालेलें बरें; तसेंच सामान्य बी. ए.ला बँकांशीं व्यवहार कसा करावा, हिशेब कसे ठेवावे, हुंड्या, कागदी चलन यांचा व्यवहार कसा करावा, विमापद्धतीचीं सामान्य तत्त्वें काय वगैरे माहीत नसल्यामुळें व्यवहारांत तो इतर लोकांच्या दृष्टीनें हास्यास्पद ठरतो. या सर्व गोष्टी शिकण्याला फार श्रम लागतात असें नाहीं. पण हें शिक्षण वेळीं न झाल्यास पुढें मुळींच होत नाहीं. कित्येकांच्या मतें कॉलेजच्या अभ्यासक्रमांत ऐसले विषय ठेविल्यानें शिक्षणाच्या दर्जास कमीपणा येतो, पण ही समजूत वेडेपणाची आहे. पाश्चात्य देशांत व्यावहारिक शिक्षण असेंच दिलें जातें. आपल्या इकडे धंदेवाईक शिक्षणाचीं स्वतंत्र कॉलेजें असलीं तरी प्रत्येकाला तें शिक्षण घेणें शक्य नसतें. पण त्या विषयाची माहिती प्रत्येकाला माहीत असणें जरूर असतें.

(४) वरील व्यावहारिक शिक्षणाशिवाय एखाद्या स्वतंत्र धंद्याचेंहि शिक्षण देण्याची तजवीज असहकारिता-कमिटीच्या योजनेंत केली आहे. याचें कारण हेंच कीं, बुद्धि चालेल त्याप्रमाणें या संस्थेंतून निघालेल्या विद्यार्थ्यानें वाटेल तर शाळामास्तर व्हावें अगर कांहीं व्यापार-धंदा करावा. शेक्सपिअरचें नाटक किंवा बाणाची कादंबरी वाचण्याऐवजीं सुतारकी, लोहारकी आलेली बरी. मुखवस्तु मनुष्य हीं पुस्तकें प्रौढवयांत स्वतः किंवा शिक्षक ठेवून वाचूं शकतो. पण प्रौढवयांत वाकस, किंकरें किंवा हातोडा घेऊन सुतारकी, लोहारकी किंवा विणकरीचे माग चालविण्याची कला त्याला येणार नाहीं. तात्पर्य, लघुलेखन, टाईपरायटिंग, एखादा

हस्तकौशल्याचा धंदा, हिशेब व पेढीचे व्यवहार इतकें ज्ञान मिळाल्यास कोणासहि उपाशीं मरण्याचें कारण नाहीं.

(५) असें आहे तरी खुद्द पुस्तकीज्ञानाकडे कोणत्याहि प्रकारें दुर्लक्ष करण्यांत आलेलें नाहीं. असहकारिता-कमिटीच्या योजनेंत पांच विषयांपैकीं तीन विषय पुस्तकीज्ञानाचे व तेहि कॉलेजच्या दर्जाचे आहेत. इंग्लिश या विषयांत कांहीं उत्कृष्ट उंची इंग्रजी सर्वमान्य ग्रंथ ठेवण्यांत येऊन शिवाय इंग्रजी निबंधलेखन, भाषांतर, संभाषण, वर्तमानपत्रांचा व्यवहार यांचेंहि शिक्षण दिलें जाईल. नाहीं म्हणावयास पुष्कळशीं इंग्रजी नाटकें, कादंबऱ्या किंवा काव्यें हीं ठेवण्यांत येणार नाहींत. त्याचें कारण उघड आहे. हें इंग्रजी भारूड वाचण्यांत पुष्कळ वेळ फुकट जातो. पण पुढें मात्र त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. कमिटीनें योजिलेलें इंग्रजी शिक्षण व्यवहारासच काय पण शाळामास्तरहि होण्यास पुरेसें आहे.

(६) आर्यसंस्कृति—यांत संस्कृत व मराठी या दोनहि भाषांतील धार्मिक व विदग्ध वाङ्मय यांचें ज्ञान द्यावयाचें; मात्र एकच पुस्तक अथपासून इतिपर्यंत न शिकवितां व्याख्यानांच्या पद्धतीनें प्रमुख प्रमुख अशा अनेक ग्रंथकारांचा परिचय करून द्यावयाचा आणि संस्कृत व मराठी वाङ्मयाचा समग्र वृत्तांत अगर इतिहास सांगावयाचा, असें शिक्षण-कमिटीनें योजिलें आहे. युनिव्हर्सिटीच्या कॉलेजच्या शिक्षणक्रमांत कांहीं संस्कृत पुस्तकें असतात, पण मराठीस जवळ जवळ अजिबात फांटाच दिलेला असतो ही पद्धति बदलून सर्व शिक्षणक्रम होतां होईतों मराठींतूनच पार पाडावयाचा पण त्यांतूनहि मराठी हा विषय म्हणून शिकवावयाचा असें ठरविण्यांत आलें आहे.

(७) शेवटचा विषय कायदा, अर्थशास्त्र, राजधर्म व प्रजाधर्म हा ठेवण्यांत आला आहे. युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांत हिंदुस्थानची राज्य-पद्धति हा एक विषय इंटर म्हणजे मध्यम परीक्षेला असतो त्याचा यांत समावेश होईलच. पण शिवाय अर्थशास्त्र आणि राजधर्म व प्रजाधर्म हे विषय केवळ हिंदी दृष्टीनें शिकविण्यांत येऊन खासगी, सार्वजनिक, राज-कीय व्यवहाराला लागणारे मुख्य मुख्य कायदेकानू मुलांकडून वाचून घेण्यांत येतील. या नवीन संस्थेतील विद्यार्थी पुढें हरएक प्रकारच्या सार्व-

जनिक कार्यांत व चळवळींत पडणार आहेत हें निश्चित आहे. कारण निवळ पोटार्थी मुलगा हल्लींचें कॉलेज मुद्दाम सोडून देऊन या नवीन संस्थेंत येतो आहे कशाला? आणि अशा चळवळींत पडावयाचें तर व्यवहारोपयोगी व व्यवहार नडवणारे म्हणजे दडपशाहीचे कायदे त्याला चांगले माहीत असले पाहिजेत.

(८) कमिटीनें योजिलेला शिक्षणक्रम दोन वर्षांचा असून त्यांत वरील पांच विषयांचे प्रत्येकीं रोज एक तास शिक्षण दिलें जाईल. याहूनहि हा शिक्षणक्रम अधिक वरच्या दर्जाचा करितां येईल कीं नाहीं असें पुष्कळांकडून विचारण्यांत आलें आहे. पण या दोन वर्षांच्या भरीस आणखी एक तिसरें वर्ष घातलें असतां वरीलपैकीं कोणत्याहि एका विषयाचें उच्च दर्जाचें ज्ञान अर्थात् देतां येईल, पण हा विचार नवीन कॉलेज सुरू झाल्यानंतर पहिल्या वर्षअखेर केला तरी चालेल. शिवाय सुट्टीच्या दिवसांत वरील विषयांना उपयोगी पडणारीं अशीं सर्वसाधारण माहितीचीं व्याख्यानें नामांकित विद्वानांकडून दिलीं जातील. तात्पर्य, या संस्थेंतील शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी सामान्य संस्कृतीच्या दृष्टीनें पाहतां बी. ए.-च्या तोडीचा होईल. इतकेंच नव्हे; तर त्याहून अधिक माहितगार, कार्यक्षम, वाकबगार व स्वतंत्र उपजीविकेस समर्थ असाच होईल.

तूर्त शिक्षणक्रम दोन वर्षांचा धरून हा प्रयोग दोन वर्षेंपर्यंत तरी करून पहावा असें कमिटीनें ठरविलें असून त्याच्या खर्चाची तरतूदहि केली आहे. पण प्रयोग हा शब्द असहकारिता-कमिटीच्या ठिकाणीं आत्मविश्वास नसल्याचें दर्शक नसून केवळ तिच्या नम्रताबुद्धीचें द्योतक आहे, व कमिटीची अशी खात्री आहे कीं, मुलांची संख्या ज्याप्रमाणें वाढेल त्याप्रमाणें या संस्थेचे वर्गहि वाढूं शकतील. तात्पर्य, ज्या मुलांना कॉलेज सोडण्याची आंतून खरी स्फूर्ति असेल त्यांना यापुढें तें न सोडण्याला कोणतीहि सबब राहणार नाहीं. मात्र त्यांनीं आपली जबाबदारी आपणच उघडया डोळ्यांनीं पतकरून कॉलेज सोडावें. मग आमची अशी तशी सोय झाली नाहीं अशी तक्रार करून दुसऱ्यास दोष लावण्यास जागा राहणार नाहीं.

कित्येक बढाईखोर लोक हें कसलें लहानसें कॉलेज म्हणून नाकें मुरड-

तील हें आम्हांस माहीत आहे. पण सर्व संस्थांचा प्रारंभ असाच अल्प असतो हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. आज फर्ग्युसन कॉलेज एवढें मोठें सजलें असलें तरी तें प्रारंभीं एका सातखणी माडींतच मावत होतें ! बरें, तें आज एवढें मोठें झालें असलें तरी तें मुख्यतः सरकारच्या आधाराधर, हें कॉलेजचें नांवच सांगतें. सरकारची मदत म्हणूनच राजेरजवाड्यांची मदत, नाहीं तर त्याला विचारीत कोण होता ? व एवढ्या देणग्या कशा मिळत्या ? या कॉलेजला खासगी गृहस्थांनींहि पुष्कळ देणग्या दिलेल्या आहेत, पण त्या वेळीं सर्व महाराष्ट्रांत ही एकच उंची संस्था होती व तिच्या उत्पादकांच्या नांवाच्या पुण्याची जोड संपली नव्हती. बरें, लोकांच्या देणग्यांवर हें कॉलेज इतकें पोसलें म्हणून त्या मानानें त्याची कार्यक्षमता वाढली किंवा विद्यार्थी त्या मानानें अधिक विद्वान् व सतेज निर्माण होऊं लागले असेंहि नाहीं. पण कॉलेजचें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याच अलीकडे पुष्कळ वाढली म्हणून या कॉलेजचें प्रस्थहि पुष्कळ माजलें इतकेंच काय तें. तात्पर्य, या जुन्या तीस वर्षांच्या कॉलेजाच्या तुलनेनें आज नवीन निघणारें कॉलेज लहान वाटावें हें ठीकच आहे. कित्येक त्याला क्षुद्र असेंहि म्हणतील. पण अभ्यासक्रम, शिक्षण वगैरेंच्या दृष्टीनें पाहतां या नव्या कॉलेजांत आज फारसें कमी कांहीं नाहीं, व असेल ती उणीवहि विद्यार्थी व जनता यांचा आश्रय मिळाल्यास लवकरच निघून जाईल असें गृहीत घेऊन चालण्यास हरकत नाहीं. विद्यार्थ्याला शिक्षण मिळेल तें कशा दर्जाचें मिळेल, त्यांत खरी राष्ट्रीय दृष्टि कितपत आहे येवढ्यावर नजर देणाऱ्याला टोलेजंग इमारती, विस्तृत मैदानें, वसतिगृहें हीं नसलीं तरी कांहींएक वाईट वाटणार नाहीं. किंबहुना राष्ट्रद्रोही बडेजावीचें कंबरडें फकिरी सोंग्यानें मोडलें तरी आज तें इष्टच आहे. आज भिक्षापात्राला राष्ट्र जो मान देतें तो सोन्याच्या खलकड्यांना देत नाहीं.

राष्ट्रीय शिक्षण व पालकांचें कर्तव्य*

गेल्या केसरींत पुणें येथील राष्ट्रीय शिक्षणाच्या योजनेविषयीं लिहितांना, मुलांना उद्देशून कोणीं कसा उपदेश करावा यासंबंधानें आम्हीं आपलें मत दिलें होतें. तरुण मुलांना निवळ भावनापूर्ण वक्तृत्वानें भुलवून लोकोत्तर स्वार्थत्यागाच्या भरीला घालणें हें तिन्हाइतास योग्य नाहीं. विद्यार्थ्यांनीं स्वतःच्या स्फूर्तीनें योग्य वाटेल तेंच करावें असें आम्हीं म्हटलें होतें. पण स्वतः तरुण मुलें किंवा तिन्हाईत यांना उद्देशून जें बोलावयाचें तें वेगळें व खुद्द पालकांस उद्देशून बोलावयाचें तें वेगळें असणार हें सांगावयास नकोच. असहकारिता व राष्ट्रीय शिक्षण यांच्या संबंधांत वास्तविक जबाबदार पालकांनींच पुढाकार घेऊन कार्य केलें पाहिजे; व या बाबतींत पालकांना जागें करण्याची वेळ खास आली आहे असें आम्हांस वाटतें.

गेल्या पंधरवड्यांत राष्ट्रीय शिक्षणाची जी चळवळ झाली तिच्या योगानें पालकवर्ग जागा झाल्यासारखा दिसतो खरा, पण ही जागृति थोडीशी उलट्या दिशेनें असल्याची शंका येते असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. पुण्यास कांहीं पालकांनीं एक हस्तपत्रक काढून गेल्या रविवारीं एक पालकांची म्हणून जाहीर सभा भरविली होती. ती एकंदर पालकवर्गाच्या मनोवृत्तीचें निदर्शक अशी मानितां आली असती तर ती खेदाची गोष्ट होती; पण पुण्याच्या काय किंवा पुण्याबाहेरील काय, पालकवर्गाच्या सारासार विवेकाविषयीं आमची निराशा झालेली नाहीं. त्यांच्याशीं मोकळ्या मनानें थोडासा युक्तिवाद केल्यास त्यांना तो पटेल; व असहकारिता आणि राष्ट्रीय शिक्षण यांना सन्मुख अशीच त्यांची मनोवृत्ति होईल अशी आम्हांस अजून बळकट आशा आहे.

पालकांना उद्देशून बोलतांना प्रथम एकदोन गोष्टी सांगून टाकल्या पाहिजेत, व त्या त्यांच्याच तर्फेच्या आहेत. पहिली ही कीं, आपल्या मुलांना शिक्षण कोणतें द्यावें हें ठरविण्याची अवल जबाबदारी व मुख्य अधिकार हा पालकांचाच आहे ही गोष्ट कोणीहि नाकबूल करून चालाव-

* केसरी, तारीख ७ डिसेंबर १९२०

याचें नाहीं. राष्ट्रीय प्रश्न झाले तरी, त्यांत मुलांचा संबंध येत असल्यास, मुख्यतः पालकांच्या द्वारेंच ते सोडविले पाहिजेत. बाहेर वाटेल तितका सूर्यप्रकाश असला तरी आपल्या कांचेवर तो किती व कसा घ्यावा हें छायाचित्र काढणारा मनुष्य म्हणजे फोटोग्राफर स्वतः ठरवितो, व त्याप्रमाणें 'कॅमेऱ्या'च्या तोंडावर लहान मोठ्या भोंकाची काळी चकती किंवा 'डायफ्रम' घालतो, त्याचप्रमाणें आपली गृहस्थिति, मुलाच्या अंगची बुद्धि च इतर गुण, आणि शिक्षणाचीं उपलब्ध साधनें या तिहींचा मेळ स्वतः पालक हाच योग्य रीतीनें घालूं शकेल, दुसऱ्यानें फार तर सद्धेतुपूर्वक त्याला सल्लामसलत द्यावी इतकेंच काय तें. तसेंच तरुण मुलांनीं झालें तरी आपल्या आईबापांच्या आज्ञेनुसार वागणें हेंच त्यांचें कर्तव्य आहे. कुटुंबांतील शिस्त हाच राष्ट्रीय शिस्तीचा पाया आहे; व तिचा उच्छेद करणें हा एक प्रकारचा राष्ट्रद्रोहच होय, हें आम्हांस मान्य आहे. राष्ट्रीय शिक्षणाचे उपदेशक झाले तरी प्रायः या मार्गाचें उल्लंघन करीत नाहींत. असहकारितेला अनुलक्षून पुण्यास जें राष्ट्रीय कॉलेज लोकमान्य टिळकांचें स्मारक म्हणून निघणार त्याचें कार्यक्रमपत्रक गेल्या अंकीं प्रसिद्ध झालें आहे त्यांत या कॉलेजकडे "नांवें नोंदवितांना विद्यार्थ्यांनीं शक्य तितका पालकांच्या संमतीचा दाखला सोबत जोडावा" असेच शब्द घातलेले आहेत. यावरून निदान सदर विद्यालयाच्या चालकांच्या मनांत पालकांच्या अधिकाराचा उपमर्द करण्याचें बिलकुल नाहीं हीच गोष्ट शाबीत होते, व पुण्याबाहेरहि ज्या कोठें अशा शाळा किंवा कॉलेजें निघतील तेथेंहि हाच समंजसपणाचा मार्ग अनुसरला जाईल अशी आमची खात्री आहे. म्हणून या बाबतींत तरी पालकांना तक्रार करण्यास जागा मिळाली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. पालकांच्या तर्फेची दुसरी गोष्ट ही कीं, तरुण मुलें होतां होईतों अशिक्षित राहूं नयेत, स्वावलंबी उपजीविका चालण्याचें साधन मिळवून देण्यासारखें कांहीं तरी शिक्षण त्यांस मिळण्याची सोय अवश्य असावी अशी पालकांची इच्छा सहजच असणार व तिचेंहि समर्थन आम्हीं गेल्या केसरींत केलें आहे. अशा शिक्षणाची कांहींच सोय नसतां सर्व मुलांनीं एकदम शाळा किंवा कॉलेजें सोडून देऊन घरीं बसणें ही गोष्ट पालकांच्या जिवावर येणारी आहे हें आम्ही जाणतों. पण वरील दोन सिद्धांत संभाळूनहि

आम्हांस असें कष्टानें म्हणावें लागतें कीं, पालकवर्गानें आपल्या आजच्या खऱ्या कर्तव्याविषयीं जितकें जागृत राहिलें पाहिजे तितकें ते राहिलेले दिसत नाहींत.

महात्मा गांधी किंवा असहकारितेचे कांहीं जहाल उपदेशक अविचारानें शिक्षण एकदम सोडून देण्याविषयीं सर्व मुलांना उपदेश करितात असा आरोप केलेला कोठें कोठें आढळून येतो. पण आम्हांस वाईट इतकेंच वाटतें कीं, पालकांच्या दृष्टीनें विचाराची योग्य मर्यादा तरी कोणती हें स्पष्ट करून सांगण्याला मात्र पालक पुढें येत नाहींत. पुण्यास भरलेल्या पालकांच्या जाहीर सभेच्या निमंत्रणपत्रिकेंत इतके मुग्धपणाचे शब्द होते कीं, त्यावरून त्यांची खरी मनःस्थिति कांहींच कळून येत नव्हती; व खुद्द सभा भरली तिजमध्यें देखील पालकांच्या तर्फेचें विधायक स्वरूपाचें असें म्हणणें कांहींच मांडलें गेलें नाहीं. मुलें सर्वस्वीं शिक्षणविरहित राहिलीं तर अनर्थ होतील एवढेंच सांगण्यांत आलें; पण अलीगडांत काय, गुजराथेंत काय किंवा पुण्यांत काय, जो उपक्रम आज होत आहे त्यावरून मुलें निरुद्योगी ठेवण्याचा कोणाचाच विचार नाहीं ही गोष्ट उघड होत आहे. मग जी गोष्ट मुळांत नाहीं तिचा निषेध किंवा इनकार करण्यापासून काय फायदा? मुलें बेकार तर ठेवावयाचीं नाहींत, पण सरकाराशीं संबंध असलेल्या शिक्षणसंस्थांतहि तीं पुढें ठेवावयाचीं नाहींत, अशा दोन गोष्टींचा मेळ घालण्याचा विधायक प्रयत्न असहकारिता-कमिटीनें जो केला आहे तो सिद्धीस कसा जाऊं शकेल व त्यांत सुधारणा काय झाल्या पाहिजेत अशाविषयीं जर सभा भरविणाऱ्या पालकांनीं स्वतःच्या म्हणून कांहीं विधायक सूचना केल्या असत्या तर त्या अवश्य ग्राह्य झाल्या असत्या. पण अशा सूचना पुढें न येण्याचें कारण एकच आहे व तें हेंच कीं, सामान्य पालकवर्गाच्या मनाला विद्यमान राजकीय परिस्थितीची जितकी आंच लागावयास पाहिजे तितकी लागलेली नाहीं, व राष्ट्रीय सभेनें असहकारितेच्या ठरावाच्या रूपानें जी स्वार्थत्यागाची हुंडी त्यांच्यावर लिहिली ती अद्यापि पटवून घेण्याची त्यांची तयारी नाहीं.

पण ती हुंडी यापुढें फार दिवस खडी राहूं शकणार नाहीं हें मात्र त्यांनीं जरूर लक्षांत ठेवावें. त्यांना फक्त दोनच मार्ग खुले आहेत; पैकीं

एक हा कीं, ती हुंडी पटवून घेऊन राष्ट्राचें देणें द्यावें व स्वतः अनृणी व्हावें. दुसरा मार्ग म्हटला म्हणजे हुंडी अमान्य करून राष्ट्रीय सभेचा अपमान करावा व तिची नापत करावी. दुसरा मार्ग अर्थात् बिनखर्ची व सोपा या बुद्धीनें तोच अनुसरावा असें त्यांना वाटेल; पण त्यांनीं आज तसें केल्यास त्याचा सव्याज मोबदला त्यांना पुढें द्यावा लागेल ही गोष्ट मात्र त्यांनीं विसरतां कामा नये. व्यवहारांतल्या सावकाराची हुंडी वसूल करण्याला सरंकारी न्यायकोर्टें असतात तशीं राष्ट्राचें देणें वसूल करण्याला नाहींत हें खरें, तथापि प्रक्षुब्ध लोकमत हा एक जहाल लाठियाळ पुरभय्या किंवा पठाण असून तो कोर्टाच्या हुकुमनाम्याची अपेक्षा न करितां आपला तगादा वसूल करण्यास आजहि समर्थ आहे व दिवसेंदिवस तो अधिकाधिक समर्थ होणार ही गोष्ट पालकवर्गानें विसरूं नये. मात्र बऱ्या बोलानें आपलें देणें न दिल्यास या वाममार्गाच्या तगादावसुलींत कोठें खरचटलें, कोठें रक्त निघालें, कोठें टेंगूळ आलें अशी तक्रार करण्यास त्यांना जागा राहणार नाहीं.

तरुण मुलांनीं आईबापांची आज्ञा पाळावी, पण या आज्ञापालकत्वालाहि ज्या अंतिम मर्यादा आहेत त्या पालकांनीं विसरूं नये. घरची सुस्थिति आहे, मुलगा सज्ञान झाला आहे, सरकारी किंवा निमसरकारी शिक्षण संस्था सोडून दिल्यास इतर रीतीनें थोडें निराळें पण स्वतंत्र शिक्षण मिळण्याची सोय आहे, अशी स्थिति असताहि राष्ट्रीय शिक्षण घेण्याची मुलाची हौस जो बाप पुरविणार नाहीं त्या नतद्रष्ट बापाची आज्ञा तरी मुलानें कां पाळावी हें आम्हांस समजत नाहीं. आणि असे बाप किंवा पालक आज थोडे आहेत असें आम्हांस म्हणतां येत नाहीं, हें आमचें दुर्दैव होय. पूर्वी महाराष्ट्रांत लष्करच्या नोकरीवर निघण्याची वेळ आली असतां घरटीं एक मनुष्य देऊन लष्करी नोकरी करून वतन संभाळलें जाई. आजच्या पालकवर्गाला आमचा आज असा खडा सवाल आहे कीं, राष्ट्राचें सर्व वतन परकीयांच्या हातीं जाऊन नष्ट होण्याची वेळ आली आहे व तें राखावयाचें तर केवळ स्वार्थत्यागानेंच राखलें जाणार आहे, अशा वेळीं हिंदुस्थानातील प्रत्येक कुटुंबानें आपला एक मुलगा राष्ट्रकार्याकरितां वाहिला तर एवढी प्रचंड सेना सिद्ध होईल कीं, तिच्या बळावर आमचें

हरपलेलें स्वातंत्र्य परत आणतां येईल. पण स्वातंत्र्याचें वतन बुडालें तरी चालेल, आपल्या मुलांचें मात्र नुकसान काडीभरहि होऊं नये ही क्षुद्रपणाची स्वार्थबुद्धि आमच्यांतून अजून गेली नाहीं.

स्वतः मुलगाच रडतराऊ असेल तर त्याला स्वारीवर सक्तीनें घाडण्यांत अर्थ नाहीं. पण राष्ट्रीय सभेसारख्या अधिकारी संस्थेनें किंवा महात्मा गांधींसारख्या वैराग्यसंपन्न फकीरानें हांक मारलेली ऐकून जो मुलगा स्वार्थत्याग करण्याला तयार होतो त्याला राष्ट्रद्रोही अशा फाजिल माया-ममतेनें कोंडून ठेवणाऱ्या आईबापांचा जेवढा धिक्कार करावा तेवढा थोडाच आहे. अशाहि आईबापांची इच्छा मुलाचें कल्याण व्हावें हीच खरी; तथापि कल्याण या शब्दाचा अर्थच आज त्यांना बरोबर कळत नाहीं, किंवा कळत असला तरी तो फार संकुचित आहे. त्याचा राष्ट्र-दृष्टीनें विस्तार झाला पाहिजे, असें म्हणण्यास पालकवर्गाच्या देवाचीहि आम्हांस भीति वाटत नाहीं. जे आईबाप इतर रीतीनें अशरण, असहाय, दुबळे, पंगु असतील व ज्यांच्या उदरपोषणाचा भार सर्वस्वी आपल्या मुलावरच असेल अशांनीं एक वेळ मुलांना मिळणाऱ्या शिक्षणाकडे केवळ पैशाच्या दृष्टीनें पाहिलें तर तें कदाचित् क्षम्य होईल, व अशा आई-बापांच्या हातची म्हातारपणाची काठी काढून घेऊन त्यांना तोंडघशीं पाडण्याचा निष्ठुरपणा कोणीहि करणार नाहीं. पण आपण चैनींत किंवा भरपूर सुखांत दिवस घालविले तसेच मुलानेंहि घालवावे, किंबहुना त्याच्या सुखाची व चैनीची कमान चढती असावी, आपण केलेला धनसंचय त्यानें कमी न करतां उलट वाढवावा व त्याकरितां सरकारी नोकरी करावी, किंवा स्वतंत्र शिक्षण घेऊं नये, अशा नादान कल्पना ज्यांच्या डोक्यांत असतील त्या आईबापांना मुलांनीं राष्ट्राचेच काय पण स्वतःचेंहि हितशत्रु खुशाल मानावें, आणि त्यांची स्वार्थी दृष्टीची आशा बेलाशक लाथाडावी; त्यांत त्यांना मुळींच पातक लागणार नाहीं.

आतां सर्वच पालकवर्ग असा आहे असें आमचें म्हणणें नाहीं. तथापि देशाभिमानाचा प्रकाश मनांत थोडाबहुत पडणाऱ्या पालकांमध्येंहि पुष्कळ लोक आज राष्ट्रीय शिक्षणाविषयीं साशंक दिसतात. व त्यांना उद्देशून आम्हांस हेंच सांगावयाचें कीं, त्यांनीं आतां ही साशंकवृत्ति टाकावी,

व देशांत शिक्षणविषयक असहकारिता फैलावण्याचा उद्योग, निदान विधायक उद्योग जे लोक करीत असतील त्यांना, पुढें येऊन, हरएक प्रकारची सल्लामसलत द्यावी, मदत करावी व राष्ट्रीय शिक्षणाचें कार्य पुढें ढकलावें. कोणचीहि संस्था बनविण्याला पुष्कळ दिवस लागतात व ती मोडण्याला फारसे श्रम लागत नाहींत हा सामान्य सिद्धांत खरा आहे; व राष्ट्रीय चळवळींत झालें तरी शहाण्या मनुष्यानें तृणजलुकेप्रमाणें दुसऱ्या काडीवर पाय पक्का ठेवल्यावरच पहिल्या काडीवरील पाय काढून घ्यावा ही सावधगिरीची सूचना सामान्यतः कोणालाहि ग्राह्य होईल. तथापि स्वतः पालकांकडून जोंपर्यंत प्रगतिपर अशा विधायक सूचना येणार नाहींत तोंपर्यंत एका बाजूस स्वार्थबुद्धीनें विद्यमान संस्थांना कवटाळून धरणारे लोक व दुसऱ्या बाजूस अशा संस्थांच्या पायाखालीं सुरुंग खणून त्या एकदम उडवून देण्याचे प्रयत्न करणारे लोक यांच्यांतच बिनतोड झगडा चालू राहिल्यास नवल काय? पुण्यांतील कांहीं पालकांनीं मुलांचें हित लक्षांत घेऊन राष्ट्रीय शिक्षणाच्या चर्चेकरितां पालकांची जाहीर सभा भरविण्याचें श्रेय घेतलें याबद्दल आम्ही त्याचें अभिनंदन करतों; कारण त्या सभेचा परिणाम शेवटीं राष्ट्रीय शिक्षणाच्या तर्फेचाच होणार; पण वाईट एवढेंच वाटतें कीं, राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळेंत मुलांनीं जाणें हें संकट वाटून ज्यांनीं आपले हातपाय हलविले त्यांना असेच हातपाय हलविण्याच्या इतर अनेक बाबी असतांहि त्या कामीं मात्र ते हलत नाहींत. उदाहरणार्थ, पुण्यांत पालकांच्या परवानगीशिवाय सिनेमा किंवा नाटकें पाहण्यास जाणारे गांवचे, निदान परगांवचे, विद्यार्थी अनेक असतील. याकरितां पालकांच्या दाखल्याशिवाय नाटकवाले किंवा सिनेमावाले यांनीं मुलांना तिकिटें विकूं नये अशी चळवळ झाली तर ती इष्ट नव्हे काय? पण या कामीं मात्र कोणी पालक इस्तपत्रकें काढून सभा भरवीत नाहींत यावरून काय अनुमान काढावयाचें तें उघडच आहे.

आमची अशी खात्री आहे कीं, पालकवर्गानें मनावर घेतल्यास राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न हटकून सुटून असहकारितेचें कार्य सफल होईल. सरकारी ग्रँट घेणें ही गोष्ट ती ग्रँट घेणारालाहि मनापासून आवडतेच असें आम्ही म्हणत नाहीं. पण ज्यांनीं ती घेण्याचा प्रघात पाडला व तिजमुळें येणाऱ्या

स्वास्थ्याच्या उपभोगाची संवय लावून घेतली त्यांना ती सोडून देण्याचें वैराग्य एकदम स्फुरेल हें शक्य नाहीं. पण सरकारी ग्रँटचे आंकडे व त्याचा प्रत्यक्ष उपयोग यांची ज्यांना थोडीशी माहिती आहे त्यांच्या हें चटकन लक्षांत येतें कीं, एका बाजूस सुशिक्षणाच्या नांवाखालीं होणारा फाजील डामडौल व बडेजाव कमी करण्यांत आला, व दुसरे बाजूस पालकांनीं स्वार्थत्यागाची थोडीशी कळ सोसण्याचा निश्चय केला तर सरकारी ग्रँटवर बहिष्कार घालणें ही गोष्ट अशक्य कोटींतील नाहीं. आणि या कामीं चळवळ करावयाची तर ती करण्यास विद्यार्थ्यांचे पालकच योग्य आहेत, व त्यांनीं थोडी उचल केल्यास विद्यमान शिक्षणसंस्थांचे चालक ग्रँट सोडण्यास मिळतें घेतील व कोणी ग्रँट न सोडण्याचा आग्रहच धरील तर त्यांना वठणीवर आणण्यास फारसें अवघड जाणार नाहीं. युनिव्हर्सिटीशीं संबंध सोडणें ही गोष्ट ग्रँट सोडण्यापेक्षांहि थोडी अवघड खरी; तथापि स्वतः पालकांनीं मनावर घेतल्यास हीहि गोष्ट अशक्य नाहीं. प्रत्यक्ष सरकारी नोकरी वगळली असतां युनिव्हर्सिटीच्या पदवीला किती मान द्यावा, किती किंमत द्यावी हें लोकमतानेंच ठरणार आहे. हा मान व ही किंमत शक्य तितकी कमी करण्याचा उद्योग असहकारितेच्या पुरस्कर्त्यांनीं हल्लीं सुरू केला असून, पालकवर्ग जर या कामीं त्यांना येऊन मिळेल तर दुधांत साखर पडल्यासारखें होईल. पण त्यांना स्वतः पुढें पाऊल टाकून विधायक प्रगतिपर असें कांहींच करावयाचें नसेल तर सर्वनाश जवळच ठेवलेला आहे हें मात्र त्यांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें.

पुणें टिळक महाविद्यालय*

उद्घाटनसमारंभ

पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें बुधवार ता. ८ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां येथील श्रीशिवमंदिराच्या विस्तीर्ण जागेंत टिळक स्मारक कमिटी-मार्फत स्थापन झालेल्या टिळक महाविद्यालयाचा उद्घाटनसमारंभ अत्यंत थाटानें नानासाहेब वैद्य यांच्या हस्तें पार पडला. समारंभास शहरांतील राष्ट्रीय पक्षाचे सर्व वर्गांचे व सर्व जातींचे हिंदु व मुसलमान पुढारी हजर होते. मीरतचे मौलवीसाहेब हे हल्लीं येथें असून तेहि समारंभास आले होते.

यानंतर न. चिं. केळकर यांनीं विद्यालयासंबंधानें उद्देशपत्रकवजा माहिती इंग्रजींत वाचून दाखविली. तिचा सारांश खालीलप्रमाणें—

सदर विद्यालयाचे हेतु दोन आहेत–(१) असहकारितेच्या तत्त्वाला अनुसरून शाळा व कॉलेजें सोडून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करणें, व (२) लो० टिळकांच्या स्मारकाकरितां योजिलेल्या युनिव्हर्सिटीचा पहिला घटक बनविणें. राष्ट्रीय सभेच्या असहकारितेच्या ठरावाचा खरा अर्थ किंवा तो अमलांत आणण्याचीं योग्य साधनें कांहींहि असोत, राष्ट्रीय सभेशीं निष्ठा बाळगून व स्वार्थत्याग करून जीं मुलें बाहेर पडलीं त्यांच्या अभ्यासाची तजवीज लावणें हें अवश्य कर्तव्य आहे. हें विद्यालय प्रारंभीं असावें तितकें बडेजावीचें नाहीं असे दोष टीकाकार दाखविणार हें ठरलेलेंच आहे. पण इतर विद्यालयांपेक्षां यांत एकदोन फायदे इतके भरपूर आहेत कीं, ते ही उणीव भरून काढतील. पहिलें हें कीं, इतर कॉलेजांच्या मानानें यांतील पुस्तकी शिक्षण कमी नसून व्यावहारिक शिक्षण मात्र अधिक आहे. यांतून बाहेर पडणारे विद्यार्थी सरकारी नोकरीला नालायक अर्थातच असणार; व सरकारच्या बगलेंत शिरणाऱ्या श्रीमंत कारखानदारांनाहि यांना नोकरीस ठेवण्याची बुद्धि होणार नाहीं. कारण त्यांच्या अंगांतील राष्ट्रीयत्वाचें तेज हाच त्यांचा अपराध. पण स्वतंत्र धंद्यांच्या दृष्टींत या विद्यालयांतील शिक्षण

* केसरी, तारीख १४ डिसेंबर १९२०.

खास अधिक उपयोगी पडेल. शिवाय यांतील विद्यार्थी पुढें राष्ट्रीय सेवा करण्यास विशेष लायक ठरतील हें सांगावयास नकोच. तसेंच यांतील शिक्षक व विद्यार्थी हे एकाच हेतूनें प्रवृत्त झाले असल्यामुळें या उभयतांनीं मिळून हें विद्यालय जसें काढलें तसेंच तें यशस्वी व्हावें अशीहि त्यांची इच्छा असणार यामुळें ते एकमेकांशीं जिव्हाळ्यानेंच वागतील. शिवाय लो. टिळकांविषयीं त्यांची आदरबुद्धि व तिजमुळें येणारी स्फूर्ति याहि दृष्टीनें ते समानधर्म म्हणतां येतील.

पुणें टिळक स्मारक कमिटीनें शिक्षणविषयक स्मारक करण्याचें ठरविलें हें अभिनंदनीय होय! आपल्या बाळपणींच टिळकांनीं शिक्षण हेंच राष्ट्रीय सेवेचें मुख्य अंग मानलें होतें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांबरोबर टिळकांनीं 'न्यू इंग्लिश स्कूल' नामक शाळा काढली हें खरें. परंतु त्यांचा खरा मानस जमल्यास कॉलेज काढावें असाच होता हें प्रसिद्ध आहे, व पुढें संधि येतांच टिळकांनीं फर्ग्यूसन कॉलेज काढलेंहि. या कॉलेजला एका गोऱ्या अधिकाऱ्याचें नांव दिलें गेलें व युनिव्हर्सिटीचा अधिकार त्यानें मानला या दोन दोषांत पुढें सरकारी ग्रँट घेतल्याच्या तिसऱ्या दोषाची भर पडली; शिवाय टिळक व त्यांच्या मताचे लोक यांनीं अंग काढून घेतल्यावर ज्यांच्या हातीं या कॉलेजाची व्यवस्था गेली त्यांचीं राजकीय मतें तर प्रसिद्धच आहेत! कोणावर टीका करण्याची माझी इच्छा नाहीं; व आपल्या चालू संस्थेचें धोरण एकदम बदलणें कोणासहि एकदम अवघड जातें हें खरें. पण व्यक्तींच्या अडचणीमुळें एकादी गोष्ट अवघड ठरली तर ती राष्ट्रानें करूं नये असें नाहीं.

प्रथम सरकारी संस्थांना दोष देऊन ग्रँट घेणाऱ्या खासगी संस्था निघाल्या. ग्रँट घेण्याला दोष देऊन ग्रँट न घेणाऱ्या संस्था निघाल्या, पण त्यांना युनिव्हर्सिटीशीं संबंध तोडतां आला नाहीं. याच्या पुढची पायरी म्हणजेच ग्रँट नको व हा संबंधहि नको असें म्हणणारांची. त्यांनीं वाटल्यास सर्वस्वी स्वतंत्र अशी संस्था कां काढूं नये? बनारस हिंदू युनिव्हर्सिटी, अलीगड युनिव्हर्सिटी यांनीं एक पाऊल पुढें टाकलें तर चौदा वर्षांपूर्वी महाराष्ट्रविद्याप्रसारक मंडळ म्हणजे समर्थ-विद्यालय निघालें, त्यानें दोनहि पावलें पुढें टाकलीं होतीं. सरकारनें समित्यांचा कायदा लावून समर्थ-

विद्यालय बुडविण्याचा अव्यापारेषु व्यापार केला; नाहीं तर तळेगांवास आज राष्ट्रीय कॉलेज व युनिव्हर्सिटीच दिसली असती. अलीकडे प्रो० कर्वे यांनीं परिश्रमपूर्वक स्त्रियांकरितां युनिव्हर्सिटी काढली व तीहि आज निखालस राष्ट्रीय शिक्षणाचीच संस्था आहे व सरकारी ग्रँट किंवा चार्टर न घेतां ती चालली तर त्याच नांवास याहीपुढें ती पात्र राहील. महाराष्ट्रांत पुरुषांकरितां राष्ट्रीय युनिव्हर्सिटी स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीनंतर निघावी ही विधिघटनेची एक मौजच आहे. पण मागाहून का होईना निघो म्हणजे झालें ! गुजराथेंत गांधींनीं स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढलीच आहे तशीच महाराष्ट्रांत कां निघूं नये ?

आमची ही संस्था आज अल्पप्रमाण आहे, पण सर्व मोठ्या संस्था अल्पमूलच असतात. पण अल्पमूल म्हणजे अल्पमूल्य नव्हे. लो० टिळकांच्या नांवानें युनिव्हर्सिटी निघाल्यास तिला पांच प्रकारची कामगिरी करतां येईल. (१) असहकारितावाल्या स्वार्थत्यागी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय, (२) हल्लींच्या कॉलेजांतून न मिळणाऱ्या व्यावहारिक शिक्षणाची सोय, (३) उदार ज्ञानाचा मुबलक प्रसार, (४) उपयुक्त विषयांवर राष्ट्रीय दृष्टीनें सोप्या भाषेंत लिहिलेल्या सोप्या पुस्तकांचा प्रसार, (५) आजन्म राष्ट्रसेवेस वाहून घेणाऱ्या लोकांची सोसायटी.

मुंबईच्या सरकारी युनिव्हर्सिटींत राष्ट्रीय दृष्टीनें सुधारणा करण्याचा प्रयत्न आजवर ज्यांनीं केला त्यांचे आभार मानलेच पाहिजेत पण हें काम खांद्यावर पर्वत उचलल्यासारखें जड व मुंगीच्या पायानें चालण्यासारखें हळुहळू होत असतें म्हणून शिक्षणाच्या बाबतींत सुधारणेचा नाद टाकून देऊन क्रांतीचा मार्ग पत्करणें योग्य होईल. अशा प्रकारच्या प्रयत्नांची लोक निंदा व थट्टाहि करतील. एकादा-अर्धा प्रयत्न फसेलहि, पण राजकीय स्वराज्य मिळविण्याकरितां चाललेल्या युद्धांत जशा एकामागून एक मोहिमा चालतात–त्यांतील एकादी साधते व एकादी फसते–तसाच राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्मीहि प्रयत्न अवश्य झाला पाहिजे.

अशा आशयाचें उद्देशपत्रक वाचून दाखविल्यानंतर न. चिं. केळकर आपल्या भाषणांत म्हणाले कीं, चाळीस वर्षांच्या अवधीनें ज्या संस्था आज वाढीस लागल्या आहेत त्या संस्थांचे चालक आपल्या या अल्प

प्रमाणांतील प्रयत्नास हंसोत; पण त्यांच्या संस्थांचे बाल्यावस्थेतलें रूप कसें होतें तें मला माहीत आहे आणि आजमितीला देखील त्या संस्थांतील विद्यार्थ्यांस विश्वासांत घेऊन तुझे कांहीं प्रोफेसर्स कसे आहेत असें विचारल्यास हल्लींचेंहि स्वरूप उघडकीस आल्यावांचून रहात नाहीं. अशांनीं नाकें मुरडण्यासारखी आपली संस्था खास नाहीं. प्रत्येक ठिकाणाहून एक दोन निवडक खेळाडू घेऊन 'टीम' बनवावी तसा आमचा प्रोफेसरांचा संघ सर्वोत्कृष्ट बनला आहे. आमच्या या महाविद्यालयाची लवकरच महाराष्ट्रीय युनिव्हर्सिटी बनेल. महाराष्ट्रीय युनिव्हर्सिटींत इतर प्रांतांतल्या विद्यार्थ्यांस येण्यास प्रतिबंध आहे असा याचा अर्थ होत नसून जशी गुजराथेंत निघालेली ती गुर्जर युनिव्हर्सिटी, तशीच महाराष्ट्रांतहि निघणारी ही महाराष्ट्रीय युनिव्हर्सिटी होय. या महाविद्यालयांत कानडी विद्यार्थ्यांना कानडी वाङ्मय शिकविण्याची सोय लवकरच करण्यांत येणार आहे.

विद्यार्थी व असहकारिता*

कलकत्त्याच्या जादा राष्ट्रीय सभेनें असहकारितेचा जो ठराव मंजूर केला त्यांत विद्यार्थ्यांनीं असहकारिता अंमलांत आणावी असें उपदेशिलें होतें; तथापि असहकारितेच्या ठरावाची प्रत्यक्ष भाषा इतर बाबींप्रमाणें विद्यार्थ्यांच्या बाबतींतहि संदिग्ध होती, निदान समाधानकारक तरी नव्हती. यामुळें ठरावाचा अर्थ व तदनुरोधानें अंमल करतांना समजुतींत एकवाक्यता होत नव्हती. नागपूरच्या राष्ट्रीय सभेनें ही संदिग्धता काढून टाकली. एवढेंच नव्हे, तर असहकारितेचा एकंदर ठराव व्यापक म्हणजे सर्वस्पर्शी व समाधानकारक केला, यामुळें असहकारितेच्या लोकांनीं किंवा काँग्रेसच्या इमानी सेवकांनीं विद्यार्थ्यांसंबंधीं कोणतें धोरण स्वीकारावें याविषयीं संशयास जागा उरली नाहीं. हल्लींच्या ठरावाप्रमाणें सोळा वर्षांच्या आंतील विद्यार्थ्यांना असहकारितेचा प्रत्यक्ष उपदेश कोणास करतां येत नाहीं. फक्त त्यांच्या पालकांसच तो करतां येतो. सोळा वर्षांच्या आंतील विद्यार्थ्यांनेंहि

* केसरी तारीख २५ जानेवारी सन १९२१

स्वतःच्या मनास पटेल तर असहकारिता अंमलांत आणावी. स्वयंस्फूर्तीला इतर कशाचेंहि बंधन पडूं शकत नाहीं. पण पूर्वी त्यांना उद्देशून प्रत्यक्ष उपदेश करण्यास जी चुकून जागा होती ती हल्लींच्या ठरावानें काढून टाकून तसा उपदेश करण्याचा स्पष्ट निषेध केला आहे, यामुळें असहकारिता-वादी लोकांचें नुकसान असें फारसें झालें नाहीं. पण हे लोक वयाकडे न पाहतां कोंवळ्या पोरांनाहि कुमार्गाला लावितात असा जो आक्षेप घेण्यास जागा होती ती गेली, एवढा खरोखर फायदा झाला. सोळा वर्षांच्या आंतील मुलांना प्रत्यक्ष उपदेश करूं नये. याच्याच जोडीला सोळा वर्षांच्या वरील मुलांना तसा उपदेश करतां येईल, अशी जी स्पष्ट संमति मिळाली ती इष्ट असून तिच्याच जोरावर विद्यार्थिकृत असहकारितेचें काम हल्लीं फैलावत आहे. सोळा वर्षांच्यावरील मुलगा म्हणजे प्रायः कॉलेजांतील मुलगा असाच अर्थ होतो. जो अखेरची परीक्षा देऊन सुटला त्याला विद्यार्थी या नात्यानें असहकारितेचा उपदेश कसा करावयाचा? तो मग प्रौढ झाला व स्वतंत्र नागरिकांच्या ओळीस बसला. स्वतंत्र नागरिक या नात्यानेंहि असहकारितेचें कार्य करण्यास त्याला पुढें जन्मभर वाव आहेच. पण प्रस्तुत मुद्दा इतकाच कीं, एकीकडे सोळा वर्षांच्या आंतील वय, व दुसरीकडे परीक्षा पास होऊन जाणें; या दोन मर्यादा लक्षांत घेतल्या तर विद्यार्थीविषयक असहकारितेची व्याप्ति आपोआपच निश्चित होते. असहकारितेसंबंधानें बोलावयाचें तर विद्यार्थी म्हणजे कॉलेजांतील विद्यार्थी एवढाच अर्थ निघूं शकतो; दुसरा निघतच नाहीं.

कॉलेजांतील मुलें झालीं तरी एका अर्थानें अज्ञानच म्हणतां येईल. परंतु ती भाषा फाजील प्रेमाची किंवा लाडाची होय. मध्यम वयाच्या मनुष्याच्या नशिबांत जर मातृसुख असलें तर त्या आईलाहि आपला मुलगा कोंवळा बाळ वाटतो व त्या दृष्टीनें ती त्याला काळजी घेऊन वागविते. पण सार्वजनिक व्यवहारांत ही घरगुती दृष्टि ठेवून चालत नाहीं. कॉलेजचीं मुलें हीं मुलेंच असलीं तरी प्रौढ मुलें. स्वतःचें बरेंवाईट काय हें समजण्याची त्यांची पात्रता व तिला अनुसरून स्वतंत्रपणें वागण्याचा अधिकार हीं दोनहि गृहीत घेतलीं जातात. या गोष्टीस अनुसरूनच नागपूरच्या राष्ट्रीय सभेनें प्रौढ विद्यार्थ्यांच्या विवेकबुद्धीचा स्पष्ट उल्लेख केला

आहे; व अशा विद्यार्थ्यांना म्हणजे अर्थात् त्यांच्या विवेकबुद्धीला उपदेश करण्याची स्पष्ट अनुज्ञा दिली आहे. अशाहि प्रौढ मुलांना असहकारितेच्या उपदेशाचें पाणी पाजावयाचें तर तें शक्य तितकें पालकांच्या वळणानें पाजतां आलें तर बावगें नाहीं; व याच दृष्टीनें तारीख ७ डिसेंबर १९२० च्या अग्रलेखांत "राष्ट्रीय शिक्षण व पालकांचें कर्तव्य" या विषयाची आम्हीं चर्चा केली होती. त्या लेखांत योजलेल्या शब्दांनींच बोलावयाचें तर आम्हीं असें म्हटलें होतें कीं, "पालकवर्गानें मनावर घेतल्यास राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न हटकून सुटून असहकारितेचें कार्य सफल होईल." विशेषतः सरकारी ग्रँट घेणाऱ्या शिक्षणसंस्थांनीं ती सोडून देणें व आपल्या संस्था राष्ट्रीय करणें या बाबतींत चळवळ करावयाची तर ती करण्यास विद्यार्थ्यांचे पालकच योग्य आहेत. त्यांनीं थोडी उचल केल्यास सर्व काम होईल, आणि पालकवर्ग जर असहकारितेच्या पुरस्कर्त्यांना येऊन मिळेल तर दुधांत साखर पडल्यासारखें होईल असें आम्हीं म्हटलें होतें. पण त्याच वेळीं हेंहि स्पष्ट बजावलें होतें कीं, "त्यांना स्वतः पुढें पाऊल टाकून विधायक व प्रगतिपर असें कांहींच करावयाचें नसेल तर सर्वनाश जवळच ठेवलेला आहे, हें मात्र त्यांनीं ध्यानांत ठेवावें." पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, त्यानंतर आज दीड महिन्यांत व दरम्यान नागपूरच्या राष्ट्रीय सभेनें कलकत्त्याच्या सभेचा ठराव पक्का केला असतांहि पालकवर्गाच्या हातून पुढें पाऊल पडल्याचें कांहींच चिन्ह नाहीं, यामुळें एक पक्षीं विद्यार्थी अस्वस्थ व उतावळे झाले आहेत, व दुसरे पक्षीं असहकारितावादी लोकांनाहि खुद्द विद्यार्थ्यांना कॉलेजें सोडण्याला बेलाशक उपदेश करण्याला कांहीं हरकत उरली नाहीं. यामुळें पालकांच्या पर्वतप्राय अनास्थेंत या दोन बाजूंनीं बोगदा पोखरण्यास सुरवात झालेली असून नागपूर, कलकत्ता वगैरे ठिकाणीं झालेल्या चळवळीचा अर्थ हाच कीं, या बोगद्यांतून आतां आरपार उजेड लुकलुकूं लागला असून असहकारितेचा राजमार्गहि लवकरच साफ होईल.

परवां पुण्यास भरलेल्या विद्यार्थ्यांच्या सभेपासूनहि हाच बोध घेतला पाहिजे. या बोगद्याचें भगदाड पाहून सर्वनाश जवळ ठेपला असें कदाचित् पालकांस वाटेल. पण आम्हीं पूर्वीच्या एका लेखांत म्हटल्याप्रमाणें कल्याण व अकल्याण या शब्दांचे त्यांचे अर्थ फार संकुचित असतात.

म्हणून मळलेला मार्ग सोडून आपला मुलगा किंचित् बाजूला गेला एवढ्यानेंच त्यांना सर्वनाश वाटतो. पण हा नाश लहान असो वा मोठा असो, मानीव असो किंवा वास्तविक असो, त्यांना ती शिक्षा होणें आतां सर्वस्वी योग्यच ठरत आहे. मनुष्याला शिक्षा करण्याचे दैवाचे प्रकारच असे मार्मिक असतात कीं, जी गोष्ट मनुष्य अज्ञानानें उराशीं बाळगतो तिच्याच द्वारें त्याची हानि व्हावी. फार लाड केलेला मुलगा मूर्ख व आईबापांसच लाथा मारणारा निघावा, किंवा नवसानें झालेला मुलगा मृत्युमुखीं पडावा हे याच शिक्षेचे प्रकार होत. आजकालचे पालक असें मानतात कीं, सरकारी किंवा निमसरकारी शाळांतून ठराविक शिक्षण घेणें हीच आपल्या मुलाच्या कल्याणाची परमावधि; व ही त्यांची घातक कल्पना दैवाला आज काढून टाकावीशी वाटत असल्यामुळें हीं मुलेंच बंडखोर बनून ही शिक्षणपद्धति लाथाडूं लागलीं आहेत. पालकांच्या दृष्टीनें हा सर्वनाश असेल, पण वास्तविक राष्ट्राच्या प्रगतीचें तें एक गूढ बीजच आहे. पालकांनीं आपली विवेकशक्ति कायमची गवसणींत घालून ठेवली, तेव्हां राष्ट्रीय सभेलाहि खुद्द मुलांच्या विवेकशक्तीला गवसणींतून काढावें लागलें; व या विवेकशक्तीच्या तारा जुळवून हें मानसिक वाद्य सर्व देशभर सारखें सुरेल करून वाजविण्याचें काम आतां सुरू झालें आहे. एक तार छेडल्याबरोबर दुसरी तार आपोआप स्पंदन पावूं लागली म्हणजे जोड बरोबर लागला असें समजण्यांत येतें. त्याच रीतीनें नागपूर, कलकत्ता व महाराष्ट्र या तीन दूरदूरच्या ठिकाणीं एकाच उमद्या प्रवृत्तीनें विद्यार्थ्यांचीं मनें स्फुरण पावूं लागलीं आहेत. यावरून असहकारितेची वीणा विद्यार्थ्यांच्या बाबतींत तरी सुरेल लागत चालली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पालकांनीं पुढें पाऊल न टाकल्यामुळें ती जागा आक्रमण्यास असहकारिताद्यांनीं पुढें यावें हें रीतीचेंच आहे. कारण विद्यार्थ्यांच्या मनाचा अंत तरी त्यांनीं कोठवर पहावा ! घुढाऱ्यांनीं अनुसरलेलें धोरण फाजील सावधगिरीचें आहे अशी तक्रार उत्पन्न होणें हें विद्यार्थ्यांची विवेकबुद्धि पूर्ण विकसित होत असल्याचें स्पष्ट चिन्ह आहे. कोणीहि आपल्या उपदेशानें भरीस भरून व्यर्थ बळी पडूं नये असें घुढाऱ्यांना वाटणें व आपल्याविषयीं अशी सावधगिरी घुढारी ठेवतात हें

आपल्यावरील अविश्वासाचें एक लक्षण म्हणून त्याचा विद्यार्थ्यांना राग येणें या गोष्टी उभयतांनाहि सारख्याच शोभणाऱ्या आहेत.

पालकांनाहि आम्ही हें स्पष्ट विचारतों कीं, त्यांचीं मुलें रूढ विद्याभ्यास-क्रमांतून बाजूला गेलीं तर त्यांना तरी इतकें वाईट कां वाटावें ? धंदे-शिक्षणाची गोष्ट कदाचित् थोडीशी निराळी मानली जाईल तर तें एक असो. पण नुसत्या आर्ट्स् शाखेच्या अभ्यासासंबंधानें देखील आहे हेंच अत्यंत श्रेयस्कर याहून राष्ट्रदृष्ट्या अधिक श्रेयस्कर, असें कांहीं असूं शकणार नाहीं, ही त्यांची बुद्धि ढळत नाहीं असें पाहिलें म्हणजे त्यांच्या बुद्धिजाड्याची कींव करावी तितकी थोडीच वाटते. खुद्द पुण्याचेंच उदाहरण घेतलें तर आज सुमारें पंधराशें मुलें आर्ट्स् शाखेचा अभ्यास करीत आहेत. या सर्वांनीं जर आज सरकारी किंवा निमसरकारी कॉलेजें सोडून दिलीं तर त्यांचें विशेष नुकसान होईल असें आम्हांस तर वाटत नाहीं. याच तोडीचें शिक्षण राष्ट्रीय शाळांतून देतां येईल. पण हें शिक्षण कायमचें सोडून देण्याचाहि प्रश्न नसून फार तर एक वर्षभर कॉलेजांवर बहिष्कार घालण्या-चा प्रश्न जेव्हां पुढें येतो तेव्हां तर कांहींच अडचण उरत नाहीं. एक वर्षभर कॉलेज सोडणाऱ्या मुलांची तीन तऱ्हांनीं व्यवस्था होऊं शकते. कांहीं मुलें घरचीं खाऊनपिऊन सुखी असतात यामुळें राष्ट्राकरितां एक वर्षभर शिक्षण सोडून तीं घरीं बसलीं तर आईबाप खास दरिद्री होत नाहींत. घरीं बसूनहि विद्यार्थ्याला लिहितां येऊं शकतें व इच्छा असल्यास त्याला राष्ट्रकार्यांतहि थोडें सामील होतां येईल. ज्यांना शिक्षण लवकर संपवून पोटास मिळावयास लागलेंच पाहिजे असेहि कांहीं विद्यार्थी अस-तात. पण त्यांच्याकरितां स्वतंत्र राष्ट्रीय शिक्षणाचीं कॉलेजें निघणें मुळींच कठीण नाहीं. इकडे शिकावयाचें तें तिकडे इतकाच फरक. उलट राष्ट्रीय सभेच्या सेवेचें पुण्य मात्र पदरांत पडतें. तिसरा वर्ग अशांचा कीं, ज्यांना शिक्षण पुरें करण्याची इतकी आस्था किंवा आवश्यकता नाहीं. त्यांना करण्यासारखी फार मोठी कामगिरी वाढून ठेवलेली आहे. ती म्हटली म्हणजे खेड्यापाड्यांतून जाऊन राष्ट्रीय सभेचा निरोप अज्ञ जनतेला सम-जावून सांगणें. अशा रीतीनें तीनहि वर्गांची व्यवस्था तर लागतेच; पण त्याचबरोबर कॉलेजांवर बहिष्कार घालणें ही फार महत्त्वाची गोष्ट सिद्ध होते.

या बहिष्काराचा परिणाम सरकारवर खरा कितपत होईल असाहि प्रश्न कोणी विचारतात. पण त्याला उत्तर हेंच कीं, सरकारवर परिणाम होवो न होवो; आपलें कर्तव्य केल्याचें समाधान तरी आपणांस खचित लाभेल. सरकारी किंवा निमसरकारी कॉलेजें ओस पडलीं म्हणून सरकारची प्रत्यक्ष कांहींच हानि होत नाहीं. त्यांची नोकरभरती एक वर्षांत फारशी रोडावणार नाहीं, किंवा अठरा कारखाने बंद पडणार नाहींत. पण राष्ट्रीय सभेच्या शब्दाला राष्ट्रांत मान आहे, सभा सांगते तें लोक अमलांत आणतात, पुढारी व अनुयायी यांचा परस्पर विश्वास असून एकाच्या हांकेला ओ देऊन दुसरा त्याला कृतार्थ करतो ही गोष्ट सिद्ध होण्यांत राष्ट्राचा खरा फायदा आहे. आज विद्यार्थ्यांनीं ऐकलें, उद्यां वकील ऐकतील, परवां व्यापारी ऐकतील, नंतर मजूर ऐकतील, शेवटीं शेतकरी ऐकतील व एकाच्या वेळीं जरूर तर हे सर्व मिळून ऐकतील असा आत्मविश्वास पटूं लागतो, हेंच यांतील मुख्य मर्म आहे. विद्यार्थ्यांनीं मनावर घेतल्यास एक वर्षाच्या बहिष्कारानेंहि त्यांना इतर गोष्टी साधतां येतील. उदाहरणार्थ, जीं कॉलेजें चतकोर भाकरीच्या आशेला लागून अजूनहि गुलामगिरींत व्यर्थ खितपत पडलीं आहेत त्यांना तींतून बाहेर काढणें. अशा कॉलेजांपैकीं कांहीं मवाळ लोकांच्या हातीं असून राष्ट्रीय सभेला विरोध करणें हेंच त्यांचें ब्रीद असल्यामुळें एकच विद्यार्थी उरला तरी बेहेत्तर, पण आम्ही ग्रँट घेतल्याशिवाय राहाणार नाहीं अशा हट्टाला ते पेटूं शकतील. अशांनाहि वठणीवर आणतां येणार नाहीं असें नाहीं. प्रत्यक्ष मुलांनीं मनावर घेतल्यास हा हट्ट किती चालतो हें जग पाहील. पण दुसरीं कित्येक कॉलेजें अशीं आहेत कीं, तीं वास्तविक राष्ट्रीय भावनेच्या लोकांनींच चालविलेलीं आहेत. पण सरकारी ग्रँटच्या रोगानें येणारी सूज हेंच निरोगी बाळसें असें त्यांना वाटूं लागतें, आणि कोणी-कडून तरी कॉलेज वाढूं दे मग स्वाभिमान कितीहि खचीं पडला किंवा अधिकाऱ्यांशीं लांगूलचालन करावें लागलें तरीहि चालेल अशी बुद्धि त्यांना होऊं लागते. अशा लोकांना क्वचित् मधून मधून वैराग्य येऊं शकतें. पण त्यांना अशी शंका येते कीं, आम्हीं आज ग्रँट सोडली व बडेजावीला रजा देऊन फीच्या उत्पन्नांत कसें तरी निभावून घेतलें, तरी खुद्द विद्यार्थ्यां-

चा तरी उदार आश्रय कायमचा टिकेल हें कशावरून ? व आज जसे धनिक लोक देणग्या देतात तसेच उद्यां देतील कशावरून ? असल्या शंकेला आमच्या मतें खुद्द विद्यार्थीच समर्पक उत्तर देण्याला समर्थ आहेत.

आज न्यू पूना कॉलेजला कोणा एका गृहस्थानें तीन लक्ष रुपयांची देणगी कबूल केली असतांहि त्यांना आपलें कॉलेज राष्ट्रीय करण्याचें धैर्य होत नाहीं, याचें एक कारण विद्यार्थ्यांच्या हृदयांत ज्योत जशी पेटावी तशी पेटलेली त्यांना दिसत नाहीं हें होय. या कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या चारित्र्यावर हा एक डागच आहे असें आम्ही समजतों. म्हणून त्यांनीं निश्चय करून जर हें कॉलेज एक वर्षभर सोडलें तर सर्वांचाच त्यांत फायदा होईल. विष्णुशास्त्री चिपळूणकरांपर्यंत केसरी व न्यू पूना कॉलेज या दोघांचाहि संबंध पोंचत असल्यामुळें केसरी व कॉलेज हे दोनहि सगोत्र होत. व सगोत्राचें निसंतान व्हावें अशी कोणीहि इच्छा करीत नाहीं हें आम्हांस माहीत आहे. पण हें कॉलेज राष्ट्रीय झाल्याच्या योगानें त्याचें निसंतान न होतां, उलट त्याचा कीर्तिवंश विस्तारच पावूं लागेल असें आम्हास वाटतें. न्यू पूना कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं इष्टानें आजचें कॉलेज बुडवावें असें आमच्या मनांत येण्याला द्वेष नसून प्रेमच कारण आहे. तात्पर्य, कलकत्त्याप्रमाणें घुण्याच्या विद्यार्थ्यांनीं निश्चय करून एक वर्षपर्यंत एकोपा दाखविल्यास त्या एका कृत्यांतून अनेक कार्यें निष्पन्न होण्यासारखीं आहेत. आपल्या पालकांनीं राष्ट्राला दगा दिला याची जर विद्यार्थ्यांस चीड येत असेल व राष्ट्रीय सभेनें गृहीत धरल्याप्रमाणें विद्यार्थ्यांना विवेकबुद्धि असेल, तर ती जगाला दाखविण्याची हीच वेळ आहे. सुदैवानें कॉलेजांतील विद्यार्थी अजून संसारपंकांत रुतलेले नसतात. त्यांचा आश्रित वर्ग वाढून जबाबदारी फैलावलेली नसते. म्हणून मळलेल्या मार्गाला सोडून किंचित् बाजूला जाऊन स्वसामर्थ्यावर थोडासा पराक्रम करून दाखविण्याची हौस असल्यास ती भागविण्यास आयुष्यांत हा एवढाच काळ आहे, हें लक्षांत घेऊनच राष्ट्रीय सभेनें त्यांना हांक मारलेली आहे. व ते तिला ओ देतील असा आम्हाला भरंवसा वाटतो.

-[२]-*

गेल्या आठवडयांत मुंबई, पुणें धारवाड वगैरे ठिकाणीं विद्यार्थी-वर्गामध्यें असहकारितेच्या चळवळीला बरी सुरवात झालेली आहे. कॉलेज सोडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मुंबईस सुमारें १००० पर्यंत गेलेली असून राष्ट्रीय शिक्षणाचे कॉलेजची स्थापनाहि या आठवडयांत होईल अशीं चिन्हें दिसत आहेत. धारवाडास तीनचारशें विद्यार्थ्यांनीं कॉलेज सोडल्याची बातमी आली असून तेथेंहि हल्लींचें खासगी कॉलेज स्वतंत्र राष्ट्रीय शिक्षणाचें केलें जाईल असा अंदाज आहे. या चळवळीला पुण्यांत दोन महिन्यांपूर्वीच प्रारंभ झाला होता व टिळक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची संख्या हल्लींच नव्वदावर गेली असून हळुहळू ती वाढेल, घटणार नाहीं, असें स्पष्ट दिसत आहे. पण या कॉलेजांत न येतां घरीं बसणाऱ्या किंवा स्वयंसेवक या नात्यानें राष्ट्रकार्याकरितां बाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जमेस धरली तर कॉलेज सोडलेल्या एकंदर विद्यार्थ्यांची संख्या २०० वर गेली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. या संख्येंत डेक्कन कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा समावेश झालेला नाहीं. पण लवकरच त्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या स्वार्थ-त्यागाची बातमी देण्याचा सुयोग येणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत आणि राहिलेल्या इतर विद्यार्थ्यांनीं ही टर्म पदरांत पाडून घेऊन पुढें मात्र त्या पूर्ण सरकारी कॉलेजास कायमचा रामराम ठोकल्यास त्यांचें तेंहि कृत्य असहकारितेच्या पुण्यमार्गांत रुजूं होणार आहे. एकंदरीनें हा प्रारंभ निराशाजनक नाहीं एवढेंच नव्हे तर येत्या मार्चमध्यें वार्षिक परीक्षा होऊन कित्येकांचें वर्ष पदरांत पडणार, कित्येकांची फी खरी होऊन टर्म पदरांत पडणार या गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे बहिष्कारवादी विद्यार्थ्यांची संख्या येत्या जूनमध्यें आणखीहि वाढेल असें अनुमान करितां येईल.

विद्यार्थ्यांनीं कॉलेजवर बहिष्कार घालण्याच्या चळवळीबरोबरच बहिष्कार घालून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तजविजीचाहि प्रश्न जबाबदार लोकांनीं हातीं घेतलाच पाहिजे. या तजविजीचे मुख्य तीन मार्ग आम्हीं गेल्या अंकीं

* केसरी, तारीख, १ फेब्रुवारी सन १९२१

सुचविलेच होते. पहिला सुखवस्तु आईबापांच्या मुलांनीं घरीं राहून विद्यार्जन किंवा राष्ट्रकार्य करण्याचा. अशा विद्यार्थ्यांची तजवीज करण्याची जबाबदारी जनतेवर फारशी पडणार नाहीं. आईबाप झाले तरी ते जनतेचेच अंश होत. अर्थात् आईबापांनीं मुलांच्या योगक्षेमाचा भार एक वर्षभर सोसणें काय आणि नागरिक या नात्यानें परक्या मुलांच्या योगक्षेमाकरितां वर्गणी देणें काय दोनहि सारखींच. ही वर्गणी समंजस नागरिकाला व राष्ट्राभिमानी नागरिकाला यापुढें चुकणार नाहीं. मग घरच्या मुलांनाच वर्षभर पोटाला घातलें तर त्यांत काय बिघडलें? पूर्वी कॉलेजचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा होता तो हल्लीं चार वर्षांचा सरकारनें करविला आहे. या व्यवस्थेनें किंवा अव्यवस्थेनें पालकांवर जें एक वर्ष लादलें गेलें तें जर त्यांना खपतें तर राष्ट्रानें त्यांजवर लादलेलें असेंच एक वर्ष त्यांना कां खपूं नये? उलट ते आपलीं मुलें एखाद्या राष्ट्रीय कॉलेजांत पाठवितील तर मुलाना अवश्य असा अभ्यासक्रम दोनतीन वर्षांत आटोपून अभ्यास व राष्ट्रकार्य दोहोंचेंहि पुण्य एकदम पदरीं पडेल. मुलगा एकादे वर्षी आजारी पडला तर जसें एकादें वर्ष फुकट जातें तसेंच हेंहि कां समजूं नये? व्यक्तीला आलेल्या तापाइतकी तरी निदान राष्ट्राच्या संतापाला किंमत असावी असें म्हटलें तर फारसें वावगें होणार नाहीं. लष्करभरतीची चळवळ निघाली तेव्हां सरकार पक्षपाती प्रोफेसरांनीं तीनतीन चारचार महिने अभ्यास दवडून मुलांचें वर्ष बुडालें तरी हरकत नाहीं असा सल्ला दिमाखानें दिला व आईबापांनीं तो मान्य करून मुलांस सैन्यभरतींत नांव देण्यास परवानगी दिली आणि युनिव्हर्सिटीनेंहि त्या विद्यार्थ्यांस अनेक सवलती दिल्या. पण आज प्रत्यक्ष राष्ट्रीय सभा मुलांचें एक वर्ष मागत असतां तें मात्र त्यांनीं देऊं नये याला काय म्हणावें? मुलगा खाकी पोषाख घालून उनाडक्या करीत असलेला पाहून आईबापांच्या डोळ्यांना बरें वाटावें, आणि आज तोच मुलगा खादी घालून राष्ट्रीय सभेचा आदेश जनतेला सांगत एकाद्या समर्थ-शिष्याप्रमाणें झोळी लटकावून फिरूं लागला असतां तें मात्र त्यांना दुःसह व्हावें काय? दुसऱ्या कित्येकांना आपल्या मुलांनीं कॉलेजांत राहून चैनीनें मेजवान्या झोडून अजीर्ण करून घेतलें तरी त्याचें वाईट वाटूं नये,

पण राष्ट्रकार्याचें शिक्षण संपादीत असतां एकादा अर्धा दिवस त्यांना उपोषण घडलें तर त्यानें मात्र काळजाला पीळ पडावा हें कशाचें लक्षण?

दुसरा वर्ग राष्ट्रीय कॉलेजांत जाऊन शिक्षणक्रम चालू ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांचा. या बाबतींत आम्ही फिरफिरून हेंच निक्षून सांगूं इच्छितों कीं, सरकारी अगर निमसरकारी आर्ट्स् कॉलेजें सोडून जितके विद्यार्थी बाहेर पडतील व राष्ट्रीय कॉलेजांत शिक्षण घेऊं इच्छितील तितक्या सर्वांची व्यवस्था मुंबई, पुणें, धारवाड यांसारख्या ठिकाणीं होण्यासारखी आहे. एवढेंच नव्हे तर त्यांचें शिक्षणहि सरस होण्याचा संभव आहे. धंदेवाईक शिक्षकांनीं कितीहि वाईट शिकविलें तरी तें खपावें त्यांनीं नसतीं कामें अंगावर घेऊन आपल्या खास कर्तव्याकडे दुर्लक्ष केलें तरी तें खपावें, हा जनतेनें आपण होऊन पाडलेल्या रूढीचा परिणाम आहे. त्याची तक्रार करून काय चालणार? पण अजून जरी या रूढीचा फांस मनावरून काढण्याचा आपला निश्चय झाला तरी तो काढतां येईल. सरकारी आर्ट्स् कॉलेजें केवळ संस्कृत, इंग्रजी कादंबऱ्या व नाटकें पढण्याची जागा, अशी स्थिति आहे, ती पालटून जरूर त्या वाङ्मयशिक्षणांत इतर ज्ञानाची भर घालून शिवाय हा सर्व शिक्षणक्रम चार ऐवजीं तीन किंवा दोन वर्षांत पुरा करणें शक्य आहे व शिक्षण देणारी संस्था सरकारीच काय पण निमसरकारी कॉलेजापेक्षां कमी खर्चानें चालविणें शक्य आहे, हें थोड्याशा प्रयत्नांतीं सिद्ध होणारें आहे. मोठमोठ्या शहरीं अनेक विद्वान् लोक राहात असतात; व आपले इतर धंदे संभाळून त्यांनीं आठवड्यातून एक दोन तास जरी राष्ट्रीय शिक्षणाकडे देण्याचें कबुल केलें तरी दर भाषावार प्रांतांत दोनदोन तीनतीनहि चांगलीं आर्ट्स् कॉलेजें चालण्याचा संभव आहे. इतर धंदा करणारा एम. ए. किंवा एलएल. बी. हा देखील आर्ट्स् कॉलेजांतील आपल्या आवडीचा एकादा विषय घेऊन परिश्रमानें कॉलेजच्या नांवास शोभेल असा शिकवूं शकेल. आज अशी स्थिति आहे कीं, सरकारी किंवा निमसरकारी कॉलेजांत एकदां प्रोफेसरांच्या यादींत नांव पडलें म्हणजे मग तो कितीहि मठ्ठ किंवा रूक्ष असला, त्याच्या अंगांत तेज, बुद्धींत प्रतिभा किंवा शिक्षणपद्धतींत चित्ताकर्षकपणा नसला तरी चालतें. उलट त्यांनीं कॉलेजांत असतां अभ्यासांतील तरतरीमुळें

नांव केलें, बक्षिसें मिळविलीं, परीक्षेंत वर नंबर मिळविला असे लोक वकिलीसारखा धंदा करूं लागले म्हणजे हे काय कॉलेजांत शिकविणार, असें लोकांना वाटूं लागतें. पण त्याहूनहि विशेष हें कीं, त्यांना स्वतःलाहि आपणाविषयीं अविश्वास वाटूं लागतो. एका पुण्यांत तरी आज इतर धंदे करणाऱ्या लोकांनीं मनावर घेतलें तर अगदीं फावल्या वेळीं व विशेष यातायात न करितां ते सर्व मिळून दोनतीन कॉलेजें चालवूं शकतील. वकिलांना नांवें ठेवलीं म्हणजे त्यांना राग येतो व या वर्गाचा एकंदरीनें राजकारणांत झालेला उपयोग लक्षांत घेऊन आम्हीहि त्यांची तरफदारी केव्हां केव्हां करितों. तथापि आजकालच्या सरसकट वकिलांकडे पाहिलें म्हणजे तो वर्ग आपली बुद्धि, आपला वेळ व आपला पैसा हीं राष्ट्रकार्याकडे जितकीं लावतां येतील तितकीं लावतो असें आमच्यानें प्रामाणिकपणें म्हणवत नाहीं. धंदेशिक्षणाची गोष्ट थोडीशी वेगळी आहे, हें आम्ही जाणतों; कारण अशा शिक्षणाचीं कॉलेजें काढण्याला शास्त्रीय ज्ञानांत पारंगत असलेले शिक्षक व मोठ्या खर्चाचीं साधनें लागतात व आर्ट्स् किंवा वाङ्मय शिक्षण यांच्या मानानें हीं दोनहि सुलभ असत नाहींत. तथापि पुण्यांतील डॉक्टर, इंजिनिअर वगैरे लोकांनीं मनावर घेतल्यास राष्ट्रीय पद्धतीचें इंजिनियरिंग किंवा मेडिकल स्कूलहि निघणार नाहीं असें म्हणवत नाहीं. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, मोठमोठ्या शहरांतील सुशिक्षित लोकांनीं मनांत ईर्ष्या धरल्यास राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न सुटणें फारसें अवघड नाहीं.

हा मुद्दा संपविण्यापूर्वी दुसऱ्या एका गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य आहे. ती न्यू-पूना-कॉलेजसारख्या संस्था राष्ट्रीय करण्यासबंधाची. फर्ग्युसन कॉलेजप्रमाणें न्यू-पूना-कॉलेजच्या चालकांना हट्टच धरावयाचा असेल तर गोष्ट वेगळी ! यांत अभिमानास पेटण्यासारखें भूषणास्पद कांहीं आहे असें आम्हांस वाटत नाहीं. पण केवळ अभिमानास न पेटता आजवर ज्या राष्ट्रीय दृष्टीनें या संस्थेच्या चालकांनीं ती चालविली त्याच दिशेनें आणखी एक पाऊल पुढें टाकून व राष्ट्रांतील विचाराचा ओघ लक्षांत घेऊन जर त्यांनीं आपलें कॉलेज स्वतंत्र केलें तर त्यांना ती गोष्ट असाध्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं. या कॉलेजची आजची स्थिति हें जर

त्यांतील कांहीं व्यक्तींच्या परिश्रमाचें फल आहे, त्याचप्रमाणें त्यांनीं किंवा इतरांनीं आणखी परिश्रम केल्यास उत्क्रांतीची ही पुढची पायरी त्यांना सहज गांठतां येईल. त्यांनीं ही गोष्ट करण्याचें मनावर घेतल्यास पालकहि त्यांना मदत करण्याच्या दृष्टीनें मुलांची वाढती फी सोसण्यास तयार होतील व युनिव्हर्सिटीचें जूं फेंकून देऊन आर्टस् शाखेंतील अभ्यासक्रम चार वर्षांवरून तीन वर्षांवर आणल्यास अधिक फी देऊनहि एकंदरीनें मुलांचें शिक्षण त्यांना स्वस्तच पडेल. कारण इकडे फी थोडी वाढली तरी तिकडे पोटगीचें एक वर्ष वांचलें. शिवाय या तीन वर्षांत वाङ्मयशिक्षणाच्या भरतीस व्यावहारिक शिक्षणाचा एखादा विषय दोनतीन वर्षें शिकविल्यास कॉलेजांतून निघणारा पदवीधर हल्लींच्या बी. ए. सारखा असहाय्य न राहतां आपला योगक्षेम चालविण्याची पात्रता आपल्या ठिकाणीं अधिक आली असा त्यालाहि आत्मविश्वास वाटेल. या दृष्टीनें पाहतां या कॉलेजला कोणा एका गृहस्थानें तीनलक्ष रुपये देऊं केले ही गोष्ट कांहीं अगदींच त्याज्य नव्हती. एक कोटी रुपये तुम्ही द्याल तर सगळी कलकत्ता युनिव्हर्सिटी मी राष्ट्रीय बनवितों अशी पैज सर आशुतोष मुकर्जी यांनीं मारली व ती बॅ० दास यांनीं मान्य केली असें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालें आहे. ही हकीगत जर खरी मानली तर न्यू पूना कॉलेजला देऊं केलेली तीन लक्षांची देणगी ही कांहीं अगदींच थोडी होती असें म्हणतां येत नाहीं. पण एकवेळ नुकसान झालें तरी चालेल पण असहकारितेच्या स्वरूपाची कांहींहि गोष्ट आम्ही करणार नाहीं, असाच सदर कॉलेजच्या चालकांचा हट्ट असल्यास त्यांना आम्हांला कांहीं म्हणतां येणार नाहीं हें उघड आहे. असो !

शिक्षणावर बहिष्कार घालून निदान एक वर्ष बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्या-विषयीं आपण मूळ बोलत होतों व अशा विद्यार्थ्यांपैकीं तिसऱ्या वर्गाविषयीं विचार करावयाचा उरला आहे तेवढा करून हा लेख पुरा करूं.

या तिसऱ्या वर्गांतील विद्यार्थ्यांची म्हणजे स्वयंसेवकांची एक वर्षपर्यंत सोय करणें यासारखी म्हटली तर सोपी गोष्ट कोणतीहि नाहीं. पण म्हटली तर अवघडहि कोणती नाहीं. फक्त एकाच योजनेनें ती सोपी होऊं शकते व ती योजना म्हटली म्हणजे दर एक तालुक्यानें कमींत कमी पांच सात

स्वयंसेवकांची वर्षभर सोय लावणें. किंवा तालुक्यानिहाय कोठें कमतरता आली तर जिल्ह्यांतील पुढाऱ्यांनीं ती भरून काढणें. नुसत्या महाराष्ट्राचे दहा जिल्हे घेतले तरी त्यांत शेंदोनशें वकील असे सांपडतील कीं, त्यांना केवळ आपल्या खर्चानें एक स्वयंसेवक एक वर्षभर सहज पोसतां येईल. वकील लोकांना राष्ट्रीय सभेची आज्ञा कस्पटाप्रमाणेंच लाथाडावयाची असेल व आपल्यावर स्वार्थत्यागाची जबाबदारी कांहींच नाहीं अशी वकिली लढवावयाची असेल तर गोष्ट वेगळी ! पण सर्वच वकिलांनीं अशा बेइमानीपणानें हात धुतले आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. राष्ट्रीय सभेच्या आज्ञेला अनुसरून वकिली सोडणें हा उत्तम पक्ष, पण तें हातून कांहीं कारणानें नच घडलें तरी इतर रीतीनें शक्य तितका स्वार्थत्याग करून असहकारितेचें कार्य सफल करण्यास मदत देणें हें ते आपलें कर्तव्य मानतात असें आम्ही समजतों. तसें असेल तर त्यांना आपल्या प्राप्तीचा बराच अंश राष्ट्रकार्यास देणें प्राप्त आहे, व त्यांना स्वतःला जिल्हाभर हिंडतां येत नसेल तर सुदैवानें मिळणारे हे स्वयंसेवक आपल्या मदतीस घेऊन त्यांना जिल्हाभर जागृतीचें काम करणें अनायासानें सुलभ होणार आहे. खेडोपाडीं हिंडणारे हे स्वयंसेवक मिजासी नसल्यामुळें, शिवाय आपणास मिळणाऱ्या शिधासामुग्रीचा मौल्यवान् मोबदला उपदेश किंवा उपयुक्त काम यांच्या रूपानें परत देणारे असल्यानें, दर दहापांच गांवच्या मिळून एकेका गटाला एकदोन स्वयंसेवक पोसणें कांहीं जड जाणार नाहीं. या राष्ट्रीय बलुतेदारांची योग्यता फार मोठी आहे. व आजच्या घटकेला त्यांचा उपयोगहि तसाच मोठा आहे. बैरागी, फकीर, ज्योतिषी, जोशी, पुराणीक, पुजारी व निवळ भिक्षेकरी या नात्यानें गांवगन्ना आज कितीतरी लोक पोसले जातात, त्यांत एकाद्याअर्ध्या स्वयंसेवकाची भर डोईजड खचित नाहीं व एक वर्षाच्या अनुभवानें आपणांस पडलेला खर्च सत्कारणीं लागला, किंवा राष्ट्रीय दृष्टीनें भरूनहि निघाला असें खेडेगांवच्या लोकांना वाटेल अशी आमची खात्री आहे. अशा स्वयंसेवकांचें रजिस्टर पुण्यास असहकारिता-कमिटीनें हल्लीं ठेवलें असून त्याचा मुकाबला म्हणून जिल्ह्यांतील पुढाऱ्यांकडूनहि आम्ही अमुक इतक्या स्वयंसेवकांची तरतूद करितों असे उलट निरोप असहकारिता-कमिटीकडे येऊं

लागले पाहिजेत. विद्यार्थी कॉलेजांतून बाहेर निघणें ही गोष्ट अशा निरोपांवर बरीचशी अवलंबून आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन सर्व जिल्ह्यांचे पुढारी स्वयंसेवकांचे हातून काम घेणें व निदान एक वर्षभर त्यांच्या योगक्षेमाची तजवीज करणें या गोष्टीच्या तयारीला एका क्षणाचाहि विलंब न करतां लागतील अशी आम्हांस आशा आहे.

बहिष्कारयोगी विद्यार्थ्यांची सोय*

मुंबई, पुणें, सांगली वगैरे ठिकाणच्या कॉलेजांतील ज्या विद्यार्थ्यांनीं शिक्षणावर बहिष्कार घातला आहे त्यांची व्यवस्था काय होणार या-संबंधानें अनेक लोकांकडून माहिती मागण्यांत येत असल्यामुळें खालील माहिती प्रसिद्ध करण्यांत येत आहे व तिनें सर्वांच्या शंकांचें निरसन होईल अशी आशा आहे. बहिष्कारवादी विद्यार्थ्यांनीं कॉलेजें सोडलीं तीं राष्ट्रीय सभेच्या ठरावास मान देण्याकरितां व स्वतःचें कर्तव्य म्हणून सोडलीं. हें शिक्षण त्यांनीं तहकूब केलें तें बिनशर्त तहकूब केलें. या तहकुबीच्या मुदतींत अमुकानें आपणास अमुक मदत करूं असें वचन दिलें आहे असें त्यांना म्हणतां येणार नाहीं, व तसें ते म्हणूं इच्छीतहि नाहींत. या सर्व गोष्टी खऱ्या. तथापि त्यांना योग्य तो सल्ला व शक्य ती मदत देणें हें सर्व पुढाऱ्यांचें काम आहे. मुलांनीं शिक्षण तहकूब करणें हें ज्या राष्ट्रीय सभेनें सांगितलें त्याच सभेनें हेंहि सांगितलें आहे कीं, राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा काढल्या जाव्या; लवाद कोर्टें स्थापिलीं जावीं, स्वदेशीचा फैलाव केला जावा. कॉंग्रेसचा निरोप व आदेश खेड्यांतून पसरला जावा. या सर्व कामांत विद्यार्थ्यांचा शक्य तितका उपयोग करून घेतल्यास राष्ट्रीय सभेचें कार्य सफळ होईल व विद्यार्थ्यांचीहि सोय होईल.

जे विद्यार्थी कॉलेजें सोडून आज बाहेर निघाले आहेत त्यांचे तीन चार वर्ग करितां येतील.

(१) ज्यांची घरची स्थिति साधारण बरी आहे त्यांनीं पुढाऱ्यांकडून कोणत्याहि प्रकारें सांपत्तिक मदतीची अपेक्षा करणें योग्य होणार नाहीं.

* केसरी तारीख ८ फेब्रुवारी १९२१

त्यांनीं वाटेल तर राष्ट्रीय कॉलेजांत जावें. आज मुंबई व पुणें दोनहि ठिकाणीं राष्ट्रीय आर्ट्स् कॉलेजें निघालीं आहेत. त्यांत येतील तितकीं मुलें घेतलीं जातील; मात्र अशा कॉलेजांत त्यांनीं ठरीव फी देण्यास तयार असलें पाहिजे. कॉलेजच्या तोडीचें शिक्षण मिळेल, पण तें फुकट मिळणार नाहीं. नवीन मुलें आलीं असतां जितके अधिक वर्ग काढावे लागतील तितके काढण्याची या दोन कॉलेजच्या चालकांची तयारी आहे. मुलें येतात-सें वाटल्यास धंद्यांच्या शिक्षणाच्या कॉलेजांसहि हळूहळू सुरवात होईल.

(२) ज्या मुलांनीं कॉलेज सोडलें पण ज्यांना कॉलेजची फी देणें झेपत नाहीं, त्यांनीं घरीं राहून अभ्यास करावा. मात्र अशांची परीक्षा घेऊन त्यांना त्यांच्या दर्जाप्रमाणें कॉंग्रेसचें सर्टिफिकीट किंवा पदवी दिली जाईल. सामान्यतः कॉलेजच्या विद्यार्थ्यानें मनावर घेतल्यास त्याला कॉलेज-चा अभ्यास घरीं करतां येतो. पुष्कळ विद्यार्थी टर्मचे दिवस भरण्याच्या सक्तीमुळें कॉलेजांत जातात, पण हजेरीनंतर हजर राहात नाहींत. राहिले तरी गमतीखातर राहतात, व गप्पागोष्टी करीत असतात. कॉलेजांतील निंम्याहून अधिक विद्यार्थी केवळ घरच्या अभ्यासानें पास होतात, प्रोफे-सरांच्या व्याख्यानांवर त्यांची भिस्त नसते. कित्येक प्रोफेसरहि त्यांच्यावर भिस्त ठेवण्यास लायक नसतात हें प्रसिद्धच आहे. खासगी अभ्यासच काय, पण उपजीविकेकरितां एखादी नोकरी पत्करून अभ्यास करून पास होणें हेंहि मेहनती विद्यार्थ्यास शक्य असते. अलाहाबाद युनिव्हर्सिटीनें शिक्षक लोकांना नोकरी करून–म्हणजे कॉलेजांत 'टर्म' न भरतां–परीक्षेस बसण्याची परवानगी ठेवली आहे. विलायतेंत मजूरपक्षापैकीं फारच थोडे लोक युनिव्हर्सिटीची परीक्षा दिलेले असतात. तथापि कॉलेजांत न जातां ज्यांनीं उत्कृष्ट प्रकारची विद्या किंवा संस्कृति संपादन केली असे लोक त्यांत थोडे नाहींत. हे लोक नोकरी करून पोटाला मिळवून फावल्या वेळीं अभ्यास करून विद्वान् झालेले आहेत. तात्पर्य, विद्वत्ता परीक्षेवरच अवलं-बून असते असें नाहीं. तथापि परीक्षेचें सर्टिफिकीट किंवा पदवी असली म्हणजे खासगी नोकऱ्या वगैरेहि मिळणें सुलभ होतें ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं, यामुळें ज्यांना अशीं सर्टिफिकिटें किंवा पदव्या हव्या असतील त्यांच्याकरितां टिळक महाविद्यालयाच्या मंडळामार्फत–म्हणजे भावी टिळक

युनिव्हर्सिटीमार्फत–सर्व प्रकारच्या परीक्षा घेण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे. अशा रीतीनें शिक्षण बिनखर्ची होऊन उपजीविकेस खंड न पडतां मान्यताहि मिळेल. ज्यांना खासगी नोकरीच पुढें करावयाची त्यांना परीक्षा देण्याला एखादें वर्ष अधिक लागलें तरी हरकत नसते, कारण नोकरी सुरू असते.

(३) ज्यांना घरीं बसून स्वस्थ राहतां येत नाहीं, किंवा ज्यांना अभ्यास चालू ठेवण्यापेक्षां खेडोपाडीं जाऊन राष्ट्रकार्य करण्याचें महत्त्व अधिक वाटतें त्यांना तिकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे. या बाबतींत दोन प्रकारची व्यवस्था झाली आहे. पहिली अशी कीं, ज्या विद्यार्थ्यांची एकदम खेडोपाडीं जाण्याची तयारी नसेल, व या कार्यास लागणारें शिक्षण ज्यांना बरेच दिवस घ्यावयाचें असेल, त्यांच्याकरितां मुंबईजवळ अंधेरी येथें एक आश्रम काढण्यांत आला आहे. या आश्रमांत राहण्याची व जेवण्याखाण्याची व्यवस्था बहुतेक बिनखर्ची करण्यांत आली आहे. तथापि सुखवस्तु विद्यार्थ्यांनीं राष्ट्रीय द्रव्यनिधीवर अधिक भार पडूं नये म्हणून स्वतःच्या खर्चाचे पैसे द्यावे. आश्रमांतील विद्यार्थ्यांस शिक्षण द्यावयाचें तें राष्ट्रकार्याचें, म्हणजे सध्या काँग्रेस–प्रचाराचेंच, दिलें जाईल. मात्र शिक्षण अनेकांगी असून योग्य असा अभ्यासक्रम ठरविला आहे, आणि विद्वान्, अनुभविक अशा व्याख्यात्यांच्या व्याख्यानांची व्यवस्था केली आहे. ही आश्रम-व्यवस्था प्रयोगादाखल निदान सहा महिने चालेल व जरूर तर पुढेंहि वाढविली जाईल.

(४) ज्या विद्यार्थ्यांना या आश्रम-व्यवस्थेचा फायदा न घेतां एकदम प्रचाराच्याच कामास सुरवात करावयाची असेल त्यांचीहि तदनुरूप व्यवस्था करण्यांत आली आहे. ही व्यवस्था म्हणजे, विद्यार्थी स्वयंसेवकास त्यानें पसंत केलेल्या जिल्ह्यांत अगर तालुक्यांत पाठविण्यांत येईल. निघण्यापूर्वी त्याला मुंबई किंवा पुणें येथें व्याख्यानरूपानें पांचचार दिवस माहिती देण्यांत येऊन सर्व-साधारण अनुभवाच्या अशा सूचना करण्यांत येतील तशीं व्याख्यानें गेल्या आठवड्यांत मुंबईस सुरू झालींच आहेत व पुण्यासहि या आठवड्यांत सुरू होतील. त्याच्याबरोबर सुरवातीसच कांहीं उपयुक्त पुस्तकें व हस्त-पत्रकें देण्यांत येतील. शिवाय मागाहून प्रचाराकरितां मुद्दाम लिहविण्यांत

येणारीं पत्रकें हींहि त्याजकडे मधून मधून पाठविण्यांत येतील. ज्यांची वर्तमानपत्रें वाचून दाखविण्याची इच्छा असेल त्यांना त्यांच्या पत्त्यावर नियमितपणें वर्तमानपत्रें पाठविलीं जातील. तसेंच विद्यार्थ्यांचें हें प्रचाराचें काम सुरू असतां, विशेषेंकरून खेडेगांवच्या लोकांना उपयोगी पडण्यासारखी माहिती देणारे लेख वर्तमानपत्रांतून लिहविले जातील. ज्या ठिकाणीं हे प्रचारक जाणार तेथील पुढारी व प्रतिष्ठित गृहस्थांना शिफारसपत्रें लिहून प्रचारकांचा योग्य परामर्ष घेऊन त्यांस लागेल ती मदत करण्याविषयीं विनंति करण्यांत येईल. सुरवातीस प्रवासखर्च, दोन तीन आठवड्यांची पोटगी व जुजबी कपडालत्ता यांकरितां म्हणून लहानशी रक्कम प्रचारकांना देण्यांत येईल. पण त्यापुढें या स्वयंसेवकांनीं केवळ आपल्या परिश्रमानें आपल्या चरितार्थाची सोय लाविली पाहिजे. यार्ची कारणें दोन आहेत. एक तर सर्व प्रचारकांचा वर्षभर जेवणाखाणाचा व प्रवासाचा खर्च मुख्य कचेरीस सोसवणार नाहीं. तीन प्रचारक वर्षभर अंगावर पोसावयाचे असल्यास त्यांजकरितां निदान एक हजार रुपये लागतील असा अंदाज आहे. याशिवाय छपाई वगैरेचा खर्च वेगळाच. म्हणजेच पांचशें प्रचारक वर्षभर संभाळण्यास दीडपासून दोन लक्ष रुपये लागतील. महाराष्ट्राची इच्छा, हे प्रचारक असे संभाळले जावे, त्यांना खेडेगांवीं कोणावरहि अवलंबून राहावयास लागूं नये—अशी असल्यास त्यानें राष्ट्रीय सभेनें फर्माविल्याप्रमाणें टिळक स्वराज्यफंडाकरितां तितकी रक्कम जमविली पाहिजे व तो जमवीलहि. पण ती प्रत्यक्ष जमेपर्यंत वाट पहात बसून मग स्वयंसेवकांना बाहेर रवाना करावयास लागल्यास व्यर्थ कालहानि होणार. उलट स्वयंसेवक रवाना झाले तर ही वर्गणी जमण्यास मदतच होईल. कारण कोणासहि मुद्दाम आठवण ठेवून उठून वर्गणी पाठविणें हें मुष्किलीचें असतें. तेंच त्याला घरबसल्या वर्गणी मागावयास गेल्यास तीं तो सहज हात उचलून देतो. दरतालुक्यास पांचचार फिरते स्वयंसेवक लाभल्यास जरूर ती वर्गणी लवकरच जमेल याविषयीं आम्हांस संशय वाटत नाहीं. ही वर्गणी मुख्य कचेरीकडे अगर जिल्हापुढाऱ्यांकडे आल्यास तींतून स्वयंसेवकांना जरूर ती पोटगी देऊन स्वावलंबी बनवितां येईल. व असें होणेंच एका अर्थी अधिक बरें. कारण

स्वयंसेवकांजवळ पावती-पुस्तकें असलीं तरी ते अनोळखी म्हणून त्यांच्याशीं पैशाचा व्यवहार सर्रास करण्याला लोकाचा दिल प्रथम खुला राहणार नाहीं. याकरितां वर्गणी जमणें ती जिल्ह्यांतील प्रमुख पुढाऱ्यांकडे जमा होऊन शक्य तितकी त्यांच्या जिल्ह्यांत काम करणाऱ्या स्वयंसेवकांच्या पोटगीकरितां या पुढाऱ्यांकडून खर्च झाल्यास फार उत्तम होईल व मुख्य कचेरीचें जमाखर्चाचें बरेंच काम वांचेल.

पण कोणी म्हणतील कीं, वर्गणी अशी जमावयाची तर ती रोख व एकदम द्यावी लागणार त्यापेक्षां स्वयंसेवकांनाच आम्ही संभाळूं म्हणजे झालें. वास्तविक हीहि योजना कांहीं वाईट नाहीं, दुसऱ्या एका दृष्टीनें अधिक सोईचीहि आहे. पण तींत एक अडचण आहे ती अशी कीं, या व्यवस्थेंत स्वयंसेवकाला परावलंबी व्हावें लागेल. एखादा गांव असा उमद्या दिलाचा निघेल कीं, स्वयंसेवकाला तो घरच्या माणसासारखा किंबहुना पाहुण्यासारखा प्रतिष्ठित रीतीनें वागवील. पोटगीची किंवा प्रत्यक्ष जेवणाखाण्याची व्यवस्था या कानाची त्या कानाला न कळतां करून टाकील. स्वयंसेवकास आपण परावलंबी आहों असें यत्किंचितहि वाटणार नाहीं. पण सर्वच गांव सारखे नसतात. स्वयंसेवकांचा चरितार्थ परस्पर गांवाकडे सोंपविल्यास यांपैकीं कित्येकांच्या स्वाभिमानबुद्धीला मधून मधून धक्का लागण्याचा संभव आहे. याकरितां स्वयंसेवक स्वतंत्र व स्वावलंबी असलेला बरा. ज्या लोकांत प्रत्यक्ष काम करावयाचें त्यांच्याकडूनच पोटगी मिळावयाची असल्यास त्या कामाचें तेज निम्मेंअधिक नाहींसें होतें. उलट उपदेशक किंवा प्रचारक आपलें काम तर करितो, पण पोटाला दिलें तरीहि घेत नाहीं, असे लोकांना अनुभवाला आल्यास त्याच्या उपदेशाचें तेज द्विगुणित वाढतें. तात्पर्य, या दोन व्यवस्थांचे गुणदोष वेगवेगळे असल्यानें त्यांपैकीं कोणती व्यवस्था पत्करावयाची, व स्वयंसेवकांच्या निदान एक वर्षभरच्या पोटगीची तयारी करावयाची, याचा विचार व निश्चय जिल्हापुढारी आणि तालुक्यांतील पुढारी यांनीं एकत्र जमून करावा. हा त्यांचा निश्चय होईपर्यंत जी चारदोन आठवड्यांची पोटखर्ची लागेल ती पुणें व मुंबई येथील स्वराज्यसंघ-कचेरीतून स्वयंसेवकाजवळ दिली जाईल.

ही पोटखर्ची वास्तविक थोडी आहे. पण एक तर वर दर्शविल्याप्रमाणें

सर्व स्वयंसेवक पगारी ठेवून त्यांना मुख्य कचेरींतून पगार देण्याला घुष्कळ रोख रक्कम लागेल, व ती जमवीपर्यंत स्वयंसेवक निरुपयोगी राहतील. दुसरे पक्षीं आपणांस अमुक इतके स्वयंसेवक पाहिजेत असें दरतालुक्यानें मनाशीं ठरवून त्यांच्या पोटखर्चीची तयारी केल्यास त्यांना ताबडतोब कामास सुरवात करतां येईल. पण क्षणभर समजा कीं, तालुक्याच्या पुढाऱ्यांनीं आपलें कर्तव्य केलें नाहीं असें मानिलें तरी स्वयंसेवकांना हताश होण्याचें कारण नाहीं व ते हताश होणार नाहींत अशी आमची खातरी आहे. आमचा या विद्यार्थी स्वयंसेवकांना असा स्पष्ट सवाल आहे कीं, आपल्या पोटगीची कोणी हमी देईपर्यंत पायावर पाय घालून ते आळशी बसणार कीं काय ? त्यांना आधींच इतकें शिक्षण आहे कीं, ते तालुक्यांच्या शाळांतून शिक्षकहि होऊं शकतील व तालुकानिहाय शाळांची वाण असते हें प्रसिद्धच आहे. याकरितां त्यांनीं दोनदोन चारचार असामी मिळून तालुक्याच्या गांवास निदान राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा काढल्या व मुलें पढविलीं तर त्यांच्या पोटापुरतें वेतन सहज मिळून शिवाय उरलेल्या वेळांत त्यांना गांवच्या लोकांना उपयोगी पडतां येईल शाळाहि न चालल्या व पाहुणचार करण्यास पुढें येण्यांत गांवगन्नाच्या लोकांनीं कुचराई केली तरी त्यांची झोळी कांहीं कोणीं काढून नेलेली नाहीं. फंदीबुवांनीं आपल्या फटक्यांत सांगून ठेवलेंच आहे.

असल्यावर भीक मागुं नको।
नसल्यावर सांगणें कशाला।
गांव तुझा भीड धरूं नको।

कर्तव्यपराङ्मुख निःस्फूर्त जनतेला लाजविण्याचा तो एक प्रशस्त मार्गच आहे. निःस्वार्थीपणाचें ठळक लक्षण भिक्षेइतकें दुसरें कोणतें असणार ? प्रतिष्ठित मनुष्यानें मागितलेली भिक्षा हा स्वार्थच नव्हे. मी पोटाकरितां भिक्षा मागत नाहीं हें तो जाणतो; हा पोटाकरितां भिक्षा मागत नाहीं हें ते जाणतात. 'भिक्षावृत्ति अवलंबणें। जळो जिणें लाजिरवाणें' यांत मुख्य रोख वृत्ति या शब्दावर आहे. वृत्ति म्हणजे धंदा. अर्थात् जी धंदेवाईक भिक्षा, ज्या भिक्षेचा आद्य व अंतिमहि हेतु स्वतःचें उदरभरण हा आहे, ती भिक्षा मात्र लाजिरवाणी. तसें नसतें नर 'आधीं मागितली

पाहिजे भिक्षा। ओं भवति या पक्षा रक्षिलें पाहिजे' असें समर्थांनीं म्हटलें नसतें व भिक्षेचें गौरव केलें नसतें. आजवर हिंदी लोक धर्मबुद्धीनें भिक्षा घालीत आले आहेत हें खरें; पण भिक्षेकऱ्याकरितां खरी आदरबुद्धि बाळगून घातलेली भिक्षा फार थोडी. भिक्षा वाढतांना हात पुढें होतो, पण मन मागें होत असतें. नेहमींची भिक्षा घालतांना यजमानाला स्वतःविषयीं मोठेपणा आणि भिक्षेकऱ्याविषयीं तुच्छ बुद्धि वाटत असते. पण तोच निःस्वार्थी देशाभिमानी भिक्षेकरी भिक्षा मागण्यास आला असतां या भावनांची उलटापालट होते. यजमानाला वाटतें कीं, मोठ्या कार्याकरितां भिक्षा मागण्याला आलेला हा याचक खरा मोठा; मीच खरोखर क्षुद्र. कारण त्याच्या कार्याच्या मानानें मी देऊन किती देणार! शिवाय मी जें मूठभर देणार तें देण्याला तो मागायला येईपर्यंत कां थांबलों? तो उठून चालत माझ्या दारापर्यंत आला, मी घरींच राहिलों म्हणून त्याची स्फूर्ति अधिक प्रबळ.

बरें, आपण असेंहि घेऊन चालूं कीं, स्वयंसेवकाला भिक्षा घालतांना खेडेगांवच्या लोकांनीं वर सांगितल्या प्रकारची उदार मनोवृत्ति न अनुसरतां तोंड वांकडें केलें, तरी स्वयंसेवकानें असें मनांत आणावें कीं, वांकडें कर-करून याचें तोंड कायमचें वांकडें बनलें तरी चालेल, पण त्याला देशाकरितां हा भुर्दंड पाडलाच पाहिजे. तो पाडल्यानें त्याचें कल्याणच होईल. अजीर्णानें आजारी झालेल्या मुलाला ज्याप्रमाणें एकादशीच्या निमित्तानें डॉक्टर उपोषण घालतो त्याचप्रमाणें स्वार्थाचें अजीर्ण झालेल्या लोकांना हे स्वयंसेवक भिक्षेच्या द्वारें उपोषण घालतील. खेडेगांवचे लोक एरवीं सरकारी अधिकाऱ्यांची काय थोडी सरबराई करितात व शिधापाणी देतात? स्वयंसेवक झाला तरी तो जनतेच्या पदरचा अधिकारीच आहे; त्याचीहि थोडीबहुत सरबराई त्यांच्या हातून घडली तर काय बिघडलें? युद्ध सुरू असतां सरकार आपले शिपायास वाटेल त्याच्या घरीं सक्तीनें जाऊन उतरण्याचा व बिऱ्हाड लावण्याचा परवाना देतें. सांप्रत असहकारितेच्या युद्धांत झालें तरी जनतेनें बहिष्कारवादी विद्यार्थी-सैनिकांस जर खेडेगांवच्या पुढाऱ्यांच्या घरीं उतरण्याचा परवाना दिला तर त्यांत तरी काय बिघडलें? खेडेगांवच्या लोकांवर एरवीं बोजे काय

थोडे असतात ? त्यांतच त्यांनीं हाहि एक समजावा. त्रिंबक नारायण अत्रे यांनीं गांवगाडा नांवाचें जें अत्यंत मनोरंजक पुस्तक लिहिलें आहे त्यांतील सहाव्या प्रकरणांत 'फिरस्ते' या सदराखालीं खेडेगांवच्या लोकांकडून कमी अधिक हक्कानें, वहिवाटीनें, जरबेनें, कुचेष्टेनें, चोरीनें, भिक्षेनें धान्य अगर पैसे उकळणाऱ्या लोकांची याद दिली आहे. ती या प्रसंगीं समग्र उतरून घेण्याची लहर आम्हांस आंवरत नाहीं. ही याद अशीः— पांचाळ, बेलदार, बडार, कैकाडी, वंजारी, लमाण, मेवाती, वैदू, गोंड, मांगगारोडी, गोपाळ, कोलहाटी, हरदास, दरवेश, बेदरवाले, गारोडी, कुंचेवाले, कंजारी, तिरमल, चित्रकथी, फासेपारधी, बहुरूपी, रायनंद, भोप्ये, भगत, भुत्ये, आराधी, वाघ्ये, मुरळ्या, जोगती, कांतकाडिणी, भराडी, वासुदेव, पांगूळ, गुरुबाळसंतोष, राऊळ, ठोकेजोशी, कुडमुडे जोशी, सुपहलब्ये, पोतराज, कानफाटे, उदासी, आघोरी, खोटे, आघळे-पांगळे, नाथपथी, वारकरी, कबीरपंथी, संन्यासी, कापडी (कापडी-वाले), बैरागी, जती, साधू, अयाचित, मानभाव, नानकशाही फकीर, शिद्दी, इराणी, बलुची, अफगाणी, इत्यादि. पुष्कळ वाचकांना ही याद वाचून नवल वाटेल. पण सदर ग्रंथकारांनीं त्यांपैकीं बहुतेकांचें प्रत्यक्ष चरित्र वर्णिलें असल्यामुळे त्यांच्या खरेपणाविषयीं कोणास शंका घेण्याचें कारण नाहीं. शहरगांवच्या लोकांना यांतील कित्येक नांवे अपरिचित असतील. पण खेडेगांवच्या लोकांना या सर्वांची प्रायः प्रत्यक्ष ओळख असते. आमचें एवढेंच म्हणणें कीं, वरील यादींत कॉलेजचा विद्यार्थी ऊर्फ असहकारितेचा स्वयंसेवक जर एक अधिक घातला गेला तर आम्हीं मोठासा अपराध केला असें होणार नाहीं; व आमचे खेडेगांवचे बंधूहि त्याचा वरील यादींत कायमचा समावेश मोठ्या हौसेनें करतील. कारण हरिदास किंवा वारकरी यांखेरीजकरून आमच्या विद्यार्थी स्वयंसेवकाच्या जोडीला बसूं शकेल असा उपयुक्त किंवा सात्विक फिरस्ता वरील यादींत दुसरा एकहि सांपडणार नाहीं.

खेडेगांवांत जाऊन स्वयंसेवकानें कोणतें काम करावें याचीं तात्त्विक उदाहरणें आम्हांस पुष्कळ देतां येतील. साक्षरतेचा प्रसार करणें, वर्तमानपत्रें, राजकीय पोथ्या, पुस्तकें वाचून दाखविणें, चित्रें दाखविणें, गोष्टी

सांगणें, गप्पा मारतां मारतां उपयुक्त माहिती देणें, स्थलवर्णनें करून रंजविणें, ऐतिहासिक कथा सांगणें, हातरहाट, सुधारलेले माग, कापूस बठण्याचीं यंत्रें चालविणें, पतपेढ्यांची माहिती देणें, वरिष्ठ राज्यकारभार, जमाखर्च यांची माहिती देणें, कायदेबाजी, दारूबाजी, जुगार, ग्रामकलह वगैरेंच्या निषेधपर उपदेश करणें, स्वदेशी जिनसा प्रत्यक्ष दाखविणें, त्यांच्या मूळ ठिकाणची माहिती देणें, शेतकीची सुधारणा, बीं-बियाणें, खतमूत्र, जनावरांची पैदास, गोरक्षण वगैरे विषयांचीं मूलतत्त्वें घुस्तकावरून किंवा हस्त-पत्रकावरून समजावून देणें, कायद्याचे लढे उकलणें, लवाद कोर्टांची स्थापना करणें, पंचायती निवडून दाखविणें, परदेशच्या वर्णनाची माहिती सांगणें, युरोपियन लोकांचे गुणदोषपर स्वभाववर्णन करणें, हिंदी लोकांचे नागरिक-त्वाचे प्रामाणिक हक्क समजावून देणें, राष्ट्रीय सभेची माहिती देणें, तिचे ठराव समजावून सांगणें, सहकारितेचा दुःखद इतिहास व असह-कारितेचा अवतार यांचा संबंध समजावून देणें, कॉंग्रेसकमिट्या बनविणें सदर कमिट्यांचे सभासद करणें, टिळक स्मारकाचा फंड जमविणें, अशीं किती तरी उदाहरणें देतां येतील. एकाद्या पंडिक हरिदासाप्रमाणें स्वयं-सेवकानें गेज एक नवी गोष्ट घेतली किंवा राष्ट्रीय आख्यान लाविलें तरी त्याला वर्षभर पुनरुक्ति करण्याचें कारण पडणार नाहीं. तात्पर्य, स्वयं-सेवकाला खेडेगांवांत उद्योगाची वाणच पडणार नाहीं, मात्र इच्छा हवी.

कित्येक विद्यार्थ्यांना हा पहिलाच अनुभव असल्यामुळें ते प्रथम गांगरून जातील. परंतु पहिली भीड मोडतांच ते लोकांना प्रिय व उपयुक्त झाल्याशिवाय राहणार नाहींत. अशी संधि ही पहिल्यानेंच आलेली आहे व ती दवडली जाणार नाहीं अशी आम्हास आशा आहे. तालुक्याच्या लोकांच्या अनास्थेनें किंवा विद्यार्थी स्वयंसेवकांच्या अचतुरतेनें जर ती फसली किंवा बिघडली तर त्यापासून देशाचें हित होणार नाहीं, व ती जर कां एकदां साधली तर हा दाखला कायम होऊन राजकीय चळवळीचें हें साधन सर्वांत आधुनिक पण सर्वांत अधिक परिणामकारक असेंच ठरेल. सरकारनें मतदारी खेड्यापर्यंत नेऊन भिडविली, त्याला राष्ट्रीय सभेचाहि जबाब खेड्यापर्यंत नेऊन राजकीय चळवळ भिडवूनच देणें योग्य होईल.

असो. पण या बाबतींत इतकें विस्तृत लिहिण्याचें कदाचित् कारणहि

नाहीं. आमचा स्वयंसेवक सुशिक्षित व प्रतिष्ठित असून शिवाय लोकोपयोगाकडे त्याचें विशेष लक्ष राहील, यामुळें तो लवकरच खेडेगांवच्या लोकांना प्रिय होईल असा आम्हांस भरंवसा आहे. विद्यार्थ्यांनीं खेडेगांवांत गेल्यावर कसें वागावें याविषयीं त्यांस मुद्दाम कांहीं सांगण्याचें कारण दिसत नाहीं. त्यांचें स्वभावदाक्षिण्यच तें त्यांना शिकवील; शिवाय राष्ट्रीय स्वयंसेवक या नात्याची नवी जबाबदारीहि ओळखूनच ते वागतील याविषयीं शंका नाहीं. स्वार्थाच्या दृष्टीनें प्रतिष्ठित पाहुण्याप्रमाणें म्हणजे अत्यंत भिडस्तपणानें त्यांना वागावें लागेल, पण लोकोपयोगाच्या दृष्टीनें ती वृत्ति ठेवून चालणार नाहीं. कारण पाहुणा प्रतिष्ठित असला तर ओळ्यासमोर मांजर यजमानाचें दूध पीत असलें तरी त्याचा हात उचलत नाहीं ! तसें मात्र स्वयंसेवकांनीं करून चालणार नाहीं. लोकोपयोगाच्या बाबतींत नम्र सेवकाप्रमाणेंच त्यांना वागावें लागेल. हिंदी राष्ट्रांतील चालत्या गांवगाड्यांची व बोलत्या गांवगाड्यांची ही पहिलीच भेट आहे. म्हणून गांवगाडा ग्रंथाचे कर्ते अत्रे यांच्याच उमद्या शब्दांनीं हा लेख घुरा करितों.

" चालत्या गांवगाड्यांतलें पुष्कळ भरित ह्या बोलत्या गांवगाड्यांबाहेर आहे; आणि तें कोठें गांवांत तर कोठें वनपर्वतांत पांगलें आहे. आपल्या ह्या बंधूंना निरक्षर म्हणून मागसलेले गणण्याची चाल पडली आहे. पण गंजाखालीं पाणीदार पोलादहि निमूटपणें दिवस कंठतें हें विसरतां कामा नये. हे लोक अनादि कालापासून बिकट परिस्थितीशीं झगडून संसारयात्रा करीत असल्यामुळें नानातऱ्हेचे, विशेषतः शेती, वनस्पती, पक्षी, मनुष्य, वैद्यक इत्यादिकांचें, ज्ञानभांडार त्यांच्या तोंडांत व दिलदप्तरांत नुसतें खेळत आहे. जर साक्षर मंडळी नमते घेऊन त्यांच्याच सुतासुतानें घेतील तर ह्या वस्तुस्थितीविषयीं त्यांची बालंबाल खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच मानापमान गुंडाळून ठेवून जर संशोधक व सुधारक रानोमाळ हिंडून त्यांच्यामध्यें मिसळतील तर नानाविध सामाजिक, धार्मिक व ऐतिहासिक माहितीची किती तरी मनोरम व बिनमोल लेणीं ह्या नैरक्षर्य पर्वताच्या उदरांत दडून राहिलीं आहेत, हें त्यांना कळून येऊन विलक्षण ज्ञानानंदाचा अपूर्व आस्वाद लाभेल ह्यांत संशय नाहीं. तेव्हां ह्या बाहेर राहिलेल्या

भरिताचाहि यांग व व्यवस्था लावणें त्वरित व देशहितास्तवच नव्हे तर मानवधर्मपालनास्तवहि अत्यंत इष्ट आणि अवश्य आहे.''

टिळक-विद्यापीठाची योजना*

पुण्यांतील टिळकस्मारक कमिटी अस्तित्वांत आल्यापासून थोड्याच दिवसांत तिनें असें ठरविलें कीं, सदर स्मारक मुख्यतः शिक्षणविषयक असावें. अशा प्रकारच्या स्मारकाची व्याप्ति प्राथमिक शाळांपासून विद्यापीठा-(युनिव्हर्सिटी) पर्यंत सहजच होऊं शकते. असहकारितेची मदत याच वेळीं झाल्यानें स्मारक-चालकांच्या अदमासापेक्षांहि आधींच लोकमान्य टिळकांच्या नांवाचें महाविद्यालय (कॉलेज) पुण्यास निघालें. तें आपल्या पैशांतून चालविण्याचें काम सदर कमिटीनें आपणाकडे घेतलें व ता. ५ डिसेंबर १९२० च्या जाहीर सभेंत स्मारकाच्या योजनेंत टिळक-विद्या-पीठाचा प्रत्यक्ष समावेश करण्यांत येऊन टिळक स्मारकफंडाच्या कोणत्या दर्जाच्या वर्गणीदारांस सदर विद्यापीठांत कोणत्या दर्जाचा सभासद होतां येतें हेंहि ठरविण्यांत आलें. त्यानंतर टिळकमहाविद्यालयातर्फे परीक्षा घेण्याचा उपक्रम करण्यांत आला तो बराच यशस्वी झाला, हें परीक्षांचे निकाल प्रसिद्ध झाले त्यावरून दिसून येईलच. सदर परीक्षांच्या उपक्रमांत विशेष ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट घडली ती ही कीं, गुजराथ-विद्यापीठाच्या योजनेप्रमाणेंच याहि विद्यालयाच्या परीक्षास्थापनाच्या शाखा बऱ्हाड, मध्यप्रांत किंबहुना अलाहाबाद, डेहराडून येथपर्यंत पसरल्या होत्या; यावरून योग्य दिशेनें प्रयत्न झाल्यास विद्यापीठाचा पाया घालण्यास थांबण्याचे फारसें कारण नाहीं असें उघडच झालें. आणि वसई येथें भरलेल्या प्रथम महाराष्ट्रीय प्रांतिक परिषदेच्या प्रसंगीं टिळकविद्यापीठाची कल्पना अनेक लोकांपुढें ठेवून तें कार्य पुढें ढकलण्यास संमति मिळविण्यांत आली. पुण्यास काल रोजीं भरलेली सभा ही या कार्यांतली आणखी एक पुढची पायरी असून तिच्या योगानें लोकमान्य टिळकांच्या शिक्षणविषयक स्मार-काचें ध्येय तितकें जवळ येत आहे ही आनंदाची गोष्ट होय.

* केसरी, तारीख, २१ जून सन १९२१

कोणाचेंहि स्मारक अनेक प्रकारांनीं करतां येतें व त्यांपैकीं बऱ्याच प्रकारांचा अवलंब हिंदुस्थानांतील लो० टिळकांचे चहाते व भक्त अनेक ठिकाणीं करून चुकलेच आहेत. कोणीं त्यांच्या नांवाच्या नवीन इमारती बांधल्या; कोणीं जुन्या इमारतींना त्यांचीं नांवें दिलीं; कोणीं त्यांच्या नांवाचीं लहानसहान वाचनालयें स्थापिलीं; त्यांचें सर्वांत मोठें स्मारक टिळक-स्वराज्यफंडाच्या रूपानें होत आहे; तथापि यांपैकीं बऱ्याच गोष्टींचा लवकरच विसर पडण्याचा संभव आहे. टिळकस्वराज्यफंड एक कोटि रुपयांपर्यंत जमला तरी काँग्रेसची सुख्य कचेरी व प्रांतिक कचेऱ्या यांच्या द्वारें तो लवकरच खर्चून जाईल. परंतु पुणें शहरानें आरंभिलेल्या व महाराष्ट्राच्या अनेक विभागांनीं संमति दिलेल्या शिक्षणविषयक स्मारकाची गोष्ट तशी नाहीं. हें स्मारक दिवसेंदिवस वृद्धि पावणारेंच आहे. टिळकविद्यापीठाला प्रत्यक्ष प्रारंभ होण्यापूर्वी आज हें बोलणें कदाचित् धाडसाचेंहि दिसेल; तथापि हें विद्यापीठ स्थापन झाल्यास हिंदुस्थानांतील कित्येक जुन्या विद्यापीठांप्रमाणें किंवा ऑक्सफर्ड, केंब्रिज वगैरे ठिकाणच्या विद्यापीठांप्रमाणें त्यांचें नांव अनेक शतकेंपर्यंत अबाधित चालावें अशी इच्छा करणें बावगें होणार नाहीं.

विद्यापीठें व त्यांचीं नांवें यांचा संबंध सामान्यतः दोन प्रकारचा असतो. एक संबंध स्थलवाचक व दुसरा व्यक्तिवाचक. हिंदुस्थानांतील सर्व विद्यमान विद्यापीठें पहिल्या संबंधाचीं उदाहरणें होत. मुंबई युनिव्हर्सिटी ही मुंबई शहरांत स्थापिली गेली, मुंबई इलाख्यांतील विद्यार्थ्यांकरितां ती काढण्यांत आली व मुंबईसरकार तिचा खर्च चालवितें. अर्थात् कोणत्याहि रीतीनें विशिष्ट व्यक्तीचा तिच्याशीं संबंध येत नाहीं. दुसऱ्या प्रकारची युनिव्हर्सिटी अमेरिकेंतील जॉन हॉपकिन्स युनिव्हर्सिटी होय. सदर गृहस्थानें सदर युनिव्हर्सिटी स्थापण्यास लागणारा पैसा देणगीरूपानें दिलेला असल्यामुळें सदरहू युनिव्हर्सिटीला त्याचें नांव यथार्थच लावलें जातें. लोकमान्य टिळकांच्या स्मारकाकरितां काढल्या जाणाऱ्या विद्यापीठास व्यक्तिवाचक व स्थळवाचक अशीं दोनहि नांवें शोभतील. याचें कारण उघड आहे. सदर विद्यापीठ स्वतः टिळकांनीं दिलेल्या एखाद्या पैशाच्या देणगींतून निघालेलें नाहीं. पण टिळकांनीं या विद्यापीठास त्यांचें नांव देणें

शोभण्यासारखी दुसरी एक देणगी दिलेली आहे व ती म्हणजे स्वतः त्यांच्या स्फूर्तिदायक स्मरणाची. कोणत्याहि विद्यापीठाचा मुख्य हेतु विद्वत्ता, सच्छील आणि देशकार्यकर्तृत्व हीं जनतेंत पसरविणें हाच असतो. या दृष्टीनें पाहतां लोकमान्य टिळकांनीं या तीनहि गुणांचा एवढा भरपूर ठेवा आपल्या उदाहरणानें महाराष्ट्रास दिलेला आहे कीं, एरवीं कोणी लाखो रुपयांची देणगी दिली तरी या त्रिगुणात्मक धनाची बरोबरी तिला करतां येणार नाहीं. म्हणूनच टिळकांचें स्मरण ही टिळकांची देणगी समजून त्याच्या बळावर त्यांच्या नांवाचें विद्यापीठ काढणें हें सर्वस्वीं युक्त होईल. मुंबई युनिव्हर्सिटीच्या प्रत्येक वार्षिक पदवीदानसमारंभाच्या प्रसंगीं नवीन पदवीधरांना जो विविध उपदेश केला जातो त्या सर्वांचें सार तुम्ही टिळकांसारखे व्हा, या एका लहानशा सूत्रांत गोवितां येईल, व दिवसहि सुदैवानें असे येत चालले आहेत कीं, मी मुंबईच्या सरकारी युनिव्हर्सिटीचा पदवीधर म्हणवून घेण्यांत पूर्वी जो अभिमान वाटत असे तो आतां वाटत नाहींसा झाला आहे. आणि मी टिळक-विद्यापीठाचा पदवीधर असें म्हणण्यांत तरुण पिढीला अधिक अभिमान वाटेल अशीं चिन्हें दिसत आहेत.

नवीन विद्यापीठाच्या नांवांत टिळकांच्या नांवावरोबर महाराष्ट्र हें स्थलवाचक नाव येणें अयोग्य होणार नाहीं. कारण टिळकांना हिंदुस्थानांतील सर्व प्रांत जरी आपलेसे मानीत होते, तरी टिळक व महाराष्ट्र यांचा संबंध विशेष प्रकारचा होता व टिळक आज जरी मृत झाले असले तरी महाराष्ट्राच्या अंतःकरणांतील त्यांच्या स्मृतीनें तो आत्मीय भाव अद्यापि अबाधित आहे व पुढेंहि तो तसाच अबाधित राहील; शिवाय विद्यापीठाच्या योजनेनें टिळक व यच्चयावत् महाराष्ट्रीय यांचें एकीकरण जितकें समर्पक व दृढ होईल तितकें इतर कशानेंहि होणार नाहीं. सरकारी रचनेमुळें महाराष्ट्र कायमचा तिभंगलेला असून सरकार फिरून हीं शकलें एकत्र सांधील अशी आशा करवत नाहीं. वेणीसंहारांतील क्रुद्ध भीमाप्रमाणें 'मी तर फोडायलाच बसलों आहें, तुमची छाती असेल तर जोडून पहा' अशीच जणुं काय प्रतिज्ञा करून सरकारनें एका महाराष्ट्राचे तीन महाराष्ट्र केले आहेत. आणि तुम्ही कसें जोडतां तें पहातों, असा रोकडा सवाल टाकला आहे. पण या सवालासहि जबाब बरोबर देतां येईल व

तो टिळक विद्यापीठासारखी सर्व महाराष्ट्राकरितां स्वतंत्र अशी एखादी संस्था काढूनच देतां येईल असें आम्हांस वाटतें. हें उत्तर देण्याला नागपूरच्या राष्ट्रीय सभेनें भाषावार प्रांत-रचना अंगिकारून प्रारंभ केला हें प्रसिद्धच आहे; तथापि वरील तत्त्वास विघातक अशीं कांहीं उदाहरणें अजूनहि शिल्लक राहिलीं आहेत. उदाहरणार्थ, बंगाली भाषा बोलणाऱ्या चार कोटि लोकांना एकटी एकच प्रांतिक कॉंग्रेसकमिटी पुरते. चार कोटि हिंदी भाषा बोलणाऱ्या संयुक्त प्रांतालाहि एकच प्रांतिक कॉंग्रेसकमिटी पुरते. असें असून मराठी भाषा बोलणाऱ्या दोन-सव्वादोन कोटि लोकांना तीन कॉंग्रेसकमिट्या लागतात. पण त्यांतहि लोकांच्या मनःस्फूर्तीपेक्षां विद्यमान राजकीय परिस्थितीचाच दोष अधिक आहे असें आम्हांस वाटतें. नागपूर, वऱ्हाड व दक्षिणमहाराष्ट्र यांतील लोकांत क्वचित् मतभेद असला तरी बंगाल इलाख्यांतील लोकांपेक्षां अधिक आहे असें नाहीं. संयुक्तनामधारी प्रांतांतल्या हिंदी लोकांत तर इतका मतभेद बोकाळला आहे कीं, परवां पुण्यास झालेल्या भाषणांत महंमद अल्ली यांनीं या गंगाजम्नी प्रांताला संयुक्त म्हणण्यापेक्षां संविभक्त प्रांत म्हटलें तर अधिक शोभेल असें उघड सांगितलें. असें असतां एकाच गव्हर्नराच्या अमलाखालीं सर्व बंगाली लोक म्हणून त्याला एकच प्रांतिक कॉंग्रेसकमिटी चालते व एकाच गव्हर्नरच्या अमलाखालीं गंगायमुना प्रांतांतील चार कोटि हिंदी लोक असले तरी त्यांच्याकरितां दोन प्रांतिक कमिट्या कोणी मागत नाहीं. आणि नागपूरला वेगळी, उमरावतीला वेगळी व पुण्याला वेगळी अशा तीन वेगळ्या प्रांतिक कॉंग्रेसकमिट्या हव्या असें आम्हां मराठी लोकांना मात्र अद्यापि वाटतें. याचें कारण आम्हांला मनांतून एकी नको म्हणून नव्हे तर यदृच्छेनें तीन निरनिराळ्या प्रांतिक सरकारच्या अमलाखालीं आम्ही आज अनेक वर्षें रहात आलों म्हणून. आतां तीन वेगवेगळ्या प्रांतिक कॉंग्रेसकमिट्या असल्यामुळें राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षाच्या निवडणुकीसारख्या एखाद्या बाबतींत महाराष्ट्रीय लोकांना तीन मतें मिळतील ही गोष्ट खरी; परंतु हा फायदा तितक्या पुरताच आहे. कारण राष्ट्रीय सभेंत प्रांतवार मतें घेण्याची वेळ आली असतां तीन महाराष्ट्र मिळून जी मतांची संख्या मिळते ती इतर कोणत्याहि प्रांताच्या

तिपटीइतकी नसते. पण मतांच्या बाबतींत अशा रीतीनें थोडासा सूक्ष्म फायदा असला तरी सर्व महाराष्ट्र हा एक प्रांत झाल्यापासून जो फायदा होईल त्याहून तो खचित अधिक नाहीं. मूळ राज्यघटना होतांना अव्वल इंग्रजींत नागपूर, वऱ्हाड व दक्षिणमहाराष्ट्र हे जर एकाच सरकारच्या अमलाखालीं येते तर काँग्रेसच्या पहिल्याच घटनेंत या सर्वांकरिता मिळून एकच प्रांतिक काँग्रेसकमिटी स्थापन झाली असती व आज महाराष्ट्राचे तीन विभाग जोडून त्याकरितां एक कमिटी स्थापणें हें जसें कित्येकांना चमत्कारिक किंवा घाडसाचें वाटतें, तसेंच उलट एका महाराष्ट्राचे तीन विभाग करून त्याकरितां तीन निरनिराळ्या कमिट्या करण्याची सूचना घाडसाची व उपद्व्यापी वाटली असती. पण स्वराज्याच्या चळवळींत ज्या अनेक बाबतींमध्यें पूर्वग्रह प्रयत्नानें खोडून टाकावे लागतात त्यांतलीच ही एक आहे. ते खोडून निघण्यास तूर्त मुख्य दोन उपाय दिसतात. पहिला उपाय सर्व महाराष्ट्राची मिळून महाराष्ट्रीय परिषद वेळोवेळीं भरविणें, व दुसरा सर्व महाराष्ट्राकरितां मिळून एक विद्यापीठ स्थापणें हा होय. पैकीं दुसरी गोष्ट आतां घडून येत आहे, व तिच्या मागोमाग पहिलीहि गोष्ट लवकरच घडून येईल अशी आम्हांस आशा आहे.

कोणत्याहि विद्यापीठाचा हेतु वरिष्ठ प्रतीच्या शिक्षणास मान्यता देणें व द्रव्यबलानुसार अशा शिक्षणाच्या संस्था स्थापणें हा असतो. टिळक विद्यापीठाचा हेतु राष्ट्रीय शिक्षणाची प्रगति करण्याचा असल्यामुळें अशा शिक्षणाला मान्यता देणें व अशा शिक्षणाच्या संस्था स्थापणें या दोनहि गोष्टी त्याला कर्तव्य आहेत. पैकीं दुसरी गोष्ट विशेष खर्चाची असते हें उघड आहे. तो इतकी कीं, हिंदुस्थानांतील सरकारी युनिव्हर्सिट्यांना देखील त्या आज ५० वर्षांवर हयात असतांना व अखंड काम चालवीत असतां तें अद्यापि सर्रास हातीं घेतां आलें नाहीं. कोणत्याहि प्रांतांतील युनिव्हर्सिटीनें स्वतः चालविलेलें असें एकहि कॉलेज नाहीं. अर्ध शतकपर्यंत उदार धनिकांनीं पाडलेला देणग्यांचा पाऊस व दिवसेंदिवस विस्तार पावणाऱ्या विद्यार्थिवर्गानें परीक्षेच्या फीच्या रूपानें त्यांत घातली जाणारी भर, या दोहोंस सरकारकडून पैशाची मदत मिळून त्रिवेणीसंगम झाल्यावरच एखाददुसऱ्या विषयावर व्याख्यानें देण्यास प्रोफेसर नेमण्यांत आले आहेत.

कनिष्ठ पदव्या घेतल्यानंतर वरिष्ठ पदव्यांचें शिक्षण देण्याची सोय एका बंगाल्याखेरीज इतर कोठेंहि अजून झालेली नाहीं. भारतमहिला-विद्यापीठाला सर विठ्ठलदास यांनीं एकदम सालिना पन्नास हजार रुपये येण्याएवढी रक्कम देऊं केली, तेव्हांच त्याला आपलें खास असे कॉलेज काढतां आलें. तात्पर्य, टिळकविद्यापीठ आज स्थापन झालें तरी त्याला स्वतःच्या खर्चानें कॉलेज काढतां येणार नाहीं. परंतु स्वतंत्र रीतीनें निघालेल्या कॉलेजांना मान्यता देतां येईल; तसेंच प्राथमिक व दुय्यम प्रतीचें शिक्षण राष्ट्रीय दृष्टया कसें असावें हें ठरवून या नवीन पद्धतीची परंपरा सुरू करतां येईल. पण 'विद्या' या शब्दाचा अर्थ हल्लींच्या युनिव्हर्सिट्यांतून पुस्तकी ज्ञान व कागदी परीक्षा असा जो संकुचित केला जातो तो अधिक विस्तृत केल्यास पाश्चात्य देशांतील 'युनिव्हर्सिटी एक्स्टेन्शन' पद्धतीनें सामान्य जनतेंत संस्कृति पसरविणें व स्वयंभूहि विद्या जेथें आढळेल तेथें तिला मान्यता देणें, याहि गोष्टी अशा विद्यापीठाला करितां येण्यासारख्या आहेत. चार इंग्रजी व चार संस्कृत ग्रंथकार वाचण्याबाहेर कांहीं विद्या म्हणून आहे असें हल्लींच्या सरकारी विद्यापीठांना वाटत तरी असेल कीं नाहीं कोण जाणे, अशीहि शंका येते. सूक्ष्म दृष्टीनें समाजांत फिरून चवकशी करूं लागलों असतां सरकारी विद्यापीठें बहुमानाच्या ज्या उच्च पदव्या फुकट लब्धप्रतिष्ठ अशा मोठ्या लोकांना देतात, त्या देण्याला स्वयंभू विद्यासंपन्न असे सत्पात्र विद्वान् किती तरी आढळतील. परवां ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटीनें राणी मेरी हिला कायदेपंडित ही पदवी देऊन भूषविलें किंवा त्यापूर्वी इकडील कित्येक राजेरजवाड्यांना ही पदवी दिली; यापेक्षां त्या पदव्यांचा उपयोग अधिक प्रयोजक रीतीनें खचित करतां आला असता. कारण विद्यापीठाची एखादी प्रत्यक्ष परीक्षा उत्तीर्ण होणें यांतच गुणसर्वस्व सांठविलेलें नाहीं ही गोष्ट आजकालच्या पाश्चात्य प्रधानमंडळांत पदवीधर असे किती थोडे लोक असतात यावरून दिसून येईल. त्याच रीतीनें टिळकविद्यापीठाच्या अधिकारस्थानीं महाराष्ट्रांतील सर्व बाजूंनी श्रेष्ठ असे लोक बसले असतां, विद्यापीठाच्या प्रत्यक्ष तोरणाखालून न गेलेल्या अशाहि विद्वानांना म्हणजे कवींना, लेखकांना, वक्त्यांना, चित्रकारांना, शिल्पकारांना, संशोधकांना, गवयांना, पंडितांना, सामुदायिक कार्यवाहकांना, योग्य पदव्या देऊन कसें

भूषवितां येईल हें त्यांना सांगावयास नको. आज सरकारी विद्यापीठांतून अगदीं एकेरी किरण ठराविक दिशेनें पडत असल्यानें त्यांच्या मान्यतेचा प्रकाश फार थोड्या व्यक्तींच्या कपाळावर पडतो, पण हा अन्याय होय. खऱ्या विद्यापीठाच्या मान्यतेचा प्रकाश, गुप्त पोलिसांच्या छुप्या कंदीलाप्रमाणें, (Pocket Light) आसपासच्या गहन अंधारांत एकाच वस्तूवर पडून ती अत्यंत उज्ज्वल अशी भासावी यापेक्षां, सूर्यप्रकाशाप्रमाणें सर्वत्र म्हणजे कानाकोपऱ्यांतहि पसरून त्यांत वस्तुमात्राच्या नैसर्गिक उच्चनीचतेचें स्वभावदर्शन व्हावें हेंच अधिक रास्त आहे. स्वतः लोकमान्य टिळकांनीं आपली गुणग्राहकता जशी सर्व जनतेमध्यें पसरून जेथें जेथें सांपडले तेथें तेथें गुणिजनांना मान्यतेनें भूषविलें. त्याच धोरणाला अनुसरून त्यांचें स्मारक म्हणून स्थापिल्या जाणाऱ्या विद्यापीठानें मान्यतेचा फैलाव केल्यास मोठेंच कार्य होणार आहे. कोणतेंहि नवीन धोरण बनविणें म्हणजे वाहत्या प्रवाहाच्या पाण्यांत नवीन भोवरा निर्माण करणें होय. हा भोवरा निर्माण करण्याला पुष्कळ गति देऊन पाण्यांत क्षोभ उत्पन्न करावा लागतो. त्याचप्रमाणें एकादें नवें विद्यापीठ स्थापून नवी परंपरा पाडणें यालाहि समाजाचें पाणी खळबळून सोडावें लागतें व अशी खळबळ सुरू करण्याचे दिवस आतां आले आहेत हें म्हणणें कोणासहि पटेल.

पदवीदान-समारंभ*

गेल्या रविवारीं सायंकाळीं टिळक-विद्यापीठाचा दुसरा पदवीदानसमारंभ मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. लोकमान्यांच्या स्मारकाकरितां श्रीजगन्नाथमहाराज यांनीं अर्पण केलेली रम्य व प्रशस्त जागा, पदव्या घेणारे स्वार्थत्यागी व हौशी विद्यार्थी आणि राष्ट्रीय शिक्षणावर प्रेम करणाऱ्या प्रेक्षकांचा समाज या तिहींच्या संमेलनानें समारंभ विशेष आनंददायक झाला. कारण 'राष्ट्रीय शिक्षण' हा शब्द वाच्यार्थानें एकेरी असला तरी त्यांतून स्फूर्तिदायक व हृदयस्पर्शी अशा अनेक भावनांचें अनुरणन मार्मिक मनुष्याच्या मनांत होत असतें. विद्यापीठाचे कुलपति श्रीशंकराचार्य यांनीं आपल्या आशीर्वादरूपी संदेशांत असें म्हटलें आहे कीं, "शंकराचार्यांची गादी व रामदासांचे मठ यांप्रमाणेंच विद्यापीठ हाहि एक राष्ट्रकार्याचा मठ होय." सरकारी विद्यापीठाच्या पदवीदानसमारंभाचे वेळीं तेथील कुलपति किंवा चॅन्सेलर देखील हीच भाषा वापरीत असतात. तथापि उद्देश व सहचारी कल्पना यांच्यामुळें तिचे अर्थ अनेक प्रकारचे होतात, व यांतील कित्येक अर्थ हितसंबंधाच्या दृष्टीनें अगदीं परस्परविरोधी असावे असेंहि संभवतें. सर जॉर्ज लॉईड व श्रीशंकराचार्य या दोघांनींहि नवीन पदव्या घेणाऱ्यांना "देशकार्यकर्ते" व्हा, अशाच शब्दांनीं उपदेश केला तरी परकी गव्हर्नराचा इष्टार्थ कोणता व श्रीशंकराचार्यांचा इष्टार्थ कोणता याची कल्पना सामान्य बुद्धीच्याहि मनुष्यास करितां येईल.

स्वतः शिक्षणाला मान व महत्त्व मोठें असलें तरी शिक्षण हें एक निव्वळ साधन आहे. साध्य नाहीं. यामुळेंच शिक्षणाच्या प्रकारांत विविधता दिसून येते. हें एकच कारण अमेरिकेंतील शिक्षण युरोपांतील शिक्षणाहून भिन्न कां, व खुद्द हिंदुस्थानांतील सरकारी विद्यापीठें व खाजगी विद्यापीठें यांतील शिक्षण भिन्न कां हें सांगण्यास पुरेसें आहे. सुशिक्षणावाचून कोणालाच आपलें कार्य स्वतः करतां येत नाहीं किंवा तें दुसऱ्याकडून करवून घेतां येत नाहीं. पण सुशिक्षण हें पोलादासारखें असून, तें भट्टींत कमावितांना किंवा यंत्रांत घालून त्याचे निरनिराळे पदार्थ बनवितांना,

* केसरी तारीख ४ सप्टेंबर १९२३

योजकाच्या निरनिराळ्या हेतूप्रमाणें त्याचा आकार बनविला जातो किंवा त्याला पाणी दिलें जातें. एकाच पोलादाची कांब, पण त्यांतील एक तुकडा कोणी तलवार बनविण्याकरितां कापून घेईल, दुसऱ्याचा कोणी नांगरचा फाळ बनवील व तिसरा कोणी त्यांतून शेंकडों घड्याळांकरितां कमानी तयार करील. उदार या नांवानें उल्लेखिल्या जाणाऱ्या शिक्षणाचीहि तीच गोष्ट आहे. शिक्षण म्हणजे फक्त बुद्धिसंस्कार याहून दुसरें कांहीं नाहीं. पण बुद्धिसंस्काराचें मुख्य द्रव्य किंवा संस्कृतीचा रांधा पुष्कळसा तोच असला तरी, त्या संस्कृतीचा अखेर उपयोग ज्या दृष्टीनें व्हावयाचा त्या दृष्टीनेंच त्याचा आकार, त्याचीं उपांगें, व त्याच्या सहचर उपाधि या निर्माण केल्या जातात. म्हणूनच संस्कृतीच्या मूळ द्रव्यापेक्षांहि या इतर गोष्टींना सहजच एक प्रकारें अधिक महत्त्व प्राप्त होतें.

सरकारी विद्यापीठांतिल शिक्षणाचे मुख्य विषय व राष्ट्रीय विद्यापीठांतील शिक्षणाचे मुख्य विषय हे सकृद्दर्शनीं प्रायः एकरूपच दिसले तरी, या अवांतर महत्त्वाच्या गोष्टीनींच त्या विषयांच्या शिक्षणापासून उत्पन्न होणाऱ्या मनोरचनेचा नूर बदलत असतो. लिहिणें-वाचणें, अभिजात वाङ्मयाशीं निकट परिचय करणें, निरनिराळ्या विषयांत खोल शिरून त्यांचें सांगोपांग आकलन करणें, दुसऱ्याचे विचार समजून घेण्याप्रमाणें स्वतःचेहि विचार दुसऱ्याच्या मनावर ठसविण्याची पात्रता अंगीं आणणें, यालाच उदार शिक्षण म्हणतात. अर्थात् ती बुद्धीची एक प्रकारें तालीम किंवा कसरत होय. कोणत्याहि आखाड्यांत जोर, उठाबशा, मल्लखांब, कुस्ती, दांडपट्टा वगैरे शरीरमेहनतीचे तेच प्रकार दृष्टीस पडतात. परंतु अशा रीतीनें शरीर कमावणारा तरुण मनुष्य, स्वतः त्याच्या किंवा इतरांच्या योजनेनें, एकाद्या सावकाराच्या देवडीवरील पहारेवाला, किंवा पोटभरू पहिलवान, किंवा एकाद्या गोल्डन गँगच्या पदरचा भाडोत्री लाठ्याळ किंवा सरकारच्या लष्करांतील शिपाई, किंवा राष्ट्रीय पथकांतील स्वयंसेवक किंवा एकाद्या मोफत तालमीचा परोपकारी वस्ताद होणार यावरूनच त्याच्या शरीरसंपत्तीचा खरा उपयोग ठरविण्यांत येईल; आणि मेहनतीचे व कसरतीचे प्रकार तेच असले तरी शिक्षक व इतर परिस्थिति यामुळेंच त्यांच्या उपयोगाचा ओघ निरनिराळ्या दिशांनीं वळेल.

सरकारी विद्यापीठाच्या पदवीदानसमारंभाचे वेळीं चॅन्सेलरसाहेबांची दृष्टि जेव्हां पदवी घेणारांवर पडते तेव्हां त्यांच्या मनांत प्रायः हाच विचार येतो कीं, या तरुण मुलानें सरकारी नोकरींत शिरावें, तेथें मिळेल तें वेतन घेऊन संतुष्ट रहावें, त्याचा गोरा अधिकारी हुकूम फर्मावील तो त्यानें इमानदारीनें पाळावा, व्यक्तिमात्रानें करतां येईल तितका कारभार सुयंत्रित व सुरक्षित करावा, व अशा रीतीनें इंग्रजांचें हिंदुस्थानांतील राज्य व जगावरील साम्राज्य हें सुदृढ, पुष्ट व टिकाऊ होण्यास मदत करावी. याच्या उलट टिळक विद्यापीठासारख्या राष्ट्रीय भावनेच्या विद्यापीठांतील पदवीदानसमारंभाचे वेळीं कुलपति किंवा कुलगुरु यांची दृष्टि पदवी घेणाऱ्या तरुणांकडे जाते, त्या वेळीं त्यांच्या मनांत कोणच्या प्रकारची विचारपरंपरा चालू असेल? या मुलानें वाटेल तर उपाशीं मरावें, व जरूर तर सामान्य मोलमजुरी करून देखील उदरनिर्वाह करावा, पण सरकारी नोकरीची कल्पनाहि मनांत आणूं नये; यानें निर्भय होऊन सरकारी अधिकारी, मग तो कोणी व केवढाहि का असेना, अधिकारदृष्ट्या तुच्छ मानावा; इंग्रज सरकारचें हित तेंच प्रायः आपलें अहित व हिंदुस्थानचें हित तेंच प्रायः इंग्रजांचें अहित हा स्वाभाविक व दुस्तर विरोध निरंतर लक्षांत ठेवून क्षणशः व कणशः या विरोधांत स्वदेशाचेंच हित साधावें. व त्याकरितां इंग्रजांचें अहित चिंतण्यास किंवा आचरण्यासहि कसूर करूं नये; सरकारी नोकर होऊन राज्ययंत्राचा राखणदार स्वतः तर बनूंच नये, पण हिंदी लोकांना स्वराज्य मिळावें म्हणून दुसऱ्याच्या हातीं असलेलें राज्ययंत्रहि शक्य तेथवर सुरक्षित व सुरळित राहूं नये असाच प्रयत्न करावा; भावी महत्त्वाकांक्षेचा पाया म्हणून आपल्या पात्रतेप्रमाणें द्रव्यबल मिळेल तितकें मिळवून होईल तितका ओला स्वार्थत्याग करावा; अधिकारी व प्रजाजन यांच्या दरम्यान जेथें जेथें अन्यायाचें झुंज चाललेलें दिसेल तेथें तेथें उडी टाकून आपल्या शक्तीप्रमाणें स्वकीयांची न्यायाची बाजू उचलून धरावी. स्वराज्याकरितां जरूर तर साम्राज्यास धोका देण्याचे विचारहि याच्या मनांत खेळावेत; व निर्वाणीचे प्रसंग थोडे येत असले तरी अशा प्रसंगांत त्यानें आपली आहुतिहि द्यावी, पण स्वकीयांचेंच हित साधावें, अशी अपेक्षा हा पदवी देणारा या पदवी घेणाराकडून करीत असेल यांत काय संशय?

भाषा, इतिहास, गणित, अर्थशास्त्र, पदार्थविज्ञान, व्यापार, यंत्रकला या गोष्टी यथाद्रव्यशक्ति त्याच शिकवावयाच्या; पण शिकविणारा व शिकणारा यांच्या मूल हेतूनेंच त्या शिक्षणाला अखेरचें पाणी मिळत असतें. राष्ट्रीय विद्यापीठांतील झालें म्हणून कांहीं गणितांत दोन व दोन यांची बेरीज पांच होऊं शकणार नाहीं. भूमितींतील वर्तुळाच्या जागेंत त्रिकोण बरोबर बसतो असें होणार नाहीं, वाङ्मय–शिक्षणांत कालिदासाच्या शकुंतलेला दुष्यंत किंवा उपवनाला तपोवन म्हणतां येणार नाहीं. शेक्सपियरचा आयागो हा साधु किंवा अथेल्लो हा शहाणा विवेकी ठरवितां येणार नाहीं. इतिहासांत फ्रांसीची वॉटर्लू होणार नाहीं. भूगोलांत जिब्राल्टर मुंबई बंदरांत येणार नाहीं. धर्मशिक्षणांत बायबल हें गीता ठरणार नाहीं, किंवा स्मृतिशास्त्रांतील निषेध विधिपर लावतां येणार नाहींत. व्यापारी शिक्षणांतील रोजकीर्दीत खर्चापेक्षां जमा अधिक असल्याखेरीज शिल्लक उरते असें शिकवितां येणार नाहीं. ज्योतिषांत पृथ्वी सूर्यापेक्षां मोठी ठरवितां येणार नाहीं. पदार्थविज्ञान राष्ट्रीय झालें म्हणून त्यांत क्रियेपेक्षां प्रतिक्रिया लहानमोठी होते, किंवा स्वरूपनाश हा आत्यंतिक द्रव्यनाश ठरतो असें शिकवितां येणार नाहीं. हें सर्व खरें. तथापि ज्ञान तेंच व मन विकसित करण्याचा त्याचा परिणाम तोच असला तरी सरकारी विद्यापीठांतून बाहेर पडणारा पदवीधर व हा हे पुष्कळ वेळां वेगवेगळ्या दिशेनेंच चालूं लागल्याचें आढळतील यांत शंका नाहीं. शिक्षणक्रम तोच असतांहि आमचें कॉलेज हें कांहीं डेक्कन कॉलेज नाहीं असें म्हणण्यांत फर्ग्युसन कॉलेजच्या अधिकाऱ्यांना जर यथार्थता वाटूं शकते, न्यू पूना कॉलेजच्या लोकांना आमचें कॉलेज म्हणजे कांहीं फर्ग्यूसन कॉलेज नव्हे असें जर अभिमानपूर्वक व सयुक्तिकपणें म्हणतां येतेंच, तर तितक्या प्रमाणानेंच कां होईना, टिळक-विद्यापीठ हें कांहीं सरकारी किंवा निमसरकारी विद्यापीठ नव्हे असें, परवां वाङ्मयविशारद ही पदवी घेतलेल्या पदवीधरांनाहि नुसतें अभिमानानेंच नव्हे तर यथार्थतेनेंहि म्हणतां येणार आहे. कारण राष्ट्रीय शिक्षण हा शिक्षणापेक्षांहि अधिकाराचाच प्रश्न अधिक आहे. व हा अधिकारहि निवळ पोकळ स्वातंत्र्याच्या इच्छेचा नसून आपणाकडून शिक्षण व पदवी घेणाऱ्या

विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा व क्रियेचा ओघ तावडतोब कोणीकडे वळवावा या दृष्टीनेंच महत्त्वाचा ठरतो.

सरकारी विद्यापीठ व राष्ट्रीय विद्यापीठ यांतील विरोध एकाच शहरांतील दोन आखाड्यांच्या स्पर्धेसारखा सहेतुक व स्वाभिमानमूलकच आहे. सरकारी विद्यापीठांत किंवा शिक्षणसंस्थांत फाजील गर्दी झाली ती कशी तरी मोडण्याकरितांच केवळ राष्ट्रीय विद्यापीठ किंवा टिळकविद्यालय अशांची स्थापना नाहीं. निराळ्या प्रकारची पदवीधरपरंपरा निर्माण करण्याचा हेतु नसेल, किंवा तो हेतु असूनहि विफलच होणार असेल, तर राष्ट्रीय शिक्षणाचें वेगळें कॉलेज किंवा विद्यापीठ काढण्याचा प्रयत्न हा निवळ उपद्व्यापच ठरेल. पण खरा प्रकार तसा नाहीं. बलाबलाची तुलना करितांना एकीकडे सर्व देशभर पर्वतप्राय पसरलेला सरकारी विद्यापीठांच्या पदवीधरांचा सांप्रदाय, दुसरीकडे तळहाताएवढ्या लहानशा दिसणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणसंस्थांचा क्षुद्र उपक्रम, असा विरोध पाहून अदूरदर्शी लोकं निराशा पावोत; परंतु एका सुप्रसिद्ध कविवचनाप्रमाणें, पुढें आकाश भरून टाकणारा मेघसमुदाय प्रारंभीं तळहातासारख्या लहानशा चकतीएवढाच असतो. आतां राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार सर्व शिक्षण-संस्था पुढें केव्हां तरी खासगी स्वरूपाच्या बनूनच होणार असें नाहीं. देशांत जोंपर्यंत सरकार आहे व सरकारचे आश्रित आहेत, तोंपर्यंत शिक्षणसंस्था या सरकारी व निमसरकारी अशा पुष्कळशा राहणारच. पण अशा संस्थांना आज मान्यतेचा असा कोणीच प्रतिस्पर्धी नाहीं ही जी खेदकारक स्थिति ती मात्र यापुढें फार दिवस टिकणार नाहीं. कदाचित् मुंबईचें सरकारी विद्यापीठ हेंच पुढेंमागें बहुतांशीं लोकनियुक्त होऊन, शिक्षणमंत्री हा जो आज सरकारच्या बाहुल्याप्रमाणें नाचलेला दिसतो तोच उद्यां कायदे-कौन्सिलच्या पाठबळामुळें अरेराव बनून लोकमताचें प्रतिबिंब सरकारी युनिव्हर्सिटींत पाडूंहि शकेल. तथापि ही इष्ट गोष्टहि लवकर घडून यावी, ती घडून आल्यानंतरहि ज्यांना सरकारी विद्यापीठांत अनेक कारणांनीं स्थान मिळूं शकत नाहीं अशा विद्वानांचा एकादा सुदृढ संघ बनावा, व त्याच्या सांप्रदायाचें महाराष्ट्रभर जाळें लवकरच पसरावें हाच टिळक-विद्यापीठाच्या चालकांचा मुख्य हेतु आहे.

राष्ट्रीय शिक्षणाची कुस्ती ही मान्यता मिळविण्याची कुस्ती आहे. आणि देशांतील स्वतंत्र विचाराचे विद्वान्, मग ते कोणत्याहि शास्त्रांत किंवा कलेंत निष्णात झालेले असोत, त्यांनीं एक जुटीनें कार्य केल्यास सरकारी विद्यापीठाला योग्य प्रतिस्पर्धी असा विद्वत्संघ निर्माण होण्याला व सांप्रदाय बनण्याला अडचण पडणार नाहीं. हें कार्य एकजुटीनें होत नाहीं म्हणूनच केवळ, आपण सरकारबहिष्कृत एवढ्याचकरतां नादान, टाकाऊ, कमकुवत अशी जी एक घातक बुद्धि विद्येच्या क्षेत्रांत उत्पन्न झालेली आहे ती निघून जाऊन, उलट आम्ही संघ बनवूं तर सरकारी विद्यापीठालाहि मान्यतेंत कालांतरानें खालीं पहावयास लावूं अशी बुद्धि व तत्सिद्धयर्थ प्रयत्न होणें हीच काय ती आज मुष्किलीची गोष्ट होऊन बसली आहे. इतर सर्व कांहीं सोपें आहे असें आम्हांस वाटतें. ही बुद्धि कोठें व कशी उत्पन्न करितां येईल हा खरोखरच आज लोकांपुढें मांडण्याला अत्यंत योग्य असा विषय आहे; व सवडीनुसार राष्ट्रीय शिक्षणाच्या विषयाचा या दृष्टीनें विवेचन करण्याचा आमचा विचारहि आहे.

व्याख्यानें

*पुण्यांतील विद्यार्थ्यांची सभा

रविवार ता. २३ रोजीं सायंकाळीं सहा वाजतां श्रीशिवाजीमंदिराच्या मैदानांत पुण्यांतील विद्यार्थ्यांची सभा भरली होती. सभेस पुष्कळ सद्गृहस्थ व दोनतीन हजार विद्यार्थी हजर होते. न. चिं. केळकर यांची अध्यक्षस्थानीं योजना झाली. प्रास्ताविक भाषण करतांना केळकर यांनीं ही सभा भाषणें करण्याकरितां बोलावलेली नसून प्रत्यक्ष कृति करण्याचा निश्चय करण्याकरितां बोलावली आहे असें सांगून ज्या विद्यार्थ्यांना बोलावयाचें असेल त्यांनीं बोलावें असें सांगितलें. न्यू इंग्लिश स्कूलचे कान्हेरे यांनीं आपण आजपासून शाळा सोडली असून पुढारी सांगतील तें काम करण्यास तयार आहों असें सांगितलें. बेलापुरकर, बेलसरे व परांजपे या विद्यार्थ्यांनीं आपण पूर्वीच कॉलेज सोडल्याचें जाहीर करून महाराष्ट्राची उज्ज्वल परंपरा राखण्याची विद्यार्थ्यांना विनंति केली. भिडे यांनीं इंग्रजीमध्यें व रबडे, दातार व दीक्षित यांनीं मराठीमध्यें आपणहि कॉलेज सोडल्याचें सांगून प्रथम विद्यार्थ्यांनीं कोणाचीच वाट न पाहतां स्वार्थत्याग कां करावा हें सांगितलें. यानंतर अध्यक्षांनीं कोणा विद्यार्थ्यास उलट बोलावयाचें असल्यास बोलावें व त्यांचें भाषण सर्व मंडळींनीं अगदीं शांतपणें ऐकून घ्यावें अशी विनंति केली. शहा यांनीं विद्यार्थ्यांना शाळा व कॉलेजें सोडण्यास सांगणें अनुचित असून त्यांत विद्यार्थ्यांचें नुकसान आहे असें उलट बाजूनें प्रतिपादन केलें. यानंतर म्हैसूरकर, रा. दा. देसाई, घारपुरे, फडके, दा. वि. गोखले यांचीं कळकळीचीं भाषणें झालीं. अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना केळकर म्हणाले:—

" कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेहून जास्त समाधानकारक व पक्का असा ठराव नागपूरच्या राष्ट्रीय सभेनें केला आहे. " जो Conscience ला स्मरून आपल्या बळावर कॉलेज सोडील, त्याला मी डोक्यावर घेऊन नाचेन " असें मीं पूर्वी एका सभेंत सांगितलें होतें. 'Conscience' या महत्त्वाच्या शब्दाने राष्ट्रीय सभेनें आपल्या ठरावांत बदल केला असून १६

* केसरी तारीख २५ जानेवारी सन १९२१

वर्षांवरील प्रौढ विद्यार्थ्यांनीं एक वर्ष जरी कॉलेज सोडलें तरी हा स्वार्थ-त्याग राष्ट्राला मंजूर आहे, असें तिनें सांगितलें आहे. आतां मात्र परीक्षा तुमची आहे. दास, भोपटकर वगैरे पहिल्या प्रतीच्या वकिलांनीं स्वार्थत्याग करून दाखविल्याकारणानें वकीलवर्गाकडेहि बोट दाखविण्यास जागा नाहीं. कॉलेज सोडल्यानें कोणीहि फुकट मरत नाहीं. ज्यांना शिकावयाचें आहे त्यांच्याकरितां कॉलेजें आहेत. माझ्या अंगीं 'सावधपणानें बोलतो' असा दोष आहे खरा. पण अविचाराच्या दोषापेक्षां जबाबदार पुढारी या नात्यानें मला सावधपणाचा दोष पत्करेल. 'सार्वजनिक सभेंत' मीं माझें मत सांगितलें नाहीं, असा माझ्यावर आरोप आहे ! माझें मत तुम्हांस पाहिजे का ? त्याच वेळेला सभेंत बोलण्याचे आधीं मीं माझीं मुलें शाळांतून काढून प्रत्यक्ष उदाहरणानें माझें मत काय तें सांगितलें होतें. त्या वेळेला तुम्ही माझ्या सावधगिरीला हंसलांत, कीं मी फक्त १०० मुलांची शाळा काढणार. पण आतां हंसणारांचेच दांत दिसत आहेत. कारण अद्याप १०० मुलेंहि आलीं नाहींत ! केळकर आमची सोय करावयाला तयार नाहींत, अशा तक्रारी कित्येकांनीं गांधींकडे केल्या आहेत ! पण मी या चहाडखोरांना विचारतों कीं, आतां असे पुढें या, व मी विचारतों या प्रश्नांचा जाब द्या. ज्यांना माझ्या शब्दांकरितां आडकाठी असेल त्यांना मी स्वच्छ सांगतों कीं, मी घरावर तुळशीपत्र ठेवीन, भीक मागेन पण तुमची सोय लावण्याचा शक्य तो प्रयत्न करीन. पण नक्की करीनच असें सांगत नाहीं, कारण मी 'सावध' असा दोषारोप तुम्हीच करतां ! पण मध्यंतरीं मुलांना सरसकट कॉलेजें सोडण्याला सांगण्यापूर्वी येथील न्यू पूना कॉलेजला मीं असें विचारलें होतें कीं, " १२ हजार रु. ची तुम्हांस तूट येते. मी तीन लक्ष रुपये म्हणजे सालिना १८ हजार तुम्हांस मिळण्याची हमी घेतों. तुमचें कॉलेज राष्ट्रीय करतां काय ? " त्यांनीं तुम्हां विद्यार्थ्यांवरच अविश्वास व्यक्त करून असें म्हटलें कीं, " संस्था राष्ट्रीय केली तरी ५०० मुलें राहतील याची हमी काय ? " याची लाज तुम्हांला पाहिजे. राष्ट्राचे भावी आधारस्तंभ असा इतके दिवस स्तुतीचा खुराक खाल्लांत. आतां परीक्षेची वेळ आहे. पुढें कोण येतां ते या. डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थ्यांप्रमाणें श्रीमंत असलांत, व शिक्षण घ्यावयाचें नाहीं म्हटलेंत तरी तुमच्या राष्ट्रीय मताकडे पाहून

आईबाप हरकत घेणार नाहींत. गरीब असून धंदा कसा करूं म्हटलेंत, तरी खेड्यापाड्यांत पुष्कळ काम आहे. एक खेडें जरूर एका माणसास आनंदानें पोशील. आम्हीहि शक्य तितकी त्याला मदत करूं. ज्याला एवढीहि धमक नाहीं, व खेडयांत काम करून आपलें पोटहि भरतां येणार नाहीं, तो कसला राष्ट्राचा आधार? ज्यांना शिकावयाचें आहे त्यांच्याकरितां कॉलेज आहे. पूर्वी तुम्ही माझ्या सावधगिरीची परीक्षा पाहिली; आतां मी तुमच्या तडफेची परीक्षा पाहतों."

शिक्षणावरील बहिष्कार

(शिवमंदिरांतील सभा)

नागपूरच्या कॉंग्रेसनंतर तारीख १ फेब्रुवारी १९२१ रोजीं शिवाजी मंदिरांत केळकर यांचे अध्यक्षतेखालीं शिक्षण-बहिष्कार-विषयक सभा झाली. व्याख्याते हे गुजराथेकडील असून बहिष्काराचा प्रचार करण्याकरितां इकडे आले होते. याच वेळीं टिळकमहाविद्यालय नुकतेंच निघालें असून बहिष्काराची चळवळ जोरांत होती; व मुलांनीं भराभर शाळा व कॉलेजें सोडावीं याकरितां प्रो० फडके, घारपुरे, देव वगैरे व्याख्यात्यांची व्याख्यानें गांवांत होत होतीं. विद्यार्थ्यांतफेंहि यासंबंधीं बरीच खटपट होत असून कित्येक स्वतः शाळा सोडून इतरांस उपदेश करीत, तर कित्येक बहादर असे होते कीं, स्वतः कॉलेजें न सोडतांच इतरांस फूस देऊन त्यांच्या याद्या सभेंत वाचून दाखविण्याचा त्यांचा उपक्रम चालू होता! इतर उत्साही उपदेशक व केळकर यांच्यामध्यें कार्याच्या पद्धतीसंबंधानें एक तीव्र मतभेद होता. तो हाच कीं, कॉलेज सोडावयास सांगतांना विवेचकबुद्धि जरूर चालविली पाहिजे असें केळकर यांचें मत होतें. इतरांच्या मतें पुढाऱ्यानें सर्वांस सरसकट कॉलेज सोडण्याचा जाहीर उपदेश केलाच पाहिजे व असा उपदेश केळकर यांनीं करावा असा त्यांचा आग्रह होता.

व्याख्यात्यांचें व्याख्यान चांगलें सुश्राव्य झालें. त्यानंतरहि कांहीं किरकोळ भाषणें झाल्यावर 'ऑनर्स लिस्ट'प्रमाणें ज्यांनीं कॉलेज सोडल्याचा शुभ्र

संकल्प जाहीर केला त्यांची यादी नेहमींप्रमाणें घाणेकर हे विद्यार्थी वाचून दाखवूं लागले. पण हेंच काम करतांना पुढें आडवाटेंत शिरून त्याच दिवशींच्या केसरीवर त्यांनीं भाष्य करावयास सुरुवात केली. केसरीचा त्या दिवशींचा अग्रलेख बहिष्कार-विषयक होता; पण ज्यांना त्यांतील धोरण नापसंत होतें. त्यांनीं सत्प्रवृत्तीनें कां होईना, पण थोड्या अविचारानेंच संध्याकाळच्या जाहीर सभेंत वेगळ्या तऱ्हेचा उपदेश करण्याची केळकर यांस निकड लावली. केळकर यांनीं तें मनावर घेतलें नाहीं तेव्हां योग्य मर्यादा ओलांडून घाणेकर हे केसरीच्या वाक्यांनीं उत्पन्न झालेला गैरसमज (?) दूर करूं लागले ! तेव्हां मात्र केळकर यांनीं उठून घाणेकर यांस रागानें विचारलें, "कांहो, मी येथें असतां तुम्ही माझ्याबद्दल कां बोलतां ? गैरसमज असल्यास एकादा विचारील. मी उत्तर द्यावयाला येथें हजर आहें. तुम्हाला हा 'अव्यापारेषुव्यापार' सांगितला कोणीं ? गैरसमज होता कशावरून ? नसला तर तुमच्या या कृत्यानें तो पसरावयाचा मात्र !

असो. मला कांहीं विशेष बोलावयाचें नाहीं. पण आजच्या एका गोष्टीनें मी कावराबावरा झालों खरा. त्याबद्दल मी आपणांला एकदां स्वच्छ सांगतों. घाणेकर यांनीं अमुक बोला म्हणून मला सकाळीं सांगितलें. पण काय लिहावयाचें व काय बोलावयाचें हें मला त्यांच्यापेक्षां चांगलें समजतें. तुम्हांला वाटत असेल, कीं टिळक गेल्यामुळें ही नगरी गतधवा झाली तर तुमच्याप्रमाणेंच मीहि तसें म्हणण्यास तयार आहें. मी मला तुमचा पुढारी असें मानीत नाहीं. किंबहुना ज्याच्या अंगांत सामर्थ्य असेल त्यानें खुशाल हें असलें पुढारीपण पतकरावें. त्याला माझी ना नाहीं. मी आनंदानें त्याचा अनुयायी होईन. त्यांत मला बिलकुल असंतोष किंवा असमाधान नाहीं. ओघासच आलें म्हणून सांगतों कीं, मी पहिल्यापासून हिंमतीपेक्षांहि दोन शब्द कमीच बोलणारा आहें. लोकांस वाटेल तसें मला बोलतां येत नाहीं. पुढारी झाला तरी त्यालासुद्धां बोलण्यास मर्यादा आहेच. त्यानें वाटेल तें सांगितलें तरी चालतें असें कोणास वाटत असेल; मला तसें वाटत नाहीं. तुम्हांला जर टिळकांच्या नांवाबद्दल एवढें प्रेम वाटतें तर तुम्हीं कॉलेज सोडावयाचें होतेंत त्यांच्याकरितां; यांत पुण्याचें नांव जातें असें जर तुम्हांला वाटत होतें तर आपण होऊनच कां सोडलें नाहींत

कॉलेज ? हा ज्याचा त्याचा व्यक्तिशः प्रश्न आहे. यांत कांहीं प्रांतिक अभिमानाचा किंवा पुढाऱ्याच्या नांवाचा प्रश्न नाहीं.

आजचे व्याख्याते माझ्याकडे दुपारीं आले त्यावेळीं मी क्षणभर निजलों होतों. आल्याबरोबर त्यांनीं मला पहिला प्रश्न विचारला तो असा कीं, 'महाराष्ट्रांत जागृति दिसत नाहीं!' मला त्यावेळीं थोडा रागच आला. मीं म्हटलें, 'होय नाहीं खरीच. कारण त्यावेळेला मी निजलों होतों!' नंतर मीं त्यांना विचारिलें कीं, 'महाराष्ट्राचें एकवेळ असो; पण तुमच्या गुजराथेंत कसें काय आहे?' तेव्हां त्यांना झकत कबूल करावें लागलें कीं, तेथें महाराष्ट्रापेक्षांहि कमी मुलें शाळेंतून निघालीं आहेत! आणि तेथें तर स्वतः गांधीच जातीनें हजर आहेत! हें आतां कसें काय तें तुम्हीच पाहून घ्या. मी मुलांना मुद्दामच सांगत नाहीं. जेथें गांधींनीं स्वतः सांगून परिणाम होत नाहीं तेथें मी सांगून होईल ही समजूत चुकीची आहे. आम्हीं बोलावें आणि मुलांनीं निमूट ऐकावें अशी स्थिति असती तर वेगळी गोष्ट होती. पण मुलांचा स्वभाव कसा असतो तें मला माहित आहे. कित्येक मुलें तर आमची केवळ परीक्षा घ्यावयाला येतात. मग आम्हीं तरी सावधगिरीनें कां बोलूं नये? माझ्या कामगिरीची व टिळकांची कित्येक तुलना करतात. टिळक असते तर यापेक्षां अर्थातच जास्त काम झालें असतें हें उघड आहे. टिळकांपेक्षां माझें काम कमी, असें कोणास वाटल्यास त्यांत वावगें तरी काय आहे? बरोबरच आहे. मी जितका टिळकांपेक्षां लहान तितकें माझें काम कमी. हा तरी हिशेबच आहे. पण माझी खात्री आहे कीं, स्वतः टिळकांनीं सांगूनहि तुम्हीं कॉलेज सोडलें नसतें. ते स्वतः याबद्दल काय म्हणत तें मला माहित आहे. रेमार्केटांत एकदां लोकांनीं त्यांचा सन्मान केला, तेव्हां त्यांनीं लोकांना स्वच्छ बजावलें कीं, आतां माळा घालाल पण नंतर कामाला मात्र कोणीहि राहणार नाहीं!

मला रडतराव घोड्यावर बसवावयास नको आहेत. डेक्कन कॉलेजचे विद्यार्थ्यांना तर स्वतः कांहीं न करतां दुसऱ्याची परीक्षा पहावयास हवी. पण कोण कसा काय आहे हें मी जाणून आहें. मीं या डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांना सांगितलें कीं, खुशाल तुम्ही सर्व सरसकट कॉलेज सोडा पाहूं या, पुढच्या टर्मच्या सुरवातीला तुम्हांपैकीं कॉलेजांत कोणींहि हजर

राहूं नये. पण त्यांच्या हातून हें झालें नाहीं. चैन करून चटावलेल्या या विद्यार्थ्यांना हें अशक्य होतें हें मी जाणून आहें. पण हेच विद्यार्थी कॉलेज स्वतः न सोडतां फुकट आमची परीक्षा मात्र पहावयाला येणार! मग आम्हीं तरी सावधगिरीनें कां बोलूं नये? सर्व विद्यार्थ्यांस सरसकट कॉलेज सोडा म्हणून सांगणें माझ्या हातून होणार नाहीं. विद्यार्थ्यांच्याबद्दल माझ्या मनांत एक प्रकारचें प्रेम आहे. त्यामुळें माझ्यानें त्यांना कॉलेज सोडा असें सांगवत नाहीं! विवेचकबुद्धि अंगिकारूनच येयें वागलें पाहिजे. आज माझेकडे दोन विद्यार्थी आले; तेव्हां अगोदर मीं त्यांची परिस्थिति विचारली व नंतर एकाला कॉलेज सोड व दुसऱ्यास कॉलेज सोडूं नको असें सांगितलें. कित्येक म्हणतात कीं, आम्ही 'व्हिलेज् प्रापोगँडा' करूं; पण कांहीं नाहीं म्हटलें तरी त्यांची तरी काहीं सोय केली पाहिजेच ना? परवां मीं बमनजी शेटजींकडे जाऊन याकरितांच भीक मागितली व दहा हजार रुपये आणले; पण असे पैसे मिळवून किती पुरणार? एक हजार रुपयांत फार तर तीन विद्यार्थ्यांची सोय करतां येईल. म्हणूनच खेडोंपाडीं चळवळ करण्यास मुलें पाठविण्याची कल्पना अव्यवहार्य आहे. म्हणून मी तुम्हांला स्पष्ट सांगतों कीं, विद्यार्थ्यांची शक्य तितकी सोय करण्याचा प्रयत्न आम्ही जिवापाड करूं; पण सर्वांची सोय आमचेकडून होईलच असें मी तुम्हांस सांगत नाहीं. कॉलेज सोडणारानें तें आपल्या मगदुराबर सोडावें; यापेक्षां त्यानें मुळींच सोडलें नाहीं तरी मला त्याची फिकीर नाहीं. तुम्हांस त्यागाचा सरसकट उपदेश करण्याची पात्रता माझ्यांत नाहीं. फक्त, ज्यांनीं सर्वस्वाचा त्याग केला आहे त्या गांधीनाच तेवढी आहे. मी स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेविलें नाहीं तोंपर्यंत सर्वांना सरसकट त्यागाचा उपदेश करण्यास मी अपात्र आहें, असें वाटल्यास म्हणा.

आजच्या व्याख्यात्यांनीं एक गोष्ट अगदीं खरी सांगितली. ती म्हणजे स्वावलंबीपणा. हा सर्व स्वार्थत्यागाचा मामला आहे. ज्याला स्वार्थत्याग करावयाचा त्यानें तो स्वतःच्या हिंमतीवर करावा; परिणामाचे धनी आपण या बुद्धीनें करावा. अशा बाबतींत कोणीं कोणास सल्ला देऊं नये. कोणास कोणीं काय करूं म्हणून विचारण्यास जाऊं नये. स्वार्थत्याग हा ज्याचा त्यानें करावयाचा असतो. जें करावयाचें तें ज्याचें त्यानें आपल्या जबाबदारीवर,

आजूबाजूस न पाहतां, पुढील परिणामाबद्दल कुरकूर न करतां, आणि तें सुद्धां स्वतःला वाटलें म्हणून करावें. लोकांनीं सांगितला म्हणून स्वार्थत्याग करूं नये. अशा रीतीनें स्वार्थत्याग करणाऱ्याला एकान्तांत असतांना स्वतःच्या समाधानाचें तरी सुख मिळेल. स्वतःच्या मनाचें बक्षीस हेंच खरें बक्षीस होय. कोणाच्या सांगण्याची तुम्ही वाट कां पाहतां ? माझ्या तोंडून माझ्या हिंमतीपेक्षां जास्त उपदेश तुम्हांला मिळणें शक्य नाहीं. उलट मी तुम्हांला स्पार्टामधील एका शिपायाची गोष्ट सांगतों. इतर शिपायांबरोबर याहि स्पार्टन शिपायाला तलवार देण्यांत आली. पण याची तलवार इतरांपेक्षां वीतभर कमी होती म्हणून हा कुरकुरूं लागतांच त्याच्या कमांडरनें त्याला सांगितलें, "अरे, तुझी तलवार एक वीतभर कमी आहे, तर तूं वीतभर पाऊल पुढें टाक !" तसेंच मीहि तुम्हांला सांगतों कीं, माझा उपदेश अपेक्षेपेक्षां वीतभर कमी पडला तर तुम्ही पाऊल एक वीत पुढे टाका म्हणजे झालें !

स्वार्थत्याग करणाराला उपदेशाचींच जरूर आहे असें नाहीं. आणि खरा स्वार्थत्याग करणारा कोणाच्या उपदेशाची वाटहि पहात नाहीं. पण ज्यांना कांहींच करावयाचें नसतें ते दुसऱ्याला विचारतात ! कलकत्त्याच्या काँग्रेसच्या ठरावांत विशिष्ट वर्गाचाच निर्देश असल्यामुळें इतरांना आधार घेण्यास सवड तरी होती. पण सर्व वर्गांनीं स्वार्थत्याग करण्याबद्दलचें कलम घालून नागपूरच्या काँग्रेसने त्यांचा हा आधार काढून घेतला आहे. नागपुरास गांधींशीं भांडून ही दुरुस्ती मीं मुद्दाम करून घेतली. या ठरावानें सर्व वर्गांना स्वार्थ-त्याग करण्यास आव्हान केलें आहे. दुसऱ्याकडे पहावयाची आतां सोय नाहीं.

ज्यांना स्वतः कांहींच करावयाचें नसतें ते दुसऱ्यास विचारण्यास जातात. पण दुसऱ्याचा सल्ला विचारणें किंवा आधीं इतर वर्ग काय काय करतात याची रिकामटेकडी चौकशी करणें हा नुसता चावटपणा आहे. आगींत उडी घालावयाची ती दुसऱ्याला बरोबर घेऊन घालूं म्हणण्यांत काय हंशील! दुसरीकडे पाहील तो स्वार्थत्याग करण्यास नालायक. महाभारतांतील या-विषयींची गोष्ट प्रसिद्ध आहे. द्रोणांनीं सर्व शिष्यांची धनुर्विद्येंत परीक्षा घेण्याचें ठरविलें. प्रथम युधिष्ठिर धनुष्यबाण घेऊन पुढें आला. द्रोणांनीं त्याला विचारिलें, तुला काय काय दिसतें ? युधिष्ठिरानें उत्तर केलें मला येथें बसलेले तुम्ही सर्वजण दिसतां. द्रोणानें सांगितलें, तूं नालायक आहेस;

धनुष्यबाण खालीं ठेव. याप्रमाणेंच इतरांचीहि काय काय ती परीक्षा झाली. अर्जुनाला द्रोणांनीं विचारिलें, तुला काय दिसतें ? अर्जुनानें उत्तर केलें, 'मला फक्त माझ्या बाणाचें टोंक आणि झाडावरील पक्ष्याचें डोकें यांखेरीज दुसरें कांहींहि दिसत नाहीं.' अर्थात् या परीक्षेस एकटा अर्जुनच उतरला. स्वार्थत्यागी माणसानेंहि असेंच करावें. स्वार्थत्यागाशिवाय दुसरें कांहीं एक मनांत आणलें नाहीं. त्याचा स्वार्थत्याग खरा !

यासंबंधानें मी तुम्हाला ग्रीक इतिहासांतील आणखी दुसरी एक गोष्ट सांगतों. एकदां ग्रीसमध्यें एक मोठा धरणीकंप होऊन शहराच्या मध्यभागींच एक मोठा खोल खड्डा पडला. इतका कीं, वरून पाहिलें तर त्याच्या तळापर्यंत नजरहि पोंचत नसे. अर्थातच हा अनर्थ ईश्वराचा कोप झाला म्हणूनच उद्भवला असें लोकांनीं मानलें. आतां परमेश्वराच्या कोपाची शान्ति ही केलीच पाहिजे. ती कशानें होईल म्हणून सध्यांच्या काळीं पुढाऱ्याचा सल्ला घेतात त्याप्रमाणें त्या वेळीं देवाला कौल मागितला. तेव्हां अशी आकाशवाणी झाली कीं, आपणाला जें प्रिय त्याचा या वेळीं कोणीं बळी दिला तर देवतांचा हा कोप शांत होईल व खड्डा भरून येईल. त्याप्रमाणें जो तो विचारपूस करूं लागला. नतर सर्व लोक त्या खड्ड्याजवळ जमले. त्यांत कोणी व्यापारी होते. त्यांपैकीं एक शेठजी विचार करूं लागले कीं, आपण काय बरें केलें असतां हा खड्डा भरून येईल ? त्याचा मुनीम जवळच होता तो म्हणाला, होय, आपल्या येथे असलेली ती धर्मादायाची पेटी नव्हे का ? त्यांत बराच धर्मादायाचा पैसा सांचून राहिला असेल. फार तर त्या रकमेचें व्याज काढून घेऊन आपण ही पेटी आंत टाकून देऊं म्हणजे कदाचित् हा खड्डा भरून येईल. शेठजींनाहि हा सल्ला पसंत पडली व त्यांनीं मुनीमाकडून पेटी आंत टाकवली. पण खड्डा जशाचा तसाच कायम राहिला.

कांठावरच्या गर्दीत कांहीं स्त्रियाहि जमल्या होत्या. एकीनें विचार केला आपण कोठली प्रिय वस्तु टाकली तर हा खड्डा भरून येईल बरें ? तिची दुसरी मैत्रीण शेजारीच होती. ती म्हणाली, स्त्रियांना अत्यंत प्रिय वस्तु म्हणजे त्यांचें मुखकमल. पण मुखकमलच कसें टाकून देणार ? तेव्हां पहिलीनें विचार केला, मुखकमलाखालोखाल स्त्रियांना त्यांचे कुरळ कुंतल

फार आवडतात. तेव्हां बाजूकडेचा एक कुंतल तोडून टाकून दिला म्हणजे झालें. हा विचार पटून तिनें आपला एक केंस खड्डयात टाकला! पण खड्डा कायमच राहिला!

हा प्रकार होत आहे तों त्यांत एक वर्तमानपत्राचे संपादक होते त्यांसहि त्यावेळीं स्वार्थत्याग करण्याची बुद्धि झाली. पण वर्तमानपत्राचा संपादक मॅनेजराचा सल्ला घेतल्याशिवाय काय करणार? संपादक म्हणाले, काढा, तुमच्या खतावण्या. त्यांतील जाहिरातींचीं बिलें येतच नाहींत. पैसे येतील तेव्हां या बिलांच्या कागदांना किंमत. तेव्हां त्या खतावण्या व हीं बिलें हींच स्वार्थत्याग म्हणून खड्डयांत सोडून द्यावीं. मॅनेजर म्हणाले, अहो! खतावण्या टाकून मी वर्तमानपत्र काय चालवूं? त्यापेक्षा फुकट रद्दी म्हणून ते सहाशें अंकांचे बांधलेले गठ्ठे आहेत ते कां टाकाना? संपादक म्हणाले, अंकाची किंमत एक एक आणा आहे; म्हणजे हे अंक टाकण्यांत आपले सहाशें आणे गेलेच कीं! तेव्हां उभयतांच्या सल्ल्यानें हाच विचार कायम होऊन गठ्ठे खड्डयांत टाकण्यांत आले. पण खड्डा कांहीं भरून आला नाहीं!

सदर संपादकाचे एक स्नेही वकील शेजारींच होते. त्यांनीं गठ्ठे टाकलेले पाहून संपादकास विचारिलें. संपादक म्हणजे सर्वज्ञ सल्लागार! त्यांनी आपला अभिप्राय दिला, की वकीलवर्गानें आपल्या प्रिय वस्तूचा त्याग केल्याशिवाय हें राष्ट्रीय संकट टळणार नाहीं. तेव्हां खड्डा भरून येण्यास वकील वर्गानेंच पुढें झालें पाहिजे. वकिलानें आपल्या कारकुनास विचारलें. कारकून स्वतः वकिलालाच काय सल्ला देणार? वकिली सोडण्याची आजची कल्पना त्याला त्यावेळीं आठवली नाहीं. तेव्हां वकिलालाच कल्पना सुचून अशीलाचे जे कांहीं अमानत पैसे त्याजकडे होते त्याची एक लहानशी पिशवी त्यानें खड्डयांत टाकून दिली. पण खड्डा भरून आला नाहीं!

याप्रमाणें तेथें जे जे वर्ग हजर होते त्यांपैकीं सर्वांनीं आपापल्या बुद्धीनुसार स्वतःचें म्हणून कांहीं कांहीं त्या खड्डयांत टाकून पाहिलें. परंतु खड्डा जशाचा तसाच! इतकें होत आहे तों लांबून एक घोडेस्वार भरधांव तेथें आला; व आजूबाजूस न पाहतां त्यानें निःशंकपणानें घोड्यासकट त्या खड्ड्यांत उडी घेतली! त्याबरोबर चमत्कार होऊन खड्डा एकदम भरून गेला

या गोष्टीचें तात्पर्य आपल्या लक्षांत आलेंच असेल. स्वार्थत्याग करावयाचा असेल त्यानें कोणाचा सल्ला विचारण्यास न जातां स्वतःच्या स्फूर्तीनें तो करावा. म्हणून, जो कोणी आपल्या स्वतंत्र बुद्धीनें व स्वयंस्फूर्तीनें या वेळीं स्वार्थत्याग करील, त्याला मी डोक्यावर घेऊन नाचेन असें मीं पूर्वी सार्वजनिक सभेंत म्हटलें होतें तें माझें म्हणणें आजहि कायम आहे. दुसऱ्यानें रडतराव घोड्यावर बसवण्यांत अर्थ नाहीं. माझ्याकडे मी दहा दिवसांनीं कॉलेज सोडूं का, वगैरे विचारण्यास येतात त्यांना मी पूर्ण ओळखतों. मग मी काय म्हणून त्यांना सांगूं कीं तूं आतांच सोड म्हणून. आम्ही तुमची सोय करूं या भावनेनें तुम्ही सोडीत असाल तर मी तुम्हांस आतांच सांगतों कीं, तुमची सोय करण्याबद्दल मी जबाबदार नाहीं. कायमचा पत्कर कोण कोणाचा घेऊं शकेल? मला स्वतः गांधींची गोष्ट माहीत आहे. गांधींच्याकडे एक वकील गेले व म्हणाले,मीं आपली वकिली सोडली.गांधी म्हणाले फार उत्तम आहे. पण नंतर ते वकील माझी पुढची तजवीज काय असें विचारूं लागतांच, गांधी त्याला म्हणाले, बाबारे! असें असेल, तर तूं आपली वकिली सोडूं नको. मीहि तुम्हांला सांगतों, कीं कॉलेज काढल्यानंतरच मीं तुम्हांस कॉलेज सोडावयास सांगितलें. शाळांतल्या मुलांचा पत्कर मीं घेतला नाहीं. शक्य त्या मुलांची सोय आम्हीं केली व आमच्या शक्त्यनुसार आणखीहि करूं. आम्हालाहि थोडेंबहुत ब्रीद असेलच. त्याला आम्ही जागूं.

सरतेशेवटीं मला इतकेंच सांगावयाचें कीं, हा सर्व स्वार्थत्यागाचा मामला आहे. म्हणून ज्याला कोणाला स्वार्थत्याग करावयाचा असेल त्यानें तो स्वयंस्फूर्तीनें व आपल्या जबाबदारीवर करावा. अशा बाबतींत कोणीं कोणाचा सल्ला घेऊं नये, कोणीं देऊं नये!

प्रो० घारपुरे व 'राष्ट्रीय शिक्षण'

[बुधवार तारीख १७ ऑगस्ट १९२२ रोजीं द. रा. घारपुरे यांचें "राष्ट्रीय शिक्षण" या विषयावर शिवाजी मंदिरांत व्याख्यान झालें. अध्यक्षस्थानीं न. चिं. केळकर हे होते.]

प्रथमतः घारपुरे यांनीं राष्ट्रीय सभेच्या ठरावांची कशी प्रगति होत गेली वगैरे सांगून सरतेशेवटीं ते राष्ट्रीय शिक्षणाच्या सद्यःस्थितीवर आले. ती सांगतांना नुकत्याच होऊन गेलेल्या कायदेभंगकमिटीपुढील साक्षींचा त्यांनीं आधार घेतला. व केळकर, लवाटे, भोपटकर, जम्नादास मेहेता व लोहोकरे या सर्वांनीं विरुद्ध स्टेटमेंट लिहिल्यानें घाण केली, एकट्या आपण मात्र आपल्या स्टेटमेंटमध्यें राष्ट्रीय शिक्षणाबाबत यथायोग्य लिहिलें असें त्यांनीं प्रौढीनें बोलून दाखविलें! पण याहि पलीकडे जाऊन व शिष्टाचाराची योग्य मर्यादा ओलांडून त्यांनीं वरील मंडळींवर इतकी कुत्सित व खोडसाळपणाची व्यक्तिविषयक टीका केली कीं, शब्दावडंबर व मुत्सद्दीपणा यांच्या पांघरुणाखालीं केवळ आपला नादानपणा झांकण्याचा प्रयत्न महाराष्ट्रीय पुढारी करीत आहेत असें लोकांस भासविण्याचा त्यानीं प्रयत्न केला. स्वतःची पायरी सोडून इतक्या निःशंक बेमुर्वतखोरपणानें जाहीर सभेंत घारपुरे यांनीं तोंड चालविल्यामुळें साहजिकच येथें कांहींतरी पाणी खरोखरीच मुरत असावें असा आभास त्यांनीं निर्माण केला. यामुळें उत्तर देऊन गैरसमज दूर करणेंहि अपरिहार्य झालें. परंतु या दिवशीं व्याख्यानास बराच उशीर झाल्यामुळें सभा तहकूब होऊन दुसऱ्या दिवसावर ढकलण्यांत आली.

घारपुरे यांनीं अशा रीतीनें लोकमत चाळविल्यामुळें दुसऱ्या दिवशीं व्याख्यानास जास्त गर्दी झाली. प्रथमतः गोखले यांनीं भाषण केल्यावर लवाटे यांनीं आपला खुलासा केला व सांगितलें कीं, जे शब्द आपण लिहिले असें घारपुरे यांचें म्हणणें आहे तसले शब्द आपण कधींहि लिहिले किंवा बोललों नाहीं. या बाबतींत बाजू समूळ उलटलेली पाहातांच "माझा तसें म्हणण्याचा उद्देश नव्हता. मी आपले शब्द परत घेतों" असें म्हणून घारपुरे यांनीं आपणांस सांवरून घेतलें.

वास्तविक या व्याख्यानास अध्यक्ष भोपटकरच व्हावयाचे; पण त्यांस

बाहेरगांवीं जावयाचें असल्याकारणानें ते व्याख्यानाच्या दिवशीं हजर राहूं शकले नाहींत. पण दुसरे दिवशीं घारपुरे यांनीं घेतलेले आक्षेप त्यांच्या कानीं गेले तेव्हां स्वतःबद्दल सर्व खुलासा त्यांनीं सभेंत येऊन केला.

न. वि. गाडगीळ यांनीं घारपुरे यांचा थोडासा पूर्वेतिहास सांगितला. व घारपुरे स्वार्थत्याग करून टिळकमहाविद्यालयांत आले असें म्हणतांना यापूर्वी किती प्रसंगीं न्यू पूना कॉलेजचा राजीनामा पाठविला होता असें त्यांस विचारलें? पण तुम्ही केवळ 'रडवेपणानें' इकडे आलांत असा व्यक्तिविषयक शब्द त्यांनीं योजल्यामुळें लोकमताची बाजू गाडगीळ यांजवर उलटली व त्यांस खालीं बसावें लागलें.

यानंतर शंकरराव देव आले व म्हणाले, "दारूच्या गुत्त्यावर पिकेटिंग करणें तुम्ही योग्य मानतां मग कॉलेजपुढें जाऊन विद्यार्थ्यांपुढें पिकेटिंग करण्यास हरकत कोणती? शाळा व कॉलेजें हे झाले तरी दारूचे गुत्तेच आहेत! अशी सरसकट असहकारितेची चळवळ हीच योग्य चळवळ होय. टिळकांच्या चळवळीमुळें जशी पूर्वीच्या मवाळांची चळवळ फिक्की पडली तशीच आजच्या चळवळीमुळें राष्ट्रीय पक्षाची स्थिति झाली आहे." कित्येकांस हा वाग्बाण सहन न झाल्यामुळें त्यांनीं देवांस 'शब्द परत घ्या' असें आव्हान केलें व सभेंत गोंगाट केला. परंतु "त्यांना संपेपर्यंत बोलूं द्या" असें म्हणून केळकरांनीं त्यांचें भाषण होऊं दिलें.

तिसऱ्या दिवशीं लोहोकरे यांनीं भाषण केलें. त्यांत त्यांनीं व्यक्तिविषयक भांडणांनीं येथील राष्ट्रीय शाळेंत कशी दुफळी झाली व सरतेशेवटीं बोर्डाची सभा बोलावल्यावर त्यांनीं घारपुरे व साने यांचे हवालीं त्यांच्या खासगी जबाबदारीवर शाळा कशी स्वाधीन केली वगैरे सांगितलें. राष्ट्रीय शिक्षण व निमसरकारी शिक्षण यांची तुलना फार तर घरचें अन्न व खाणावळींतील अन्न अशी करावी; परंतु त्यांस दारूचे गुत्ते म्हणणें ही भाषा आपणास पटत नाहीं असें तें म्हणाले. टिळक-राष्ट्रीय पाठशाळेंतील एकदोन शिक्षकांचींहि भाषणें झालीं. त्यांपैकीं एका शिक्षकानें 'असा अविचार करूं नका, असहकारितेमध्यें इतके भडकून जाऊं नका' असा इशारा दिला. व हरोलीकर यांनीं अरेराव अधिकारी जसे बोलतात त्याप्रमाणें येथील राष्ट्रीय शाळेच्या मार्फत अंतर्व्यवस्थेचा खुलासा सांगितला.

टिळकमहाविद्यालयांतील प्रो० वि. प्र. लिमये यांनींहि भाषण केलें. त्यांच्या भाषणाचा रोख असा कीं, घारपुरे यांची व्यक्तिविषयक टीका ही अयोग्य झाली. संस्था चालविण्यास त्यांतील माणसांनीं एकोप्यानेंच वागलें पाहिजे.

यानंतरहि अनेकांचीं भाषणें होऊन लोकमत फार प्रक्षुब्ध झालें. व लोकमताच्या न्यायबुद्धीचा तराजू अत्यंत सूक्ष्म व चंचल झाला. अमुक गृहस्थ आज तुरुंगांत आहेत त्यांच्याबद्दल या वादांत काय म्हणून बोलतां, अमक्याला बोलूं दिलें नाहीं त्याला बोलूं द्या, अमक्या या बाबतींत तुम्हीं अन्याय केला; वगैरे प्रश्न मधून मधून प्रेक्षकांमधून घारपुऱ्यांवर येऊं लागले व दरवेळेस सभेंत दंगल माजून वातावरण अस्थिर होऊन जात असे.

इतक्यांत अवचित जमनादास मेहेता हेहि मुंबईहून आल्याकारणानें सभेंत हजर झाले. पुण्यांत इतक्या थरापर्यंत या सभेचा प्रकार गेला असेल याची त्यांस कल्पनाहि नव्हती ! Above all the places in India Poona is a land of Freedom— "हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि ठिकाणापेक्षां लोकशाहीचा अवतार पुण्याइतका कोठेंहि पहावयास सांपडत नाहीं !" असें पुण्याचें प्रथम गौरवपूर्वक वर्णन करून पैसा व पदवी हे दोन मोठे प्रश्न राष्ट्रीय-शिक्षण देणारास प्रथमतः सोडवावे लागतात; किंबहुना हीच मोठी अडचण राष्ट्रीय शिक्षणाच्या मार्गांत आहे, असें त्यांनीं सांगितलें व हेंच आपल्या स्टेटमेंटमध्यें आपण सांगितलें असा खुलासा केला.

सरतेशेवटीं अध्यक्ष या नात्याने केळकर यांजवर भाषण करण्याची पाळी आली. व केळकर आतां आपला खुलासा-समारोप कसा काय करतात याविषयीं प्रेक्षकांचीं मनें अत्यंत उत्कंठित व उतावीळ झालीं. परंतु यावेळीं रात्रीचे नऊ वाजावयास आले होते. म्हणून मला सावकाश व व्यवस्थित रीतीनें बोलण्यास तीन तास तरी पाहिजेत असें सांगून केळकर यांनीं मंगळवारचा दिवस मुद्दाम मागून घेतला.

तीनचार दिवस चाललेल्या या जाहीर भांडणाचा अनिष्ट परिणाम टिळकमहाविद्यालयांतील मुलांचे मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. व तेथें एकदोन सभाहि झाल्या. पण बाहेरील वादांत आपण कोणताच भाग घेऊं नये किंवा कोणाबद्दलच विश्वासनिदर्शक किंवा निंदाव्यंजक ठराव

करूं नये, आपण तटस्थ रहावें असेंच बहुमतानें ठरल्यामुळें, केळकर यांनीं विद्यार्थ्यांच्या कोणत्याच मताचा उल्लेख करूं नये असें त्यांस मंगळवारच्या सभेच्या पूर्वी कळविण्यांत आलें.

रविवार व सोमवारचा दिवस मध्यें गेल्यानें लोकांची उत्कंठा अधिकच वाढली व मंगळवारीं हें व्याख्यान केसरींत जाहीर केलें नसतांहि संध्याकाळीं सभेस अतोनात गर्दी जमली. पांच हजारांवर श्रोतृसमुदाय जमला होता. बरोबर सहा वाजतां केळकर यांनीं आपल्या भाषणास सुरवात केली. केळकर म्हणालेः—

"घारपुरे यांनीं आपल्या व्याख्यानांतून जे आक्षेप आमच्यावर घेतले आहेत त्यांचें स्पष्टीकरण आज मी करणार आहें. तें व्यवस्थित रीतीनें करतां यावें म्हणून एक दिवस मीं आपणाकडून स्वतंत्र मागून घेतला. हें स्पष्टीकरण करितांना शांतपणा न सोडण्याचा मी आपणांकडून शक्य तितका प्रयत्न करीन. परंतु क्वचित् माझे हातून तसें न झालें तर त्याला माझा नाइलाज आहे.

घारपुरे यांनीं राष्ट्रीय शिक्षण हा विषय आपल्या व्याख्यानास घेऊन त्यांत राष्ट्रीय सभेच्या ठरावांतून राष्ट्रीय शिक्षणाच्या विषयाची प्रगति कशी होत गेली तें सांगितलें. यानंतर 'राष्ट्रीय शिक्षण कसें वाढवावें' वगैरे विधायक गोष्टी ते सांगतील असें व्याख्यानाचा बराच भाग होईपर्यंत मला वाटलें. पण यानंतर मात्र, मांजराच्या नखांप्रमाणें लपवून ठेवलेलीं आपलीं नखें घारपुरे यांनीं एकदम बाहेर काढलीं व ज्याला त्याला ते बोचकारूं लागले! प्रत्युत्तराच्या वेळीं तर त्यांच्या बोचकाऱ्यांतून श्रोतृवृंदहि सुटला नाहीं!

या बाबतींत थोडें असें झालें, कीं घारपुऱ्यांची इरवली होती एक टांचणी; म्हणून हातांत दिवा घेऊन ती शोधण्याकरितां घारपुरे कापसाच्या बखारींत गेले. कापसावर अग्नि पडून त्यानें पेट घेतला व आग लागली. साहजिकच लोक जमले. तें पाहून घारपुरे म्हणतात, "छेः हो! मी अगदीं साधासुधा प्राणी. मी फक्त माझी टांचणी शोधली. पण ही आग कशी भडकली! बरोबर! घारपुऱ्यांनीं फक्त आपली टांचणी शोधली; इकडे आग कशी भडकली हें त्यांना माहित नाहीं!

राष्ट्रीय शिक्षणाची खरीखुरी कळकळ घारपुरे यांना असती तर हा घोंटाळा त्यांनीं माजवावयास नको होता. यापेक्षां चांगलें व विचारपरिप्लुत व्याख्यान त्यांना देतां आलें असतें. पण मूळ बुद्धीच तसें करण्याची नव्हती. आमच्या 'स्टेटमेंट'नें सगळी घाण झाली असें घारपुऱ्यांनीं सभेंत उभें राहून सांगितलें. पण त्यांना मी जाहीर रीतीनें सांगतों कीं, राष्ट्रीय शिक्षण आम्हीं स्टेटमेंट विरुद्ध लिहिलें म्हणून बुडत नाहीं. आणि तें बुडणारच असलें तर घारपुऱ्याच्या कळकळीनें तें तरणारहि नाहीं.राष्ट्रीयशिक्षण हें स्वतःच्या पायावर उभें आहे. स्वतःच्या गुणानींच तें बुडेल किंवा तरेल. तें केवळ लोकांच्या मदतीवर अवलंबून आहे. लोकांकडे मदत मागण्याचा हेतु या व्याख्यानात होता असेंहि नाहीं. केवळ आम्हांस नाव ठेवण्यासाठींच त्यांनीं व्याख्यान दिलें हेंच शेवटीं ठरलें. घारपुरे वैतागानें काहींतरी बोलले असें म्हणावें तर त्यांनीं घेतलेल्या आक्षेपांत सत्याचा लवलेश तरी असावयास पाहिजे होता. पण त्यांनीं घेतलेले आक्षेप घडघडीत खोटे आहेत, हें मी क्रमाक्रमानें दाखविणार आहें. व्याख्यान देण्याचा त्याचा हेतु काहींतरी घाण आमच्यावर उडवावी हाच होता. परंतु त्यानीं घाण केली तरी आम्हांला ती काढणें प्राप्तच आहे. मी तर येथील म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष आहें. घाण काढणें हें माझें कामच आहे. एवढ्याच करिता मीं स्वतंत्र दिवस मागून घेतला आहे.

स्वतःबद्दल बोलण्यापूर्वी प्रथम मला लवाटे, भोपटकर व लोहोकरे यांचे-संबंधानें दोन शब्द सांगितले पाहिजेत. घारपुऱ्यांनीं याचेवरहि शिंतोडे उडविले आहेत. पैकीं डॉ० लोहोकरे हे येथील राष्ट्रीय शाळेच्या बोर्डावर होते. पण जेव्हां शाळा अगदींच डबघाईस आली त्यावेळीं त्यांनीं बोर्डाची सभा बोलावली व बोर्डानें पुढील व्यवस्था लावली. रा० भोपटकरांसंबंधींचे आक्षेप भोपटकरांनीं खोडून काढलेच आहेत. पण त्याच्यावर घाण उडविताना भोपटकर यांनीं यापूर्वी राष्ट्रीय शिक्षणासंबंधीं काय श्रम घेतले आहेत, किती झीज सोसली आहे याचा विचार घारपुरे यानीं करावयास पाहिजे होता. घारपुरे यांना जगात अजून पुष्कळ अनुभव यावयाचा आहे ! भोपटकराइतकी मजल गांठण्यास घारपुरे यास अद्याप बराच अवकाश आहे. घारपुरे यांना राष्ट्रीय शिक्षणासंबंधानें स्फूर्ति आज आली

आहे ! पण सर्वांना तीच स्फूर्ति किंवा उमेद एकाच वेळीं यावी हें कसें होणार ? मला स्फूर्ति आली त्याच वेळीं ती इतरांनाहि कां आली नाहीं हें विचारणें अगदीं गैरशिस्त आहे. दुसऱ्यांवर आरोप करण्यापूर्वी त्यांचें पूर्वचरित्र काय आहे याचा थोडा तरी विचार घारपुऱ्यांनीं करावयास पाहिजे होता ! भोपटकरांवर घारपुरे इतके चरफडले, कां तर त्यांच्या स्टेटमेंटमध्यें घारपुरे यांच्या मनासारखें वाक्य नाहीं म्हणून ! पण असें करण्याचें घारपुऱ्यांना कांहींच कारण नाहीं. पूर्वी भोपटकरबंधूंनींच पुण्यांत राष्ट्रीय शाळा काढून चालविली होती. व त्या शाळेसंबंधानें टिळक नेहमीं मोठ्या अभिमानाने सांगत असत. लवाटे यांच्यासंबंधानें तर घारपुऱ्यांनीं बोलूं सुद्धां नये. लो० टिळकांच्या चरित्रासंबंधीं कागदपत्र चाळतांना यांच्या शाळेची जाहिरात मीं तीस वर्षांपूर्वीच्या केसरींत पाहिली आहे ! व बोर्डिंगची यातायात तर यांनीं अगदीं परवां परवांपर्यंत चालविली होती, ती काय राष्ट्रीय शिक्षणासंबंधीं त्यांना कळकळ नव्हती म्हणून ? मी घारपुऱ्यांना स्वच्छ सांगतों, अशा माणसांचा पूर्ववृत्तांत विसरणें म्हणजे शुद्ध कृतघ्नपणा आहे ! त्यांना कळकळ नाहीं म्हणण म्हणजे त्यांची व त्यांच्या पूर्वीच्या कृत्यांची बदनामी करणें आहे. आपल्याच अहपणाच्या प्रौढींत मुसंडी मारून पायाखालीं सांपडेल त्याला लाथ व शेजाऱ्याला कोपरखळी मारीत घारपुरे पुढें जात आहेत ! भोपटकर, लवाटे यांनीं शाळा चालविली त्यावेळीं थोडेबहुत पोटाला घेतलें असेल म्हणून त्यांचा निःस्वार्थीपणा फुकट गेला कीं काय ? पण आज घारपुरे देखील टिळकविद्यालयांतून १२५ रु. पगार घेतच आहेत ! दुसऱ्यांना सरसहा असा दोष देऊन कार्यभाग होणार नाहीं; गोड शब्दांनीं सर्वांची सहानुभूति कशी मिळवावी लागते याचा अनुभव घारपुरे यांना अद्याप यावयाचा आहे. एखादें मोठें काम अंगावर घेऊन ते करावयास जातील तेव्हां घारपुरे यांना हा अनुभव येईल.

घारपुरे यांनीं माझी निंदा केली व मला हातांतली टांचणी टोंचण्याचा प्रयत्न केला; पण मी स्वच्छ बजावतों, कीं या त्यांच्या टोंचण्यानें माझें रक्त निघणार नाहीं. किंबहुना मी त्यांना पुरून उरणार आहें. त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, मी त्यांनाच काय पण पुष्कळांना पुरून उरणार आहें. मोठेपणाच्या ताठ्यांत ते बोलले, पण आपण किती मोठे आहों याचें भान त्यांना

रहावयास पाहिजे होतें ! 'केळकरांचा मीं वेळोवेळीं बचाव केला आहे' असें घारपुरे यांनीं बोलून दाखविलें ! केवढा हा अभिमान ? कोण आढ्यतखोरपणा हा ? आज असा काळ आला आहे काय, कीं घारपुरे यांना माझे संरक्षण करावयास लागावें ? मी त्यांना आव्हान करून सांगतों कीं जी काय माझी निंदा करावयाची असेल ती घारपुरे यांनीं खुशाल करून घ्यावी ! त्यांच्या निंदेला कोणी कुत्राहुद्धां विचारणार नाहीं. पण घटकाभर असेंहि समजा, कीं घारपुरे यांनीं माझ्यावर यःकश्चित् एकादा उपकार केला असला; तरी कोणी कोणावर केलेला उपकार जाहीर सभेंत सांगणें—मोठ्या बढाईनें सांगणें—हा कोठल्या सभ्यतेचा प्रकार ? पण घारपुरे यांचे अंगीं मोठेपणाचें वारें शिरलें आहे. म्हणून, मला त्यांनीं 'डिफेंड' केलें असें जाहीर सभेंत सांगण्याचें धाडस ते करतात !

बरें, माझ्यासंबंधानें इतके दोष घारपुरे यांनीं सांगितले, पण माझ्याबद्दल जातांजातां चांगुलपणाचा एक शब्द तरी त्यांनीं सांगितला काय ? एकाद्याचे दोषच दाखवावयाचे असले तरी ते नुसते तसे दाखवून भागत नाहीं ! जमेच्या बाजूस एकादा तरी गुण दाखवावा लागतो. दोष देतांना देखील प्रथम कांहीं गुण जमेस धरून त्या गुणाच्या बैठकीवर जर दोष मांडून दाखविले तर तो मनुष्य देखील स्वतः निरुत्तर होइल. स्वतः घारपुरे यांच्या दृष्टीनेंहि मी असें म्हणतों कीं, मला दोष देण्यापूर्वी माझ्याबद्दल एक स्तुतिवाचक शब्द घारपुरे बोलते तरी त्यांच्या दृष्टीनें त्यांनीं माझें काम अधिक अवघड करून ठेविलें असतें. पण घारपुरे यांना न्यायबुद्धीच नाहीं, त्यांना फक्त माझे दोषच दाखवावयाचे होते ! मजकडूनहि कांहीं अल्पस्वल्प देशसेवा झाली असेल; नाहीं असें नाहीं. पण स्वाभिमानानें बडेजाव करून यंव केलें त्यंव केलें, असें स्वतःच सांगणें बरें झालें असतें काय ? आम्हीं जर सत्यस्थिति सांगितली तर तें स्मशानगीत ठरतें आणि यांनीं केलेली आत्मस्तुति ही अभिमानाचीं मंगळाष्टकें होतात ! आम्हीं जर कांहीं गोष्टी विनयानें सांगितल्या तर जग कांहीं खास मरत नाहीं व यांनाहि स्मशानगीतें गाण्याची पाळी खास येत नाहीं हें निश्चित समजा. आतां मी आपणाला माझें सी. डी. कमिटीपुढील स्टेटमेंट वाचून दाखवितों. यांत कोठें स्मशानगीतें आहेत हें आपणच पहा.

माझ्या स्टेटमेंटसंबंधीं सांगत असतांना घारपुरे असे कांहीं विलक्षण हंसले कीं, त्या हंसण्यांतच साऱ्या निंदेचें सार होतें. आपल्याला कदाचित् तें आठवत नसेल; पण मी तें विसरणार नाहीं. मला प्रत्यक्ष तोंडावर कोणीं शिव्या दिल्या तरी मी त्या सहन करीन; पण असें कोणीं मला कुचेष्टेनें हास्यास्पद केलें किंवा मला हास्यास्पद करण्याच्या हेतूनें अर्धा ओठ वांकडा झाला तरी मी तें जन्मभर विसरणार नाहीं! माझें स्टेटमेंट अर्थ-विहीन आहे असें घारपुरे म्हणतात पण ज्यांना माझें लिहिणें व बोलणें माहीत आहे त्यांनींच हें ठरवावें. सी. डी. कमिटीपुढील साक्षींत मीं निरर्थक शब्द घातले हें म्हणणें अज्ञानाचें द्योतक आहे. माझी साक्ष सर्व हिंदुस्थानभर प्रसिद्ध झाली आहे. व चौकशी कमिटी येथें आली असतां तिनें माझी चार पांच तास कसून तपासणी केली. असें असतां स्टेटमेंट-मध्यें निरर्थक शब्द मी कसे घालीन ?

घारपुरे यांचा दुसरा मोठा आक्षेप हा कीं, कमिटीपुढील साक्षींत मीं कौन्सिलच्या सदराखालींच राष्ट्रीय शिक्षणाची मोट बांधून टाकली आहे. व कौन्सिलवर भर देऊन राष्ट्रीय शिक्षण पाठीमागें टाकलें आहे. पण हें म्हणणें खोटें आहे. आपण माझें स्टेटमेंट काढून पहा. त्यांत पुढें प्रश्नावलींत केवळ 'राष्ट्रीय शिक्षण' या विषयाचें मीं स्वतंत्र हेडिंग केलें आहे. घारपुरे ही गोष्ट विसरले असें दिसतें. यंदां गतवर्षीपेक्षां राष्ट्रीय शिक्षणाची पिछेहाट झाली आहे येवढेंच माझें विधान त्यांनीं तुम्हांला वाचून दाखविलें. पण याच्याच पुढें जाऊन स्टेटमेंटमध्यें ते पहाते तर त्यांना आणखीहि कांहीं दिसलें असतें. वरील वाक्याच्याच पुढे मीं असेंहि लिहिलें आहे कीं, " अशी स्थिति असली तरी दिवसेंदिवस युनिव्हर्सिटीच्या डिग्र्या घेण्याकडील लोकांची प्रवृत्ति मावळत चालली आहे. शिवाय सुदैवानें राष्ट्रीय शिक्षणाकडे लोकांचें जास्त लक्ष लागत चाललें आहे." ही वस्तुस्थिति अतिशयोक्तीनें सांगितली नाहीं हाच माझा गुन्हा झाला असें त्यांचें म्हणणें आहे ! माझें स्टेटमेंट जगजाहीर आहे. कोणीहि तें वाचून राष्ट्रीय शिक्षणाचे पाय मीं मागें ओढले आहेत असें दाखवून द्यावें. उगाच कांहींतरी बोललों असतों तर घारपुरे यांना बरें वाटलें असतें. पण मला तसें करतां येत नाहीं.

तसेंच घारपुरे यांनीं 'इन्डिजिनस' या शब्दाबद्दलच वाद घातला. आतां 'इन्डिजिनस' हा शब्द जोरदार कीं, 'नॅशनल्' हा त्यापेक्षां जोरदार हे ठरवावयाचें कसें? मी पूर्वी कोल्हापुरास असतांना हलवाई व मेवेकरी या दोन शब्दांबद्दल भांडणाऱ्या दोघां माणसांची गोष्ट मला आठवते. एक म्हणे 'हलवाई' हा शब्द जोरदार. दुसरा म्हणे छेः 'हलवाई' कसला? मेऽवेऽकरी हाच शब्द जास्त जोरदार! वास्तविक शब्दांत काय आहे? एकाद्या शब्दाला हास्यास्पद करावयाचें झाल्यास तें कोणालाहि करतां येईल. बोलण्याचा सूर बदलला कीं चांगला शब्दसुद्धां वाईट ठरतो. पूर्वीच्या मवाळांनीं नॅशनल या ऐवजीं 'इण्डिपेण्डण्ट' हा शब्द योजला. 'इण्डिजिनस' हा शब्दहि त्याच्याच सारखा आहे असें म्हणून घारपुरे यांनीं आम्हाला मवाळ ठरविण्याचा प्रयत्न केला. पण मी त्यांना इतकेंच सांगतों कीं, लखनौच्या कॉंग्रेसनेहि शिक्षणाबद्दलच्या आपल्या ठरावांत हाच शब्द योजलेला आहे. लखनौच्या कॉंग्रेसला जमलेले लोक तर सर्व मवाळ नव्हते ना? असो. हा शब्द आपण लक्षांत ठेवा. यासंबंधानें व टिळकांच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेबद्दल मला पुढें आपणांला सांगावयाचें आहे.

माझ्या स्टेटमेंटमध्यें राष्ट्रीय शिक्षणाबद्दल मीं स्मशानगीतें गाइलीं आहेत असें घटकाभर म्हटलें तरी घारपुरेपक्षीय इतरांनीं आपापल्या स्टेटमेंटमध्यें काय लिहिलें आहे तें पहा. (येथे श्री० केळकर यांनीं सी. डी. कमिटीपुढील स्टेटमेंट्स्च्या फाइलींतून घारपुरेपक्षीय सर्व मंडळींच्या साक्षीचे उतारे वाचून दाखविले.) घारपुरे सांगतात कीं, राष्ट्रीय शिक्षणाचा उत्कर्ष झाला आहे. पण आतांच मीं त्यांच्या मंडळींची आपणांस यादी वाचून दाखविली. ही सर्व मंडळी सांगतात कीं राष्ट्रीयशिक्षणाची स्थिति सर्वत्र खालावली आहे. भुसावळचे दास्ताने लिहितात तेंच मीं लिहिलें आहे. देवकीनंदन, पी. जी. जोशी, सातारचे सोमण, पंढरपूरचे फणसळकर, तसेंच नगर, कुलाबा, रत्नागिरी, कऱ्हाड येथील सर्व मंडळींहि परिस्थिति खालावली असेंच लिहितात. पण याहिपेक्षां पुढें जाऊन देव व कानिटकर आपल्या साक्षींत काय लिहितात तें पहा. "राष्ट्रीय शिक्षणासबंधीं सर्वत्र निराशा आहे. कॉंग्रेसनें या शाळांना पैसे दिले ही मोठी चूक केली. व टिळकस्वराज्यफंड शाळांकरितां देऊन विनाकारण उधळपट्टी मात्र केली आहे.

ज्यांनीं एक वर्षांत स्वराज्य देतों असें सांगितलें त्यांनींच ही सुरवात केली आहे. राष्ट्रीय शिक्षणाचा उपक्रम मूर्खपणाचा नसला तरी हास्यास्पद झाला आहे" पहा हीं मुक्ताफळें! याला आतां स्मशानगीत म्हणावें कीं देवदूतांचें गाणें म्हणावें हें आपणच ठरवा. या वाक्यांनीं मात्र राष्ट्रीय शिक्षणाची हानि होत नाहीं! कानिटकर येथें असल्यास मी त्यांस उघड विचारतों कीं, राष्ट्रीय शिक्षणाला म्हणून दिलेले कॉंग्रेसचे पैसे कॉंग्रेसनें उधळले असें म्हणतां तर येथील चिंचवडच्या संस्थेला कॉंग्रेसच्या मार्फत परवां दहा हजार रुपये कां घेतलेत? अंधेरी आश्रमाप्रमाणें तेथेंहि फक्त प्रचारक तयार करण्याचें शिक्षण कां देत नाहीं? (येथें लोकांनींहि कानिटकर यांस उत्तर द्या म्हणून जाब विचारला पण त्यांस उत्तर देतां आलें नाहीं!) मी हा प्रश्न कानिटकर यांस जाहीर रीतीनें विचारितों. यांचीं उत्तरें वाटल्यास त्यांनीं जाहीर करावीं. स्वतःच्या संस्थेला कॉंग्रेसकडून मदत घेऊन पुन्हा स्टेटमेंटमध्यें कॉंग्रेसनें हे पैसे उधळले असें लिहिणें त्यांस शोभत नाहीं.

राष्ट्रीय शिक्षणाची स्थिति सर्वत्र कशी खालावली आहे हें या मंडळींच्या साक्षींवरून मीं आतां आपणास दाखविलेंच आहे. परंतु स्थिति खालावली असें आम्हीं सांगितलें तर हें उघड कां केलें? असा प्रश्न विचारतात. पण ही स्थिति एकट्या माझ्याच साक्षीवरून उघड झाली आहे काय? इतरांनींहि तेंच सांगितलें आहे याचा विचार करा. स्थिति खालावली अशी वस्तुस्थिति सांगितली तर असले खोटे आक्षेप कां घेतले असा प्रश्न विचारतात. पण अशा आक्षेपांना उत्तर न देतां स्वस्थ बसलें तर तें अंगाशीं येतें याचा मला पदोपदीं अनुभव आला आहे. साक्षीमध्यें मीं वस्तुस्थिति सांगितली येवढाच माझा दोष! राष्ट्रीय शिक्षणाच्या खालावलेल्या स्थितीला पुढाऱ्यांच्या अनास्थेची पुस्ती जोडण्यांत आली आहे! महाराष्ट्रांतील पुढारी निष्काळजी आहेत असें घटकाभर कबूल केलें तरी इतर प्रांतांतहि हीच स्थिति कां दृष्टीस पडावी? मद्रासेंत किती शिक्षणसंस्था आहेत? बंगाल्यांतील दासांचें कॉलेज कुठें आहे? लजपतरायांच्या कॉलेजमध्यें मुलें गेलीं पण त्यांना निराश होऊन परत यावें कां लागलें? असा प्रश्न विचारून या थोर पुढाऱ्यांबद्दल मी अनादर दर्शवितों असें कृपा करून आपण मानूं नका. पण एकट्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांना नादान ठरवितांना

जरा आजूबाजूला पहावयास नको काय ? या थोर पुढाऱ्यांचा अपमान करावा म्हणून हें मी सांगत नाहीं; फक्त माझ्या बचावार्थ सांगतों आहें. हे पुढारी मला सर्वस्वीं वंद्य आहेत. आमच्या येथें जी अडचण आम्हांला आहे तीच अडचण त्यांच्यापुढें आहे हें मी जाणतों. आणि म्हणूनच त्यांचीं उदाहरणें मीं घेतलीं. आम्हांला सरसहा दोषी ठरवितांना घारपुरे यांनीं थोडातरी विचार करावयास पाहिजे होता !

माझ्यावरील आणखी आरोप काय, तर मी बडोद्याच्या साहित्य-संमेलनास गेलों. पहा, हा टीकाकार किती अधोगतीला गेला आहे. बरें, गेलों तर गेलों ! पण तेथें टिळकमहाविद्यालयाचा उच्चारहि केला नाहीं म्हणे ! पण ही गोष्ट खरी कशावरून ? सरकारी नोकर, बडोदें सरकार वगैरे इतर सर्व मंडळींनीं असा ठराव केला आहे कीं, मराठी विद्यापीठ महाराष्ट्रांत असणें अवश्य आहे. यांत लोकमान्य टिळकांच्या नांवानें निघालेल्या विद्यापीठाचा उल्लेख नाहीं इतकेंच; पण हा ठराव तेथें सर्व दर्जाच्या लोकांनीं पास केला आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तसेंच न्यू पूना कॉलेजमधील प्रसंगीं मीं या विद्यालयाचा उल्लेख केला होता असें उपवक्त्यांपैकीं एकानें सांगून परस्परच घारपुरे यांचे कान टोचले आहेत. घारपुरे म्हणतात, इतिहासमंडळांत मीं व्याख्यान दिले, तेथें मीं टिळकविद्यालयाचा उच्चार केला नाहीं. पण मीं जाईन तेथें तेथें टिळक विद्यालयाचा उच्चार केलाच पाहिजे असें आहे कीं काय ? युनिव्हर्सिटीचा उल्लेख मीं तेथें केला म्हणून घारपुरे रागावतात; पण मी त्याना असें विचारतों कीं, कायदेभंग कमिटीपुढें जी साक्ष त्यांनीं लिहून पाठविली त्याच्यावर आपल्या नांवापुढें त्यांनीं एम्. ए., बी. एस् सी. ही पदवी जोडली आहे. त्यावांचून त्यांचें काय अडलें होतें ? मीं माझ्या नांवापुढील पदवी केसरींत काढून टाकली आहे. मग यांनाच त्याचा एवढा मोह कां वाटावा ! देवांनीं आपल्या भाषणांत शाळा व कॉलेजांना दारूचे गुत्ते म्हटलें आहे. आम्हाला कांहीं असें बोलतां येत नाहीं. अलंकारशास्त्रांत अतिशयोक्ति खपते, पण व्यवहारांत तसें चालत नाहीं. इतर शाळा व कॉलेजें हे दारूचे गुत्ते असले तर असोत; पण मला मात्र त्यांतून दारू पिऊन बाहेर पडलेला हा एकच पदवीधर दिसतो आहे. एरवीं त्याच्या

तोंडून अशीं बेभान विधानें बाहेर पडतींना. दुकानांत दारू ओतून दारूचें पिंप रिकामें होऊन परत चाललें तरी शिंदीची एकादी फांदी तें आपल्या डोक्यांत खोंचतेंच ! असहकारितावादी म्हणवूनहि सरकारी पदवीचा मोह ज्यांना सुटत नाहीं त्यांना यापेक्षां काय म्हणणार ?

घारपुरे यांचा आमच्यावरील दुसरा एक आक्षेप म्हणजे "तुम्ही असें करतां म्हणून असें झालें. तुम्हाला याहून जास्त करतां आलें असतें." या आक्षेपाला मात्र कोणापाशींच उत्तर नाहीं. याप्रमाणें मी प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला सुद्धां विचारीन कीं, "बाबारे, तूं एवढी सृष्टि निर्माण केलीस पण याहून अधिक करतास तर अधिक झालें असतें." पण आम्हांला जर ही अधिकाची कसोटी लावावयाची तर जे त्या संस्थेंतून पगार घेतात त्यांना ही कसोटी कां लावूं नये ? मी घारपुरे यांना असें विचारितों कीं, आम्ही अविश्वासी, कबूल; पण तुमचा राष्ट्रीय शिक्षणावर जास्त विश्वास आहे आणि तुम्ही पगारहि संस्थेंतून घेतां. तुम्ही शिक्षणाप्रीत्यर्थ काय काय केलें आहे तें तरी कळूं द्या. मला संस्थेतून पगार नाहीं, पण मीं आठवड्यांतून दोन तासपर्यंत वर्षभर विद्यालयांत शिकविलें आहे. पण घारपुरे हे कांहींच शिकवीत नाहींत. मला वेळ मिळेल त्याप्रमाणें मीं टिळक महाविद्यालयांत शिकवीत असतों. तसेंच परवां सस्थेचा खर्च चालण्यास अडचण पडली तेव्हां मीच नेने यांना भीड घालून, त्यांच्याशीं भांडून ज्युबिली फंडापैकीं व्याजाचे ३५०० रुपये टिळक विद्यापीठाकरितां मागून घेतले. लोकमान्य टिळक राष्ट्रीय शिक्षणाचे अभिमानी होते अशी त्यांची ख्याति आहे. पण या विषयावर त्यांचे फक्त दहाबाराच अग्रलेख केसरींत आहेत. समर्थ विद्यालयांत तर तेथील अभ्यासक्रम पहाण्यास ते उभ्या आयुष्यात एकदांहि गेले नव्हते. चिरोल केसच्यावेळीं साक्षींमध्यें त्यांनीं ही गोष्ट शपथेवर सांगितली होती. पैशासाठींहि त्यांनीं एकदांच दौरा काढला होता. महाराष्ट्र गरीब आहे, त्याच्याजवळ पैसा नाहीं ही गोष्ट ते जाणून होते. ज्याच्या पाठीमागें दहा कामें असतात त्याचे असेंच असतें. लो० टिळकांचें उदाहरण मी स्वतःला लावतों असें आपण समजूं नका. टिळकांच्या पादरजाचीहि मला किंमत नाहीं. माझें म्हणणें इतकेंच कीं, अशा स्थितींत जें काय थोडेंबहुत करण्यांत येईल त्याला दूषण देऊं नका. कवें हे मोठी

युनिव्हर्सिटी चालवितात; पण त्यांना असलीं स्मशानगीतें गायचा प्रसंग आला नाहीं. जो निमित्ताला टेंकलेला असतो तोच रडगाणीं गात असतो. विद्यापीठाला पैशांची मदत व्हावी म्हणून मीच त्या स्मारकाचा पैसा विद्यापीठाकडे लावला. पण घारपुरे यांनीं स्वतः जितका पगार आजवर संस्थेंतून घेतला तितकाहि त्यांनीं बाहेरून मिळवून आणला नाहीं. चिंतामण-राव वैद्यांचें वय पहा ! पण वैद्य हे या वयांत स्वतः जितके हिंडले तितके हे पगारी प्रचारक स्वतः हिंडले नाहींत !

मी राष्ट्रीय शिक्षणाचा वैरी आहे असें घारपुरे यांनीं भासविलें; पण आमची राष्ट्रीय शिक्षणाबाबत कल्पना घारपुऱ्यांच्या कल्पनेहून निराळी आहे. घारपुरे यांना राष्ट्रीय शिक्षणाची बरोबर कल्पना नाहीं. बहिष्कार हा नैमित्तिक आहे, पण शिक्षण हें नित्याचें आहे. टिळक राष्ट्रीय शिक्षणाचे अभिमानी होते पण ग्रँट घेण्याच्या ते विरुद्ध नव्हते. कारण शाळेला पैसा पाहिजे. पैशाचा प्रश्न हीच राष्ट्रीय शिक्षणाच्या कामांत एक मोठी अडचण होय. त्यामुळेंच आपणांस हव्या तितक्या राष्ट्रीय संस्था निघूं शकत नाहींत. पंढरपुरास १९०७ सालीं बाळबंटांत त्यांचें व्याख्यान झालें. त्यावेळीं समोर दिसणाऱ्या एका देवळाऱ्या शिखराचे उपलक्षणादाखल उदाहरण घेऊन ते म्हणाले, "मलाहि असें एक देऊळ बांधावयाचें आहे." पण तें 'एकच' असें म्हणाले; अनेक देवळें बांधीन असें त्यांनीं म्हटलें नाहीं !

ग्रँटच्या बाबतींत त्यांचें मत असें होतें कीं, शिक्षणास ग्रँट घेण्यास मुळींच हरकत नाहीं. कारण ग्रँटचा पैसा हा मूळांत लोकांनींच दिलेला असतो. ग्रँटबरोबर जो सरकारी नियंत्रणाचा लगाम येतो तो मात्र त्यांना नको होता. बंगालचे फाळणीचे वेळीं रिसले-सर्क्युलर निघालें व प्रत्येक शाळेनें ग्रँट घेतलीच पाहिजे नाहींतर ती शाळा राजद्रोही असें जाइल्ससाहेब म्हणाले, त्यावेळीं बहिष्कार पुकारला; एरवीं नाहीं. राजकीय शिक्षण शाळेंतून देण्यास अडचण पडते; व्याख्यानांमधून स्वतंत्र विचार मुलांना ऐकावयास मिळाले म्हणजे आपलें काम झालें; एरवीं तीं मुलें सरकारी शाळेंत गेलीं तरी मला चालतील !" असें टिळक म्हणत त्यांतील मर्म हेंच आहे. १९०८ सालीं बाँब प्रकरणांत सांपडलेलीं बहुतेक मुलें सरकारी शाळेंतीलच होतीं. पण सर्वांना सरसकट आपापल्या शाळा सोडून बाहेर

पडा म्हणावयाचें तर, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था लावलीच पाहिजे. मुलगा मोकळा राहिला ही गोष्ट मला पटत नाहीं व माझ्या स्टेटमेंटमध्यें मी असेंच लिहिलें आहे. यांत घारपुरे यांचें मी काय घोडें मारलें आहे, तें त्यांचें त्यांनाच ठाऊक!

दुसरें असें कीं, घारपुरे यांना संस्थेंत मी 'फ्री-हँड' दिला नाहीं असें घारपुरे म्हणतात. पण तेंहि खोटें आहे. संस्थेंत तर त्यांच्याच बाजूच्या मंडळींचें बहुमत आहे. पण हे निमित्ताला टेकलेले, कोणावर तरी दोषाचें खापर फोडायला पाहिजे होतें म्हणून माझ्यावर कोसळले इतकेंच. पण मी कोणाच्याच मार्गांत आड येत नाहीं. त्यांना मी नको असेन तर मी आनंदानें सोडीन. त्यांना संस्थेंत काम करणें नको असेल तर त्यांनीं बेलाशक संस्था सोडावी, मी ती चालवीन. टिळकांचें खरे स्मारक शैक्षणिक असावें ही कल्पना माझी आहे. पुण्यांत असहकारिता सुरू झाली त्यावेळेला, टिळकांचें स्मारक व असहयोगी मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न यांची सांगड घालून मीच हा ठराव स्मारक कमिटीच्या गळ्यांत बांधला. आपण त्यावेळचें प्रोसिडिंग बुक काढून पहा, म्हणजे आपल्या लक्षांत येईल. घारपुरे यांना पाहिजे असेल ती गोष्ट त्यांनीं पत्करावी. त्यांपैकीं कोठल्याहि गोष्टीला मी तयार आहें. किंवा, यापेक्षां उत्तम म्हणजे आपण दोघेहि हातांत हात घालूं व ह्या सर्व गोष्टी विसरून आजवर जसें काम केलें तसेंच पुढे करूं या! मी विसरणारा मनुष्य आहें. त्यांनींहि हें सर्व विसरून जावें. आजच्या प्रसंगीं इतकें बोलावें लागेल अशी कल्पना नव्हती. पण मी तुम्हांला खरोखर सांगतों, घारपुरे यांच्या भाषणानें माझ्या अंतःकरणाला घरें पडलीं! न्यू पूना कॉलेज सोडून प्रोफेसर घारपुरे व फडके बाहेर पडले तेव्हां आम्हीच त्यांना घोड्यावर बसविलें. त्यांपैकीं एक चाबूकस्वार जो घोड्यावर बसला तो घोडाच घेऊन पळून गेला. कोठें? तर शिकारीला! आणि दुसरा आमच्यावरच उलटून हातांतल्या चाबकाचे तडाखे घोडयास मारण्याऐवजीं आम्हांलाच मारूं लागला! परंतु झाल्या गोष्टी विसरावयास मी तयार आहें. घारपुरे यांनीं त्याबद्दल क्षमा मागावी असेंहि मी म्हणणार नाहीं. त्यांनीं आपली दिलगिरी पुढील वर्तनांत नुसती निदर्शनास आणली तरी त्यांत मला समाधान आहे. संस्थेचा उच्छेद व्हावा अशी माझी

इच्छा नाहीं. विनाकारण एकमेकांस नांवें ठेवल्यानें कार्याची हानी होते. अगोदर आपणाकडे माणसें थोडीं, त्यांत अशा उखाळ्यापाखाळ्या काढल्या तर आहेत हींच माणसें दूर होतील !

सरतेशेवटीं, या टिळकविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसंबंधानें मला सांगावयाचें आहे. खरा स्वार्थत्याग माझा नाहीं व घारपुऱ्यांचा तर नाहींच नाहीं. खरा स्वार्थत्याग जर कोणाचा असेल तर तो या टिळक महाविद्यालयांतील मुलांचा आहे ! त्यांनीं हा सर्व वाद विसरून जावा व आपला वेळ उगाच सभा वगैरे भरविण्यांत खर्चूं नये. टिळक महाविद्यालयांतला मुलगा शिकला किती, इकडे सर्वांचें लक्ष लागून राहाणार हें लक्षांत ठेवा. यापेक्षां अधिक मला कांहीं सांगावयाचें नाहीं."

विद्यार्थ्यांना उपदेश*

गुरुवार, ता. १८ रोजीं डेक्कन कॉलेजांत न. चिं. केळकर यांचें विद्यार्थ्यांपुढें व्याख्यान झालें. त्यांतील महत्त्वाचा भाग खालीं दिला आहे.

"मी आज येथें आल्यावर मला एक नवीन गोष्ट कळली. लो० टिळक डेक्कन कॉलेजमध्यें असतांना ज्या खोलींत राहत असत ती खोली तुमच्यापैकीं एकानें मला दाखविली. घ्यावें त्याप्रमाणें उलट द्यावें ही रीतच असल्याकारणानें मीहि आपणांस एक नवीन वाटेल अशी हकीकत सांगतों. १८८३-८४ सालीं डेक्कन कॉलेज हें अजीबात बंद करावें व तें 'नेटिव्ह' लोकांच्या ताब्यांत द्यावें अशी वरिष्ठ अधिकाऱ्यांना बुद्धि सुचली होती व ही गोष्ट अमलांत येती तर एकाद्या युरोपियन प्रिन्सिपालचे ऐवजीं टिळक किंवा आगरकर हे या कॉलेजचे प्रिन्सिपाल झाले असते. आज सर्वच खात्यांत काटकसरीची जरूरी सरकारला भासत आहे व त्याप्रमाणें हें कॉलेज जर बंद झालें तर ती फार इष्ट गोष्ट होईल. सरकारशीं निदान या बाबतींत तरी आमचें एक मत आहे व तुम्हांलाहि ही गोष्ट पटण्याला मला हरकत दिसत नाहीं. स्वराज्याच्या चळवळीचा ओघ पाहतां प्रथम सरकारी कॉलेजें

* केसरी, १९२१.

निमसरकारींत सामील होणें व त्यांचीं पुनः खासगी राष्ट्रीय कॉलेजें होणें ही कालाच्या ओघानें होणारीच गोष्ट आहे.

आज हें कॉलेज ओस पाडावें म्हणून अर्थातच मी येथें आलों नाहीं. पण माझें मत तुम्ही होऊन विचारलेंत तर मी असें स्पष्ट सांगेन कीं, 'ज्यांना शक्य असेल त्यांनीं प्रथम टिळक—कॉलेजांत जाणें चांगलें; हें शक्य नसेल, त्यांनीं निमसरकारींत जावें, व ज्यांना प्रकृतीमुळें किंवा वडील माणसांच्या सक्तीच्या इच्छेनेंच या कॉलेजांत येणें भाग पडेल तेवढ्यांनीं नाइलाज म्हणून इकडे यावें. यदृच्छा किंवा परिस्थिति ही कोणासहि सुटत नाहीं, म्हणून मला कोणालाहि तोडून बोलवत नाहीं, किंवा दोष देववत नाहीं. तुम्ही या कॉलेजांत आहां म्हणून मी तुम्हांस दोष देणार नाहीं. परिणामीं तुम्ही सर्व आमचेच आहां व आमच्या कार्याला उपयोगी पडणारे आहां असा आमचा तुमच्यावर विश्वास आहे. सार्वजनिक कार्याकरितां शेकडों रुपये तुम्ही येथून आम्हांला वेळोवेळीं दिले आहेत; मग तुम्ही आमचे नाहीं असें आम्हीं कसें म्हणावें ? परभृत न्यायानेंच आम्ही तुमच्याकडे पाहतों. कोकिळा आपलीं अंडीं स्वतःच्या घरट्यांत ठेवीत नाहीं, दुसऱ्याच्या घरट्यांत ठेवून उबविते; पण तें अंडें कावळ्यानें उबविलें तरी अंडें फुटल्यावर बाहेर येणार ती कोकिळाच असणार ! तुम्ही सरकारी शिक्षणसंस्थातून युरोपियन प्रिन्सिपालच्या हाताखालीं शिक्षण घेतां, ही स्थिति आम्हाला आवडणारी नसली तरी तुम्हांवर आमचा गैरविश्वास असण्याचें काय कारण ?

अशा स्थितींतहि तुम्हांवर जसा आम्ही विश्वास ठेवूं त्याप्रमाणें तुम्हीहि स्वतःबद्दल विश्वास बाळगला पाहिजे. अशाहि कॉलेजांतून पुढें एखादा टिळकांसारखा माणूस निर्माण होऊं शकतो हें विसरूं नका. मी तुम्हांला कांहीं तरी सांगतों असें नाहीं. ही गोष्ट खरीच आहे. तुम्ही या गोष्टीचा जरूर अभिमान बाळगा. राष्ट्रीय कॉलेजांतलीं मुलें काय व तुम्ही काय, सर्व एकाच खाणींतली माती आहां. तुमची योग्यता त्यांच्याहून मी मुळींच कमी समजत नाहीं. महत्त्वाकांक्षा ठेवाल तर तुम्हांलाहि या परिस्थितींतून बाहेर आल्यावर मोठें होतां येईल. प्रत्येकाची पूर्वायुष्यांतील महत्त्वाकांक्षा सफल होतेच असें नाहीं. 'तुम्ही कोण होणार' म्हणून विचारलें असतां

"मी न्यायाधीश होणार" असें सांगणारा परिस्थितीच्या प्रवाहांत सांपडून नवीन महात्त्वाकांक्षा उत्पन्न होऊन संपादक किंवा मुत्सद्दी होतो. पण याच्या उलट अशीं माणसेंहि दाखवितां येतील कीं, सरकारी व निमसरकारी कॉलेजांतील विद्यार्थ्यांना बाहेर खेचण्याचा चंग बांधून अखेरीस स्वतःच ज्यांनीं सरकारी संस्थांकडे प्रोफेसरी मिळण्याविषयीं अर्ज पाठविले! तात्पर्य, मी अमुक होईनच म्हणून कोणी बढाई मारण्याचें कारण नाहीं. परंतु कोठल्याहि परिस्थितींत मनुष्य असला तरी स्वतःबद्दल योग्य महत्त्वाकांक्षा ठेवणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय, व ती तुम्ही या वयांत अवश्य जागृत ठेवली पाहिजे.

Saints have a past and Sinners have a future हें वाक्य खोलींतल्या भिंतीवर तुम्ही मोठ्या अक्षरांनीं लिहून ठेवा. 'सत्पुरुषांनाहि पूर्वेतिहास असतो तर अनेकवार चुकलेल्या पापी माणसांनाहि भविष्यकालाबद्दल सदाशा ठेवण्यास हरकत कोणती?' ऋषीचें कूळ पाहूं नये अशी म्हणच आहे. स्वतःबद्दल निराश होण्याचें कोणास कधींच कारण नाहीं. जनता ही अत्यंत उदार आहे व थोड्याशा क्षुल्लक सेवेनेंहि ती एखाद्या माणसाचें पूर्ववृत्त सहज विसरून जाते. तुम्हीं देशाच्या खरोखरच उपयोगी पडलांत तर तुम्ही कोणत्या सरकारी शाळेंत केव्हा शिकत होतां हें तुम्हांला पुढें कोणी विचारणारहि नाहीं. टिळकांना कधीं कोणी दोष दिला काय, कीं तुम्ही सरकारी कॉलेजांत शिक्षण घेतलेंत म्हणून? टिळकांनीं अशा प्रश्नास "त्या वेळीं खासगी कॉलेजच नव्हतें त्याला मी तरी काय करूं" असें उत्तर दिलें असतें ही गोष्ट वेगळी! पण उलट तुम्ही "सरकारी कॉलेजांत शिक्षण घेऊनहि इतके मोठे झाला अं? काय तुमची थोरवी!" अशी लोकांनीं टिळकांची प्रशंसाच केली असली पाहिजे.

पण, सत्पुरुषांना पूर्वेतिहास असतो व पापी माणसांना भविष्यकाळ असतो, ही म्हण तुम्हांला विशेषतः कां सांगूं इच्छितो? कारण या वेळीं तुमच्या हातून पाप घडलेलें नाहीं, व अशाच रीतीनें आयुष्यक्रम घालवून पुढें सत्पुरुषाच्या थोर पदवीस पोंचल्यावर आपल्या हातून पूर्वी पाप घडलें होतें असा पश्चात्तापहि करावयाची वेळ तुम्हांस येणार नाहीं. आयुष्याच्या अशा संधिकालावर तुम्हीं उभे आहां, म्हणून या आयुष्याचा वेळ जितका

होईल तितका विद्यार्जनाकडे तुम्हीं लावला पाहिजे 'विद्वान्' ही कांहीं शिवी नाहीं भूषणच आहे. जग विद्वानांच्याच स्वार्थत्यागाला जास्त किंमत देतें हें लक्षांत ठेवा. माणूस स्वार्थत्यागी असेल, पण तो विद्वान् नसेल तर तो त्याच्या अंगीं दोषच आहे असें आपण म्हटलें पाहिजे. विद्वत्ता हें स्वार्थ व परमार्थ यांचें एकच साधन होय. स्वार्थाची पात्रता माणसानें सिद्ध केल्यावरच त्याच्या परोपकाराला तेज चढतें. कवीनें म्हटलेंच आहे कीं, "विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः" ज्याला विकारहेतूच नाहीं तो स्वार्थत्याग तरी कशाचा करणार व अशा स्वार्थत्यागाला विचारतो तरी कोण? विद्वत्ता हा सर्व जगांत उपयोगी पडणारा पासपोर्ट आहे. तो हस्तगत करणें हेंच तुमचें या वेळीं कर्तव्य आहे. स्वार्थत्याग करण्यालाहि पात्रता लागते व ती सर्वांना मान्य होईल अशा विद्वत्तेनेंच मिळते. म्हणून या रुयांत तुम्हां सर्वांना मी एकच गोष्ट सांगेन कीं, 'विद्वान् व्हा.'

वैश्य-विद्याश्रम, सासवनें*

[श्री० तात्यासाहेब केळकर यांनीं ता. १२ रोजीं कुलाबा जिल्ह्यांत दौऱ्यावर असतांना वैश्य-विद्याश्रम, सासवनें या संस्थेस भेट दिली.]

आरंभीं ईशस्तवन झाल्यावर देश० तात्यासाहेब बोलावयास उठले. राजकारण हे स्वतःचें मुख्य कार्य असल्यामुळें राष्ट्रीय शिक्षण-संस्थांशीं व इतर संस्थांशीं आपला कोणत्या स्वरूपाचा संबंध असतो, याचा खुलासा करून व्याख्याते म्हणाले, "राजकीय कार्यांत पडणाऱ्या लोकांना इतर संस्थांमधून उपांग म्हणून बरेंच कार्य करतां येतें. व तसें कार्य माझ्या हातून थोडेंबहुत झालेलें आहे. 'वैश्य-विद्याश्रम' ही संस्था लोकाश्रयास पात्र असून टिळक महाराष्ट्र विद्यापीठाशीं या संस्थेचा संबंध जोडण्याचे कामीं मीं थोडीबहुत मदत केली आहे. राष्ट्रीय शिक्षण हें जरी माझें मुख्य कार्य नसलें तरी या बाबतींत मीं विचार केला आहे.

* तारीख १२ आक्टोबर १९१३

व माझे विचार लौकरच लेखमाला लिहून मी प्रसिद्ध करणार आहें. नेहमीं असें सांगण्यांत येतें कीं, राष्ट्रीय शिक्षण म्हणजे सगळ्या राष्ट्राचें शिक्षण हातीं घेणें. पण वर्गण्या जमवून शिक्षण हातीं घेणें ही कल्पना कशी वेडेपणाची व खोटी आहे, हें सप्रमाण सिद्ध करून दाखवितां येण्यासारखें आहे. सध्यां राष्ट्रीय शिक्षणाचा प्रयोग झाला पाहिजे. स्वराज्याची चळवळ जोरानें चालवून त्याबरोबरच स्वराज्यप्राप्तीनंतर कोणत्या नमुन्याचें शिक्षण द्यावें, याचे प्रयोगहि तितक्याच जोरानें झाले पाहिजेत. शेतीचा दृष्टान्त घेतला तर बीं पेरून रोप उगवल्यावर तें उपटून चिखल केलेल्या जागीं नेऊन लावल्याखेरीज फलनिष्पत्ति होणें शक्य नाहीं. त्याप्रमाणें आज राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयोग झाले, तरी स्वराज्यप्राप्तीवरच त्यांचें यश अवलंबून राहणार. तर असें राष्ट्रीय शिक्षणाचें काम तुम्हां राष्ट्रीय शिक्षणप्रसारकांचें, व त्या नमुन्याचा प्रसार व्हावा म्हणून चळवळ करून शिक्षणाचें खातें हस्तगत करून घेण्याचें काम आमचें. प्रयोगासाठीं अशा संस्थांतून पांचच मुलें जरी पूर्ण स्वावलंबी बनून बाहेर पडलीं, तरी राष्ट्राला खरा लाभ झाला असें म्हणतां येईल. ज्या संस्थेचे नांव घेऊन मुलगा बाहेर पोट भरील तीच संस्था यशस्वी असें म्हणतां येईल. आपली ही संस्था या पद्धतीची आहे, असें दिसतें. कारण, वैश्यसमाजाला स्वतंत्र बुद्धि असून आर्थिक व्यवहार करणें, हें त्यांचें ध्येय आहे. तेव्हां अशा स्वतंत्र संस्थांच्या बाबतींत तुम्हांला यश मिळणें सुलभ आहे. कृषी, गोरक्षण, वाणिज्य ही वैश्यांचीं स्वाभाविक कर्मे आहेत. 'गोरक्षण' मी कोठल्या तरी पोटांत घालतों. आणि तुमच्या या संस्थेनें देशांतील कृषी व वाणिज्य सांभाळणारी पिढी उत्पन्न केली, तरी मोठें कार्य होणार आहे. मला सुशिक्षित वाणी व सुशिक्षित शेतकरी पाहिजेत. सर्वांनींच वडिलार्जित धंदा करावा अशी सक्ति नसावी; तरी पण वडिलार्जित धंद्यांतच यशःप्राप्तीचा संभव जास्त असतो."

सरतेशेवटीं केसरी–मराठा संस्थेतर्फे शंभर रुपयांची देणगी वैश्य-विद्याश्रमास अर्पण केली असल्याचें सांगून दे० भ० तात्यासाहेब केळकर यांनीं आपलें भाषण संपविलें.

राष्ट्रीय शिक्षण*

तारीख २६ रोजीं सांगलीस दे० भ० तात्यासाहेब केळकर यांचें सायंकाळीं ६ वाजतां श्री० केशवराव छापखाने यांचे अध्यक्षतेखालीं सदामुख थिएटरांत "राष्ट्रीय शिक्षण" या विषयावर दीड तास सुश्राव्य व्याख्यान झालें. थिएटर व्यापारी, विद्यार्थी व वकील यांनीं अगदीं भरून गेलें होतें. स्त्रीसमाजहि बराच जमला होता. व्याख्यानास सुरुवात करतांना तात्यासाहेब म्हणाले, "टिळक महाविद्यालय माजी विद्यार्थी-संघातर्फे टिळक सप्ताहांत टिळक महाविद्यालयाचे मदतीकरितां या भागांत मदत मिळविण्याविषयीं विनंति केल्यावरून मी येथें आलों आहें. राष्ट्रीय शिक्षणाचा इतिहास राजकारणाशीं निगडित आहे. साधारणपणें राष्ट्रीय शिक्षणाचा उगम न्यू इंग्लिश स्कूलचे स्थापनेचे वेळीं आहे, असें म्हणतां येईल. आज कालांतरानें त्यांत थोडाबहुत फरक पडला हें खरें; परंतु तत्त्वतः तोच उगम असें म्हणतां येईल. राष्ट्रीय शिक्षणाचें मुख्य अंग म्हणजे "सर्वस्वी स्वतंत्र" या शब्दांनीं व्यक्त करतां येईल. नंतर मध्यम भाषा कोणती असावी, शिक्षण कसें असावें, शिक्षक कोण असावेत, पदव्या कोणच्या असाव्या, वगैरे अनेक दृष्टीनीं त्याचा विचार करतां येतो. सरकारी शिक्षणाशीं स्पर्धा करण्याकरतांच राष्ट्रीय शिक्षणाचा उपक्रम आहे, असें म्हटलें असतां बिघडणार नाहीं. न्यू इंग्लिश स्कूलचे इतिहासावरून जितका व्याप अधिक तितकी भावनेची तीव्रता कमी व स्वतंत्र वृत्ति कमी होते; ही गोष्ट दिसून येते. परंतु शाळेचें कॉलेज केल्यावर चालक मंडळींना हें स्वातंत्र्य राखूं अशी उमेद होती. आज शिक्षणाचा किल्ला सरकारचे हातीं आहे तो आमचे हातीं आला म्हणजे राष्ट्रीय शिक्षणाचा बराचसा प्रश्न सुटल्यासारखा आहे. पुष्कळ लोक विचारतात कीं, तुमच्या शिक्षणांत व सरकारी शिक्षणांत फरक काय ? परंतु असलेला फरकहि जरी बाजूला ठेवला, तरी देखील शिक्षण देण्यामध्यें जी भावना, जें ध्येय व जी फलश्रुति असते, तींतच मुख्य फरक आहे. राजकीय चळवळीपासून निराळ्या

* सांगली, तारीख २६ जुलई १९२१

स्वरूपांत राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न बंगालच्या चळवळीपासून प्रामुख्यानें पुढें आला व त्याप्रमाणें अनेक संस्थाहि त्या वेळीं स्थापन झाल्या. त्यांत समर्थ विद्यालयासारखी दुय्यम शिक्षण देणारी संस्था लो० टिळकांनीं काढली व बंगाल्यांत तर कॉलेज निघालें. त्याचाच हा परिणत परिणाम आहे कीं आज राष्ट्रीय विद्यापीठहि स्थापन झालें आहे. या प्रत्येक चळवळीचे वेळीं राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेची अयशस्विताच सिद्ध होत गेली. न्यू स्कूल, बंगालची चळवळ व म० गांधींची चळवळ, या तीनहि प्रसंगीं वरील अनुभव आला आहे. तरी देखील समुद्राची लाट मागें आली, हें ओहोटीचें लक्षण नसून भरतीचेंच लक्षण आहे. कारण वरील इतिहासावरून राष्ट्रीय शिक्षणाची वृद्धीच होत आहे, हें दिसून येईल. याशिवाय दोन तीन गोष्टीहि आज नाहीं उद्यां झाल्याशिवाय राहत नाहींत. मुंबईची युनिव्हर्सिटी ही उद्यां लोकपक्षाची होणार, याविषयीं माझी अगदीं खात्री आहे. त्याचप्रमाणें सरकारचें जें शिक्षणखातें तेहि लोकपक्षाच्या हातीं येईल व हें स्पर्धेचें अंतर कमी होत जाईल. उदाहरणार्थ, विलायतेंत सरकारी नियंत्रणाखालची अशी युनिव्हर्सिटी नाहीं. इतकें असूनहि तेथें हजारों विद्वान् पदवीधर आहेत. मग येथेंच सरकारी व राष्ट्रीय असा भेद कां? मद्रास इलाख्यांतच सरकारी हायस्कूल नाहीं! मग काय शिक्षण होत नाहीं कीं काय? विलायतेंत कोणतीहि शिक्षणसंस्था जी असते, ती सरकारी सत्तेवर अगर मदतीवर नसून तिला सर्व लोकांनीं दिलेल्या व तिने मिळविलेल्या गुणांवर जगते व म्हणूनच हल्लीं असलेल्या युनिव्हर्सिटीच्या मागें असलेलें जें सरकारचें (Prestige) स्तोम आहे, तें पहिल्या प्रथम मोडण्याच्या कल्पनेचीहि प्रगति म्हणजेच राष्ट्रीय शिक्षणाचा इतिहास होय. टिळक महाविद्यालयाचीच गोष्ट घेऊं. आज संस्था अगदींच लहान आहे हें खरें. राष्ट्रीय शिक्षण पूर्णपणें केव्हां हातीं येईल, याचें उत्तर स्वराज्य हातीं येईल तेव्हांच, असें द्यावें लागेल. मग तोंपर्यंत राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्नच हातीं घ्यावयाचा नाहीं. कीं काय! म्हणूनच हा प्रश्न आज क्षुद्र दिसत असला तरी तो हातीं घेणें प्राप्त आहे. कोणत्याहि मोठ्या कार्याचा उगम हा लहानच असतो. म्हणून हें कार्य पुढें मोठें होणारच नाहीं काय? केंब्रिज किंवा ऑक्सफोर्ड या युनिव्हर्सिट्यांना सरकारचें अधिष्ठान नसतांना इतकें महत्त्व आलें कसें?

तर त्यांच्या मागें विद्यार्थी, पैसा, काळ व शिक्षणाचा उत्कृष्टपणा यांची मोठी परंपरा आहे. ही परंपरा आम्हांला निर्माण करावयाची आहे; परंतु ही परंपरा निर्माण करतांना जुन्या शिक्षपद्धतीला दारूचे गुत्ते असें म्हणणें मला अगदीं पसंत नाहीं. हा पहिला फरक. दुसरा फरक म्हणजे विद्यार्थी जुन्या कॉलेजांतून बाहेर काढण्याचे वेळीं बेजबाबदारपणानें सर्रास आग्रह न धरतां जे विद्यार्थी आत्मस्फूर्तीनें बाहेर येतील, तेवढेच मला पुरेसे वाटले व तेवढ्यांचीच चांगली सोय लावणें हें माझें कर्तव्य असें मला वाटलें व याकरतां मीं लोकांच्या शिव्याहि सहन केल्या. तिसरा फरक असा कीं, शिक्षणाकरितां लहान मुलें न घेतां कॉलेजमधील प्रौढ विद्यार्थी घ्यावेत असें मला वाटतें. खर्च व परिणाम या दोन्ही दृष्टीनीं मी म्हणतों या गोष्टीचा आपण विचार करा. समर्थ विद्यालयाचें उदाहरण आपल्यापुढें आहेच. परंपरा निर्माण करावयाची असें मी म्हणतों, त्या दृष्टीनेहि वरील विचारसरणी आपणांस पटेलसें वाटतें, व म्हणूनच राष्ट्रीय शिक्षणाचें कॉलेजच काढावें व त्याची परंपरा राखण्याकरतां युनिव्हर्सिटीच असणें जरूर आहे असें दिसून येईल. मुंबईच्याच युनिव्हर्सिटीची गोष्ट घ्या. तींत कांहीं युरोपियन, कांहीं तत्सम पार्शी व ख्रिश्चन व उरलेले इतर. हे लोक आमच्या शिक्षणाला काय मदत करणार ? व देशी भाषेच्या द्वारें शिक्षण द्यावें, असें ते काय म्हणणार ? इतक्या वर्षांच्या झगड्यानंतर युनिव्हर्सिटींत आज मातृभाषांचा नुसता प्रवेश झाला आहे ! हल्लीं काय झालें आहे ? तर शिकवा मराठींतून, पण परीक्षा मात्र म्हणे इंग्रजीतून ! म्हणून या युनिव्हर्सिटीची जी ही मायावी इभ्रत पसरली आहे, ती मोडून आपणांस आज नवी परंपरा निर्माण करावयाची आहे. याकरतां एकप्रकारचा संकेत निर्माण केला पाहिजे. विद्येचें एक प्रमाण उपजीविका असें समजूं. मग असे किती तरी धंदे आहेत कीं, येथें पदवी न घेतां शेंकडा ९५ लोक आज जगत आहेत. मग तींहि विद्या कां म्हणूं नये ? व या हल्लींच्या निष्फळ विद्येचा कां नाश करूं नये ? यांत कोणता घातपात आहे ? इंग्लंडनें देखील युद्ध जिंकलें, तें पदवीधरांच्या मंत्रिमंडळाच्या बुद्धिबळावर नव्हे तर देशांतील इतर कर्तृत्ववान् लोकांच्या शहाणपणावर जिंकलें. तेव्हां नुसत्या पदवीवर न जातां मी व्यवहाराला अधिक महत्त्व देतों, असे लोक जर

युनिव्हर्सिटीच्या सेनेटमध्यें घेतले तर काय दोष ? व अशा निष्णात लोकांनीं दिलेल्या पदव्या आम्हीं मानाव्या कीं नाहीं ? ही अब्रू पदवींत नाहीं तर ती देणाऱ्यांच्या कौशल्यावर आहे व हाच संकेत आपण केला पाहिजे आणि ही इभ्रत आपणच वाढविली पाहिजे. या पद्धतीचें शिक्षण घेणारे विद्यार्थी, त्यांना नोकऱ्या देणारे व मानणारे लोक आणि त्यांचा संतोष, ह्याच गोष्टी ही परंपरा वाढविण्यास पुरेशा आहेत. सरकारच्या इतका आपल्याजवळ पैसा नाहीं व तितके विद्यार्थीहि नाहींत. एक शंभर विद्यार्थी जरी अशा या स्वतंत्र युनिव्हर्सिटींतून बाहेर पडले तरी नाहीं का आपल्याला कौतुक वाटणार ? सरकार हल्लींचीं बंधनें व दोष काढून टाकणार नाहीं कारण आज त्यांना हवे तितके विद्यार्थी मिळतात. मग आपण नको का ही अडचण दूर करायला ? हिंगणे युनिव्हर्सिटीचीच गोष्ट घ्या. तिकडे काय कमी आहे ? घुष्कळ पैसा, उत्तम शिक्षक, मोठाल्या इमारती सर्व कांहीं आहे. पण मुली कुठें आहेत ? कारण त्याला सरकारी अधिष्ठान नाहीं ! येवढ्याकरतांच आपणा सर्वांचा संकेत पाहिजे असें मी म्हणतों. प्रारंभ जरी लहान आहे, तरी त्यांतील तत्त्व फार मोठें आहे. ह्या पदवीधरांना आपण चहाणें हें आपलें कर्तव्य व त्यांनीं समाजाची अब्रू वाढविणें हें त्यांचें कर्तव्य, असें हें परस्परावलंबी आहे. आपण केलेल्या मदतीबद्दल मी आपला फार आभारी आहें."

अध्यक्षांनीं थोडक्यांत सुंदरसा समारोप केल्यावर सांगलीतर्फे टिळक महाविद्यालयास १५०० रुपयांवर मदत मिळाल्याचें जाहीर करण्यांत आलें. टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत सभेचें काम संपलें.

प्रासंगिक उद्गार

[असहकारितेमधील स्वानुभव व कांहीं अप्रसिद्ध हकिगती यांसंबंधीं हें टांचण टिळक महाविद्यालयाच्या एका माजी विद्यार्थ्यानें आमचेकडे प्रसिद्धीस पाठविलें आहे, त्यांतील महत्त्वाचा भाग येथें देत आहों. — प्रकाशक.]

ज्या दिवशीं टिळक महाविद्यालय सुरू झालें त्या, म्हणजे अगदीं पहिल्या दिवशीं, प्रथमतः शिक्षक व विद्यार्थी यांची समोरासमोर मुलाखत झाली. सुमारें ५०।६० विद्यार्थी हजर होते. त्या प्रसंगीं गुरुवर्य तात्यासाहेब केळकर, आपटे, करंदीकर वगैरे सर्व शिक्षक हजर होते. प्रास्ताविक भाषणांत गुरु०करंदीकर यांना, पूर्वी सरकारच्या जुलमी वटहुकुमानें आपणांस समर्थ विद्यालय कसें मोडावें लागलें व मुलांप्रमाणें काळजी घेतलेल्या विद्यार्थ्यांची स्वतःला पालकांकडे कशी रवानगी करावी लागली याचें स्मरण होऊन क्षणभर गहिंवरून आलें व त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवरहि झाल्याशिवाय राहिला नाहीं. सरतेशेवटीं तात्यासाहेब यांनीं भाषण केलें त्यांत त्यांनीं जी विद्यार्थ्यांस सावधगिरीची सूचना केली त्याचा गंभीरपणा मला अजूनहि चांगला स्मरतो. ते म्हणाले, "तुम्ही व आम्ही दोघांनीं मिळून आज हा उपक्रम सुरू केला आहे. याचा गंभीरपणा कायम ठेवणें हें तुमचें काम आहे. तुम्ही आतां टिळक कॉलेजांतील विद्यार्थी आहां ही गोष्ट लक्षांत ठेवा, म्हणून चारचौघांत असतांना किंवा एकाद्या सार्वजनिक प्रसंगीं, ज्यावेळीं तुमच्याबद्दल किंवा तुमच्या या कॉलेजबद्दल जेव्हां कोठें हास्यास्पदता उत्पन्न होण्याचा प्रसंग असेल त्या त्या वेळीं तुम्हीं आपल्या गंभीरपणानें त्यावर दाब ठेवला पाहिजे. जे आतां हंसतील त्यांचे दांत दिसतील. He who laughs last laughs best हें वाक्य लक्षांत ठेवा. आतां क्वचित् कोणी तुम्हांला हंसतील तरी पुढें मागें तेच तुमचें कौतुक केल्याशिवाय रहावयाचे नाहींत! "

* * *

सन १९२२ सालीं कौन्सिलवाद हा निंदेच्या दृष्टीनें अगदीं भराला आला असतां पां. वा. गाडगीळ यांचें महाविद्यालयांत "कौन्सिल-

प्रवेश" या विषयावर व्याख्यान झालें. त्या प्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना केळकर म्हणाले, "कौन्सिलप्रवेश हा राजकारणांतील विषय होय. अर्थात् या प्रसंगीं या विषयावर माझें मत तुम्हांस कळावयास पाहिजे असलें तरी मी तें तुम्हांस येथें सांगणार नाहीं. वर्तमानपत्रें किंवा जाहीरसभा यांतून आम्हांला आमचीं मतें मांडून मतप्रचार करतां येतो. म्हणून तुम्हांला माझें मत माझ्या तोंडून मांडलेलें ऐकण्याची इच्छा असली तरी गुरु व शिष्य या नात्याचा मी या प्रसंगीं असा फायदा घेणार नाहीं! भिन्नमतांची बाहेर धुमश्चक्री चालली असतां स्वतःचा किंवा कोणताहि मतप्रचार करण्याचें योग्य स्थान कॉलेज हें नव्हे. तुम्हांला माझें मतच पाहिजे असलें तर तें सभांतून कळेल किंवा खाजगी रीतीनें मताकरितां माझ्याशीं भांडायला या म्हणजे मी आपलें मत सांगेन. अशा चालून आलेल्या प्रसंगाचा फायदा घेऊन मी आपलें मत तुम्हांस पटविणें हें मला बरोबर वाटत नाहीं."

* * *

१९२२ सालीं झालेल्या टिळक महाविद्यालयाच्या संमेलनाचे अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना ते म्हणाले, "दोन वर्षांपूर्वी आम्हीं हें कॉलेज काढलें त्यावेळीं या कॉलेजांत येणारे तुम्ही पहिले विद्यार्थी आहां; थोड्याच दिवसांत शिक्षणक्रम संपवून तुम्ही घरोघरी जाल. येथे येऊन तुम्हीं जे बरेवाईट अनुभव घेतले असतील ते तुम्ही सहजच विसरून जाल, पण या विद्यालयासंबंधींची स्मृति मात्र तुमच्या मनांत अखंड कायम राहील, व ती ठेवावीशी वाटेल. तुमच्या पुढील आयुष्यक्रमाला उपयुक्त व्हावें अशा दृष्टीनेंच येथें तुम्हांस शिक्षण दिलेलें आहे, तें तुम्हास कितपत उपयोगी पडतें किंवा त्याचा तुम्ही काय उपयोग करतां हें पुढें ठरावयाचें आहे. पण तुमच्या विद्वत्तेसंबंधानें किंवा अभ्यासासंबंधानें तुम्हांस एक गोष्ट सांगावयाची आहे ती ही कीं, स्वतः विद्वत्तेपेक्षां विद्वत्तेचा सदुपयोग हाच श्रेष्ठ होय. विद्वत्तेसंबंधानें तीन प्रकार आढळतात. A crafty man hates learning, A simple man admires learning, but a wise man uses learning. अंगीं असलेल्या विद्वत्तेचा सद्यःपरिणामी किंवा सद्यःफलदायी उपयोग केलात तर उपयोग; नाहींतर भाराभर पुस्तकें वाचून नुसता कापूस

पिंजला, पण उपयोगाच्या दृष्टीनें त्यांतून बोटभरहि सूत निघालें नाहीं तर काय उपयोग ?

* * *

१९२३ सालीं कॉलेजमध्यें नवीन मुलें आलीं व कॉलेज सुरू होण्याच्या पहिल्या दिवशीं विद्यार्थ्यांपुढें त्यांनीं प्रास्ताविक भाषण Opening speech केलें. याप्रसंगीं बरेच माजी विद्यार्थी कुतूहलानें हजर राहिले होते. त्यांपैकीं बऱ्याच जणांनीं महाविद्यालयासंबंधीं आपले अनुभव सांगितले. त्यांपैकीं एका विद्यार्थ्यानें असें बोलून दाखविलें कीं, "येथील कांहीं शिक्षकांची भावना आमच्याबद्दल जशा प्रकारची असावयास पाहिजे तशी ती असत नाहीं. निर्जीव द्रव्यावर जसा रासायनिक प्रयोग करून पाहातात त्याप्रमाणेंच हाहि एक राष्ट्रीय शिक्षणाचा 'प्रयोग' आपण विद्यार्थ्यांवर करून पहात आहों असें त्यांना वाटतें!" यानंतर अध्यक्ष या नात्यानें तात्यासाहेब केळकर यांनीं भाषण केलें. ते म्हणाले, "आजच्या प्रसंगीं नवीन विद्यार्थ्यांबरोबर बरेच जुने विद्यार्थीहि या समारंभास आलेले दिसत आहेत. म्हणून या कॉलेजसंबंधीं त्यांना जें कांहीं वाटतें तें त्यांनीं अगदीं मोकळ्या मनानें सांगावें अशाकरितां त्यांनींहि बोलावें असें मीं प्रथम सांगितलें. त्याप्रमाणें अनेकांनीं आपले अनुभव सांगितले. त्यांपैकीं बऱ्याचजणांचे अनुभव समाधानकारक आहेत हें ऐकून मला बरें वाटलें. परंतु तुमच्यापैकीं एकानें न कळत 'प्रयोग' हा जो शब्द वापरला तो जरा मला थोडा लागला. यांत त्याची कांहीं चूक नाहीं. विशेषतः कोणाला उद्देशून किंवा कोणत्या गोष्टीला अनुलक्षून त्यानें हा शब्द वापरला असेल हें मला माहीत नाहीं. पण तें कसेंहि असलें तरी, ज्या भावनेनें आमच्यावर विश्वास टाकून तुम्ही येथें आलां त्याच भावनेनें आम्ही तुम्हांशीं वागलें पाहिजे ही गोष्ट कोणीहि नाकबूल करणार नाहीं. याहून वेगळ्या रीतीनें जर येथें कोणी वागत असेल तर उघडच तें दोषास्पद ठरेल. बेडकाची चिरफाड प्रयोगाकरितांच होत असते; पण ती होतांना त्या बिचाऱ्याला ज्या प्राणांतिक वेदना होत असतात त्याकडे मात्र प्रयोग करणारा दुर्लक्ष करतो! इतकें विकृत स्वरूप अशा भाषेनें जरी बाहेर एकाद्या टीकाकारानें रंगविलें तरीहि तें योग्यच ठरेल!

असो. या प्रयोगासंबंधानें मला इतकेंच म्हणावयाचें कीं, जीं मुलें या

कॉलेजांत आज नव्यानें आलीं तीं हा प्रयोग पाहून आपण होऊनच येथें आलीं. त्यांना या असें आम्हीं सांगितलें नाहीं. तेव्हां यापुरती तरी त्यांची जबाबदारी आम्हांवर नाहीं. जे जुने विद्यार्थी आहेत त्यांनीं आमच्या सांगण्यावरून कॉलेज सोडलें. व त्यांच्याबद्दल आम्ही उघडच जबाबदार आहों. पुढच्या भावी आयुष्यक्रमाला उपयोगीं असें विशिष्ट कांहींतरी शिक्षण प्रथमपासूनच येथें देण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकीं ज्यांनीं त्याचा या दृष्टीनें खरा उपयोग करून घेतला असेल त्यांना तें शिक्षण पुढें किती उपयोगीं पडतें किंवा त्याचा ते किती उपयोग करतात तें दिसावयाचें आहे. व हें ऐच्छिक शिक्षण अजूनहि अपुरें पडतें असें दिसल्यास वाटल्यास तुम्ही सांगाल त्या त्या विषयांत अजूनहि एक वर्षभर तुम्हाला शिक्षण देण्याची आम्ही व्यवस्था करूं. ज्यांनीं हें शिक्षणच प्रथमपासून अशा दृष्टीनें घेतलें नसेल त्यांच्याबद्दल मात्र नाइलाज आहे. तुम्हाला भावी आयुष्यक्रमाला उपयोगीं पडावा अशा सद्धेतूनेंच हा प्रयोग आम्ही तुमच्या सल्ल्यानेंच केला. अठरा वर्षांचे आंतील मुलांची जबाबदारी मी घेतली नाहीं! जाणत्या मुलांकरितां म्हणूनच हें कॉलेज काढलें व पुढें काय? हा तुमचा प्रश्न तुम्हाला सोडवितां यावा म्हणून आम्हीं प्रामाणिक प्रयत्न करून पाहिला. याहि उपर ज्यांना खरोखरीच असें वाटत असेल, कीं हा प्रयोग फसला त्यांनीं खुशाल तसें म्हणावें. त्याला काय करणार? पण अशा विद्यार्थ्यांच्या दृष्टीनेंहि मी सांगतों कीं, आम्ही दिलेलें शिक्षण व तुम्ही घेतलेले श्रम व्यर्थ गेले असें जरी घटकाभर मानलें तरी, तुम्हीं पुढील प्रश्न सोडविण्यास जो मार्ग शोधून काढाल किंवा सुचवाल त्यामध्यें तुम्हांस हवी असेल ती मदत देण्यास आम्ही तयार आहों. घटकाभर मी तुम्हांस असेंहि सांगेन कीं, हा प्रयोग फसला असें तुम्ही म्हणण्यांत एकट्या आमचीच फजिती होते असें नाहीं, तुमचीहि होते. आपण दोघांनीं मिळून हा प्रयत्न करून पाहिला. साधलें तर यांत दोघांनाहि भूषण; फसलें तर दोघांचीहि फजिती! म्हणून प्रयोग साधला किंवा फुकट गेला हा विचार पुढील आयुष्यक्रमाच्या दृष्टीनें क्षणभर मनाशीं केला तरी, फसला म्हटल्यानें तुमची पुढील प्रश्न सुटत नाहीं! म्हणून प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें जो विचार तुम्ही ठरवाल त्यांत तुम्ही मागाल व आम्हांला जी शक्य, ती मदत आम्हीं आनंदानें देऊं.

ज्यांनीं या कॉलेजांत शिक्षण घेतलें नाहीं, परंतु इकडच्या परीक्षेला बसून पदवी घेतली त्यांचेंहि बरें चाललें आहे हें उदाहरणादाखल मला सांगावेसें वाटतें. अशा विद्यार्थ्यांपैकीं म्हणजे, वि. प्र. लिमये, खाडिलकर व केळकर हे होत. केळकर, यांनीं सरकारी एंजिनीअरिंग कॉलेजांत शिक्षण घेतलें; पण पदवी येथें घेतली. तसेंच नुकताच दवाखाना उघडलेले डॉक्टर ल.शू. झाडावर चिकून तयार झालेलें फळ जसें तोडून घ्यावें, तसें या मुलानें मेडिकल कॉलेजांत पांचव्या वर्षांत असतां तें कॉलेज सोडलें व इकडची पदवी घेतली! त्यांचा दवाखाना चांगला चालला आहे हें ऐकून मला फार बरें वाटलें. देव त्यांचे पुढेंहि असेंच बरें करो!

* * *

मला आतां क्षणभर गहिंवरून आलें याचें कारण मुलांच्याबद्दल मला वाटत असलेली एक प्रकारची प्रेमबुद्धि होय. त्यामुळें माझ्या हातून कोणाहि विद्यार्थ्याचें नुकसान होऊं नये असें मला नेहमीं वाटतें. म्हणून सर्वांना सरसकट कॉलेज सोडा असें मला तोडून सांगतां येत नाहीं. हा माझ्यांत दोष आहे असेंहि वाटल्यास म्हणा.

कित्येकांनीं आम्हांस पुढें नोकऱ्या मिळणार नाहींत असें सांगितलें. नोकरीच्या लायकीला या पदवीपेक्षां सरकारी युनिव्हर्सिटीची पदवी थोडी अधिक उपयोगी पडेल यांत शंका नाहीं. पण शेकडा सरकारी नोकऱ्या तरी किती आहेत? त्या पांचाहून अधिक नाहींत. सध्यां मुंबई युनिव्हर्सिटीच्या बी. ए.ना तरी नोकऱ्या कोठें मिळतात? याचीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील. त्यांनाहि कोठें इकडेतिकडे खासगी नोकऱ्याच पहाव्या लागत आहेत. तुमच्याआमच्या प्रयत्नानें त्या तुम्हांसहि मिळूं शकतील. व्यापारविषयाची पदवी मिळालेल्या येथल्या कोणाहि विद्यार्थ्यास एकादा व्यापारी आपल्या दुकानांत हाताखालीं ठेवण्यास कमी मानणार नाहीं. सरकारी पदवी न मिळाल्यामुळें आजची स्थिति पाहतां तुमचें पांच किंवा दहा टक्के नुकसान झालें आहे इतकें मी कबूल करतों; पण त्या पदवीऐवजीं तुम्ही ही पदवी घेतलीत यामुळें तुमचें यापेक्षां जास्त नुकसान झालें किंवा सर्वस्व बुडालें असें मानण्याला मी तयार नाहीं. तुमचें जें थोडेंसें नुकसान झालें आहे तें

तुम्हीं मनांत आणलेंत तर तुम्हांला थोड्याफार श्रमानें भरून काढतां येईल व मग दर्जा या दृष्टीनें त्यांच्यांत व तुमच्यांत फरकहि राहणार नाहीं.

* * *

तारीख १६ डिसेंबर १९२१ रोजीं सरकारनें जुलमी वटहुकूम काढून पुण्यांत सुमारें सहा महिने शांततेनें चालूं असलेलें पिकेटिंग एकदम बंद केलें ! याच वेळेला बंगाल्यांत दासबाबूंना गिरफदार करण्यांत आल्या-कारणानें त्यांचें अभिनंदन करण्याकरितां पुणें व लष्कर येथील लोकांची शिवाजीमंदिरांत प्रचंड जाहीरसभा भरली होती. या सभेस जमला होता इतका प्रेक्षकवर्ग पुण्यांतील सभांना क्वचित् प्रसंगीं लाभतो. सुमारें सहा हजार श्रोतृसमुदाय जमला असून सर्व जातींचे व मतांचे लोक हजर होते. शेंदीडशें स्त्रियाहि सभेस हजर होत्या.

बुधवारींच प्रथम दे० भ० तात्यासाहेब केळकर यांच्या नेतृत्वाखालीं पिकेटिंग-मनाईच्या हुकुमाचा भंग करण्यास सुरवात झाल्यामुळें सभेंत यासंबंधानें कांहीं तरी भाषणें होणार अशी अपेक्षा धरून कित्येक लोक सभेस हजर राहिले होते. परंतु कायदेभंग करणाऱ्या मंडळींना पकडण्यांत न आल्यामुळें सर्व मंडळी तशीच सभेच्या वेळीं शिवाजीमंदिरांत येऊन दाखल झाली. व पकडली जाणारी मंडळी फिरून आपल्यास पहावयास मिळाली यास्तव दे० भ० तात्यासाहेब व भोपटकर प्रभृति मंडळी सभास्थानीं येतांच त्यांचें टाळ्यांच्या कडकडाटांत स्वागत करण्यांत आलें. कर्तव्यकृत्य व्यक्तीनें आपणांस कृतकृत्य केल्यानंतर ज्याप्रमाणें तिच्या चेहेऱ्यावर कर्तबगारी-चा छाप दिसतो व वाणींत एक प्रकारचें सामर्थ्य उत्पन्न होतें. तसाच प्रकार ह्याहि प्रसंगीं दिसून आला. सभेच्या कामास सुरवात करितांना रा० गद्रे यांनीं केळकर यांची स्तुति करून त्यांस अध्यक्ष होण्याची सूचना केली व भाऊसाहेब लवाटे यांनीं "आजच्या सभेचें अध्यक्षस्थान घेण्यास सर्व पुणें शहरांत केळकर यांशिवाय दुसरा लायक माणूस नाहीं" अशा आदर व गौरवयुक्त शब्दांनीं वरील सूचनेस अनु-मोदन दिलें. एकदोन दिवसांपूर्वीच शिवाजीमंदिरांत नाफेरवाल्यांची अकोला परिषदेबद्दल सभा भरली होती. त्यांत केळकर व भोपटकर यांस असभ्य व निंदास्पद शिव्यांची लाखोली वाहिली गेली होती; इतकेंच नव्हे

तर, कांहीं नाफेरवाल्यांनीं लांब जीभ करून वाटेल ते शब्द तेथें बोलून घेण्याची आपली हौस पुरवून घेतली! लवाटे यांची यावेळची स्तुति-पुष्पांजली म्हणजे एक प्रकारची उलट प्रतिक्रियाच होती. त्यामुळें किंचित् वाईट वाटून, प्रक्षुब्ध शब्दांनीं केळकर म्हणाले, "मला आतां चांगलीं व वाईट दोन्ही विशेषणें सोडून द्या. कारण चांगल्या विशेषणांना मी पात्र नाहीं, व वाईट विशेषणें निर्लज्जपणाचीं आहेत. मला वाटतें, आतां दिवसेंदिवस सभा भरविणें देखील कमी करावें. जों जों कार्य करण्याचा काळ समीप येत जातो तों तों भाषणें करण्याचें मान कमीच होत गेलें पाहिजे. आपण श्री० दास यांचें अभिनंदन कां करितों? तर त्यांच्यांत व आपल्यांत अजून द्वैत आहे म्हणून! ते तुरुंगांत जातात व आपण घरीं स्वस्थ बसतों, म्हणून द्वैत आलें! हें द्वैत घालविलें पाहिजे. आतां कार्य करण्याचा काळ आला आहे. तुरुंगांत जो जातो त्याचें अभिनंदन कसलें करितां? काय त्याला तेथें सुख होत असतें? कदन्न भक्षण करून तुरुंगवास कंठण्यांत काय सुख आहे? कां तें आपणाला होत असतें? फार काय पण जे तुरुंगांतील हालअपेष्टा भोगावयास लावतात त्या सरकारचे मुख्य रेडिंग साहेब म्हणतात कीं, आम्हांला देखील हे लोक तुरुंगांत जातात हें पाहून वाईट वाटतें! तेव्हां तुरुंगांत जातात त्यांचें अभिनंदन करितों असें म्हणण्याऐवजीं त्याचें समर्थन करितों असेंच म्हणावें; कारण तेंच सार्थ आहे व तें सार्थ आहे हें कृतीवरून दिसणार आहे. आतां कृतीची वेळ आली आहे; शब्दांची गेली. यंदाची काँग्रेस तरी कशी काय पार पडते ही एक काळजीच आहे. कारण काँग्रेसच्या अधिकाऱ्यांपैकीं त्यावेळेपर्यंत कोण जाग्यावर राहतो व कोण नाहीं कोणास ठाऊक! सरकारनें वाटेल त्या नांवाखालीं काँग्रेसवाल्यांना पकडण्यास सुरवात केली आहे. आपण आपल्या कृतीचा गाजावाजा न करितां जेवढें करितां येईल तेवढें करावें. ज्याला करावयाचें असेल त्याला पुष्कळ वाव आहे. परंतु बोलणें व वागणें यांच्यांत मेळ पाहिजे."

यानंतर भोपटकर यांनीं दासबाबूंचें समर्थन करण्याचा ठराव पुढें मांडतांना आवेशयुक्त भाषण केलें. ते म्हणाले, "सरकारच्या अरेरावी-विरुद्ध जनतेचें हें एक प्रकारचें बंडच आहे. महाराष्ट्रीय पुढाऱ्यांवर ते

असेच आहेत, ते तसेच आहेत असे दोषारोप लावण्याचा कित्येकांनीं सपाटा चालविला आहे. मी तर सरकारनें असला दडपशाहीचा हुकूम करावा याची वाटच पहात होतों. पण लक्षांत ठेवा कीं, महाराष्ट्र ही वीरांचीच खाण आहे!"

या ठरावावर गाडगीळ, मारुतीबोवा, बाबुराव फुले यांचीं भाषणें झाल्यावर दुसरा ठराव श्री० बाबुराव गोखले यांनीं पुढें मांडला. त्यांत पिकेटिंगच्या मनाईचा हुकूम मोडून तुरुंगांत जाण्यास विनंति करण्यांत आली होती. त्यावर प्रो० घारपुरे व बाळूकाका कानिटकर यांनीं भाषणे केलीं. त्यांत या नाफेरवाल्यांनीं "राष्ट्राचा भार तरुण पिढीवर आहे; म्हणून विशेषतः विद्यार्थ्यांनींच कायदेभंग केला पाहिजे" अशा रीतीनें त्यांस चेतविण्यास कमी केलें नाहीं. व्यापाऱ्यांतर्फे गोडसे यांनीं आपण कायदेभंगास तयार असल्याचें सांगून व्यापारीवर्गास तशी विनंति केली. यानंतर भाऊसाहेब लवाटे यांनीं भाषण केलें. गेल्या दोन महिन्यांत पिकेटिंग शांततेनेंच चाललें होतें व नांवाला देखील अपराध झाला नव्हता! व याचा परिणाम अधिकाऱ्यांवरहि झाल्याशिवाय राहिला नाहीं. गुत्तेदार लोक रोज त्यांच्या हातापायां पडून पिकेटिंग उठविण्याबद्दल विनंति करीत. पण पिकेटिंग बेकायदा ठरवून, असलेल्या शांततेचा भंग मी करूं इच्छीत नाहीं असें कलेक्टर यांनींच गुत्तेदार लोकांना साफ सांगितलें होतें! पण सरकारनेंच हडसनसाहेबांच्या द्वारें हा जुलमी हुकूम काढला व त्यामुळेंच पुणें शहरांत शेंकडों ठिकाणीं बेकायदा रीतीनेंहि दारू बोकाळूं लागली, वगैरे हकीकत त्यांनीं कळकळीनें व करुणास्पदरीतीनें सांगून, ठराव कृतीनें पसंत करून दाखवा अशी विनंति केली.

यानंतर अध्यक्ष या नात्यानें समारोपादाखल भाषण करितांना केळकर म्हणाले, "कायदेभंग करण्याचा उत्साह व तयारी आज मला येथें पुष्कळांची दिसत आहे. परंतु नाइलाजानें मला कांहींजणांना नाराज करणें भाग पडत आहे. त्यांपैकीं भाऊसाहेब लवाटे, तात्यासाहेब करंदीकर व गाडगीळ या मंडळींना मुद्दाम व्यवस्था व शिस्त राखण्याकरितां मागें ठेवलेलें आहे. या विषयाशीं संबंध या दृष्टीनें भाऊसाहेबांची योग्यता आपणांस माहीत आहे. तेव्हां या बाबतींत तेच मुख्य आहेत असें समजून त्यांच्या हाता-

खालीं काम करण्यास आपण तयार झालें पाहिजे. गाडगीळ यांनीं मला कायदेभंगाबद्दल विचारलें होतें; पण मींच आग्रहानें भाऊसाहेबांच्या बरोबर व्यवस्था पाहण्याकरितां म्हणून त्यांना मागें ठेविलें. कायदेभंग झाला तरी चालू संस्था पुढें चालल्याच पाहिजेत; म्हणून केसरीकरितां करंदीकर यांस ठेविलें आहे. तसेंच आजच्या सभेंत सौ० इंदुमतीबाई नाईक यांनींहि बोलूं देण्याबद्दल इच्छा दर्शविली. परंतु त्यांना आज मी मुद्दामच नको म्हटलें! इंदुमतीबाई या फार चांगलें बोलतात. कांहीं वेळीं त्या माझ्याविरुद्ध बोलल्या तरी मला त्यांचें भाषण आवडतें; पण मीं आपणांस विचारतों कीं, पुण्यांतील लोकांना कायदेभंग करण्यास लावण्याकरितां त्यांना बायकांनीं टोंचावें लागतें काय? पुण्यांत इतकें अवसान नाहीं काय? कित्येकांनीं आज तरुण विद्यार्थ्यांना कायदेभंग करण्यास सांगितलें आहे! पण मी सर्वांना उघड विचारतों कीं, तरुण विद्यार्थी व स्त्रिया यांनाच प्रथम चळवळीच्या तोंडाशीं यावयाला पुण्यांतील सर्व प्रौढ माणसें मेलीं आहेत काय? मी विद्यार्थ्यांना देखील यावेळीं यावयास सांगणार नाहीं; चळवळीचे पाय पाठीमागें ओढले म्हटलेंत तरी फिकीर नाहीं! पुण्यांतील प्रौढ माणसांची बुद्धि जागी असेल तर यावेळीं फक्त पांचशें माणसें पाहिजे आहेत. मी आपणांपुढें पदर पसरतों, कृपा करून येवढी भिक्षा आपण मला घाला! विद्यार्थ्यांना पुढें करण्याऐवजीं, जे संसार करीत आहेत अशा प्रौढ लोकांनींच यावेळीं पुढें झालें पाहिजे. ज्या वेळीं असें सिद्ध होईल कीं, पुण्यांत प्रौढ माणसें तयार नाहींत त्या वेळीं मग बायकापोरांना बोलावूं!

हा अन्यायी कायदा मोडून तुरुंगांत गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं. वरून हिंदुस्थानसरकारचे हुकूम न सुटते तर आज दडपशाहीची सुरवात करावयास येथल्या अधिकाऱ्यांना तरी कोठें हवी होती? पण वर हिमालयावर बर्फ पडूं लागलें, तेव्हां ही थंडी येथें आली! दारू थांबण्याबद्दल नीतीचा प्रश्न क्षणभर बाजूस ठेवा; पण मी सांगतों कीं, सरकारनें प्रथम अबकारी कायदा मोडला म्हणून तुम्ही हा सरकारचा हुकूम मोडा! दिवसाचे चोवीस तास दुकानें उघडीं ठेवावीं व चोरून दारू विकावी असें तरी कोणत्या अबकारी कायद्यांत सांगितलें आहे? सरकारनें स्वतः

केलेला कायदा मोडून वटहुकूम काढला तर तो पायाखालीं तुडविण्यास हरकत कोणती ? मला तूर्त हजार माणसें नकोत, दोन हजार नकोत. मोठे आंकडे माझ्या तोंडून निघत नाहींत. फक्त पांचशें माणसें पाहिजे आहेत. जर पुण्यांत इतकीं मिळत नसलीं तर मग कसलें करतां राजकारण ! दीड लाख वस्तींत अशा आणीबाणीच्या वेळीं स्वार्थत्याग करण्यास पांचशें माणूसहि न मिळेल तर तुमची सर्व चळवळ अयशस्वीच झाली असें मी म्हणेन ! कायदेभंग करण्यास तयार अशा पांचशें प्रौढ माणसांची भिक्षा मला घालावी, येवढीच माझी आपणांस प्रार्थना आहे."

अशा रीतीनें हीं अत्यंत आवेशयुक्त भाषणें झाल्यावर ही संस्मरणीय सभा समाप्त झाली. इतर पुढाऱ्यांइतकेच केळकर हेहि दडपशाहीचे शत्रु हें तर खरेंच; पण इतर पुढाऱ्यांपेक्षां केळकर यांचें वैशिष्ट्य त्यांच्या तरुण विद्यार्थ्यांविषयीं असलेल्या वृत्तींत आहे; व हें या प्रसंगीं निदर्शनास आल्याखेरीज राहिलें नाहीं.

पुण्यांत कायदेभंग सुरू झाला. टिळक-महाविद्यालयांतील बहुधा सर्व शिक्षकांनीं त्यांत भाग घेतला. त्यामुळें साहजिकच विद्यार्थ्यांनाहि आपलें कर्तव्य काय हें कोणीं वेगळें सांगण्याचें कारण पडलें नाहीं. यापूर्वी झालेल्या मुळशीच्या सत्याग्रहांत गुरुवर्य करंदीकर, परांजपे यांच्या उदाहरणानें तीन चार विद्यार्थ्यांनीहि तुरुंगवास भोगलाच होता; पण यावेळीं सुमारें तीस पस्तीस विद्यार्थ्यांनीं पिकेटिंग केलें ! याच सुमारास एकवेळ तात्यासाहेब हे कॉलेजात आले होते. विद्यार्थ्यांनीं पिकेटिंग करण्याची आपली तयारी असल्याचें त्यांस कळविलें. तेव्हां ज्यांची तयारी असेल त्यांनीं खुशाल पिकेटिंग करावें असें त्यांनीं मोठ्या आनंदानें सांगितलें. इतक्यांत एका विद्यार्थ्यानें सावधगिरीचा विचार म्हणून असा एक प्रश्न विचारला कीं, "समर्थविद्यालयाप्रमाणें या गोष्टीचा याहि कॉलेजवर परिणाम तर होणार नाहीं ना ?"

यावर केळकरांनीं ताबडतोब उत्तर केलें, "तसें झालें तर सर्वोत्तम त्यासारखी उत्तम गोष्ट दुसरी नाहीं."

प्रथम खंड समाप्त